# पुस्तपालन आणि लेखाकर्म

## इयत्ता ११ वी



व्यवहार
लेखा पुस्तके
निव्वळ नफा
व्यवसाय
एकेरी नोंद
देयता
रोजकिर्द
द्विनोंद
खरेदी
उचल
NEFT
संपत्ती
खाते पुस्तक
कसर
GST
IFRS
जमा
मालकाचा निधी
भांडवल



RTGS
किरकोळ ऋणको
विक्री

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २०.०६.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे

# पुस्तपालन आणि लेखाकर्म

## इयत्ता अकरावी

२०१९

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११ ००४.

I6B8T6

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Cd द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : 2019

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे - ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**वाणिज्य शाखा मुख्य समिती**

| | |
|---|---|
| श्री. सुरेंद्र निरगुडे | (अध्यक्ष) |
| डॉ. मुकुंद तापकीर | (सदस्य) |
| डॉ. प्रशांत साठे | (सदस्य) |
| डॉ. ज्योती गायकवाड | (सदस्य) |
| श्री. मोहन साळवी | (सदस्य) |
| श्री. महेश आठवले | (सदस्य) |
| श्रीमती अनंतलक्ष्मी कैलासन | (सदस्य) |
| श्री. नारायण पाटील | (सदस्य) |
| श्रीमती लक्ष्मी पिलाई | (सदस्य) |
| श्रीमती मृणाल फडके | (सदस्य) |
| श्रीमती उज्ज्वला गोडबोले | (सदस्य-सचिव) |

**पुस्तपालन व लेखाकर्म- राज्य अभ्यासगट सदस्य**

श्री. विलास पोतदार
डॉ. नरेंद्र पाठक
श्री. संजीव मोरे
श्री. अब्दुल रऊफ
श्री. सुभाष मोरे
श्री. गणेश चन्ना
श्री. अनिल कदम
श्री. अनिल कापरे
श्रीमती लक्ष्मी रा. अय्यर
श्री. आप्पासाहेब दोरकर
डॉ. अनघा काळे
श्री. बी.एस्. कुंभार
श्रीमती ज्योती भोरे

**भाषांतरकार**

श्री. अब्दुल रऊफ
श्री. अनिल कदम
श्री. संजय पंदीकर

**समीक्षक**

श्री. अनिल कापरे
श्री. सुरेंद्र निरगुडे
श्री. संजीव मोरे
श्री. संजय पंदीकर

**मुख्य समन्वयक**

श्रीमती प्राची रवींद्र साठे

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. संदिप कोळी, चित्रकार, मुंबई
श्री. गणेश चन्ना, सोलापूर

**अक्षरजुळणी**

बलदेव कम्युटर्स मुंबई

**समन्वयक**

**उज्ज्वला श्रीकांत गोडबोले**
प्र. विशेषाधिकारी गणित,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

**सच्चितानंद आफळे**
मुख्य निर्मिती अधिकारी
**संजय कांबळे**
निर्मिती अधिकारी
**प्रशांत हरणे**
सहायक निर्मिती अधिकारी

**कागद**

७० जी.एस.एम.क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

N/PB/2019-20/7,000

**मुद्रक**

S GRAPHIX ( INDIA ) PVT. LTD., THANE

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक**
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई २५

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

## प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून इयत्ता ११ वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार तयार करण्यात आलेले पुस्तपालन व लेखाकर्म या विषयाचे पुस्तक आपणास सादर करताना विशेष आनंद होत आहे.

वाणिज्य शाखेचा विद्यार्थी व्यवसाय, व्यवस्थापन, वित्त अर्थशास्त्र, कॉस्टिंग, इत्यादी विषयांचा अभ्यास करतो. पुस्तपालन व लेखाकर्म हा वाणिज्य शाखेतील एक अतिशय महत्वाचा विषय आहे. यामध्ये विविध व्यावसायिक संघटन प्रकाराच्या आर्थिक व्यवहारांचा अभ्यास केला जातो. अकरावीचे विद्यार्थी हा विषय प्रथमच शिकत असल्यामुळे प्रत्येक घटकाचा तपशील सोप्या पद्धतीने देण्यात आलेला आहे. पुस्तपालन व लेखाकर्म या विषयातील घटकांची मांडणी करताना त्यामधील मूलभूत संकल्पना सहज स्पष्ट होतील असा विचार केलेला आहे. पुस्तकामध्ये आवश्यक त्या ठिकाणी तक्ते, चित्रे इत्यादिंचा समावेश केलेला आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वाध्याय दिलेला आहे. तसेच विविध संकल्पना स्पष्ट होण्यासाठी विविध उदाहरणे सोडविण्यासाठी दिलेली आहेत. प्रत्येक घटकाच्या शेवटी QR कोड देण्यात आलेला आहे, या माध्यमातून विद्यार्थी संबंधित घटकाचे विशेष ज्ञान प्राप्त करू शकेल व स्पष्टता मिळवू शकेल.

सदर पुस्तकामध्ये पुस्तपालन व लेखाकर्म विषयाच्या मूलभूत संकल्पना, उद्दिष्ट्ये, अर्थ व हेतू, लेखांकनाच्या संकल्पना, संकेत, खात्यांचे वर्गीकरण, नोंदी करण्याचे नियम, विविध महत्त्वाची कागदपत्रे व दस्तऐवजे, रोजकिर्द, खातेवही इत्यादी ते अंतिम खात्यापर्यंतचा सर्व समावेश केला आहे. तसेच यामध्ये काही नवीन व्यवहारात उपयोगात येत असलेल्या संकल्पनांचा / साधनांचाही समावेश केलेला आहे. उदा. GST, NEFT, RTGS, Debit Card, Credit Card, e-wallet इत्यादी याशिवाय विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष व्यावहारिक ज्ञान वाढवण्यासाठी त्यांना विविध प्रकारचे कार्य/ उपक्रमही दिलेले आहेत.

यापुस्तकाचे समिती सदस्य, अभ्यासगट सदस्य, समीक्षक, गुणवत्ता परीक्षक आणि ज्यांनी हे पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी सहकार्य केले त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

विद्यार्थी, शिक्षक व विषयतज्ज्ञ या पाठ्यपुस्तकाचे स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.

**(डॉ. सुनिल मगर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक** : २० जून २०१९,
भारतीय सौर : ३० ज्येष्ठ १९४१.

## विषय : पुस्तपालन आणि लेखाकर्म
## अकरावी वाणिज्य
## क्षमता विधाने

| घटक क्र. | घटक | क्षमता विधाने |
|---|---|---|
| १. | पुस्तपालन व लेखाकर्म परिचय | • विद्यार्थ्याला लेखाकर्माचा अर्थ, गुणवैशिष्ट्ये व वर्गीकरणाचे महत्त्व आकलन होते.<br>• विद्यार्थ्यांना लेखांकिय परिभाषा व संकल्पनांचे आकलन होते.<br>• विद्यार्थ्यांना पुस्तपालनाची भूमिका व फायदे ज्ञात होतात.<br>• विद्यार्थ्यांना अस्तित्वात असलेल्या लेखाकर्माच्या मानांकनासंबंधी जागरूकता येते. |
| २. | पुस्तपालनाची व्दिनोंद पद्धती – अर्थ व मुलतत्त्वे | • विद्यार्थ्यांना व्दिनोंदी पद्धतीच्या प्रमुख मुलभूत तत्वांचे आकलन होते.<br>• विद्यार्थ्यांना खात्यांचे प्रकार व वर्गीकरण यांचे आकलन होते.<br>• विद्यार्थी व्यवहाराचे वर्गीकरण करताना सोनेरी नियमांचा वापर करतो.<br>• विद्यार्थी व्यवहारांचे वर्गीकरण व लेखांकिय सूत्राचा तक्ता तयार करतो. |
| ३. | रोजकोर्द / पंजी | • विद्यार्थी लेखांकनाची कागदपत्रे / दस्तऐवजे तयार करतो.<br>• आर्थिक व्यवहारांच्या परीणामांचे (नावे – जमा) आकलन विद्यार्थ्यांस होते.<br>• विद्यार्थी रोजकिर्दीच्या प्रमाणित रचना करतो.<br>• विद्यार्थी वस्तु खरेदी विक्रीवरील वस्तु व सेवा कराची (GST) गणना करू शकतो.<br>• विद्यार्थी वस्तु विक्रीवरील वस्तु व सेवा कराची गणना करू शकतो.<br>• विद्यार्थी रोजकिर्द नोंद बिनचूक करू शकतो. |
| ४. | खातेवही / प्रपंजी | • विद्यार्थी रोजकिर्द वरून खातेवहीत नोंद करू शकतो.<br>• विद्यार्थी विविध खात्यांचे संतुलन करतो.<br>• विद्यार्थी तेरीजपत्रक तयार करू शकतो. |
| ५. | सहाय्यक पुस्तके | • विद्यार्थ्यांना सहाय्यक पुस्तकांचा अर्थ व गरजांचे आकलन होते.<br>• विद्यार्थ्यांना विशेष रोजकिर्द मध्ये प्रत्यक्ष नोंदी करता येतात.<br>• विद्यार्थी विविध रोख व उधारीच्या व्यवहारांचे वर्गीकरण करू शकतो.<br>• विद्यार्थी रोख पुस्तकांमध्ये आर्थिक व्यवहारांची नोंद करून संतुलन करतो.<br>• विद्यार्थी बँक व्यवहारांचे लेखांकन व प्रति नोंदी करू शकतो.<br>• विद्यार्थी विविध सहाय्यक पुस्तके तयार करू शकतो. |

| | | |
|---|---|---|
| ६. | **बँक मेळ पत्रक** | • विद्यार्थी बँकेशी संबंधित वेगवेगळ्या कागद पत्रांचे नमुने तयार करू शकतो.<br>• विद्यार्थी रोख पुस्तक व बँक पासबुक यामधील फरक ओळखतो.<br>• विद्यार्थी रोख पुस्तकाची शिल्लक व पासबुक शिल्लक यामध्ये येणाऱ्या फरकाची कारणे शोधू शकतो.<br>• विद्यार्थी बँक मेळ पत्रक तयार करू शकतो. |
| ७. | **घसारा** | • विद्यार्थ्यांना घसाऱ्याची संकल्पना, विविध पद्धती व महत्वांचे आकलन होते.<br>• विद्यार्थ्यांना स्थिर व चल संपत्तीच्या फरकांचे आकलन होते.<br>• विद्यार्थी विविध स्थिर संपत्तीवरील घसाऱ्याची गणना करू शकतो.<br>• विद्यार्थी सरळ रेषा पद्धती व ऱ्हासमान घसारा पद्धतीतील घसाऱ्याच्या राशीचा फरक ओळखतो. |
| ८. | **चुका व त्यांची दुरुस्ती** | • विद्यार्थ्यांना चुकांच्या दुरुस्तीचा अर्थ व परिणामांचे आकलन होते.<br>• विद्यार्थ्यांना चुकांचे प्रकार व त्यांची उदाहरणे समजतात.<br>• विद्यार्थी चुकांचा शोध व दुरुस्ती करतो.<br>• विद्यार्थ्याला निलंबित खात्याचा अर्थ व महत्त्व समजते.<br>• विद्यार्थी निलंबित खाते तयार करू शकतो. |
| ९. | **स्वामीत्व संस्थेची अंतिम खाती** | • विद्यार्थ्याला स्वामित्व संस्थेच्या अंतिम खात्यांचा अर्थ, उद्दिष्ट्ये व महत्वाचे आकलन होते.<br>• विद्यार्थ्याला विविध समायोजन नोंदीचे आकलन होते.<br>• विद्यार्थी व्यापार खाते, नफा तोटा खाते आणि ताळेबंद कौशल्य वापरून तयार करू शकतो. |
| १०. | **एकेरी नोंद पद्धती** | • विद्यार्थ्याला एकेरी नोंद पद्धतीचा अर्थ समजतो.<br>• विद्यार्थी एकेरी नोंद पद्धत व व्दिनोंद पद्धतीचा फरक ओळखतो.<br>• विद्यार्थी स्वामित्व संस्थेचे प्रारंभिक व अंतिम विवरण पत्रक आणि नफा किंवा तोटा पत्रक तयार करू शकतो. |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | पुस्तपालन व लेखाकर्माची ओळख | १ |
| २ | पुस्तपालनाची द्विनोंद पद्धती, अर्थ आणि मूलतत्वे | १९ |
| ३ | रोजकिर्द / पंजी | ४५ |
| ४ | खातेवही / प्रपंजीयन | ९० |
| ५ | सहाय्यक पुस्तके | १२३ |
| ६ | बँक मेळपत्रक / बँक जुळवणी पत्रक | १८४ |
| ७ | घसारा / अवक्षयन | २१७ |
| ८ | चुकांची दुरूस्ती | २५३ |
| ९ | स्वामित्व संस्थेची अंतिम खाती | २७६ |
| १० | एकेरी नोंद पद्धती | ३३९ |
| | उत्तरसूची | ३७० |

# 1 पुस्तपालन व लेखाकर्माची ओळख
## (Introduction of Book-Keeping & Accountancy)

**अभ्यास घटक**

*१.१ अर्थ, व्याख्या आणि उद्‌देश*

*१.२ पुस्तपालनाचे महत्त्व*

*१.३ पुस्तपालन व लेखाकर्म यातील फरक*

*१.४ लेखाकर्माची अर्थ आणि व्याख्या*

*१.५ लेखाकर्माच्या पद्‌धतीचा पाया*

*१.६ लेखाकर्माच्या माहितीची गुणात्मक वैशिष्टे*

*१.७ लेखाकर्माच्या मूलभूत संकल्पना*

*१.८ लेखाकर्माची संकल्पना, नियमावली आणि तत्वे*

*१.९ लेखांकीय दर्जा (AS) IFRS*

***क्षमता विधाने***

- *विद्यार्थ्यांना लेखाकर्माचा अर्थ, गुणवैशिष्ट्ये व वर्गीकरणाचे महत्त्व इ. आकलन होते.*
- *विद्यार्थ्यांना लेखांकिय परिभाषा व संकल्पनांचे आकलन होते.*
- *विद्यार्थ्यांना पुस्तपालनाची भूमिका व फायदे ज्ञात होतात.*
- *विद्यार्थ्यांना अस्तित्वात असलेल्या लेखाकर्माच्या मानांकनासंबंधी जागरूकता येते.*

**प्रस्तावना :**

पुस्तपालन हे व्यवसायातील व्यवहार नोंदविण्याशी संबंधित आहे. व्यवसायिक संस्था आणि इतर संस्था आर्थिक व्यवहार मोठ्या संख्येने मोठ्या प्रमाणात वित्त किंवा वित्तीय स्वरुपात करतात. हे सर्व व्यवहार व्यवसायात महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी नोंदविले जातात. ते व्यवसायासाठी फायदेशीर आहेत किंवा नाहीत. व्यवसायाबद्‌दल आणि इतर संघटनाबद्‌दल माहिती केवळ व्यवसायाच्या मालक आणि इतर संस्थाकडूनच आवश्यक नाही तर सरकार, गुंतवणूकदार, ग्राहक, कर्मचारी आणि संशोधनासारख्या इतर हितधारकांना देखील करणे आवश्यक आहे..

**लेखांकनाची उत्क्रांती** (Evolution of Accounting) **:**

भारतामध्ये चंद्गुप्त मौर्य यांच्या काळात मंत्री कौटिल्य यांनी अर्थशास्त्र नावाचे पुस्तक लिहिले होते, ज्यामध्ये काही संदर्भ, खाती सांभाळण्यास ठेवण्याचे मार्ग शोधले गेले. त्यानंतर आपल्या देशाच्या काही भागातील 'देशीनामा' म्हणून वापरल्या जाणाऱ्या पद्‌धतीचा वापर केला गेला.

सभ्यतेच्या पूर्वीच्या काळात त्यांनी मालमत्ता मालकांसाठी नियमितपणे खाते तयार केले. १२ व्या शतकात नावे आणि जमा नोंदी आढळलेल्या प्रतिनिधीने (एजंटने) लेखालेखन केले, जे श्रीमंत लोकांच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करते.

१४९४ मध्ये 'ल्युका डि बर्गो पॅसिओली' या इटालियन व्यापाऱ्याने पुस्तपालनाची दुहेरी नोंद पद्धती विकसीत केली. १८ व्या आणि १९ व्या शतकातील औद्योगिक क्रांतीमुळे मोठ्या प्रमाणावर मोठे व्यवसाय संयुक्त स्कंध प्रमंडळात एकत्रीत करण्यात आले. संयुक्त स्कंध प्रमंडळ एक महत्त्वाचे स्वरूप म्हणून उभे राहिले, ज्यात व्यवस्थापनापासून व्यवसायाची मालकी वेगळे करण्याची गरज होती. म्हणूनच मालक व गुंतवणूकदारांचे हित सुरक्षित करण्यासाठी व्यवसायाविषयी तपशीलवार माहिती आवश्यक आहे. ज्यामुळे व्यापक वित्तीय लेखांकिय माहिती प्रणालीच्या विकासाचा मार्ग प्रशस्त झाला.

२० व्या शतकात व्यवस्थापकीय निर्णयासाठी आर्थिक माहितीच्या विश्लेषणाची गरज असल्यामुळे व्यवस्थापन लेखांकनाची स्वतंत्र शाखा उदयास आली. 'उत्क्रांतीच्या सुरुवातीच्या काळात लेखांकन वैयक्तिकरित्या केंद्रित असले तरी ते विविध क्षेत्रांमध्ये विकासाच्या परिणामी व्यवसायातील वाढीमुळे २१ व्या शतकात हळूहळू सामाजिक जबाबदारीचे खाते बनले आहे.'

## अर्थ व संकल्पना :

सर्वसामान्यपणे पुस्तपालन म्हणजे व्यवसायातील व्यवहार खात्याच्या पुस्तकात शास्त्रीय पद्धतीने नोंदवीणे होय. सर्व व्यवायात घडणारे व्यवहार हे तारखेनुसार व अचूक लिहिले जातात. त्यांचा शेवट प्रत्येक वर्षाच्या शेवटी म्हणजे ३१ मार्चला होतो.

पुस्तपालन हे कला व शास्त्र असून त्यामध्ये वित्तीय व्यवहारांची नोंद शास्त्रीय, वर्गीकृत व सारांश रूपाने विविध कालावधीसाठी प्रामुख्याने एक वर्षासाठी केल्या जातात.

## पुस्तपालनाची व्याख्या (Definition of Book-Keeping)

**रिचर्ड ई. स्ट्राहेल्म :** व्यवसायाच्या व्यवहाराचे विश्लेषण करणे आणि नोंदविण्याची कला, भविष्यातील कार्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी तपशीलांसह व्यवसाय परिणामांचा अहवाल देणे आणि अशा परिणामांचे स्पष्टीकरण पुस्तपालन करते.

**जे. आर. बाटलीबॉय :** पुस्तपालन ही पुस्त संचामध्ये व्यवसायाच्या व्यवहाराची नोंद करण्याची कला आहे.

**नोथकॉट :** पुस्तपालन ही पैशांमध्ये व्यक्त होणारी व्यावसायिक किंवा आर्थिक व्यवहार नोंद लेखापुस्तकी करण्याची कला आहे.

**आर. एन. कार्टर :** पुस्तपालन म्हणजे व्यवसायातील व्यवहार पैशाच्या संबंधीत असलेले योग्य पद्धतीने पुस्तकांमध्ये नोंदविण्याची विज्ञान आणि कला आहे. त्या सर्व व्यवसायांच्या व्यवहाराच्या परिणामामुळे पैसा किंवा पैशाची किंमत हस्तांतरित होते.

## पुस्तपालनाची वैशिष्ट्ये : –

१) हे दररोजच्या व्यवसायाच्या व्यवहाराची नोंद करण्याची पद्धत आहे.

२) केवळ आर्थिक व्यवहार नोंदविले जातात.

३) सर्व नोंदी विशिष्ट कालावधीसाठी तयार केल्या जातात ज्या भविष्यातील संदर्भासाठी उपयुक्त आहेत.

४) व्यवहारांच्या नोंदी या नियम व नियमनावर आधारीत आहे.

५) व्यावसायिक व्यवहार वैज्ञानिकरित्या नोंदविण्याची ही कला आहे.

**पुस्तपालनाची उद्‌दिष्ट्ये :**

१) पुस्तपालनाचे मुख्य उद्‌दिष्ट हे सर्व आर्थिक व्यवहारांचे व्यवस्थित आणि तर्कशुद्‌ध पद्‌धतीने पूर्ण आणि अचूक माहिती ठेवणे आहे.

२) सर्व व्यावसायिक व्यवहारांची नोंद तारखेनुसार आणि खात्यानुसार करणे.

३) पुस्तपालन व्यवसायाच्या व्यवहाराचे कायमस्वरुपी माहिती म्हणून कार्य करते आणि जेव्हाही आवश्यक असेल तेव्हा ते पुरावे म्हणून सादर केले जाऊ शकते.

४) व्यवसायाचा आर्थिक वर्षातील नफा किंवा तोटा जाणून घेणे.

५) व्यवसायाची एकूण मालमत्ता आणि दायित्वे जाणून घेणे.

६) व्यवसायाचा मालकाची व्यावसायिक देणी जाणून घेणे.

७) व्यवसायाला गेल्या वर्षीच्या प्रगतीबद्‌दल किंवा समान व्यवसायाशी जोडलेल्या इतर व्यवसायाशी तुलना करणे.

## २. पुस्तपालनाचे महत्त्व :

पुस्तपालनाचे महत्व खालील प्रमाणे सांगता येईल. :

**१) नोंदी (Record) :** नोंदविलेले सर्व व्यवहार कोणालाही लक्षात ठेवणे शक्य नाही. परंतु पुस्तपालन सर्व व्यवहारांची नोंदी कायम स्वरुपी आणि शास्त्रीय पद्‌धतीने सांभाळते.

**२) आर्थिक माहिती (Financial Information) :** व्यवसायातील नफा, तोटा, मालमत्ता, दायित्वे, गुंतवणूक आणि स्कंध इ. माहिती मिळविण्यासाठी पुस्तपालन उपयुक्त आहे.

**३) निर्णय घेण्यास उपयुक्त (Decision Making) :** निर्णय घेण्याकरिता पुस्तपालन व्यवसायिकांना आर्थिक माहिती प्रदान करते.

**४) नियंत्रण करण्यासाठी (Controlling) :** पुस्तपालनाद्‌वारे उपलब्ध झालेल्या आर्थिक माहिती आणि आकडेवारीद्‌वारे व्यवसायावर नियंत्रण ठेवता येते.

**५) पुरावे (Evidence) :** कोणत्याही विवादास्पद प्रकरणात व्यावसायिकांना न्यायालयात पुरावा म्हणून वापरण्यास उपयुक्त ठरते.

**६) कर दायित्व (Tax Liability) :** सर्व कर देयके शोधण्यासाठी पुस्तपालन उपयुक्त आहे उदा. आयकर, वस्तू व सेवा कर, मालमत्ता कर, इत्यादी.

**पुस्तपालनाची उपयोगिता (Utility of Book-keeping) :**

**१) मालक :** व्यावसायिक कोणत्याही वेळी व्यवसायाचा नफा, तोटा, मालमत्ता आणि दायित्वे शोधू शकतो.

**२) व्यवस्थापन :** व्यवसायासाठी नियोजन, निर्णय घेण्याचे आणि संपूर्ण व्यावसायिक उपक्रमांवर नियंत्रण व्यावसायिकाला ठेवता येते.

**३) गुंतवणूकदार :** गुंतवणूक करायची की नाही हा निर्णय घेण्यासाठी गुंतवणूकदाराला पुस्तपालन उपयोगी ठरते.

**४) ग्राहक :** ग्राहक व्यवसायाची आर्थिक स्थिती सहजपणे समजू शकतो. वस्तूंच्या पुरवठ्याबद्‌दल तो खात्री बाळगू शकतो.

**५) सरकार :** विविध स्त्रोतांद्‌वारे कर शोधून काढण्यासाठी शासनाच्या विविध विभागाला पुस्तपालन उपयोगी ठरते.

**६) कर्जदार :** लेखा पुस्तकाच्या माध्यमातून व्यवसायाला पुढेही कर्ज पुरवठा करणे सुरू ठेवावे किंवा ठेवू नये याबाबतचे निर्णय कर्ज देणारे घेवू शकतात.

**७) विकास :** व्यावसायिक व्यवसायातून लेखांकनाच्या मदतीने व्यवसायाचा विकास करू शकतो.

### १.३ पुस्तपालन आणि लेखाकर्म यातील फरक

| मुद्दे | पुस्तपालन | लेखाकर्म |
|---|---|---|
| अर्थ | पुस्तपालन हे व्यवसायातील व्यवहारांच्या नोंदी व वर्गीकरण करते. | लेखाकर्म व्यवसायातील व्यवहाराच्या नोंदी, वर्गीकरण, सारांश, विश्लेषण व पृथःकरण करते. |
| अवस्था | पुस्तपालन ही लेखाकर्माची प्राथमिक अवस्था आहे. हा लेखाकर्माचा पाया आहे. | लेखाकर्म ही दुसरी अवस्था असून त्यामध्ये वर्गीकरण व पृथःकरण सामाविष्ट आहे. |
| उद्‌देश | पुस्तपालनाचा उद्‌देश सर्व आर्थिक व्यवहारांची नोंद योग्य व पद्‌धतशीरपणे ठेवणे हा आहे. | लेखाकर्माचे ध्येय हे नफा किंवा तोटा शोधून काढणे आणि व्यवसायाची वित्तीय स्थिती दर्शवीने. |
| जबाबदारी | पुस्तपालनाच्या नोंदी ठेवण्यास कनिष्ट कर्मचारी जबाबदार असतो. | लेखाकर्माच्या नोंदी ठेवण्यास वरीष्ठ लिपिक व कर्मचारी जबाबदार असतो. |
| परिणाम | रोजकिर्द आणि खाते पुस्तक हा पुस्तपालनाच्या नोंदीचा परिणाम आहे | नफातोटा खाते व ताळेबंदपत्रक हा लेखाकर्माचा परिणाम आहे. |
| कालावधी | पुस्तपालन प्रत्येक दिवसाची माहिती देते. | लेखाकर्म हे एका वर्षाची सविस्तर माहिती देते. |
| विश्लेषण | पुस्तपालनाची व्याप्ती मर्यादित आहे. | लेखाकर्माची व्याप्ती मोठी आहे. |
| निर्णय प्रक्रिया | पुस्तपालनामध्ये दुहेरी नोंद पद्‌धतीच्या मूलभूत नियमांचे पालन करून दररोजच्या व्यवहाराच्या नोंदी करणे समाविष्ट आहे. | लेखाकर्मामध्ये पुस्तकांमधून उपलब्ध असलेल्या प्राथमिक माहितीची प्रक्रिया आणि आर्थिक विवरणांची तयारी समाविष्ट आहे. |
| कौशल्य | पुस्तपालनासाठी रोजकिर्द आणि खतावणीचे प्राथमिक ज्ञान तत्वांची आवश्यकता असते. | लेखाकर्मासाठी सर्व लेखाकर्माच्या तत्वांची आवश्यकता असते. |

### १.४ लेखाकर्माचा अर्थ आणि परिभाषा :

पुस्तपालनापेक्षा लेखाकर्म ही एक व्यापक संकल्पना आहे. पुस्तपालन हा लेखाकर्माचा हिस्सा आहे. म्हणूनच असे म्हटले जाते की पुस्तपालन चे कार्य जेथे संपते तेथे लेखाकर्माचे सुरू होते.

**व्याख्या** (Definitions) :

१) **कोहलर** यांच्या मते ''एखाद्या व्यवहाराची सर्व सैध्दांतिक बाजू आणि लेखांकिय कृती म्हणून लेखाकर्माचा उल्लेख करावा लागेल.''

२) **प्रो. रॉबर्ट एन. ॲन्थोनी** यांनी व्याख्या केली आहे की, ''जवळपास सर्वच व्यापारी व्यक्तीची स्वत:ची अशी एक लेखांकिय पद्‌धत असते की, जो व्यापारिक व्यवहाराचे एकत्रीकरण सारांशीकरण विश्लेषण आणि मौद्रीक माहितीचा अहवाल देते.''

## १.५ लेखांकनाचे मुख्य घटक (Basis of Accounting)

सामान्यत: खात्याचे तीन आधार आहेत.

(१) नगदी आधार / रोख घटक

(२) उपर्जित व्यापारी आधार

(३) मिश्रित किंवा संकरित आधार

**(१) रोख घटक (Cash basis) :**

रोखीच्या व्यवहारांमध्ये प्रत्यक्ष रोख जमा व प्रत्यक्ष रोख खर्च नोंदविले जातात.

विविध घटकांच्या आधारे लेखापुस्तके तयार केली जातात. या विविध घटकांपैकी जेव्हा रोख प्राप्त होते. तेव्हा उत्पन्नाची नोंद केली जाते. आणि खर्चाची नोंद प्रत्यक्ष दिलेला खर्च अशा नोंदी केल्या जातात.

या आधारावर (१) कोणतेही मिळालेले उत्पन्न, (२) कोणताही केलेला खर्च, लेखांकनाची ही पद्धत व्यावसायिकांना उपयुक्त आहे. जसे. डॉक्टर, वकील, सी.ए. आणि नफा न मिळविणाऱ्या संस्था.

**(२) उपर्जित घटक (Accrual basis)**


या पद्धतीमध्ये प्राप्त झालेले उत्पन्न व येणे उत्पन्न तसेच प्रत्यक्ष केलेला खर्च व देय खर्च नोंदविले जातात. व्यापारी तत्वांचे लेखांकन या नावाने सुद्धा ही पद्धत ओळखली जाते.

**(३) संकरित किंवा मिश्रित घटक (Hybrid or Mixed basis)**

हे रोख घटक आणि उपर्जित घटक यांचे मिश्रण आहे. लेखांकनाच्या मिश्रीत घटकांवर आधारीत रोख घटक आणि उपर्जित घटक यांचे अनुकरण केले जाते. महसुल आणि संपत्ती सामान्यपणे रोख घटकावर आधारीत नोंदविले जातात. तर विविध खर्च उपर्जित घटकांच्या आधारे नोंदविले जातात. भारतीय कायद्याप्रमाणे ह्या पद्धतीचा उपयोग केला जातो.

## १.६ लेखांकिय माहितीची गुणात्मक वैशिष्ट्ये (Qualitative characteristics of accounting information)

लेखांकन म्हणजे आर्थिक स्वरुपातील व्यवसायिक व्यवहाराच्या आकडेवारीचे गुणात्मक सादरीकरण होय. लेखापुस्तकात लेखांकिय माहितीची नोंद करीत असताना आपण खालील लेखांकिय गुणात्मक वैशिष्ट्ये लक्षात ठेवली पाहिजेत.



१. **लेखांकिय माहितीची विश्वसनियता :** विश्वसनीयता हे गुणात्मक वैशिष्ट्यांपैकी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. विश्वसनीयता म्हणजे प्रत्येक लेखांकिय माहिती ही विविध दस्तऐवजी पुराव्यावरच आधारीत असावी. लेखांकिय तथ्य निरपेक्षपणे सादर केले गेले पाहिजे. लेखांकीय माहितीची विश्वसनीयता येण्यासाठी माहितीमध्ये भविष्यात सत्यता पडताळून पाहण्याची क्षमता सहजता आणि प्रमाणिकपणा वैशिष्ट्य असणे आवश्यक आहे. विश्वसनियता प्रत्येक घटकानुसार बदलते.

२. **लेखांकिय माहितीची समर्पकता :** लेखापुस्तकाद्वारे लेखांकिय माहिती प्रकट केली जाते आणि आर्थिक विवरणे समर्पक असली पाहिजे. याचा अर्थ असा की लेखांकिय माहितीमध्ये अवास्तव आणि असमर्पक माहितीचा समावेश असू नये. संपूर्ण माहिती ही समर्पकच असावयास पाहिजे. तरच कोणतीही माहिती व्यावसायिक परिणाम बदलवू शकते. म्हणजे प्रत्येक उपयोगी, महत्त्वाची आणि समर्पक माहिती, लेखा पुस्तकात आपली जागा बनविते. माहिती ही चिरंतन शाश्वतपणा स्वत:ला सिध्द करणारी आणि कोणत्याही चौकशीला सकारात्मक प्रतिसाद देणारी असावी.


३. **लेखांकित माहितीचा सुगमपणा :** लेखांकिय माहिती अशा पद्धतीने नोंदली, सादर केली आणि स्पष्ट केली गेलेली असावी की, वापरणाऱ्याला ती सहजतेने समजू शकेल. माहिती ही मुद्देसुद, स्पष्ट, संक्षिप्त आणि जशीच्या तशीच असावी. आर्थिक लेखांकनाची माहिती जाणुन घेणाऱ्या पक्षांना त्यांच्या जाणुन घेण्याच्या क्षमतेनुसार आर्थिक लेखांकनाची माहिती आणि आकडेवारी ही त्यांच्या संकल्पनाधिष्टीतपणे सादर करता आली पाहिजे.

४. **लेखांकिय माहितीची तुलनात्मकता :** निर्णय घेतांना, लेखाच्या तुलनात्मक पद्धतीचा वापर करतांना, लेख्यांची नोंदी करतांना आणि लेखांचे सादरीकरण करतांना त्यात अचूकता येण्यासाठी प्रत्येक वर्षाला माहितीत बदल होता कामा नये नाहीतर तुलनात्मक विस्कळीत झाल्याशिवाय राहणार नाही. एकल संस्था किंवा दोन अथवा त्यापेक्षा जास्त संस्थेच्या कालावधीची माहितीमध्ये तुलनात्मक फरक असल्यास व्यावसायिक निर्णय घेणाऱ्या पक्षांना व्यवसायाशी संबंधीत वित्तीय क्षमता अथवा कमतरता जाणुन घेण्याची आशा असते.

## १.७ लेखांकनाच्या मूलभूत संकल्पना

लेखाकर्म चांगले समजून घेण्यासाठी लेखाकर्मामध्ये वापरल्या जाणाऱ्या अर्थ आणि मुलभूत शब्द जाणून घेणे आवश्यक आहे. लेखाकर्म एक बहुमुखी प्रणाली आहे जी आधुनिक व्यावसायिक जगात मोठ्या प्रमाणावर उद्देश प्रदान करते. म्हणून खालील संज्ञा समजून घेणे आवश्यक आहे.

व्यवहारांचे प्रकार




### १.७.१ व्यवहार (Transactions)

दोन व्यक्तीमधील पैशात मोजता येणाऱ्या वस्तू व सेवांची देवाणघेवाण म्हणजे व्यवहार होय.

**(अ) मौद्रीक व्यवहार** (Monetary Transactions) **:**

(१) **रोखव्यवहार :** ज्या व्यवसायात रोख पैसे दिले जातात किंवा घेतले जातात अशा व्यवहारांना रोख व्यवहार म्हणून ओळखले जाते

उदा. i) रोखीने वस्तू खरेदी रु. १५,०००/-

ii) वेतनाचे दिले ₹ ५,०००/-

२) **उधारीचे व्यवहार :** उधारीचे व्यवहार म्हणजे व्यवहाराच्या वेळी ताबडतोब रोख रक्कम दिली किंवा घेतली जात नाही. ज्या वेळेस रोख चा वापर केला जात नाही किंवा रोख प्राप्त झाली नाही परंतु नंतरच्या तारखेला रोख दिली किंवा घेतली जाते.

उदा. i) श्री. अमनला उधारीवर माल विकला ₹ ८,०००/-

ii) श्री. अमरसिंग यांना ₹ २०,०००/- ची मशीनरी उधारीवर विकली

**(ब) अमौद्रीक व्यवहार** (Non-Monetary Transactions) **:**

ज्या व्यवहारांमध्ये पैशाचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष वापर होत नाही अशा व्यवहारांना अमौद्रिक व्यवहार असे म्हणतात. एका वस्तूच्या बदल्यात दुसरी वस्तू मिळणे याला वस्तुविनिमय म्हणतात.

१) **नोंद :** जमाखर्चाच्या पुस्तकात योग्य पद्धतीने व्यवसायाचे व्यवहार लिहिणे म्हणजे नोंद किंवा प्रविष्टी करणे होय.

२) **नोंदीचे वर्णन :** व्यवसायाच्या ज्या व्यवहाराची नोंद केली जाते त्या नोंदी खाली व्यवहाराचे संक्षिप्त वर्णन केले जाते. त्याला नोंदीचे वर्णन (स्पष्टीकरण) असे म्हणतात. हे स्पष्टीकरण नेहमी केलेल्या नोंदीखाली 'केल्याबद्दल' या शब्दाने लिहितात.

३) **वस्तू /माल :** व्यापारात व्यापारी ज्या वस्तू किंवा तयार केलेल्या वस्तू खरेदी, विक्रीसाठी वापरतो त्यास व्यापारी वस्तू असे म्हणतात. व्यापारात या खरेदी केलेल्या किंवा तयार केलेल्या वस्तू व्यापाऱात नफा होऊन विकण्यासाठी खरेदी किंवा तयार केल्या जातात.

उदा. i) औषधी विक्रेत्याकरिता, औषध वस्तू आहे.

ii) भाजीपाला विक्रेत्यासाठी, भाजीपाला वस्तू आहे.

iii) गाड्यांचे सुटे भाग जसे टायर, इंजीन, गिअरबॉक्स इ. ची वाहननिर्मिती करणाऱ्या बजाज ऑटो हिरो मोटर्सच्या दृष्टीने वस्तू आहेत.

### १.७.२ भांडवल आणि उचल (Capital and Drawings):

**अ) भांडवल** (Capital) **:** व्यावसायिकाने व्यवसायात गुंतविलेल्या संपूर्ण रकमेला भांडवल असे म्हणतात. लेखांकिय भाषेत सांगावयाचे झाल्यास संपत्तीचे देयतेवरील आधिक्य म्हणजे भांडवल असे म्हणता येईल. हे सुत्र रूपाने खालील प्रमाणे मांडता येईल.

भांडवल = संपत्ती -देयता

व्यवसाय बंद करताना व्यवसाय मालकाला भांडवलाची राशी व्यवसायाकडून घेणे असल्यामुळे भांडवल व्यवसायाची देयता ठरते.

**ब) उचल** (Drawings) **:** जर व्यवसाय मालक आपल्या व्यक्तीगत उपयोगासाठी व्यवसायातून संपत्ती किंवा वस्तू किंवा रोख राशी घेत असेल तर त्यास उचल असे म्हणतात.

उदा : i) मालकाने व्यवसायातून मुलाचे महाविद्यालय शुल्क दिले.

ii) मुलाच्या खर्चाचे शोधन व्यवसायातून केले. जसे - औषधाचा खर्च, मोबाईल बिल इत्यादी.

### १.७.३. ऋणको आणि धनको (Debtors and Creditors) :

अ) **ऋणको** (Debtor) **:** जी व्यक्ती वस्तू किंवा सेवांचा उधारीवर उपभोग घेतल्यामुळे व्यवसायास देणे लागत असेल तर त्या व्यक्तीला व्यवसायाचा ऋणको असे म्हणतात. ऋणको ही अशी व्यक्ती आहे की, जी व्यवसायाला पैसे देणे लागते.

ब) **धनको** (Creditor) **:** ज्या व्यक्तीकडून वस्तू किंवा सेवा उधार विकत घेतल्यामुळे आपण त्या व्यक्तीला पैसे देणे लागतो, ती व्यक्ती म्हणजे धनको होय. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास धनको म्हणजे अशा व्यक्ती होय की ज्यांना व्यवसाय देणे लागतो.

(क) **बुडीत कर्ज** (Bad Debts) **:** ऋणकोकडून वसूल न होणारी राशी म्हणजे बुडीत कर्ज होय. हे व्यवसायाचे महसुली नुकसान समजले जाते.

### १.७.४ खर्च आणि खर्चाचे प्रकार (Expenditure and Types of Expenditure)

**खर्च** (Expenditure) **:** कोणत्याही कारणामुळे व्यवसायाला ज्या राशीचे शोधन करावे लागते त्याला खर्च असे म्हणतात.

i) **भांडवली खर्च** (Capital Expenditure) **:** हा खर्च स्थिर संपत्ती मिळविण्यासाठी किंवा स्थिर संपत्तीच्या मुल्यात वाढ करण्यासाठी केलेला खर्च आहे. हा खर्च दिर्घकाळपर्यंत लाभ देणारा आणि पुन्हा पुन्हा न उद्‌भवणाऱ्या स्वरुपाचा आहे.
उदा. : यंत्राची खरेदी, इमारतीचा विस्तार, संगणकाची खरेदी इत्यादी.

ii) **महसुली खर्च** (Revenue Expenditure) **:** महसुली खर्च हा असा खर्च आहे की ज्यापासून भविष्यात नफा मिळण्याची अपेक्षा नसते. परंतु ताबडतोब किंवा अल्पावधीत अर्थात एका वर्षाच्या आत लाभ मिळण्याची शक्यता असते. हा खर्च संघटनेची लाभ प्राप्त करण्याची क्षमता वाढवित नाही. हा व्यवसाय किंवा संस्था संचालनानुसार प्रत्येक दिवशी होणारा सामान्य खर्च आहे.

उदा. : भाडे दिले, वेतन दिले, मजुरी दिली इत्यादी.

iii) **अस्थागित महसुली खर्च** (Deferred Revenue Expenditure) **:** असे खर्च की जे मुलत: महसुली स्वरुपाचे आहेत. परंतु ज्यांचा लाभ एका वर्षाच्या आत पूर्णपणे उपयोगी आणता येत नाही अशा खर्चांना अस्थगित दिसणारे महसुली स्वरुपाचे खर्च म्हणतात. असे खर्च काही वर्षानंतर अपलेखीत करतात. असा अपलेखीत केलेला खर्च नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर दर्शवितात. अपलेखीत न केलेला खर्च ताळेबंद पत्रकाच्या संपत्ती बाजूला दर्शवितात.

उदा. : खूप मोठ्या प्रमाणात केलेला जाहिरात खर्च,
खूप मोठ्या प्रमाणात केलेला कायदेशीर खर्च

### १.७.५ रोख कसर आणि व्यापारी कसर (Cash Discount and Trade Discount) :

कसर ही विक्रेत्याने ग्राहकाला दिलेली सुट किंवा सवलत होय.

i) **व्यापारी कसर** (Trade Discount) **:** व्यापारी कसर ही वस्तूंच्या विक्रीचे वेळी वस्तुंच्या किंमतीमधून कमी केलेली राशी होय ही कसर विक्रेत्यांना वस्तूंच्या छापील किमतीमध्ये वस्तूंची विक्री करतांना नफा मिळवून देण्यास मदत करते. म्हणून व्यापारी कसरीची लेखापुस्तकात नोंद घेणे गरजेचे नाही. उदा. ₹ १,०००/– किमतीचा माल ५% व्यापारी कसरीवर विकल्यास कसर ₹ ५०/– मालाच्या किमतीतून वजा केली जाते.

ii) **रोख कसर** (Cash Discount) **:** ही अशी रक्कम होय की जी रोख राशी घेतेवेळी वजा करून घेतलेली असते. शोधन करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून दिलेली ही सूट होय. प्रत्यक्ष रक्कम देतेवेळी किंवा काही कालावधीत रक्कम घेतेवेळी अशा प्रकारची सुट दिली जाते. व्यापारी कसर दिल्यानंतर रोख कसरीचा हिशोब केला जात असल्यामुळे रोख कसर ही विक्रेत्याचे नुकसान आणि ग्राहकाचा फायदा असतो. या कसरीची लेखापुस्तकात नोंद केली जाते.

### १.७.६ शोधनक्षम (दिवाळखोर नसलेला) आणि अशोधनक्षम (दिवाळखोर) (Solvent and Insolvent) :

i) **शोधनक्षम (दिवाळखोर नसलेला) (Solvent) :** जर एखादया व्यक्तीची संपत्ती, त्याच्या देयतेपेक्षा जास्त किंवा देयते बरोबर असते, त्यावेळी त्या व्यक्तीला शोधनक्षम किंवा दिवाळखोर नसलेली व्यक्ती असे म्हणतात. अशा व्यक्ती आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत असतात आणि आपली देणी देण्यास समर्थ असतात.

उदा. : एखादया व्यक्तीची संपत्ती किंवा मालमत्ता ₹ ५०, ००, ०००/– ची आहे आणि त्या व्यक्तीची एकूण देयता किंवा कर्ज ₹ ३०,००,०००/– चे आहे. अशा परिस्थितीत ती व्यक्ती आर्थिक दृष्ट्या सुस्थितीत असून आपले कर्ज फेडण्यास समर्थ आहे. म्हणून अशा व्यक्तीला शोधनक्षम आहे असे म्हणतात.

ii) **अशोधनक्षम किंवा दिवाळखोर (Insolvent) :** अशी व्यक्ती की जी आपल्या संपत्तीतून आपली संपूर्ण देणी देण्यास असमर्थ असते. अशा व्यक्तीची देयता ही त्यांच्या संपत्तीपेक्षा जास्त असते.

उदा. : जर एखादया व्यक्तीची संपत्ती किंवा मालमत्ता संपूर्ण हिशेब झाल्यानंतर ₹ २०,००,०००/– ची आहे आणि अशा व्यक्तीची संपूर्ण देयता ₹ ५०, ००,००० ची आहे. तसेच तो कोणत्याही मार्गाने पुन्हा उत्पन्न उभारण्यास असमर्थ असेल आणि न्यायालय जर समाधानी असेल तर अशा व्यक्तीला दिवाळखोर म्हणून घोषीत करण्यात येईल.

**लेखावर्ष / जमाखर्चाचे वर्ष (Accounting Year) :**

व्यापारी ठेवत असलेल्या लेखा पुस्तकांच्या हिशोबाचा अवधी १२ महिन्यांचा असतो. हिशेबाचे वर्ष कोणते ठेवावे हे सर्वस्वी त्या व्यापाऱ्यावर अवलंबून असते. परंतु सध्या आयकराच्या दृष्टीने लेखांकन वर्ष १ एप्रिल पासून सुरू होते आणि ३१ मार्चला बंद होते. लेखांकन वर्षाच्या शेवटी व्यवसायाचा मालक, व्यापारलेखा, नफातोटा लेखा आणि ताळेबंद तयार करतो. यावरून त्याला आपल्या व्यापाराची आर्थिक स्थिती कळते.



***विद्यार्थी कृती :***

व्यापारी कसरी संबंधी जाहिराती गोळा करून वहीमध्ये चिटकवा.

**व्यापारी संस्था आणि नफ्याचा उद्देश नसलेल्या संस्था (Trading Concern and Not for Profit Concerns)**

i) **व्यापारी संस्था (Trading Concern) :** व्यापारी संस्था या अशा संस्था होय की ज्या नफा मिळविण्याच्या उद्देशाने वस्तूची विक्री करण्याकरीता स्थापन झालेल्या असतात. यांना व्यावसायिक संघटना किंवा नफा मिळविणाऱ्या संघटना या नावाने सुद्धा ओळखले जाते.

ii) **नफ्याचा उद्देश नसलेल्या संस्था (Not for Profit Concern) :** नफ्याचा उद्देश सोडून समाजाच्या सेवेसाठी किंवा सेवाप्रदान करण्यासाठी ज्या संस्था स्थापन केल्या जातात. त्या संस्थांना नफ्याचा उद्देश नसलेल्या संस्था असे म्हणतात. कला, विज्ञान, क्रिडा, सांस्कृतिक कार्य, धर्मादाय कार्य, उपजिविकेचे उद्योग इत्यादी कार्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा प्रकारच्या संस्था स्थापन केल्या जाऊ शकतात.

उदा. शाळा, दवाखाना,क्रिडामंडळे इत्यादी.

### १.७.८ ख्याती / लौकीक मूल्य (Goodwill) :

ख्याती म्हणजे व्यवसायाचा पैशात मोजता येण्यासारखा नावलौकिक /पत / प्रतिष्ठा / किर्ती होय. ही व्यवसायाची अमूर्त संपत्ती आहे. ख्याती हे दुसरे –तिसरे काही नसून व्यवसायाने बाजारपेठेत प्रस्थापित केलेले आपले नाव होय. ख्याती ही, व्यवसायाच्या इतर अमूर्त संपत्तीला जोडलेली अतिरिक्त मुल्य असलेली अमुर्त संपत्ती आहे.

- ख्याती म्हणजे व्यवसायाचा पैशात मोजता येण्यासारखा नावलौकीक
- ख्याती ही अमूर्त संपत्ती आहे.

### १.७.९ नफा किंवा तोटा (Profit or Loss)

**अ) नफा / लाभ** (Profit) : जेव्हा मालाची विक्रीची किंमत तिच्या परीव्यय मूल्यापेक्षा जास्त असते तेंव्हा त्यास नफा असे म्हणतात. नफ्यामुळे व्यवसायाच्या भांडवलात वाढ होते.

उदा. एका आर्थिक वर्षात ₹ ५०,०००/- रुपयाच्या वस्तु विकल्या असतील आणि त्या आर्थिक वर्षात संपूर्ण खर्च ₹ ३०,०००/- आला असेल तर एका आर्थिक वर्षात व्यवसायाला ₹ २०,०००/- रू नफा झाला असे म्हणता येईल.

ब) **तोटा** (Loss) : जेव्हा मालाची विक्रीची किंमत तिच्या परीव्यय मूल्यापेक्षा कमी असते तेंव्हा त्यास तोटा असे म्हणतात. तोट्यामुळे व्यवसायाचे भांडवल कमी होते.

उदा. जर एका आर्थिक वर्षात संपूर्ण वस्तूंची विक्री ₹ ५०, ०००/- केली गेली असेल आणि त्या वर्षात होणारा संपूर्ण खर्च ₹ ६०,००० असेल तर या प्रसंगी व्यवसायाला ₹ १०,००० तोटा झाला असे म्हणतात.

क) **उत्पन्न** (Income) : ही व्यावसायिक व्यवहारातून निर्माण झालेली महसुली प्राप्ती होय. वस्तू विक्री पासून किंवा ग्राहकांना पुरविलेल्या सेवेपासून प्राप्त झालेली राशी होय. यात इतर घटकापासून मिळालेल्या उत्पन्नाचाही समावेश होतो. उदा. प्राप्त भाडे, प्राप्त व्याज,प्राप्त वर्तन, प्राप्त लाभांश इ.

**ड) महसुली** (Revenue) : महसुली उत्पन्न म्हणजे व्यवसायाला वस्तूंच्या विक्रीपासून किंवा ग्राहकांना दिलेल्या सेवेपासून प्राप्त झालेले उत्पन्न होय.

### १.७.१० संपत्ती, देयता, निव्वळ किंमत/मूल्य :

**अ) संपत्ती** (Assets) : मौद्रिक किंमत असलेली कोणत्याही प्रकारची भौतिक वस्तू म्हणजे संपत्ती किंवा मालमत्ता होय. मालमत्तेची मालकी ही व्यवसायाच्या संबंधी असली पाहिजे. उदा. भूमी व इमारत, संयंत्र व यंत्र, ख्याती इ.

**ब) संपत्तीचे प्रकार** (Types of Assets) :

- **अ) स्थिर संपत्ती** (Fixed Assets) : ही अशी संपत्ती आहे की, जी व्यवसायाला दिर्घकाळपर्यंत लाभ देत राहते. अशी संपत्ती व्यवसायाच्या दिर्घकालीन उपयोगासाठी खरेदी केली जाते. ही संपत्ती मूर्त किंवा अमूर्त असते. उदा. इमारत, यंत्र, ख्याती इत्यादी.

- **ब) चल संपत्ती** (Current Assets) : अल्पावधीसाठी व्यवसायात राहणारी आणि सहजतेने पैशात रुपांतरीत करता येणाऱ्या संपत्तीला चल संपत्ती असे म्हणतात. उदा. ऋणको, प्राप्त विपत्र, रोख, शिल्लक माल इ.

- **क) काल्पनिक संपत्ती** (Fictitious Assets) : ही संपत्ती दृश्य किंवा मालमत्तेच्या स्वरूपात दर्शविता येत नाही. अशी संपत्ती काल्पनिक स्वरुपाची असते. परंतु तिची मुल्याच्या स्वरुपात देवाण घेवाण करता येत नाही. उदा. प्रारंभीक खर्च, महसुली स्वरुपाचे खर्च, जसे जाहिरात खर्च ४ वर्षासाठी दिला.

**क) देयता** (Liabilities) : व्यवसायाला इतरांना द्यावी लागणारी संपूर्ण राशी देयता म्हणून ओळखली जाते. हे कर्ज आहे किंवा व्यवसायाने इतरांकडून प्राप्त केलेल्या लाभाच्या मोबदल्यात त्यांना देय असलेली राशी होय. उदा. घेतलेले कर्ज, धनको, अधिकोष अधिविकर्ष इत्यादी.

**ड) देयतेचे प्रकार** (Types of Liabilities) :

- **अ) स्थिर देयता** (Fixed Liabilities) : स्थिर देयता ही व्यवसाय निधीचा एक मुख्य स्त्रोत आहे. भांडवल, सुरक्षित कर्ज, दिर्घ मुदतीची बँकेकडून व आर्थिक संस्थांकडून घेतलेली कर्ज इ.

**ब)** **चल देयता (Current Liabilities) :** एका वर्षात द्याव्या लागणाऱ्या देयतांना चल देयता असे म्हणतात. अशा देयता व्यवसायात नियमित घडणाऱ्या घडामोडीतून उद्भवतात साधारणत: अशा देयता सुरक्षित नसतात. उदा. धनको, देय्यविपत्रे इत्यादी.

**इ)** **शुद्ध संपत्ती किंवा मालकाचा निधी किंवा भांडवल (Net worth or Owners Equity or Capital) :**

व्यवसायाच्या मालकाकडून व्यवसायाला जो निधी पुरवला जातो त्यास भांडवल असे म्हणतात. तसेच व्यावसायिक देयतेपेक्षा जास्तीची असणारी संपत्ती म्हणजे भांडवल होय. यालाच शुद्ध मूल्य असेही म्हणतात. भांडवल आणि संचिती याचा समावेश शुद्ध मुल्यात होतो. भांडवल रोख किंवा वस्तू / मालमत्ता स्वरूपात असते.

**शुद्ध मूल्य = व्यवसाय मालकाचा निधी = भांडवल**

**किंवा**

**व्यवसाय मालकाचा निधी (भांडवल ) = एकूण निधी (संपत्ती) – धनकोचा निधी (देयता)**

उदा. अ) जर भांडवल ₹ ४,००,००० आहे आणि ₹ २,००,००० चा धनकोचा निधी (देयता) आहे. तर

व्यवसाय मालकाचा निधी = देयता + भांडवल

₹ ६,००,०००= २,००,००० + ४,००,०००

ब) जर व्यवसायाची संपूर्ण संपत्ती ₹ १,५०,००० रूपयाची आहे आणि ₹ ५०,००० ची देयता आहे तर

धनकोचा निधी = संपत्ती – भांडवल

₹ ५०,००० = ₹ १,५०,०००– ₹ १,००,०००

क) जर व्यवसायाची एकूण संपत्ती ₹ ५,००,००० आहे आणि देयता ₹ २,००,००० आहे. तर मालककाचा निधी (भांडवल) पुढीलप्रमाणे–

मालकाचा निधी (भांडवल) = Assets - Liabilities

₹ ३,00,000 = ₹ ५,००,०००– ₹ २,००,०००

**संभाव्य देयता / आकस्मिक देणी (Contingent Liabilities) :**

ज्या देयता भविष्यात घडणाऱ्या किंवा न घडणाऱ्या अचानक घटनांतून निर्माण होत असतात. त्यांना संभाव्य / आकस्मिक देणी म्हणतात. अशा प्रकारच्या देयता ह्या निश्चित स्वरुपाच्या नसल्यामुळे त्याचा व्यवसायाच्या आर्थिक स्थितीवर परिणाम होत नाही. त्यामुळे आकस्मिक देणी ताळेबंदाच्या देयता बाजूवर दर्शविल्या जात नाही. परंतु माहिती म्हणून टीपद्वारे ताळेबंदाच्या तळाशी दर्शवितात.

उदा. एखाद्या कामगाराने नुकसान भरपाई म्हणून ₹ ५,०००/– चा दावा केला असेल आणि प्रकरण न्यायालयात असेल तर न्यायालयाच्या निर्णयावर ती भविष्यकालीन देयता असू शकते.

## १.८ लेखांकनाच्या संकल्पना, संकेत आणि तत्वे (Accounting Concepts, Conventions and Principles)

**लेखांकिय संकल्पनेचा अर्थ आणि महत्त्व (Meaning and Importance of Accounting Concepts)**

लेखाकर्म हे व्यवसायातील घडामोडीचे परिणाम वेगवेगळ्या हितसंबंध असणाऱ्या घटकांना कळविण्यात येतात. उदा. मालक, धनको, गुंतवणूकदार, बँका, वित्त संस्था, सरकार आणि इ. संस्था. व्यवसायाची भाषा म्हणजे लेखाकर्म असे म्हटले जाते.

लेखाकर्म हे फक्त व्यवसायाची निगडीत नसून ते प्रत्येकाशी निगडीत आहे जे पैशासंबंधी हिशोब ठेवतात. सामान्यपणे लेखाकर्म ही संकल्पना आर्थिक लेखाकर्माशी संबंधित आहे. पुस्तपालन व लेखाकर्म ही एक नोंदविण्याची, विभागणी व विश्लेषणात्मक व्यवसायाची परिपूर्ण कला आहे.

**लेखांकिय तत्त्वाचे महत्त्व (Importance of Accounting Concepts) :**

१) विश्वसनीय आर्थिक विवेचन (Reliable financial statements)

२) सादरीकरणात एकसारखेपणा (Uniformity in presentation)

३) मोजमापाचे साधारण स्विकार्य तत्व (Generally acceptable basis of measurement)

४) सर्वांकरिता योग्य माहिती (Proper information to all)

५) कायदेशीर आणि योग्य गृहीते (Valid and appropriate assumptions)

**काही महत्त्वाची तत्वे खालीलप्रमाणे आहेत :**

**१) व्यवसायाचे स्वतंत्र अस्तित्व (Business Entity) :** व्यवसायाचे, व्यवसाय मालकापासून स्वतंत्र अस्तित्व असते. हा व्यवसायाच्या स्वतंत्र अस्तित्वाचा मुळ अर्थ आहे. या संकल्पनेनुसार एकल व्यापार आणि एकल व्यापारी या दोन वेगवेगळ्या स्वतंत्र संकल्पना म्हणून लक्षात घेतल्या जातात. या तत्वानुसार केवळ व्यावसायिक व्यवहारांचा व्यवसायाच्या लेखा पुस्तकात नोंदी केल्या जातात. व्यापाऱ्याच्या व्यक्तीगत व्यवहाराच्या नोंदी व्यवसायाच्या लेखा पुस्तकात केल्या जात नाही. व्यवसायात गुंतवलेले भांडवल व वैयक्तिक उपभोगासाठी घेतलेली उचल लेखा पुस्तकात लिहितात.

उदा. संपूर्ण इमारतीपैकी अर्धा भाग व्यवसायासाठी आणि अर्धा भाग व्यवसाय मालक स्वत: राहण्यासाठी उपयोगात आणत असेल आणि इमारतीचे भाडे वार्षिक ₹ ५०,०००/- द्यावे लागत असेल तर अशा वेळी केवळ ₹ २५,०००/- उचल म्हणून व्यवसाय मालकाच्या भांडवलातून वजा करून दाखवावे लागेल.

**२) पैशातील मोजमाप (Money Measurement) :** व्यावसायिक व्यवहार मोजमापाच्या घटकामध्ये व्यक्त करणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यवहार पैशाच्या स्वरुपात नोंदविला जातो. भारतामध्ये सर्व लेखापाल फक्त भारतीय चलनाचाच वापर करतात. ज्या व्यवहारामध्ये पैशाचा संबंध नसतो असे व्यवहार लेखा पुस्तकामध्ये नोंदविले जात नाही. उदा. कामाच्या कार्यपद्धती, कामगारांचा संप, व्यवस्थापनाची कार्यक्षमता इ. गोष्टी पुस्तकात लिहिल्या जात नाहीत. कारण त्यांना पैशांमध्ये व्यक्त केले जात नाहीत. जसे ₹ या संकल्पनेमुळे फक्त पैशाच्या स्वरुपातीलच घटक नोंदविले जातात.

निदर्शन – व्यवसायाची मालमत्ता खालील प्रमाणे आहे. ५ संगणक, २ टेबल, ३ खुर्ची

ही माहिती पैशामध्ये नोंदविली जाईल जसे संगणक प्रत्येकी ₹ १५,०००/- टेबल प्रत्येकी ₹ २५०० /- आणि खुर्ची प्रत्येकी ₹ २५००/-

या ठिकाणी संपूर्ण संपत्तीचे मोजमाप पैशामध्ये नोंदविले जाईल आणि लेखापुस्तकात त्याचे मुल्य लिहिले जाईल.

**३) मूल्य संकल्पना (Cost Concept) :** खरेदी करतेवेळी संपत्तीची जी किंमत दिली जाते. त्याच मुल्याने त्या संपत्तीची नोंद लेखापुस्तकात केली जाते आणि दिलेले मुल्य हे पुढील सर्व लेखांकनाकरिता आधार म्हणून ग्राह्य धरले जाईल भविष्यात अशा संपत्तीचे वेगवेगळे मूल्य असू शकते. जसे बदलता येण्याजोगे मूल्य किंवा त्यांच्या योग्य किमतीने नोंदविलेली स्थिर संपत्ती किंवा चलसंपत्ती.

निदर्शन : ₹ ३,००,०००/- ला उपस्कर विकत घेतले आणि लेखा पुस्तकात हिच किंमत नोंदविली गेली. समजा या उपस्कराचे बाजारमूल्य ₹ १,००,०००/- किंवा ₹ १,५०,०००/- झाले तर हे मूल्य विचारात घेतले जाणार नाही.

४) **सातत्य संकल्पना (Consistency Concept) :** व्यवसायामध्ये लेखांकनाबाबत कोणतेही धोरण सातत्याने राबविणे गरजेचे असते. साधारणत: परिस्थिती उद्‌भवेपर्यंत या धोरणात बदल करण्याची गरज नाही. तसेही नवीन तंत्राच्या प्रगतीमध्ये याचा कोणताही अडथळा होत नाही. परंतु हे टिप देऊन स्पष्ट केले पाहिजे.

उदा. : कंपनीने आपल्या स्थिर संपत्तीवर सुरवातीपासून संपत्तीच्या अनुमानीत आयुष्यापर्यंत स्थिर पद्‌धतीने घसारा आकारण्याची पद्‌धत स्विकारली.

५) **पुराणमतवाद (Conservatism) :** व्यावसायिक व्यवहारांच्या नोंदी करतांना, त्या नफ्यासाठी नसून शक्य तेवढ्या सर्व तोट्यांच्या तरतुदीसाठी करतो आहे, हे आपणास अपेक्षित असावे ही बाब तोटा भरून काढण्यासाठी प्रोत्साहीत करते. आर्थिक विवरणात कमी उत्पन्न दाखविणे आणि ताळेबंद जास्त देयता व वास्तविकतेपेक्षा कमी संपत्ती दाखविणे शक्य आहे. नोंदी करण्याच्या या धोरणामुळे लेखापाल सुरक्षितपणे लेखे लिहू शकतो.

उदा. : कंपनीच्या अंतिम स्कंधाचे लागत मूल्य ₹ २५,०००/- आहे आणि या स्कंधाची बाजार किंमत ₹ ३५,०००/- आहे. परंतु लेखा पुस्तकात नोंदी करताना स्कंधाची कमी किंमतच म्हणजे ₹ २५,०००/- विचारात घेतली जाईल.

६) **चालू संस्था (Going Concern) :** बऱ्याच कालावधीपर्यंत व्यवसाय सुरू राहील असे गृहीत धरले आहे. व्यवसाय हा मध्येच बंद न पडता चालतच राहील. व्यवसाय हा अगदी अल्पावधीत बंद केला जाणार नाही तर व्यवसायाला दिर्घायुष्य म्हणजे फार दिर्घकाळ पर्यंत तो चालतच राहतो. ही संकल्पना गुंतवणूकदारांना गुंतवणूकीसाठी, पुरवठा करणाऱ्यांना उधार देण्यासाठी आणि बऱ्याचशा कर्मचाऱ्यांना सेवा देण्यासाठी मदत करते.

उदा. सामान्यपणे संपत्तीचे मुल्यांकन इतिहासीक पद्‌धतीने केले जाते. अल्पावधीत संपत्तीच्या मुल्यात झालेली वाढ किंवा घट दुर्लक्षीत केली जाते.

७) **रोखीकरण (Realization) :** उत्पन्न मग ते मिळालेले असो की प्राप्त झालेले असो केवळ प्रत्यक्ष वसूल झालेल्या उत्पन्नाचीच नोंद केली जाते. म्हणजे उत्पन्नाची वसुली झाल्याशिवाय नोंद केली जात नाही. विक्री केल्यानंतर किंवा सेवा दिल्यानंतरच प्राप्तीची नोंद केली जाते. लेखांकिय वर्षात विक्री झाली असेल परंतु जोपर्यंत त्या विक्रीपासून रोख प्राप्त झाली किंवा नाही हे कळत नाही तोपर्यंत ती विक्री महसुली विक्री म्हणून समजली जात नाही.

उदा. : मे २०१७ मध्ये कंपनीला ₹ १,००,०००/- च्या वस्तूंच्या विक्री आदेश मिळाला. जून २०१७ मध्ये ₹ ६०,०००/- च्या वस्तू विकल्या व पाठविल्या ₹ ६०,०००/- ची रोख राशी सप्टेंबर २०१७ ला प्राप्त झाली. रोखीकरण संकल्पनेच्या तत्वानुसारू जून २०१७ ला विक्रीची नोंद केली जाईल .

८) **उपर्जित / प्राप्त (Accrual) :** जेव्हा उत्पन्न उपर्जित होते आणि खर्च देय्य असतो तेव्हा त्याची नोंद केली जाते. सर्व खर्च आणि उत्पन्न लेखांकिय कालावधीशी संबंधित असतात. यावेळी उत्पन्न रोख मिळाले किंवा नाही, खर्च रोख केला गेला किंवा नाही हे लक्षात घेतले जात नाही.

उदा. एका कंपनीने १ ऑक्टोबर २०१५ रोजी ₹ १,००,०००/- बँकेत गुंतविले. गुंतवणुकीच्या परिपक्व स्थितीला म्हणजे ३० सप्टेंबर २०१६ रोजी बँक वार्षिक १०% दराने व्याज देते.

९) **दुहेरी पैलू (Dual Aspect) :** नफ्याच्या मोबदल्यात होणाऱ्या प्रत्येक व्यापारी व्यवहाराचे दोन प्रभाव होतात. लेखापुस्तकात लाभ देणारा आणि लाभ होणारा असे दोन्ही पैलू नोंदविले जातात. दोन्ही पैलु लेखापुस्तकात नोंदविण्याच्या या पद्‌धतीला द्विनोंद पद्‌धती असे म्हणतात.

उदा. अक्षयने ₹ ५,००,०००/- व्यापारात गुंतविले. एका बाजुने विचार केल्यास व्यापाराला संपत्ती (रोख) ₹ ५,००,०००/- मिळाली आणि दुसरी बाजू व्यापार ₹ ५,००,००० /- व्यावसायिकाचे भांडवल म्हणून देणे लागतो. अशा रितीने पुस्तकात नावे आणि जमा बाजू सारख्या होतील.

भांडवल + देयता = संपत्ती

१०) **प्रगटीकरण (Disclosure) :** लेख्यांनी सर्व महत्त्वाची माहिती उघड केलीच पाहिजे. सर्व संबंधित पक्षांना, संपूर्ण वस्तूस्थितीची माहिती प्रकट करणारे लेखांकिय अहवाल असावे. व्यापाराची आर्थिक स्थिती म्हणजे व्यवसायाचा ताळेबंद आणि आर्थिक कृती म्हणजे नफा-तोटा लेख्यातील व्यावसायिक परिणाम म्हणून नफा किंवा नुकसान आणि उत्पन्न व खर्च होय.

सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी प्रकट केलेली संपूर्ण माहिती संपूर्ण विश्वसनीय, तुलना करता येण्याजोगी आणि समजू शकेल अशी असावी.

११) **महत्त्वपूर्णता (Materiality) :** लेखांकन करतांना छोट्या तथ्यांचीही नोंद करतांना काटकसर करणे योग्य होणार नाही. या संकल्पनेच्या तत्वानुसार तुलनात्मक दृष्ट्या महत्त्वाची आणि पैशात व्यक्त होणारी माहिती नोंदविली गेली पाहिजे. या संकल्पनेचा वेळ प्रयत्न आणि वेळेच्या उपयोगीतेची संबंधित नसलेल्या परिव्यय लेखांकनाशी अत्यंत महत्वाचा संबंध आहे.

आर्थिक विवरणात केवळ विवरणे नोंदविली आणि प्रकट केली पाहिजे. की जी आर्थिक स्थिती ठरविण्यासाठी उपयुक्त आणि महत्वपूर्ण आहेत. कमी महत्वाची किंवा गौण माहिती एकतर टाळली पाहिजे किंवा महत्त्वाच्या माहितीमध्ये सम्मीलीत तरी केली पाहिजे. किंवा अशी गौण माहिती खाली टिप म्हणूनही दर्शविता येईल.

१२) **जुळवणीची संकल्पना (Matching Concept) :** लेखांकिय वर्षात झालेल्या खर्चाची जुळवणी उत्पन्नाशी (प्राप्तीशी) मान्यता प्राप्त काळात केली पाहिजे. जसे जर विशिष्ट कालखंडातील वस्तू विक्रीचे मान्यता प्राप्त उत्पन्न आहे, त्या कालखंडात विक्रीत वस्तूंची किंमत सुद्धा आकारली गेली पाहिजे.

ही संकल्पना उपार्जित तत्वाशी संबंधीत आहे आणि म्हणून पूर्वदत्त खर्च, देणे खर्च, उपार्जित उत्पन्न अशा सर्व समायोजना विचारात घेतल्या जातात. जुळवणी याचा अर्थ असा नव्हे की खर्च, उत्पन्नाशी तंतोतंत जुळलेच पाहिजे.

एका विशिष्ट कालखंडात केलेला खर्च त्या कालखंडातील वैध उत्पन्नाशी संबंधीत असू शकतो. किंवा नसूही शकतो. लेखांकिय कालखंडात उचित किमतीशी उचित सर्वांची जुळवणी झाली पाहिजे.



***विद्यार्थी कृती :***

१) आर्थिक व अनार्थिक कृतीचे उदाहरणे द्या.

२)तुमच्या घरातील संपत्ती व देयतांची यादी तयार करा.

## १.९ लेखांकिय मानांकन / प्रमाण (Accounting Standards)

लेखांकिय मानांकनामध्ये फ्रेमवर्क आणि नियमांचे पालन करतात जेणेकरून वेगवेगळ्या संस्थांचे आर्थिक विवरण तुलनात्मक होईल. वित्तीय अहवालाची सुसंगतता, तुलनात्मकता, पर्याप्तता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करण्यासाठी लेखांकनाच्या तत्वांचे पालन करणे आवश्यक आहे.

**कोहलर** यांच्या शब्दात रोख लेखापालाच्या किंवा सामान्य लेखापालाच्या हितासाठी परंपरेने लादलेली सांकेतिक पद्धत नियम किंवा व्यावसायिक मंडळ हे लेखांकनाचे आदर्श आहेत.

थोडक्यात, लेखांकिय आदर्श हे तज्ञ लेखांकन करणाऱ्या मंडळीकडून किंवा सरकारकडून किंवा इतर नियमांच्या चौकटीत तयार झालेल्या मंडळीकडून खालील विविध घटकांचा अंतर्भाव असलेले लिखीत स्वरूपाचे धोरणात्मक दस्तऐवज होय.

१) मान्यता (Recognition) २) मोजदाद (Measurement) ३) कृती (Treatment) ४) सादरीकरण (Presentation)

**लेखांकिय मानांकनाची गरज (Need for Accounting Standards) :**

लेखांकिय मानांकनाची गरज खालीलप्रमाणे :

१) वित्तीय विवरणाला चांगले समजून घेण्यासाठी हातभार लावणे.

२) लेखापालाला एकसमान प्रक्रिया आणि पद्धतींचे पालन व सराव करण्यास मदत करणे.

३) दोन किंवा अधिक घटकांच्या आर्थिक विवरणाची अर्थपूर्ण तुलना सुलभ करण्यासाठी.

४) आर्थिक विवरणाची विश्वसनीयता वाढवण्यासाठी

५) कायदेशीर आवश्यकता पूर्ण करण्यासाठी

**आंतरराष्ट्रीय आर्थिक लेखांकन मानक** (International Financial Reporting Standards) (IFRS)

आंतरराष्ट्रीय आर्थिक लेखांकन मानक (IFRS) आंतरराष्ट्रीय लेखा मानक मंडळाद्वारे (IASB)जारी केले जातात. IFRS वित्तीय विवरणामध्ये विशिष्ट प्रकारचे व्यवहार आणि इतर घटक कशा नोंदविल्या पाहिजेत या विषयी आंतरराष्ट्रीय लेखामानकांचा एक संच आहे. आंतरराष्ट्रीय आर्थिक अहवाल लेखांकन मानक विकसीत करण्यासाठी जारी केले जातात. जे जगभरात स्वीकार्य असतील आणि आंतरराष्ट्रीय स्तराव आर्थिक अहवाल सुधारतील.

**भारतातील लेखांकन मानक** (Accounting Standards in India)

भारतातील लेखांकनाची मानके इन्स्टिट्यूट ऑफ अकाऊंटंट ऑफ इंडिया या संस्थेद्वारे (ICAI)जारी केले जातात. भारतीय चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इन्स्टिट्यूट ऑफ कौन्सिलने भारतात लेखांकन मानक मंडळ (ASB) २१ एप्रिल १९७७ रोजी भारतातील मानकांची गरज पूर्ण करण्यासाठी तयार केले. ASB लेखांकीय मानदंड तयार करते जेणेकरून अशा मानकांची स्थापना इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाद्वारे केली जाऊ शकते. भारतातील लेखामानक मंडळ ASB तयार लागू कायदे, सानुकूल, वापर, व्यवसाय, पर्यावरण आणि आंतरराष्ट्रीय लेखामानक मानेल.

जागतिकीकरणामुळे, भारतात तयार केलेले खाते आणि इतर देशांमध्ये तयार केलेल्या खात्याशी सुसंगत असले पाहिजेत. याचा परिणाम म्हणून विद्यमान ASF, IFRS सह एकत्रित केले गेले आहे. या अभिसरणाने परिणामी Ind AS म्हणून ओळखले जाते. भारतीय मूलभूत पद्धती, रीतिरिवाज आणि परंपरा यांच्यानुसार मूलभूतपणे आंतरराष्ट्रीय लेखा मानकांचे रुपांतर केले गेले आहे. सध्या, सर्व मोठ्या कंपन्यांना नियम म्हणून इंडेक्सचे अनुसरण करावे लागते. परंतु लहान व्यवसाय घटक (युनिट्स) वापरणे सुरु ठेवण्याची परवानगी आहे. भविष्यात अशी अपेक्षा केली जाते की, Ind AS मध्ये सर्व भारतातील व्यावसायिक संस्था स्थलांतरीत होतील.

(Ind AS.- भारतीय दर्जा)

**काही लेखांकिय प्रमाणे** (AS) : दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौन्टंट ऑफ इंडिया परिषदेने एकतीस लेखांकिय आदर्श निर्देशित केलेले आहेत. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे आहे.

१) AS-1 **लेखांकिय आदर्श : लेखांकिय धोरणाचे प्रकटीकरण** (Disclosure of Accounting Policies)

लेखांकनाच्या या आदर्शानुसार लेखांकिय धोरणात, आर्थिक विवरणाची तयारी आणि सादरीकरण हे आर्थिक विवरणाचा एक भाग असला पाहिजे आणि ते एका ठिकाणी प्रकट केले गेले असले पाहिजे.

(१-४-१९९१ पासून कंपनीकरिता आणि १-४-१९९९ पासून इतरांसाठी)

२) AS-2 **स्कंधाचे मूल्यांकन** (Valuation of Inventories) :

लेखांकनाच्या या आदर्शानुसार साधारण संपत्तीचे मूल्यांकन भूतकाळातील कमी किमतीने आणि वास्तविक शुद्ध किमतीने केले पाहिजे. (०१-०४-१९९९)

३) AS-3 **रोख प्रवाह विवरण** (Cash Flow Statements) (०१-०४-२००१)

लेखांकनाच्या या आदर्शानुसार ज्यावेळी / लाभालाभ लेखा तयार केला जातो त्याच काळात निधी प्रवाह विवरणे तयार आणि सादर केली पाहिजे.

४) AS-6 **घसारा लेखा** (Depreciation Accounting) :

लेखाकनांच्या या आदर्शानुसार संपत्तीचा वापर होत असतानाच्या कालखंडात प्रत्येक लेखांकिय कालावधीसाठी संपत्तीच्या किंमतीवर नियोजित पद्धतीने घसारा आकारला गेला पाहिजे. (०१-०४-१९९५)

५) AS-8 **(संशोधन आणि विकासाकरिता लेखांकन** (Accounting for Research and Development) :

लेखांकनाच्या या आदर्शानुसार शोध आणि विकासावर खर्च झालेली राशी ज्या प्रत्यक्ष कालखंडात खर्च केली गेली असेल, त्या विशिष्ट कालखंडात खर्च म्हणून दाखवावी.

(कंपनीकरिता ०१-०४-१९९१ आणि इतरासाठी ०१-०४-१९९३)

६) AS-9 **(उत्पन्न नियोजित)** Revenue Recognition) :

व्यवसाय चालकाने तयार केलेल्या लाभा लेख्यातील मान्यता प्राप्त (वैध) उत्पन्न घटकाच्या आवश्यक तत्वाशी या आदर्शाचा संबंध आहे. मान्यता प्राप्त उत्पन्न हे व्यवसाय चालकाच्या विविध व्यवहारातून उत्पन्न झालेले असावे, अशी अट घालून देण्यात आली आहे. (०१-०४-१९९१)

७) AS-10 **(स्थिर संपत्तीसाठी लेखांकन** ) (Accounting for Fixed Assets) :

लेखाकनांच्या आदर्शानुसार स्थिर संपत्तीच्या किमतीची तुलना तिच्या खरेदी किंमतीशी आणि संपत्तीच्या हेतू पुरस्पर उपयोगासाठी चालू स्थितीत संपत्ती आणतांना बहाल केलेल्या किंमतीशी केली पाहिजे ज्यावेळी स्थिर नष्ट केली जाते किंवा तिच्या उपयोगापासून भविष्यात कोणताही लाभ अपेक्षित नसतो. अशावेळी आर्थिक विवरणातून ती काढून टाकली पाहिजे. (०१-०४-१९९१)

8) As-12 **शासकीय अनुदानासाठी लेखांकन** (Accounting for Government Grants)

ज्यावेळी संस्था शासकीय निती नियम आणि अटीशी बांधील राहिल अशी खात्री असते. त्यावेळी शासकीय अनुदानाच्या लेखांकनास मान्यता दिली जाते. (०१-०४-१९९४).

9) As-13 **विनियोजना जनाकरिता / गुंतवणुकीकरिता लेखांकन** (Accounting for Investments)

लेखाकनांच्या या आदर्शानुसार व्यवसायाने आपल्या आर्थिक विवरणात चालू आणि दिर्घकालीन विनियोग प्रकर्षाने प्रकट केले पाहिजे आर्थिक विवरणात चालू गुंतवणूक तिच्या कमीत कमी किमतीने किंवा योग्य किमतीने दर्शवावी. दिर्घकालीन गुंतवणूक मात्र आर्थिक विवरणात तिच्या प्रचलित किमतीने दर्शवावी. (०१-०४-१९९५).

10) AS-१४ **आयकराकरिता लेखांकन** (Accounting for Taxes on Income) :

लेखाकनांच्या या आदर्शानुसार विशिष्ट चालू कर आणि अस्थगित कर यांची तुलना करताना करावरील खर्च शुद्ध नफा किंवा त्या कालखंडातील तोटा निश्चित करतांना समाविष्ट केला पाहिजे. (०१-०४-२००१).



***विद्यार्थी कृती :***

icai.org या संकेत स्थळाला भेट द्या. आणि लेखांकिय मानक आणि भारतीय दर्जा या विषयी माहिती मिळवा.

## स्वाध्याय

**प्र.१ एका वाक्यात उत्तरे लिहा. :**

१) पुस्तपालन म्हणजे काय ?

२) वस्तु / माल म्हणजे काय ?

३) भांडवल म्हणजे काय ?

४) उचल म्हणजे काय आहे ?

५) ख्याती म्हणजे काय ?

**प्र.२ खालील विधानासाठी एक शब्द शब्दसमुह किंवा संज्ञा द्या :**

१) व्यवसायाच्या व्यवहाराची नोंद करणे.

२) व्यवसायाच्या मालकाने व्यवसायात गुंतवणूक केलेली रक्कम.

३) एखादा व्यक्ती ज्याला रक्कम देणे आहे.

४) दोन व्यक्तींमधील विनिमय

५) उत्पन्नावरील खर्चाचे अधिक्य

६) ज्या व्यक्तीची मालमत्ता देणी पूर्ण करण्यासाठी पुरेशी आहे ती व्यक्ती.

७) पुस्तपालन व्यवसायासाठी आवश्यक सर्व आर्थिक माहिती व्यावसायिकाला पुरवीत असते.

८) व्यवसायाच्या मालकीच्या कोणत्याही तपशीलाची संपत्ती.

९) मालमत्ता ज्या केवळ थोड्या काळासाठी राहतात आणि ते सहजपण रोख स्वरुपात परावर्तीत होऊ शकतात.

१०) सूट जी वस्तूच्या पुस्तकी मुल्यावर दिलेली असते.

**प्र.३ खाली दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्यायाची निवड करा आणि विधाने पुन्हा लिहा.**

१) खर्चांवरील उत्पन्नचे अधिक्य _______________.

अ) नफा  ब) तूट  क) तोटा  ड) आर्थिक संस्था.

२) _____________ लेखाचे आधार, वास्तविक रोख प्राप्ती आणि प्रत्यक्ष रोख शोधून नोंदविली असतात.

अ) संचय  ब) संकरीत  क) रोख  ड) व्यापारिक

३) ग्राहकाकडून परत मिळण्यायोग्य नसलेली रक्कम _______________ म्हणून ओळखली जाते.

अ) बुडित कर्ज  ब) कर्ज  क) कर्जदार  ड) संशयास्पद कर्जे

४) प्रामाणिकपणे तयार केलेले लेखे आणि सर्व भौतिक माहितीचा उल्लेख असलेले लेखे __________म्हणतात.

अ) प्रवेश संकल्पना  ब) दुहेरी दृष्टीकोन संकल्पना  क) प्रकटीकरण संकल्पना  ड) खर्चाची संकल्पना

५) व्यावसायिक व्यवहार करतात त्या वस्तू म्हणजे ________________.

अ) माल  ब) उत्पन्न  क) मालमत्ता  ड) खर्च

६) __________ म्हणजे व्यवसायाची पैशामध्ये नमूद केलेली प्रतिष्ठा होय.

अ) व्यापारचिन्ह  ब) मालमत्ता  क) विशेष हक्क  ड) ख्याती

७) लेखांकनाच्या या आदर्शानुसार ज्यावेळी लाभालाभ लेखा तयार केले जाते त्याच काळात निधीप्रवाह विवरणे तयार आणि सादर केली जातात.

अ) एएस – ३  ब) एएस –१०  क) एएस –६  ड) एएस – २

८) नुकसानीची तात्काळ ओळख करून ताबडतोब त्याची तरतूद करणारे तत्व म्हणजे ___________.

अ) पुराणमतवाद  ब) उद्दिष्ट  क) जुळवणी तत्व  ड) सातत्य संकल्पना

९) रोजकिर्दीवी खात्याची एकूण संख्या __________म्हणून ओळखली जाते.

अ) पान क्रमांक  ब) स्पष्टीकरण  क) खतावणी  ड) पंजीयन

१०) दोन्ही पक्षांमधील भूतकाळातील बदल किंवा गोष्टींचा एक कायदा म्हणजे _______.

अ) खतावणी  ब) हस्तांतरण  क) व्यवहार  ड) व्यवसाय

**प्र.४ खालील विधाने सत्य आहे की असत्य आहे हे स्पष्ट करा. :**

१) पुस्तपालन आणि लेखाकर्म एक सारख्या गोष्टी आहेत.

२) पुराणमतवादाचा अर्थ सुरक्षित अनुसरण करणे होय.

३) दुहेरी नोंद पद्धती दुहेरी संकल्पनेवर आधारीत आहे.

४) अधिकोश अधिवीकर्ष ही व्यवसायाची मालमत्ता आहे.

५) शोधनक्षम व्यक्ती ही अशी व्यक्ती आहे जिची संपत्ती त्याच्या देयतेपेक्षा जास्त आहे.

६) हिशोब पुस्तकात रोख कसर लिहली जात नाही.

७) व्यवहाराचा संबंध पैशाशी किंवा पैशाच्या मूल्याशी असतो.

८) लेखांकन हे व्यवसायाची परिभाषा आहे. .

# 2 पुस्तपालनाची द्विनोंद पद्धती अर्थ आणि मूलतत्वे
## (Meaning & Fundamental of Double Entry Book-Keeping)

**अभ्यास घटक**

*२.१ पुस्तपालनाच्या द्विनोंद पद्धतीचा अर्थ आणि व्याख्या*

*२.२ लेखांकनाच्या पद्धती (भारतीय, एकेरी नोंद, द्विनोंद)*

*२.३ पुस्तपालनाच्या द्विनोंद पद्धतीचे फायदे*

*२.४ खात्यांचे वर्गीकरण*

*२.५ खाते / लेखे नावे आणि जमा करण्याचे सुवर्ण नियम (परंपरागत दृष्टीकोन)*

*२.६ आधुनिक संकल्पनेनुसार खात्याचे नियम*

*२.७ स्वाध्याय*

*२.८ लेखांकिय सूत्र*

**क्षमता विधाने :**

- *विद्यार्थ्यांना द्विनोंद पद्धतीच्या प्रमुख मुलतत्त्वाचे आकलन होते.*
- *विद्यार्थ्यांना खात्यांचे प्रकार आणि वर्गीकरणाचे आकलन होते.*
- *विद्यार्थी व्यवहारांचे वर्गीकरण करताना सोनेरी नियमांचा वापर करतो.*
- *विद्यार्थी व्यवहारांचे वर्गीकरण व लेखांकिय सुत्रांचा तक्ता तयार करतो.*

### २.१ पुस्तपालनाच्या द्विनोंद पद्धतीचा अर्थ आणि व्याख्या :


व्यापारात घडणारा प्रत्येक आर्थिक व्यवहार लेखा पुस्तकात नोंदविण्याची द्विनोंद पद्धती ही एक शास्त्रशुद्ध पद्धत आहे. पुस्तपालनाची द्विनोंद पद्धतीचा शोध १० नोव्हेंबर १४९४ रोजी इटालियन व्यापारी ''ल्युका डी बर्गो पॅसिओली' यांनी लावला म्हणून १० नोव्हेंबर १४९४ या दिवसाला 'आंतरराष्ट्रीय लेखांकन दिवस' म्हणून साजरा करण्यात येतो. व्यापारात घडणाऱ्या प्रत्येक व्यवहाराचा दोन खात्यावर प्रभाव पडतो. हा या पद्धतीचा मूळ आधार आहे. प्रत्येक व्यापारी व्यवहारात दोन पक्ष प्रभावित होतात. एक पक्ष फायदा / लाभ घेतो तर दुसरा पक्ष फायदा / लाभ देत असतो. एखाद्या व्यवहारात काही येत असेल तर तेच दुसऱ्या व्यवसायातून जात असते.


'ल्युका डी बर्गो पॅसिओली

आर्थिक व्यवहारात दोन प्रभाव होत असतात, त्यापैकी एक खाते विकलन (नावे) तर दुसरे खाते समाकलन (जमा) होते या पद्धतीला पुस्तपालनाची द्विनोंद / दुहेरी नोंद पद्धती असे म्हणतात.

आधुनिक संकल्पनेनुसार, प्रत्येक व्यवसायिक व्यवहार हा संपत्ती, देयता, भांडवल, खर्च आणि उत्पन्नाशी संबंधीत असतो. संपत्ती आणि खर्चात वाढ झाली तर नावे करा आणि संपत्ती आणि खर्चात झालेली घट जमा केली जाते.

## २.२ लेखांकिय माहिती नोंदविण्याची पद्धती :




### १) भारतीय पद्धती :

लेखांकनाच्या या पद्धतीत सर्व व्यवहार भारतीय भाषेत नोंदविले जातात, जसे मराठी, हिंदी, ऊर्दु, गुजराथी इत्यादी यालाच महाजनी ''देशी नामा' पद्धत असे म्हटले जाते.

व्यवसायात घडलेले व्यवहार भारतीय पद्धतीनुसार ज्या पुस्तकात नोंदविले जातात, त्या पुस्तकाला वही खाते किंवा किर्द असे म्हणतात. लेखांकनाची भारतीय पद्धत ही द्विनोंद /दुहेरी पद्धतीवर अवलंबून नाही. जरी ही पद्धत शास्त्रशुद्ध नसली तरी आजही ही पद्धत भारतातील छोटे व्यापारी उपयोगात आणतात.

### २) इंग्रजी पद्धत :

#### अ) एकेरी नोंद पद्धती (Single Entry System) :

यापद्धतीनुसार फक्त रोकड / रोख पुस्तक आणि वैयक्तीक खातेच फक्त ठेवली जातात. एक नोंद पद्धती ही अशास्त्रीय पद्धत असून तिला हिशोबाची अपूर्ण पद्धत असेही म्हटले जाते. कारण व्यापारी आपल्या सोयीप्रमाणे या पद्धतीत बदल करीत असतो.

एकेरी नोंद पद्धत जमाखर्च लिहिण्यासाठी व्यवसायाची आर्थिक स्थितीबद्दलची अचूक/सत्य माहिती पूरवू शकत नाही. म्हणून ही छोट्या व्यवसायिकासाठी उपयोगी आहे.

#### ब) दुहेरी नोंद / द्विनोंद पद्धती (Double Entry System) :

पुस्तपालनाची दुहेरी / द्विनोंद पद्धती ही व्यवसायिक व्यवहार लेखापुस्तकात नोंदविण्याची शास्त्रीय पद्धत आहे. या पद्धतीमध्ये प्रत्येक घडलेल्या आर्थिक व्यवहाराने दोन लेखे प्रभावित होतात.

दुहेरी नोंद पद्धतीनुसार नोंद झाल्यानंतर एक खाते ज्या रकमेने नावे होत असेल तितक्याच रक्कमेने दुसरे खाते जमा करावे लागतात.


> दुहेरी नोंद पद्धतीच्या मुख्य नियमानुसार ''प्रत्येक नावे रक्कम हीच जमा रक्कम असते. तात्पर्य नावे आणि जमा अशा दोन वेगवेगळ्या खात्याच्या विरुद्ध बाजूवर नोंद होताना ती समान रक्कमेने होते.

### ब) दुहेरी नोंद / द्विनोंद पद्धतीची व्याख्या

**दुहेरी नोंद / द्विनोंद पद्धतीची व्याख्या खालील प्रमाणे आहे:**

"प्रत्येक व्यापारी व्यवहाराचे दोन विरुद्ध बाजूवर प्रभाव करणारे परिणाम घडत असतात. अशा व्यवहारांच्या नोंदी करावयाच्या असल्यास त्या एका लेख्याच्या नावे बाजूवर आणि दुसऱ्या लेख्याच्या जमा बाजूवर करणे आवश्यक असते. असे दोन परिणाम करणारे व्यवहार द्विनोंद / दुहेरी नोंद पद्धतीस जन्म देते.'' – **जे. आर. बॉटलीबाय**

**पुस्तपालनाच्या दुहेरी नोंद पद्धतीचे महत्वाचे घटक**




### द्विनोंद / दुहेरी नोंद पद्धतीची मूलतत्वे (Principles of Double Entry Book-keeping System) :

१) प्रत्येक व्यापारी व्यवहाराचे कमीत कमी दोन खात्यावर परिणाम होतात. एक नावे तर दुसरा जमा.

२) दोन लेखांपैकी एक लाभ घेणारा तर दुसरा लाभ देणारा असतो.

३) प्रभावित होणाऱ्या दोन खात्यापैकी एक खाते नावे होते तर दुसरे खाते जमा जाते.

४) प्रत्येक खाते ज्या रकमेने नावे होते त्याच रकमेने ते खाते जमा होते.

### २.३ पुस्तपालनाच्या द्विनोंद / दुहेरी नोंद पद्धतीचे फायदे : (Advantages of Double Entry Book-keeping System) :

**१) परिपूर्ण नोंदी (Complete Record) :**

या पद्धतीमध्ये सर्व व्यापारी व्यवहारांची नोंद होते. ही शास्त्रीय पद्धत असून त्यामध्ये प्रत्येक व्यवहाराचे दोनही परिणामांची नोंद केली जाते.

**२) अचूकता (Accuracy) :**

या पद्धतीनुसार लेखापुस्तकात दोन्ही पक्षांची नोंद केली जाते. त्यामुळे लेखांकनाच्या कार्यात अचूकपणा प्रस्थापीत होतो. यामध्ये गणितीय अचूकता तपासली जाते.

**३) व्यवसायिक निष्पती (Business Results ) :**

सर्व खर्च, नुकसान, उत्पन्न, लाभ, देयता, संपत्ती, ऋणको, (अधमर्ण) आणि धनको (उत्तमर्ण) यांच्याशी संबंधीत सर्व व्यवहार नोंदविले जातात. याच्याच आधारे व्यवसायिकाला एका विशिष्ट कालावधीत व्यवसायाची अचूक आर्थिक स्थिती जाणून घेता येते.

**४) सर्वमान्यता (Common Acceptance) :**

सार्वत्रिक व व्यापक मान्यता असलेल्या लेखा मूलतत्त्वांचे पालन केले जात असल्यामुळे या पद्धतीनुसार लिहिलेल्या व्यावसायिक नोंदीवर वित्तीय संस्था, शासकीय अधिकारी इत्यादीची मान्यता आहे.

**लेखांकनाची परंपरागत पद्धत** (Conventional Accounting)

परंपरागत लेखांकन पद्धत व्यावहारिकतेवर आधारलेली आहे. सर्वसामान्य मान्यतेवर आधारित नियमांनुसार लेखांकन करणे म्हणजे परंपरागत लेखांकन पद्धत होय. तसेच यामध्ये लेखांकनाच्या संकल्पना व संकेताबाबत स्पष्टता नाही. लेखांकनाची भारतीय पद्धत ही परंपरागत पद्धतीचे उदाहरण आहे. या पद्धतीमध्ये द्विनोंद पद्धतीच्या नियमांचे पालन केले जात नाही. लेखांकनाची ही पद्धत अपूर्ण म्हणून ओळखली जाते.

## २.४ लेखांचे / खात्यांचे वर्गीकरण (Classification of Accounts) :

**लेख्यांचा/ खात्याचा अर्थ (Meaning of Account) :**

लेख्यांच्या / खात्याचा अर्थ विशिष्ट व्यक्तींच्या संदर्भात विशिष्ट संपत्ती, देयता, विशिष्ट उत्पन्न व खर्चावरील पदे तसेच विशिष्ट ठिकाणी नोंदविलेला खर्च ज्या खात्यात लिहिला जातो त्याला खाते/ लेखा म्हणतात. दिवसें दिवस व्यापारात होणाऱ्या व्यवहारांची संख्या वाढत असून ही संख्या अनेक लेख्यांना प्रभावीत करते. काही विशिष्ट कालावधीत तर व्यवसायिकाला खालील माहिती शोधण्यासाठी खात्यांचे / लेख्यांचे संतुलन करणे अनिवार्य असते. जसे एकूण भांडवल, एकूण देयता आणि एकूण संपत्ती, एकूण उत्पन्न आणि खर्च इत्यादी.


**लेख्यांची / खात्याची व्याख्या (Definition of Account) :**

‘‘खाते म्हणजे एका व्यक्तीवर, एका प्रकारच्या संपत्तीवर किंवा एका प्रकारचा लाभ किंवा हानीवर प्रभाव करण्याचा व्यवहारांच्या सारांश रूपाने केलेली नोंद होय.

**(जी आर बॉटलीबाय)**

‘‘खाते म्हणजे विशिष्ट वस्तू किंवा व्यक्तींच्या संदर्भात घडलेल्या सर्व व्यवहारांची सारांश रुपाने लेखापुस्तकांत केलेली नोंद होय.’’

**(आर. एन. कार्टर)**



**लेख्यांचे उदाहरणासह विवेचन खालीलप्रमाणे करता येईल. –**

१) **वैयक्तीक / व्यक्तीगत लेखे** (Personal Accounts) :

व्यक्ती किंवा व्यक्ती समुहासोबत घडणाऱ्या व्यवसायिक व्यवहाराच्या लेख्यांचा वैयक्तीक लेख्यात समावेश होतो असे लेखे तीन भागात विभागले जातात. :-

अ) **नैसर्गिक वैयक्तीक लेखे** (Natural Person's Account) :

नैसर्गिक वैयक्तीक लेखे हे व्यक्तीगत व्यवहारांशी संबंधीत असतात. उदा. राजेशचा लेखा, सुमितचा लेखा, सुदामाचा लेखा, वैभवचा लेखा इत्यादी.

ब) **कृत्रिम वैयक्तीक लेखे** (Artificial Person's Account) :

कृत्रिम व्यक्ती म्हणजे कायद्याने कृत्रिम व्यक्ती म्हणून मान्यता पावलेल्या संघटना/ संस्था / क्लब इ. यांची व्यवसायिक दृष्टिकोनातून झालेल्या लेख्यांचा अंतर्भाव अशा लेख्यांमध्ये होतो.

उदा. बँक ऑफ महाराष्ट्र, अबक आणि कंपनी लेखा, मनोरंजन / करमणूक मंडळ लेखा.

क) **प्रतिनिधीक वैयक्तीक लेखे** (Representative Personal Account) :

हे लेखे विशिष्ट व्यक्ती किंवा व्यक्ती समूहाच्या घडामोडीचे प्रतिनिधीत्व कतात. अदत्त व पूर्वदत्त स्वरुपाचे व्यवहार वरील लेखेत समाविष्ट असतात.

उदा. अदत्त भाडे खाते, आगाऊ मिळालेले उत्पन्न, अदत्त मजूरी इ.

२) **अवैयक्तीक खाते** (Impersonal Account) :

अवैयक्तीक खात्याचे दोन भागात विभाजन करता येईल:-

१. **वास्तविक खाते** (Real Accounts) :

मालमत्ता आणि संपत्तीचे व्यवहार नोंदविण्यासाठी जे खाते उघडले जातात त्यांना वास्तविक खाते असे म्हणतात. वास्तविक खात्याचे खालील प्रमाणे उप प्रकार पडतात.

अ) **मूर्त वास्तविक खाते** (Tangible Real Account) :

अशी मालमत्ता व संपत्ती जी डोळ्यांनी दिसते. ज्या संपत्तीला स्पर्श करता येतो आणि ज्या संपत्तीचे मोजमाप करता येते अशा प्रकारच्या संपत्तीच्या लेख्यांचा अंतर्भाव ज्या लेख्यात होतो. त्या लेख्याला मूर्त वास्तविक लेखे असे म्हणतात.

उदा. यंत्र खाते, मोटारवाहन खाते, मालसाठा खाते इ.

ब) **अमूर्त वास्तविक खाते** (Intangible Real Account) :

अशी संपत्ती जी डोळ्यांना दिसत नाही त्याला स्पर्श सुद्धा करता येत नाही. परंतु त्याचे पैशाच्या स्वरुपात मोजमाप करता येते. अशा संपत्तीच्या लेख्यांना अमूर्त वास्तविक लेखे असे म्हणतात.

उदा. ख्याती / लौकिकमूल्य, एकस्वाधीकार खाते, बोधचिन्ह खाते, ग्रंथ हक्क लेखा इत्यादी.

२. **नामधारी खाते** (Nominal Accounts) :

खर्च आणि नुकसान, उत्पन्न आणि प्राप्ती या संदर्भातील लेख्यांना नामधारी लेखे असे म्हणतात.

उदा. मजुरी खाते, लेखनसामुग्री खाते, वेतन खाते, घसारा खाते, प्राप्त वर्तन, प्राप्त कसर इ.

**नावे आणि जमा** (Debit and Credit)

१) **विकलन (नावे)** Debit :

लेख्यांच्या डाव्या बाजूला नावे बाजू म्हणतात.

२) **समाकलन (जमा)** Credit) :

लेख्यांच्या उजव्या बाजूला जमा बाजू म्हणतात.

## २.५ नावे आणि जमा करण्याचे सोनेरी नियम : (परंपरागत पद्धत) :

**वैयक्तीक लेखा**
- लाभ घेणाऱ्याचे खाते नावे
- लाभ देणाऱ्याचे खाते जमा

**वास्तविक खाते**
- येणारी संपत्तीचे खाते नावे
- जाणारी संपत्तीचे खाते नावे

**नामधारी लेखा**
- खर्च आणि नुकसान खाते नावे
- उत्पन्न आणि प्राप्ती खाते जमा

**I) खालील व्यवहारावरून शोधा –**

१) दोन पैलू  २) दोन लेखे  ३) लेख्यांचे वर्गीकरण

१) ₹ २०,०००/– गुंतवून व्यवसाय सुरू केला.
२) श्री अजयकडून ₹ १०,०००/– ची उधार मालाची खरेदी केली.
३) रोख विक्री ₹ ७,०००/–
४) वर्तन मिळाले ₹ ५००/–
५) भाडे दिले ₹ ८००/–

**१) दोन पैलू**

| अ.क्र. | पैलू एक | पैलू दोन |
|---|---|---|
| १) | व्यवसायात रोख आली. | मालक हा भांडवल देणारा आहे. |
| २) | खरेदी हा खर्च आहे. | अजय हा फायदा देणारा आहे. |
| ३) | रोख व्यवसायात आली. | विक्री हे उत्पन्न आहे. |
| ४) | रोख व्यवसायात आली. | प्राप्त वर्तन हे उत्पन्न आहे. |
| ५) | भाडे देणे हा खर्च आहे. | व्यवसायातून रोख गेली . |

**२) दोन पैलू आणि दोन लेखे :**

| अ.क्र | दोन पैलू | दोन लेखे | |
|---|---|---|---|
| १ | व्यवसायात रोख आली<br>मालक हा भांडवल देणारा आहे. | रोख खाते<br>------------- | -------------<br>भांडवल खाते |
| २ | खरेदी हा खर्च आहे<br>अजय हा फायदा देणारा आहे. | खरेदी खाते<br>------------- | -----------<br>अजयचे खाते |
| ३ | रोख व्यवसायात आली<br>विक्री हे उत्पन्न आहे. | रोख खाते<br>------------- | -----------<br>विक्री खाते |
| ४ | व्यवसायात रोख आली.<br>प्राप्त वर्तन हे उत्पन्न आहे. | रोख खाते<br>------------- | ---------------<br>प्राप्त वर्तन खाते |
| ५ | भाडे देणे हा खर्च आहे.<br>व्यवसायातून रोख गेली | भाडे खाते<br>------------- | ---------<br>रोख खाते. |

**३) दोन पैलू, दोन लेखे आणि लेख्यांचे वर्गीकरण :**

| अ.क्र | दोन पैलू | दोन लेखे | लेख्यांचे वर्गीकरण |
|---|---|---|---|
| १. | व्यवसायात रोख आली.<br>मालक हा भांडवल देणारा आहे. | रोख खाते<br>भांडवल खाते | वास्तविक खाते<br>वैयक्तीक खाते |
| २. | खरेदी हा खर्च आहे.<br>अजय हा लाभ देणारा आहे | खरेदी खाते<br>अजयचे खाते | नामधारी खाते<br>वैयक्तीक खाते |
| ३. | व्यवसायात रोख आली<br>विक्री हे उत्पन्न आहे. | रोख खाते<br>विक्री खाते | वास्तविक खाते<br>नामधारी खाते |
| ४ | व्यवसायात रोख आली<br>प्राप्त वर्तन हे उत्पन्न आहे | रोख खाते<br>वर्तन खाते | वास्तविक खाते<br>नामधारी खाते |
| ५ | दिलेले भाडे हा खर्च आहे.<br>व्यवसायातून रोख गेली. | भाडे खाते<br>रोख खाते | नामधारी खाते<br>वास्तविक खाते. |

**कार्य / कृती करा – १**

खाली दिलेल्या व्यवहारांचे

१) दोन पैलू  २) दोन लेखे

३) लेख्यांचे वर्गीकरण करून खालील तक्ते पूर्ण करा.

१) रोख ₹ ५०,०००/– गुंतवून व्यापार सुरु केला.

२) श्री अविनाशकडून ₹ २०,०००/– चे सयंत्र उधारीने खरेदी केले.

३) श्री राहूल कडून ₹ ५,००० /– च्या वस्तू रोखीने खरेदी केल्या.

४) श्री अनिकेत यांना ₹ ६,००० /– चा माल उधारीवर विकला.

५) वेतन दिले ₹ १,०००/–

६) जुने उपस्कर विकले ₹ ३,०००/–

**उत्तर :**

**१) दोन पैलू**

| अ.क्र. | पैलू एक | लेखे दोन |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |
| ६ | | |

२) दोन पैलू आणि दोन लेखे

| अ.क्र. | दोन पैलू | दोन लेखे | |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |
| ६ | | | |

क) दोन पैलू, दोन लेखे आणि लेख्यांचे वर्गीकरण

| अ. क्र. | दोन पैलू | दोन लेखे | लेखांचे वर्गीकरण |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |
| ६ | | | |

**नावे व जमा करण्याच्या नियमानुसार व्यवहारांचे वर्गीकरण**
**(परंपरागत संकल्पनेनुसार)**

| अ. क्र. | व्यवहार | दोन प्रकार | अंतभूर्त लेखे | लेख्यांचे वर्गीकरण | अवलंबिलेले नियम | नावे होणारे खाते | जमा होणारे खाते |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ₹ ५०,००० रोख गुंतवणूक व्यवसाय सुरू केला | १. रोख व्यवसायात आली<br>२. मालक हा भांडवल देणारा | १. रोख लेखा<br>२. भांडवल लेखा | १. वास्तविक खाते<br>२. वैयक्तीक खाते | १. येणाऱ्या संपत्तीचे खाते<br>२. लाभ देणारा लेखा | रोख खाते<br>------ | ---<br>भांडवल खाते |
| २ | जाहिरातीसाठी ₹ ५,००० इम्रानला दिले | १. जाहिरात हा खर्च आहे.<br>२. रोख व्यापारातून गेली | १. जाहिरात लेखा<br>२. रोख लेखा | १. नामधारी खाते<br>२. वास्तविक खाते | १. खर्च/ नुकसान नावे<br>२. जाणाऱ्या संपत्तीला जमा | जाहिरात लेखा<br>--- | ---<br>रोख लेखा |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | बँक ऑफ इंडिया मध्ये ₹ १०,००० रोख जमा केले | १. बँक ऑफ इंडिया लाभ घेणारा<br>२. व्यवसायातून रोख गेली | १. बँक ऑफ इंडिया लेखा<br>२. रोख लेखा | १. वैयक्तीक लेखा<br>२. वास्तविक लेखा | १. लाभ घेणाऱ्याचे लेखा नावे<br>२. जाणाऱ्या संपत्तीचे खाते जमा | बँक ऑफ इंडिया लेखा<br>------ | ---<br>रोख लेखा |
| ४ | सुनिलकडून ₹ १३,००० चा माल खरेदी केला | १. खरेदी हा खर्च आहे.<br>२. लाभ देणारा सुनिल आहे. | १. खरेदी लेखा<br>२. सुनिल लेखा | १. नामधारी लेखा<br>२. वैयक्तीक लेखा | १. खर्च नुकसान नावे<br>२. लाभ देणाऱ्याचे खाते जमा | खरेदी लेखा<br>--- | ---<br>सुनिल लेखा |
| ५ | ₹ १२,००० माल रोखीने विकला. | १. व्यवसायात रोख आली.<br>२. मालाची विक्री हे उत्पन्न आहे. | १. रोख लेखा<br>२. विक्री लेखा | १. वास्तविक लेखा<br>२. नामधारी लेखा | १. येणाऱ्या संपत्तीचे खाते नावे<br>२. उत्पन्न / प्राप्ती जमा | रोख लेखा<br>--- | ---<br>विक्री लेखा |
| ६ | वर्तन मिळाले ₹ ४,५०० | १. व्यवसायात रोख आली.<br>२. प्राप्त वर्तन हे उत्पन्न आहे. | १. रोख लेखा<br>२. वर्तन लेखा | १. वास्तविक लेखा<br>२. नामधारी लेखा | १. येणाऱ्या संपत्तीचे खाते नावे<br>२. उत्पन्न/ प्राप्ती जमा | रोख लेखा<br>--- | ---<br>वर्तन लेखा |

**टिप : १)** **व्यवहार क्र. २ :** जाहिरात खर्च इम्रानला दिला. या ठिकाणी इम्रानच्या खात्यावर कोणताही परिणाम होत नाही. फक्त जाहिरात हा खर्च असल्यामुळे तोच विचारात घेतला जाईल.

**२)** **व्यवहार क्र. ४ :** हा व्यवहार उधारीचा आहे असे गृहीत धरण्यात आले कारण व्यवहारात विक्रेत्याचे नाव दिलेले आहे. परंतु रोखीने खरेदी केले असे दर्शविण्यात आलेले नाही.

**कार्य / कृती २. खाली दिलेला तक्ता पूर्ण करा.**

**नावे व जमाच्या नियमानुसार लेख्यांचे वर्गीकरण करा.**
**(परंपरागत संकल्पनेनुसार)**

| अ. क्र | व्यवहार | दोन प्रभाव | अंतर्भूत लेखे | लेख्यांचे वर्गीकरण | अवलंबिलेले नियम | नावे होणारे खाते | जमा होणारे खाते |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ₹ ९०,००० रोख गुंतवून व्यवसाय सुरु केला. | | | | | | |
| २. | देना बँकेत ₹ ९,००० जमा केले. | | | | | | |
| ३ | खाजगी वापरासाठी ₹ १,५०० ची रोख काढली. | | | | | | |
| ४ | श्री. मंदार कडून ₹ १२,००० ला माल खरेदी केला. | | | | | | |
| ५ | वेतन दिले ₹ २,९०० | | | | | | |
| ६. | व्याज मिळाले ₹ ४,००० | | | | | | |

## २.६ खात्याचे वर्गीकरण (आधुनिक संकल्पनेनुसार)

**खात्याचे वर्गीकरण**

**संपत्ती लेखा**
१. यंत्र लेखा
२. इमारत लेखा
३. ख्याती लेखा
४. उपस्कर लेखा

**देयतेचा लेखा**
१. धनकोचा लेखा
२. अधिकोष अधिविकर्ष लेखा
३. अधिकोष कर्ज लेखा
४. अदत्त खर्च लेखा

**भांडवल लेखा**
१. आदित्य भांडवल लेखा
२. गिरीश भांडवल लेखा
३. मे. हरिलाल ट्रेडर्स लेखा
४. मे. शर्मा ट्रेडर्स लेखा

**उत्पन्न व लाभ लेखा**
१. प्राप्त वर्तन लेखा
२. प्राप्त लाभांश लेखा
३. प्राप्त भाडे लेखा
४. प्राप्त व्याज लेखा

**खर्चानुसार लेखा**
१. मजूरी लेखा
२. अंकेक्षण शुल्क लेखा
३. आगीमुळे नुकसान लेखा
४. छपाई व लेखन सामुग्री लेखा

वर दिलेल्या तक्तामध्ये वेगवेगळ्या खात्याचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. व्यापारात घडलेले व्यवहार नोंदविण्यासाठी संबंधीत सर्व लेखे पाच गटात विभागलेले आहेत.

म्हणजेच जसे – १) संपत्ती २) देयता ३) भांडवल
४) खर्च नुकसान ५) उत्पन्न व लाभ

**खालील खात्यात नोंदीमध्ये बदल करण्यासाठी दोन मूलभूत नियम दिलेले आहेत. :**

१) संपत्ती आणि खर्च (नुकसान) या नोंदीत बदल करणे.

अ) संपत्तीत झालेली वाढ नावे करा आणि संपत्तीत झालेली घट जमा करा.

ब) खर्च / नुकसानीत झालेली वाढ नावे करा आणि खर्च / नुकसानीत झालेली घट जमा करा.

२. भांडवल, देयता, उत्पन्न / लाभ नोंदीत बदल करणे.

१) देयतेत झालेली वाढ जमा करावी आणि देयतेत आलेली घट नावे करावी.

२) भांडवलात झालेली वाढ जमा करावी आणि भांडवलात झालेली घट नावे करावी.

३) महसूली उत्पन्नात / लाभात वाढ झाल्यास जमा करावी आणि महसूली उत्पन्नात / लाभात झालेली घट नावे करावी.

**व्यवहाराचे वर्गीकरण नावे जमाच्या नियमानुसार (आधुनिक संकल्पना)**

| अ. क्र. | व्यवहार | दोन पैलू / प्रभाव | अंतर्भूत लेखे | गट/ विभाग | अवलंबिलेले नियम | नावे लेखा | जमा लेखा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.. | संजयने ₹ ७०,००० गुंतवून व्यापार सुरू केला | १. रोख व्यापारात आली.<br>२. मालक हा भांडवल देणारा | १. रोख लेखा<br>२. भांडवल लेखा | १. संपत्ती लेखा<br>२. भांडवल लेखा | १. संपत्ती वाढ<br>२. भांडवलात वाढ | रोख लेखा<br>--- | ---<br>भांडवल लेखा |
| २.. | श्री. अमोल ला भाडे बद्दल दिलेले ₹ ५,००० | १. भाडे देणे हा खर्च<br>२. रोख व्यापारातून गेली. | १. भाडे लेखा<br>२. रोख लेखा | १. खर्च लेखा<br>२. संपत्ती लेखा | १. खर्च वाढ<br>२. संपत्तीत घट | भाडे लेखा | ---<br>रोख लेखा |
| ३. | कार्यालयीन कामासाठी बँकेतून ₹ १०,००० काढले | १. रोख व्यापारात आली<br>२. बँक ही लाभ देणारी आहे. | १. रोख लेखा<br>२. बँक लेखा | १. संपत्ती लेखा<br>२. संपत्ती लेखा | १. संपत्तीत वाढ<br>२. संपत्तीत घट | रोख लेखा<br>-- | ---<br>बँक लेखा |
| ४. | पत्नीच्या मोबाईलचे बिलासाठी ₹ ४२०० दिले. | १. उचलीमुळे मालकाचा लाभ होतो.<br>२. रोख व्यापारातून बाहेर गेली. | १. उचल लेखा<br>२. रोख लेखा | १. भांडवल लेखा<br>२. संपत्ती लेखा | १. भांडवलात घट<br>२. संपत्तीत घट | उचल लेखा<br>----- | ---<br>रोख लेखा |
| ५. | श्री. सुनिल कडून ₹१३,००० चा माल खरेदी केला | १. खरेदी हा खर्च आहे.<br>२. लाभ देणारा सुनिल आहे | १. खरेदी लेखा<br>२. सुनिलचा लेखा | १. खर्च लेखा<br>२. देयता लेखा | १. खर्चात वाढ<br>२. देयतेत वाढ | खरेदी लेखा<br>--- | ---<br>सुनिल लेखा |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | वर्तन मिळाले ₹ ४,५०० | १. रोख व्यापारात आली.<br>२. वर्तन हे उत्पन्न आहे. | १. रोख लेखा<br>२. वर्तन लेखा | १. संपत्ती लेखा<br>२. उत्पन्न लेखा | १. संपत्तीत वाढ<br>२. उत्पन्न वाढ | रोख लेखा<br>--- | ---<br>वर्तन लेखा |

**कार्य/कृती : ३**

**नावे आणि जमाच्या नियमानुसार खालील व्यवहाराचे वर्गीकरण करा.**
**(आधुनिक संकल्पना )**

| अ. क्र. | व्यवहार | दोन पैलू / प्रभाव | अंतर्भूत लेखे | गट / विभाग | अवलंबिलेले नियम | नावे लेखा | जमा लेखा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रोख ₹ ८०,००० आणून राजेशने व्यापार सुरु केला. | | | | | | |
| २. | दूरध्वनी (टेलिफोन) बिल (कार्यालय) ₹ ५,००० | | | | | | |
| ३. | रोखीने मालाची खरेदी केली ₹ ८,०००. | | | | | | |
| ४. | श्री. मनोजला ₹ ६,००० चा माल विकला | | | | | | |
| ५. | श्री. सुरेश कडून ₹ १५,००० चे सयंत्र उधारीवर खरेदी केले. | | | | | | |
| ६. | भाडे मिळाले. ₹ २,५०० | | | | | | |

## २.७ निदर्शने : १

**खालील व्यवहारात सामविष्ट होणारे दोन खाते स्पष्ट करा.**

१) रोख ₹ ७०,००० आणून व्यवसाय प्रारंभ केला.
   १) रोख खाते
   २) भांडवल खाते

२) बँक ऑफ इंडिया मध्ये ₹ १०,००० जमा केले.
   १) बँक ऑफ इंडिया खाते
   २) रोख खाते

३) कार्यालयीन कामासाठी बँक ऑफ इंडियामधून काढले ₹ ५,५००.
   १) रोख खाते
   २) बँक ऑफ इंडिया खाते

४) रोखीने ₹ ५,००० /- च्या मालाची खरेदी केली.
   १) खरेदी खाते
   २) रोख खाते

५) किरण स्टोअर्स कडून ₹ ६,०००/- चा माल उधारीवर खरेदी केला.
   १) खरेदी खाते
   २) किरण स्टोअर्स खाते

६) रोखीने मालाची विक्री
   १) रोख खाते
   २) विक्री खाते

७) रोहीणीला ₹ ९,०००/- चा माल विक्री केला.
   १) रोहिणी खाते
   २) विक्री खाते

८) लाभांश मिळाले ₹ ४,५००.
   १) रोख खाते
   २) लाभांश खाते

९) अंकेक्षण शुल्क दिले ₹ १,०००/-
   १) अंकेक्षण खाते
   २) रोख खाते

### निदर्शने – २

**खालील लेख्यांचे वैयक्तीक लेखे, वास्तविक लेखे आणि नामधारी लेख्यामध्ये वर्गीकरण करा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | लेखन सामुग्री लेखा | २) | महेशचा लेखा |
| ३) | यंत्र लेखा | ४) | भांडवल लेखा |
| ५) | आगीमुळे नुकसान लेखा | ६) | पुणे महानगरपालिका लेखा |
| ७) | इमारत लेखा | ८) | बँक ऑफ महाराष्ट्र लेखा |
| ९) | ग्रंथ हक्क लेखा | १०) | दुरुस्ती लेखा |
| ११) | संगणक लेखा | १२) | मजूरी लेखा |

**उत्तर :**

| वैयक्तीक लेखा | वास्तविक लेखा | नामधारी लेखा |
|---|---|---|
| महेशचा लेखा | यंत्र लेखा | लेखन सामुग्री लेखा |
| भांडवल लेखा | इमारत लेखा | आगीमुळे नुकसान लेखा |
| पुणे महानगरपालिका लेखा | ग्रंथ हक्क लेखा | दुरुस्ती लेखा |
| बँक ऑफ महाराष्ट्र लेखा | संगणक लेखा | मजुरी लेखा |

### निर्दशने : ३

**खालील लेख्यांचे वैयक्तीक लेखे, वास्तविक लेखे आणि नामधारी लेख्यामध्ये वर्गीकरण करा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | रोख लेखा | २) | अदत्त वेतन लेखा | ३) | रोहीतचा लेखा |
| ४) | उपस्कर लेखा | ५) | जीवन विमा महामंडळ लेखा | ६) | ख्याती लेखा |
| ७) | पूर्वदत्त विमा खर्च लेखा | ८) | बोधचिन्ह लेखा | ९) | वर्तन लेखा |
| १०) | कर्ज लेखा | ११) | उचल / आहरण लेखा | १२) | व्याज लेखा |

**उत्तर :**

| वैयक्तीक लेखा | वास्तविक लेखा | नामधारी लेखा |
|---|---|---|
| अदत्त वेतन खाते | रोख खाते | वर्तन खाते |
| रोहीतचे खाते | उपस्कर खाते | व्याज खाते |
| जीवन विमा महामंडळ खाते | ख्याती खाते | |
| पूर्वदत्त विमा खर्च खाते | | |
| कर्ज खाते | बोधचिन्ह खाते | |
| उचल / आहरण खाते | | |

### निदर्शन –४

**खालील लेख्यांचे संपत्ती, देयता, उत्पन्न आणि खर्च यामध्ये वर्गीकरण करा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | पूर्वदत्त भाडे लेखा | २) | वेतन लेखा | ३) | बँक कर्ज लेखा |
| ४) | मोटार कार लेखा | ५) | देय भाडे लेखा | ६) | बुडीत कर्ज लेखा |
| ७) | ग्रंथ हक्क लेखा | ८) | प्राप्त व्याज लेखा | ९) | प्राप्त लाभांश लेखा |
| १०) | परिसर लेखा | ११) | विमा प्रव्याजी लेखा | १२) | अंकेक्षण शुल्क लेखा |

**उत्तर :**

| संपत्ती | देयता | उत्पन्न | खर्च |
|---|---|---|---|
| पूर्व दत्त भाडे लेखा | बँक कर्ज लेखा | प्राप्त व्याज लेखा | वेतन लेखा |
| मोटार कार लेखा | देय भाडे लेखा | प्राप्त लाभांश लेखा | बुडीत कर्ज लेखा |
| ग्रंथ हक्क लेखा | | | विमा प्रव्याजी लेखा |
| परिसर लेखा | | | अंकेक्षण शुल्क लेखा |

### निदर्शन –५

**खालील लेख्यांचे संपत्ती, देयता, उत्पन्न आणि खर्च भागभांडवल यामध्ये वर्गीकरण करा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | भूमी व इमारत | २) | प्राप्त व्याज लेखा | ३) | संगणक लेखा |
| ४) | विविध धनको | ५) | प्राप्त विपत्र लेखा | ६) | दिलेली कसर |
| ७) | विविध ऋणको | ८) | ख्याती | ९) | वाहन व्यय |
| १०) | प्राप्त कसर | ११) | देय विपत्र | १२) | अमितचे भांडवल खाते |
| १३) | मुदत ठेवीवरील व्याज | १४) | अधिकोष अधिविकर्ष | १५) | जिवंत माल साठा |
| १६) | छपाई व लेखन | १७) | बँक शिल्लक | १८) | प्राप्त भाडे |

१९) दुरुस्तीचे व देखभाल खर्च
२०) वाहन खर्च
२१) अदत्त भाडे
२२) प्राप्त वर्तन
२३) बँक कर्ज
२४) विद्युत देयक
२५) ग्रंथ हक्क लेखा

**उत्तर :**

| संपत्ती | देयता | उत्पन्न / लाभ | खर्च / तोटा | भांडवल |
|---|---|---|---|---|
| भूमी व इमारत | विविध धनको | प्राप्त व्याज | दिलेली कसर | अमितचा भांडवल लेखा |
| संगणक लेखा | देय विपत्र | प्राप्त कसर | वाहतूक खर्च | |
| प्राप्त विपत्र | अधिकोष अधिविकर्ष | मुदत ठेवीवरील व्याज | दुरुस्ती व देख भाल खर्च | |
| विविध ऋणको | | प्राप्त भाडे | वाहन खर्च | |
| ख्याती लेखा | अदत्त भाडे | प्राप्त वर्तन | विद्युत देयक | |
| पशुधन | बँक कर्ज खाते | | छपाई व लेखन सामुग्री | |
| बँक शिल्लक | | | | |
| ग्रंथ हक्क लेखा | | | | |

## २.८ लेखांकिय सूत्र :

लेखाकिय सूत्र हे दर्शविते की, व्यापारातील संपत्ती नेहमी व्यापारातील भांडवल व देयतेच्या बेरजे एवढी असते.

हे सूत्र खालील प्रमाणे सांगता येईल. –

संपत्ती = देयता + भांडवल

मूलभूत सूत्रे पुस्तपालनाच्या द्विनोंद / दुहेरी नोंद पद्धतीचा पाया आहे.
सूत्रे खालील प्रमाणे आहेत. –

भांडवल = एकूण संपत्ती – बाह्य देयता

संपत्ती = भांडवल + बाह्य देयता

संपत्ती = देयता

**उदाहरणार्थ : –**

१. राहुलने रोख ₹ ५०,००० /– आणून व्यापार सुरू केला.
लेखांकिय सूत्र खालील प्रमाणे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **संपत्ती** | **=** | **भांडवल** | **+** | **देयता** |
| रोख | = | भांडवल | + | देयता |
| ₹ ५०,००० | = | ₹ ५०,००० | + | ० |
| ₹ ५०,००० | = | ₹ ५०,००० | | |

२. एच. पी. कंपनीकडून राहुलने ₹ १०,०००/– चे यंत्र उधारीवर खरेदी केले.
लेखांकिय सूत्र खालीलप्रमाणे –

| | | | |
|---|---|---|---|
| **संपत्ती** | **=** | **भांडवल** | **+ देयता** |
| रोख + यंत्र | = | भांडवल | + विविध धनको |
| ₹ ५०,००० + ₹ १०,००० | = | ₹ ५०,००० | + ₹१०,००० |
| ₹ ६०,००० | = | ₹ ६०,००० | |

३. राहुलने ₹ २०,०००/– चा माल खरेदी केला.
लेखांकिय सूत्र खालील प्रमाणे –

| | | | |
|---|---|---|---|
| | **संपत्ती** | **=** | **भांडवल + देयता** |
| | रोख + यंत्र + मालसाठा | = | भांडवल + विविध धनको |
| जुनी शिल्लक | ₹ ५०,००० + ₹ १०,००० + ० | = | ₹ ५०,००० + ₹ १०,००० |
| नवीन व्यवहार | ₹ ३०,००० + ₹ १०,००० + ₹ २०,००० | = | ₹ ५०,००० + ₹ १०,००० |
| नवीन शिल्लक | ₹३०,००० + ₹ १०,००० + ₹ २०,००० | = | ₹ ५०,००० + ₹ १०,००० |
| | ₹ ६०,००० | = | ₹ ६०,००० |

### निदर्शन क्र –१ :

**खालील व्यवहारांवरून लेखांकित सूत्र दर्शवा.**

१) रोहित शर्मा यांनी रोख ₹ ५०,००० /– गुंतवून व्यापार सुरु केला.
२) धोनीकडून ₹ १०,०००/– चा माल उधारीवर खरेदी केला.
३) विराटला उधारीवर मालाची विक्री केली ₹ २०,०००.
४) लाभांश मिळाला ₹ ५००/–
५) जाहिरातीसाठी दिले ₹ ५००/–

**उत्तर :**

| | व्यवहार | संपत्ती (₹) | = | देयता (₹) | + | भांडवल (₹) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | रोहित शर्माने ₹ ५०,००० गुंतवून व्यापार सुरु केला. | ५०,००० | = | ० | + | ५०,००० |
| | | ५०,००० | = | ० | + | ५०,००० |
| २. | धोनीकडून ₹ १०,००० चा माल उधारीवर खरेदी केला | (+) १०,००० | = | १०,००० | + | ० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ६०,००० | = | १०,००० | + | ५०,००० |
| ३ | विराटला उधारीवर मालाची विक्री केली ₹ २०,०००. | (–) २०,००० | | | | |
| | | (+) २०,००० | = | ० | + | ० |
| | | ६०,००० | = | १०,००० | + | ५०,००० |
| ४ | लाभांश मिळाला ₹ ५०० | (+) ५०० | = | ० | + | (+)५०० |
| | | ६०,५०० | = | १०,००० | + | ५०,५०० |
| ५ | जाहिराती बद्दल दिले ₹ ५०० | (–) ५०० | = | ० | + | (–) ५०० |
| | **एकूण** | **६०,०००** | **=** | **१०,०००** | **+** | **५०,०००** |

**निदर्शने क्र – २ :**

**खालील व्यवहारांवरून लेखांकिय सूत्र दर्शवा –**

१) रुपालीने ₹ २५,०००/– बँकेतील शिल्लकीच्या आधारे व्यापार सुरु केला.

२) यंत्राची रोखीने खरेदी केली ₹ ५,०००/–

३) स्वराकडून ₹ ३,०००/– माल उधारीने खरेदी केला.

४) वेतनाबद्दल दिले ₹ ३,०००/–

५) व्याज मिळाले ₹ २००/–

**उत्तरे :**

| | व्यवहार | संपत्ती (₹) | = | देयता (₹) | + | भांडवल (₹) |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | रुपालीने बँकेतील शिल्लकीच्या आधारे व्यापार सुरू केला | २५,००० | = | ० | + | २५,००० |
| | | २५,००० | = | ० | + | २५,००० |
| २) | यंत्राची रोखीने खरेदी केली ₹ ५,०००/– | (+) ५,००० | | | | |
| | | (–) ५,००० | = | ० | + | ० |
| | | २५,००० | = | ० | + | २५,००० |
| ३) | स्वराकडून ₹ ३,०००/– माल उधारीने खरेदी केला. | (+) ३,००० | | | | |
| | | | = | ३,००० | + | ० |
| | | २८,००० | = | ३,००० | + | २५,००० |
| ४) | वेतनाबद्दल दिले ₹ ३,०००/– | (–) ३,००० | = | ० | + | (–)३,००० |
| | | २५,००० | = | ३,००० | + | २२,००० |
| ५) | व्याज मिळाले ₹ २०० | (+) २०० | = | ० | + | (+) २०० |
| | एकूण | **२५,२००** | **=** | **३,०००** | **+** | **२२,२००** |

**निदर्शने – ३ :**

**लेखांकिय सूत्राच्या आधारे खालील व्यवहाराचे प्रभाव स्पष्ट करा. –**

१) अर्जुनने ₹ ९०,०००/– आणून व्यापार सुरु केला.

२) होंडा कंपनीकडून उधारीवर मोटार कार खरेदी केली ₹ ३०,०००/–

३) करन कडून ₹ १०,००० चा माल उधारीवर खरेदी कोला.

४) आगीमुळे माल नष्ट झाला ₹ १,०००/–

५) मोटारकार वर एक वर्षाचा घसारा आकारला ₹ १,०००/–

६) मालाची रोखीने विक्री केली ₹ ५,०००/–

| | व्यवहार | संपत्ती (₹) | = | देयता (₹) | + | भांडवल (₹) |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | अर्जुनने रोख ₹ ९०,००० आणून व्यापार सुरु केला | ९०,००० | = | ० | + | ९०,००० |
| | | ९०,००० | = | ० | + | ९०,००० |
| २) | होंडा कंपनीकडून उधारीवर मोटारकार खरेदी केली ₹ ३०,०००/– | (+) ३०,००० | = | ३०,००० | + | ० |
| | | १,२०,००० | = | ३०,००० | + | ९०,००० |
| ३) | करन कडून ₹ १०,०००/– चा माल उधारीवर खरेदी केला. | (+) १०,००० | = | १०,००० | + | ० |
| | | १,३०,००० | = | ४०,००० | + | ९०,००० |
| ४) | आगीमुळे माल नष्ट झाला ₹ १,०००/– | (–) १,००० | = | ० | + | (–)१,००० |
| | | १,२९,००० | = | ४०,००० | + | ८९,००० |
| ५) | मोटारकार वर एक वर्षाचा घसारा आकारला ₹ १,०००/– | (–) १,००० | = | ० | + | (–) १,००० |
| ६) | मालाची रोखीने विक्री केली ₹ ५,०००/– | १,२८,०००<br>(–)५,०००<br>(+)५,००० | = | ४०,०००<br>० | + | ८८,०००<br>० |
| | **एकूण** | १,२८,००० | = | ४०,००० | + | ८८,००० |

**निदर्शने – ४ :**

**खालील व्यवहारांवरून लेखांकिय सूत्र दर्शवा –**

१) निमाने रोख ₹ ६०,०००/– आणून व्यापार सुरु केला.

२) बँक ऑफ इंडिया मध्ये रोख ₹ २०००/– जमा केले.

३) निमाने जादा भांडवल म्हणून आणले ₹ ७,०००/–

४) वर्माकडून ₹ १०,०००/– किंमतीचा माल खरेदी केला.

५) वर्मा यांना ₹ ७,०००/– चा माल विकला.

६) वाहन खर्च दिला ₹ ५,०००/–

७) व्याज मिळाले ₹ २००/–

उत्तर :

| | व्यवहार | संपत्ती (₹) | = | देयता (₹) | + | भांडवल (₹) |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | निमाने रोख ₹ ६०,०००/– आणून व्यापार सुरु केला. | ६०,००० | = | ० | + | ६०,००० |
| | | ६०,००० | = | ० | + | ६०,००० |
| २) | बँक ऑफ इंडियामध्ये रोख ₹ २०००/– जमा केले. | (–) २,००० | = | ० | + | ० |
| | | (+)२,००० | | | | |
| | | ६०,००० | = | ० | + | ६०,००० |
| ३) | निमाने जादा भांडवल म्हणून आणले ₹ ७,०००/– | (+) ७,००० | = | ० | + | (+) ७,००० |
| | | ६७,००० | = | | + | ६७,००० |
| ४) | वर्माकडून ₹ १०,०००/– किंमतीचा माल खरेदी केला. | (+) १०,००० | = | (+) १०,००० | | |
| | | ७७,००० | = | १०,००० | + | ६७,००० |
| ५) | वर्मा यांना ₹ ७,०००/– चा माल विकला. | (–) ७,००० | | – | | – |
| | | (+)७,००० | | | | |
| | | ७७,००० | = | १०,००० | + | ६७,००० |
| ६) | वाहन खर्च दिला ₹ ५,०००/– | (–) ५,००० | = | ० | + | (–) ५,००० |
| | | ७२,००० | = | १०,००० | + | ६२,००० |
| ७) | व्याज मिळाले ₹ २००/– | (+) २०० | = | ० | + | (+) २०० |
| | **एकूण** | **७२,२००** | **=** | **१०,०००** | **+** | **६२,२००** |

**निदर्शन क्र – ५ :**

**खालील व्यवहारांवरून लेखांकिय सूत्र दर्शवा –**

१) श्री. मेहता यांनी ₹ ८०,०००/– आणून व्यापार केला.

२) आश्विन कडून ₹ १२,०००/– चा माल उधारीवर खरेदी केला.

३) एस.एम. फर्निचर मार्टकडून ₹ ६,०००/– चे उपस्कर (फर्निचर) उधारीवर खरेदी केले.

४) आनंद यांना ₹ १०,०००/– किंमतीचा माल विकला.

५) खाजगी वापरासाठी रोख ₹ २,५००/– ची उचल केली.

६) ₹ १२,०००/– किंमतीचा माल ₹ २,०००/ नफ्याने विकला.

**उत्तर :**

| | व्यवहार | संपत्ती(₹) | = | देयता (₹) | + | भांडवल (₹) |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | श्री. मेहता यांनी ₹ ८०,०००/- आणून व्यापार केला. | ८०,००० | = | ० | + | ८०,००० |
| | | ८०,००० | = | ० | + | ८०,००० |
| २) | आश्विन कडून ₹ १२,०००/- चा माल उधारीवर खरेदी केला. | (+) १२,००० | | (+) १२,००० | + | ० |
| | | ९२,००० | = | १२,००० | + | ८०,००० |
| ३) | एस. एम. फर्निचर मार्टकडून ₹ ६,०००/- चे उपस्कर (फर्निचर) उधारीवर खरेदी केले. | (+) ६,००० | = | (+) ६,००० | + | ० |
| | | ९८,००० | = | १८,००० | + | ८०,००० |
| ४) | आनंद यांना ₹ १०,०००/- किंमतीचा माल विकला. | (-) १०,००० | = | ० | + | ० |
| | | (+)१०,००० | | | | |
| | | ९८,००० | = | १८,००० | + | ८०,००० |
| ५) | खाजगी वापरासाठी रोख ₹ २,५००/- ची उचल केली. | (-) २,५०० | = | ० | + | (-) २,५०० |
| | | ९५.५०० | = | १८,००० | + | ७७,५०० |
| ६) | ₹ १२,०००/- किंमतीचा माल ₹ २,००० नफ्याने विकला. | (-) १२,००० | = | ० | + | (+) २,००० |
| | | (+)१४,००० | | | | |
| | **एकूण** | **९७,५००** | **=** | **१८,०००** | **+** | **७९,५००** |

## कार्य / कृती : ०४

**लेखांकिय सूत्राच्या आधारे खालील दिलेल्या व्यवहाराच्या नोंदी तक्त्यात नोंदवून तक्ता पूर्ण करा.**

१) श्री मनोहरने ₹ ७५,०००/- आणून व्यापार सुरू केला.

२) लेखन सामुग्री खरेदी केली ₹ १,०००

३) मोहनकडून ₹ ६,०००/- चा माल खरेदी केला.

४) राधाला माल विकला ₹ १०,०००/-

५) व्यवसायासाठी ₹ २,०००/- चा मोबाईल खरेदी केला.

६) ₹ २०,०००/- किंमतीचा माल ₹ ५,०००/- नफ्याने विकला.

७) वेतन दिले ₹ २,५००/-

उत्तर

| अ.क्र. | व्यवहार | संपत्ती | = | देयता | + | भांडवल |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | | | | | | |
| | | | | | | |
| २) | | | | | | |
| ३) | | | | | | |
| | | | | | | |
| ४) | | | | | | |
| ५) | | | | | | |
| ६) | एकूण | | | | | |



***कार्य / कृती : ५***

तुमच्या महाविद्यालयाचे काही नियम व तत्वे प्रत्येक विद्यार्थ्यांकरिता असतात. समजा विद्यार्थ्यांनी नियमांचे उल्लंघन केले? समजा विद्यार्थ्यांसाठी काही नियम व तत्वच नसतील तर काय होईल?

## स्वाध्याय

**प्र.१ एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) दुहेरी नोंद पद्धती म्हणजे काय?

२) खाते किंवा लेखा म्हणजे काय?

३) एक नोंद पद्धतीचा अर्थ स्पष्ट करा.

४) वैयक्तीक खाते म्हणजे काय?

५) नामधारी खात्याचा नियम स्पष्ट करा?

६) अमूर्त किंवा अदृश्य संपत्तीचे दोन उदाहरण द्या?

७) वास्तविक खात्याचा अर्थ स्पष्ट करा?

८) उत्पन्न व प्राप्तीची दोन उदाहरणे द्या?

९) वैयक्तीक खात्याच्या नियम स्पष्ट करा?

१०) लेखांकिय माहिती नोंदविण्याच्या किती पद्धती आहेत?

## प्र.२ पुढील विधानासाठी एक शब्द किंवा एक संज्ञा किंवा शब्दसमुह द्या.

१) लेखांकनाची अशी पद्धत ज्यात व्यवहाराचे प्रभाव दोन खात्यावर होतात.

२) लेख्याची / खात्याची उजवी बाजू

३) व्यवसायाच्या मालकाने व्यवसायाचा पैसा वैयक्तिक कारणासाठी वापरल्यामुळे नावे होणारे खाते

४) संपत्ती आणि मालमत्तेचे खाते

५) खर्च, नुकसान आणि उत्पन्न किंवा लाभाचे खाते.

६) लेख्याची / खात्याची डावी बाजू.

७) अशी संपत्ती जी डोळ्यांना दिसत नाही, स्पर्श करता येत नाही व अनुभवता येत नाही.

८) द्विनोंद / दुहेरी नोंद पद्धतीचा शोध लावणारी व्यक्ती

९) व्यवसायिक व्यवहार नोंदविण्याची अपूर्ण पद्धत

१०) व्यवसायिक व्यवहार नोंदविण्याची शास्त्रीय पद्धत.

## प्र.३ खालील दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१) आंतरराष्ट्रीय लेखांकन दिवस . . . . . . . . . . . . . . रोजी साजरा करण्यात येतो.

अ) १० नोव्हेंबर ब) १२ नोव्हेंबर

क) १० डिसेंबर ड) १५ डिसेंबर

२) लेखांकनाची परंपरागत पद्धती . . . . . . . . . . . . . .

अ) इंग्रजी नोंद पद्धती ब) दुहेरी नोंद पद्धती

क) भारतीय पद्धत ड) वरील प्रमाणे एकही नाही.

३) प्रत्येक नावे होणारे खाते . . . . . . . . . . . . .होते

अ) नावे ब) जमा

क) उजवी बाजू ड) वरीलपैकी एकही नाही.

४) राधाचे खाते हे . . . . . . . . . . . . . . प्रकारचे खाते होय.

अ) नामधारी ब) वैयक्तीक क) वास्तविक ड) खर्च

५) यंत्र खाते हे . . . . . . . . . . . . . . खाते होय.

अ) नामधारी ब) उत्पन्न क) वैयक्तिक ड) वास्तविक

६) ख्याती ही . . . . . . . . . . . . . . . संपत्ती आहे.

अ) मूर्त ब)चल / तरल क) अमूर्त ड) यापैकी कोणतीही नाही

७) पूर्वदत्त खर्च हे . . . . . . . . . . . . खाते होय.

अ) वास्तविक ब) वैयक्तीक क) नामधारी ड) उत्पन्न

८) लाभ घेणाऱ्याचे खाते नावे तर जमा होणारे खाते . . . . . . . . . . . . . . .

अ) बाहेर जाणे ब) लाभ देणाऱ्याचे क) उत्पन्न आणि प्राप्ती ड) येणाऱ्याचे खाते.

९) येणारी संपत्ती नावे होत असेल तर जमा होणारी . . . . . . . . . . . . . . .

अ) देणारा ब) खर्च आणि नुकसान

क) बाहेर जाणारी ड) वरील पैकी एकही नाही.

१०) सर्व नावे . . . . . . . . . . . . . . . आणि उत्पन्न आणि प्राप्ती जमा होतात.

अ) देणारा ब) खर्च आणि नुकसान

क) बाहेर जाणे ड) वरील पैकी एकही नाही.

## प्र.४ खालील विधाने चूक किंवा बरोबर ते सकारण लिहा.

१) अदत्त खर्च हे नामधारी खाते आहे.

२) भांडवल खाते वास्तविक खाते होय.

३) प्रत्येक नावे होणारी खाते जमा खात्याला समान असते.

४) प्राप्त कसर ही नामधारी खाते आहे.

५) उचल खाते ही नामधारी खाते होय.

६) अदत्त वेतन हे नामधारी खाते आहे.

७) कर्ज खाते हे वैयक्तीक खाते आहे.

८) ख्याती खाते हे वास्तविक खाते आहे.

९) व्यापारी कसर हे नामधारी खाते

१०) मालकाचे खाजगी स्वरुपाच्या व्यवहाराच्या नोंदी व्यवसायाच्या लेखापुस्तकात घेतल्या जात नाही.

११) मोटार गाडी हे एक वास्तविक खाते आहे.

१२) फायदा घेणाऱ्याचे खाते नावे आणि फायदा देणाऱ्याचे खाते जमा हा नामधारी खात्याचा नियम आहे.

१३) बँक कर्ज खाते हे नामधारी खाते आहे.

१४) संपत्ती = भांडवल + देयता

१५) व्यापारी चिन्ह लेखा हे वैयक्तिक खाते आहे.

## प्र.५ रिकाम्या जागा भरा.

१) संपत्तीच्या मूल्यात झालेली वाढ नावे होते, तर संपत्तीच्या मूल्यात झालेली घट . . . . . . . . . . . होते.

२) संपत्ती = देयता + . . . . . . . . . . .

३) भांडवलात झालेली वाढ जमा होते तर भांडवलातील घट . . . . . . . . . . . होते.

४) नोंद करण्याची शास्त्रोक्त आणि परिपूर्ण पद्धतीला . . . . . . . .

५) सर्व खर्च आणि नुकसान नावे होते तर . . . . . . . . . . . जमा होते.

६) भूमी इमारत खाते हे . . . . . . . . . . . खाते आहे.

७) केवळ रोकड पुस्तक आणि वैयक्तीक खाते उघडले जातात ती पद्धती म्हणजे . . . . . . .

८) येणारी संपत्ती नावे आणि जाणारी संपत्ती जमा होते, हा नियम . . . . . . . . . खात्याचा आहे.

९) प्रवास खर्च हा . . . . . . . . . . .या खात्याचा प्रकार आहे.

१०) प्रत्येक व्यवहाराला . . . . . . . . . . . प्रभाव / बाजू असतात.

११) . . . . . . . . . . . खाते म्हणजे मालमत्ता आणि संपत्तीचे खाते होय.

१२) संगणक खाते हे . . . . . . . . . . . खाते आहे.

**प्र.६ खालील लेख्यांचे / खात्यांचे वर्गीकरण वैयक्तीक खाते, वास्तविक खाते आणि नामधारी खात्यात करा.**

१) रोहितचे भांडवल खाते
२) सुटी अवजारे खाते
३) उचल खाते
४) हमाली खाते
५) पूर्वदत्त भाडे खाते
६) ग्रंथ हक्क लेखा
७) एकस्वाधीकार खाते
८) अप्राप्त उत्पन्न खाते
९) पूर्व दत्त खर्च खाते
१०) प्राप्त वर्तन खाते
११) वाहतुक खर्च खाते
१२) यंत्र व सयंत्र खाते
१३) विविध उत्पन्न खाते
१४) पशुधन खाते
१५) मोफत वाटलेल्या वस्तू
१६) राधिकाचे खाते
१७) अदत्त मजूरी खाते
१८) उपस्कर विक्रीवरील तोटा खाते
१९) बँक ऑफ महाराष्ट्र खाते
२०) कर्ज खाते
२१) संगणक खाते
२२) कायदेशीर खाते
२३) मुदत ठेव खाते
२४) अप्राप्त उत्पन्न खाते
२५) अंकेक्षण शुल्क
२६) बोधचिन्ह खाते
२७) आगीमुळे नुकसान खाते
२८) मोटारकार खाते
२९) आयकर खाते
३०) वस्तू व सेवाकर खाते (GST)
३१) सिद्धीविनायक ट्रस्ट खाते
३२) कार्यालयीन उपकरणे खाते
३३) लेखन सामग्रीचा स्कंध खाते
३४) भारतीय रेल्वे खाते
३५) पूर्वप्राप्त उत्पन्न खाते
३६) गुंतवणूकीवरील अग्रिम लाभांश खाते
३७) कसर खाते
३८) राज आणि कंपनी खाते
३९) दुरुस्त खाते
४०) अधिकार शुल्क खाते

## प्रात्यक्षिक उदाहरणे

**प्र.१ खालील दिलेल्या व्यवहाराचे लेखांकनाच्या परंपरागत पद्धतीने तक्त्यात विश्लेषण करा. :**

१. राजासाहेब यांनी रोख ₹ ८५,०००/- गुंतवणूक व्यापार सुरू केला.

२. रोखीने मालाची खरेदी केली ₹ ५,०००/-

३. उधारीने मालाची विक्री केली ₹ ६,००० /-

४. बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये ₹ १२,०००/- जमा केले.

५. राधिकाकडून व्याज मिळाले ₹ ७००/-

६. घरमालकाला ₹ २,०००/- भाडे दिले.

७. ब्रीजमोहन यांच्याकडून ₹ ७,०००/- माल उधारीने खरेदी केला.

८. कार्यालयीन कामासाठी बँकेतून रोख रक्कम काढली ₹ १,०००/-

९. ₹ ९,०००/- चा संगणक रोखीने खरेदी केला.

१०. भ्रमणध्वनीचे देयक (कार्यालयीन) दिले. ₹ ५००/-

११. जूना भ्रमणध्वनी विकला ₹ २,०००.

१२. भाडेकरूकडून ₹ १,०००/- भाडेबद्दल मिळाले.

**प्र.२ लेखांकनाच्या आधुनिक पद्धतीनुसार खालील दिलेल्या व्यवहारांचे विश्लेषण तक्त्यात करा.**

१. श्री. मेघराज यांनी रोख ₹ ३०,०००/- आणून व्यापार सुरू केला.

२. बँक ऑफ इंडिया मध्ये ₹ २,०००/- रोख जमा केले.

३. खाजगी उपयोगाकरिता ₹ १,०००/- रोख काढले.

४. निलेशकडून ₹ २,०००/- च्या मालाची उधारीवर खरेदी केली.

५. रोख खरेदी ₹ ३,०००/-

६. मजूरी दिली ₹ ४००/-

७. कार्यालयासाठी खुर्ची खरेदी केली ₹ ३,२००/-

८. मोहन यांना ₹ १,२००/- किंमतीचा माल विकला.

९. कार्यालयीन कामासाठी रोख ₹ ३,०००/- काढले.

१०. जुने उपस्कर (फर्निचर) विकले ₹ ९,०००/-

११. लाभांश मिळाला ₹ १,०००/-

१२. पावतीपुस्तक छपाईबद्दल दिले ₹ २००/-

**प्र.३ खाली दिलेल्या व्यवहाराचे लेखांकिय सूत्रे तयार करा :**

१. श्री. वैभव यांनी रोख ₹ १,००,०००/- आणून व्यापार सुरू केला.

२. रिता स्टोअर्स कडून ₹ ९,०००/- चा माल उधारीवर खरेदी केला.

३. कार्यालयीन उपयोगासाठी लॅपटॉप खरेदी केला ₹ १०,०००/-

४. रिनाला उधारीवर माल विकला ₹ १२,०००/-.

५. व्याज मिळाले ₹ २,५००/-

६. दूरध्वनी देयक दिले ₹ १,३००/-

**प्र.४. खाली दिलेल्या व्यवहाराचे लेखांकिय सूत्रे तयार करा :**

१. श्री. स्वराज्य यांनी बँकेत ₹ १,१०,०००/- जमा करून व्यापार सुरु केला.

२. एस. एम. फर्निचर मार्ट यांचेकडून ₹ २५,०००/- चे उपस्कर (फर्निचर) उधारीवर खरेदी केले.

३. युवराजकडून ₹ १५,०००/- माल उधारीने खरेदी केला.

४. सयंत्र खरेदी केले ₹ १०,०००/-

५. विद्युत देयकाबद्दल दिले ₹ ३,५००/-

६. आगीमुळे माल नष्ट झाला ₹ १,५००/-.

**प्र.५ खाली दिलेल्या व्यवहाराचे लेखांकिय सूत्रे दर्शवा :**

१. रोहितने रोख ₹ ५०,०००/- आणून व्यापार सुरु केला.

२. मनोज यांचे कडून ₹ ६,०००/-चा माल उधारीने खरेदी केला.

३. रोख खरेदी ₹ ५,०००/-

४. हंगामी कामगारांना मजूरी दिली ₹ ३,०००.

५. संतोषला ₹ ७,०००/-चा माल उधारीवर विकला.

६. वैशालीकडून ₹ १,०००/- वर्तन मिळाले.

**प्र.६ खाली दिलेल्या लेखांकिय सूत्राचे कोष्टक / तक्ता पूर्ण करा :**

| अ.क्र. | व्यवहार | संपत्ती(₹) | = | देयता(₹) | + | भांडवल(₹) |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | ₹ ५०,०००/- आणून व्यवसाय सुरू केला. | ? | = | ? | + | |
| २) | ₹ १०,०००/- चा माल खरेदी केला. | ? | = | ? | + | |
| ३) | ₹ १,०००/- चा माल चोरीला गेला. | ? | = | ? | + | |
| ४) | रोखीने मालाची विक्री केली ₹ ५,०००/- | ? | = | ? | + | |
| ५) | बँकेकडून ₹ ७,०००/- कर्ज घेतले. | ? | = | ? | + | |

**प्र.७ संपत्ती, भांडवल आणि देयता यामधील वाढ व घटीचा परिणाम दर्शविणारे व्यवहार लिहा :**

१. [ ] संपत्तीत झालेली वाढ
संपत्तीत झालेली घट

२. [ ] भांडवलात झालेली वाढ
संपत्तीत झालेली घट

३. [ ] देयतेत होणारी घट
संपत्तीत होणारी घट

४. [ ] संपत्तीत होणारी घट
भांडवलात होणारी घट

# 3 रोजकिर्द / पंजी (Journal)

**अभ्यास घटक**

*३.१ लेखांकिय दस्तऐवजाचा अर्थ, महत्व, आणि उपयोगिता*

*३.२ रोजकिर्दीचा अर्थ, महत्व, आणि उपयोगिता*

*३.३ रोजकिर्दीचा नमुना*

*३.४ जीएसटी (GST) वस्तू व सेवाकरासह रोजकिर्दीत नोंदी करणे.*

**क्षमता विधाने**

- *विद्यार्थी लेखांकनाची कागदपत्रे/दस्तएवजे तयार करतो.*
- *आर्थिक व्यवहाराच्या परिणामांचे (नावे-जमा) आकलन विद्यार्थ्यांस होते.*
- *विद्यार्थी रोजकिर्दीच्या प्रमाणित रचना करतो.*
- *विद्यार्थी वस्तू खरेदीवरील वस्तू व सेवाकराची (GST) गणना करू शकतो.*
- *विद्यार्थी वस्तू विक्रीवरील वस्तू व सेवाकराची (GST) गणना करू शकतो.*
- *विद्यार्थी रोजकिर्दीतील नोंदी अचूकपणे करु शकतो.*

## ३.१ प्रस्तावना :

स्त्रोत दस्तऐवजांच्या साह्याने रोजच्या व्यवसायातील व्यवहाराच्या नोंदी लेखापुस्तकात नोंदविण्यात येतात. स्त्रोत दस्तऐवज म्हणजे कायदेशीर व्यवहार झाल्याची माहिती पुरविणारा कागद होय. जेव्हा आपण रोखीने ₹ ३०,००० चे संगणक खरेदी करतो, तेव्हा त्याच्याकडून रोख बीजक घेतो. हे रोख बीजक म्हणजे स्त्रोत (मुल) दस्तऐवज होय. मालक किंवा लेखापाल या दस्तऐवजाच्या आधारे व्यवहाराची वास्तविकता आणि खात्री करुन घेतो. त्यानंतर लेखापुस्तकात नोंद करतो. लेखापुस्तकातील प्रत्येक नोंद ही संबंधित स्त्रोत दस्तऐवजाच्या आधारेच पुराव्यानिशी करण्यात येते. याच कागदपत्रांना स्त्रोत दस्तऐवज असे म्हणतात. जमाखर्चाच्या पुस्तकात आर्थिक व्यवहार नोंदविण्याचा लेखांकिय दस्तऐवज हाच एक आधार असतो.

**लेखांकिय दस्तऐवजाचे महत्व व उपयोगिता**

१. लेखापुस्तकात सर्व व्यवहाराच्या नोंदी करण्याकरिता स्त्रोत दस्तऐवजांची गरज असते.

२. लेखांकिय व्यवहाराच्या नोंदी कागदपत्रे किंवा संगणकाच्या आधारे नोंदविण्यात येतात.

३. स्त्रोत दस्तऐवजांची साठवणूक करण्यासाठी भौतिक स्वरुपाच्या फाईल किंवा संगणकाचा वापर केला जातो.

४. न्यायालयीन प्रकरणात स्त्रोत दस्तऐवज कायदेशीर पुरावा मानला जातो.

५. विश्वस्त आयुक्त कार्यालयास स्त्रोत दस्त ऐवजांची आवश्यकता असते.

६. सरकार किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या शोधनासाठी या दस्तऐवजांची आवश्यकता असते.

काही महत्वाची लेखांकिय दस्तऐवजे खालील प्रमाणे आहेत :

**प्रमाणक** (VOUCHER) :

प्रमाणक दस्तऐवजाच्या आधारेच व्यवसायाचा मालक शोधन करीत असतो. विशिष्ट व्यक्तीला / पक्षाला ठराविक रक्कम देण्यासंबंधीचा हा कायदेशीर पुरावा असतो. व्यावसायिकाकडून विविध प्रकारची प्रमाणके तयार करण्यात येतात. रोखप्रमाणक, बँक प्रमाणक, खरेदी प्रमाणक, विक्री प्रमाणक, प्रवासी देयके, मजुरीची देयके, पगार देयके इ.

प्रमाणकाचे आंतरिक प्रमाणक व बाह्य प्रमाणक असे दोन भाग आहेत.

आंतरिक प्रमाणक (**Internal vouchers**) **:** संस्थेत तयार करण्यात येणाऱ्या दस्तऐवजांना आंतरीक प्रमाणक असे म्हणतात. जे प्रमाणक व्यवसायिकाने स्वत: तयार केले असतील आणि त्यावर आदात्याची (payee) पैसे घेणाऱ्याची सही असेल अशा दस्तऐवजाला अंतर्गत प्रमाणक असे म्हणतात. जेव्हा आपण एखाद्या व्यवहाराची पावती किंवा पुरावा सादर करू शकत नाही तेव्हा अंतर्गत प्रमाणके तयार करण्यात येतात. उदा. टॅक्सी भाडे, बस भाडे, ऑटो रिक्षा भाडे इ.

**बाह्य प्रमाणके** (External voucher) **:** बाह्यप्रमाणक हा असा एक दस्तऐवज आहे की, जो एखाद्या व्यवहारासाठी बाहेरील व्यक्ति किंवा संस्थेकडून प्राप्त होतो. उदा. विक्रेत्याकडून मालाची उधार खरेदी केल्यामुळे करपत्र (Tax Invoice ) लेखनसामुग्रीची खरेदी, विजेचे बील, नावेपत्र, जमापत्र रोख बीजक इ.

**पंजियन प्रमाणक** (Journal voucher) **:** पंजियन प्रमाणक हे पायाभूत / मूळ दस्तऐवज असून त्यांच्याआधारे रोजकिर्दीमध्ये पंजियन केले जाते.

### पंजियन प्रमाणकाचा नमुना Specimen of Journal voucher

Journal voucher

संस्थेचे नाव ____________________

प्रमाणक क्र. : ____________ व्यवहार क्र. : ____________ दिनांक : ____________

नावे होणाऱ्या खात्याचे नाव : ____________________

जमा होणाऱ्या खात्याचे नाव : ____________________

| तपशील | राशि (₹) |
|---|---|
| | |
| | |

राशि शब्दात ₹ ____________________

पास करणाऱ्याची सही ____________ अधिकृत सही ____________ सही ____________

**रोख प्रमाणक** (Cash Voucher)

अर्थ (**Meaning**) **:** रोख रक्कम दिल्याचा अथवा घेतल्याचा कागदोपत्री पुरावा म्हणजेच रोख प्रमाणक होय. रोख रक्कम खर्च केल्यास रोखप्रमाणक तयार करणे आवश्यक असते. रक्कम प्राप्तकर्त्याकडून दस्तऐवज प्राप्त झाल्यास त्याचा प्रमाणक म्हणून उपयोग करण्यात येतो आणि त्याला एखादा बाह्य दस्तऐवज जोडता येतो.

**रोख प्रमाणकचा नमुना**

**रोख प्रमाणक**

**नकुल आणि कंपनी**

प्रमाणक क्र. : बान्द्रा रोड, मुंबई दिनांक :

G.S.T. I.N. No. :

यांना रक्कम द्यावी ______________________________

या कारणासाठी (on account of ) ______________________________

नावे खाते (Debit account) ______________________________

एकूण रक्कम (Total ₹) ______________________________ फक्त

₹ [ ]

______ तयार करणारा ______________ मंजुरी देणारा ______________ रक्कम प्राप्त करणाऱ्याची सही

**कर चलनपत्र (TAX INVOICE)**

विक्रेता, खरेदीदाराला मालाचा पुरवठा करतो. त्यासंबंधीची माहिती कर चलनपत्राद्वारे दिली जाते. त्यामध्ये मालाचे वर्णन संख्या, दर, शोधनासंबंधीच्या शर्ती व व्यापारी कसर (trade discount) इ. संबंधीचा तपशील असतो. यातील CGST and SGST ची रक्कम त्याला देय होते. हे आवक बीजक किंवा खरेदी बीजक (purchase invoice' or inward invoice) खरेदीसाठी वापरतात. तर विक्रीसाठी विक्रीपत्रक (sales invoice)किंवा जावक बीजक (outward invoice) वापरतात. खरेदीपुस्तकातील नोंदी ह्या आवक बीजकाच्या आधारे करतात. विक्रीपुस्तकातील नोंदी ह्या जावक बीजकाच्या आधारे केल्या जातात. जेव्हा विक्रेत्याकडून क्रेत्याला वस्तूंचा पुरवठा होतो त्यासोबत करचलनपत्र पाठविले जाते.

**करचलन पत्राचा नमुना (Specimen of Tax Invoice)**

**करचलनपत्र**

**सुनिल जनरल स्टोअर्स**

Cash bill No.: दुकान नं ५, लक्ष्मी रोड, पुणे

G.S.T. I.N. No. : दिनांक:

नाव : (ग्राहकाचे नाव) ______________________________

पत्ता : ______________________________

| Sr. No. | Particulars | HSN No. | Rate ₹ | Qty | Taxable amount ₹ | CGST % ₹ | SGST % ₹ | Total Amount (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

राशि शब्दात ______________________________

बँक तपशील : ______________

बँकेचे नाव : ______________

बँकेचा IFSC कोड : ______________

A/c No. : ______________

E & O.E. Signature

**उधार बीजक (CREDIT MEMO)**

उधारबीजकाला उधारीचे बील असे देखील म्हणतात. जेव्हा मालाची उधार खरेदी करण्यात येते. तेव्हा विक्रेता त्याच्या ग्राहकाला मालविक्री व कराच्या (tax तपशीलासह उधारीचे बीजक पाठवितो. जेव्हा विक्रेत्याकडून क्रेत्याला जे बीजक प्राप्त होते तेव्हा त्याला आवक बीजक असे म्हणतात. तर तेच बीजक विक्रेत्यासाठी जावक बीजक असते. थोडक्यात उधारीचे बीजक म्हणजे विक्रेत्याकडून त्याच्या ग्राहकाला उधारीवर पुरवलेल्या मालासंबंधीचे किंमतीचे विवरण होय. याच आधारे खरेदी व विक्रीपुस्तकात नोंदी करण्यात येतात.

**पावती / रसीद ( RECEIPT) :**

आधुनिक व्यवसायात नफा वाढविण्यासाठी उधारीचे व्यवहार हे सामान्य स्वरुपाचे झाले आहे. या व्यवहारात मालाचा पुरवठा करण्यात येतो. परंतु त्यासंबंधीची रक्कम एका विशिष्ट मुदतीनंतर प्राप्त होते. जेव्हा रक्कम प्राप्त होते. तेव्हा प्राप्तकर्त्याने शोधन मिळाल्याची, शोधनकर्त्याला पोच ( Acknowledgement) देणे आवश्यक असते. त्याकरिता ज्या दस्तऐवजाचा उपयोग केला जातो. त्याला पावती अथवा रसीद असे म्हणतात. रक्कम प्राप्तकर्त्याने रक्कम प्राप्त झाल्याबरोबर त्या संबंधीची पावती तयार करून देणे आवश्यक असते.

**पावती**

**बालाजी ॲन्ड सन्स्**  पावती क्र ----------

सोमवार पेठ, नाशिक  दिनांक -----------

G.S.T.I.N. No. :---------------

श्री. M/s------------------------------------------यांच्याकडून सधन्यवाद बिल------

₹-------------------------------------------------------क्रमांकाच्या

बीलाबद्दल दिनांक ---------------------रोख / चेक क्र. ------------------------------

-------- ------दिंनाक ---------------बँकेचे नाव व शाखा ---------------------

₹ [ ]

तिकिट

धनादेश जमा होण्याच्या शर्तीवर  प्राप्तकर्त्याची सही

**धनादेश (CHEQUE)**

व्यवसायिक व्यवहारातील देवाण-घेवाण पूर्ण करण्यासाठी रकमेचे शोधन व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पैसे पाठवयाचे असतात तेव्हा व्यवसायिक विभिन्न प्रकारच्या धनादेशाचा उपयोग करीत असतो. जे खातेदार ठराविक रक्कम आपल्या खात्यात ठेवीत (Deposit) असतात. त्यांना बँकेकडून धनादेशपुस्तिका (Cheque book ) पुरविण्यात येते.

धनादेश म्हणजे असा आदेश जो खातेदाराद्वारे बँकेला त्या धनादेशावर लिहिलेल्या व्यक्तीला अथवा वाहकाला त्यावरील रकमेचे शोधन करण्यासाठी दिला जातो. खातेदाराच्या मागणीनुसार बँक त्याला छापील धनादेशपुस्तीका प्रदान करते.

**धनादेशाची व्याख्या (Definition of Cheque)**

"धनादेश हा लिखीत बिनशर्त आदेश आहे की, ज्याद्वारे जमाकर्ता त्यावर आपली स्वाक्षरी करून एका विशिष्ट बँकेला निर्देश देतो की, धनादेशामध्ये ज्याचे नांव लिहलेले आहे त्याला किंवा वाहकाला त्यांनी मागणी केल्यावर एक ठराविक रक्कम द्यावी".

**धनादेशाचे पक्ष (Parties to a Cheque)**

**(अ) आदेशक (Drawer) :** जो व्यक्ती धनादेश काढतो त्याला आदेशक असे म्हणतात.

**(ब) आदेशिती (Drawee) :** ज्या बँकेवर धनादेश काढलेला आहे, त्यास आदेशिती असे म्हणतात. बँक आदेशिती असते

**(क) आदाता (The Payee) :** ज्या व्यक्तीकरिता धनादेश लिहिला जातो त्याला आदाता असे म्हणतात.

**धनादेशाचे घटक (Contents of Cheque)**

१) बँकेचे नाव व पत्ता शाखा इ.

२) धनादेश लिहिण्याचा दिनांक

३) आदात्याचे नांव

४) धनादेशाची रक्कम शब्दात व अंकात

५) खातेदाराचे नाव व सही

६) धनादेश क्रमांक

७) MICR कोड क्रमांक

८) IFSC कोड नंबर

९) खाते क्रमांक

**धनादेशाचे प्रकार (Types of Cheques)**

धनादेशाचे प्रकार पुढील प्रमाणे

१) वाहक धनादेश २) आदेशित धनादेश ३) रेखांकित धनादेश

**१)** वाहक धनादेश (**Bearer Cheque) :** ज्या धनादेशाचे पैसे बँकेच्या खिडकीवर (countar) कोणत्याही व्यक्तीला मिळू शकतात त्यास वाहक धनादेश असे म्हणतात. धनादेश धारण करणारा व्यक्ती बँकेत भौतिकरित्या हजर होवून धनादेशाच्या पृष्ठभागावर बँक अधिकाऱ्यासमोर सही करून त्या धनादेशाची रक्कम प्राप्त करू शकतो.

**वाहक धनादेशाचा नमुना (Specimen of a Bearer Cheque)**

DD MM YY

Pay ____________________________________________ OR BEARER

RUPEES ____________________________________________

₹

| A/C NO. | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

State Bank of India,
M.G. Road, Mumbai.
IFSC No. SBIN 1234001.

Signature

123456 ``4110150351 : 00796411

२) **आदेशित धनादेश (Order cheque) :** जेव्हा धनादेशातील रक्कम विशिष्ट व्यक्तीला देय असते तेव्हा त्यास आदेशित धनादेश असे म्हणतात. या धनादेशातील रक्कम धनादेशात नमूद केलेल्या व्यक्तीला अथवा त्याच्या आदेशाप्रमाणे तो सांगेल त्याला दिली जाते. जेथे वाहक चेक समाप्त होतात तेथे आदेशित चेक बनतात.

**आदेशित धनादेशाचा नमुना (Specimen of an Order Cheque)**

DD MM YY

Pay ____________________________________________ OR BEARER

₹

RUPEES ____________________________________________

| A/C NO. | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

State Bank of India,
M.G. Road, Mumbai.
IFSC No. SBIN1234001.

Signature

123456 ``4110150351 : 00796411

३) **अ) रेखांकित धनादेश (Crossed Cheque) :** खातेदार आणि आदात्याला रक्कम मिळण्याच्या सुरक्षिततेसाठी जेव्हा धनादेशावर दोन समांतर रेषा काढल्या जातात, तेव्हा त्या 'धनादेशास रेखांकित धनादेश' असे म्हणतात. रेखांकित धनादेशाचे पैसे प्रथम बँक खात्यात जमा होते आणि तद्नंतर त्याला पैसे काढता येतात. रेखांकित धनादेशाच्या प्रभाव असा होतो की, धनादेशावर ज्या व्यक्तीचे नांव आहे त्याच माणसाला त्याचे शोधन होते.

**रेखांकित धनादेशाचा नमुना (Specimen of a Crossed Cheque)**

DD MM YY

Pay ______________________________________________
____________________ OR BEARER

RUPEES ______________________________________________
________________________________

| A/C NO. | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

₹

State Bank of India,
M.G. Road, Mumbai.
IFSC No. SBIN1234001.

Signature

123456 ``4110150351 : 00796411

३) **ब) अकांउटपेयी रेखांकित धनादेश (Crossed Account Payee Cheque) :** रेखांकित अकाऊंटपेयी धनादेश हा रेखांकित धनादेशासारखा असतो. या धनादेशामध्ये लिहण्यात आलेली रक्कम ही केवल धनादेशामध्ये ज्या व्यक्तीचे / संस्थेचे नाव लिहण्यात आलेले आहे त्याच व्यक्तीच्या बँक खात्यात जमा होईल. जेव्हा एखाद्या धनादेशावर दोन समांतर रेषा, ओढून त्यामध्ये केवल पैसे प्राप्त करणारा "Account payee" only हे शब्द लिहिले जातात अशा धनादेशाला रेखांकित अकाऊंटपेयी धनादेश असे म्हणतात.

**रेखांकित अकाऊंटपेयी धनादेशाचा नमुना**

A/c payee

DD MM YY

Pay ______________________________________________
____________________ OR BEARER

RUPEES ______________________________________________
________________________________

| A/C NO. | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

₹

State Bank of India,
M.G. Road, Mumbai.
IFSC No. SBIN1234001.

Signature

123456 ``4110150351 : 00796411

## ३.२ रोजकिर्दीचा अर्थ, व्याख्या महत्त्व आणि उपयोगिता

**प्रस्तावना :**

व्यावसायिक दर दिवशी असंख्य व्यवहार पूर्ण करीत असतो. हे सर्व व्यवहार तो स्मरणात ठेवू शकत नाही. म्हणून या व्यवहारांची नांद करण्याकरिता तो विविध प्रकारच्या पुस्तकांचा उपयोग करतो. यांची संख्या व्यवसायाचा आकार, स्वरूप आणि व्यवहारांच्या संख्येवर अवलंबून असते. परंतु असे असले तरीही काही महत्त्वाची लेखापुस्तके ही प्रत्येक व्यवसायिकाला ठेवावी लागतात. ती रोजकिर्द आणि खातेवही आहे. खातेवहीत नोंद करणे सोयीस्कर व्हावे अशा स्वरूपात व्यवहारांचे वर्गीकरण करणारे पुस्तक म्हणजे रोजकिर्द होय. रोजकिर्द रोजच्या आर्थिक व्यवहारांच्या नोंदी ठेवते. रोजकिर्द हे मुळनोंदीचे पुस्तक आहे. जेव्हा रोजकिर्दीतील व्यवहार रोजकिर्दीत नोंदविले जातात. तेव्हा ती रोजकिर्दीतील नोंद होते.आर्थिक व्यवहारातील नावे व जमा यांचा समावेश रोजकिर्दीत असतो. त्याचबरोबर व्यवहाराचे संक्षिप्त स्पष्टीकरण दिलेले असते. रोजकिर्द हे असे पुस्तक आहे. की, ज्यामध्ये व्यवसायातील आर्थिक व्यवहार कालक्रमानुसार तारीखवार (Chronological )सर्वप्रथम लिहले जातात. व्यवहार ज्या क्रमाने केले जातात. त्याच क्रमाने लिहले जातात.

सामान्यपणे व्यवसायातील आर्थिक व्यवहारांच्या नोंदी करण्याकरिता व्यवसायिक विविध प्रकारच्या पुस्तकांचा उपयोग करीत असतो. यात प्राथमिक व दुय्यम स्वरुपाच्या पुस्तकांचा समावेश असतो. प्राथमिक पुस्तकात मुळरोज/किर्द (Proper Journal) विशेष रोजकिर्द (Special Journal ) यांचा समावेश असतो. जसे खरेदीपुस्तक, विक्री पुस्तक, खरेदीपरत पुस्तक, विक्रीपरत पुस्तक, प्राप्तविपत्रपुस्तक, देयविपत्र पुस्तक आणि दुय्यम पुस्तकात खातेवही (Ledger) चा समावेश असतो.

### ३.२.१ अर्थ (Meaning) :

इंग्रजीतील Journal हा शब्द फ्रेन्च भाषेतील "JOUR" या शब्दापासून घेतला आहे. JOUR या शब्दांचा अर्थ "Day"अर्थात दिवस असा होतो. म्हणून रोजकिर्द म्हणजे दैनंदिन नोंद होय. रोजकिर्दीत व्यवसायातील आर्थिक व्यवहारांच्या नांदी केल्या जातात. याठिकाणी असे व्यवहार झाल्याबरोबर लगेच ते नावे आणि जमा केले जातात. आणि त्यांचे स्पष्टीकरणही दिले जाते. सर्वप्रथम तारीखवार नोंदी रोजकिर्दीत केल्या जातात. ज्याक्रमाने त्या केल्या जातात त्याच क्रमाने त्या लिहल्या जातात. रोजकिर्द हे मुळनोंदीचे किंवा प्राथमिक नोंदीचे पुस्तक होय.

**व्याख्या (Definition) :**

१) खातेवहीत नोंद करणे सोयीस्कर व्हावे अशा स्वरुपात व्यवहारांचे वर्गीकरण करणारे पुस्तक म्हणजे रोजकिर्द होय.'

एल. सी. कॉपर

"A journal is a book, employed to classify or sort out transactions in a form convenient for their subsequent entry in the Ledger"

२) Accountant Dictionary written by **Eric Kohler –** " A Journal is the book of original entry are recorded transaction not provided for in specialised journals".

३) रोजकिर्द हे मुळनोंदीचे किंवा प्राथमिक नोंदीचे पुस्तक आहे.

### ३.२.२ रोजकिर्दीचे महत्त्व आणि उपयोगिता (Importance and utility of Journal) :

रोजकिर्दीचे महत्त्व : पुस्तपालनातील रोजकिर्द हे महत्त्वाचे पुस्तक आहे. सर्व लहान-मोठे व्यापारी रोजकिर्द ठेवतात. रोजकिर्दीचे महत्त्व आणि उपयोगिता पुढीलप्रमाणे :-

१) रोजकिर्द हे जमाखर्चाचे प्रमुख पुस्तक आहे. यात व्यवसायातील सर्व प्रकारच्या खात्यांचा समावेश होतो.

२) हे व्यवहाराशी संबंधित आवश्यक माहिती रोजकिर्द मध्ये दर्शविली जाते.

३) रोजकिर्दीत सर्व व्यवहार सविस्तरपणे तारीखवार नोंदविले जातात. यातील खात्यांच्या आधारे घडलेल्या गोष्टी कोणत्या ठिकाणी लिहिलेल्या आहेत ते समजते.

४) रोजकिर्द हे दुय्यमपुस्तक आहे. ज्यामध्ये रोजचे व्यवहार नोंदविले जातात. सर्वप्रथम हे व्यवहार ज्या क्रमाने ते केले जातात त्या क्रमाने लिहिले जातात. ते नावे व जमा केले जातात. प्रत्येक व्यवहाराची राशी दिली जाते.

५) लेखांकन प्रक्रिया हि लेखांकिय दस्तऐवजाच्या आधारे केली जाते.

६) रोजकिर्दीत झालेल्या नोंदीच्या स्पष्टीकरणामुळे व्यवहाराचे संक्षिप्त स्वरुप दिसून येते. यामुळे व्यवहारात सुस्पष्टपणा दिसण्यास मदत होते.

७) किर्दनोंदीमुळे होणाऱ्या चुका शोधणे आणि त्यांना प्रतिबंध घालणे सोपे होते.

८) किर्दनोंदीमुळे व्यवहारांची अंकगणितीय अचुकता तपासण्यास मदत होते.

९) किर्दनोंदीचा व्यवसायाचे अंतीम लेखे तयार करण्यास मदत होते.

## ३.३ रोजकिर्दीचा नमुना / स्वरुप / आखणी खालीलप्रमाणे–

श्री ------------------------------------------------------------यांची रोजकिर्द

| दिनांक | तपशील / विवरण | खा.पा | नावे राशि ₹ | जमा राशि ₹ |
|---|---|---|---|---|
| वर्ष/ महिना/ तारीख | नावे करावयाच्या खात्याचे नाव नावे.<br>जमा करावयाच्या खात्याचे नाव<br>(.....................................बद्दल) | | | |

**रकान्यांचे स्पष्टीकरण (Explanation of columns) :**

**१) दिनांक (Date) :** या रकान्यात प्रत्येक व्यवहाराची दिनांक लिहिण्यात येते. दिनांक लिहितांना प्रथम वर्ष, त्याखाली महिना व तारीख लिहावी.

**२) तपशील / विवरण (Particulars) : रकान्यात रोजकिर्द नोंद ही तीन भागात केली जाते.**

i) **नावे खाते (Debit A/c) :** तपशीलच्या रकान्यात प्रथम नावे होणाऱ्या खात्याचे नाव लिहावे.

ii) **जमाखाते (Credit A/c ) : यात जमा होणाऱ्या खात्याचे नाव लिहिले जाते.**

यासाठी नावे व जमा करण्यासंबंधीचे नियम अंमलात आणले जातात. नेहमी सर्वप्रथम नावे होणाऱ्या खात्याचे नांव लिहिले जाते. अगदी खाते पान क्रमांकाच्या रकान्याजवळ "नावे''. हा शब्द लिहितात. पुढच्या ओळीवर दिनांकच्या ओळीच्या बाजूला थोडी जागा सोडून जमा होणाऱ्या रकान्याचे नाव लिहितात. त्याखाली व्यवहाराचे स्पष्टीकरण लिहिण्यात येते.

iii) स्पष्टीकरण (Narration) म्हणजे व्यवहारासंबंधीची माहिती होय. हे स्पष्टीकरण नेहमी कंसामध्ये लिहावे आणि वाक्याच्या शेवटी बद्दल (Being) जोडला जातो.

**३) खाते पान क्रमांक (Ledger Folio Number) :** पृष्ठ (Folio) म्हणजे पान क्रमांक (page number) आणि म्हणून खातेवही पान म्हणजे खातेवहीतील पान क्रमांक – रोजकिर्दीत लिहिलेल्या व्यवहारांची खातेवहीत खतावणी करण्यात येते.

खतावणी करतांना खातेवहीत ज्या पानावर संबंधित दोन खाती दर्शविली असतात त्यामध्ये नोंद करून त्या पृष्ठाचा क्रमांक खाते पान क्रमांक या रकान्यात लिहण्यात येतो.

पान क्रमांक मोठ्या अक्षरात लिहण्यात यावा.

**४) नावे राशि (Debit Amount) :** नावे झालेल्या खात्याची रक्कम या रकान्यात त्याच ओळीत लिहिली जाते.

**५) जमा राशि (Credit Amount) :** जमा झालेल्या खात्याची रक्कम या रकान्यात त्याच ओळीत लिहिली जाते.

रोजकिर्दीची बेरीज (Casting of Journal) **:** रोजकिर्दीच्या प्रत्येक पानाच्या शेवटी नावे व जमा रक्कम या रकान्यांची बेरीज करण्यात येते. यामुळे व्यवहारांची अचूकता तपासता येते. दोनही रकान्याची बेरीज सारखीच असायला हवी.

रोजकिर्दीत व्यवहारांच्या नोंदी केल्यानंतर आणि पानाच्या शेवटी रक्कम या रकान्याची बेरीज केल्यानंतर ती बेरीज पुढील पानावर ओढली जाते. ज्या पानावरून ही बेरीज पुढे नेण्यात येते, त्या पानावर तपशील या रकान्यात शेवटी 'बेरीज पुढे नेली' Total c/f असे लिहिण्यात येते. हिच बेरीज पुढील पानावर सर्व प्रथम 'बेरीज' पुढे आणली. (Total b/f) असे लिहून पुढे आणली जाते. रोजकिर्दीच्या शेवटच्या पानावर एकूण बेरीज लिहिण्यात येते.

**रोजकिर्दीत नोंदी करणे / पंजीयन (Journalising) :**

रोजकिर्दीत व्यवहारांच्या नोंदी करण्याच्या क्रियेला रोजकिर्दीयन किंवा पंजीयन असे म्हणतात.

**रोजकिर्दीत नोंद करावयाच्या पायऱ्या** (Steps for Journalising ) :

१) विशिष्ट व्यवहारांमध्ये असलेल्या दोन खात्यांची ओळख पटविणे.

२) ती खाती कोणत्या प्रकारात मोडतात हे निश्चित करणे.

३) संबंधित खात्याला नावे आणि जमा करण्यासंबंधीचे नियम निश्चित करणे.

४) कोणते खाते नावे व कोणते खाते जमा होईल हे निश्चित करणे.

५) दिनांकाच्या रकान्यात व्यवहाराची दिनांक लिहावी.

६) तपशीलाच्या रकान्यात प्रथम नावे होणाऱ्या खात्याचे नाव लिहिण्यात यावे. हे नाव डावीकडील दिनांक खात्याच्या जवळ लिहिले जाते. दुसऱ्या ओळीवर डावीकडील दिनांक रकान्यापासून काही जागा सोडून जमा होणाऱ्या खात्याचे नांव लिहिले जाते.

७) नावे होणाऱ्या खात्याच्या शेवटी नावे 'नावे.' असे लिहिले जाते. जमा होणाऱ्या खात्याच्या शेवटी 'ला' असा शब्द लिहिला जातो.

८) विशिष्ट खात्यात नावे होणारी रक्कम 'नावे राशी' या रकान्यात लिहिली जाते, तसेच जमा होणारी रक्कम 'जमा राशी' या रकान्यात लिहिली जाते.


९) व्यवहाराच्या नोंदीचे खाली कंसात संक्षिप्त स्पष्टीकरण दिले जाते. स्पष्टीकरणाच्या शेवटी 'बद्दल' असा शब्द लिहिला जातो.

१०) प्रत्येक नोंदीनंतर तपशील रकान्यात एक सरळ रेषा ओढली जाते जेणे करून एक व्यवहार दुसऱ्या व्यवहारापासून स्पष्टपणे वेगळा दिसून येईल.


११) खातेवही मध्ये ज्या पानावर खाते उघडले जाते त्या पानाचा क्रमांक खा.पा. या रकान्यात लिहिण्यात येतो.

**तुम्हाला हे माहित आहे ???**

**व्यवहार कसा प्रवास करतो**



### ३.३.१ वस्तू व सेवाकर (GST)




वस्तु व सेवाकराच्या GST ची अंमलबजावणी होण्यापूर्वी प्रत्येक राज्यामध्ये व्यवसायाच्या विविध टप्प्यावर (stages) विविध प्रकारच्या करांची आकारणी केली जात असे. पूर्वी अस्तित्वात असलेले कर जसे इक्साईज ड्युटी, कस्टम ड्युटी, (VAT) व्हॅट, मनोरंजनकर, सेन्ट्रल सेल्स टॅक्स, सेवाकर (Service Tax), ऑक्ट्राय इ. हे सर्व कर GST अंतर्गत समाविष्ट करण्यात आले आहेत, म्हणूनच GST एक देश एक कर एक बाजार' असे ठरविण्यात आले. GST ची अंमलबजावणी १ जुलै २०१७ पासून झाली आहे.

कर पावत्यामध्ये काही सांकेतांक (code) समाविष्ट करण्यात आले आहेत. वस्तूच्या (Goods) बाबतीत

HSN – Harmonised System of Nomenclature

सेवेच्या बाबतीत(services) – सेवांचे वर्गीकरण करून त्यांना विशेष कोड नंबर देण्यात आलेला आहे.

SAC – Service Accounting Code.

HSN मुळे वस्तूंचे व SAC मुळे सेवांचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | प्रकार | कराचे दर | वस्तू व सेवेचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | शुन्य दराच्या वस्तू | ०% | **वस्तू (Goods) :** महत्वाच्या उपयोग्य वस्तू जसे अन्न, धान्य, फळे, भाजीपाला, दूध, मीठ, मातीची भांडी इ.<br>**सेवा :** धर्मादाय संस्थेची कार्ये, रस्ते, पुल, इ. बांधकाम पाणीसेवा, सार्वजनिक ग्रंथालय कृषी कार्ये – शिक्षण व आरोग्य संबंधीच्या सेवा. |
| २ | कमी दराच्या वस्तू | ५% | **वस्तू :** LPG , सिलेंडर, चहा, कॉफी, तेल, मध, गोठवलेल्या वस्तू, भाजीपाला / तिखट, चटण्या गोड पदार्थ (Sweets) इ. |
| ३ | जास्त दराच्या वस्तू (स्लॅब I ) | १२% | **वस्तू :** बटर, तूप, सुका मेवा, ड्राय फ्रूट, रस, आचार, लोणचं, मोबाईल, जाम, जेली<br>सेवा : फोन, छपाई, Tobwork विश्रामगृह, बांधकाम व्यवसाय इ. संबंधीत सेवा. |
| ४ | जास्त दराच्या वस्तू (स्लॅब II ) | १८% (वस्तू व सेवा ) | **वस्तू :** परफ्युम, धातूच्या वस्तू, संगणक, प्रिंटर, ग्रेनाईट, छपाई, यंत्र, सीसी. टी.व्ही, मॉनीटर इ.<br>**सेवा :** टपाल सेवा, कुरिअर सेवा, आऊटडोअर केटरिंग, सर्कस, नाटक, सिनेमा, प्रदर्शने, भागदलाल सेवा, भागबाजारातील सेवा. चलन विनिमय. |
| ५ | उच्चदराच्या वस्तू/ सेवा | २८% | **वस्तू :** चैनीच्या वस्तू, मोटारसायकल, सुटे भाग, अलिशान गाडी, व्हॅक्युम क्लिनर, ए. सी. , वॉशिंग मशीन, फ्रीज, मसाला, तंबाखू पदार्थ.<br>**सेवा :** Five star हॉटेल, पार्कस्, वॉटर पार्क, थीम पार्क, रेस कोर्स, आयपीएल, करमणूक केंद्र, गेम्स्, विमानसेवा (व्यावसायिक वर्ग) कॅसीनो इ. |

**सूचना :** हे प्रकरण लिहिताना सरकारने वस्तू व सेवाकरांबाबत वरील दर व प्रकार सुचविलेले आहेत. वीज, पेट्रोल, डिझेल, इंधन, गॅस इत्यादी बाबतीत GST चे दर बदलणारे असतील.

**GST व्यवहारांच्या किर्दनोंदी**

**उदा. १:** जलराम आणि कंपनीकडून ₹ ५०,००० किमतीचा लॅपटॉप खरेदी केला. त्यावर १८% दराने GST आकारण्यात आला. शोधन चेकद्वारे करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| लॅपटॉपची किंमत | = | ₹ | ५०,००० |
| + केंद्र सरकार CGST ९% | = | ₹ | ४,५०० |
| + राज्य सरकार SGST ९% | = | ₹ | ४,५०० |
| एकूण मूल्य | = | ₹ | ५९,००० |

**रोजकिर्दीत नोंद**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना<br>दिनांक | संगणक खाते .......................... नावे<br>CGST खाते .......................... नावे<br>SGST खाते .......................... नावे<br>बँकखात्याला<br>(१८% GST ने लॅपटॉप खरेदी केल्याबद्दल) | | ५०,०००<br>४,५००<br>४,५०० | <br><br><br>५९,००० |

**उदा. २:** ₹ १,००,००० ला मोटारकार २८% GST ने विकली व रक्कम चेकने मिळाली.

| | | |
|---|---|---|
| मोटारीची किंमत | = | ₹ १,००,००० |
| + CGST १४% | = | ₹ १४,००० |
| + SGST १४% | = | ₹ १४,००० |
| एकूण मूल्य | = | ₹ १,२८,००० |

**रोजकिर्द (Journal Entry)**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना<br>दिनां | बँक खाते ..................................नावे<br>मोटारकार खात्याला<br>CGST खात्याला<br>SGST खात्याला<br>(२८% GST वर मोटारकारची विक्री केल्याबद्दल) | | १,२८,००० | <br>१,००,०००<br>१४,०००<br>१४,००० |

## ३.४ रोजकिर्दीत नोंदी करणे (Recording of Journal Entries)

**माल / वस्तू खाते (Goods Account) :**

व्यवसायिक ज्या वस्तू पुन्हा विकण्याच्या हेतूने खरेदी करतो त्यांना माल किंवा वस्तू असे म्हणतात. माल खात्याचे विभिन्न खात्यामध्ये वर्गीकरण करण्यात येते. जसे खरेदीखाते, विक्री खाते, खरेदी परत खाते, विक्री परत खाते, मालकाद्वारे उचल खाते, नमुना माल वितरण खाते, आगीमुळे माल नष्ट खाते, मार्गस्थ मालाची तुटफूट होणे किंवा हरविणे खाते इ.

१) **खरेदी खाते (Purchase Account) :** व्यवसायासाठी वस्तूंची खरेदी म्हणजे व्यापार किंवा उत्पादनकार्यासाठी माल / वस्तू आणणे होय.

खरेदी दोन प्रकारची असते.

i) रोख खरेदी (Cash Purchases) ii) उधार खरेदी (Credit Purchases)

i) **रोख खरेदी (Cash Purchases) :** जेव्हा माल/ वस्तू खरेदी करून विक्रेत्याला ताबडतोब रोख किंवा धनादेश च्या माध्यमातून शोधन केले जाते, अशा खरेदीला रोख खरेदी असे म्हणतात.

**उदाहरण १:** सोनूकडून ₹ २,००० किमतीचा माल नगदी खरेदी केला.

**रोजकिर्दीत नोंद**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना<br>दिनांक | खरेदी खाते ....................................नावे<br>रोकड खात्याला<br>(मालाची नगदी खरेदी केल्याबद्दल) | | २,००० | २,००० |

ii) **उधार खरेदी (Credit Purchases) :** माल खरेदी केल्यानंतर विक्रेत्याला भविष्यामध्ये देणे दिले जाते. ज्या खरेदीच्या बाबतीत विक्रेता खरेदीदाराला मालाच्या शोधनासाठी एक निश्चित मुदत देत असतो. तिला उधार खरेदी असे म्हणतात.

**उदाहरण २ :** सौ. सोनाली यांच्याकडून ₹ १५,००० किमतीच्या वस्तू उधार खरेदी केल्या.

**रोजकिर्दीत नोंद**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना<br>दिनां | खरेदी खाते ..................................नावे<br>सौ. सोनाली खात्याला<br>(मालाची उधार खरेदी केल्याबद्दल) | | १५,००० | १५,००० |

**खरेदी पुस्तक हे प्रामुख्याने केवळ मालाच्या उधार खरेदीची नोंद करण्यासाठी ठेवण्यात येते.**

२) **खरेदीपरत / क्रय प्रत्याय / निर्गत प्रत्याय खाते (Return Outward/Purchase Return Account) :**

कित्येकदा खरेदी करण्यात आलेला माल काही कारणास्तव पुरवठादाराला परत करण्यात येतो जसे –

i) माल नमुन्याप्रमाणे नसणे.
ii) माल हलक्या प्रतीचा असणे.
iii) रस्त्यात मालाची तूट-फूट होणे.
iv) मालात खराबी असणे.
v) अतिरिक्त प्रमाणात माल प्राप्त होणे.
vi) मालाचा पुरवठा उशिरा झाल्यास.

अशा रितीने खरेदी केलेला माल जेव्हा खरेदीदाराकडून, पुरवठादाराला परत करण्यात येतो. तेव्हा त्यास खरेदी परत असे म्हणतात.

**उदाहरण ३ :** वरील उदाहरण क्र. २ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या मालापैकी ₹ २,००० किमतीचा माल सौ सोनालीला परत केला.

**रोजकिर्दीत नोंद**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना<br>दिनांक | सौ. सोनालीचे खाते............................. नावे<br>खरेदी परत खात्याला<br>(माल परत केल्याबद्दल) | | २०० | २०० |

३) **विक्री :** व्यवसायासाठी विक्री म्हणजे मालाची विक्री होय. विक्री दोन प्रकारची असते. –

अ) रोख विक्री  ब) उधार विक्री

**अ) रोख विक्री :** जेव्हा मालाची विक्री करण्यात येते आणि त्यासंबंधीची रक्कम ताबडतोब मिळते, तेव्हा अशा विक्रीला रोख विक्री असे म्हणतात.

**उदाहरण ४ :** गोविन्दाला ₹ ५,००० किमतीच्या वस्तू नगदी विकल्या.

**रोजकिर्दीत नोंद**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना<br>दिनांक | रोकड खाते ....................................नावे<br>विक्री खात्याला<br>(वस्तूंची नगदी विक्री केल्याबद्दल) | | ५,००० | ५,००० |

**ब) उधार विक्री (Credit sales) :** जेव्हा मालाची विक्री होते आणि त्यासंबंधीची रक्कम भविष्यात प्राप्त होते. तेव्हा त्यास उधार विक्री असे म्हणतात.

**उदाहरण ५ :** गोविंदाला ₹ ३०,००० किमतीचा माल विकला. –

**रोजकिर्दीत नोंद**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना<br>दिनांक | गोविंदचे खाते ....................................नावे<br>विक्री खात्याला<br>(मालाची उधार विक्री केल्याबद्दल ) | | ३०,००० | ३०,००० |

४) **विक्री परत / आगतप्रत्यय :** जेव्हा ग्राहकाला माल विकल्यानंतर, खरेदीदाराकडून तो काही कारणास्तव विक्रेत्याला परत केला जातो, यास विक्री परत असे म्हणतात.

**उदाहरण ६:** गोंविदकडून खरेदी केलेल्या ₹ ३०,००० च्या मालापैकी ₹ ८, ००० किमतीचा माल परत केला.

**रोजकिर्दीत नोंद**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना<br>दिनांक | विक्री परत खाते ..................................नावे<br>गोविंदच्या खात्याला<br>(गोविंदला माल परत केल्याबद्दल) | | ८,००० | ८,००० |

५) **मालकाद्वारे मालाची उचल / आहरण** (Goods withdrawn by Proprietor )

जेव्हा मालक व्यवसायातून खाजगी, वैयक्तीक किंवा घरगुती उपयोगासाठी वस्तूंची उचल करतो तेव्हा, त्यास उचल / आहरण असे म्हणतात. अशावेळी उचल खाते नावे करतात. मालकाने वस्तूंची उचल केल्यामुळे धंद्यातील वस्तू कमी होतात म्हणून वस्तू / माल खाते जमा करतात. मालकाद्वारे जेव्हा मालाची उचल केली जाते तो तेंव्हा माल एकूण खरेदीतून वजा होतो.

**रोजकिर्दीत नोंद**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना<br>दिनांक | उचल खाते ............................नावे<br>मालाचे खाते / खरेदी खात्यात<br>(मालाची उचल केल्याबद्दल ) | | xxx | xxx |

६) **नमुना म्हणून मोफत वाटलेल्या वस्तू (Goods distributed as free sample) :** मालाची जाहिरात करण्याच्या उद्देशाने व्यवसाय संस्थेद्वारा ग्राहकांना मालाचा नमुना म्हणून मोफत वितरण केले जाते. अशा मालाच्या किंमतीने जाहिरात खर्च खाते नावे केले जाते आणि व्यवसायामधून माल बाहेर जात असल्याने मालखाते / खरेदी खाते जमा करण्यात येते.

**रोजकिर्दीत नोंद**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना<br>दिनांक | जाहिरात खाते ........................नावे<br>नमुना माल वितरण किंवा खरेदी खात्याला<br>(माल मोफत वाटल्याबद्दल) | | xxx | xxx |

७) **आगीमुळे / अपघातामुळे माल नष्ट होणे (Goods Destroyed by fire/Accident) :** आगीमुळे / अपघातामुळे माल नष्ट झाला तर ते मालाचे भौतिक स्वरुपाचे नुकसान आहे. याकरिता नुकसानीचे खाते नावे करण्यात येईल आणि एक प्रकारे माल व्यवसायातून बाहेर जात असल्याने 'माल नष्ट खाते' किंवा 'खरेदी खाते' जमा करण्यात येईल.

अ) **मालाचा विमा काढण्यात आलेला नसेल (If goods are not Insured (Uninsured) :**

i) जेव्हा आगीमुळे माल नष्ट झाला असेल आणि विमा कंपनीने दावा स्वीकारला नसेल तेव्हा खालील प्रकारची नोंद होईल. :

**रोजकिर्दीत नोंद**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना<br>दिनांक | आगीमुळे नुकसानीचे खाते ........................नावे<br>आगीमुळे नष्ट माल खाते / खरेदी खात्याला<br>(आगीमुळे माल नष्ट झाल्याबद्दल) | | xxx | xxx |

ब) **मालाचा विमा काढण्यात आलेला असेल (If goods are insured) :**

i) विमा कंपनीने संपूर्ण दावा मान्य केल्यास खालील नोंद करावी. :

**रोजकिर्दीत नोंद**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना/<br>दिनांक | विमा कंपनी खाते ........................नावे.<br>आगीमुळे माल नष्ट खाते / खरेदी खात्याला<br>(आगीमुळे माल नष्ट झाला विमा कं. दावा मान्य केल्याबद्दल) | | xxx | xxx |

ii) विमा विमाकंपनीने अंशत: दावा मानय केल्यास – if the claims is partly accepted. :

**रोजकिर्दीत नोंद**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना/<br>दिनांक | विमा कंपनी खाते ...............नावे<br>(नुकसान भरपाईच्या रकमेने)<br>आगीमुळे नुकसान खाते ..........नावे<br>नुकसानीच्या रकमेने आगीमुळे माल नष्ट / खरेदी खात्याला<br>(नष्ट झालेल्या मालाचा अंशत: विमा कंपनीने मान्य केल्याबद्दल) | | XXX<br><br>XXX | <br><br><br>XXX |

८) **मार्गस्थ मालाची तूटफूट होणे / हरविणे (Goods damaged or Lost in transit) :**

जेव्हा माल खरेदीदाराला वितरीत केला जातो, परंतु जोपर्यन्त गंतव्य स्थानी पोहचत नाही तोपर्यंत तो माल मार्गस्थ आहे असे समजले जाते. माल मार्गस्त असताना त्याची तूटफूट होणे किंवा गहाळ झाल्यास मालाचे भौतिक नुकसान होते.

**रोजकिर्दीत नोंद**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना/<br>दिनांक | मार्गस्थ नुकसानीचे खाते..........................नावे<br>मार्गस्थ गहाळ/ खरेदी खात्याला<br>(माल मार्गस्थ असताना गहाळ झाल्याबद्दल) | | XXX | <br>XXX |

i) मार्गस्थ मालाचा विमा काढलेला असेल आणि विमा कंपनीने संपूर्ण दावा मान्य केला असेल

**रोजकिर्द नोंद**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना/<br>दिनांक | विमा कंपनी खाते ............................. नावे<br>(विम्याची रक्कम)<br>माल नष्ट / खरेदी खात्याला<br>(माल मार्गात नष्ट झाल्याबद्दल) | | XXX | <br>XXX |

iii) मार्गस्थ मालाचा विमा काढलेला असेल आणि विमाकंपनीने अंशत: दावा मान्य केला असेल –

**रोजकिर्द**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना/<br>दिनांक | विमा कंपनी खाते (मान्य दाव्याची रक्कम) नावे<br>मार्गस्थ नुकसान खाते ................. नावे<br>(नुकसानीच्या रकमेने)<br>मार्गस्थ माल / खरेदी खात्याला<br>(मार्गस्थ माल गहाळ झाला आणि विमाकंपनीने अंशत: दावा स्विकारण्यास) | | xxx<br>xxx | <br><br><br><br>xxx |

९) **चोरीला गेलेला किंवा उचललेला माल (Pilfered goods or stolen) :**

जेव्हा माल चोरीला जातो किंवा उचलला (उचलेगिरी) जातो. तेव्हा भौतिक स्वरुपाचे नुकसान होते.

**रोजकिर्द नोंद**

| दिनांक | तपशील | खा.पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष<br>महिना/<br>दिनांक | चोरीला गेलेला माल खाते ...................... नावे<br>माल नुकसान खाते / खरेदी खात्याला<br>(माल चोरीला गेल्याबद्दल) | | xxx | <br><br>xxx |

## ३.३ रोजकिर्दी – नोंदीचे लेखन –

रोजकिर्द नोंदीचे प्रकार

साधी/ सरळ किर्दनोंद

संयुक्त किर्द नोंद

### १. साधी / सरळ किर्दनोंद (Simple Journal Entry) :

साध्या रोजकिर्द मध्ये केवळ दोन खाती प्रभावी होतात. ती म्हणजे एक खाते नावे दुसरे खाते जमा. साध्या रोजकिर्दीच्या नोंदीचे व्यवहार खाली दिले आहेत. खालील उदाहरणावरून रोजकिर्द नोंदी संबंधी प्रक्रिया स्पष्ट होईल.

**उदाहरण –अ**

**रोजकिर्द नोंदीची प्रक्रिया** (Process of Journalising) :

| व्यवहार | दोन प्रभाव | दोन खाती | खात्यांचे प्रकार | लागू होणारे नियम | नावे होणारे खाते | जमा होणारे खाते |
|---|---|---|---|---|---|---|
| १. ₹ १,००,००० ने व्यवसायाची सुरुवात केली | १. रोख रक्कम आली<br>२. मालक लाभ देणारा आहे | रोकड खाते<br>भांडवल खाते | वास्तविक<br>वैयक्तीक | येणारे ते नावे करा<br>देणाऱ्याचे खाते जमा करा | रोकडखाते | भांडवल खाते |
| २. ₹ २०,००० चे संगणक रोख खरेदी केले. | १. संगणक आले<br>२. रोख गेली | संगणक खाते<br>रोकड खाते | वास्तविक खाते<br>वास्तविक खाते | येणारे खाते<br>जाणारे खाते | संगणक खाते | रोकड खाते |
| ३. मजुरीचे दिले ₹ ९,००० | १.मजुरी हा खर्च<br>२. रोख रक्कम गेली. | मजुरी खाते<br>रोकड खाते | नामधारी<br>वास्तविक खाते | खर्च व हानीचे खाते नावे करा.<br>जाणऱ्या रकमेचे खाते जमा करा. | पगार खाते | रोकड खाते |

**उदाहरण – ब :**

**रोजकिर्द नोंद** (Journal entries)

| दिनांक | तपशील | खा.पा. | नावे राशि(₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| १. | रोकड खाते ..................................... नावे.<br>भांडवल खात्याला<br>(रोख रकमेने व्यवसाय सुरु केल्याबद्दल ) | | १,००,००० | १,००,००० |
| २. | संगणक खाते .................................. नावे .<br>रोकड खात्याला<br>(संगणक रोखीने खरेदी केल्याबद्दल ) | | २०,००० | २०,००० |
| ३. | मजुरी खाते..................................... नावे.<br>रोकड खात्याला<br>(मजुरी दिल्याबद्दल ) | | ९,००० | ९,००० |
| | एकूण | | १,२९,००० | १,२९,००० |

**उदाहरण –१**

श्री नरेंद्र जनरल स्टोअर्स यांच्या पुस्तकात खालील व्यवहारांच्या किर्दनोंद करा.

| | | |
|---|---|---|
| २०१९ एप्रिल | १ | श्री. नरेंद्र यांनी रोख रक्कम ₹ ८०,००० ने व्यवसायास सुरवात केली. |
| | ३ | किरण कडून मालाची उधार खरेदी ₹ ४०,००० |
| | ५ | रोख भाडे दिले ₹ २,००० |
| | १० | विकासला उधारीवर माल विकला ₹ ५,५०० |
| | १५ | फर्निचर १८% GST वर रोख खरेदी ₹ ३०,००० |

१८ विकासकडून वाहक धनादेश मिळाला ₹ २५,०००

२१ किरणला देना बँकेचा ₹ २०,००० चा धनादेश दिला

३० पगाराचे दिले ₹ ५,०००

**श्री. नरेंद्र जनरल स्टोअर्स यांची रोजकिर्द**

| तारीख | तपशील | खात्यांचा प्रकार | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|
| २०१९ एप्रिल १ | रोकड खाते ........... नावे<br>भांडवल खात्याला<br>(रोख रक्कम आणून व्यवसायाला प्रारंभ केल्याबद्दल) | वास्तविक खाते<br>वैयक्तीक खाते | | ८०,००० | <br>८०,००० |
| ३ | खरेदी खाते........................ नावे<br>किरणच्या खात्याला<br>(किरणकडून माल उधार खरेदी केल्याबद्दल) | नामधारी खाते<br>वैयक्तीक खाते | | ४०,००० | <br>४०,००० |
| ५ | भाडे खाते ............... नावे<br>रोकड खाते ...............<br>(भाडे दिल्याबद्दल) | नामधारी खाते<br>वैयक्तीक खाते | | २,००० | <br>२,००० |
| १० | विकासचे खाते.......................... नावे<br>विक्री खात्याला<br>(मालाची उधार विक्री केल्याबद्दल) | वैयक्तिक खाते<br>नामधारी खाते | | ५५,००० | <br>५५,००० |
| १५ | फर्निचर खाते ............... नावे<br>सीजीएसटी (प्राप्त) खाते नावे<br>एस.जी. एस् टी (प्राप्त) खाते ............ नावे<br>रोकड खात्याला<br>(१८% GST वर फर्निचर खरेदी केल्याबद्दल) | वास्तविक खाते<br>नामधारी खाते<br>नामधारी खाते<br>वास्तविक खाते | | ३०,०००<br>२,७००<br>२,७०० | <br><br><br>३५,४०० |
| १८ | रोकड खाते ............... नावे<br>विकासच्या खात्याला<br>(विकासकडून वाहक धनादेश मिळाला) | वास्तविक खाते<br>वैयक्तीक खाते | | २५,००० | <br>२५,००० |
| २१ | किरणचे खाते................. नावे<br>देना बँक खात्याला<br>(किरणला चेक दिल्याबददल) | वैयक्तीक खाते<br>वैयक्तीक खाते | | २०,००० | <br>२०,००० |
| ३० | पगार खाते .............. नावे<br>रोकड खात्याला<br>(पगाराबद्दल रोख दिले.) | नामधारी खाते<br>वास्तविक खाते | | ५,००० | <br>५,००० |
| | **एकूण** | | | **२,६२,४००** | **२,६२,४००** |

**स्पष्टीकरणात्मक टिपा :**

१. **१८ एप्रिलची नोंद**

विकासकडून वाहक धनादेश मिळाला वाहक धनादेश मिळाला म्हणजे रोख मिळाली असे मानले जाते. रोख मिळाली वास्तविक खाते व विकास लाभ देणारा.

वैयक्तीक खाते – रोकड खाते नावे आणि विकासचे खाते जमा करण्यात आले.

२. **२१ एप्रिलची नोंद**

₹ २०,००० च्या देना बँकेच्या धनादेशाद्वारे किरणला शोधन करण्यात आले. या ठिकाणी किरण (वैयक्तीक खाते) लाभ घेणारा आहे – त्यामुळे किरणचे खाते नावे व देना बँकेचे खाते जमा केले.

**कसर / अपहार / सूट (Discount) :**

कसर म्हणजे माल विक्रेत्याने खरेदीदाराला दिलेली सवलत / सूट होय.

कसर दोन प्रकारची असते १) व्यापारी कसर २) रोख कसर

१) **व्यापारी कसर (Trade Discount) :** ही कसर मालाच्या किंमत पत्रावर दिली जाते. तसेच ही कसर मालाच्या रोख किंवा उधारी खरेदी / विक्री प्रसंगी दिली जाते. त्याची जमाखर्चाच्या पुस्तकात नोंद होत नाही.

**उदाहरण :** अमरने राकेशकडून ₹ २०,००० किंमतीचा माल १०% व्यापारी कसरीवर खरेदी केला.

**अमरच्या (खरेदीदार) पुस्तकात किर्द नोंद**

| तारीख | तपशील | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष महिना/ दिनांक | खरेदी खाते .......................... नावे<br>राकेशच्या खात्याला<br>(१०% कसरीवर राकेशकडून वस्तू खरेदी केल्याबद्दल ) | | १८,००० | १८,००० |

**विक्रेता राकेशच्या पुस्तकात किर्द नोंद**

| तारीख | तपशील | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| वर्ष महिना/ दिनांक | अमरचे खाते ..................... नावे<br>विक्री खात्याला<br>(अमरला १०% कसरीवर मालाची विक्री केल्याबद्दल) | | १८,००० | १८,००० |

२) **रोख कसर (Cash Discount) :** रकमेचे वेळेवर शोधन करता येण्यासाठी प्रोत्साहन म्हणून दिलेली हि सवलत असते.

कसर हे नामधारी खाते आहे.

विक्रेत्यासाठी रोख कसर ही हानी (loss) असते तर क्रेत्यासाठी लाभ (gain) असतो. लेखापुस्तकात रोख कसरीची स्वतंत्र नोंद केली जाते. रोख कसर ही धनकोसाठी हानी आहे तर क्रेत्यासाठी (ऋणकोसाठी) लाभ आहे. जेव्हा जेव्हा धनकोला पैसे दिले जातात तेव्हा कसर खाते जमा करावे आणि ज्याला रोख रक्कम मिळते तो कसर खाते नावे देतो. व्यापारी कसर वजा केल्यानंतर रोख कसर दिली जाते. रोख कसर लेखांकनाच्या पुस्तकात लिहिली जाते.

रोख कसरीचे दोन प्रकार पडतात .

१) दत्तकसर / दिलेली कसर (Discount Allowed)

२) प्राप्त कसर / मिळालेली कसर (Discount Received)

**उदाहरण १:** कार्तिक कडून ₹ १,९०० रोख मिळाले व त्याला ₹ १०० कसर दिली.

**किर्द नोंद**

| **तारीख** | **तपशील** | **खा. पा.** | **नावे राशि (₹)** | **जमा राशि (₹)** |
|---|---|---|---|---|
| वर्ष महिना/ दिनांक | रोकड खाते ...........................नावे<br>कसर खाते ............................नावे<br>कार्तिकच्या खात्याला<br>(रोख मिळाली व कसर दिल्याबद्दल) | | १,९००<br>१०० | <br><br>२,००० |
| | **एकूण** | | **२,०००** | **२,०००** |

**उदाहरण २:** चंदाला ₹ ९८० रोख दिले व तिच्याकडून ₹ २० कसर मिळाली

**किर्द नोंद**

| **तारीख** | **तपशील** | **खा. पा.** | **नावे राशि (₹)** | **जमा राशि (₹)** |
|---|---|---|---|---|
| वर्ष महिना/ दिनांक | चंदाचे खाते ..................... नावे<br>रोकड खात्याला<br>कसर खात्याला<br>(रोख दिले व कसर मिळाल्याबद्दल) | | १,००० | <br>९८०<br>२० |
| | **एकूण** | | **१,०००** | **१,०००** |

## २) संयुक्त किर्द नोंद (Combined Journal Entry)

अनेक व्यवहारांमध्ये दोनपेक्षा अधिक खाती प्रभावी होतात. अशावेळी रोजकिर्दीत एकच खाते नावे व एकच खाते जमा होईल असे नव्हे.

ज्या किर्दनोंदीमध्ये एकापेक्षा अधिक खाती नावे किंवा एकापेक्षा अधिक खाती 'जमा' किंवा दोन्ही असू शकतात. तेव्हा अशा किर्दनोंदींना संयुक्त किर्दनोंद असे म्हणतात.

अशा प्रकारच्या संयुक्त किर्दनोंदीत.

(i) अनेक खाती नावे केली जातात आणि एक खाते जमा केले जाते.

(ii) एक खाते नावे केले जाते आणि अनेक खाती जमा केली जातात.

(iii) एकापेक्षा अधिक खाती नावे केली जातात. व एकापेक्षा अधिक खाती जमा केली जातात.

**उदाहरण १: साध्या आणि संयुक्त नोंदीचा व्यवहार :**

रोख ₹ १५०,००० , माल ₹ ३०,००० लॅपटॉप ₹ ५०,००० आणून व्यवसायाला सुरवात केली.

| **साधी नोंद** | **संयुक्त नोंद** |
|---|---|
| अ) रोकड खाते ...............नावे १,५०,०००<br>भांडवल खात्याला १५०,००० | रोकड खाते .............नावे १,५०,०००<br>मालसाठा खाते...........नावे ३०,०००<br>लॅपटॉप खाते ............नावे ५०,०००<br>भांडवल खात्याला २,३०,०००<br>(रोख, मालसाठा व लॅपटॉप आणून व्यवसायाला सुरुवात केल्याबद्दल ) |
| ब) मालसाठा खाते ..........नावे ३०,०००<br>भांडवल खात्याला ३०,००० | |
| क) लॅपटॉप खाते ..............नावे ५०,०००<br>भांडवल खात्याला ५०,००० | |

वरील तीनही नोंदीमध्ये भांडवल खाते सामाईकपणे जमा होते. म्हणून त्यांच्या तीन नोंदी करण्याऐवजी त्यांच्याकरिता एक संयुक्त नोंद करता येते.

**उदाहरण २:** किशोरला ₹ ३०,००० किंमतीचा माल विकला, त्याच्याकडून ₹ १०,००० नगदी मिळाले.

| साधी नोंद | संयुक्त नोंद |
|---|---|
| अ) किशोरचे खाते ............नावे ३०,०००<br>विक्री खात्याला ३०,००० | किशोरचे खाते ........नावे २०,०००<br>रोकड खाते .........नावे १०,००० |
| ब) रोकड खाते ................नावे १०,०००<br>किशोरचे खात्याला १०,००० | विक्री खात्याला ३०,०००<br>(किशोरला माल विकला त्याच्याकडून काही रक्कम मिळाली) |

वरील दोन्ही साध्या नोंदीमध्ये किशोरचे खाते नावे ₹ ३०,००० व लगेच ₹१०,००० जमा करण्यात आले. त्याचा परिणाम म्हणून संयुक्त नोंदीमध्ये किशोरचे खाते नावे ₹ २०,००० करण्यात आले आहे.

| | | ₹ | ₹ |
|---|---|---|---|
| **उदाहरण ३:** : मजूरी दिली ₹ ५,००० पगार दिला ₹ २,००० | मजुरी खाते ........नावे | ५,००० | |
| | पगार खाते ...........नावे | २,००० | |
| | रोकड खात्याला | | ७,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| **उदाहरण ४:** कमिशन मिळाले ₹ ७००, लाभांश मिळाला ₹ ५०० | रोकड खाते .........नावे | १,२०० | |
| | कमिशन खात्याला | | ७०० |
| | लाभांश खात्याला | | ५०० |

**उदाहरण –२**

श्री. संकल्प जनरल स्टोअर्स यांच्या पुस्तकात खालील व्यवहारांच्या किर्दनोंदी करा.

२०१९

जुलै १ रोख ₹ १,००,०००, मालसाठा ₹ ५०,०००, व संगणक ₹ ५०,००० व्यवसायात आणून प्रारंभ केला.

४ करिनाकडून ५% व्यापारी कसरीवर ₹ १०,००० चा माल उधारीने खरेदी केला.

१० प्रियांकाला १०% व्यापारी कसरीवर ₹ २०,००० चा माल विकला.

१३ स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये ₹ ५०,००० जमा केले.

१५ ₹ २,००० च्या वस्तू चोरीला गेल्या .

१८ भाडे दिले ₹ ४,०००.

२० प्रियांकाकडून पूर्ण लेखा शोधणार्थ मिळाले ₹ १७,५००

२५ लेखनसामुग्री बद्दल दिले ₹ ८,०००.

**उत्तर :**

**श्री संकल्प जनरल स्टोअर्स यांची रोजकिर्द**

| तारीख | तपशील | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१७<br>जुलै१ | | | | |
| | रोकड खाते ......................................नावे | | १,००,००० | |
| | मालसाठा खाते .................................नावे | | ५०,००० | |
| | संगणक खाते.......................................नावे | | ५०,००० | |
| | भांडवल खात्याला | | | २,००,००० |
| | (वरील संपत्ती आणून व्यवसायाला प्रारंभ केला) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | खरेदी खाते.........................................नावे<br>करीनाच्या खात्याला<br>(५% व्यापारी कसरीवर मालाची उधार खरेदी केल्याबद्दल) | | ९,५०० | ९,५०० |
| १० | प्रियांका खाते .....................................नावे<br>विक्री खात्याला<br>(१०% व्यापारी कसरीवर वस्तूंची उधार विक्री केल्याबद्दल) | | १८,००० | १८,००० |
| १३ | स्टेट बँक ऑफ इंडियाचे खाते............................नावे<br>रोकड खात्याला<br>(स्टेट बँकेत पैसा जमा केल्याबद्दल) | | ५०,००० | ५०,००० |
| १५ | चोरांकडून हानी खाते..................................नावे<br>खरेदी खात्याला / माल नुकसान खात्याला<br>(मालाची चोरी झाल्याबद्दल) | | २,००० | २,००० |
| १८ | भाडे खाते.............................................नावे<br>रोकड खात्याला<br>(भाडे दिल्याबद्दल) | | ४,००० | ४,००० |
| २० | रोकड खाते .......................................नावे<br>कसर खाते .........................................नावे<br>प्रियांकाच्या खात्याला<br>(रोख मिळाल्याबद्दल व कसर दिल्याबद्दल) | | १७,५००<br>५०० | १८,००० |
| २५ | लेखनसामुग्री खाते .................................नावे<br>रोकड खात्याला<br>(लेखनसामुग्रीबद्दल दिले) | | ८,००० | ८,००० |
| | **एकूण** | | **३,०९,५००** | **३,०९,५००** |

**उदाहरण –३**

धान्यविक्रेता श्री. राजकुमार यांच्या पुस्तकात खालील व्यवहारांच्या किर्दनोंदी करा.

२०१९

| | | |
|---|---|---|
| एप्रिल | १ | रोख ₹ २,००,०००, इमारत ₹ २,००,००० व राकेशकडून उधार ₹ ५०,००० घेवून व्यवसायाला सुरवात केली. |
| | ४ | देना बँकेत जमा केले ₹ ५०,०००. |
| | ७ | ब्रिजेशकडून १८% GST ₹ ३०,००० चा संगणक खरेदी केला व धनादेशाने रक्कम दिली. |
| | १० | रोख विक्री ₹ ९०,०००.. |
| | १२ | ५% व्यापारी कसरीवर गणेशला ₹ १०,००० चा माल उधार विकला. |
| | १५ | गणेशने ₹ ९५० च्या वस्तू परत केल्या. |
| | १८ | राजकुमारने वैयक्तीक उपयोगासाठी वस्तू उचलल्या. ₹ १,०००. |
| | २० | टेलीफोन शुल्क ₹ ५०० व टॅक्सी भाडे ₹ २०० दिले. |
| | २२ | वाहतुक खर्चाचे ₹ ५,००० ५% GST ने दिले. |
| | २४ | अंकेक्षक शुल्काबद्दल ₹ ५,००० चा धनादेश दिला. |

२६ १२% GST वर ₹ ७०,०००ची फर्निचरची खरेदी.

२८ १८% GST वर ₹ १,००,०००ची मोटार कारची विक्री केली.

३० कविताला ₹ १५,५०० रोख दिले, तिच्याकडून ₹ ५०० कसर मिळाली.

**उत्तर :** **धान्यविक्रेता श्री राजकुमार यांची रोजकिर्द**

| तारीख | तपशील | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ एप्रिल१ | रोकड खाते नावे<br>इमारत खाते नावे<br>भांडवल खात्याला<br>राकेशच्या कर्ज खात्याला<br>(रोख, इमारत आणि कर्ज घेवून व्यवसायाला प्रारंभ केल्याबद्दल) | | २,५०,०००<br>२,००,००० | <br><br>४,००,०००<br>५०,००० |
| ४ | देना बॅंक खाते नावे<br>रोकड खात्याला<br>(देना बॅंकेत जमा केल्याबद्दल) | | ५०,००० | <br>५०,००० |
| ७ | संगणक खाते नावे<br>Input CGST खाते नावे<br>Input SGST खाते नावे<br>देना बॅंक खात्याला<br>(१८% GST वर संगणक खरेदी केले व धनादेश दिल्याबद्दल) | | ३०,०००<br>२,७००<br>२,७०० | <br><br><br>३५,४०० |
| १० | रोकड खाते नावे<br>विक्री खात्याला<br>(मालाची रोख विक्री केल्याबद्दल) | | ९०,००० | <br>९०,००० |
| १२ | गणेशचे खाते नावे<br>विक्री खात्याला<br>(गणेशला माल उधार विकल्याबद्दल) | | ९,५०० | <br>९,५०० |
| १५ | विक्री परत खाते नावे<br>गणेशच्या खात्याला<br>(गणेशकडून वस्तू परत आल्या बद्दल) | | ९५० | <br>९५० |
| १८ | उचल खाते नावे<br>मालकाने उचललेल्या वस्तू खात्याला<br>(मालकाने वैयक्तीक उपयोगासाठी वस्तू उचलल्याबद्दल) | | १,००० | <br>१,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २० | टेलीफोन खर्च खाते | नावे | | ५०० | |
| | टॅक्सी भाडे खाते | नावे | | २०० | |
| | रोकड खात्याला | | | | ७०० |
| | (टेलीफोन खर्च व टॅक्सी भाडे दिल्याबद्दल) | | | | |
| २२ | वाहतुक खर्च खाते | नावे | | ५,००० | |
| | Input CGST खाते | नावे | | १२५ | |
| | Input SGST खाते | नावे | | १२५ | |
| | रोकड खात्याला | | | | ५,२५० |
| | (५% GST सह वाहतुक खर्च दिल्याबद्दल) | | | | |
| २४ | अंकेक्षण शुल्क खाते | नावे | | ५,००० | |
| | देना बँक खात्याला | | | | ५,००० |
| | (अंकेक्षण शुल्काबद्दल धनादेश दिला.) | | | | |
| २६ | फर्निचर खाते | नावे | | ७०,००० | |
| | Input CGST खाते | नावे | | ४,२०० | |
| | Input SGST खाते | नावे | | ४,२०० | |
| | रोकड खात्याला | | | | ७८,४०० |
| | (१२% GST वर फर्निचर खरेदी केल्याबद्दल) | | | | |
| २८ | रोकडखाते | नावे | | १,१८,००० | |
| | मोटारकार खात्याला | | | | १,००,००० |
| | Output CGST खात्याला | | | | ९,००० |
| | Output SGST खात्याला | | | | ९,००० |
| | (१८ % GST वर मोटारकारची विक्री केल्याबद्दल) | | | | |
| ३० | कविताचे खाते | नावे | | १६,००० | |
| | रोकड खात्याला | | | | १५,५०० |
| | कसर खात्याला | | | | ५०० |
| | (कविताला रोख दिले व तिच्याकडून कसर मिळाल्याबद्दल) | | | | |
| | **एकूण** | | | ८,६०,२०० | ८,६०,२०० |

**कार्य टीपा**

१) ७ एप्रिल २०१९ चा व्यवहार

| | | | |
|---|---|---|---|
| | संगणकाची मूळ किंमत | = | ₹ ३०,००० |
| + | ९% CGST | = | ₹ २,७०० |
| | ९% SGST | = | ₹ २,७०० |
| | एकूण मूल्य | = | ₹ ३५,४०० |

२) २२ एप्रिल २०१९ चा व्यवहार

| | | | |
|---|---|---|---|
| | वाहतुक खर्च | = | ₹ ५,००० |
| + | २.५% CGST | = | ₹ १२५ |
| | २.५% SGST | = | ₹ १२५ |
| | एकूण राशिचे शोधन | = | ₹ ५,२५० |

३) २६ एप्रिल २०१९ चा व्यवहार

| | | | |
|---|---|---|---|
| | फर्निचरची किंमत | = | ₹ ७०,००० |
| + | ६% CGST | = | ₹ ४,२०० |
| | ६% CGST | = | ₹ ४,२०० |
| | एकूण मूल्य | = | ₹ ७८,४०० |

**उदाहरण – ४**

श्रीदेवी मेडीकल स्टोअर्स यांच्या पुस्तकात खालील व्यवहारांच्या किर्दनोंदी करा.

२०१९

ऑगस्ट १ श्रीदेवी यांनी स्वत:चे रोख ₹ ९०,००० , माल साठा ₹ ४०,०००, यंत्र ₹ ७०,००० किमतीचे आणि कोनिकाकडून ₹ ५०,००० उसने वार्षिक १२% दराचे घेवून व्यवसायास सुरुवात केली.

४ १०% व्यापारी कसरीवर माधुरी कडून ₹ ५०,००० च्या वस्तू / माल खरेदी केला.

६ नमुन्याप्रमाणे माल नसल्यामुळे ₹ ४५० चा माधुरीला परत केला.

८ १०% व्यापारी कसरीवर किरणला ₹ ८०,००० किंमतीच्या वस्तू विकल्या आणि तिच्याकडून ५% रोख कसर वजा करुन रोख मिळाले

१३ भाडे दिले ₹ ४,०००.

१७ बजाज लि. कडून २८% GST सह यंत्रसामुग्री खरेदी करुन डेबिट कार्डने ₹ १०,००० दिले.

२० पगारा बद्दल दिले ₹ २७,०००.

२७ १८% GST ने ₹ १,२०,०००चे संगणक खरेदी केले व रक्कम डेबीटकार्डने दिली.

३१ खाजगी उपयोगाकरिता बँकेतून ₹ १०,००० काढले.

उत्तर :

**श्रीदेवी मेडीकल स्टोअर्स ची रोजकिर्द**

| तारीख | तपशील | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ ऑगस्ट१ | | | | |
| | रोकड खाते नावे | | १,४०,००० | |
| | मालसाठा खाते नावे | | ४०,००० | |
| | यंत्र खाते नावे | | ७०,००० | |
| | भांडवल खात्याला | | | २,००,००० |
| | कोनिकाचे कर्ज खात्याला | | | ५०,००० |
| | (रोख, माल, यंत्रसामुग्री व कर्ज घेवून व्यवसायाला प्रारंभ केल्याबद्दल) | | | |
| ४ | खरेदी खाते नावे | | ४५,००० | |
| | माधुरीच्या खात्याला | | | ४५,००० |
| | (१०% व्यापारी कसरीवर माधुरीकडून वस्तूंची उधार खरेदी केल्याबद्दल) | | | |
| ६ | माधुरीचे खाते नावे | | ४५० | |
| | खरेदीपरत खात्याला | | | ४५० |
| | (माधुरीला वस्तू परत केल्याबद्दल) | | | |
| ८ | रोकड खाते नावे | | ६८,४०० | |
| | कसर खाते नावे | | ३,६०० | |
| | विक्री खात्याला | | | ७२,००० |
| | ( १०% कसरीवर वस्तूंची रोख विक्री व ५% रोख कसर व रक्कम दिल्याबद्दल) | | | |
| १३ | भाडे खाते नावे | | ४,००० | |
| | रोकड खात्याला | | | ४,००० |
| | (भाडे दिल्याबद्दल) | | | |
| १७ | यंत्र खाते नावे | | १,००,००० | |
| | Input CGST खाते नावे | | १४,००० | |
| | Input SGST खाते नावे | | १४,००० | |
| | बँक खात्याला | | | १,२८,००० |
| | (२८% GST सह यंत्र खरेदी करून Debit cardद्वारे शोधन केल्याबद्दल) | | | |
| २० | पगार खाते नावे | | २७,००० | |
| | रोकड खात्याला | | | २७,००० |
| | (पगार रोख दिल्याबद्दल) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७ | संगणक खाते नावे<br>Input CGST खाते नावे<br>Input SGST खाते नावे<br>बँक खात्याला<br>(१८% GST सह संगणक खरेदी केले व धनादेश दिल्याबद्दल) | | १,२०,०००<br>१०,८००<br>१०,८०० | <br><br><br>१,४१,६०० |
| ३१ | उचल खाते नावे<br>बँक खात्याला<br>(खाजगी उपयोगाकरिता बँकेतून काढल्याबद्दल) | | १०,००० | <br>१०,००० |
| | **एकूण** | | ६,७८,०५० | ६,७८,०५० |

**उदाहरण – ५**

विशाल इलेक्ट्रॉनिक्स च्या पुस्तकात खालील व्यवहारांच्या किर्द नोंदी करा.

२०१८

| | | |
|---|---|---|
| एप्रिल | १ | रोख ₹ ९०,०००, उपस्कर ₹ ६०,००० इमारत ₹ १,००,००० ची आणून विशालने व्यवसायाला सुरवात केली. |
| | ४ | १८ % GST सह होंडा कंपनीकडून मोटारकार खरेदी केली व चेक ₹ ५५,००० चा दिला. |
| | ५ | युनायटेड इंडिया इंशुरन्स कंपनीला वरील मोटारकारची विमा प्रव्याजी दिली ₹ ३,००० |
| | १० | स्टेट बँक ऑफ इंडियात जमा केले ₹ ४०,०००. |
| | १२ | पगाराबद्दल दिले ₹ १०,००० भाड्याबद्दल दिले ₹ ३,००० |
| | १५ | राजेशकडून ₹ ८०,००० चा माल आणला आणि लगेच १/४ रक्कम रोख दिली. |
| | १८ | ५% GST सह रोख विक्री ₹ ६०,००० |
| | २० | ₹ १,००० भाडे मिळाले व ₹ ४,००० कमिशन मिळाले. |
| | २५ | दुरध्वनी शुल्क दिले ₹ १,५००. |
| | २७ | कॅटरिनाला ५% GST सह ₹ ७५,००० चा माल पाठविला. |
| | २९ | सुनीताने ५% GST सह ₹ ४५,००० माल घेतला. |
| | ३० | SBI च्या डेबीटकार्ड द्वारे लेखन सामुग्रीचे ₹ १७,००० शोधन केले. |

उत्तर :

**विशाल इलेक्ट्रॉनिक्सची रोजकिर्द**

| तारीख | तपशील | | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | | |
| एप्रिल १ | रोकड खाते | नावे | | ९०,००० | |
| | उपस्कर खाते | नावे | | ६०,००० | |
| | इमारत खाते | नावे | | १,००,००० | |
| | भांडवल खात्याला | | | | २,५०,००० |
| | (रोख, फर्निचर आणि इमारत आणून व्यवसायाला प्रारंभ केल्याबद्दल ) | | | | |
| ४ | मोटारकार खाते | नावे | | ५५,००० | |
| | Input CGST खाते | नावे | | ४,९५० | |
| | Input SGST खाते | नावे | | ४,९५० | |
| | रोकड खात्याला | | | | ६४,९०० |
| | (१८% GST सह मोटारकार खरेदी केल्याबद्दल) | | | | |
| ५ | विमाप्रव्याजी खाते | नावे | | ३,००० | |
| | रोकड खात्याला | | | | ३,००० |
| | (मोटाकारवरील विमा प्रव्याजी दिल्याबद्दल) | | | | |
| १० | स्टेट बँक ऑफ इंडिया खाते | नावे | | ४०,००० | |
| | रोकड खात्याला | | | | ४०,००० |
| | (स्टेट बँकेत जमा केल्याबद्दल) | | | | |
| १२ | पगार खाते | नावे | | १०,००० | |
| | भाडे खाते | नावे | | ३,००० | |
| | रोकड खात्याला | | | | १३,००० |
| | (पगार व भाडे रोख दिल्याबद्दल) | | | | |
| १५ | खरेदी खाते | नावे | | ८०,००० | |
| | राजेशच्या खात्याला | | | | ६०,००० |
| | रोकड खात्याला | | | | २०,००० |
| | (माल खरेदी केला व १/४ रक्कम रोख दिल्याबद्दल) | | | | |
| १८ | रोकड खाते | नावे | | ६३,००० | |
| | विक्रीखात्याला | | | | ६०,००० |
| | Output CGST खात्याला | | | | १,५०० |
| | Output SGST खात्याला | | | | १,५०० |
| | (५% GST सह मालाची विक्री केल्याबद्दल) | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | रोकड खाते नावे<br>भाडे खात्याला<br>कमिशन खात्याला<br>(भाडे व कमिशन मिळाल्याबद्दल) | | ५,००० | <br>१,०००<br>४,००० |
| २५ | दुरध्वनी शुल्क खाते नावे<br>रोकड खात्याला<br>(दुरध्वनी शुल्क दिल्याबद्दल) | | १,५०० | <br>१,५०० |
| २७ | रोकड खाते नावे<br>विक्रीखात्याला<br>Output CGST खात्याला<br>Output SGST खात्याला<br>(५% GST सह मालाची विक्री केल्याबद्दल ) | | ७८,७५० | <br>७५,०००<br>१,८७५<br>१,८७५ |
| २९ | सुनीताचे खाते नावे<br>विक्री खात्याला<br>Output CGST खात्याला<br>Output SGST खात्याला<br>(५% GST सह सुनीताला माल उधार विकल्याबद्दल) | | ४७,२५० | <br>४५,०००<br>१,१२५<br>१,१२५ |
| ३० | लेखनसामुग्री खाते नावे<br>स्टेट बँक ऑफ इंडिया खात्याला<br>(डेबीट कार्ड ने लेखनसामुग्री खरेदी केल्याबद्दल) | | १७,००० | <br>१७,००० |
| | **एकूण** | | **६,६७,४००** | **६,६७,४००** |

**उदाहरण – ६**

श्री राजवाडे ट्रेनिंग कंपनीच्या पुस्तकात खालील व्यवहारांच्या किर्द नोंदी करा.

२०१९

| | | |
|---|---|---|
| मे | १ | रोख ₹ १,००,०००, बँक शिल्लक ₹ २,००,००० व इमारत ₹ २,००,००० आणून व्यवसायाला सुरुवात केली. |
| | ३ | १८% GST वर रामकडून ₹ ५०,००० चा मालखरेदी केला. |
| | ५ | १८% GST राकेशला वस्तूंची / मालाची ₹ ७०,००० ची रोख विक्री केली. |
| | ७ | दुरुस्तीबद्दल ₹ ५,००० दिले. |
| | १० | १२%GST वर रणवीर ॲन्ड सन्सला माल पुरवठासंबंधीचा ₹ ६०,००० चा आदेश पाठविला. |
| | १५ | ₹ १५,००० मजुरी दिली. |
| | १८ | १२% GST वर मोहनकडून ₹ १,००,००० चा माल खरेदी केला. |
| | २० | वाहतुक खर्चाबद्दल ₹ ७,००० दिले. |
| | २५ | २८% GST सह किशोरकडून ₹ ५०,००० चा माल खरेदी केला व अर्धी रक्कम धनादेशाद्वारे दिली. |
| | ३० | १८% GST सह ₹ ५०,००० चे यंत्र खरेदी करण्यात आले, अर्धी रक्कम लगेचच धनादेशाद्वारे दिली. |
| | ३१ | वैयक्तिक उपयोगासाठी बँकेतून ₹ १०,००० काढले. |

उत्तर :

**राजवाडे ट्रेडिंग कंपनी यांची रोजकिर्द**

| तारीख | तपशील | | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|
| २०१९ मे १ | रोकड खाते | नावे | | १,००,००० | |
| | बँक खाते | नावे | | २,००,००० | |
| | इमारत खाते | नावे | | २,००,००० | |
| | भांडवल खात्याला | | | | ५,००,००० |
| | (वरील संपत्ती आणून व्यवसायाला प्रारंभ केल्याबद्दल) | | | | |
| ३ | खरेदी खाते | नावे | | ५०,००० | |
| | Input CGST खाते | नावे | | ४,५०० | |
| | Input SGST खाते | नावे | | ४,५०० | |
| | रामच्या खात्याला | | | | ५९,००० |
| | (१८% GST सह वस्तूंची खरेदी केल्याबद्दल) | | | | |
| ५ | रोकड खाते | नावे | | ८२,६०० | |
| | विक्री खात्याला | | | | ७०,००० |
| | Output CGST खात्याला | | | | ६,३०० |
| | Output SGST खात्याला | | | | ६,३०० |
| | ( १८% GST वर राकेशला मालाची रोख विक्री केल्याबद्दल) | | | | |
| ७ | दुरुस्ती खाते | नावे | | ५,००० | |
| | रोकड खात्याला | | | | ५,००० |
| | (दुरुस्ती केल्याबद्दल) | | | | |
| १५ | मजुरी खाते | नावे | | १५,००० | |
| | रोकड खात्याला | | | | १५,००० |
| | (मजुरी दिल्याबद्दल) | | | | |
| १८ | खरेदी खाते | नावे | | १,००,००० | |
| | Input CGST खाते | नावे | | ६,००० | |
| | Input SGST खाते | नावे | | ६,००० | |
| | मोहनच्या खात्याला | | | | १,१२,००० |
| | (मोहनकडून १२% GST सह माल उधार खरेदी केला) | | | | |
| २० | वाहतुक खर्च खाते | नावे | | ७,००० | |
| | रोकड खात्याला | | | | ७,००० |
| | (वाहतुक खर्च केल्याबद्दल) | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | खरेदी खाते नावे<br>Input CGST खाते नावे<br>Input SGST खाते नावे<br>किशोरचे खात्याला<br>बँक खात्याला<br>(किशोरकडून माल खरेदी केला व अर्धी रक्कम धनादेशाद्वारे दिल्याबद्दल) | | ५०,०००<br>७,०००<br>७,००० | <br><br><br>३२,०००<br>३२,००० |
| ३० | यंत्र खाते नावे<br>Input CGST खाते नावे<br>Input SGST खाते नावे<br>रोकड खात्याला<br>(१८% GST सह यंत्र खरेदी केल्याबद्दल) | | ५०,०००<br>४,५००<br>४,५०० | <br><br><br>५९,००० |
| ३१ | उचल खाते नावे<br>बँक खात्याला<br>(वैयक्तीक उपयोगासाठी बँकेतून काढल्याबद्दल) | | १०,००० | <br>१०,००० |
| | **एकूण** | | ९,१३,६०० | ९,१३,६०० |

**सूचना :** दिनांक १० मे २०१९ च्या व्यवहाराचा कोणताही आर्थिक परिणाम होत नाही म्हणून रोजकिर्दीत त्याची नोंद होणार नाही.

**उदाहरण –७**

खालील व्यवहारांच्या किर्दनोंदी सानिया इलेक्ट्रॉनिक्स पुणे, यांच्या पुस्तकात करा.

१ एप्रिल २०१९ रोजी खालील खात्यावर नावे शिलका होत्या.

| | |
|---|---|
| बँकेतील रोख शिल्लक | ₹ ५०,०००, |
| विविध ऋणको | ₹ १५,०००, |
| मालसाठा | ₹ ३५,०००, |
| संयंत्र व यंत्र | ₹ १,००,०००, |
| जमा शिलका | |
| धनको (वर्षा) | ₹ १०,००० |
| बँक कर्ज | ₹ ४०,००० |

२०१९

| | | |
|---|---|---|
| एप्रिल | १ | कंगना कडून ₹ ९०,००० चा १२% GST ची आकारणी करून माल खरेदी केला व रक्कम धनादेशाने दिली. |
| | ५ | नेहाला १८% GST सह माल विकण्यात आला ₹३०,००० |
| | १० | संजयला २८% GST सह मालाची विक्री करण्यात आली. त्याबद्दल चेक मिळाला ₹ ५०,००० |
| | १४ | १८% GST सह ₹ ५०,००० माल रोख खरेदी केला त्यावर १० % रोख कसर मिळाली. |
| | १८ | ₹ ८,००० जाहिरातीचे दिले. |
| | २० | ₹ ४०,००० ला घोडा खरेदी केला ₹ २,००० वाहन खर्च दिला. |
| | २२ | ₹ ११,००० छपाई व लेखनसामुग्रीबद्दल दिले. |

२६ १२% GST सह ₹ १३,००० ची अलोकला वस्तूंची रोखविक्री केली, त्याच्याकडून १०% रोख कसर मिळाली.

२८ बुडीत कर्ज म्हणून अपलेखीत केलेले ₹ १,००० वर्षाकडून प्राप्त झाले.

३० ₹ ५,००० चा नमूना म्हणून मोफत माल वाटला.

**उत्तर :**

**सानिया इलेक्ट्रॉनिक्स यांची रोजकिर्द**

| तारीख | तपशील | | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | | |
| एप्रिल १ | बँक खाते | नावे. | | ५०,००० | |
| | विविध ऋणकोचे खाते | नावे. | | १५,००० | |
| | मालसाठा खाते | नावे. | | ३५,००० | |
| | संयंत्र व यंत्र खाते | नावे. | | १,००,००० | |
| | वर्षाच्या खात्याला | | | | १०,००० |
| | बँक कर्ज खात्याला | | | | ४०,००० |
| | भांडवल खात्याला | | | | १,५०,००० |
| | (मागील वर्षाच्या शिलका पुढे आणल्याबद्दल) | | | | |
| १ | खरेदी खाते | नावे. | | ९०,००० | |
| | Input CGST खाते | नावे. | | ५,४०० | |
| | Input SGST खाते | नावे. | | ५,४०० | |
| | बँक खात्याला | | | | १,००,८०० |
| | (१०% व्यापारी कसरीवर १२% GST सह माल खरेदी करून धनादेश दिल्याबद्दल) | | | | |
| ५ | नेहाचे खाते | नावे. | | ५५,४०० | |
| | विक्री खात्याला | | | | ५०,००० |
| | Output CGST खात्याला | | | | २,७०० |
| | Output SGST खात्याला | | | | २,७०० |
| | (नेहाला १८% GST सह माल विकल्याबद्दल) | | | | |
| १० | बँक खाते | नावे. | | ६४,००० | |
| | विक्री खात्याला | | | | ५०,००० |
| | Output CGST खाते | | | | ७,००० |
| | Output SGST खाते | | | | ७,००० |
| | (२८% GST सह मालाची विक्री करून धनादेश मिळाल्याबद्दल) | | | | |
| १४ | खरेदी खाते | नावे. | | ५०,००० | |
| | Input CGST खाते | नावे. | | ४,५०० | |
| | Input SGST खाते | नावे. | | ४,५०० | |
| | रोकड खात्याला | | | | ५४,००० |
| | कसर खात्याला | | | | ५,००० |
| | (१८% GST सह वस्तू रोख खरेदी केल्या व १०% रोख कसर मिळाल्याबद्दल) | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | जाहिरात खाते नावे<br>रोकड खात्याला<br>(जाहिरात खर्च केल्याबद्‌दल) | | ८,००० | ८,००० |
| २० | पशुधनखाते नावे<br>रोकड खात्याला<br>(पशुधन खरेदी केले व त्यावर वाहतूक खर्च केल्याबद्‌दल) | | ४२,००० | ४२,००० |
| २२ | छपाई व लेखनसामुग्री खर्च खाते नावे<br>रोकड खात्याला<br>(छपाई व लेखनसामुग्री दिली) | | ११,००० | ११,००० |
| २६ | रोकड खाते नावे<br>कसर खाते नावे<br>विक्री खात्याला<br>Output CGST खात्याला<br>Output SGST खात्याला<br>(अलोकला १२ % GST सह माल विकला व त्याला १०% कसर दिल्याबद्‌दल) | | १३,२६०<br>१,३०० | १३,०००<br>७८०<br>७८० |
| २८ | रोकड खाते नावे<br>बुडीत कर्ज अपलेखित खात्याला<br>(अपलेखीत झालेले बुडीत कर्ज मिळाल्याबद्‌दल) | | १,००० | १,००० |
| ३० | जाहिरात खाते नावे<br>मोफत नमुना वस्तू खात्याला<br>(मोफत नमुना वस्तू वाटल्याबद्‌दल) | | ५,००० | ५,००० |
| | **एकूण** | | **५,६०,७६०** | **५,६०,७६०** |

**दि. २६ एप्रिल च्या नोंदीचे स्पष्टीकरण** ₹

| | | |
|---|---|---|
| १) | मालाची किंमत | १३,००० |
| | + ६% CGST | ७८० |
| | + ६% SGST | ७८० |
| | एकूण मुल्य | १४,५६० |
| | – १३,००० वर १०% कसर | – १,३०० |
| | रोख प्राप्त | १३,२६० |

**उदाहरण –८**

रेमंड यांच्या खालील व्यवहारांची किर्दनोंदी करा.

२०१९

एप्रिल १ ५% व्यापारी कसर व १८% GST ने ₹ २,००,००० चा काजलकडून माल खरेदी केला. त्यातील १/२ रक्कम धनादेशाद्वारे दिली.

४ महिन्द्रा कंपनीचे ₹ ६०,००० चे भाग खरेदी केले व दलाली ₹ १,००० दिली.

९ १०% व्यापारी कसर व १८% GST ने ₹ ६०,००० चा रविकांतला माल विकला.त्यातील १/३ रक्कम रोख मिळाली व त्याला ५% रोख कसर दिली.

१० मालकाच्या मुलाची कॉलेजची फी दिली ₹ १,०००.

१२ १८% GST ने ₹ ५०,००० चा संगणक खरेदी केला.

१५ वरील संगणकासाठी वाहतुक खर्च केला ₹ २,०००.

२० ₹ १५,००० पगार दिला.

२६ ₹ ५,००० भाडे दिले व ₹ १५,००० ची जाहिरात दिली.

२७ १८% GST सह सलमानला ₹ २०,००० चा माल विकला.

३० १२% GST सह माल खरेदी केला व त्याबद्दलचा धनादेश दिला. ₹ १,००,०००

३० ₹ २०,००० मजुरीचे देय आहे.

**उत्तर :**

**श्री रेमन्डच्या पुस्तकात रोजकिर्द नोंदी**

| तारीख | तपशील | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१९<br>एप्रिल १ | खरेदी खाते नावे<br>Input CGST खाते नावे<br>Input SGST खाते नावे<br>बँक खाते<br>काजलच्या खात्यात<br>(५% व्यापारी कसरीवर व ८% GST वर माल खरेदी करून अर्धी राशि चेकद्वारे दिली) | | १,९०,०००<br>१७,१००<br>१७,१०० | <br><br><br>१,१२,१००<br>१,१२,१०० |
| ४ | महिंद्र कंपनीतील गुंतवणूक खाते नावे<br>बँक खात्याला<br>(दलालीसह महिन्द्रा कंपनीच्या भागात गुंतवणूक केल्याबद्दल) | | ६१,००० | <br>६१,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | रोकड खाते नावे<br>कसर खाते नावे<br>रविकांत चे खाते नावे<br>विक्री खात्याला<br>Output CGST खात्याला<br>Output SGST खात्याला<br>(रविकांत १०% कसरीवर मालाची विक्री करून १८% GST आकारला व १/३ रक्कम मिळाली त्याला ५% रोख कसर दिल्याबद्दल) | | २०,१७८<br>१,०६२<br>४२,४८० | <br><br><br>५४,०००<br>४,८६०<br>४,८६० |
| १० | उचल खाते नावे<br>रोकड खाते<br>(मालकाच्या मुलाच्या कॉलेजची फी भरण्याबद्दल) | | १,००० | <br>१,००० |
| १२ | संगणक खाते नावे<br>Input CGST खाते नावे<br>Input SGST खाते नावे<br>रोकड खात्याला<br>( १८% GST सह संगणक खरेदी केल्याबद्दल) | | ५०,०००<br>४,५००<br>४,५०० | <br><br><br>५९,००० |
| १५ | संगणक खाते नावे<br>रोकड खात्याला<br>(संगणकावर वाहतुक खर्च ) | | २,००० | <br>२,००० |
| २० | पगार खाते नावे<br>रोकड खात्याला<br>(पगाराचे दिल्याबद्दल) | | १५,००० | <br>१५,००० |
| २६ | भाडे खाते नावे<br>जाहिरात खाते नावे<br>रोकड खात्याला<br>(भाडे व जाहिरातीवर खर्च केल्याबद्दल) | | ५,०००<br>१५,००० | <br><br>२०,००० |
| २७ | सलमानाचे खाते नावे<br>विक्री खात्याला<br>Output CGST खात्याला<br>Output SGST खात्याला<br>(सलमानला १८% GST सह मालाची विक्री केल्याबद्दल) | | २३,६०० | <br>२०,०००<br>१,८००<br>१,८०० |
| ३० | खरेदी खाते नावे<br>Input CGST खाते नावे<br>Input SGST खाते नावे<br>बँक खात्याला<br>(१२% GST सह माल खरेदी केला व धनादेशाने शोधन केल्याबद्दल) | | १,००,०००<br>६,०००<br>६,००० | <br><br><br>१,१२,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | मजुरी खाते नावे.<br>देय मजुरी खात्याला<br>(मजुरी देय झाल्याबद्दल) | | २०,००० | २०,००० |
| | **एकूण** | | **६,०१,५२०** | **६,०१,५२०** |

**विश्लेषणात्मक कार्य टिप**

१) एप्रिल ९ ची किर्द नोंद

अ)

| | | | |
|---|---|---|---|
| बीजकातील किंमत | = | ₹ | ६०,००० |
| वजा १०% व्यापारी कसर | = – | ₹ | ६,००० |
| वस्तूंची किंमत | | ₹ | ५४,००० |
| + ९% CGST | + | ₹ | ४,८६० |
| + ९%SGST | + | ₹ | ४,८६० |
| एकूण किंमत | | ₹ | ६३,७२० |

| | | (१/३) | (२/३) |
|---|---|---|---|
| | | ₹ २१,२४० | ₹ ४२,४८० |
| – ५% कसर | = | – ₹ १,०६२ | |
| रोख मिळाले | = | ₹ २०,१७८ | |



**कृती करा – Activity :**

१) पॉकेटमधून खर्च होणाऱ्या पैशाच्या व्यवहारांच्या आधारे दहा व्यवहारांची GST सह बीजके मिळवा व रोजकिर्द तयार करा.

२) एका महिन्यातील तुमचे घर अथवा कुटुंबाची रोजकिर्द तयार करा.

३) घरगुती वापराच्या वस्तूंचे १० संगणकीय बिले गोळा करून त्या आधारे रोजकिर्द तयार करा.

४) सी. ए. कार्यालयाला भेट देवून लेखांकनांच्या विविध पद्धतीची माहिती मिळवा.

## स्वाध्याय

### प्र. १ वस्तूनिष्ठ प्रश्न :

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) रोजकिर्द म्हणजे काय?

२) स्पष्टीकरण म्हणजे काय?

३) GST (जी. एस.टी.) म्हणजे काय ?

४) केंद्र सरकारने भारतात जी. एस. टी. कोणत्या वर्षी लागू केला?

५) साधी नोंद (साधारण नोंद) चा अर्थ स्पष्ट करा?

६) मिश्र नोंद चा अर्थ स्पष्ट करा?

७) जर डेबीट कार्ड द्वारे भाडे दिले तर कोणते खाते नावे होईल?

८) कोणती कसर खाते पुस्तकात नोंदवीली जात नाही?

९) कोणत्या क्रमाने मासिक व्यवहारा हे रोजकिर्दीमध्ये नोंदविले जातात?

१०) कोणते खाते जमा करण्यात येईल जेव्हा माल हा उधारीवर विकण्यात आला असेल?

### प्र.२ खालील विधानासाठी एक शब्द / शब्द समूह सूचवा.:

१) मूळ नोंदीचे पुस्तक.

२) एक कर जो ''वस्तू व सेवा'' यावर केंद्र सरकारकडून लावण्यात येतो.

३) नोंदीचे संक्षिप्त स्पष्टीकरण.

४) रोजकिर्दीत व्यवहार नोंदविण्याची क्रिया.

५) कोणत्या फ्रेंच शब्दापासून Journal हा शब्द बनला आहे.

६) अशी कसर ज्याने त्वरीत येणे (उधारी) मिळते.

७) एका पेक्षा जास्त खाते नावे किंवा जमा होणारी नोंद.

८) व्यवसायातून व्यवसाय मालकाने स्वत:च्या उपयोगासाठी घेतलेली कोणतीही रक्कम / माल.

९) मालाच्या खरेदीवर सरकारला देण्यात येणारा कर.

१०) खाते वहितील पानावरील क्रमांक

### प्र.३ योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१) --------- म्हणजे रोजकिर्दीत नोंदविण्यात आलेल्या व्यवहाराचे संक्षिप्त विवेचन होय.

अ) स्पष्टीकरण ब) रोजकिर्दयन क) खतावणी ड) बेरीज

२) --------- कसर ही खातेवहीत नोंदविण्यात येत नाही.

अ) व्यापार ब) रोख क) GST ड) VAT

३) रोजकिर्दीत व्यवहार नोंदविण्याला म्हणतात. ------

अ) खतावणी ब) रोजकिर्दयण क) स्पष्टीकरण ड) मुळ नोंद

४) प्रत्येक रोजकिर्द नोंदीला आवश्यक असते. ------

अ) बेरीज ब) खतावणी क) स्पष्टीकरण ड) रोजकिर्दयन

५) रोजकिर्द मधील --------- हा रकाना रोजकिर्दयन करतावेळी कोरा सोडण्यात येतो.

अ) दिनांक ब) विवरण क) खा.पा.क्र ड) रक्कम

६) उधारीवर मालाची विक्री केल्यास ............ नावे होते.
अ) खरेदी खाते ब) लाभ घेणाऱ्याचे खाते क) विक्री खाते ड) रोख खाते
७) यंत्रसामुग्री बसविण्यासाठी देण्यात येणारी मजूरी ही ........ नावे करण्यात येते.
अ) मजूरी खाते ब) फर्निचर खाते क) रोख खाते ड) स्थापना खाते
८) दलालाला दिलेली दलाली ही .........या खात्यात नावे केली जाते.
अ) उचल खाते ब) रोख जाते क) दलाली खाते ड) दलालाचे खाते.
९) देना बँकेतून घेतलेले कर्ज ....... खात्यात जमा करण्यात येते.
अ)भांडवल खाते ब) देना बँक खाते क) रोख खाते ड) देना बँक कर्ज खाते.
१०) प्राण्यांची रोखीने खरेदी केली तर ..............हे खाते नावे होईल.
अ) पशुधन खाते ब) माल खाते क) रोख खाते ड) बँक खाते.

## प्र.४ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण सांगा.

१) प्रत्येक नोंदीसाठी स्पष्टीकरणाची आवश्यकता नसते.
२) रोजकिर्दीत सर्व व्यवहारांच्या नोंदी करण्याकरिता बीजकाची गरज असते.
३) रोख कसर ही कसर खात्यात नावे करण्यात येते.
४) रोजकिर्द हे मूळ नोंदीचे पुस्तक आहे.
५) व्यापारी कसर खातेवहीत नोंदविण्यात येते.
६) चोरीने मालाचे नुकसान ही माल खात्यात नावे करण्यात येते.
७) जर घरमालककाला भाडे दिले तर घरमालकाचे खाते नावे होईल.
८) पैशाच्या स्वरुपातील आणि पैशाच्या स्वरुपातील नसलेले व्यवहार पुस्तपालनात नोंदवितात.
९) मालकाद्वारे उचलमुळे त्याच्या भांडवलात वाढ होते.
१०) मालाच्या खरेदीवर GST दिला तर आगम कर खाते नावे होईल.

## प्र.५ रिकाम्या जागा भरा.

१) प्रथम नोंदीचे पुस्तक .........याला म्हणतात.
२) रोजकिर्दमध्ये व्यवहार नोंदविण्याच्या क्रियेला ......
३) रोजकिर्दीत नोंदीचे संक्षिप्त विवेचनाला ...... म्हणतात.
४) ...... कसर खातेवहीत नोंदवित नाहीत.
५) ...... ही सूट ठोक मालाच्या खरेदी किंवा त्वरीत येणे (उधारी) वसूलीसाठी देण्यात येते.
६) प्रत्येक रोजकिर्द नोंदीसाठी ...... देण्यात येते.
७) ...... कसर नेहमी खातेवहीत नोंदविण्यात येते.
८) ...... दस्तऐवज हे प्रत्येक रोजकिर्द नोंदीचे स्त्रोत दस्तऐवज असते ज्याद्वारे रोजकिर्दीत नोंदी नोंदविण्यात येते.
९) धनादेशात ...... पक्षकार असतात.
१०) ...... हे (चेक) धनादेश इतर धनादेशापेक्षा जास्त सुरक्षित असातात. कारण याचे पैसे बँकेच्या काऊंटवर मिळत नाहीत.

**प्र.६** १) 'कर बिजक' चा नमुना तयार करा.
२) 'पावती' चा नमुना तयार करा.
३) 'रेखांकित धनादेश' चा नमुना तयार करा.
४) 'रोख पावती' चा नमुना तयार करा.

### प्र.७ खालील विधाने दुरुस्त करून पुन्हा लिहा.

१) सर्व व्यावसायिक व्यवहारांच्या नोंदी रोजकिर्दीत होतात.

२) रोख कसर जमाखर्चाच्या पुस्तकात नोंदवत नाही.

३) रोजकिर्द हे दुय्यम नोंदीचे पुस्तक आहे.

४) भारत सरकारकडून GST ची अंमलबजावणी १ जुलै २०१८ पासून झाली.

५) यंत्रसामुग्री खरेदी केल्यास मालकाचे भांडवल कमी होते.

### प्र.८ खालील विधानाशी तुम्ही सहमत आहात की असहमत ते सांगा.

१) प्रत्येक नोंदीसाठी स्पष्टीकरण गरजेचे आहे.

२) GST हा वस्तू आणि विक्री करासाठी आहे.

३) जमाखर्चाच्या पुस्तकात व्यापारी कसर लिहिली जात नाही.

४) यंत्र स्थापनेवरील मजुरी ही मजुरी खात्याच्या नावे बाजूला लिहिली जाते.

५) रोजकिर्दीमध्ये व्यवहार नोंदविण्याच्या प्रक्रियेला रोजकिर्दीयत असे म्हणतात.

### प्र.९ खालील विधाने सोडवा.

१) टाटा आणि कंपनीकडून ₹ २,००,००० मोटारकार खरेदी केली त्यावर १८% GST आकारला. GST ची रक्कम शोधून काढा.

२) ५% GST सह वाहतूक खर्च दिले. CGST & SGST काढा.

३) रंजनकडून ५% GST आणि १०% रोख कसरीवर वस्तू आणल्या ₹ १०,००० रोख कसर काढा.

४) ₹ १,००,००० च्या पूर्ण लेखाशोधनार्थ किरणकडून ₹ ९०,००० चा चेक मिळाला. कसरीचा दर काढा.

५) रामला १०% व्यापारी कसर आणि १०% रोख कसरीवर ₹ १,००,००० चा माल विकला आणि त्याच्याकडून ५०% राशीचा धनादेश मिळाला. मिळालेल्या धनादेशाची रक्कम काढून दाखवा.

### प्र.१० खालील कोष्टक पूर्ण करा.

| अ.क्र. | व्यवहार | नावे राशि | जमा राशि |
|---|---|---|---|
| १) | धनादेशद्वारे आयकर भरला ₹ ५०,००० | ?<br>– | –<br>बँक खाते |
| २) | RTGS च्या माध्यमातून सुनीलकडून ₹ २०,००० मिळाले. | बँक खाते<br>– | –<br>? |
| ३) | संजय नादार झाला त्याच्याकडून ₹ ५०० मिळाले नाहीत. | ?<br>– | –<br>संजय खाते |
| ४) | ₹ १०,००० चा घोडा खरेदी केला. | ?<br>– | –<br>रोकड खाते |
| ५) | मालकाच्या मुदती ठेव खात्यातून वैयक्तिक बँक खात्यात ₹ ५०,००० हस्तांतरीत करण्यात आले. | बँक खाते<br>– | –<br>? |

### १. आनंद मर्चंट यांच्या पुस्तकात खालील व्यवहार नोंदवा.

२०१९

| | | |
|---|---|---|
| एप्रिल | १ | आनंद यांनी ₹ ६०,००० भांडवल आणून व्यवसाय सुरू केला. |
| | ५ | रोखीने ₹ ३०,०००.चा माल खरेदी केला. |
| | ७ | सुरेशला ₹ १०,००० ची मालाची विक्री केली. |
| | १० | गोंविदकडून ₹ ३०,००० किंमतीचे उधारीवर फर्निचर घेतले. |
| | १५ | डेबिटकार्ड द्वारे ₹ ३,००० चे भाडे दिले. |
| | २१ | उर्मिलाकडून उधारीवर ₹ ७०,००० ची मालाची खरेदी केली. |
| | २७ | युनाईटेड ट्रान्सपोर्टला वाहतुक खर्च ₹ १,००० दिला. |
| | ३० | शर्मिलाच्या वतीने उर्मिलाला दिले ₹ २०,००० |

### २. खालील व्यवहार गजानन यांच्या पुस्तकात लिहा.

२०१९

| | | |
|---|---|---|
| मे | ३ | ₹ ९०,००० च्या मालाची खरेदी केली आणि बँकेने त्याचे शोधन केले. |
| | ७ | सतीशला मालाची उधार विक्री केली ₹ ३०,०००. |
| | ९ | टपालखर्चाचे दिले ₹ १०,००० |
| | १२ | मजुरी दिली ₹ १५,०००. |
| | १५ | ₹ ३०,००० चा सतीशकडून धनादेश मिळाला. |
| | २१ | ₹ ५००० लाभांश मिळाला. |
| | २५ | संगणक खरेदी ₹ ४०,००० व त्याचे शोधन धनादेशाद्वारे केले. |
| | २८ | ₹ १०,००० स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये जमा केले. |
| | ३१ | मालाची खरेदी ₹ ४०,००० व शोधन RTGS ने केले. |

### ३. 'अशोक जनरल स्टोअर्स' यांच्या पुस्तकात व्यवहार नोंदवा.

२०१९

| | | |
|---|---|---|
| मे | १ | भरतच्या वतीने रामकडून ₹ ५,००० मिळाले. |
| | ४ | रोखीने मालाची खरेदी ₹ ५५,०००. |
| | ८ | वेतन दिले ₹ ८,०००. |
| | १२ | गणेशकडून मालाची उधार खरेदी ₹ ३०,००० |
| | १७ | श्रीमती नेहाला मालाची उधार विक्री ₹ ६०,००० |
| | २० | यंत्राची खरेदी ₹ ८०,०००, १२% GST ने केली व रक्कम धनादेशाद्वारे दिली. |
| | २५ | एस.जी. ॲन्ड सन्सला धनादेश दिला ₹ ३०,०००. |
| | २८ | गणेशकडून कमिशन मिळाले. ₹ १०,००० |
| | ३० | भाडे दिले ₹ ५०००. |
| | ३१ | डिमॅट च्या माध्यमातून अतुल ॲन्ड कंपनीचे शेअर खरेदी केले ₹ १०,००० . |

## ४. खालील व्यवहार 'संजय जनरल स्टोअर्स' यांच्या पुस्तकात लिहा.

२०१९

जून १ व्यवसाय सुरू केला रोख ₹ ५०,०००, बँक ₹ १,००,०००, माल ₹ ५०,०००.

५ मोहन कडून १०% व्यापारी कसरीवर मालाची उधार खरेदी केली ₹ ८०,०००

९ ५% व्यापारी कसरीवर उर्मिलाला मालाची विक्री केली ₹ ३०,०००.

१२ ₹ ४०,००० देना बँकेत भरले.

१५ ₹ ५,००० किंमतीचा माल मोफत नमुना म्हणून दिला.

२२ ₹ ५,००० आनंदला कमिशन दिले.

२४ उर्मिलाकडून पूर्णशोधनार्थ ₹ २८,००० डेबिट कार्डने मिळाले.

२९ जाहिरातीचे दिले ₹ ९,०००/

३० २८% जी.एस.टी. ने ₹ २०,००० ला लॅपटॉप खरेदी केला व त्याचे शोधन NEFT ने केले.

## ५. खालील व्यवहार 'कुणाल स्टोअर्स' यांच्या पुस्तकात नोंदवा.

२०१८

ऑगस्ट १ राकेशकडून ₹ ९०,००० चा माल १०% व्यापारी कसर व १०% रोख कसरने खरेदी केला. त्यातील १/३ शोधन धनादेशाद्वारे केले.

५ भारतीय स्टेट बँक मध्ये ₹ ६०,००० भरून चालू खाते उघडले.

८ रोखीने खरेदी ₹ ८५,०००.

१० १०% व्यापारी कसरीवर तुषारला मालाची विक्री केली ₹ २०,०००

१२ वेतन दिले ₹ ४,०००.

१६ तुषारकडून माल परत आला ₹ २५०.

१७ वैयक्तीक उपयोगाकरिता ₹ २,००० किंमतीच्या मालाची कुणालने उचल केली.

२० धनादेशाद्वारे ₹ ४०,००० किंमतीच्या लॅपटॉपची खरेदी १८% GST ने केली.

२२ धनादेशाद्वारे भाड्याचे दिले ₹ १५,०००.

२५ रोखीने ₹ २,००,००० किंमतीच्या कारची खरेदी १८% GST ने केली व रक्कम बँकेद्वारे दिली.

२६ नमूना म्हणून मालाचे वाटप ₹ ४,०००.

२८ उधारीवर अमीतकडून मालाची खरेदी ₹ ६०,०००.

३० अमीतला ECS द्वारे दिले ₹ ५८,५००, त्याने कसर दिली ₹ १,५००.

३० ₹ १,००० तोटा सहन करून ₹ ५,००० चा माल विकला.

३१ रोखीची विक्री ₹ २०,०००

## ६. नीना जनरल स्टोअर्स यांच्या पुस्तकात व्यवहार नोंदवा.

२०१८

सप्टेंबर १ राजला ₹ ५०,००० चा माल १०% व्यापारी कसर व १०% रोख कसरीवर विकला, त्यातील ५०% रक्कम धनादेशाने व २०% रोखीने मिळाली.

३ प्रशांतकडून ७.५% व्यापारी कसरीवर ₹ ६०,००० मालाची खरेदी केली. अर्धी रक्कम रोख दिली.

५ ₹ ५५० किंमतीचा माल प्रशांतला परत केला.

७ १०% व्यापारी कसरीवर ₹ ९०,००० किंमतीच्या मालाची रणवीरला उधारीवर विक्री केली.

१२ कमिशन मिळाले ₹ ४,५००.

१५ रणवीरने त्याच्या खात्याच्या पूर्णशोधणार्थ रोख ₹ ८०,००० दिले.

१८ धनादेशाने ₹ ८,००० संगणकाची खरेदी रिलायन्स कंपनीकडून २८% GST ने केली.

२२ मजुरी दिली ₹ १३,०००.

२३ आयुर्विमा हप्ता दिला ₹ १७,०००.

२७ तुषारला ₹ २८,००० किंमतीच्या मालाची विक्री केली व त्याने ₹ १८,००० ताबडतोब दिले.

**७. वरूणच्या पुस्तकात व्यवहार नोंदवा.**

२०१८

ऑक्टो १ वरुणने ₹ ९५,००० ची यंत्रसामुग्री खरेदी केली. त्यावर ₹ ५,००० वाहतूक खर्च दिला.

३ मालाची ₹ १,५०,००० ला खरेदी केली व रक्कम धनादेशाद्वारे दिली.

६ १८% GST ने नागेश ॲन्ड कंपनीकडून ₹ १,८०,००० किंमतीच्या लॅपटॉपची खरेदी केली.

१० बँक ऑफ बडोदा मधे जमा केले ₹ ७०,०००.

१२ भाडे दिले ₹ ४,००० आणि कमिशन दिले ₹ ३,०००.

१५ तुषार ॲन्ड कंपनीकडून १२% GST दराने ₹ १,२०,००० किंमतीच्या मालाची खरेदी केली, त्यापैकी १/२ रक्कम बँकेतून RTGS द्वारे दिली.

१६ मालाची खरेदी केली व ₹ ५०,००० धनादेशाद्वारे दिले.

२० सतीशला ₹ ८०,००० चा १२% GST ने माल पाठविला व राशि धनादेशाने मिळाली.

२५ टेलिफोन बिलाचे दिले ₹ ९०,०००.

२७ श्रीमती वर्षाने ₹ ९०,००० चा १२% व्यापारी कसरीवर आपल्याकडून माल खरेदी केला.

२८ अभिजीत ॲन्ड सन्सकडून ₹ १,५०,००० चा माल १८% GST ने खरेदी केला.

३० १०% रोख कसर मिळवून अभिजीत ॲन्ड सन्स ला पूर्णशोधन केले.

३१. जाहिरातीसाठी ₹ ८,००० आणि दलालीचे ₹ १२,००० दिले.

**८. धोनी ॲटो कार सेंटर' च्या पुस्तकात खालील व्यवहार नोंदवा.**

२०१८

नोव्हें १ ₹ १०० चे १,००० भाग १% दलालीने विकले व बँकेच्या खात्यात राशि जमा झाली.

४ अशिष ॲन्ड कंपनी कडून ₹ २,००,०००. किंमतीच्या मालाची खरेदी केली.

६ ₹ १,५०,०००. किंमतीच्या मालाची विराट ॲन्ड कंपनीला विक्री केली.

८ जाहिराचे बील ₹ ३०,००० टाईम्स ऑफ इंडियाला दिले.

१० छपाई आणि लेखनसामुग्रीचे दिले ₹ ७,०००.

१२ प्रकाश ॲन्ड कंपनीकडून मालाची १८% GST ने ₹ १,५०,००० ची खरेदी केली.

१५ वाहतुक खर्च ₹ १०,००० १२% GST ने दिला.

२० मालाची १८% GST वर विक्रम ॲन्ड सन्स कडून ₹ १,८०,००० ची खरेदी केली. त्यापैकी अर्धी रक्कम त्वरीत दिली.

२५ प्रकाश ॲन्ड सन्सच्या खात्याच्या पूर्णशोधनार्थ १० % रोख कसरीवर दिले.

३० संजयला ₹ ६०,००० ची मालाची विक्री केली.

३१ संजयने ₹ १०,००० चा माल परत केला.

३१ संजय नादार झाल्याने रुपयातले पन्नास पैसे फक्त त्याच्याकडून मिळाले.

### ९. हिरो एंटरप्राईजेस पुणे' यांच्या पुस्तकात खालील व्यवहाराच्या नोंदी करा.

१एप्रिल २०१९ रोजीचे नावे शिल्लक

बँकेतील रोख ₹ ८०,०००, स्कंध ₹ ५५,०००, इमारत ₹ १,५०,०००.

ऋणको : राम ₹ २०,०००,

रहिम ₹ ३०,०००,

१ एप्रिल २०१९ रोजीचे जमा शिल्लक

धनको – स्वप्ना ₹ २०,०००,

रोहित ₹ ३०,०००,

बँक कर्ज ₹ ५०,०००.

२०१९

एप्रिल १ ₹ १,५०,००० किंमतीच्या मालाची १०% व्यापारी कसरीवर प्रशांत ॲन्ड कंपनीकडून खरेदी केली.

४ अमीत शर्मांला ₹ ७०,००० च्या मालाची उधार विक्री वजा १०% व्यापारी कसरीवर केली.

९ २८% GST. ने ₹ २,००,००० किंमतीच्या मालाची रोखीने खरेदी व राशी NEFT ने दिली.

१२ ₹ ९०,००० च्या मालाची आदित्य रॉय ला २८% GST विक्री केली.

१५ भाडे ₹ ५००० आणि वेतन ₹ १८,००० दिले.

१७ मालकाच्या घरभाड्याचे ₹ १२,००० दिले.

२० आदित्य रॉय कडून ९ एप्रिल रोजी खरेदी केलेल्या मालापैकी १/२ माल २०% नफ्यावर २८% GST ने विकला.

२५ मजुरीचे ₹ १५,००० दिले.

२५ ₹ १, ८०,००० चे उपस्कर १२% GST ने खरेदी केले व रक्कम R.T.G.S ने दिली.

२८ जुने उपस्कर ₹ २०,००० चे ₹ १२,००० ला विकले.

३० ₹ १०,००० किंमतीचे भाग ₹ १५,००० ला विकले व राशि धनादेशाने मिळाली.

### १०. १ एप्रिल २०१९ साठी हरभजन ॲन्ड कंपनीच्या पुस्तकात खालील व्यवहार नोंदवा.

१ एप्रिल २०१९

| | | | | |
|---|---|---|---|---|
| हस्तस्थ रोख | ₹ ३५,०००, | ऋणको – | संगीता | ₹ ४०,०००, |
| बँकेतील रोख | ₹ २५,०००, | | वीरू | ₹ ३०,००० |
| उपस्कर | ₹ १,५०,०००, | धनको – | गणेश | ₹ १०,००० |
| लॅपटॉप | ₹१,००,०००, | | गरिमा | ₹४०,००० |
| | | | बँक कर्ज | ₹ ५०,००० |

एप्रिल १ १० % व्यापारी कसरीवर ₹ २,५०,००० किंमतीचा माल १८% GST ने अजयकुमारकडून खरेदी केला, त्यापैकी अर्धी रक्कम त्वरीत रोख दिली.

५ इंफोसिस कंपनीचे भाग ₹ ५०,००० चे खरेदी केले व त्याकरिता ₹ ५०० दलाली दिली.

८ ₹ ९०,००० किंमतीच्या मालाची मिस्टर राज यांना १०% व्यापारी कसरीवर विक्री करण्यात आली तसेच १/३ रक्कम ५% रोख कसरीवर मिळाली.

१२ मालकाच्या घराचे भाडे दिले ₹ ९,००० व ₹ ५,००० कार्यालय भाडे दिले.

१५ १८% GST वर ₹ ६०,००० किंमतीचा लॅपटॉप खरेदी केला व राशि धनादेशाने दिली.

२० वरील लॅपटॉपच्या वाहतूकीचा खर्च ₹ १,००० १८% GST ने दिला.

२५ रामला कमिशन दिले ₹ २०,०००.

२६ टेलिफोनचे दिले ₹ १,०००.

२८ मालकाच्या खाजगी बँक खात्यातील ₹ ४०,००० रक्कम व्यवसायाच्या देना बँकेतील खात्यात हस्तांतरीत केली.

३० धनादेशाद्वारे ₹ १,५०,००० किंमतीचा माल १२% s GST ने खरेदी केला व रक्कम धनादेशाद्वारे दिली.

३० ₹ ३०,००० ची मोटार कार घेतली.



***कृती करा***

१. एका महिन्यातील तुमच्या कुटुंबातील व्यवहारांची रोजकिर्द तयार करा.

२. विविध प्रकारची GST ची बीले गोळा करून दरांची तुलना करा.

३. लेखांकनासाठी लागणारे विविध प्रकारची कागदपत्रे गोळा करा.

# 4 खातेवही / प्रपंजीयन (Ledger)

**अभ्यास घटक**

*४. १ खातेवहीचा अर्थ, व्याख्या आणि महत्व*
*४.२ खातेवहीचा नमुना / स्वरूप*
*४.३ रोजकिर्दीवरून / सहाय्यक पुस्तकावरून खातेवहीत खतावणी (posting) करणे.*
*४.४ खातेवहीतील खात्यांचे संतुलन (Balancing of Ledger Accounts.)*
*४.५ तेरीज तयार करणे (Preparation of Trial Balance.)*

**क्षमता विधाने**

- *विद्यार्थी रोजकिर्दवरून खातेवहीत नोंद करू शकतो.*
- *विद्यार्थी विविध खात्यांचे संतुलन करतो.*
- *विद्यार्थी तेरीजपत्रक तयार करू शकतो.*

**प्रस्तावना (Introduction)**

लेखांकनाच्या प्रक्रियेमध्ये व्यावसायिक व्यवहार त्यांच्या कालक्रमानुसार( chronological order) रोजकिर्दीत नोंदविण्यात येतात. या सर्व व्यवसायिक व्यवहारांची नोंद जमाखर्चाच्या मूळ पुस्तकात करण्यात येते. त्या जमाखर्चाच्या पुस्तकांचे खालील गट (group) पाडण्यात आले आहेत.

**लेखाकर्माची पुस्तके**
**Books of Accounts**

- रोजकिर्द/ सहाय्यक पुस्तके मुळनोंदीचे / प्राथमिक नोंदीचे पुस्तक
- खातेवही (Ledger) दुय्यमनोंदीचे / अंतिम पुस्तक

सर्व व्यावसायिक व्यवहाराच्या नोंदी ह्या रोजकिर्दीत होतात. याची आम्हाला जाणीव असली पाहिजे. जसे संपत्ती, देयता, खर्च, उत्पन्न, रोख उधारी इ. संबंधीचे व्यवहार ठराविक कालावधीनंतर विशिष्ट बाबीवर किती खर्च, उत्पन्न, रोख, उधारी इ. संबंधीचे व्यवहार ठरावीक कालावधीनंतर विशिष्ट बाबीवर किती खर्च झाला हे माहीत करू शकतो, किंवा कोणत्या व्यक्तीला, पक्षाला (Party) किती पैसे देणे आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे रोजकिर्दीवरून सहज मिळू शकणार नाही.

रोजकिर्दीच्या या मर्यादेवरून आम्हाला खातेवहीची गरज भासते. खातेवहीला लेखांकनाचे मुख्यपुस्तक (Principal Book) असे म्हणतात. एकाचवेळी रोजकिर्द व सहाय्यक पुस्तकात व्यवहारांची नोंद करण्यात येते, दुसरीकडे तेच व्यवहार खातेवहीत स्थानांतरित करून संबंधीत खाते उघडले जाते.

## ४.१ खातेवहीचा अर्थ व महत्त्व (Meaning and Importance of Ledger)

### अर्थ आणि व्याख्या (Meaning and Definitions) :

खातेवही हे लेखांकनाचे मुख्य पुस्तक आहे. याला अंतिम नोंदीचे (Final entry) पुस्तक असे देखील म्हणतात. यात सर्व खात्यांच्या माहितीचा गोषवारा असतो. उदा. संपत्ती खाते, देयतेची खाती, भांडवल खाते, उत्पन्नाचे खाते, खर्चाचे खाते इ.

'LEDGER' लेजर हा शब्द **लॅटीन भाषेतील** 'Ledger' या शब्दापासून बनला आहे. त्याचा अर्थ होतो. 'समाविष्ट करणे' To Contain' खातेवही म्हणजे सर्व खात्यांची माहिती ज्यात समाविष्ट आहे. सर्व खाती ज्याठिकाणी एकत्र केली जातात, त्याला खातेवही असे म्हणतात.

१. " एका विशिष्ट कालावधीत व्यवसायात घडलेले व्यवहार हे व्यक्तीशी, संपत्तीशी, खर्चाशी आणि उत्पन्नाशी संबंधीत असतात आणि अशा व्यवहारांचा शुद्ध प्रभाव आणि परिणाम ज्या पुस्तकात मर्यादित आणि संक्षिप्त स्वरुपात दर्शविले जाते अशा पुस्तकाला खातेपुस्तक किंवा लेखापुस्तक असे म्हणतात. – **एस्. पी. जैन, के. एल. नारंग**

२. "लेखांकनाच्या परंपरागत पद्धतीनुसार खातेवही हे एक मोठे पुस्तक आहे. या पुस्तकाच्या प्रत्येक पानावर एक खाते उखडलेले असते म्हणून खातेवही हे व्यवसायाचे मुख्य आणि महत्वाचा पुरावा असतो. तर लेखांकनाच्या आधुनिक संकल्पनेनुसार वेगवेगळ्या खात्यांची यादी एकत्र करून संगणकीय खातेवही तयार केली जाते.'' **– ऑक्सफर्ड डिक्शनरी**

३. " व्यवसायिक संस्थेचे सर्व व्यवहार किंवा इतर लेखांकन घटकांचे वर्गीकरण संपूर्णरित्या किंवा संक्षिप्तपणे, ज्या पुस्तकात समाविष्ट केले जातात त्या पुस्तकाला खातेवही किंवा खाते पुस्तक असे म्हणतात. " **–ई. एल. कोल्हर**

**खातेवहीचे महत्त्व (Importance of Ledger)**

१. खातेवही हे सर्व व्यवहारांच्या माहितीचा गोषवारा आहे. जसे – संपत्ती खाते, देयतेची खाते, उत्पन्नाची खाते, खर्चाचे खाते. इ.

२. पुरवठादारांना कोणत्या कारणास्तव किती रक्कम देणे आहे, कोणत्या ग्राहकाकडून किती रक्कम घेणे आहे, याची किमान खात्री करून घेणे हा पुस्तपालनाचा अंतीम उद्देश आहे. खतावणीच्या या प्रक्रियेमध्ये ऋणको आधि धनकोंच्या खात्यावरून सर्व माहिती व परिणाम त्वरीत उपलब्ध होतात.

३. तेरीजपत्रक तयार करण्यासाठी खातेवहीची गरज असते.

४. विविध संपत्ती व देयतांचे आधारे, व्यवसायाची आर्थिक स्थिती सहज माहित करून घेता येते.

५. खातेवहीतील विभिन्न खात्याच्या आधारे उत्पन्नाची विवरणे तयार करणे शक्य असते.

६. विविध वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी खातेवहीचा उपयोग केला जातो.

७. खातेवहीfत व्यवसायाचा परिणाम दर्शविला जातो, त्यावरून भविष्यातील योजना, अनुमान इ. बाबत उपयोजना करता येतात.

**खातेवहीचे स्वरूप (Contents of Ledger)**

खातेवही हे बंधपुस्तक असून त्यामध्ये अनेक पानांचा समावेश असतो. खातेवहीतील प्रत्येक पानाला अनुक्रमांक असतो. प्रत्येक खात्याला स्वतंत्र पान असते. खाते वहीच्या पान क्रमांकाला 'खतावणी पृष्ठांक' (L.F.)) असे म्हणतात. खाते हे दोन भागात विभागलेले असते. खात्याच्या डाव्या बाजूला नावे बाजू तर उजव्या बाजूला जमा बाजू असे म्हणतात. असे दर्शविण्यासाठी खात्याच्या वरती डाव्याबाजूला संक्षिप्त स्वरुपात (नावे) तर उजव्या बाजूला जमा लिहितात.

प्रत्येक खातेवहीला अनुक्रमणिका असते. अनुक्रमणिका ही आद्याक्षरानुसार तयार केली जाते. खातेवहीतील प्रत्येक खात्याला जो पृष्ठक्रमांक दिलेला असतो तो पृष्ठक्रमांक अनुक्रमणिकेमध्ये त्या संबंधित खात्याच्या नावासमोर लिहिला जातो. त्यामुळे खातेवहीतील असलेले खाते शोधण्यास मदत होते.

खातेवहीच्या दोनही बाजूला चार रकाने असतात ते खालीलप्रमाणे :-

१) **दिनांक (Date) :** या रकान्यात व्यवहाराचा दिनांक लिहिण्यात येतो. वर्ष, महिना, व दिनांक स्पष्टपणे लिहावी.

२) **तपशील / विवरण (Particulars) :** द्विनोंद पद्धतीप्रमाणे या रकान्यात जमा व नावे होणाऱ्या खात्याशी संबंधित विरुद्ध नांव लिहावा, नावे बाजूच्या सुरवातीला चे खाते To तर जमा बाजूला 'ला' By असे लिहावे.

३) **रोजकिर्द पान क्रमांक (J.F.) :** पंजी पृष्ठांक (Folio) म्हणजे पान क्रमांक रोजकिर्दीमध्ये संबंधीत व्यवहाराची नोंद ज्या पानावर केलेली असते. त्या पानाचा क्रमांक या रकान्यात लिहिण्यात येतो.

४) **राशि :** नावे व जमा होणाऱ्या खात्याची रक्कम या रकान्यात लिहिण्यात येते.

## ४.२ खातेवहीचा नमुना (Specimen of Ledger)

**खातेवहीची रचना इंग्रजी 'T' प्रमाणे असते, ती खालीलप्रमाणे :**

..................च्या पुस्तकात

--------चे खाते (खात्याचे नाव)

नावे जमा

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो. पा | राशि(₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |


**विवरणपत्र स्वरुपानुसार खाते** (Specimen of the 'Statement form of an Account')

| दिनांक | तपशील | रो. पा | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) | शिल्लक (₹) | अद्याक्षरे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**तुम्हाला माहित आहे का? ????**

संगणकीय खाते कसे दिसते?

आधुनिक लेखांकनाच्या पद्धतीत व्यवहारांच्या नोंदी करण्यासाठी विविध संगणक प्रणालीचा (softwares) उपयोग करण्यात येतो.



| Orion Computer Repair Company<br>General Ledger<br>Accounts Receivable | | | | |
|---|---|---|---|---|
| Date | Description | P.R. | Debit (₹) | Credit (₹) |
| ९/८/२० १८ | Computer Repair Sales | GJ १ | १८,००० | |

| Orion Computer Repair Company<br>General Ledger<br>Accounts Receivable | | | | |
|---|---|---|---|---|
| Date | Description | P.R. | Debit (₹) | Credit (₹) |
| ९/८/२० १८ | Computer Spare Parts Order | GJ १ | | ७,५०० |
| २५/९/२० १८ | Computer Spare Parts Order | GJ १ | | ६,५०० |
| ३०/९/२० १८ | Closing Outstanding Spare Part Bills | GJ १ | १४,००० | |

### ४.३ रोजकिर्द किंवा सहाय्यक पुस्तकावरून खोतवहीत खतावणी करणे (Posting of entries from Journal/Subsidiary books to Ledger)

व्यवहार जेव्हा होतो तेव्हा त्याची नोंद मुळनोंदीच्या विविध पुस्तकात होते. मुळनोंदीच्या पुस्तकावरून योग्य माहितीची नोंद खातेवहीत करण्यात येते. रोजकिर्द व इतर सहाय्यक पुस्तकातील नोंदी खातेवहीत संबंधित खात्यामध्ये स्थानांतरीत करण्याच्या क्रियेला खतावणी / प्रपंजीयन करणे असे म्हणतात.

नोंद करण्याची प्रक्रिया :

खातेवहीत व्यवहारांच्या नोंदी करण्यासाठी खालील पद्धतीचा अवलंब करावा. :

१) सर्वप्रथम रोजकिर्दीतील नोंदीवरून खातेवही तयार करावी.

२) योग्य नावाने खातेवहीत आवश्यक खाते उघडावे.

३) खातेवहीत खात्याच्या सुरवातीला शिल्लक असल्यास प्रथम ती लिहावी. जसे .शिल्लक खाली आणली किंवा .शिल्लक पुढे नेली.

४) खातेवहीत व्यवहाराची नोंद करतांना सर्वप्रथम व्यवहाराची तारीख दिनांकाच्या रकान्यात लिहावी.

५) रोजकिर्द नोंदीमध्ये जे खाते 'नावे' होत असेल, खातेवहीत खतावणी करतांना त्या खात्याच्या नावे बाजूवर तपशिलाच्या रकान्यात त्या विशिष्ट नोंदीकरिता जे खाते जमा करण्यात आले असेल त्या खात्याचे नाव लिहावे. तसेच रोजकिर्दीमध्ये जे खाते नावे करण्यात आले त्या खात्याचे नांव लिहावे.

खालील उदाहरणाच्या मदतीने व्यवहार खातेवहीत कसा नोंदविता येईल याचा अभ्यास करता येईल

**उदाहरण १**

१) १ जानेवरी २०१८ – सुरुवातीला रोख शिल्लक ₹ १५,०००

२) ५ जानेवारी २०१८ – राजने व्यवसायात गुंतवणूक केली. ₹ १०,००० या व्यवहाराची रोजकिर्दीत नोंद.

या व्यवहाराची रोजकिर्दीत नोंद

२०१८ रोकड खाते ..........................नावे १५,०००

जाने ५ राजच्या भांडवल खात्याला १०,०००

नावे रोख खाते जमा

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो. पा. | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २० १८ | | | | | | | |
| जाने १ | शिल्लक पुढे आणली | | १५,००० | | | | |
| जाने ५ | राजचे भांडवल खाते | | १०,००० | | | | |

नावे राजचे भांडवल खाते जमा

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो. पा. | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २०१८ जाने ५ | रोकड खाते | | १०,००० |

**उदाहरण – २**

**संयुक्त नोंदीची खतावणी**

भाडे दिले ₹ ३,०००

पगार दिला ₹ ५,०००

**संयुक्त रोजकिर्द नोंद :**

| दिनांक | तपशील | रो. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| | भाडे खाते............नावे | - | ३,००० | |
| | पगार खाते...........नावे | - | ५,००० | |
| | रोकड खात्याला | | | ८,००० |
| | (भाडे व पगार दिल्याबद्दल) | | | |

रोजकिर्दीत भाडे खाते आणि पगार विरुद्ध रकमेच्या एकूण रकमेने नावे करण्यात आले. रोकड खाते ₹ ८,००० ने जमा करण्यात आले. दोन विभिन्न खर्च खाते जमा बाजूला लिहिण्यात आले. ज्याची एकूण बेरीज ₹ ८,००० आहे.

या नोंदीत तीन खाती समाविष्ट आहेत. म्हणून तीन खाती उघडावे लागतील.

नावे भाडे खाते जमा

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो. पा. | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ जाने १८ | रोकड खाते | | ३,००० | | | | |

नावे पगार खाते जमा

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो. पा. | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ जाने १८ | रोकड खाते | | ५,००० | | | | |

नावे रोकड खाते जमा

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो. पा. | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २०१८ | | | |
| | | | | जाने १८ | भाडे खाते | | ३,००० |
| | | | | जाने १८ | पगार खाते | | ५,००० |

**उदाहरण ३**

**GST शी संबंधीत संयुक्त नोंदीची खतावणी (Posting of combined entries related to GST)**

Intra State – ₹ ४०,००० च्या वस्तू खरेदी करण्यात आली असून शोधन चेकद्वारे करण्यात आले.

रोजकिर्दीत पान क्र. ५ वर रोजकिर्द नोंद

प्राप्तकर SGST २.५%   प्राप्तकर CGST २.५%   प्राप्तकर IGST ५%

**रोजकिर्द (पान नं. ५)**

| दिनांक | तपशील | | खा.पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|
| २०१८ जाने ३१ | खरेदी खाते | नावे | ११ | ४०,००० | |
| | प्राप्त कर SGST खाते | नावे | १५ | १,००० | |
| | प्राप्त कर CGST खाते | नावे | १६ | १,००० | |
| | बँक खात्याला | | १७ | | ४२,००० |
| | (५% GST सह माल खरेदी केला व चेक दिल्याबद्दल ) | | | | |

**नावे खरेदी खाते (खतावणी पान नं. ११) जमा**

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ जाने ३१ | बँक खाते | ०५ | ४०,००० | | | | |

**नावे प्राप्त SGST खाते (खतावणी पान नं. १५) जमा**

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ जाने ३१ | बँक खाते | ०५ | १,००० | | | | |

नावे                    प्राप्त CGST Account (खतावणी पान नं. १६)                    जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ जाने ३१ | बँक खाते | ०५ | १,००० | | | | |

नावे                    बँक खाते (Bank Account) (खतावणी पान नं. १७)                    जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २०१८ जाने. ३१ | खरेदी खाते | ०५ | ४०,००० |
| | | | | | प्राप्त SGST खाते | ०५ | १,००० |
| | | | | | प्राप्त CGST खाते | ०५ | १,००० |

***तुम्हाला माहीत आहे का?***

वस्तू व सेवा विविध प्रकारच्या असतात. त्याप्रमाणे त्यावर वस्तू व सेवाकराची आकारणी केली जाते.

करदेयता (Tax liability) ही राज्याच्या खरेदी-विक्री वर आकारली जाते. सध्या तीन प्रकारचा GST लागू आहे.

१) SGST- राज्य वस्तू व सेवाकर (State Goods and Service Tax)

२) CGST- केंद्रीय वस्तू व सेवाकर (Central Goods and Service Tax)

३) IGST- सरकारच्या धोरणानुसार विविध (Integrated GST).

✲ शासनाच्या धोरणानुसार वस्तू व सेवा कराचे दर बदलते असू शकतात.

**सहाय्यक लेखा पुस्तकावरून खतावणी**

**१) रोकडवहीवरून खतावणी**

रोख व बँक हे स्वतंत्र रकाने, रोकड खाते व बँक रकान्याची सेवा देतात. तेव्हा खतावणी करताना रोकड खाते व बँक खाते उघडण्याची गरज नसते. रोख पुस्तक हे रोजकिर्दही आहे, तसेच खातेवहीही आहे. जेव्हा रोकड पुस्तकाच्या नावे बाजूला नोंद होते त्याच वेळेला वैयक्तीक खाते, वास्तविक खाते, नामधारी खाते जमा होते. त्याचबरोबर जेव्हा रोकड पुस्तकाच्या जमा बाजूला नोंदी होतात, त्याच नोंदी खातेवहीत नावे बाजूला नोंदवितात .

**लघुरोख पुस्तकावरून खतावणी**

मुख्य रोखपालाने लघुरोखपालास काही रक्कम हस्तांतरीत केल्यास

लघुरोख पुस्तक खाते ....................................................नावे.

रोकड / बँक खात्याला

प्राप्त झालेल्या राशितून लघुरोखपाल विभिन्न प्रकारच्या किरकोळ खर्च करतो. अशा विविध खर्चाच्या रोजकिर्दीत नोंदी करून ठेवतो.

विविध/ प्रत्येक खर्च खाते ..............................................नावे

लघु रोख खात्याला

अशा विविध खर्चाची नोंद रोजकिर्दीत लगेच करण्यात येईल. :

प्रवास आणि वाहतुक खर्च खाते ..........................................नावे.

टपाल खर्च खाते ........................................................नावे.

छपाई व लेखनसामुग्री खाते ..............................................नावे.

विविध खर्च खाते .........................................................नावे.

लघुरोख खात्याला

खतावणी करतांना अशी विविध / प्रत्येक खर्च खात्याला नोंद होईल, तशीच नोंद लघुरोख खात्याला होईल.

**उदाहरण ४**

**खरेदीपुस्तकातील नोंदीची खतावणी करणे**

एका महिन्याच्या खरेदी पुस्तकाची बेरीज ही खरेदी खात्याच्या नावे बाजूला दाखवावी आणि पुरवठादारांच्या खात्याच्या जमा बाजूला दाखवावी.

**खरेदी पुस्तक**

| दिनांक | पुरवठादारांचे नाव | आवक बीजक क्र. | खा. पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८<br>डिसें ५<br>डिसें २१ | <br>मुद्रा स्टोअर्स<br>आकाश कंपनी लि. | | | <br>१५,०००<br>१२,००० |
| | एकूण | | | २७,००० |

**नावे** **खरेदी खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो. पा | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८<br>डिसें ३१ | विविध पुरवठादारांचे खाते (खरेदी पुस्तकावरून) | | २७,००० | | | | |

**नावे** **मुद्रा स्टोअर्सचे खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २०१८<br>डिसें५ | खरेदी खाते | | १५,००० |

**नावे** **आकाश कंपनी खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २०१८<br>डिसें २१ | खरेदी खाते | | १२,००० |

उदाहरण ५

**विक्री पुस्तकातील नोंदीची खतावणी (Posting of entries in Sales Book)**

एका महिन्यातील पुस्तकाची ही विक्री खात्याच्या जमा बाजूला दाखवावी तर प्रत्येक ग्राहकाच्या खात्याच्या नावे बाजूला (debit side) त्याचा परिणाम दर्शवावा.

**विक्री पुस्तक**

| दिनांक | ग्राहकाचे नाव | जावक बिजक क्र | रो. पा | राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८<br>डिसें. १७<br>डिसें. २२ | नरेंद्र<br>देवेद्र | | | २२,०००<br>१८,००० |
| | एकूण | | | ४०,००० |

नावे **विक्री खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २०१८<br>डिसेंबर ३१ | विविध ग्राहकांचे खाते<br>(विक्री पुस्तकावरून ) | | ४०,००० |

नावे **नरेंद्रचे खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८<br>डिसेंबर ७ | विक्री खाते | | २२,००० | | | | |

नावे **देवेंद्रचे खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८<br>डिसें २२ | विक्री खाते. | | १८,००० | | | | |

उदाहरण ६

**खरेदी परत पुस्तकातील नोंदींची खतावणी**

खरेदीच्या पुस्तकाची बेरीज ही खरेदी परत खात्याच्या जमा बाजूला लिहावी, तर प्रत्येक पुरवठादाराचे खाते हे नावे करण्यात यावे.

**खरेदी परत पुस्तक**

| दिनांक | तपशील | नावे पत्र | रो. पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८<br>डिसें ७ | मुद्रा स्टोअर्स | | | २,२०० |
| | एकूण | | | २,२०० |

नावे **खरेदीपरत खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २०१८<br>डिसें ३१ | विविध खाती<br>(ख. परत पुस्तकावरून) | | २,२०० |

नावे **मुद्रा स्टोअर्सचे खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८<br>डिसें ७ | खरेदी परत खाते | | २,२०० | | | | |

**उदाहरण ७**

**विक्री परत पुस्तकातील नोंदीची खतावणी**

महिन्यातील विक्री परत पुस्तकाची बेरीज विक्री परत खात्याच्या नावे बाजूला दाखवावी, तर त्याचा दुसरा परिणाम प्रत्येक ग्राहकाच्या खात्याच्या नावे बाजूला करण्यात यावा. .

**विक्रीपरत पुस्तक**

| दिनांक | ग्राहकांचे खाते | जमापत्र क्र | खा.पा | राशि(₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८<br>डिसें २४ | देवेंद्र | | | ९०० |
| | एकूण | | | ९०० |

नावे **विक्रीपरत खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८<br>डिसें ३१ | विविध खाती<br>(विक्री परत पुस्तकावरून ) | | ९०० | | | | |

नावे **देवेंद्रचे खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २०१८<br>डिसें २४ | विक्री परत खाते | | ९०० |

**मुळ रोजकिर्दीतील नोंदीची खतावणी**

मुळरोजकिर्दीतील नोंदी हया खातेवहीत संबंधीत खात्याला दर्शविण्यात येईल.

**खातेवहीतील खात्यांचे संतुलन**

खातेवहीतील खात्यांच्या दोन्ही बाजूंच्या बेरजा समान करण्याच्या क्रियेला खाते संतुलन असे म्हणतात. मोठी बाजू व लहान बाजू यातील फरक शोधून काढला जातो. आणि तो फरक लहान बाजुला लिहून दोन्ही बाजूच्या बेरजा समान केल्या जातात.

खात्यांच्या शिलका काढण्याची पद्धत

१) नावे व जमा दोन्ही बाजूची बेरीज करा.

२) दोन्ही बाजूतील फरक शोधून काढा.

३) शेवटी नावे बाजूची बेरीज, जमा बाजूच्या बेरजेपेक्षा जास्त असल्यास, फरकाची रक्कम खात्याच्या जमा बाजूला तपशीलाच्या रकान्यात शिल्लक खाली नेली ('By Balance c/d') असे लिहून राशिच्या रकान्यात फरकाची रक्कम लिहावी.

४) त्याचप्रमाणे नावे बाजूच्या बेरजेपेक्षा जमा बाजूची बेरीज जास्त असल्यास येणारा फरक नावे बाजूला तपशीलच्या रकान्यात शिल्लक खाली नेली ('To Balance c/d') असे लिहून राशीच्या रकान्यात फरकाची रक्कम लिहावी.

५) पुढील कालावधीच्या प्रारंभी खातेवहीतील विविध खात्याच्या शेवटच्या .शिलका, प्रारंभीच्या शिलका म्हणून दाखविण्यात येतात. खातेवहीतील नावे बाजूची शेवटची शिल्लक ही खात्याच्या सुरवातीला जमा बाजूला शिल्लक पुढे आणली. ('By Balance b/d') अशा नावाने दाखविण्यात येते.

६) खात्याच्या जमा बाजूवरील शेवटची शिल्लक ही खात्याच्या सुरवातीला नावे बाजूला 'शिल्लक पुढे आणली' ('To Balance b/d') असे लिहून दाखविण्यात यते.

**तुम्हाला हे माहित आहे का? ?**

जर खात्याच्या नावे बाजूची बेरीज जमा बाजूच्या बेरजेपेक्षा जास्त असल्यास खात्यावर नावे शिल्लक (Debit balance) असे म्हणतात. त्याचप्रमाणे ---
-------




## ४.४ विविध खात्यांच्या शिलका काढणे

१. वैयक्तीक खाते

२. वास्तविक खाते

३. नामधारी खाते

**वैयक्तीक खात्याची शिल्लक काढणे**

या खात्यावर नावे शिल्लक, जमा शिल्लक किंवा कोणतीही शिल्लक दिसणार नाही. या खात्याची नावे शिल्लक ऋणको (Debtor) तर जमा शिल्लक धनको (Creditor) दर्शविते पुढील लेखांकन वर्षात या खात्यांच्या शिलका पुढे नेल्या जातात.

**अ) नावे शिल्लक :** जमा बाजूच्या बेरजेपेक्षा, नावे बाजूची जास्त असल्यास, ती नावे शिल्लक दर्शविते.

**उदाहरण ८**

२० १८

फेब्रु १ राघवला माल विकला ₹ ६,०००.

३ राघवकडून रोख मिळाले ₹ ५,४०० त्याला कसर दिली ₹६००.

१७ राघवला माल पाठविला ₹ १४,०००.

२० राघवकडून रोख मिळाले ₹ ६,०००.

**रोजकिर्द नोंद**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८<br>फेब्रु १ | राघवचे खाते नावे<br>विक्री खात्याला<br>(राघवला माल विकल्याबद्दल) | | ६,००० | ६,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | रोकड खाते नावे<br>कसर खाते नावे<br>राघवच्या खात्याला<br>(राघवकडून रोख मिळाले व त्याला कसर दिल्याबद्‌दल) | | ५,४००<br>६०० | ६,००० |
| १७ | राघवचे खाते नावे<br>विक्री खात्याला<br>(राघवला माल विकल्याबद्‌दल) | | १४,००० | १४,००० |
| २० | रोकड खाते नावे<br>राघवच्या खात्याला<br>(राघवकडून रोख मिळाल्याबद्‌दल) | | ६,००० | ६,००० |
| | **एकूण** | | **३२,०००** | **३२,०००** |

**नावे** **राघवचे खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | २०१८ | | | |
| फेब्रु १ | विक्री खाते | | ६,००० | फेब्रु ३ | रोकड खाते | | ५,४०० |
| १७ | विक्री खाते | | १४,००० | ३ | कसर खाते | | ६०० |
| | | | | २० | रोकड खाते | | ६,००० |
| | | | | २८ | शि/खा.ने | | ८,००० |
| | | | २०,००० | | | | २०,००० |
| मार्च १ | शि/ खा. आ | | ८,००० | | | | |

**निष्कर्ष :** राघवच्या खात्याची 'नावे बाकी' आहे म्हणून तो व्यवसायाचा ऋणको आहे.

**ब) जमा शिलका :** नावे बाजूच्या बेरजेपेक्षा, जमा बाजूची, बेरीज जास्त असते. तेव्हा खात्यावर जमाबाकी आहे असे म्हणतात .

**उदाहरण ९**

२० १९

जाने. १ अनुपमकडून माल आणला ₹ ८,०००.

१० अनुपमला माल परत केला ₹ ७००.

२० अनुपमला रोख दिले ₹ ७,०००.

**उत्तर :** **रोजकिर्दनोंद**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१९<br>जाने १ | खरेदी खाते नावे<br>अनुपमच्या खात्याला<br>(अनुपमकडून माल आणल्याबद्‌दल) | | ८,००० | ८,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | अनुपमचे खाते नावे<br>खरेदीपरत खात्यात<br>(वस्तू परत केल्याबद्दल) | | ७०० | ७०० |
| २० | अनुपमचे खाते नावे<br>रोकड खात्याला<br>(अनुपमाला रोख दिल्याबद्दल) | | ७,००० | ७,००० |
| | **एकूण** | | **१५,७००** | **१५,७००** |

**अनुपमच्या खात्यावर वरील नोंदीची खतावणी**

**नावे** **अनुपमचे खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| जाने १० | खरेदी परत खाते | | ७०० | जाने १ | खरेदी खाते | | ८,००० |
| २० | रोकड खाते | | ७,००० | | | | |
| ३१ | शि /खा/ने | | ३०० | | | | |
| | | | ८,००० | | | | ८,००० |
| | | | | फेब्रु १ | शि/खा/आणली | | ३०० |

**निष्कर्श:** अनुपमच्या खात्याची शिल्लक जमाबाकी दर्शविते म्हणजे तो आपला धनको आहे. दुसऱ्या शब्दात वैयक्तीक खात्याची जमाबाकी म्हणजे त्याला रक्कम देणे आहे.

**उदाहरण १०**

अभा व नभा यांच्यात झालेल्या खालील व्यवहारांच्या आधारे अभाच्या पुस्तकात नभाचे खाते आणि नभाच्या पुस्तकात अभाचे खाते तयार करा.

२०१९

सप्टें. १ अभाला, नभाचे देणे आहे ₹ २२,०००.

३ नभाला, अभाकडून रोख मिळाले ₹ १६,०००

९ अभाने, नभाकडून माल आणला ₹ ५,०००.

२० अभाने, नभाला रोख दिले ₹ ६,००० तिच्याकडून ५% कसर मिळाली.

२५ नभाला, अभाकडून वस्तू परत मिळाल्या ₹ ५५०.

३० अभाने ₹ १,५०० नभाला दिले.

**नभाच्या पुस्तकात**

**नावे** **अभाचे खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| सप्टें १ | शि/खा/आ | | २२,००० | सप्टें ३ | रोकड खाते | | १६,००० |
| सप्टें ९ | विक्री खाते | | ५,००० | २० | रोकड खाते | | ५,७०० |
| | | | | २० | कसर खाते | | ३०० |
| | | | | २५ | विक्री परत खाते | | ५५० |
| | | | | ३० | रोकड खाते | | १,५०० |
| | | | | ३० | शि/खा.नेली | | २,९५० |
| | | | २७,००० | | | | २७,००० |
| २०१९ | | | | | | | |
| ऑक्टो १ | शि/खा/ आणली | | २,९५० | | | | |

**अभाच्या पुस्तकात**

**नावे** **नभाचे खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| सप्टें ३ | रोकड खाते | | १६,००० | सप्टे १ | शि/खा/आ. | | २२,००० |
| २० | रोकड खाते | | ५,७०० | ९ | खरेदी खाते | | ५,००० |
| २० | कसर खाते | | ३०० | | | | |
| २५ | विक्री परत खाते | | ५५० | | | | |
| ३० | रोकड खाते | | १,५०० | | | | |
| ३० | शि/खा/ नेली | | २,९५० | | | | |
| | | | २७,००० | | | | २७,००० |
| | | | | २०१९ ऑक्टो १ | शि/खा/आ | | २,९५० |

**निष्कर्ष :** नभाच्या पुस्तकात, अभाच्या खात्याची नावे बाकी आहे. म्हणून ती ऋणको आहे. अभाच्या पुस्तकात, नभाच्या खात्याची जमाबाकी म्हणजे ती धनको आहे.

**वास्तविक खात्यांचे संतुलन**

संपत्ती व मालमत्तेशी संबंधीत खात्यांना वास्तविक खाती असे म्हणतात. उदा. रोकड खाते, फर्निचर खाते, वास्तविक खात्यांची नावे बाकी असते.

**उदाहरण ११**

खालील व्यवहारांच्या किर्दनोंदी करा व फक्त रोकड खाते लिहून दाखवा

२०१९

| | | |
|---|---|---|
| मार्च. | १ | रोकड बाकी ₹ १०,०००. |
| | ६ | माल आणला ₹ २,५००. |
| | ७ | सुधीर कडून रोख मिळाले ₹ ३,०००. |
| | १० | माधुरीला रोख दिले ₹ २,०००. |
| | १२ | रोख विक्री ₹ ७,०००. |
| | २० | भाडे दिले ₹ ३,५००. |

**उत्तर :**

**रोजकिर्द नोंद**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१९ मार्च ६ | खरेदी खाते नावे<br>रोकड खात्याला<br>(माल खरेदी केल्याबद्दल) | | २,५०० | २,५०० |
| ७ | रोकड खाते नावे<br>सुधीरचे खाते<br>(सुधीरकडून रोख मिळाल्याबद्दल) | | ३,००० | ३,००० |
| १० | माधुरीचे खाते नावे<br>रोकड खात्याला<br>(माधुरीला रोख दिल्याबद्दल) | | २,००० | २,००० |
| १२ | रोकड खाते नावे<br>विक्री खात्याला<br>(मालाची रोख विक्री झाल्याबद्दल) | | ७,००० | ७,००० |
| २० | भाडे खाते नावे<br>रोकड खात्याला<br>(भाडे दिल्याबद्दल) | | ३,५०० | ३,५०० |
| | **एकूण** | | **१८,०००** | **१८,०००** |

वरील किर्दनोंदीची फक्त रोकड खात्यात खतावणी दाखविली आहे.

**नावे** **रोकड खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| मार्च १ | शि/खा/ आणली | | १०,००० | मार्च ६ | खरेदी खाते | | २,५०० |
| ७ | सुधीरचे खाते | | ३,००० | १० | माधुरीचे खाते | | २,००० |
| १२ | विक्री खाते | | ७,००० | २० | भाडे खाते | | ३,५०० |
| | | | | ३१ | शि/खा/ नेली | | १२,००० |
| | | | २०,००० | | | | २०,००० |
| एप्रिल १ | शि/खा/ आणली | | १२,००० | | | | |

**निष्कर्ष :** रोकड खाते नावे बाकी दर्शविते. रोकड खात्याची नेहमी नावे बाकी असते. कारण कोणीही शिल्लक असलेल्या रकमेपेक्षा जास्त शोधन करू शकत नाही.

**नामधारी खात्यांचे संतुलन**

खर्च, उत्पन्न, हानि व लाभ इ. च्या खात्यांना नामधारी खाते असे म्हणतात. या खात्यांची नावे व जमा शिल्लक असते. आर्थिक वर्षाच्या शेवटी नामधारी खात्यांच्या शिलका व्यापारी किंवा नफा-तोटा खात्याला स्थानांतरित करतात.

**उदाहरण १२**

२०१९

| | | | |
|---|---|---|---|
| फेब्रु | १ | पगार खाते (नावे बाकी) | ₹ ३०,००० |
| | ५ | पगाराबद्दल चेक दिला | ₹ ५,०००. |
| मार्च | ५ | पगाराबद्दल दिले | ₹ ३,०००. |

**प्रत्येक वर्षी ३१ मार्चला खाते बंद होते.**

**नावे** **पगार खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| फेब्रु १ | शि/खा/ आणली | | ३०,००० | फेब्रु २८ | शि/खा/ नेली | | ३५,००० |
| ५ | बँक खाते | | ५,००० | | | | |
| | | | ३५,००० | | | | ३५,००० |
| मार्च १ | शि/खा/आ | | ३५,००० | मार्च ३१ | नफा-तोटा खाते | | ३८,००० |
| ५ | रोकड खाते | | ३,००० | | | | |
| | | | ३८,००० | | | | ३८,००० |



**कृती १**

साहील लाकडी उपस्कर बनवतो. तो द्विनोंद पद्धतीने त्याची पुस्तके ठेवतो. १ जाने २०१८ रोजी त्याच्या रोकड खात्यावर ₹ ५०,००० ची .शिल्लक होती. ७ जानेवारी २०१८ रोजी त्याने डेकोर मार्ट कडून ₹ ६,००० ची उपस्करची कच्ची सामग्री खरेदी केली. ९-१-२०१८ रोजी त्याने अविनाशला एक खुर्ची ₹ ९,००० ला विकली.

१२-१-२०१८ रोख खरेदी ₹ ४,५०० १५-१-२०१८ रोजी एक स्टडी टेबल ₹ २,५०० ला विकले. २०-१-२०१८ ला डेकोर मार्टला ₹ ४,२०० दिले. २४.१.२०१८ ला अविनाश टेडर्सकडून ₹ ७,००० मिळाले. २८-१-२०१८ ला साफसफाई खर्च केला ₹ ८००.

१-२-२०१८ रोजी डेकोर मार्टला पुर्ण लेखा शोधनार्थ ₹ १,५०० शोधन करण्यात आले. ७-२-२०१८ रोजी अविनाश ट्रेडर्सकडून पूर्ण लेखा शोधणार्थ ₹ १९०० मिळाले. १५-२-२०१८ रोजी पगाराबद्दल दिले ₹ ८०००. २५-२-२०१८ रोजी भाड्याबद्दल दिले ₹ ९०००

वरील माहितीच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१. ३१-१-२०१८ व २८-२-२०१८ रोजी रोकड खात्याची शिल्लक किती होती?
२. ३१-१-२०१८ रोजी कोण ऋणको होते किती रकमेसाठी?
३. २८-२-१०१८ रोजी कोण धनको होते किती रकमेसाठी?
४. २८.२.२० १८ रोजी ऋणको आणि धनको कोण आहेत. ?



**कृती २**

तुमचे किंवा तुमच्या पालकांचे बँकेत खाते आहे. आपण बँकेशी केलेल्या व्यवहारांचे सर्व तपशील बँकेच्या पासबुकात दिलेले असतात. हे पुस्तक नाही पण ग्राहकाचे बँकेत खाते असल्याची ग्राहक पुस्तिका असते. हे एक विशिष्ट नमुन्यात छापलेले संगणकीय खाते असते. बँकेच्या पासबुकात झालेल्या नोंदी वाचण्याचा प्रयत्न करा आणि त्याची खाते नोंदी ओळखा. उदा. बँकेत जमा झालेले धनादेश बँकेतून काढलेली रक्कम, पासबुकाच्या नोंदीतील विवरणा संबंधीचा तपशील सविस्तर वाचून पासबुकात लिहिलेल्या व नोंद झालेले १० व्यवहार लिहून दाखवा.



**कृती ३**

गिरीश हा अनुभव नसलेला लेखापाल आहे. त्याने एक अपूर्ण खाते लिहिले आहे. खातेवहीतील ते खाते तपासा. आणि सुटलेल्या राशी शोधून काढण्यास मदत करा. व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

**मनिषच्या पुस्तकात**

**नावे** **महेश चे खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | २०१८ | | | |
| मार्च १ | शि/खा. आणली | | ६४,००० | मार्च ६ | विक्री परत खाते | | ---?--- |
| ३ | विक्री खाते | | ६०,००० | ९ | खरेदी खाते | | ९,००० |
| ११ | रोकड खाते | | ५,००० | १६ | खरेदी खाते | | ३०,००० |
| २४ | विक्री खाते | | ३१,००० | २२ | रोकड खाते | | २४,००० |
| २५ | खरेदी परत खाते | | ---?--- | २२ | कसर खाते | | ३,००० |
| | | | | | बँक खाते | | ८५,००० |
| | | | | ३ | कसर खाते | | ---?--- |
| | | | १,६२,००० | | | | १,६२,००० |

३ मार्चला ज्या वस्तू महेशला विकल्या त्यापैकी १०% वस्तू / माल त्याने ६ मार्चला परत केल्या.

१) ६ मार्च आणि २५ मार्चला खतावणी केलेला व्यवहार लिहून दाखवा.

२) २२ मार्च व ३१ मार्च ला खतावणी केलेल्या व्यवहाराची रोजकिर्द नोंद करून दाखवा.

३) ३१ मार्चला महेश ऋणको आहे की धनको ते सांगा?

## ४.५ तेरीजपत्रक तयार करणे

### तेरीज

तेरीज म्हणजे विशिष्ट तारखेस व्यापाऱ्याच्या खातेवहीतील सर्व खात्यांची नावे व जमा शिलकांची सुची दर्शविणारे सारांश होय. साधारणपणे ते लेखांकन वर्षाखेरीस तयार केले जाते. ते मासिक, त्रैमासिक अथवा सहामाही / अर्धवार्षीक कालावधी किंवा व्यवसायाच्या गरजेनुसार तयार केली जाते.

### तेरजेचे प्रकार :

(१) **ढोबळ तेरीज :** सध्या या पद्धतीचा वापर करीत नाही. कारण यावरून प्रत्येक खात्याची शिल्लक / स्पष्ट होत नाही. या प्रकारांमध्ये नावे खात्याची राशि नावे बाजूलाच लिहिली जाते व जमा खात्याची राशि जमा बाजूला लिहिली जाते.

(२) **शुद्ध तेरीज :** तेरीज तयार करण्याच्या या पद्धतीत खातेवहीतील खात्यांच्या केवळ शिलका त्यांच्या नावाने दाखविण्यात येतात. जर खात्याची जमा शिल्लक येत असेल तर तेरजेच्या जमा राशीच्या रकान्यात लिहिली जाईल व खात्याची नावे शिल्लक येत असल्यास नावे राशिच्या रकान्यात लिहिली जाईल. तेरीज तयार करण्यासाठी जास्त करून हीच पद्धत वापरली जाते.

### तेरीज तयार करण्याच्या पद्धती :

तेरीज तयार करण्याच्या दोन पद्धती आहेत.

(१) रोजकिर्द प्रारूप (उभी) तेरीज – Vertical or Journal form of Trial Balance

(२) खातेवही प्रारुप (T) तेरीज – Horizontal or Ledger form of Trial Balance

**रोजकिर्द प्रारूप तेरजेचा नमुना**

**...........रोजीची तेरीज (उभा)**

| दिनांक | खात्यांची नावे | रो. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**खातेवही प्रारूप तेरजेचा नमुना**

**..............रोजीची तेरीज – (आडवा)**

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

### तेरजेची उपयोगिता :

१) खातेवहीतील विविध खात्यांच्या शिलका दाखविणे.

२) जमाखर्चाच्या पुस्तकाची अंकगणितीय अचुकता सिद्ध करणे.

३) व्यवसायाची अंतीम खाती तयार करण्यास मदत करणे.

**उदाहरण १३**

खालील व्यवहार रोजकिर्दीत नोंदवा. आवश्यक खाती उघडा, खाते संतुलन करा, आणि ३१ मार्च २०१९ रोजीची तेरीज तयार करा.

२०१९

मार्च १ विराट ने खालील संपत्ती आणून व्यवसायाला सुरुवात केली
रोख ₹ ५०,०००,
बँक ऑफ इंडियामध्ये रोख ₹ ७,०००,
फर्निचर ₹ १०,०००.

३ १०% व्यापारी कसर व ५% रोख कसरीवर रोहीतकडून माल खरेदी केला ₹ १०,०००
७ ५% व्यापारी कसरीवर सुनीलला माल विकला. ₹ ५,०००
१० बँक ऑफ इंडियामध्ये जमा केले ₹ ५,०००.
१२ वर्माकडून उधार फर्निचरची खरेदी ₹ २०,०००.
१५ नेटबँकींगच्या माध्यमाने वर्माला शोधन केले ₹ ८,०००.
१७ छपाई बिलाचे शोधन ₹ २००.
२० कमिशन मिळाले ₹ २००.
२५ बँकेतून ATM ने काढले ₹ १,०००
२८ वर्माला पूर्ण लेखा शोधनार्थ दिले ₹ ११,५००
३० जाहिरातीबद्दल दिले ₹ ५००

**उत्तर :** **विराटच्या पुस्तकात**

| दिनांक | तपशील | रो. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१९<br>मार्च १ | रोकड खाते नावे<br>बँक ऑफ इंडिया खाते नावे<br>उपस्कर खाते नावे<br>विराटच्या भांडवल खात्याला<br>(वरील संपत्ती आणून व्यवसायाला प्रारंभ केल्याबद्दल) | | ५०,०००<br>७,०००<br>१०,००० | ६७,००० |
| ३ | खरेदीखाते नावे<br>रोहीतच्या खात्यात<br>(१०% कसरीवर रोहीतकडून माल खरेदी केल्याबद्दल) | | ९,००० | ९,००० |
| ७ | सुनीलचे खाते नावे<br>विक्री खात्याला<br>(५% कसरीवर सुनीलला वस्तूची विक्री केल्याबद्दल) | | ४,७५० | ४,७५० |
| १० | बँक ऑफ इंडिया खाते नावे<br>रोकड खात्यातून<br>(बँकेत रोख जमा केल्याबद्दल ) | | ५,००० | ५,००० |
| १२ | उपस्कर खाते नावे<br>वर्माच्या खात्याला<br>(वर्माकडून उपस्कर खरेदी केल्याबद्दल) | | २०,००० | २०,००० |
| १५ | वर्माचे खाते नावे<br>बँक खात्याला<br>(वर्माला धनादेश दिल्याबद्दल) | | ८,००० | ८,००० |
| १७ | छपाई खर्च खाते नावे<br>रोकड खात्याला<br>(छपाई खर्च केल्याबद्दल) | | २०० | २०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | रोकड खाते     नावे<br>कमिशन खात्याला<br>(कमिशन मिळाल्याबद्‌दल ) | | २०० | २०० |
| २५ | रोकड खाते     नावे<br>बँक ऑफ इंडिया खात्याला<br>(एटीएम च्या माध्यमातून बँकेतून पैसे काढल्याबद्‌दल) | | १,००० | १,००० |
| २८ | वर्माचे खाते     नावे<br>रोकड खात्याला<br>कसर खात्याला<br>(वर्माला पूर्णलेखा शोधनार्थ दिल्याबद्‌दल) | | १२,००० | ११,५००<br>५०० |
| ३० | जाहिरात खर्च खाते     नावे<br>रोकड खात्याला<br>(जाहिरात खर्च केल्याबद्‌दल) | | ५०० | ५०० |
| | **एकूण** | | **१,२७,६५०** | **१,२७,६५०** |

**विराटची खातेवही**

**नावे**     **विराटचे भांडवल खाते**     **जमा**

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| मार्च ३ १ | शि/खा/ नेली | | ६७,००० | मार्च १ | रोकड खाते | | ५०,००० |
| | | | | १ | बँक ऑफ इंडिया | | ७,००० |
| | | | | | फर्निचर खाते | | |
| | | | | १ | | | १०,००० |
| | | | ६७,००० | | | | ६७,००० |
| | | | | एप्रिल १ | शि/ खा./ आ | | ६७,००० |

**नावे**     **रोकड खाते**     **जमा**

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| मार्च १ | भांडवल खाते | | ५०,००० | मार्च १० | बँक ऑफ इंडिया खाते | | ५,००० |
| २० | कमिशन खाते | | २०० | १७ | छपाई खर्च खाते | | २०० |
| २५ | बँक ऑफ इंडिया खाते | | १,००० | २८ | वर्माचे खाते | | ११,५०० |
| | | | | ३० | जाहिरात खर्च | | ५०० |
| | | | | ३ १ | शि/खा/ नेली | | ३४,००० |
| | | | ५१,२०० | | | | ५ १,२०० |
| एप्रिल १ | शि/खा/ आ | | ३४,००० | | | | |

नावे **बँक ऑफ इंडिया खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| मार्च १ | भांडवल खाते | | ७,००० | मार्च | | | |
| १० | रोकड खाते | | ५,००० | १५ | वर्माचे खाते | | ८,००० |
| | | | | २५ | रोकड खाते | | १,००० |
| | | | | ३१ | शि/खा/ नेली | | ३,००० |
| | | | १२,००० | | | | १२,००० |
| एप्रिल १ | शि/खा/ आ/ | | ३,००० | | | | |

नावे **फर्निचर खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| मार्च १ | भांडवल खाते | | १०,००० | मार्च ३१ | शि/खा/नेली | | ३०,००० |
| १० | वर्माचे खाते | | २०,००० | | | | |
| | | | ३०,००० | | | | ३०,००० |
| एप्रिल १ | शि/खा/ आनली | | ३०,००० | | | | |

नावे **खरेदी खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| मार्च ३ | रोहितचे खाते | | ९,००० | मार्च ३१ | शि/खा/ नेली | | ९,००० |
| | | | ९,००० | | | | ९,००० |
| एप्रिल १ | शि/खा/ आनली | | ९,००० | | | | |

नावे **रोहितचे खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| मार्च ३१ | शि/खा/ ने ली | | ९,००० | मार्च ३ | खरेदी खाते | | ९,००० |
| | | | ९,००० | | | | ९,००० |
| | | | | एप्रिल १ | शि/खा/आ | | ९,००० |

| नावे | | सुनीलचे खाते | | | | | जमा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **दिनांक** | **तपशील** | **रो.पा.** | **राशि (₹)** | **दिनांक** | **तपशील** | **रो.पा.** | **राशि (₹)** |
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| मार्च ७ | विक्री खाते | | ४,७५० | मार्च ३१ | शि/खा/नेली | | ४,७५० |
| | | | ४,७५० | | | | ४,७५० |
| एप्रिल १ | शि/खा/ आ. | | ४,७५० | | | | |

| नावे | | विक्री खाते | | | | | जमा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **दिनांक** | **तपशील** | **रो.पा.** | **राशि (₹)** | **दिनांक** | **तपशील** | **रो.पा.** | **राशि (₹)** |
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| मार्च ३१ | शि/खा/ नेली | | ४,७५० | मार्च ३१ | सुनीलचे खाते | | ४,७५० |
| | | | ४,७५० | | | | ४,७५० |
| | | | | एप्रिल १ | शि/खा/आ | | ४,७५० |

| नावे | | वर्माचे खाते | | | | | जमा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **दिनांक** | **तपशील** | **रो.पा.** | **राशि (₹)** | **दिनांक** | **तपशील** | **रो.पा.** | **राशि (₹)** |
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| मार्च १५ | बँक ऑफ इंडिया | | ८,००० | मार्च १ | फर्निचर खाते | | २०,००० |
| २८ | रोकड खाते | | ११,५०० | | | | |
| २८ | कसर खाते | | ५०० | | | | |
| | | | २०,००० | | | | २०,००० |

| नावे | | छपाई खर्च खाते | | | | | जमा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **दिनांक** | **तपशील** | **रो.पा.** | **राशि (₹)** | **दिनांक** | **तपशील** | **रो.पा.** | **राशि (₹)** |
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| मार्च १ | रोकड खाते | | २०० | मार्च ३१ | शि/ खा/ ने | | २०० |
| | | | २०० | | | | २०० |
| एप्रिल १ | शि/खा/ आ | | २०० | | | | |

| नावे | | कमिशन खाते | | | | | जमा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **दिनांक** | **तपशील** | **रो.पा.** | **राशि (₹)** | **दिनांक** | **तपशील** | **रो.पा.** | **राशि (₹)** |
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| मार्च ३१ | शि/खा/ने | | २०० | मार्च ३१ | रोकड खाते | | २०० |
| | | | २०० | | | | २०० |
| | | | | एप्रिल १ | शि/खा/आ/ | | २०० |

नावे कसर खाते जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| मार्च ३ १ | शि/खा/नेली | | ५०० | मार्च ३ १ | वर्माचे खाते | | ५०० |
| | | | ५०० | | | | ५०० |
| | | | | एप्रिल १ | शि/खा/ आ | | ५०० |

नावे जाहिरात खाते जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| मार्च ३० | रोकड खाते | | ५०० | मार्च ३ १ | शि/खा/ नेली | | ५०० |
| | | | ५०० | | | | ५०० |
| एप्रिल १ | शि/खा/ आ/ | | ५०० | | | | |

**विराटची ३१ मार्च २०१९ रोजीची तेरीज**

| नावे शिलका | राशि (₹) | जमा शिलका | राशि (₹) |
|---|---|---|---|
| रोकड खाते | ३४,००० | विराटचे भांडवल खाते | ६७,००० |
| बँक ऑफ इंडिया खाते | ३,००० | रोहीतचे खाते | ९,००० |
| फर्निचर खाते | ३०,००० | विक्री खाते | ४,७५० |
| खरेदी खाते | ९,००० | कमिशन खाते | २०० |
| सुनीलचे खाते | ४,७५० | कसर खाते | ५०० |
| छपाईखर्च खाते | २०० | | |
| जाहिरात खाते | ५०० | | |
| | ८१,४५० | | ८ १,४५० |

**उदाहरण १४**

१ जानेवरी २०१८ रोजी करणच्या खातेवहीत खालील शिलका दिसून आल्या.

| नावे शिलका | राशि (₹) | जमा शिलका | राशि (₹) |
|---|---|---|---|
| रोकड खाते | ६०,००० | करणचे भांडवल खाते | २,००,००० |
| खरेदी खाते | ८०,००० | विक्री खाते | ४०,००० |
| बँक ऑफ महाराष्ट्रचे खाते | १,००,००० | | |

जाने ५ ऋषीकडून माल आणला ₹ १०,०००.

१० बँकेतून कार्यालयाकरिता काढले ₹ २०,००० व खाजगी उपयोगाकरिता ₹ ६,०००

१७ ऋषीला माल परत केला २,०००.
१९ रोख खरेदी ₹ १४,०००.
२२ रोख विक्री ₹ २०,०००.
२६ बँकेत जमा केले ₹ १६,०००.
२८ बँकेने व्याज जमा केले ₹ ७,०००

**उत्तर :**

**करणची रोजकिर्द**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | |
| जाने १ | खरेदी खाते नावे | | १०,००० | |
| | ऋषीच्या खात्याला | | | १०,००० |
| | (ऋषीकडून माल खरेदी केल्याबद्‌दल) | | | |
| १० | रोकड खाते नावे | | २०,००० | |
| | उचल खाते नावे | | ६,००० | |
| | बँक ऑफ महाराष्ट्र खाते | | | २६,००० |
| | (कार्यालयीन व खाजगी उपयोगासाठी बँकेतून काढल्याबद्‌दल) | | | |
| १७ | ऋषीचे खाते नावे | | २,००० | |
| | खरेदीपरत खात्यात | | | २,००० |
| | (ऋषीला माल परत केल्याबद्‌दल) | | | |
| १९ | खरेदी खाते नावे | | १४,००० | |
| | रोकड खात्याला | | | १४,००० |
| | (मालाची रोख खरेदी केल्याबद्‌दल) | | | |
| २२ | रोकड खाते नावे | | २०,००० | |
| | विक्री खात्याला | | | २०,००० |
| | (मालाची रोख विक्री केल्याबद्‌दल) | | | |
| २६ | बँक ऑफ महाराष्ट्र खाते नावे | | १६,००० | |
| | रोकड खात्याला | | | १६,००० |
| | (बँकेत जमा केल्याबद्‌दल) | | | |
| २८ | बँक ऑफ महाराष्ट्र खाते नावे | | ७,००० | |
| | व्याज खात्याला | | | ७,००० |
| | (बँकेने व्याज जमा केल्याबद्‌दल) | | | |
| | **एकूण** | | **९५,०००** | **९५,०००** |

**करणची खातेवही :**

नावे **खरेदी खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | २०१८ | | | |
| जाने. १ | शि/खा/आ | | ८०,००० | जाने. ३१ | शि/खा/नेली | | १,०४,००० |
| ५ | ऋषीचे खाते | | १०,००० | | | | |
| १९ | रोकड खाते | | १४,००० | | | | |
| | | | १,०४,००० | | | | १,०४,००० |
| फेब्रु १ | शि/खा/आ | | १,०४,००० | | | | |

नावे **ऋषीचे खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | २०१८ | | | |
| जाने. | | | | जाने ५ | खरेदी खाते | | १०,००० |
| १७ | खरेदीपरत खाते | | २,००० | | | | |
| ३१ | शि/खा/ नेली | | ८,००० | | | | |
| | | | १०,००० | | | | १०,००० |
| | | | | फेब्रु १ | शि/खा/आ | | ८,००० |

नावे **रोकड खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ | शिल्लक पुढे आणली | | ६०,००० | २०१८ | | | |
| जाने १ | | | | जाने १९ | खरेदी खाते | | १४,००० |
| जाने १० | बँक ऑफ महाराष्ट्र खाते | | २०,००० | २६ | बँक ऑफ महाराष्ट्र खाते | | १६,००० |
| २२ | विक्री खाते | | २०,००० | | | | |
| | | | | ३१ | शि/खा/ नेली | | ७०,००० |
| | | | १,००,००० | | | | १,००,००० |
| फेब्रु १ | शि/खा/आ | | ७०,००० | | | | |

नावे **करणचे उचल खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | २०१८ | | | |
| जाने १० | बँक ऑफ महाराष्ट्र | | ६,००० | जाने ३१ | शि/खा/ नेली | | ६,००० |
| | | | ६,००० | | | | ६,००० |
| फेब्रु १ | शि/खा/ आ | | ६,००० | | | | |

नावे **खरेदीपरत खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | २०१८ | | | |
| जाने ३१ | शि/खा/ नेली | | २,००० | जाने १७ | ऋषीचे खाते | | २,००० |
| | | | २,००० | | | | २,००० |
| | | | | फेब्रु १ | शि/खा/ आ/ | | २,००० |

नावे **विक्री खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | २०१८ | | | |
| जाने ३१ | शि/खा/ नेली | | ६०,००० | जाने १ | शि/खा.आ. | | ४०,००० |
| | | | | २२ | रोख खाते | | २०,००० |
| | | | ६०,००० | | | | ६०,००० |
| | | | | फेब्रु १ | शि/खा/आ | | ६०,००० |

नावे **बँक ऑफ महाराष्ट्र खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ | शिल्लक पुढे आणली | | १,००,००० | २०१८ | | | |
| जाने २६ | रोकड खाते | | १६,००० | जाने १० | रोकड खाते | | २०,००० |
| २६ | व्याज खाते | | ७,००० | १० | उचलखाते | | ६,००० |
| | | | | ३१ | शिल्लक/खा/ नेली | | ९७,००० |
| | | | १,२३,००० | फेब्रु १ | शि/खा/नेली | | १,२३,००० |
| फेब्रु १ | शिल्लक खा आ | | ९७,००० | | | | |

नावे **व्याज खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | २०१८ | | | |
| जाने ३१ | शि/खा/नेली | | ७,००० | जाने २८ | बँक ऑफ महाराष्ट्र खाते | | ७,००० |
| | | | ७,००० | | | | ७,००० |
| | | | | फेब्रु १ | शि/खा/नेली | | ७,००० |

**तुम्हाला माहित आहे का ?**

व्यवहाराचे कसे भ्रमण होते ?

स्त्रोत दस्तऐवज → रोजकिर्द → खातेवही → तेरीज

**श्री करण यांची ३१ जानेवारी २०१८ ची तेरीज**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| १. | रोकडखाते | | ७०,००० | |
| २. | खरेदी खाते | | १,०४,००० | |
| ३. | खरेदी परत खाते | | | २,००० |
| ४. | ऋषीचे खाते | | | ८,००० |
| ५. | बँक ऑफ महाराष्ट्र खाते | | ९७,००० | |
| ६. | करणचे भांडवल खाते | | | २,००,००० |
| ७. | करणचे उचल खाते | | ६,००० | |
| ८. | विक्री खाते | | | ६०,००० |
| ९. | व्याज खाते | | | ७,००० |
| | **एकूण** | | २,७७,००० | २,७७,००० |

## स्वाध्याय

**प्र.१ एका वाक्यात उत्तरे लिहा**

१) खातेवही म्हणजे काय ?
२) खातेवहीतील खतावणी म्हणजे काय ?
३) खात्याची शिल्लक निरंक केव्हा असते ?
४) खाते पान क्रमांक म्हणजे काय ?
५) खात्याच्या विवरणाचा प्रत्यक्ष व्यवहारात कोठे उपयोग होतो ?
६) मालकाचे भांडवल खाते व्यवसायाची देयता का मानली जाते ?
७) रोकड खात्याची जमाशिल्लक का नसते ?
८) तेरीज म्हणजे काय ?

**प्र.२ खालील विधानाकरिता शब्द, शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा.**

१) लेखांकनाचे मुख्य पुस्तक.
२) रोजकिर्दीतील नोंदीचे खातेवहीत संबंधीत खात्याला स्थानांतर करणे.
३) खातेवहीतील ज्या पानावर नोंद केली आहे तो पान क्रमांक.
४) खात्याच्या लहान बाजूला शिल्लक लिहून दोन्ही बाजूच्या बेरजा समान करण्याची प्रक्रिया.
५) वैयक्तिक खात्याची नावे शिल्लक.
६) बँक खात्याची जमा शिल्लक
७) वितरीत केलेला माल आगीमुळे नष्ट झाला तेव्हा कोणते खाते नावे होईल ?
८) खातेवहीतील खात्यांच्या केवळ शिलका स्थानांतरीत केल्या जातात ती तेरीज कोणती ?

**प्र.३ योग्य पर्याय निवडून संपूर्ण विधाने पुन्हा लिहा.**

१) उधारीच्या व्यवहारामध्ये किमान एक खाते ............असते.
अ) रोख ब) उधार क) वैयक्तीक ड) नावे
२) शिल्लक खाली नेली ................दर्शविते.
अ)सुरवातीची ब) शेवटची क) धनात्मक ड) ऋणात्मक
३) .............. खतावणी रकाना रोजकिर्द रकान्याचा पान नं. उपयोग केला जातो.

अ) रो.पा.  ब) खा.पा.  क) दिनांक  ड) तपशील

४) ऋणकोच्या खात्याची ...........शिल्लक दर्शविते.

अ) वास्तविक  ब) ऋणात्मक  क) जमा  ड) नावे

५) खातेवहीतील प्रत्येक खात्याची नावे व जमा बाजूच्या बेरजेतील फरक शोधून काढण्याची प्रक्रिया ...........होय.

अ) बेरीज करणे  ब) रोजकिर्दीयन  क) खाते संतुलन  ड) खतावणी.

६) खरेदी पुस्तकाच्या बेरजेची ..........खरेदी खात्यात केली जाते.

अ) खतावणी  ब) स्थालंतर  क) देणे  ड) नोंदणी

७) वास्तविक खात्याची ..........शिल्लक असते.

अ) किमान  ब) कमाल  क) नावे  जमा

८) .............तयार करणे म्हणजे खातेवहीची अंकगणितीय शुद्धता तपासणे होय.

अ) तेरीज पत्रक  ब) खातेवही  क) रोजकिर्दी  ड) यादी

## प्र.४ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण सांगा.

१) खातेवही हे मूळ नोंदीचे पुस्तक आहे.

२) रोजकिर्दीत व्यवहार नोंदविण्याची प्रक्रिया म्हणजे खतावणी होय.

३) व्यवसायिकात धंद्यातून रोख रकमेची उचल केल्यास उचल खाते जमा केले जाईल.

४) नामधारी खात्यांच्या शिलका या पुढच्या पुढे नेल्या जातात.

५) जेव्हा खात्याच्या नावे बाजूची बेरीज, जमा बाजूच्या बेरजेपेक्षा जास्त असते तेव्हा खात्यावर नावे शिल्लक असते.

६) जेव्हा खात्याचे नांव, प्रत्येक खात्याच्या वर लिहिले जाते तेव्हा त्यास खात्याचे शिर्षक असे म्हणतात.

७) तेरीज तयार करणे म्हणजे जमाखर्चाची अचूकता सिद्ध करणे.

८) तेरीज ही द्विनोंद पद्धतीच्या सिद्धांतावर आधारीत आहे की जितके नावे असतात तितकेच जमा असतात.

## प्र.५ रिकाम्या जागा भरा

१) ............. शिल्लक ही नामधारी खात्याची खर्च किंवा हानी दर्शविते.

२) रोकड खात्याची .........शिल्लक असते.

३) खात्याच्या उजव्या बाजूला ...........बाजू असे म्हणतात.

४) धनकोच्या खात्याची ............शिल्लक असते.

५) ..........खात्यांच्या शिलका नफा-तोटा खात्याला स्थांनातरीत करून ते खाते बंद करतात.

६) शि/खा/ आ म्हणजे ............

७) मालकाच्या राहत्या घराचे भाडे ...............खात्याला नावे होते.

८) ₹ २४,००० किंमतीचा माल २०% नफ्यावर विकल्यास त्याचे क्रममूल्य ................. राहील.

## प्र.६ खालील कोष्टक पूर्ण करा.

| | | |
|---|---|---|
| १) | रोजकिर्द | रोजकिर्दीयन |
| | ? | खतावणी |
| २) | विक्रीपरत | आगतप्रत्याय |
| | क्रयप्रत्याय | ? |
| ३) | खा.पा.क्र. | रोजकिर्द |
| | ? | खातेवही |

| | | |
|---|---|---|
| ४) | संपत्ती | नावे शिल्लक |
| | देयता | ? |
| ५) | जमीन व इमारत | नावे शिल्लक |
| | प्राप्त कमिशन | ? |

**प्र.७ खालील शिलकांच्या बाबतीत योग्य खूण करा.**

| | | नावे शिल्लक | जमा शिल्लक |
|---|---|---|---|
| १) | भांडवल खाते | | √ |
| २) | ख्याती | | |
| ३) | अधिकोष अधिनिकर्ष | | |
| ४) | प्राप्त विपत्रे | √ | |
| ५) | धनको | | √ |
| ६) | उचल | | |
| ७) | जाहिरात | | |
| ८) | पूर्वदत्त भाडे | | |
| ९) | अदत्त भाडे | | |
| १०) | बुडीत कर्ज | | |

## प्रात्याक्षिक उदाहरणे

**प्र.१ खातेवहीतील खालील खात्यांच्या आधारे रोजकिर्दीत नोंदी लिहा.**

**सोपनाच्या खातेवहीत**

**नावे** **रोकड खाते** **Cr.**

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| फेब्रु १ | शि/खा/आ | | ८,००० | फेब्रु ५ | टेलीफोन खाते | | ७५० |
| ३ | विक्री खाते | | ७०० | | | | |
| ६ | व्याज खाते | | ६०० | ९ | खरेदी खाते | | ८०० |
| ८ | जयश्रीची खाते | | १,५०० | २८ | शि/खा/ने | | ९,२५० |
| | | | १०,८०० | | | | १०,८०० |
| मार्च १ | शि/खा/आणली | | ९,२५० | | | | |

नावे खरेदी खाते जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ फेब्रु ९ | रोकड खाते | | ८०० | २०१९ फेब्रु २८ | शि/खा/ने | | ८०० |
| | | | ८०० | | | | ८०० |
| मार्च १ | शि/खा/आ | | ८०० | | | | |

नावे जयश्रीचे खाते जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ फेब्रु १५ | विक्री खाते | | ५,००० | २०१९ फेब्रु ८ | रोकड खाते | | १,५०० |
| | | | | २८ | शि/खा/ नेली | | ३,५०० |
| | | | ५,००० | | | | ५,००० |
| मार्च १ | शि/खा/ आ | | ३,५०० | | | | |

प्र.२ खालील साहाय्यक पुस्तकावरून खाते वहीत आवश्यक खाती उघडा

खरेदी पुस्तक

| दिनांक | ग्राहकाचे नाव | आवक बिजक क्र | खा.पा | राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१९ ऑक्टो २ | अमोल | | | ७,५०० |
| ७ | ऐश्वर्या | | | २,४०० |
| १ १ | विवेक | | | ३,९०० |
| १७ | सेठ | | | ६,५०० |
| २७ | शबरी | | | १,००० |
| | एकूण | | | २ १,३०० |

खरेदी परत पुस्तक

| दिनांक | ग्राहकाचे नाव | नावे पत्र क्र | रो.पा | राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१९ ऑक्टो | | | | ४८० |
| १० | ऐश्वर्या | | | ६५० |
| २० | शेठ | | | २०० |
| २८ | शबरी | | | |
| | एकूण | | | १,३३० |

**प्र. ३ खालील माहितीवरून विनयच्या पुस्तकात आवश्यक खाती उघडा व खात्यांच्या शिलका काढा.**

२०१९

जाने. १ ₹ १०,०००आणून व्यवसायाला प्रारंभ केला.

६ विकासकडून माल आणला ₹ ३,०००

९ भूषणला माल विकला₹ २,४००

१२ विकासला दिले ₹ १,६००

१९ भूषणला मिळाले ₹ १,०००

२५ रोख खरेदी ₹ ३,६००

३० रोख विक्री ₹ ५,०००

३१ मजुरी दिली ₹ ४००

**प्र.४ खालील व्यवहार रोजकिर्दीत नोंदवा. व फक्त रोकड खाते तयार करा.**

२०१९

जुलै १ ₹ १५,००० रोख व यंत्र ₹ २०,००० चे आणून हार्दीक ने व्यवसायाला प्रारंभ केला.

४ १०% रोख कसरीवर माल खरेदी केला. ₹ ९,०००

९ अमरला माल विकला ₹ ३,०००

१२ मोफत वस्तू वाटल्या ₹ ७००

१४ कार्यालयाकरिता लेखनसाहित्य आणले ₹ ५५०

१८ धनश्रीकडून ₹ ९५० मिळाले, जीचे खाते बुडीत कर्ज म्हणून अपलेखीत करण्यात आले होते.

२१ अभिरामने आपल्याला ₹ ३,००० चा माल पाठविला.

२४ अभिरामचे खाते शोधनार्थ मिळाले. त्याने ५% रोख कसर दिली.

२७ ₹ २,५०० वस्तू च्या बदली तेवढ्याच किमतीचे फर्निचर घेतले.

२९ ATM च्या माध्यमातून कार्यायिलाकरीता ₹ ५,००० आणि वैयक्तिक उपयोगाकरिता ₹ ३,००० काढले

**प्र.५ सुपर्णाच्या पुस्तकात अपर्णाचे खाते तयार करा.**

२०१९

जाने १ अपर्णाकडून येणे रक्कम ₹ ६०,०००

४ १०% व्यापारी कसरीवर अपर्णाला माल विकला . ₹ १५,०००

७ अपर्णाकडून माल परत आला ₹ १,५०० (ढोबळ)

११ अपर्णाकडून रेखांकित धनादेश मिळाला. ₹ ५०,०००

१७ अपर्णाला माल पाठविला ₹ १२,०००

२५ अपर्णाला रोखीने माल पाठविला ₹ ६,०००

३० अपर्णाकडून पूर्णखाते लेखा शोधनार्थ मिळाले ₹ ३३,०००

**प्र.६ मदनलालच्या पुस्तकात रोकड खाते, बँक खाते, खरेदी खाते, विक्री खाते व भांडवल खाते उघडून त्यांच्या शिलका काढा.**

२०१९

ऑगस्ट १ बँक शिलकेसह मदनलालने व्यवसायाला प्रारंभ केला. ₹ ४०,०००.

२ १०% व्यापारी कसरीवर असीमकडून माल खरेदी केला ₹ १५,०००

३ अरुणला माल रोख विकला. ₹ ८,०००.

४ भाडे ₹ ३,००० दिले व विद्युत बील भरले ₹ ५००.

५ नेटबँकींगच्या माध्यमातून मदनलालने प्रत्येकी ₹ ५५ रु प्रमाणे परफेक्ट टेक्नॉलॉजीचे १०० भाग खरेदी केले. व दलाली म्हणून ₹ २५० दिले.

६ वैयक्तीक उपयोगासाठी वस्तू घेतल्या ₹ ५००.
७ १०% रोख कसरीवर माल विकला ₹ ५,०००
८ बँकेत जमा केले ₹ २,०००.
९ बँकेच्या डेबीट कार्डच्या माध्यमातून मुलीची ट्युशनफी दिली ₹ ३,०००
१० टेबल खरेदी केले. ₹ २,०००.
१९ भंगार विकून मिळाले ₹ १,५०० .
२७ ₹ २,००० शिल्लक ठेवून जास्तीचे पैसे बँकेत भरले.

**प्र.७ खालील माहितीवरून रोजकिर्द तयार करा, खतावणी करा.**

**फेब्रुवारी २०१९**

१ सुनीलने ₹ २०,००० किमतीच्या वस्तू रोख ₹ १,७०,००० व्यवसायाला प्रारंभ केला. रोख रकमेपैकी ₹ ५०,००० त्याने त्याचा मित्र केदारकडून १०% वार्षिक दराने आणले.
५ पुरवठादार, मोहनकडून ₹ ७,००० किमतीच्या वस्तू खरेदी केल्या व त्याला अग्रीम म्हणून ₹ ५,५०० दिले.
९ कार्यालयाकरिता लेखनसाहित्य खरेदी केले. ₹ ४,५००
१२ मोफत नमुना वस्तू वाटल्या ₹ २,०००
१७ श्री. देवच्या वतीने भाडे दिले ₹ ४००
२४ मोहनच्या सूचनेप्रमाणे त्याचा ५ तारखेची ऑर्डर पूर्ण करून खाते निरंक करण्यात आले.
२७ २०% व्यापारी कसरीवर शेखरकडून दोन महिन्याच्या मुदतीवर माल खरेदी केला आणि तो लगेच सागरला पाठविला.
२८ शेखरने सागरला मालाचे जावक बीजक छापील किंमतीच्या १०% व्यापारी कसरने पाठविले.

**प्र.८ संजीवच्या पुस्तकात खालील व्यवहारांच्या किर्दनोंदी करून खातेवहीत योग्य खाती उघडा.**

२०१९

जून १ कमिशनबद्दल राजूकडून रोख मिळाले ₹ १०,०००.
३ राकेशला आंतरराज्य माल विकला ₹ ३,००० SGST @२.५% व CGST @२.५% लागू आहे.
५ राकेशकडून पूर्ण रक्कम मिळाली.
८ मंगेशकडून आंतरराज्य माल खरेदी केला ₹ २,००० आणि SGST @२.५% व CGST @२.५%लागू आहे.
११ मंगेशला रकमेचे शोधन केले.
१८ भाडे दिले ₹ २,५००
२४ मोबाईल खर्चाचे बिल दिले ₹ १,००० त्यातील ₹ ७०० कार्यालयाकरिता व ३०० रु वैयक्तीक उपयोगाकरिता वापरले.

**प्र.९ १ जुलै २०१९ रोजी पवन पवार, पुणे यांच्या खातेवहीत खालील शिलका दिसून आल्या.**

| नावे शिलका | राशि (₹) | जमा शिल्लक | राशि (₹) |
|---|---|---|---|
| यंत्र खाते | ४,४०,००० | खरेदी परत खाते | ६०,००० |
| रश्मीचे खाते | ७०,००० | विक्री खाते | ३,६०,००० |
| खरेदी खाते | १,३०,००० | पवनचे भांडवल खाते | ४,८०,००० |
| विक्रीपरत खाते | ४०,००० | व्याज खाते | ६,००० |
| रोकड खाते | १,००,००० | राकेशचे खाते | ५६,००० |
| बँक खाते | १,८०,००० | | |
| लेखनसामुग्री खाते | २,००० | | |

**जुलै २०१९ मध्ये खालील व्यवहार झाले. खातेवहीत त्यांची नोंद करून ३१ जुलै २०१९ चे तेरीज पत्र तयार करा.**

| | |
|---|---|
| १ | अतिरिक्त भांडवल आणले ₹ ४०,००० |
| ४ | १०% व्यापारी कसरीवर राकेश कडून माल आणला ₹ ८०,००० |
| ७ | रश्मीला माल विकला ₹ ३०,००० |
| ९ | राकेशला माल परत केला ₹ २०,००० (ढोबळ) |
| ११ | रश्मीकडून माल परत आला ₹ ४०० |
| १४ | राकेशला रोख दिले व त्याच्या कडून २% रोख कसर मिळाली ₹ ४०,००० |
| २२ | रोख खरेदीबद्दल धनादेश दिला. ₹ १७,००० |
| २४ | रोख विक्री ₹ ८,००० |
| २७ | लेखनसामुग्री आणली ₹ ३,००० |
| २८ | RTGS च्या माध्यमातून रश्मीकडून ₹ ३९,००० मिळाले व ₹ १,००० कसर दिली. |
| २९ | पगार दिला ₹ १०,००० |
| २९ | रश्मीला माल विकला ₹ २०,००० |
| ३१ | राकेशकडून माल आणला व त्याला ₹ ३६,००० चा धनादेश दिला. |

# 5 सहाय्यक पुस्तके (Subsidiary Books)

**अभ्यास घटक**

*५.१ ओळख, अर्थ, आवश्यकता आणि सहाय्यक पुस्तकांची देखरेख*
*५.२ केवळ रोख रकाना असलेले साचे रोख पुस्तक*
*५.३ रोख व बँक रकाने असलेले रोख पुस्तक*
*५.४ विश्लेषणात्मक लघु रोख पुस्तक – अग्रघन पध्दती*
*५.५ खरेदी पुस्तक*
*५.६ खरेदी परत पुस्तक*
*५.७ विक्री पुस्तक*
*५.८ विक्री परत पुस्तक*
*५.९ मूळ रोजकीर्द*

**क्षमता विधाने**

- *विद्यार्थ्यांना सहाय्यक पुस्तकांचा अर्थ व गरजांचे आकलन होते.*
- *विद्यार्थ्यांना विशेष रोजकिर्दमध्ये प्रत्यक्ष नोंद करता येते.*
- *विद्यार्थी रोख व्यवहाराचे आणि उधारीच्या व्यवहाराचे वर्गिकरण करू शकतो.*
- *विद्यार्थी विविध रोख पुस्तकांमध्ये आर्थिक व्यवहारांची नोंद करून संतुलन करतो.*
- *विद्यार्थी बँक व्यवहारांचे लेखांकन व प्रती नोंदी करू शकतो.*
- *विद्यार्थी विविध सहाय्यक पुस्तके तयार करू शकतो.*

## ५.१ प्रस्तावना

लहान प्रमाणावरील व्यापारात घडून येणाऱ्या व्यवहारांची संख्या जास्त नसते. त्यामुळे अशा व्यापारी संस्थाना रोजकीर्द आणि खातेवही अशा दोन पुस्तकात सर्व व्यवहार लिहिणे सोयीचे असते. परंतु व्यापाराचा व्याप वाढल्यावर ज्यावेळी व्यवहारांची संख्या वाढत जाते त्यावेळी रोजकीर्दीचे विभाजन करुन एका कीर्दीऐवजी लहान लहान अशा अनेक कीर्दी ठेवण्यात येतात. या छोट्या कीर्दीनांच दैनिक पुस्तके, 'दुय्यम कीर्द' (Subsidiary Journals) किंवा 'सहाय्यक पुस्तके' (Subsidiary Books) असे म्हणतात.

## ५.१ अर्थ : (Meaning)

रोजकीर्दीच्या उपविभाजनाला सहाय्यक पुस्तके असे म्हणतात. एक प्रकारे व्यवहारांच्या स्वरुपाच्या आधारावर रोजकीर्दीचे अनेक विशिष्ट रोजकीर्दींमध्ये उपविभाजन करण्यात येते.

सहाय्यक पुस्तके ही मुळ नोंदीची प्रथम किंवा प्राथमिक नोंदीची पुस्तके होत. कारण व्यवहाराची प्रथम नोंद ही सहाय्यक पुस्तकात करण्यात येते आणि त्याची नोंद खातेवहीतील विशिष्ट खात्यात करण्यात येते.

### ५.१.१ सहाय्यक पुस्तके ठेवण्याची आवश्यकता

१) **विशेषीकरण (Specialisation) :** कर्मचाऱ्याला एकाच प्रकारचे कार्य सोपविले जाते त्यामुळे तो ते कार्य करण्यात निष्णात होतो आणि त्याच्या कार्यक्षमतेत वाढ होते.


२) **वेळेची बचत आणि मितव्ययी :** एकाच वेळी लेखांकनाच्या विभिन्न पध्दती उपयोगात आणल्या जाऊ शकतात. त्यामुळे वेळेची व खर्चाची बचत होते.

३) **कार्याचे विभाजन :** सहाय्यक पुस्तकामध्ये व्यवहारांच्या नोंदी करण्याचे कार्य आणि खातेवहीमधील खात्यामधे खतावणी (नोंद) करण्याचे कार्य हे एकाच वेळी अनेक कर्मचाऱ्यामध्ये विभागले जावु शकते.

४) **जलद माहिती आणि भावी संदर्भ :** समान व्यवहारांची नोंद एकाच पुस्तकात एकत्रीतरित्या करण्यात येत असल्याने आवश्यक माहिती लवकर उपलब्ध होते आणि त्या माहितीचा भविष्यकाळात उपयोग करणे सोपे होते.

५) **अंतर्गत पडताळणी :** सहाय्यक पुस्तकामुळे अंतर्गत नियंत्रण शक्य होते. त्यामुळे लेखापुस्तकातील अचुकचता पडताळून पाहता येते.

**व्यवहारांच्या आधारावर सहाय्यक पुस्तकांचे प्रकार**




या प्रकरणात आपण खालील विशेष हेतु पुस्तकावर चर्चा करणार आहोत.

१) रोख पुस्तक
२) लघु रोख पुस्तक
३) खरेदी पुस्तक
४) खरेदी परत पुस्तक
५) विक्री परत पुस्तक
६) विक्री पुस्तक
७) मूळ रोजकीर्द

## ५.२ रोख पुस्तक (Cash book) :

रोख पुस्तक : सर्व प्रकारचे रोख व बँक व्यवहार या पुस्तकात नोंदविले जातात. रोख ही संपत्ती असल्यामुळे रोख पुस्तकावर नेहमी नावे बाकी असते. रोख पुस्तकाला दोन बाजू असतात, डाव्या बाजुस प्राप्ती बाजु किंवा नावे बाजु आणि उजव्या बाजुस शोधन बाजू किंवा जमा बाजु असे म्हणतात. जेव्हा रोख रक्कम किंवा धनादेश किंवा अधिकर्ज देण्यात येतो तेव्हा अशा व्यवहारांची तपशीलवार नोंद ही उजव्या बाजुस करण्यात येते. ह्या बाजुस शोधनबाजु किंवा जमाबाजु असे म्हणतात. रोख पुस्तकात संबंधीत सर्व व्यवहार हे काल-क्रमानुसार नोंदविले जातात.

**साधे रोख पुस्तकाचा नमुना**

**नावे** **साधे रोख पुस्तक** **जमा**

| दिनांक | प्राप्ती | पावती क्रमांक | खा.पा. | रक्कम ₹ | दिनांक | शोधन | प्रमाणक क्रमांक | खा.पा. | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

**साधे रोख पुस्तक उदाहरणे**

**१) साधे रोख पुस्तक तयार करा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मार्च २०१९ | १ | हस्तस्थ रोख | ₹ | २,५०० |
| | ५ | सुरेश यांना रोख दिली | ₹ | १,००० |
| | ७ | रोख खरेदी | ₹ | ५०० |
| | १४ | प्रकाश यांचेकडून रोख मिळाली | ₹ | १,००० |
| | १६ | रोखीने मालाची विक्री | ₹ | ८०० |
| | २० | गाडी भाडे दिले | ₹ | १०० |
| | २५ | वेतन दिले | ₹ | ५०० |

**............... यांचे पुस्तकात**

**नावे** **साधे रोख पुस्तक** **जमा**

| दिनांक | प्राप्ती | पा. क्र. | खा. पा. | रक्कम ₹ | दिनांक | शोधन | प्र. क्र. | खा. पा. | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ मार्च | | | | | २०१९ मार्च | | | | |
| १ | शिल्लक पु / आ | | | २,५०० | ५ | सुरेश खाते (रक्कम दिल्याबद्दल) | | | १,००० |
| १४ | प्रकाश खाते (रक्कम मिळाल्याबद्दल) | | | १,००० | ७ | खरेदी खाते (माल खरेदी केल्याबद्दल) | | | ५०० |
| १६ | विक्री खाते (रोख विक्री केल्याबद्दल) | | | ८०० | २० | गाडी भाडे खाते (गाडी भाडे दिल्याबद्दल) | | | १०० |
| | | | | | २५ | वेतन खाते (वेतन दिल्याबद्दल) | | | ५०० |
| | | | | | ३१ | शिल्लक पु / ने | | | २,२०० |
| | | | | ४,३०० | | | | | ४,३०० |
| १ एप्रिल २०१९ | शिल्लक पु/आ. | | | २,२०० | | | | | |

२. **पुढील व्यवहारांची नोंद सौरभ ट्रेडर्स यांच्या साध्या रोख पुस्तकात करा.**

| | | | |
|---|---|---|---|
| जुलै २०१८ | १ | रोख रकमेसह व्यवसाय प्रारंभ केला | ₹ १,००,००० |
| | ३ | बँकेत रक्कम जमा केली | ₹ ८०,००० |
| | ५ | रोखीने स्टेशनरी खरेदी केली | ₹ २,००० |
| | ७ | रोख खरेदी | ₹ १५,००० |
| | ८ | रोखीने मालाची विक्री | ₹ २०,००० ८ % व्यापारी कसरीवर |
| | १० | विम्याचा हप्ता भरला | ₹ ५,००० |
| | १२ | दिक्षित यांना रक्कम दिली | ₹ १०,००० |
| | १५ | सक्सेना यांच्याकडून रक्कम मिळाली | ₹ ८०,००० |
| | १७ | कमिशन मिळाले | ₹ २,००० |
| | १८ | व्यक्तीगत उपयोगासाठी व्यवसायातुन उचलले | ₹ ४,००० |
| | २२ | उपस्कर विक्री | ₹ ५,००० |
| | २५ | रामला वेतन दिले | ₹ ६,००० |
| | ३० | व्याज मिळाले | ₹ ४,००० |

**उत्तर :**

**सौरभ ट्रेडर्स यांचे पुस्तकात**

**नावे** **साधे रोख पुस्तक** **जमा**

| दिनांक | प्राप्ती | पा. क्र. | खा. पा. | रक्कम ₹ | दिनांक | शोधन | प्र. क्र. | खा. पा. | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जुलै २०१८ | | | | | जुलै २०१८ | | | | |
| १ | भांडवल खाते (व्यावसायात भांडवल गुंतविल्याबद्दल) | | | १,००,००० | ३ | बँक खाते (बँकेत रक्कम जमा केल्याबद्दल) | | | ८०,००० |
| ८ | विक्रीकर खाते (विक्री केल्याबद्दल) | | | १८,४०० | ५ | स्टेशनरी खाते (स्टेशनरी खरेदीबद्दल) | | | २,००० |
| १५ | सक्सेना खाते (रोख मिळाल्याबद्दल) | | | ८०,००० | ७ | खरेदी खाते (माल खरेदी केल्याबद्दल) | | | १५,००० |
| १७ | कमिशन खाते (कमिशन मिळाल्याबद्दल) | | | २,००० | १० | विमा हप्ता खाते (विमा हप्ता भरल्याबद्दल) | | | ५,००० |
| २२ | उपस्कर खाते (उपस्कर विकल्याबद्दल) | | | ५,००० | १२ | दिक्षित खाते (रक्कम दिल्याबद्दल) | | | १०,००० |
| ३० | व्याज खाते (व्याज मिळाल्याबद्दल) | | | ४,००० | १८ | उचल खाते (उचल केल्याबद्दल) | | | ४,००० |
| | | | | | २५ | वेतन खाते (वेतन दिल्याबद्दल) | | | ६००० |
| | | | | | ३१ | शिल्लक खाते | | | ८७,४०० |
| | | | | २,०९,४०० | | | | | २,०९,४०० |
| ऑगस्ट १ | शिल्लक खाते | | | ८७,४०० | | | | | |

३. **कमल ट्रेडर्स यांच्या साध्या रोख पुस्तकात पुढील व्यवहारांच्या नोंदी करा.**

| | | | |
|---|---|---|---|
| ऑगस्ट २०१८ | १ | हस्तस्थ रोख | ₹ ३७,४०० |
| | ४ | साक्षीकडून मिळाले | ₹ २५,००० |
| | ५ | १२% व्यापारी कसरीवर रोखीने मालाची खरेदी | ₹ २५,००० |
| | ८ | भागांमध्ये गुंतविले | ₹ २५,००० |
| | १० | विविध किरकोळ खर्चाचे दिले | ₹ ३,००० |
| | १२ | जीवन विमा प्रव्याजीचे दिले | ₹ ८,००० |
| | १६ | लाभांश मिळाला | ₹ २,००० |
| | २० | टेलीफोन बिल भरले | ₹ ६,००० |
| | २२ | व्याज मिळाले | ₹ १,००० |
| | २५ | २०% व्यापारी कसरीवर मालाची रोख विक्री | ₹ २५,००० |
| | २८ | विद्युत बिल भरले | ₹ ४,५०० |

**उत्तर :**

**कमल ट्रेडर्स यांचे पुस्तक**

**साधे रोख पुस्तक**

**नावे** **जमा**

| दिनांक | प्राप्ती | पा. क्र. | खा. पा. | रक्कम ₹ | दिनांक | शोधन | प्र. क्र. | खा. पा. | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑगस्ट २०१८ | | | | | २०१८ ऑगस्ट | | | | |
| १ | शिल्लक पु / आ. | | | ३७,४०० | ५ | खरेदी खाते (माल खरेदी केल्याबद्दल) | | | २२,००० |
| ४ | साक्षी खाते (रक्कम मिळाल्याबद्दल) | | | २५,००० | ८ | भाग गुंतवणुक खाते (भागांमध्ये गुंतविल्याबद्दल) | | | २५,००० |
| १६ | लाभांश खाते (लाभांश मिळाल्याबद्दल) | | | २,००० | १० | विविध किरकोळ खर्च खाते (विविध खर्च केल्याबद्दल) | | | ३,००० |
| २२ | व्याज खाते (व्याज मिळाल्याबद्दल) | | | १,००० | १२ | उचल खाते (जीवन विमा प्रव्याजीचे दिल्याबद्दल) | | | ८,००० |
| २५ | विक्री खाते (रोख विक्रीबद्दल) | | | २०,००० | २० | टेलीफोन बिल खाते (टेलीफोन बिल भरल्याबद्दल) | | | ६,००० |
| | | | | | २८ | विद्युत बिल खाते (विद्युत बिल भरल्याबद्दल) | | | ४,५०० |
| | | | | | ३१ | शिल्लक पु. / ने | | | १६,९०० |
| | | | | ८५,४०० | | | | | ८५,४०० |
| २०१८ सप्टे. १ | शिल्लक पु.आ. | | | १६,९०० | | | | | |

## ५.३ रोख व बँक रकाने असलेले रोख पुस्तक / दोन रकानी रोख पुस्तक

वर्तमान काळात बँका व्यावसायिकांना विविध सेवा प्रदान करण्यात महत्वाची भूमिका अदा करीत आहेत. बँका ग्राहकांकडून ठेवी स्विकारतात आणि आपल्या ग्राहकांना रोख स्वरुपात किंवा धनादेशाद्वारे पैसे काढण्याची सेवा प्रदान करतात. याशिवाय बँका विविध प्रकारची कार्य करतात. उदाहरणार्थ धनादेशाद्वारे शोधन आणि ड्राफ्ट द्वारे शोधन कर्ज सुविधा, विनिमय विपत्र वटविणे, रोख कर्ज आणि वरील सर्व सुविधा याशिवाय जेव्हा एखादा ग्राहक बँकेत चालुखाते उघडतो तेव्हा त्याला अधिकोष अधिविकर्षाची सवलत प्रदान करण्यात येते.

ज्या व्यावसायिकाला बँकामार्फत अनेक व्यवहार करावे लागतात तो बँकमधे चालुखाते उघडतो आणि अधिविकर्ष सवलतीचा फायदा घेतो.

### ५.३.१ रोख व बँक रकाने असलेल्या रोख पुस्तकातील रकाने :

रोख व बँक रकाने असलेल्या रोख पुस्तकात प्राप्ती व शोधन ह्या दोन्ही बाजूंना रोख रकान्याशिवाय एक अतिरिक्त रकाना असतो त्या रकान्यास बँक रकाना असे म्हणतात. ह्या रकान्यात केवळ बँकेशी संबंधित असलेल्या व्यवहारांचीच नोंद करण्यात येते. रोख पुस्तकातील बँक रकाना हा व्यावसायिकांच्या बँकेतील चालू खात्याचे प्रतिनिधीत्व करतो.

### ५.३.२ रोख व बँक रकाने असलेल्या रोख पुस्तकाचे प्रारूप :

.............. यांचे रोख पुस्तक

**नावे** **जमा**

| दिनांक | तपशील (प्राप्ती) | पावती क्रमांक | खा. पा. | रोख ₹ | बँक ₹ | दिनांक | तपशील (शोधन) | प्रमाणक क्रमांक | खा. पा. | रोख ₹ | बँक ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

### ५.३.३ रोख व बँक रकाना असलेल्या रोख पुस्तकात बँक व्यवहारांचे लेखांकन

१) **बँक खात्याची प्रारंभीक शिल्लक :** जेव्हा प्राप्ती बाजूची (नावे बाजू) बेरीज ही शोधन बाजूच्या (जमा बाजूच्या बेरजेपेक्षा जास्त असते तेव्हा त्याला नावे शिल्लक असे म्हणतात. या उलट जेव्हा शोधन (जमा) बाजूची बेरीज ही प्राप्ती बाजूच्या (नावे बाजू) बेरजेपेक्षा जास्त असते तेव्हा त्याला जमा शिल्लक असे म्हणतात. बँक खाते हे वैयक्तिक खाते असल्यामुळे या खात्यात नावे शिल्लक किंवा जमा शिल्लक असू शकते. बँक खात्यात जमा शिल्लक असणे म्हणजे. **'बँक ओव्हरड्राफ्ट' होय.**

**अ) जेव्हा बँक खात्याची नावे शिल्लक दिलेली असते :** जेव्हा बँक खात्याची नावे शिल्लक दिलेली असते तेव्हा ती रोख पुस्तकाच्या प्राप्ती (नावे) बाजूस बँक रकान्यात दिलेल्या रकमेची नोंद करताना तपशील रकान्यात पुढील प्रमाणे दर्शविण्यात येते **'शिल्लक पु/आ'**.

**ब) जेव्हा बँक खात्याची जमा शिल्लक देण्यात आली असेल किंवा खात्यात बँक 'ओव्हरड्राफ्ट' देण्यात आला असेल :** बँक खात्यातील जमा शिलकेला 'ओव्हरड्राफ्ट' असे म्हणतात. जेव्हा खातेदार आपल्या बँकेतील चालू खात्यात असलेल्या जमा रकमेपेक्षा जास्त रकम काढतो तेव्हा 'ओव्हरड्राफ्ट'ची स्थिती निर्माण होते. थोडक्यात बँक 'ओव्हरड्राफ्ट' म्हणजे बँकेने आपल्याला चालू खात्यावर दिलेले अल्पकालीन कर्ज होय. या व्यवहाराची रोख पुस्तकात नोंद करताना शोधन (जमा) बाजूवर बँक रकान्यात 'ओव्हरड्राफ्ट'च्या रकमेची नोंद करताना तपशील रकान्यात पुढील प्रमाणे दर्शविण्यात येईल **'शिल्लक पु/आ'**.

२) **प्राप्त धनादेश :** रोख विक्री, कमिशन, लाभांश व व्याज व खात्यांचे हिशेब चुकते होणे (Statement of accounts) इत्यादी करिता धनादेश प्राप्त होत असतात.

**अ) रेखांकीत धनादेश प्राप्त झाले असता :** जेव्हा रेखांकित धनादेश प्राप्त होतो तेव्हा त्याची नोंद रोख पुस्तकात प्राप्ती बाजूला बँक रकान्यात करण्यात येते. या धनादेशावरील रकमेची नोंद बँक रकान्यात करताना तपशील रकान्यात पुढील प्रमाणे नोंद करण्यात येते. **'विक्री / व्याज / कमिशन / ग्राहक खाते'**

**रोजकीर्द नोंद –** बँक खाते नावे

विक्री / व्याज / कमिशन / ग्राहक खात्याला

**ब) वाहक धनादेश प्राप्त झाले असता :** जेव्हा वाहक धनादेश प्राप्त होतो तेव्हा रोख रक्कम मिळाली असे समजले जाते. या व्यवहाराची नोंद रोख पुस्तकाचे प्राप्ती बाजूला करताना संबंधित धनादेशाची रक्कम ही रोख रकान्यात लिहून तपशील रकान्यात पुढील प्रमाणे संबंधित खात्याचे नाव लिहिण्यात येते. **'विक्री / व्याज / कमिशन / ग्राहक खाते'**

**रोजकीर्द नोंद –** रोख खाते नावे

विक्री / व्याज / कमिशन / ग्राहक खात्याला

**क) प्राप्त धनादेश त्याच दिवशी बँकेत जमा करण्यात आला :** प्राप्त धनादेश राशी संग्रहणाकरिता बँकेत जमा करण्यात येतात. तेव्हा रोख पुस्तकाचे प्राप्त बाजूवर बँक रकान्यात संबंधित रक्कम लिहिली जाते व तपशील रकान्यात पुढील प्रमाणे संबंधित खात्याचे नाव लिहिण्यात येते **'विक्री / व्याज / कमिशन / ग्राहक खाते'**

**रोजकीर्द नोंद –** बँक खाते नावे

विक्री / व्याज / कमिशन / ग्राहक खात्याला

**ड) प्राप्त धनादेशाचे अनादरण :** प्राप्त झालेले धनादेश त्यावरील तारखेपासून तीन महिन्याचे आत राशी संग्रहणाकरिता बँकेत जमा करावे लागतात. तसे केले नाही तर ते धनादेश निरर्थक (Worthless) किंवा मृतप्राय होतात. जेव्हा काही कारणांमुळे बँक आदात्याला (Payee) धनादेशाची रक्कम देण्यास नाकारते तेव्हा त्याला धनादेशाचे अनादरण झाले असे म्हणतात.

अनादरीत धनादेशांची नोंद रोख पुस्तकाच्या शोधन बाजूवर बँक रकान्यात करण्यात येते यामुळे प्राप्त धनादेशाच्या नोंदीचा प्रभाव रद्द होतो. या करीता तपशील रकान्यात पुढील प्रमाणे संबंधित खात्याचे नाव लिहिण्यात येते.

**रोजकीर्द नोंद –** विक्री / व्याज / कमिशन / ग्राहकाचे खाते नावे

बँक खात्याला

**इ) निर्गमीत धनादेश :** रोख खरेदी, देयकमिशन, देय व्याज, हिशेब चुकते करणे इत्यादीचे शोधनासाठी धनादेश निर्गमित देण्यात करण्यात येतात. तसेच धनादेशाचा वापर बँकेतून रोख रक्कम काढण्यासाठी ही केला जातो. या व्यवहाराची नोंद रोख पुस्तकात शोधन बाजूवर बँक रकान्यात केली जाते व तपशील रकान्यात पुढील प्रमाणे संबंधित खात्याचे नाव लिहिण्यात येते.

**रोजकीर्द नोंद –** विक्री / व्याज / कमिशन / पुरवठादाराचे खाते नावे

बँक खात्याला

**फ) निर्गमीत धनादेशाचे अनादरण :** निर्गमीत धनादेशाचे अनादरण झाल्यास रोख पुस्तकाचे प्राप्ती (नावे) बाजूवर बँक रकान्यात संबंधित रकमेची नोंद केली जाते यामुळे शोधनासंबंधी पूर्वी केलेल्या नोंदीचा प्रभाव रद्द होतो. प्राप्ती बाजूवर नोंद करताना तपशील रकान्यात पुढीलप्रमाणे संबंधित खात्याचे नाव लिहिले जाते. **'विक्री / व्याज / कमिशन / पुरवठादाराचे खाते'**

**रोजकीर्द नोंद –** बँक खाते नावे

विक्री / व्याज / कमिशन / पुरवठादाराचे खात्याला

ग) **स्वत:च्या (खाजगी) कामाकरिता बँकेतून रक्कम काढणे :** अशा व्यवहारांची नोंद रोख पुस्तकाचे शोधन बाजूवर बँक रकान्यात करण्यात यावी व तपशील रकान्यात 'उचल खाते' (आहरण खाते) असे लिहिण्यात यावे.

**रोजकीर्द नोंद –** उचल (आहरण) खाते नावे

बँक खात्याला

३) **बँक सूचना व विवरण :** बँक आपल्या ग्राहकांना विविध सेवा प्रदान करतात. उदाहरणार्थ बँकेत राशी संग्रहाणार्थ जमा करण्यात आलेल्या धनादेशांची रक्कम गोळा करणे, लाभांश गोळा करणे, खातेदाराचे वतीने त्याचे सूचनेनुसार विविध खर्चाचे शोधन करणे इत्यादी अशा सेवा प्रदान केल्यानंतर बँक यासंबंधीची सूचना व्यवहाराच्या संपूर्ण तपशीलासह खातेदाराला पाठविते. ज्या खातेदारांचे चालू खाते असते या खातेदारांना बँकेकडून नियमीत विवरणे प्राप्त होतात. असा विवरणांमध्ये विविध व्यवहारांची विस्तृत माहिती असते. उदाहरणार्थ धनादेशाचे अनादरण, ग्राहकाने खातेदाराच्या खात्यात सरळ (Direct) रक्कम जमा करणे, बँक ओव्हरड्राफ्टवर बँकेने आकारलेले व्याज इत्यादी. अशा सर्व व्यवहारांची नोंद व्यावसायिक आपल्या रोख पुस्तकात बँकेकडून प्राप्त सूचना व विवरणपत्राचे आधारे करीत असतो.

अ) **ग्राहकाने सरळ बँक खात्यात रक्कम जमा करणे :** आपल्या व्यवहारांची पूर्तता करण्यासाठी काही ग्राहक रोख पैसे किंवा धनादेश न देता आपल्या बँकेतील खात्यात सरळ पैसे जमा करतात. अशा परिस्थितीत हा व्यवहार रोख पुस्तकात प्राप्ती (नावे) बाजूला बँक रकान्यात नोंदविला जाईल आणि संबंधित ग्राहकाचे नाव तपशील रकान्यात लिहिले जाईल.

**रोजकीर्द नोंद –** बँक खाते नावे

ग्राहक खात्याला

ब) **बँकेने दिलेले व्याज :** बँक खातेदाराला त्याचे खात्यातील जमा रकमेवर व्याज देत असते. असे व्याज हे व्यावसायिकाला मिळालेले उत्पन्न असते. त्यामुळे बँकेतील शिलकेत वाढ होते. ह्या व्यवहाराची नोंद रोख पुस्तकातील प्राप्ती बाजूवरील बँक रकान्यात केली जाईल आणि तपशील रकान्यात **'व्याज खाते'** असे लिहिले जाईल.

**रोजकीर्द नोंद –** बँक खाते नावे

व्याज खात्याला

क) **बँकेने बँक ओव्हरड्राफ्टवर आकारलेले व्याज (Interest Charged on Overdraft by bank) :** ओव्हरड्राफ्टवर सुविधा म्हणजे बँकेद्वारे चालू खाते असलेल्या खातेदाराला दिलेले अल्पकालीन कर्ज होय अशा ओव्हरड्राफ्टवर बँक एक निश्चित दराने व्याज आकारते. आकारण्यात आलेले असे व्याज हा व्यावसायिकाचा खर्च होय. या व्यवहाराची नोंद रोख पुस्तकात शोधन बँक रकान्यात करण्यात येईल आणि तपशील रकान्यात 'बँक ओव्हरड्राफ्टवरील व्याज खाते' असे लिहिले जाईल.

**रोजकीर्द नोंद –** बँक ओव्हरड्राफ्टवरील व्याज खाते नावे

बँक खात्याला

ड) **बँकेद्वारे नावे टाकण्यात आलेले बँक शुल्क (आकार) :** बँक आपल्या ग्राहकांना विविध सेवा प्रदान करतात. ह्या सेवासाठी बँकेद्वारे एका निश्चित शुल्काची आकारणी करण्यात येते. या सेवा शुल्कालाच बँक शुल्क/आकार (Bank Charges) असे म्हणतात. बँकेने आकारलेली शुल्काची रक्कम व्यावसायिकांसाठी खर्च असते. या व्यवहारांची नोंद रोख पुस्तकाचे शोधन बाजूवर 'बँक' रकान्यात करण्यात येईल व तपशील रकान्यात 'बँक शुल्क खाते' असे लिहिले जाईल.

**रोजकीर्द नोंद –** बँक शुल्क खाते नावे

बँक खात्याला

इ) **बँकेने व्यावसायिकाचे वतीने गुंतवणुकीवर गोळा केलेले लाभांश किंवा व्याज :** बँकेने गोळा केलेली ही रक्कम व्यावसायिकाचे उत्पन्न होय या संदर्भात बँकेकडून व्यावसायिकाला सूचना किंवा विवरण प्राप्त झाल्यानंतर व्यावसायिक या व्यवहाराची नोंद रोख पुस्तकात प्राप्ती बाजूवर बँक रकान्यात करतो आणि तपशील रकान्यात 'गुंतवणुकीवरील लाभांश किंवा व्याज खाते' असे लिहिले जाते.

**रोजकीर्द नोंद –** बँक शुल्क खाते नावे

व्याज / लाभांश खात्याला

ग) **व्यावयायिकाचे स्थायी सूचनेनुसार बँकेद्वारे करण्यात येणारे शोधन :** व्यावसायिकाने दिलेल्या स्थायी सूचनेनुसार बँक व्यावसायिकाचे वतीने विमा प्रव्याजी, टेलिफोन बिल, विद्युत बिल व इतर खर्चाचे शोधन करते. अशा व्यवहारांची नोंद रोख पुस्तकात 'शोधन' बाजूला बँक रकान्यात केली जाते आणि तपशील रकान्यात संबंधित खर्च खात्याचे नाव लिहिले जाते.

**रोजकीर्द नोंद –** संबंधित खर्च खाते नावे

बँक खात्याला

४) **रकमेचे हस्तांतरण :** व्यावसायिकाचे बँकेत चालू खात्याव्यतिरिक्त 'रोख प्रत्याय' (Cash credit), किंवा 'कर्ज खाते' (Loan Account) असू शकते. या खात्याच्या सहाय्याने व्यावसायिक आपल्या वित्तिय गरजांची पूर्तता करू शकतो. व्यावसायिक आपल्या रोख प्रत्याय किंवा कर्ज खात्यातून विशिष्ट रक्कम चालू खात्यात स्थानांतरीत करू शकतो किंवा आपला चालू खात्यातून रोख प्रत्याय किंवा कर्ज खात्यात स्थानांतरीत करू शकतो. त्याप्रमाणे वैयक्तिक बचत खात्यातून चालू खात्यात किंवा चालू खात्यातून वैयक्तिक बचत खात्यात रकमेचे स्थानांतरण होऊ शकते असे व्यवहार पुढील प्रमाणे रोख पुस्तकात लिहिले जातात.

अ) **रोख प्रत्याय किंवा कर्ज खात्यातून चालू खात्यात स्थानांतरण :** या व्यवहारांमुळे चालू खात्यातील शिलकेत (Balance) वाढ होते. म्हणून या व्यवहाराची नोंद रोख पुस्तकात प्राप्ती बाजूवर बँक रकान्यात केली जाते व तपशील रकान्यात 'रोख प्रत्याय किंवा कर्ज खाते' हे नाव लिहावे.

**रोजकीर्द नोंद –** बँक खाते नावे

रोख प्रत्याय / कर्ज खात्याला

ब) **चालू खात्यातून रोख प्रत्याय किंवा कर्ज खात्याला स्थानांतरण :** ह्या व्यवहारामुळे चालू खात्यातील शिल्लक कमी होते त्यामुळे या व्यवहाराची नोंद रोख पुस्तकाचे शोधन बाजूस बँक रकान्यात केली जाते आणि तपशील रकान्यात रोख प्रत्याय किंवा कर्ज खाते असे लिहिले जाते.

**रोजकीर्द नोंद –** बँक खाते नावे

रोख प्रत्याय / कर्ज खात्याला

क) **वैयक्तिक बचत खात्यातून चालू खात्यात स्थानांतरण :** हा व्यवहार म्हणजे व्यावसायिकांद्वारे व्यवसायात अतिरिक्त रक्कम आणणे होय. यामुळे भांडवल आणि बँकेतील चालू खात्याच्या शिलकेमध्ये वाढ होते. त्यामुळे या व्यवहाराची नोंद रोख पुस्तकात 'प्राप्ती' बाजूला बँक रकान्यात करण्यात येते व तपशील रकान्यात 'भांडवल' असे लिहिले जाते.

**रोजकीर्द नोंद –** बँक खाते नावे

भांडवल खात्याला

ड) **चालू खात्यातून वैयक्तिक बचत खात्यात स्थानांतरण :** हा व्यवहार म्हणजे व्यावसायिकाद्‌वारे रकमेची केलेली उचल होय. यामुळे व्यवसायाच्या बँकेतील खात्यातील शिल्लक कमी होते याची नोंद रोख पुस्तकाचे शोधन बाजूवर बँक रकान्यात करण्यात येते व तपशील रकान्यात 'उचल खाते' असे लिहिले जाते.

**रोजकीर्द नोंद –** उचल खाते नावे

बँक खात्याला

५) **प्रति प्रविष्ट्या / दुहेरी नोंदी / प्रती नोंदी / विरुद्ध नोंदी (Contra Entries) :** एखादा विशिष्ट व्यवहार एकाचवेळी रोख व बँक अशा दोन खात्यांना प्रभावित करतो. अशा व्यवहारामुळे एकाचवेळी रोख शिलकेत घट व बँक शिलकेत वाढ होते किंवा रोख शिलकेत वाढ बँक शिलकेत घट होते. दोन रकानी रोख पुस्तकात 'रोख पुस्तक' या एकाच शिर्षकाअंतर्गत बँक खाते व रोख खाते दर्शविण्यात येतात. बँक खात्यातील शिलकेमध्ये होणारी वाढ दर्शविण्यासाठी 'बँक खाते' नावे करण्यात येते आणि रोख खात्यातील शिलकेत होणारी घट दर्शविण्यासाठी रोख खाते जमा करण्यात येते. तसेच विपरीत स्थितीत उलटनोंदी करण्यात येतात. रोख पुस्तकात अशा प्रकारे दोन्ही बाजूंना नोंदी करण्यात येतात. रोख पुस्तकात अशा प्रकारे दोन्ही बाजूंना नोंदी करण्याच्या क्रियेला प्रती प्रविष्टी असे म्हणतात. प्रती प्रविष्टी तेव्हाच करण्यात येते जेव्हा एखादा विशिष्ट व्यवहार रोख आणि बँक या दोन्ही खात्यांना एकाच वेळी प्रभावित करतो. ही नोंद (व्यवहार) रकान्यात प्र.प्र. (प्रती प्रविष्टी) किंवा दु.नो. (दुहेरी नोंद) असे लिहिले जाते.

**प्रती प्रविष्टीची उदाहरणे (Example of Contra Enteries) :**

१) बँकेत रोख रक्कम जमा करणे २) कार्यालयीन उपयोगासाठी बँकेतून रक्कम काढणे

३) अगोदरचे दिवशी प्राप्त झालेला धनादेश बँकेत जमा करणे

प्रती प्रविष्टी लेखांकनाची पद्धती (Accounting treatment for contra entries as under) खालील प्रमाणे

अ) **बँकेत रोख रक्कम जमा करणे :** या व्यवहारामुळे बँकेतील शिल्लकेत वाढ होते आणि रोख शिलकेत घट होते या व्यवहाराची नोंद पुढील प्रमाणे करण्यात येते.

रोख पुस्तकाचे प्राप्ती बाजूवर बँक रकान्यात राशीची नोंद करून तपशील रकान्यात 'रोख खाते' लिहिले जाते आणि शोधन बाजूवर रोख रकान्यात तीच राशी लिहून तपशील रकान्यात बँक खाते असे लिहिले जाते.

**रोजकीर्द नोंद –** बँक खाते नावे

रोख खात्याला

वरील व्यवहारात बँक प्राप्तकर्ता आहे म्हणून बँक खाते नावे करण्यात आले व व्यवसायातून रोख रक्कम बाहेर जात असल्याने रोख खाते जमा करण्यात आले आहे.

ब) **कार्यालयीन उपयोगाकरिता बँकेतून रोख रक्कम काढणे :** या व्यवहारामुळे रोख शिलकेत वाढ होते व बँक शिल्लकेत घट होते. या व्यवहाराची नोंद पुढील प्रमाणे करण्यात येते.

रोख पुस्तकाचे प्राप्ती बाजूवर रोख रकान्यात राशी लिहून तपशील रकान्यात 'बँक खाते' असे लिहिले जाते आणि शोधन बाजूवर बँक रकान्यात तिच राशी लिहून तपशील रकान्यात 'रोख खाते' असे लिहिले जाते.

**रोजकीर्द नोंद –** रोख खाते नावे

बँक खात्याला

या व्यवहारात व्यवसायामध्ये रोख येते म्हणून रोख खाते नावे व बँकेतून रोख कमी होते म्हणून बँक खाते जमा करण्यात येते

क) **अगोदरचे (मागील) दिवशी मिळालेला धनादेश बँकेत जमा करणे :** वाहक धनादेश मिळाला असता रोख मिळाली असे गृहीत मानले जाते. असे धनादेश जेव्हा बँकेत राशी संग्रहणासाठी पाठविले जातात (जमा केले जातात) तेव्हा रोख रक्कम व्यवसायातून बाहेर जात आहे असे मानले जाते व बँक प्राप्तकर्ता आहे. अशा व्यवहारामुळे बँक शिलकेत वाढ होते आणि रोख शिल्लक कमी होते. या व्यवहाराची नोंद पुढील प्रमाणे करण्यात येते.

रोख पुस्तकाचे प्राप्ती बाजूवर बँक रकान्यात राशी लिहून तपशील रकान्यात रोख खाते असे लिहिले जाते. त्याचप्रमाणे रोख पुस्तकाचे जमा बाजूवर रोख रक्कम या रकान्यात राशी लिहून तपशील रकान्यात बँक खाते असे लिहितात.

**रोजकीर्द नोंद –** बँक खाते नावे

रोख खात्याला

या ठिकाणी बँक प्राप्त कर्ता आहे म्हणून 'बँक खाते' नावे करण्यात येते आणि त्याचबरोबर रोख रक्कम बाहेर जात असल्याने रोख खाते जमा करण्यात येते.

### ५.३.४ रोख व बँक रकाना असलेल्या रोख पुस्तकाचे संतुलन :

या रोख पुस्तकात प्राप्ती (Receipts) व शोधनाच्या नोंदी केल्यानंतर दिवसाचे शेवटी रोख पुस्तकाचे संतुलन करून रोख शिल्लक व बँक शिल्लक काढण्यात येते.

**रोख रकाना (Cash Column) :** हस्तस्थ रोख (Cash in hand) ही नेहमी शोधनाचे रकमेपेक्षा जास्त असते किंवा शोधनाचे रकमेबरोबर असते. म्हणून प्राप्ती बाजूची एकूण बेरीज शोधन बाजूच्या एकूण बेरजेपेक्षा जास्त किंवा बरोबर असते. म्हणून शोधन बाजूची एकूण बेरीज ही प्राप्ती बाजूच्या एकूण बेरजेतून वजा करण्यात येते व आलेल्या शिल्लक रकमेची नोंद रोख पुस्तकाचे शोधन बाजूस रोख रकान्यात लिहून तपशील रकान्यात 'शिल्लक पुढे नेली' किंवा 'शिल्लक खाली नेली' असे लिहिण्यात यावे. ही शिल्लक पुढील लेखांकन अवधीचे प्रारंभीस रोख पुस्तकाचे प्राप्त बाजूवर रोख रकान्यात लिहून तपशील रकान्यात 'शिल्लक पुढे आणली' असे लिहिण्यात यावे.

**बँक रकाना (Bank Columns) :** बँक खाते हे वैयक्तिक खाते होय. या खात्यात नावे किंवा जमा शिल्लक असू शकते. जेव्हा प्राप्ती बाजूची एकूण बेरीज ही शोधन बाजूच्या एकूण जास्त असते तेव्हा या दोन बेरजेतील अंतराला धनात्मक किंवा सामान्य शिल्लक (Positive or Normal Balance) असे म्हणतात. या शिल्लक रकमेची नोंद रोख पुस्तकात शोधन बाजूवर बँक रकान्यात लिहून तपशील रकान्यात शिल्लक पुढे नेली असे लिहिण्यात यावे. पुढील लेखांकन अवधीचे प्रारंभी ही शिल्लक रोख पुस्तकाचे प्राप्ती बाजूवर बँक रकान्यात लिहून तपशील रकान्यात 'शिल्लक पुढे आणली' असे लिहावे.

या उलट जेव्हा शोधन बाजूची एकूण बेरीज प्राप्ती बाजूच्या एकूण बेरजेपेक्षा जास्त असते तेव्हा अशा फरकाला म्हणजेच शिलकेला 'जमा शिल्लक' किंवा 'अधिकोष अधिविकर्ष (Bank Overdraft) (बँक ओव्हरड्राफ्ट)' असे म्हणतात. या शिलकेची नोंद रोख पुस्तकात प्राप्ती बाजूला बँक रकान्यात लिहून तपशील रकान्यात शिल्लक पुढे नेली असे लिहिण्यात यावे पुढील लेखांकन कालावधीचे प्रारंभी हीच शिल्लक म्हणजेच, बँक ओव्हरड्राफ्टची रक्कम रोख पुस्तकाचे शोधन बाजूस बँक रकान्यात लिहून तपशील रकान्यात शिल्लक पुढे आणली असे लिहिण्यात यावी.

**बँक खात्याचे खालील प्रकार आहेत.**

१. **चालू खाते :** चालू खाते हे व्यावसायिकासाठी उपयुक्त आहे कारण या खात्यात त्या बँक कामकाजाच्या वेळेमध्ये कितीही वेळा रक्कम जमा करु शकतो व खात्यातुन रक्कम काढु शकतो सर्वसाधारणपणे या खात्यातील जमा रकमेवर बँक व्याज देत नाही परंतु चालु खाते असलेल्या खातेदाराला बँकेकडून ओव्हरड्राफ्टची सुविधाही प्राप्त होते.

२. **बचत खाते :** ज्या व्यक्तीला स्थिर आणि नियमित उत्पन्न हवे असे अशा व्यक्ती बचत खात्यात ठेवी ठेवतात साधारणपणे या खात्यात रक्कम ठेवणे व काढणे यावर बंधन असते. या खात्यातील जमा रकमेवर खातेदाराला एका निश्चित दराने व्याज दिले जाते. या खात्यावर ओव्हरड्राफ्ट सुविधा उपलब्ध नसते.

३. **मुदती ठेव खाते :** या खात्यात विशिष्ट रक्कम विशिष्ट कालावधीसाठी जास्तीत जास्त व्याज मिळविण्यासाठी ठेवण्यात येते. या खात्यातुन तो विशिष्ट कालावधी संपण्याआधी रक्कम काढता येत नाही. हे खाते नियमित बँकींग व्यवहार करणाऱ्यांसाठी उपयुक्त नाही.

४. **आवर्ती / पुनरावर्ती ठेव खाते :** या खात्यात जमाकर्ता एक विशिष्ट रक्कम विशिष्ट कालावधीकरीता दर महिन्यात जमा करीत असतो. या खात्यात बचत खात्यापेक्षा जास्त दर दिला जातो परंतु मुदती ठेव खात्यापेक्षा व्याजाचा दर कमी असतो. खातेदाराला या खात्यातुन तोपर्यंत रक्कम काढता येत नाही जो पर्यंत तो विशिष्ट कालावधी संपत नाही.

**उदाहरण–१**

**मेसर्स सिमा ट्रेडर्स यांचे दोन रकानी रोख पुस्तक तयार करा.**

जाने २०१९

| | | |
|---|---|---|
| ०१ | रोख रकमेसह व्यवसाय प्रारंभ केला | ₹ ६०,००० |
| ०४ | बँक ऑफ इंडीया मध्ये रक्कम जमा केली | ₹ २५,००० |
| ०६ | रोख खरेदी | ₹ ६,००० |
| १० | कार्यालयीन उपयोगाकरीता संगणक खरेदी केले | ₹ २२,००० |
| १५ | राकेश यांना उधारीवर माल विकला आणि त्यांच्याकडून धनादेश मिळाला | ₹ १०,००० |
| २० | राकेशकडून मिळालेला धनादेश बँकेत जमा केला | |
| २४ | वाहतुक खर्च दिला. | ₹ ३०० |
| २५ | वैयक्तीक उपयोगाकरीता व्यवसायातुन उचलले | ₹ ३,००० |
| ३० | धनादेशाद्वारे भाडे दिले | ₹ १,२०० |

उत्तर : सिमा ट्रेडर्स यांच्या पुस्तकात

नावे दोन रकानी रोख पुस्तक जमा

| दिनांक | प्राप्ती | पा. क्र. | खा. पा. | रोख ₹ | बँक ₹ | दिनांक | शोधन | प्र. क्र. | खा. पा. | रोख ₹ | बँक ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ जाने. १ | भांडवल खाते (भांडवल गुंतवल्याबद्दल) | – | | ६०,००० | – | २०१९ जाने. ४ | बँक खाते (बँकेत रक्कम जमा केल्याबद्दल) | – | प्र.प्र. | २५,००० | – |
| ४ | रोख खाते (बँकेत रक्कम जमा केल्याबद्दल) | – | प्र.प्र. | – | २५,००० | ६ | खरेदी खाते (रोख खरेदीबद्दल) | – | – | ६,००० | – |
| १५ | विक्री खाते (रोख विक्रीबद्दल) | – | | १०,००० | – | १० | संगणक खाते (संगणक खरेदीबद्दल) | – | – | २२,००० | – |
| २० | रोख खाते (बँकेत रक्कम जमा केल्याबद्दल) | – | प्र.प्र. | – | १०,००० | २० | बँक खाते (धनादेश बँकेत जमा केल्याबद्दल) | – | प्र.प्र. | १०,००० | – |
| | | | | | | २४ | वाहतुक खर्च खाते (वाहतूक खर्च केल्याबद्दल) | – | – | ३०० | – |
| | | | | | | २५ | उचल खाते (व्यवसायातून रक्कम उचलल्याबद्दल) | – | – | ३,००० | – |
| | | | | | | ३० | भाडे खाते (धनादेशाद्वारे भाडे दिल्याबद्दल) | – | – | – | १,२०० |
| | | | | | | ३१ | शिल्लक पु./ने | – | – | ३,७०० | ३३,८०० |
| | | | | ७०,००० | ३५,००० | | | | | ७०,००० | ३५,००० |
| फेब्रु. १ | शिल्लक पु./आ | | | ३,७०० | ३३,८०० | | | | | | |

२)	**खालील व्यवहार सुंदर ॲन्ड कंपनीशी संबधित आहेत त्यावरुन दोन रकानी रोखपुस्तक तयार करा.**

| दिनांक | | तपशिल | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| २०१८ | ०१ | बँक शिल्लक | ५२,००० |
| सप्टें. | ०१ | रोख शिल्लक | १५,००० |
| | ०४ | धनादेशाद्वारे मालाची खरेदी | १५,००० |
| | ०८ | मालाची रोखीने विक्री | ८,००० |
| | १३ | धनादेशाद्वारे यंत्रसामुग्री खरेदी केली | १०,००० |
| | १६ | मालाची विक्री केली व धनादेश मिळाला, तो लगेच बँकेत जमा करण्यात आला | १२,००० |
| | १७ | मृणाल कडून रोखीने माल खरेदी केला | १८,००० |
| | २० | धनादेशाद्वारे स्टेशनरी खरेदी केली | २,१०० |
| | २४ | अवधुतला धनादेश दिला | १,८०० |
| | २७ | बँकेतुन रक्कम काढली | १२,००० |
| | ३० | धनादेशाद्वारे भाडे दिले | ५०० |
| | ३० | वेतन दिले | ४,००० |

उत्तर :

## सुंदर अ‍ॅन्ड कंपनीच्या पुस्तकात

नावे — **रोख पुस्तक** — जमा

| दिनांक | प्राप्ती | पा. क्र. | खा. पा. | रोख ₹ | बँक ₹ | दिनांक | शोधन | प्र. क्र. | खा. पा. | रोख ₹ | बँक ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ सप्टें. १ | शिल्लक पु.आ | | | १५,००० | ५२,००० | २०१८ सप्टें. ४ | खरेदी खाते (धनादेशाद्वारे मालाची खरेदी केली) | | | | १५,००० |
| ८ | विक्री खाते (रोख विक्रीबद्दल) | | | ८,००० | – | १३ | यंत्रसामुग्री खाते (धनादेशाद्वारे यंत्र खरेदी केल्याबद्दल) | | | | १०,००० |
| १६ | विक्री खाते (विक्रीबद्दल धनादेश मिळाला) | | | | १२,००० | १७ | खरेदी खाते (रोखीने माल खरेदी केल्याबद्दल) | | | १८,००० | – |
| २७ | बँक खाते (बँकेतून रक्कम काढल्याबद्दल) | | प्र.प्र. | १२,००० | – | २० | स्टेशनरी खाते (धनादेशाद्वारे स्टेशनरी खरेदी केल्याबद्दल) | | | | २,१०० |
| | | | | | | २४ | अवधुत खाते (धनादेश दिल्याबद्दल) | | | | १,८०० |
| | | | | | | २७ | रोख खाते (बँकेतून रक्कम काढल्याबद्दल) | | प्र. प्र. | | १२,००० |
| | | | | | | ३० | भाडे खाते (धनादेशाद्वारे भाडे दिल्याबद्दल) | | | | ५०० |
| | | | | | | ३० | वेतन खाते (वेतन दिल्याबद्दल) | | | ४,००० | – |
| | | | | | | ३० | शिल्लक पु / ने | | | १३,००० | २२,६०० |
| | | | | ३५,००० | ६४,००० | | | | | ३५,००० | ६४,००० |
| ऑक्टो. १ | शिल्लक पु/आ | | | १३,००० | २२,६०० | | | | | | |

**३) खालील व्यवहारांची मेहता ब्रदर्स यांच्या रोख आणि बँक रकाने असलेल्या रोख पुस्तकात नोंद करा.**

ऑक्टोबर २०१८

| | |
|---|---|
| १ | हस्तस्थ रोख ₹ १३,००० आणि बँक शिल्लक ₹ २४,००० |
| ३ | १०% व्यापारी कसरीवर मालाची रोख विक्री ₹ ८०,००० |
| ५ | ₹ ६०,००० किंमतीचा माल १०% व्यापारी कसर खरेदी केला अर्धी रक्कम ताबडतोब ५% रोख कसरीने रोख दिली व उर्वरीत रकमेचा धनादेश दिला. |
| ७ | बँकेत जमा केले ₹ ४०,००० |
| ९ | सुमितकडून वाहक धनादेश मिळाला ₹ ९,५०० |
| १३ | रोखीने मालाची विक्री ४% व्यापारी कसरीवर करण्यात आली. ₹ १२,००० |
| १५ | जीवन विमा प्रव्याजीचे दिले ₹ ४,००० |
| १८ | ९ ऑक्टोंबर २०१८ रोजी मिळालेला धनादेश बँकेत जमा केला. |
| २२ | प्रभाकर कडून रेखांकीत धनादेश मिळाला ₹ ६,००० |
| २७ | व्यवसायात ₹ २५,००० अतिरीक्त भांडवल गुंतविले व ते बँकेत जमा करण्यात आले. |
| २८ | विद्युत बिल भरले ₹ ३,००० आणि टेलीफोन बिल भरले ₹ ४,१०० |
| ३० | लाभांशाबद्दल रेखांकीत धनादेश मिळाला ₹ ६,२५०. |

उत्तर : **मेहता ब्रदर्स यांच्या पुस्तकात**

**नावे** **रोखपुस्तक** **जमा**

| दिनांक | प्राप्ती | पा. क्र. | खा. पा. | रोख ₹ | बँक ₹ | दिनांक | शोधन | प्र. क्र. | खा. पा. | रोख ₹ | बँक ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ ऑक्टो. १ | शिल्लक पु./आ. | | | १३,००० | २४,००० | २०१८ ऑक्टो. ५ | खरेदी खाते (खरेदीबद्दल) | | | २५,६५० | २५,६५० |
| ३ | विक्री खाते (रोख माल विकल्याबद्दल) | | | ७२,००० | – | ७ | बँक खाते (बँकेत रक्कम जमा केल्याबद्दल) | | प्र.प्र. | ४०,००० | – |
| ७ | रोख खाते (बँकेत रक्कम जमा केल्याबद्दल) | | प्र.प्र. | – | ४०,००० | १५ | उचल खाते (जीवन विमा प्रव्याजी दिल्याबद्दल) | | | ४,००० | – |
| ९ | सुमित खाते (धनादेश मिळाल्याबद्दल) | | | ९,५०० | – | १८ | बँक खाते (धनादेश बँकेत जमा केल्याबद्दल) | | प्र.प्र. | ९,५०० | – |
| १३ | विक्री खाते (रोखीने माल विकल्याबद्दल) | | | ११,५२० | – | २८ | विद्युत बिल खाते (विद्युत बिल भरल्याबद्दल) | | | ३,००० | – |
| १८ | रोख खाते (धनादेश बँकेत जमा केल्याबद्दल) | | प्र.प्र. | – | ९,५०० | २८ | टेलीफोन बिल खाते (टेलीफोन बिल भरल्याबद्दल) | | | ४,१०० | – |
| २२ | प्रभाकर खाते (रेखांकित धनादेश मिळाल्याबद्दल) | | | – | ६,००० | ३१ | शिल्लक पु /ने | | | १९,७७० | ८५,१०० |
| २७ | भांडवल खाते (अतिरिक्त भांडवल बँकेत जमा केल्याबद्दल) | | | – | २५,००० | | | | | | |
| ३० | लाभांश खाते (लाभांशबद्दल रेखांकित धनादेश मिळाल्याबद्दल) | | | – | ६,२५० | | | | | | |
| | | | | १,०६,०२० | १,१०,७५० | | | | | १,०६,०२० | १,१०,७५० |
| नोव्हे. १ | शिल्लक पु./आ. | | | १९,७७० | ८५,१०० | | | | | | |

**कार्य टीप :**

५ ऑक्टोंबर २०१८ चा व्यवहार शुद्ध रोख खरेदी = रोख खरेदी १०% व्यापारी करार

= ₹ ६०,००० – ₹ ६,००० = ₹ ५४,०००

रक्कम दिली = शुद्ध रोख खरेदी – ५% रोख कसर

= ₹ ५४००० – ५% ₹ ५४,०००

कसर पूर्ण करा – = ₹ ५४,००० – ₹ २,७०० = ₹ ५१,३००

अर्धी (१/२) रक्कम रोख दिली = ₹ ५१,३०० x १/२ ₹ २५,६५०

उर्वरीत रकमेचा धनादेश दिला = ₹ ५१,३०० – ₹ २५,६५० = ₹ २५,६५०

**४) गुरुदक्षिणा ब्रदर्स यांचे दोन रकानी रोख पुस्तक तयार करा. (स्पष्टीकरणाची आवश्यकता नाही.)**

| | | |
|---|---|---|
| २०१८ मार्च | १ | रोख शिल्लक ₹ १३,००० आणि बँक शिल्लक ₹ १८,००० |
| | २ | नेहा कडून रक्कम मिळाली ₹ १,७०० आणि धनादेश प्राप्त झाला ₹ ५००. |
| | ७ | धनराजला धनादेशाद्वारे दिले ₹ ६,००० |
| | ८ | रोख विक्री ₹ ६,५४५ आणि कसर दिली ₹ ५५ |
| | १० | २ मार्च २०१९ रोजी प्राप्त झालेला धनादेश बँकेत जमा केला |
| | १२ | बँकेत जमा केले ₹ ५,००० |
| | १३ | प्राचीकडून उधारीवर माल खरेदी केला ₹ ५,००० |
| | १५ | नेहा कडून मिळालेला धनादेश अनादरीत झाला |
| | २० | ७% व्यापारी कसरीवर स्विटी कडून ₹५,००० किमतीचा माल खरेदी केला आणि अर्धी रक्कम ताबडतोब दिली. |
| | २२ | बँकेला विमा हप्त्याचे ₹ १,००० दिले आणि गुंतवणुकीवरील व्याज गोळा केले ₹ १,६५० |
| | २४ | धनराजला दिलेल्या धनादेशाचे अनादरण झाले. |
| | २६ | गुप्ता स्टोअर्स यांनी परस्पर आपल्या बँक खात्यात र ₹७,५०० भरले. |
| | ३० | ₹३,९२० पेक्षा जास्तीची रक्कम बँकेत जमा करण्यात आली |

### गुरु दक्षिणा ब्रदर्स यांच्या पुस्तकात

**नावे :** **रोख पुस्तक** **जमा**

| दिनांक | प्राप्ती | पा. क्र. | खा. पा. | रोख ₹ | बँक ₹ | दिनांक | शोधन | प्र. क्र. | खा. पा. | रोख ₹ | बँक ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ मार्च | | | | | | २०१९ मार्च | शिल्लक पु.आ | | | | १८,००० |
| १ | शिल्लक पु.आ. | | | १३,००० | | ७ | धनराज खाते | | | | ६,००० |
| २ | नेहा खाते | | | २,२०० | | | | | | | |
| ८ | विक्री खाते | | | ६,५४५ | | १० | बँक खाते | | प्र.प्र | ५०० | – |
| १० | रोख खाते | | प्र.प्र. | | ५०० | १२ | बँक खाते | | प्र.प्र | ५,००० | – |
| १२ | रोख खाते | | प्र.प्र. | | ५,००० | १५ | नेहा खाते | | | | ५०० |
| २२ | गुंतवणुकीवर व्याज खाते | | | | १,६५० | २० | खरेदी खाते | | | २,३२५ | – |
| २४ | धनराज खाते | | | | ६,००० | २२ | विमा हप्ता खाते | | | | १,००० |
| २६ | गुप्ता स्टोअर्स खाते | | | | ७,५०० | ३० | बँक खाते | | प्र.प्र | १०,००० | |
| ३० | रोख खाते | | प्र.प्र. | | १०,००० | ३१ | शिल्लक पु./ने | | | ३,९२० | ५,१५० |
| | | | | २१,७४५ | ३०,६५० | | | | | २१,७४५ | ३०,६५० |
| एप्रिल १ | शिल्लक पु/आ. | | | ३,९२० | ५,१५० | | | | | | |

**कार्य टीपा :**

१) २० मार्च २०१९ चा व्यवहार

| | |
|---|---|
| खरेदी मालाचे एकूण मूल्य | ₹ ५,००० |
| (–) ७% व्यापारी कसर | ₹ ३५० |
| निव्वळ खरेदी किंमत | ₹ ४,६५० |

४,६५०x १/२ = २३२५

१/२ रक्कम रोख दिली ₹ २,३२५ १/२ रक्कम उधार ₹ २,३२५

२) ३० मार्च २०१९ चा व्यवहार

₹ ३,९२० पेक्षा अतिरिक्त रक्कम बँकेत जमा करण्यात येणाऱ्या राशीचे (Calculation) आगणन खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| रोख रकान्याच्या प्राप्ती बाजूची बेरीज | ₹ २१,७४५ |
| (–) रोख रकान्याच्या शोधन बाजूची बेरीज | ₹ ७,८२५ |
| शिल्लक रक्कम | ₹ १३,९२० |
| (–) व्यवसायात ठेवायची रोख | ₹ ३,९२० |
| बँकेच जमा करावयाची रक्कम | ₹ १०,००० |

टिप :– १३ मार्चचा व्यवहार उधारीचा असल्यामुळे त्याची नोंद रोख पुस्तकात करण्यात आली नाही.

## ५.४ लघु रोख पुस्तक

मोठ्या व्यावसायिक संस्थांमध्ये लेखांकनाचे काम व्यवस्थितपणे विभागलेले असते. विविध विभागात किरकोळ खर्च होतात जसे लेखनसामग्री, टपालखर्च, चहापाणी, गाडीभाडे इत्यादी परंतु जेव्हा त्यांची संख्या वाढते तेव्हा ते ज्या स्वतंत्र पुस्तकात नोंदविले जातात त्यालाच लघुरोख पुस्तक असे म्हणतात.

लघुरोख पुस्तक लिहिण्याचे काम करणाऱ्या व्यक्तीला लघुरोखपाल असे म्हणतात. लघुरोखपालास प्रत्येक महिन्याच्या सुरवातीला मुख्यरोखपालाकडून अग्रिम रक्कम देण्यात येते. सर्व प्रकारचे किरकोळ खर्च भागविण्यासाठी आणि लघुरोख पुस्तकात नोंदवून ठेवण्यासाठी.

इंग्रजी भाषेतील petty हा शब्द फ्रेंच भाषेतील Petit या शब्दापासून उद्धृत करण्यात आला आहे. Petit या शब्दाचा अर्थ लहान असा होतो. तर लघुरोख पुस्तकात किरकोळ रकमांचे व्यवहार नोंदविले जातात. ज्याचे शोधन धनादेशाद्वारे केले जात नाही.

**लघुरोख पुस्तकाचे प्रकार :**

१) साधे लघु रोख पुस्तक

२) विश्लेषण किंवा रकानेयुक्त् लघु रोख पुस्तक

**१) साधे लघु रोख पुस्तक :**

साधे लघु रोख पुस्तक दोन बाजुमध्ये विभागले जाते. i) प्राप्ती बाजू (ii) शोधन बाजू मुख्य रोखपालाकडून प्राप्त झालल्या रकमेची किंवा धनादेशाची नोंद प्राप्ती बाजूवर करण्यात येते व शोधन करण्यात आलेल्या लघु खर्चाची नोंद शोधन बाजूवर करण्यात येते लघुरोख पुस्तकात नोंदविलेल्या व्यवहारांची खातेवहीत संबंधित विशिष्ट खर्चाच्या खात्यात खतावणी करण्यात येते. ह्या करीता अतिरिक्त श्रम व वेळेची गरज असते. म्हणून सर्वसाधारण व्यवहारात व्यावसायिक लघु रोख पुस्तक ठेवत नाहीत.

**खालील दिलेल्या व्यवहारांवरुन साधे लघुरोख पुस्तक तयार करा.**

**नोहा ब्रदर्स यांच्या पुस्तकात**

| दिनांक | व्यवहारांचा तपशिल | रक्कम (₹) |
|---|---|---|
| २०१९ | | |
| जानेवारी ०१ | मुख्य रोखपालाकडून मिळाले | १,२०० |
| ०४ | टेलीफोन खर्चाचे दिले | १९३ |
| ०७ | मोबाईल खर्चाचे दिले | ५७ |
| १० | कार्यालय फाईल्स खरेदी | १२५ |
| १४ | सेवकाला बक्षिस दिले | ४० |
| १६ | जुन्या वर्तमानपत्राची विक्री | ६० |
| १९ | स्विटीला अग्रिम दिले | १०० |
| २२ | बांधणी खर्चाचे दिले | १७० |
| २४ | जाहीरात खर्चाचे दिले | १२० |
| २६ | सफाई खर्चाचे दिले | ६० |
| २८ | देणगी दिली | १०१ |
| ३० | पावती तिकीटांची खरेदी | ६० |

उत्तर

**साधे लघु रोख पुस्तक**

| प्राप्त रक्कम (₹) | दिनांक | विवरण किंवा तपशिल | प्रमाणक क्रमांक | खा.पा. | एकूण खर्च रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| १,२०० | २०१९ जानेवारी १ | रोख खाते | | | |
| | ४ | टेलीफोन खर्च खाते | | | १९३ |
| | ७ | मोबाईल खर्च खाते | | | ५७ |
| | १० | कार्यालय फाईल्स खरेदी खाते | | | १२५ |
| | १४ | सेवकाला बक्षिस खाते | | | ४० |
| ६० | १६ | जुने वर्तमानपत्र विक्री खाते | | | १०० |
| | १९ | स्विटी खाते | | | – |
| | २२ | बांधणी खर्च खाते | | | १७० |
| | २४ | जाहिरात खर्च खाते | | | १२० |
| | २७ | सफाई खर्च खाते | | | ६० |
| | २८ | देणगी खाते | | | १०१ |
| | ३० | पावती तिकीटे खाते | | | ६० |
| | | एकूण खर्च | | | १,०२६ |
| | ३१ | शिल्लक पु / ने | | | २३४ |
| १,२६० | | | | | १,२६० |
| २३४ | २०१९ फेब्रु., १ | शिल्लक पु / आ | | | |

२) **विश्लेषणात्मक लघुरोखपुस्तक / रकानेयुक्त लघुरोख पुस्तक :**

विश्लेषणात्मक लघुरोखपुस्तक दोन बाजूमध्ये विभागले जाते डावीकडील बाजुवर रोख प्राप्ती तर उजवीकडील बाजुवर रोख शोधनाच्या नोंदी केल्या जातात. विश्लेषणात्मक रोख पुस्तकाचे शोधन बाजूस वारंवार होणाऱ्या विभिन्न खर्चासाठी आवश्यक तेवढे रकाने केले जातात. उदाहरणार्त छपाई व लेखनसामग्री, टपाल, गाडीभाडे आणि हमाली इत्यादी. विविध किरकोळ स्वरुपाचे खर्च नोंदविण्यास हे रकाने उपयोगी आहेत. विश्लेषणात्मक लघु रोख पुस्तकात खर्चाच्या नोंदीकरीत रकान्याची संख्या किती असावी ह्या संबंधी कोणतेही कठोर नियम नाहीत. या रकान्या व्यतीरिक्त वैयक्तीक आणि वास्तविक खात्याशी संबधीत शोधना करीता एक स्वतंत्र रकाना असतो. लघुरोखपाल झालेल्या विविध खर्चाचे संक्षिप्त विवरण तयार करुन मुख्यरोखपालास देतो. त्यामुळे व्यावसायिक जगतात विश्लेषणात्मक लघुरोख पुस्तक फारच व उपयोगी आहे.

**अग्रधन पद्धती :** लघुरोख पुस्तक ठेवण्याची ही एक लोकप्रिय पद्धत होय. या पद्धती अंतर्गत एका विशिष्ट अवधीत होणाऱ्या लघुरोख खर्चाचा अंदाज घेतला जातो ही अंदाजीत रक्कम मुख्यरोखपाल लघुरोखपालास त्या विशिष्ट अवधीतील लहान खर्च भागविण्यासाठी अग्रिम म्हणून देतो. विशिष्ट कालावधी संपल्यावर रोख पुस्तकाचे संतुलन करण्यात येते. लघुरोखपाल लघु खर्चाचा सारांश तयार करतो आणि मुख्य रोखपालास सादर करतो. लघुरोखपालाने सादर केलेल्या विवरणांची अचुकता पडताळुन पाहण्यासाठी, मुख्यरोखपाल त्याची तपासणी करतो. त्या नंतर मुख्यरोखपाल लघुरोखपालास मागील कालावधीत खर्च करण्यात आलेल्या रकमेइतकी रक्कम देतो. या पद्धीलाच अग्रधन पध्दती किंवा अग्रदाय पध्दती असे म्हणतात.

## विश्लेषणात्मक लघुरोख पुस्तक (प्रारूप)

| प्राप्त रक्कम ₹ | रो. पु. पृ. | दिनांक | तपशील | प्र. क्र. | एकूण रक्कम ₹ | छपाई व सामग्री ₹ | डाक ₹ | गाडीभाडे व हमाली ₹ | प्रवास खर्च ₹ | विविध खर्च ₹ | दूरध्वनी खर्च ₹ | खा. पा. | खाते वही खाते ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| XX | | | ----------------- | | | | | | | | | | |
| | | | ----------------- | | XX | | XX | | | | | | |
| | | | ----------------- | | XX | | | | | | | | XX |
| | | | ----------------- | | XX | | | | XX | | | | |
| | | | ----------------- | | XX | | | | | | XX | | |
| | | | ----------------- | | XX | | | | | XX | | | |
| | | | ----------------- | | XX | XX | | | | | | | |
| | | | ----------------- | | XX | | | XX | | | | | |
| | | | एकूण खर्च | – | XXX | XX | XX | XX | XX | XX | XX | | XX |
| | | | शिल्लक पु / ने | | XX | | | | | | | | |
| XXX | | | | | XXX | | | | | | | | |
| XX | | | शिल्लक पु / आ. | | | | | | | | | | |
| XXX | | | ----------------- | | | | | | | | | | |

**उदा. १ :** राजे मोबाईल कंपनीच्या सौरभ या लघुरोखपालास १ जून २०१९ रोजी मुख्यरोखपाल कडुन ₹ ८,००० मिळाले. जून महिन्यातील विविध खर्च खालील प्रमाणे आहेत. त्यावरुन लघु रोख पुस्तक तयार करा.

| दिनांक | व्यवहाराचा तपशिल | रक्कम (₹) |
|---|---|---|
| २०१९ जून | | |
| १ | ॲटो भाडे दिले | २५५ |
| ३ | कुरिअर खर्चाचे दिले | ६० |
| ४ | पोस्टाची तिकीटे खरेदी केली | २१० |
| ५ | रबर, पेन, पेन्सिलची खरेदी | ५२५ |
| ६ | जलद डाक खर्च दिला | १९८ |
| ८ | टॅक्सी भाडे | ३९० |
| ८ | अल्पोपहार | ८५० |
| १० | ॲटो भाडे | ३१० |
| १२ | नोंदणीकृत टपाल शुल्क | १४२ |
| १३ | फाईल खरेदी | ४५ |
| १४ | गाडी भाडे | ६५ |
| १६ | संगणक स्टेशनरी खरेदी | १,६५० |
| १९ | बस भाडे | २४० |
| १९ | मोबाईल खर्च | २७० |
| २० | कार्यालय स्वच्छता शुल्क दिले | १६० |
| २२ | अल्पोपहार | ४५० |
| २३ | झेरॉक्स शुल्काचे दिले | २७० |
| २८ | कुरिअर खर्च | १४० |
| २९ | माल उतरविण्याचे शुल्क | १७० |
| ३० | बस भाडे | १५० |

**उत्तर–१**

राजे मोबाईल कंपनी लातूर यांच्या पुस्तकात
लघुरोख पुस्तक

| प्राप्त रक्कम ₹ | दिनांक | तपशील | प्र. क्र. | एकूण ₹ | कुरीअर/टपाल ₹ | टेलिफोन (₹) | प्रवास/वाहतुक खर्च (₹) | छपाई व लेखन सामग्री (₹) | विविध खर्च (₹) | खा.पा. | खतावणी ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८,००० | २०१९ जून १ | रोख खाते | – | | | | | | | | |
| | १ | ॲटो भाडे | – | २५५ | | | २५५ | | | | |
| | ३ | कुरिअर खर्च | – | ६० | ६० | | | | | | |
| | ४ | पोस्ट तिकीट | – | २१० | २१० | | | | | | |
| | ५ | रबर, पेन, पेन्सिल खरेदी | – | ५२५ | | | | ५२५ | | | |
| | ६ | जलद डाक खर्च दिला | – | १९८ | १९८ | | | | | | |
| | ८ | टॅक्सी भाडे | – | ३९० | | | ३९० | | | | |
| | ८ | अल्पोपहार | – | ८५० | | | | | ८५० | | |
| | १० | ॲटो भाडे | – | ३१० | | | ३१० | | | | |
| | १२ | नोंदणीकृत पोस्टल शुल्क | – | १४२ | १४२ | | | | | | |
| | १३ | फाईल खरेदी | – | ४५ | | | | ४५ | | | |
| | १४ | गाडी भाडे | – | ६५ | | | | | ६५ | | |
| | १६ | संगणक स्टेशनरी | – | १,६५० | | | | १,६५० | | | |
| | १९ | बस भाडे | – | २४० | | | २४० | | | | |
| | १९ | मोबाईल खर्च | – | २७० | | | | | २७० | | |
| | २० | कार्यालय स्वच्छता शुल्क | – | १६० | | | | | १६० | | |
| | २२ | अल्पोपहार | – | ४५० | | | | | ४५० | | |
| | २३ | झेरॉक्स शुल्क | – | २७० | | २७० | | | | | |
| | २८ | कुरिअर खर्च | – | १४० | १४० | | | | | | |
| | २९ | माल उतरविण्याचे शुल्क | – | १७० | | | | | १७० | | |
| | ३० | बसभाडे | – | १५० | | | १५० | | | | |
| | | **एकूण खर्च** | – | ६,५५० | ७५० | २७० | १,३४५ | २,२२० | १,९६५ | | |
| | ३० | शिल्लक पु / ने | | १,४५० | | | | | | | |
| ८,००० | | | | ८,००० | | | | | | | |
| १,४५० | २०१९ जुलै ०१ | शिल्लक पु / आ | | | | | | | | | |

वरील विश्लेषणात्मक लघुरोख पुस्तकाच्या आधारे रोजकिर्द नोंदी आणि खतावणी करा.
उततर–१

राजे मोबाईल कंपनीच्या पुस्तकात रोजकीर्द नोंदी

| दिनांक | तपशील | खा.पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम(₹) |
|---|---|---|---|---|
| २०१९<br>जून १ | लघुरोख खाते नावे<br>रोख खात्याला<br>(मुख्य रोखपालाकडून रक्कम मिळाली) | | ८,००० | ८,००० |
| जून ३० | कुरिअर आणि टपाल खर्च खाते................ नावे<br>टेलीफोन खर्च खाते ................ नावे<br>प्रवास व वाहतुक खर्च खाते................ नावे<br>छपाई व सामग्री खाते ................ नावे<br>विविध किरकोळ खर्च खाते ................ नावे<br>लघुरोख खाते<br>(लघुखर्च लघुरोखपुस्तकात नोंदविल्या बद्दल) | | ७५०<br>२७०<br>१,३४५<br>२,२२०<br>१,९६५ | ६,५५० |

राजे मोबाईल कंपनीच्या पुस्तकात खतावणी

नावे लघुरोख खाते जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९<br>जून १ | रोख खाते | | ८,००० | २०१९<br>जून ३० | विविध खर्च लघुरोख पुस्तकावरून | | ६,५५० |
| | | | | ३० | शिल्लक पु/ने | | १,४५० |
| | | | ८,००० | | | | ८,००० |

नावे कुरिअर आणि टपाल खाते जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९<br>जून ३० | लघुरोख खाते | | ७५० | | | | |
| | | | ७५० | | | | |

नावे **टेलिफोन खर्च खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९<br>जून ३० | लघुरोख खाते | | २७० | | | | |
| | | | २७० | | | | |

नावे **प्रवास व वाहतुक खर्च खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९<br>जून ३० | लघु रोख खाते | | १,३४५ | | | | |
| | | | १,३४५ | | | | |

नावे **छपाई व सामग्री खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९<br>जून ३० | लघु रोख खाते | | २,२२० | | | | |
| | | | २,२२० | | | | |

नावे **विविध किरकोळ खर्च खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९<br>जून ३० | लघु रोख खाते | | १,९६५ | | | | |
| | | | १,९६५ | | | | |

**उदाहरण २ – जुलै २०१८ या महिन्यातील पुढील व्यवहारांच्या नोंदी अग्रधन पध्दतीनुसार विश्लेषणात्मक रोख पुस्तकात करा.**

| दिनांक | | व्यवहाराचा तपशिल | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| २०१८ | १ | रोख शिल्लक | ३३५ |
| जुलै १ | १ | मुख्य रोखपालाकडून मिळाले | २,१६५ |
| | २ | लेखनिक ओंकारला | २५१ |
| | ५ | स्पिड पोस्ट आणि रजिस्टर साठी दिले. | २४० |
| | ६ | जुन्या वर्तमान पत्रांची विक्री | १०० |
| | ७ | सेवकास धुलाई खर्च दिला | १७० |
| | १० | विक्रेत्याला भोजनाचे बिल दिले | १६० |
| | १३ | अरुण या सेवकाला अग्रिम दिले | ५०० |
| | १६ | वाहतुक खर्च आणि गाडीभाडे दिले | १८० |
| | १९ | कार्यालयीन उपयोगाकरीता खुर्ची खरेदी केली | ३०० |
| | २२ | स्टॅम्प पॅड, पेपर आणि पेन्सीलची खरेदी | १७० |
| | २६ | कार्यालयाकरीता फाईल्स खरेदी | ११० |
| | ३० | यंत्र दुरुस्तीला दिले | २३० |

उत्तर :

...................... यांचे पुस्तकात

## विश्लेषणात्मक लघु रोख पुस्तक (अग्रधन पध्दतीनुसार)

| प्राप्त रक्कम ₹ | दिनांक | तपशील | प्र. क्र. | एकूण ₹ | खर्चाचे विश्लेषण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | टपाल खर्च ₹ | छपाई लेखन सामुग्री ₹ | वाहतूक व गाडीभाडे ₹ | दुरूस्ती ₹ | विविध खर्च ₹ | खा. पा. | खातेवही लेखा ₹ |
| | २०१८, | | | | | | | | | | |
| ३३५ | जुलै १ | शिल्लक पु / आ. | | | | | | | | | |
| २,१६५ | १ | रोख खाते | | | | | | | | | |
| | २ | लेखनिकास बक्षीस | | २५१ | | | | | २५१ | | |
| | ५ | नोंदणी व जलद टपाल | | २४० | २४० | | | | | | |
| १०० | ६ | जुन्या वर्तमानपत्रांची विक्री | | | | | | | | | |
| | ७ | धुलाई खर्च | | १७० | | | | | १७० | | |
| | १० | भोजन बिल | | १६० | | | | | १६० | | |
| | १३ | अरूणला अग्रिम | | ५०० | | | | | | | ५०० |
| | १६ | वाहतुक खर्च व गाडीभाडे | | १८० | | | १८० | | | | |
| | १९ | खुर्ची | | ३०० | | | | | | | ३०० |
| | २२ | स्टॅम्प पॅड, पेपर, पेन्सील इ. | | १७० | | १७० | | | | | |
| | २६ | कार्यालय फाईल्स | | ११० | | ११० | | | | | |
| | ३० | दुरूस्ती | | २३० | | | | २३० | | | |
| | | **एकूण खर्च** | | २,३११ | २४० | २८० | १८० | २३० | ५८१ | | ८०० |
| | ३१ | शिल्लक पु / ने | | २८९ | | | | | | | |
| २,६०० | | | | २,६०० | | | | | | | |
| २८९ | ऑगस्ट १ | शिल्लक पु / आ | | | | | | | | | |
| २,३११ | ऑगस्ट १ | रोख खाते | | | | | | | | | |

**उदा. ३ – ऑगस्ट २०१८ मधील खालील व्यवहार अग्रधन पध्दतीवर आधारीत विश्लेषणात्मक लघुरोख पुस्तकात लिहा. अग्रधन रक्कम ₹ २,००० एवढी ठेवण्यात यावी.**

| दिनांक | व्यवहाराचा तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|
| २०१९ ऑगस्ट १ | सुरवातीची लघुरोख शिल्लक | १५० |
| १ | मुख्य रोखपालाकडून धनादेश मिळाला. | १,८५० |
| ५ | वाहतुक खर्च दिला | १८ |
| ५ | पाकिटांची खरेदी | ६५ |
| ६ | धुलाई आणि सफाई खर्चाचे दिले | ८० |
| ८ | टेलीफोन खर्चाचे दिले | २८० |
| १० | देणगी दिली | २५० |
| १४ | वर्तमान पत्राची वर्गणी दिली | १२० |
| १९ | पोस्ट कार्ड खरेदी | ६० |
| १९ | पावती तिकीटांची खरेदी | ४५ |
| २२ | अल्पोपहारासाठी दिले | २०० |
| २६ | ॲटो भाड्यासाठी दिले | ५५ |
| २७ | मजुरी दिली | ७५ |
| २८ | यंत्र दुरुस्ती खर्चासाठी दिले | १८० |
| ३० | श्रीमान कृष्णा यांना दिले | ५०० |

उत्तर ३ :

**................... यांचे पुस्तकात**

**विश्लेषणात्मक लघु रोख पुस्तक**

| प्राप्त रक्कम ₹ | दिनांक | तपशील | प्र. क्र. | एकूण ₹ | खर्चाचे विश्लेषण: वाहतुक खर्च ₹ | छपाई व स्टेशनरी ₹ | टेलीफोन खर्च ₹ | टपाल खर्च ₹ | प्रवास खर्च ₹ | मजुरी ₹ | दुरूस्ती ₹ | विविध खर्च ₹ | खा. पा. | खाते वही लेखा ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१८, ऑगस्ट | | | | | | | | | | | | | |
| १५० | १ | शिल्लक पु / आ | | | | | | | | | | | | |
| १,८५० | १ | बँक खाते | | | | | | | | | | | | |
| | ५ | वाहतुक खर्च | | १८ | १८ | | | | | | | | | |
| | ५ | छपाई खर्च | | ६५ | | ६५ | | | | | | | | |
| | ६ | स्वच्छता व धुलाई खर्च | | ८० | | | | | | | | ८० | | |
| | ८ | टेलीफोन खर्च | | २८० | | | २८० | | | | | | | |
| | १० | देणगी | | २५० | | | | | | | | २५० | | |
| | १४ | वर्तमानपत्र वर्गणी | | १२० | | | | | | | | १२० | | |
| | १९ | पोस्टकार्ड खरेदी | | ६० | | | | ६० | | | | | | |
| | १९ | पावती तिकीट खरेदी | | ४५ | | | | | | | | ४५ | | |
| | २२ | अल्पोपहार खर्च | | २०० | | | | | | | | २०० | | |
| | २६ | ऑटो भाडे | | ५५ | | | | | ५५ | | | | | |
| | २७ | मजुरी | | ७५ | | | | | | ७५ | | | | |
| | २८ | दुरूस्ती खर्च | | १८० | | | | | | | १८० | | | |
| | ३० | श्रीमान कृष्णा खाते | | ५०० | | | | | | | | | | ५०० |
| | | **एकूण खर्च** | | १,९२८ | १८ | ६५ | २८० | ६० | ५५ | ७५ | १८० | ६९५ | | ५०० |
| | ३१ | शिल्लक पु / ने | | ७२ | | | | | | | | | | |
| २,००० | | | | २,००० | | | | | | | | | | |
| ७२ | सप्टें. १ | शिल्लक पु / आ | | | | | | | | | | | | |
| १,९२८ | सप्टें. १ | रोख खाते | | | | | | | | | | | | |

## ५.५ खरेदी पुस्तक (Purchase Book):

खरेदी पुस्तकात केवळ त्या मालाची नोंद करण्यात येते जो माल वस्तुंची निर्मिती किंवा उत्पादन करण्यासाठी किंवा पुन:विक्री करण्यासाठी उधारीवर खरेदी करण्यात येतो. रोख खरेदीच्या व्यवहारांची नोंद खरेदी पुस्तकात करण्यात येत नाही. त्याच प्रमाणे माला शिवाय खरेदी केलेल्या इतर कोणत्याही वस्तु जसे कार्यालयीन उपकरणे, उपस्कर, लेखनसामग्री आणि इमारत इत्यादिची नोंद खरेदी पुस्तकात करण्यात येत नाही. उदाहरणार्थ व्यवहारांची नोंद खरेदी पुस्तकात होणार नाही.

उधारीने खरेदी केलेल्या मालाची नोंद करताना ती शुध्द रकमेने / किमतीने करण्यात यावी.

**खरेदी पुस्तकाचे प्रारुप**

**............... यांचे खरेदी पुस्तक**

| दिनांक | आवक बिजक क्र. | पुरवठादाराचे नाव | खा. पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**उदा. १) नोहा ट्रेडर्स यांच्या पुस्तकात खरेदी पुस्तक तयार करा.**

| | |
|---|---|
| एप्रिल २०१९ १ | श्रीमती कमल यांचे कडून ₹ १,००० चा माल उधार खरेदी केला (आवक बिजक क्र.४) |
| ४ | साक्षी यांचे कडून रोखीने मालाची खरेदी ₹ ५०० |
| ५ | मशिनरी टुल्स कंपनी कडून उधारीने मशीन खरेदी केले ₹ ५,००० |
| ८ | सौरभ यांचेकडून उधार माल खरेदी केला ₹ २,००० (आवक बिजक क्र.१०) |
| १० | एश्वर्या यांचेकडून उधारीवर मालाची खरेदी केली ₹ ५,००० (आवक बिजक क्र.११) |

**नोहा ट्रेडर्स यांचे खरेदी पुस्तक**

| दिनांक | पुस्तकाचे नाव | आवक बिजक क्र. | खा.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| एप्रिल २०१९ | | | | |
| १ | श्रीमती कमल | ४ | | १,००० |
| ८ | सौरभ | १० | | २,००० |
| १० | ऐश्वर्या | ११ | | ५,००० |
| | | एकूण | | ८,००० |

**टीपा :** १) ४ एप्रिल २०१९ च्या व्यवहाराची नोंद खरेदी पुस्तकात होणार नाही कारण तो रोख व्यवहार आहे.

२) ५ एप्रिल २०१९ च्या व्यवहाराची नोंद मुळ रोजकिर्दीत होईल म्हणून या व्यवहाराची नोंद खरेदी पुस्तकात होणार नाही.

२) **पुढील व्यवहारांची नोंद मेसर्स कोनिका इलेक्ट्रानिक्स यांच्या खरेदी पुस्तकात करा आणि खतावणी करून ३१ ऑगस्ट २०१८ रोजीची तेरीज तयार करा.**

| दिनांक | व्यवहाराचा तपशील |
|---|---|
| ऑगस्ट २०१८<br>३ | मेसर्स सीमा इलेक्ट्रानिक्स यांचे कडून माल खरेदी गेला<br>(आवक बिजक क्र. २२५०)<br>२० लहान मोबाईल प्रत्येकी ₹ २,००० प्रमाणे<br>१२ होम थिएटर प्रत्येकी ₹ ४,५०० प्रमाणे<br>२० % व्यापारी कसरीवर |
| १० | पवन इलेक्ट्रानिक्स कडून माल खरेदी<br>(आवक बिजक क्र. २८६०)<br>१०० पेन ड्राइव्ह प्रत्येकी ₹ २१० प्रमाणे १० % व्यापारी कसरीवर |
| १६ | मॉडर्न इलेक्ट्रानिक्स कडून माल खरेदी<br>(आवक बिजक क्र. २४५६)<br>१५ (Stereos) स्टिरीओ प्रत्येकी ₹ ४,२०० प्रमाणे<br>२० रंगीत LCD प्रत्येकी ₹ १४,००० प्रमाणे<br>१२.५ % व्यापारी कसरीवर |
| २६ | सीमा इलेक्ट्रानिक्स कडून मालाची खरेदी<br>(आवक बिजक क्र. २३९४)<br>१० छोटे (लहान) LCD प्रत्येकी ₹ ८,००० प्रमाणे<br>६ LED प्रत्येकी ₹ १२,५०० प्रमाणे<br>२० % व्यापारी कसरीवर |
| २९ | पवन इलेक्ट्रानिक्स कडून आणले.<br>(आवक बिजक क्र. २९६०)<br>५० पेन ड्राइव्ह प्रत्येकी ₹ २१० प्रमाणे<br>२०% व्यापारी कसरीवर |

२) पुढील व्यवहारांची नोंद मेसर्स कोनिका इलेक्ट्रानिक्स यांच्या खरेदी पुस्तकात करा.

**उतर :** **कोनिका इलेक्ट्रॉनिक्स यांचे खरेदी पुस्तक**

| दिनांक | पुरवठारादाचे नाव | | खा.पा. | आवक बिजक क्र. | रक्कम( ₹) |
|---|---|---|---|---|---|
| ऑगस्ट २०१८ ३ | **सीमा इलेक्ट्रॉनिक्स** | ₹ | | २,२५० | |
| | २० T.V. ₹ २,००० प्रमाणे | ४०,००० | | | |
| | १२ होमथएिटर ₹ ४,५०० | ५४,००० | | | |
| | | ९४,००० | | | |
| | (–) २०% व्यापारी कसर कपात | १८,८०० | | | ७५,२०० |
| १० | **पवन इलेक्ट्रॉनिक्स** | | | २,८६० | |
| | १०० पेन ड्राइव्ह ₹ २१० प्रमाणे | २१,००० | | | |
| | (–) १०% व्यापारी कसर कपात | २,१०० | | | १८,९०० |
| १६ | **मॉडर्न इलेक्ट्रॉनिक्स** | | | २,४५६ | |
| | १५ स्टिरीओ ₹ ४२०० प्रमाणे | ६३,००० | | | |
| | २० LCD ₹ १४००० प्रमाणे | २,८०,००० | | | |
| | | ३,४३,००० | | | |
| | (–) १२.५% व्यापारी कसर कपात | ४२,८७५ | | | ३,००,१२५ |
| २६ | **सीमा इलेक्ट्रॉनिक्स** | | | २,३९४ | |
| | १० छोटे LCD ₹ ८००० प्रमाणे | ८०,००० | | | |
| | ६ LCD ₹ १२५०० प्रमाणे | ७५,००० | | | |
| | | १,५५,००० | | | |
| | (–) २०% व्यापारी कसर कपात | ३१,००० | | | १,२४,००० |
| २९ | **पवन इलेक्ट्रॉनिक्स** | | | २,९६० | |
| | ५० पेन ड्राइव्ह ₹ २१० प्रमाणे | १०,५०० | | | |
| | (–) २०% व्यापारी कसर कपात | २,१०० | | | ८,४०० |
| | एकूण | | | | ५,२६,६२५ |

**टीप :** गणनाचा तपशील कार्य टीपा म्हणून दाखविल्या आहेत.

**कोनिका इलेक्ट्रॉनिक्स यांच्या पुस्तकात**

**नावे** **खरेदी खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ ऑगस्ट ३१ | विविध खाते (खरेदी पुस्तकावरुन) | | ५,२६,६२५ | २०१८ ऑगस्ट ३१ | शिल्लक खाली नेली | | ५,२६,६२५ |
| | | | ५,२६,६२५ | | | | ५,२६,६२५ |
| सप्टेंबर १ | शिल्लक खाली आणली | | ५,२६,६२५ | | | | |

नावे **सीमा इलेक्ट्रॉनिक्स खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८<br>ऑगस्ट<br>३१ | शिल्लक खाली नेली | | १,९९,२०० | २०१८<br>ऑगस्ट<br>३<br>२६ | <br><br>खरेदी खाते<br>खरेदी खाते | | <br><br>७५,२००<br>१,२४,००० |
| | | | १,९९,२०० | | | | १,९९,२०० |
| | | | | सप्टे. १ | शिल्लक खाली आणली | | १,९९,२०० |

नावे

**पवन इलेक्ट्रॉनिक्स खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८<br>ऑगस्ट<br>३१ | शिल्लक खाली नेली | | २७,३०० | २०१८<br>ऑगस्ट<br>१०<br>२९ | <br><br>खरेदी खाते<br>खरेदी खाते | | <br><br>१८,९००<br>८,४०० |
| | | | २७,३०० | | | | २७,३०० |
| | | | | सप्टें. १ | शिल्लक खाली आणली | | २७,३०० |

नावे **मॉडर्न इलेक्ट्रॉनिक्स खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | रो.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८<br>ऑगस्ट<br>३१ | शिल्लक खाली नेली | | ३,००,१२५ | २०१८<br>ऑगस्ट<br>१६ | खरेदी खाते | | ३,००,१२५ |
| | | | ३,००,१२५ | | | | ३,००,१२५ |
| | | | | सप्टें. १ | शिल्लक खाली आणली | | ३,००,१२५ |

**कोनिका इलेक्ट्रॉनिक्स यांच्या पुस्तकात**

**तेरीजपत्रक (परिक्षासूची) ३१ ऑगस्ट २०१८**

| तपशील | खा.पा. | नावे शिल्लक (₹) | जमा शिल्लक (₹) |
|---|---|---|---|
| खरेदी खाते | | ५,२६,६२५ | – |
| सीमा इलेक्ट्रॉनिक्स खाते | | – | १,९९,२०० |
| पवन इलेक्ट्रॉनिक्स खाते | | – | २७,३०० |
| मॉडर्न इलेक्ट्रॉनिक्स खाते | | – | ३,००,१२५ |
| एकूण | | ५,२६,६२५ | ५,२६,६२५ |

## ५.६ खरेदीपरत पुस्तक (Purchase Return Book) :

या पुस्तकात खरेदी केलेल्या मालापैकी परत पाठविलेल्या मालाची नोंद करण्यात येते. जेव्हा उधारीने खरेदी करण्यात आलेला माल हा पुरवठादारांना किंवा धनकोना परत करण्यात येतो खरेदी करण्यात आलेला माल निर्देशित मालाप्रमाणे नसेल, नमून्याप्रमाणे नसेल किंवा वाहतुकीत खराब किंवा तुटफुट झालेला असेल असा माल पुरवठा दारांना परत करण्यात येतो जेव्हा विक्रेत्याला माल परत करण्यात येतो तेव्हा नावे पत्र हे खरेदीदाराकडून निर्गमीत करण्यात येते. यामधे परत केलेल्या मालाचा संपूर्ण तपशील दिलेला असतो. नावे पत्राची पोहोच म्हणून विक्रेता जमापत्र (Credit note) पाठवितो.

**खरेदी परत पुस्तकाचा नमुना**

**................................ यांचे खरेदी परत पुस्तक**

| दिनांक | पुरवठादाराचे नाव | नावे पत्र क्रमांक | खा. पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१) **नावे पत्र (debit note) :** नावेपत्रात परत केलेल्या मालाची किंमत, प्रकार, मालाची पत (गुणवत्ता) इत्यादी, माहिती दिलेली असते. हे पत्र मालपरत करणाऱ्या व्यक्तीकडून तयार केले जाते. अशा वेळी व्यापारी परत केलेल्या मालाच्या किमतीने विक्रेत्याचे खाते नावे करुन तशी सूचना त्याला देतो.

**विग्नेश ट्रेडींग कंपनी ली.**

**कर्वे रोड, पुणे**

नावे पत्र क्र. ......................          दिनांक ................

प्रति, ....................................................................................................

....................................................................................................

आपणास कळविण्यात येते की आम्ही आपले खाते ₹ ............. फक्त परत केलेल्या खालील मालाप्रमाणे नावे केले आहे

| नग/संख्या | तपशील | आवक बिजक क्र | दर (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

चूकभूल द्यावी घ्यावी
(E. & O. E.)

विग्नेश ट्रेडींग कंपनी ली.
(सही)

तयार करणारा .................. (सही)

**उदा १) खालील माहितीवरुन खरेदीपरत पुस्तक तयार करा.**

२० ऑगस्ट २०१८ सिमा इलेक्ट्रॉनिक्स यांना खालील माल परत केला.

२ लहान T.V. प्रत्येकी ₹ २,०००

१ होम थिएटर प्रत्येकी ₹ ४,५०० (नावे क्र. ४/२०१८ नुसार)

**खरेदी परत पुस्तक**

| दिनांक | पुरवठादाराचे नाव | नावे पत्र क्र. | खा.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८<br>२० ऑगस्ट | **सीमा इलेक्ट्रॉनिक्स** | ४/२०१८ | | ८,५०० |
| | | | | ८,५०० |

**खरेदी परत खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | खा.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | खा.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २०१८<br>ऑगस्ट ३१ | विविध खाते<br>(खरेदी परत पुस्तकाप्रमाणे) | | ८,५०० |
| | | | | | | | |

नावे **सीमा इलेक्ट्रॉनिक्स खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | खा.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | खा.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८<br>२० ऑगस्ट | खरेदीपरत खाते | | ८,५०० | | | | |

## ५.७ विक्री पुस्तक

विक्रीपुस्तकात केवळ मालाच्या उधार विक्रीचे व्यवहार लिहिले जातात. ह्या पुस्तकात रोख विक्रीचे व्यवहार लिहिले जात नाहीत. त्याच प्रमाणे मालाशिवाय इतर कोणत्याही वस्तुंच्या उधार विक्रीची नोंद या पुस्तकात करण्यात येत नाही जसे जुनी संपत्ती, जुनी वर्तमानपत्रे (रद्दी) इत्यादी.

उदाहंरणार्थ एखादा व्यावसायिक फर्निचरचा व्यवसाय करीत असेल तर तो केवळ फर्निचरच्या उधार विक्रीची नोंद विक्रीपुस्तकात करेल आणि फर्निचरची रोखीने विक्री केल्यास विक्रीपुस्तकात नोंद होणार नाही.

या पुस्तकात उधारीने विक्री करण्यात आलेल्या मालाची केवळ शुध्दमुल्य / किंमत लिहिण्यात येते.

**विक्री पुस्तकाचे प्रारुप**

**.............. यांचे विक्री पुस्तक**

| दिनांक | ग्राहकाचे नाव | जावक | खा.पा. | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | बिजक क्र. | | (₹) |
| | | | | |

**उदा. १ : पुढील व्यवहारांची नोंद भैरवनाथ ट्रेडर्स यांच्या विक्रीपुस्तकात करा.**

| | |
|---|---|
| २०१९ | |
| मार्च १ | अरुण यांना उधारीने माल विकला ₹ ५,००० (बिजक क्रमांक ११२) |
| ४ | अरुणाकडून रोखीने मालाची खरेदी केली ₹ ३,००० |
| ८ | नेहाला उधारीवर ₹ ४,००० चा माल विकला (बिजक क्रमांक. ११५) |
| १० | मृणालला उधारीवर माल विकला ₹ ५,००० (बिजक क्रमांक ११८) |
| १२ | अवधुत यांना ₹ ८,००० चे जुने उपस्कर (फर्निचर) विकले. |

**भैरवनाथ ट्रेडर्स यांचे पुस्तकात**

**विक्री पुस्तक**

| दिनांक | ग्राहकाचे नाव | जावक बिजक क्रमांक | खा.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| मार्च २०१९ | | | | |
| १ | अरूण | ११२ | | ५,००० |
| ८ | नेहा | ११५ | | ४,००० |
| १० | मृणाल | ११८ | | ५,००० |
| | एकूण – | | | १४,००० |

**टीप :** १) दि.४ मार्च २०१९ च्या व्यवहाराची नोंद रोख खरेदी असल्यामुळे रोख पुस्तकात होईल

२) दि.१२ मार्च २०१९ च्या व्यवहाराची नोंद विक्रीपुस्तकात होणार नाही. त्याची नोंद मुळ रोजकिर्दीत होईल.

**उदा. २ : मेसर्स कोहीनूर एजन्सीज यांना खालील मालउधार विकला**

एप्रिल २०१८ ६ ५ जलशुद्धीकरण उपकरणे प्रत्येकी ₹ २,००० प्रमाणे

५ बादली प्रत्येकी ₹१७० प्रमाणे

९ मेसर्स नूतन एंटरप्रायजेस यांना माल विकला (जावक बिजक क्र. २०८)

रस्त्याच्या बाजूला सामान ठेवण्यासाठी – ३ उपकरणे प्रत्येकी ₹ ४,००० प्रमाणे

२८ रोमा ट्रेडर्सला माल विकला

१०० पाणी ठेवणारी उपकरणे प्रत्येकी ₹ ८५० प्रमाणे (जावक बिजक क्र. २०९)

**कोहिनूर सप्लायर्स विक्री पुस्तक**

| दिनांक | जावक बिजक क्र. | ग्राहकाचे नाव | खा.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | |
| एप्रिल ६ | २०७ | रोमा ट्रेडर्स | | १०,८५० |
| ९ | २०८ | मे. नुतन एंटरप्रायजेस | | १२,००० |
| २८ | २०९ | रोमा ट्रेडर्स | | ८५,००० |
| | | एकूण | | १,०७,८५० |

Dr. **विक्री खाते** Cr.

| दिनांक | तपशील | खा.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | खा.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २०१८ | | | |
| | | | | एप्रिल ३० | विविध खाते विक्री पुस्तकाप्रमाणे | | १,०७,८५० |

नावे **रोमा ट्रेडर्स खाते** जमा

| दिनांक | तपशील | खा.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | खा.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | | | | |
| एप्रिल ६ | विक्री खाते | | १०,८५० | | | | |
| २८ | विक्री खाते | | ८५,००० | | | | |

नावे **मेसर्स नुतन एंटरप्रायजेस खाते** जमा

| दिनांक | तपशील | खा.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | खा.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | | | | |
| एप्रिल ९ | विक्री खाते | | १२,००० | | | | |

## ५.८ विक्री परत पुस्तक (Sels Return Book) :

जेव्हा उधारीवर विकण्यात आलेला माल हा आदेशीत मालाच्या तपशीलानुसार किंवा नमुन्यानुसार किंवा वाहतुकीमध्ये खराब होतो तेव्हा खरेदीदार किंवा ऋणको असा माल जो उधारीवर (विक्रेत्याला परत करतात. असा परत आलेला माल जो उधारीवर विकण्यात आला होता केवळ याचीच नोंद विक्रीपरत पुस्तकात करण्यात येईल. रोखीने विकलेला माल परत आल्यास त्याची नोंद या पुस्तकात होणार नाही.

**२) जमापत्र (Credit Note)**

ज्या दस्तऐवजांचे आधारावर व्यवहारांची विक्री परत पुस्तकात नोंद करण्यात येते त्या दस्तऐवजाला जमापत्र असे म्हणतात. नावेपत्र आणि जमापत्र यातील फरक म्हणजे जेव्हा माल परत येतो तेव्हा जमापत्र हे विक्रेत्याद्वारे खरेदीदारास पाठविले जाते आणि जमापत्र मिळाल्याची पोहोच पावती म्हणून खरेदीदार नावेपत्र पाठवितो.

**विजया ट्रेडींग कंपनी ली.**

**कर्वे रोड, पुणे.**

जमापत्र क्र. ........................ दिनांक .................

प्रति, ..............................

....................................

....................................

आपणास कळविण्यात येते की आम्ही आपले खाते ₹ ............. फक्त परत आलेल्या खालील मालाप्रमाणे जमा केले आहे.

| नग/संख्या | तपशील | बिजक क्रं | दर (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

चूकभूल द्यावी घ्यावी
(E. & O. E.)

विजय ट्रेडींग कंपनी ली.
(सही)

तयार करणारा ................... (सही)

**विक्री परत पुस्तकाचा नमुना**

| दिनांक | ग्राहकांचे नाव | जमा पत्र क्र. | खाते पान | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**उदा. :** २० मे २०१८ रोमा ट्रेडर्स यांनी जलशुद्धीकरण परत केले ₹ २१०० (जमा पत्र क्र. १०/२०१८)

**.................. यांचे विक्री परत पुस्तक**

| दिनांक | ग्राहकांचे नाव | जमा पत्र क्र. | खाते पान | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ २० मे | रामा ट्रेडर्स | १०/२/२०१८ | | २,१०० |
| | एकूण | | | २,१०० |

नावे **विक्री परत खाते** **जमा**

| **दिनांक** | **तपशील** | **खा.पा.** | **रक्कम (₹)** | **दिनांक** | **तपशील** | **खा.पा.** | **रक्कम (₹)** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८<br>मे ३१ | विविध खाते<br>विक्रीपरत पुस्तका प्रमाणे | | २,१०० | | | | |

नावे **रामा ट्रेडर्स खाते** जमा

| दिनांक | तपशील | खा.पा. | रक्कम (₹) | दिनांक | तपशील | खा.पा. | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २०१८ मे २० | विक्रीपरत खाते | | २,१०० |

**उदा. (५) खालील व्यवहारावरुन महाराष्ट्रातील GST सह खरेदीपुस्तक आणि खरेदी परत पुस्तक तयार करा.**

| दिनांक | व्यवहाराचा तपशील |
|---|---|
| ऑगस्ट २०१८ ०५ | **मे. रामा दिल्ली यांचे कडून माल खरेदी (आवक बिजक क्र. ७८०)**<br>३० T.V. प्रत्येकी ₹ १०,००० प्रमाणे<br>४ होम थिएटर प्रत्येकी ₹ १२,५०० प्रमाणे<br>१०% व्यापारी कसरीवर |
| ७ | **खराब असलेले ३ T.V. संच मे. रामा दिल्ली यांना परत केले नावेपत्र क्र. २११** |
| २० | **मेसर्स टाईम इलेक्ट्रॉनिक्स हरियाना यांचे कडून माल खरेदी केला (आवक बिजक क्र. ११)**<br>५ धुलाई यंत्र प्रत्येकी ₹ १०,००० प्रमाणे<br>५ LCD प्रत्येकी ₹ २५,००० प्रमाणे<br>५% व्यापारी कसरीवर<br>वरील खरेदीस GST चे दर लागु आहेत<br>CGST ९%, SGST 9% व IGST @ १८% |

**उत्तर** **............. यांचे खरेदीपुस्तक (विश्लेषणात्मक)**

| दिनांक | आवक बिजक क्र. | पुरवठादाराचे नाव | खाते पान | तपशील (₹) | एकूण (₹) | खरेदी (₹) | CGST (₹) | SGST (₹) | IGST (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑगस्ट २०१८ | ७८० | **मे. रामा दिल्ली**<br>३० T.V. प्रत्येकी ₹ १०,००० प्रमाणे<br>४ होम थिएटर प्रत्येकी ₹ १२,५०० प्रमाणे | | ३,००,०००<br>५०,००० | | | | | |
| | | (–) T.D. १०% एकूण व्यापारी कसरीवर | | ३,५०,०००<br>३५,००० | | | | | |
| | | (+) : IGST १८% | | ३,१५,०००<br>५६,७०० | ३,७१,७०० | ३,१५,००० | | | ५६,७०० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | ११ | **मे. टाईम इलेक्ट्रॉनिक्स**<br>५ धुलाई यंत्र प्रत्येकी ₹ १०,००० प्रमाणे<br>५ LCD प्रत्येकी ₹ २५,००० प्रमाणे | | ५०,०००<br>१,२५,००० | | | | | |
| | | (–) T.D. ५% एकूण व्यापारी कसरीवर | | १,७५,०००<br>८,७५० | | | | | |
| | | (+) : IGST १८% प्रमाणे | | १,६६,२५०<br>२९,९२५ | १,९६,१७५ | १,६६,२५० | | | २९,९२५ |
| | | एकूण | | | ५,६७,८७५ | ४,८१,२५० | | | ८६,६२५ |

**खरेदी परत पुस्तक**

| दिनांक | नावे पत्र क्र. | पुरवठादाराचे नाव | खाते पान | तपशील (₹) | एकूण (₹) | खरेदी (₹) | CGST (₹) | SGST (₹) | IGST (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑगस्ट २०१८<br>७ | २११ | **मे. रामा दिल्ली**<br>३ T.V. प्रत्येकी ₹ १०,००० प्रमाणे<br>(–) T.D. १०% व्यापारी कसरीवर | | ३०,०००<br>३,००० | | | | | |
| | | (+) : IGST १८% प्रमाणे | | २७,०००<br>४,८६० | ३१,८६० | २७,००० | | | ४,८६० |
| | | एकूण | | | ३१,८६० | २७,००० | | | ४,८६० |

**उदा. (६) महाराष्ट्रातील मेसर्स सौरभ यांचे विक्री पुस्तक आणि विक्रीपरत पुस्तक तयार करा. खालील व्यवहारांना GST लागु आहे.**

| दिनांक | व्यवहाराचा तपशील |
|---|---|
| ऑगस्ट २०१८<br>०७ | **मेसर्स मेहुल ब्रदर्स दिल्ली यांना माल विकला (बिजक क्र. ३६२)**<br>३० शर्ट प्रत्येकी ₹ २५० प्रमाणे<br>४० पॅन्ट प्रत्येकी ₹३५० प्रमाणे<br>८% व्यापारी कसर कपात |
| १० | **मेसर्स मेहुल ब्रदर्स दिल्ली यांचेकडून ५ शर्ट परत आले (जमा पत्र क्र. ६१)** |
| १८ | **मेसर्स राजा ट्रेडर्स जालना यांना माल विकला (जावक बिजक क्र. ३६३)**<br>२० जॅकेट प्रत्येकी ₹ ४५० प्रमाणे<br>१० साधे शर्ट प्रत्येकी ₹ २०० प्रमाणे<br>८% व्यापारी कसर कपात<br>**वरील तयार मालास (Readymade) GST दर लागु आहेत.**<br>CGST २.५% प्रमाणे<br>SGST २.५% प्रमाणे<br>IGST ५% प्रमाणे |

**उत्तर** **विक्रीपुस्तक (विश्लेषणात्मक)**

| दिनांक | जावक क्र. | ग्राहकाचे नाव | खाते पान | तपशील (₹) | एकूण (₹) | विक्री परत (₹) | CGST (₹) | SGST (₹) | IGST (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ ऑगस्ट ७ | ३६२ | **मेसर्स मेहुल ब्रदर्स दिल्ली**<br>३० शर्ट प्रत्येकी ₹ २२५० प्रमाणे<br>४० पॅन्ट प्रत्येकी ₹ ३५० प्रमाणे | | ७,५००<br>१४,००० | | | | | |
| | | (-) ८% व्यापारी कसर कपात | | २१,५००<br>१,७२० | | | | | |
| | | (+): IGST ५% | | १९,७८०<br>९८९ | २०,७६९ | १९,७८० | | | ९८९ |
| १८ | ३६३ | **मेसर्स राजा ट्रेडर्स जालना**<br>२० जॅकेट प्रत्येकी ₹ ४५० प्रमाणे<br>१० साधे शर्ट प्रत्येकी ₹ २०० प्रमाणे | | ९,०००<br>२,००० | | | | | |
| | | (-) ८% व्यापारी कसर कपात | | ११,०००<br>८८० | | | | | |
| | | (+): SGST २.५% प्रमाणे<br>(+) CGST २.५% प्रमाणे | | १०,१२०<br>२५३<br>२५३ | १०,६२६ | १०,१२० | २५३ | २५३ | |
| | | एकूण | | | ३१,३९५ | २९,९०० | २५३ | २५३ | ९८९ |

**विक्री परत पुस्तक**

| दिनांक | जमापत्र क्र. | ग्राहकाचे नाव | खाते पान | तपशील (₹) | एकूण (₹) | विक्री परत (₹) | CGST (₹) | SGST (₹) | IGST (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ ऑगस्ट १० | ६१ | **मेसर्स मेहुल ब्रदर्स दिल्ली**<br>५ शर्ट ₹ २५० प्रमाणे<br>(-) ८% व्यापारी कसर कपात | | १,२५०<br>१०० | | | | | |
| | | (+) IGST ५% प्रमाणे | | १,१५०<br>५८ | १,२०८ | १,१५० | - | - | ५८ |
| | | एकूण | | | १,२०८ | १,१५० | - | - | ५८ |

**उदा. (७) पुढील व्यवहारांची नोंद मेसर्स किर्ती यांच्या खरेदीपुस्तक, खरेदी परत पुस्तक, विक्रीपुस्तक आणि विक्रीपरत पुस्तकात करा.**

| दिनांक | व्यवहाराचा तपशील |
|---|---|
| २०१८ मार्च ०१ | सुधाकर स्टोअर्सला माल विकला ₹ ३९,००० १०% व्यापारी कसर. |
| ३ | अवधुत ट्रेडर्स यांचे कडून माल खरेदी केला ₹ ४७,३५० आणि वाहतुक खर्च ₹ २५० दिला. |
| ६ | सुधाकर स्टोअर्स यांनी माल परत केला. ₹ ३,२२० (Net) |
| १० | रोख खरेदी ₹ १८,६०० आणि रोख विक्री ₹ १६,००० |
| १३ | दि. २८ फ्रेबुवारी २०१८ च्या आदेशाप्रमाणे राकेश यांनी माल परत पाठविला ₹ ३७,००० |
| १७ | रागिणिला ₹ ३३,४०० चा माल विकला @ १०% व्यापारी कसर कपात |
| २० | खराब माल असल्यामुळे राकेश यांना परत केला. ₹ ३,८५० |
| २२ | ₹ १९,४५० चा माल मेसर्स मायकल ट्रेडर्स कडून ₹ १५० व्यापारी कसरीवर उधार खरेदी केला. |
| २३ | माल खराब असल्यामुळे रागिनि यांनी परत केला ₹ १९०० (सकल) |
| २६ | शर्मा फर्निचर मार्ट कडून कार्यालय उपस्कर ₹ ५५,००० खरेदी केले. |
| २९ | गरीमा स्टोअर्स कडून ₹ ८,००० चा माल खरेदी करण्यात आला आणि तोच माल २५% नफ्याने सुनिताला विकण्यात आला. |
| ३१ | मायकल ट्रेडर्सला नावेपत्र पाठविले ₹ ३,२०० |

उत्तर :

## किर्ती यांचे खरेदी पुस्तक

| दिनांक | जावक बिजक क्र. | पुरवठादाराचे नाव | खाते पान | जमा रक्कम ( ₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ ०३<br>मार्च १३<br>२२<br>२९ | | अवधुत ट्रेडर्स<br>राकेश<br>मायकल ट्रेडर्स<br>गरिमा स्टोअर्स | | ४७,३५०<br>३७,०००<br>१९,३००<br>८,००० |
| | | एकूण | | १,११,६५० |

## विक्री पुस्तक

| दिनांक | जावक बिजक क्र. | ग्राहकाचे नाव | खाते पान | जमा रक्कम ( ₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ ०१<br>मार्च ७<br>२९ | | सुधाकर स्टोअर्स<br>रागिनी<br>सुनिता | | ३५,१००<br>३०,०६०<br>१०,००० |
| | | एकूण | | ७५,१६० |

## खरेदीपरत पुस्तक

| दिनांक | नावे पत्र क्र. | ग्राहकाचे नाव | खाते पान | जमा रक्कम ( ₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ २०<br>मार्च १ | | राकेश<br>मायकल ट्रेडर्स | | ३,८५०<br>३,२०० |
| | | एकूण | | ७,०५० |

## विक्रीपरत पुस्तक

| दिनांक | जमा पत्र क्र. | ग्राहकाचे नाव | खाते पान | जमा रक्कम ( ₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ ०६<br>मार्च ३ | | सुधाकर स्टोअर्स (शुध्द)<br>रागिणी | - | ३,२२०<br>१,७१० |
| | | एकूण | | ४,९३० |

## मुळ रोजकिर्द

| दिनांक | तपशील | खाते पान | नावे रक्कम | जमा रक्कम ( ₹) |
|---|---|---|---|---|
| मार्च २०१८<br>२६ | फर्निचर खाते .......... नावे<br>शर्मा फर्निचर मार्ट खात्याला<br>(शर्मा फर्निचर मार्ट कडून उधारीने फर्निचर खरेदी केल्याबद्दल) | | ५५,००० | <br>५५,००० |
| | बेरीज | | ५५,००० | ५५,००० |

**टीपा :**

१) २६ मार्च २०१८ रोजीचा व्यवहार मुळ रोजकिर्दीत नोंदविला जाईल.

२) ३ मार्च २०१८ च्या व्यवहारामधील वाहतुक खर्च ₹ १५० रोख पुस्तकात नोंदविला जाईल.

३) दिनांक १० मार्च २०१८ चा रोख खरेदी व रोख विक्री व्यवहार रोख पुस्तकात लिहिला जाईल.

**उदा ८ : पुढील व्यवहारांची नोंद श्रेयस ट्रेडर्स यांच्या खरेदी पुस्तक, विक्री पुस्तक, खरेदी परत पुस्तक, आणि विक्री परत पुस्तक यात करा.**

| दिनांक | व्यवहाराचा तपशिल |
|---|---|
| २०१८ जुलै ०१ | निलकमल स्टोअर्सकडून ₹ ३३,००० चा माल ५% व्यापारी कसरीवर खरेदी करण्यात आला अर्धि रक्कम ताबडतोब दिली. |
| ३ | धवल ट्रेडर्स यांना ₹ २७,७५० चा माल पाठविला. |
| ४ | २७ जून २०१८ च्या आदेशानुसार सोनाली यांनी आपल्याला ₹ १४,००० चा माल ४% व्यापारी कसरीने पाठविला. |
| ९ | सौरभ ॲन्ड सन्स यांना ₹ ३०,००० चा माल उधारीवर ७% व्यापारी कसरीने विकला. |
| १२ | निलकमल स्टोअर्स यांना नावेपत्र पाठविण्यात आले ₹ ३,००० (ढोबळ) |
| १४ | धवल ट्रेडर्स यांना जमापत्र पाठविण्यात आले ₹ ३,५५० |
| १९ | सोनालीकडून नावेपत्र प्राप्त झाले ₹ १,००० (ढोबळ) |
| २१ | सौरभ ॲन्ड सन्स यांना जमापत्र पाठविले. ₹ ४,६७५ (निव्वळ). |
| २४ | सुरभी स्टोअर्स कडून ₹ १५,००० चा माल खरेदी केला आणि तोच माल प्राचीला २५% नफ्यावर विकण्यात आला. |
| २५ | सीमा स्टोअर्सकडून ₹ ६,६०० चा माल खरेदी केला आणि ₹ २४० वाहतुक खर्च दिला. |
| २७ | दोषपूर्ण माल असल्यामुळे प्राचीने ₹ ५,००० चा माल परत केला तोच माल सुरभी स्टोअर्सला परत करण्यात आला. |
| ३० | कार्यालय उपयोगाकरीता भारत फर्निचर यांचे कडून उधारीने कार्यालयीन उपस्कर खरेदी केले, ₹ २३,००० |

**श्रेयस ट्रेडर्स यांचे पुस्तकात**

**खरेदी पुस्तक**

| दिनांक | पुरवठादाराचे नाव | आवक क्रमांक | खाते पान | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | |
| जुलै ०१ | निलकमल स्टोअर्स | | | १५,६७५ |
| ४ | सोनाली | | | १३,४४० |
| २४ | सुरभी स्टोअर्स | | | १५,००० |
| २५ | सीमा स्टोअर्स | | | ६,६०० |
| | एकूण | | | ५०,७१५ |

### विक्री पुस्तक

| दिनांक | ग्राहकाचे नाव | जावक बिजक क्रमांक | खाते पान | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | |
| जुलै ०३ | धवल ट्रेडर्स | | | २७७५० |
| ९ | सौरभ ॲन्ड सन्स | | | २७,९०० |
| २४ | प्राची | | | १८,७५० |
| | **एकूण** | | | ७४,४०० |

### खरेदी परत पुस्तक

| दिनांक | पुरवठादाराचे नाव | नावेपत्र क्रमांक | खाते पान | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | |
| जुलै १२ | निलकमल स्टोअर्स | | | २,८५० |
| १९ | सोनाली | | | ९६० |
| २७ | सुरभी स्टोअर्स | | | ४,००० |
| | **एकूण** | | | ७,८१० |

### विक्री परत पुस्तक

| दिनांक | ग्राहकाचे नाव | जमापत्र क्रमांक | खाते पान | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | |
| जुलै १४ | धवल ट्रेडर्स | | | ३,५५० |
| २१ | सौरभ ॲन्ड सन्स | | | ४,६७५ |
| २७ | प्राची | | | ५,००० |
| | **एकूण** | | | १३,२२५ |

**टीप :**

२७ जुलै २०१८ चा व्यवहार : प्राची यांनी परत केलेला माल विक्री पुस्तकात दर्शविण्यात आला. ₹ ५,००० तोच माल सुरभी स्टोअर्सला परत केला. तो खरेदी परत पुस्तकात दर्शविण्यात आला. त्याचे मुल्य पुढीलप्रमाणे निश्चित केले.

मुळ किंमत + नफा = विक्री मूल्य

जर मूळ किंमत १०० + मूळ किमंतीवर २५% नफा १०० + २५ = विक्री किंमत

म्हणजेच विक्रीमूल्य १२५ तेव्हा मूळ किंमत १०० असेल

जर विक्री मूल्य ५,००० ते खरेदी मूल्य किती ?

१२५ : १०० : ५,००० : : ? = १००/(१०० + २५)

= ५,००० x (१००/१२५) = ₹ ४,०००

₹ ४,००० ही रक्कम खरेदी परत पुस्तकात दर्शविली आहे.

दि. ३० मार्च २०१८ रोजीचा व्यवहार उधारीचा असल्यामुळे वरील पुस्तकात नोंद केली नाही.

**उदा. ९ : खालील व्यवहार कमल जनरल स्टोअर्सच्या खरेदीपुस्तक, विक्रीपुस्तक, खरेदी परत पुस्तक, विक्रीपरत पुस्तक यात नोंदवा.**

| दिनांक | व्यवहाराचा तपशील |
|---|---|
| २०१८ | |
| मे ०१ | जया यांच्याकडून ₹ १५,००० चा माल ९% व्यापारी कसरीवर खरेदी केला, आवक बिजक क्र. २३ |
| ३ | IBM कम्पूटर यांचेकडून ₹ ५५,००० चे संगणक खरेदी केले, आवक बिजक क्र. ८६ |
| ४ | प्रिया यांना ₹ २०,००० चा माल ४.५% व्यापारी कसरीवर विकला, जावक बिजक क्र. ३४ |
| ७ | स्नेहाला ₹ १४,५०० चा माल १०% व्यापारी कसरीवर विकला, जावक बिजक क्र.३५ |
| १२ | प्रियाकडून ₹ ३,५०० (ठोबळ) चा माल परत आला तिला जमापत्र क्र. ८७ पाठविले. |
| १५ | जयाला ₹ ४,५०० चा (ठोबळ) माल परत केला व नावे पत्र ४९ पाठविले |
| १७ | विपिन यांना जुने यंत्र उधारीने विकले ₹ २९,८००. |
| २० | अमिनाला ₹ २६,६५० चा माल जावक बिजक क्र. ३६ प्रमाणे विकला आणि तिच्याकडून ₹ १२,२५० चा माल खरेदी केला, आवक बिजक क्र. ४५५ |
| २२ | कैलास ट्रेडर्स यांनी आपल्याकडून ₹ १६,००० चा माल ६% व्यापारी कसरीवर खरेदी केला, आवक बिजक क्र. ३७ |
| २४ | स्वीटी यांनी आपल्याला माल पाठविला ₹ २,४५०, आवक बिजक क्र. ६३० |
| २७ | कैलास ट्रेडर्स यांनी ₹ ५१८० चा माल परत पाठविला, त्यांना जमापत्र क्र.८८ पाठविले. |
| २९ | स्विटीला ₹ ४६० चा माल परत केला आणि नावे पत्र क्र. ५० दिले. |

उत्तर : **कमल जनरल स्टोअर्स यांचे पुस्तकात**

**खरेदी पुस्तक**

| दिनांक | पुरवठादाराचे नाव | आवक बिजक क्र. | खाते पान | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | |
| मे ०१ | जया | २३ | | १३,६५० |
| २० | अमिना | ४५५ | | १२,२५० |
| २४ | स्विटी | ६३० | | २,४५० |
| | **एकूण** | | | २८,३५० |

**विक्री पुस्तक**

| दिनांक | ग्राहकाचे नाव | जावक बिजक क्र. | खाते पान | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | |
| मे ०४ | प्रिया | ३४ | | १९,१०० |
| ७ | स्नेहा | ३५ | | १३,०५० |
| २० | अमिना | ३६ | | २६,६५० |
| २२ | कैलास ट्रेडर्स | ३७ | | १५०४० |
| | **एकूण** | | | ७३,८४० |

**खरेदी परत पुस्तक**

| दिनांक | ग्राहकाचे नाव | नावे पत्र क्र. | खाते पान | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | |
| मे १५ | जया | ४९ | | ४,०९५ |
| २९ | स्विटी | ५० | | ४६० |
| | **एकूण** | | | ४,५५५ |

**विक्री परत पुस्तक**

| दिनांक | ग्राहकाचे नाव | जमापत्र क्रमांक | खाते पान | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | |
| मे १२ | प्रिया | ८७ | | ३,३४२ |
| २७ | कैलास ट्रेडर्स | ९७ | | ५,१८० |
| | **एकूण** | | | ८,५२२ |

## ५.९ मूळ रोजकीर्द (Journal Proper)

### ५.११.१ अर्थ (Meaning)

काही असे विशिष्ट व्यवहार जे त्यांच्या स्वरूपामुळे वरीलपैकी कोणत्याही सहाय्यक पुस्तकात नोंदविले जाऊ शकत नाहीत अशा व्यवहारांची नोंद मूळ रोजकीर्दीत करण्यात येते म्हणजेच ज्या व्यवहारांची कोणत्याही विशिष्ट सहाय्यक पुस्तकात नोंद होत नाही त्यांची मूळ रोजकीर्दीत होते.

**उदाहरणार्थ :** संपत्ती आणि माल (Goods) सोडून इतर वस्तू ज्या उधारीवर खरेदी केल्या जातात त्यांची नोंद रोख पुस्तक किंवा खरेदी पुस्तकात करता येत नाही अशा व्यवहारांची नोंद मूळ रोजकीर्दीत करण्यात येते.

**मूळ रोजकीर्दीत लिहिण्यात येणारे व्यवहार पुढील प्रमाणे**

१) **प्रारंभिक नोंदी (Opening entries) :** वित्तीय वर्षाच्या सुरुवातीची शिल्लक जसे संपत्ती, देयता, भांडवल याची नोंद रोजकिर्दमध्ये प्रारंभिक नोंदीमध्ये होते.

२) **समायोजन नोंदी (Adjusting entries) :** लेखांकीय कालावधीच्या शेवटी खालीत अद्यावत करण्याच्या उद्देशाने अशा नोंदी करण्यात येतात. उदा. अदत्त भाडे, पूर्वदत्त विमा, संपत्तीवरील घसारा, आगाऊ मिळालेले कमिशन इ.

३) **दुरुस्ती नोंदी (Rectification entries) :** मूळ रोजकीर्द आणि खतावणीत नोंद करताना खातेवहीत झालेल्या व्यवहारांच्या चुकीच्या नोंदी दुरुस्त करणे.

४) **स्थानांतरण नोंदी (Transfer entries) :** लेखांकीय वर्षाच्या अखेरीस उचल खात्याची शिल्लक भांडवल खात्याला स्थानांतरीत केली जाते. खर्च व उत्पन्न वर्षाच्या शेवटी खात्याचे संतुलन केले जात नाही. व्यापार चालवित असताना विक्री खाते, खरेदी खाते, सुरुवातचा मालसाठा, उत्पन्न, लाभ आणि खर्च, उचल इत्याद ही सर्व खाती वर्षअखेर बंद करण्यात येतात आणि त्यांच्या शिलका व्यापार व नफातोटा खात्याला स्थानांतरीत करण्यात येतात. ह्या नोंदींना अखेरच्या नोंदी असे देखील म्हणतात.

५) **अन्य नोंदी जसे :**

अ) संपत्तीची उधार खरेदी

ब) जुन्या संपत्तीची उधार विक्री

क) मालकाद्वारे मालाची उचल

ड बुडीत कर्जाचे अपलेखन

इ) आग, चोरी किंवा वाहतुकी दरम्यान मालाचे होणारे नुकसान

फ) मोफत नमुना किंवा धर्मादाय म्हणून मालाचे वितरण

ग) रोख व्यवहारांमध्ये किंवा दत्त कसरीचे व्यवहार

**--------- यांचे पुस्तकात**

| दिनांक | तपशील | खा.पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**मूळ रोजकीर्दीत लिहिण्यात येणाऱ्या व्यवहारांची लेखांकन पद्धती**

१) **प्रारंभिक नोंदी :** आर्थिक वर्षाचे प्रारंभी संपत्ती आणि देयतांची खाती लेखापुस्तकात उघडण्यासाठी (आणण्यासाठी) या नोंदी केल्या जातात. हे करताना सर्व संपत्ती 'नावे' केल्या जातात आणि देयता 'जमा' केल्या जातात. देयतांपेक्षा जास्त असलेली संपत्तीची रक्कम म्हणजे भांडवल होय ते जमा केले जाते.

म्हणजेच भांडवल = एकूण संपत्ती – एकूण देयता

**उदाहरण –**

| | | |
|---|---|---|
| हस्तस्थ रोख | ₹ | ८,५०० |
| संयंत्र व यंत्रसामग्री | ₹ | १,१०,००० |
| माल साठा (स्कंध) (Stock) | ₹ | ३७,००० |
| ऋणको | ₹ | ४३,००० |
| धनको | ₹ | ३२,००० |
| बँकेतील रोख | ₹ | ३५,००० |

वरील माहितीचे आधारे प्रारंभिक रोजकीर्द नोंद करा.

**उत्तर :**

**मुळ रोजकीर्द**

| दिनांक | तपशील | | खा.पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| | रोख खाते | नावे | | ८,५०० | |
| | बँकेतील रोख खाते | नावे | | ३५,००० | |
| | संयंत्र व यंत्र सामग्री खाते | नावे | | १,१०,०० | |
| | स्कंध खाते | नावे | | ३७,००० | |
| | विविध ऋणको खाते | नावे | | ४३,००० | |
| | विविध धनको खात्याला | | | | ३२,००० |
| | भांडवल खात्याला | | | | २,०१,५०० |
| | (विविध संपत्ती आणि देयता | | | | |
| | खाली आणल्याबद्दल) | | | **२,३३,५००** | **२,३३,५००** |

**टीप :**

| | | |
|---|---|---|
| एकूण संपत्ती | ₹ | २,३३,५०० |
| (–) एकूण देयता = | ₹ | ३२,००० |
| = भांडवल | ₹ | २,०१,५०० |

२) **समायोजन नोंदी (Adjusting entries) :** लेखांकन आर्थिक वर्षाचे शेवटी नफ्याची गणना करण्यासाठी तेरजेच्या आधारावर अंतिम खाती तयार केली जातात. तेरजेत केवळ त्या खात्यांचा समावेश होतो जी लेखा पुस्तकांमध्ये नोंदविली जातात. अतिरिक्त बुडीत कर्ज, संपत्तीवर घसारा, संवरण स्कंध, येणे उत्पन्न (Income Receivable) आणि देय खर्च (Expenses Payable) या सारखी पदे तेरजेत आढळत नाहीत. जो पर्यंत ही पदे लेखा पुस्तकांमध्ये आणली जात नाहीत तो पर्यंत अंतिम लेखे अचूक परिणाम दर्शविणार नाहीत. म्हणून अशी पदे लेखा पुस्तकात आणण्याकरिता समायोजन नोंदी करण्यात येतात.

**पुढील पदांच्या समायोजन नोंदी करा :**

१) अतिरिक्त बुडीत कर्जाची रक्कम ₹ ३,७५०

२) इमारतीवर घसाऱ्याची तरतूद करा ₹ ३१,५००

**उत्तर :**

**मुळ रोजकीर्द**

| दिनांक | तपशील | खा.पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १ | बुडीत कर्ज खाते ----------- नावे<br>ऋणको खात्याला<br>(बुडीत कर्ज अपलेखीत केल्याबद्‌दल) | | ३,७५० | ३,७५० |
| २ | घसारा खाते ----------- नावे<br>इमारत खात्याला<br>(घसारा आकारल्याबद्‌दल) | | ३१,५०० | ३१,५०० |
| | **एकूण** | | **३५,२५०** | **३५,२५०** |

३) **अंतीम नोंदी (Closing entries) :** व्यवसाय संस्थेचा नफा-तोटा शोधण्यासाठी प्रथमतः सर्व खर्चाची व उत्पन्नाची खाती वर्ष अखेरीस बंद केली जातात. अंतीम नोंदीचे सहाय्याने सर्व खाती आणि उत्पन्न खात्याच्या शिलका व्यापार .किंवा नफा-तोटा खात्याला स्थानांतरीत करून ती खाती बंद केली जातात. अंतीम खाती तयार करताना अंतीम नोंदी केल्या जातात.

**पुढील पदांच्या अंतीम नोंदी करा :**

१) चालू वर्षाच्या कार्यालय भाड्याचे नफा-तोटा खात्याला स्थानांतरीत केले ₹ १७,५००

२) चालू वर्षातील मालाची खरेदी ₹ २,९५,५००

**उत्तर :**

**मुळ रोजकीर्द**

| दिनांक | तपशील | खा.पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १ | नफा-तोटा खाते ----------- नावे<br>कार्यालय भाडे खात्याला<br>(कार्यालय भाड्याचे नफा-तोटा खात्याला स्थानांतरीत केल्याबद्‌दल) | | १७,५०० | १७,५०० |
| २ | व्यापार खाते ----------- नावे<br>खरेदी खात्याला<br>(खरेदी खाते बंद करण्याकरिता व्यापार खात्याला स्थानांतरीत केल्याबद्‌दल) | | २,९५,५०० | २.९५,५०० |
| | **एकूण** | | **३,१२,५००** | **३,१२,५००** |

**टीप :** वर्षाचे शेवटी ढोबळ नफा किंवा हानी आणि शुद्‌ध नफा किंवा तोटा निश्चित करण्यासाठी व्यापार खाते आणि नफा-तोटा खाते तयार करण्यात येते. परिस्थितीनुसार महसूल खर्च आणि उत्पन्न हे व्यापार किंवा नफा-तोटा खात्याला स्थानांतरीत करण्यात यावा.

४) **स्थानांतरण नोंदी (Transfer entries) :** कधी कधी एखादे खाते बंद करण्यासाठी त्या खात्यातील शिल्लक ही दुसऱ्या खात्याला स्थानांतरीत करण्यात येते. अशा परिस्थितीत ज्या नोंदी केल्या जातात त्या नोंदींना स्थानांतरण नोंदी असे म्हणतात.

**पुढील पदांवरून स्थानांतरण नोंदी तयार करा :**

१) शुद्‌ध नफा ₹ ८७,५०० भांडवल खात्याला स्थानांतरीत करण्यात आला.
२) उचल ₹ १०,५०० ही भांडवल खात्याला स्थानांतरीत करण्यात आली.

**उत्तर :**

**मूळ रोजकीर्द**

| दिनांक | तपशील | खा.पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १ | नफा-तोटा खाते ----------- नावे | | ८७,५०० | |
| | भांडवल खात्याला | | | ८७,५०० |
| | (शुद्‌ध नफा भांडव खात्याला स्थानांतरीत केल्याबद्‌दल) | | | |
| २ | भांडवल खाते ----------- नावे | | १०,५०० | |
| | उचल खात्याला | | | १०,५०० |
| | (उचलची रक्कम भांडवल खात्याला स्थानांतरीत केल्याबद्‌दल) | | | |
| | **एकूण** | | **९८,०००** | **९८,०००** |

५) **दुरुस्तीच्या नोंदी (Rectification entries) :** लेखापालाद्‌वारे जी चूक (Mistake) न कळत व अफरातफर करण्याचा कोणताही उद्‌देश नसताना केली जाते तिला चूक (Error) असे म्हणतात. लेखा पुस्तकांमधील अशा चूका दुरुस्त करण्यात आल्या नाहीत तर लेखा पुस्तके सत्य आणि योग्य परिणाम (True and fair results) देणार नाहीत. म्हणून अशा प्रकारच्या झालेल्या चुकांचे दुरुस्तीकरिता लेखापाल दुरुस्ती नोंदी करीत असतो.

**पुढील व्यवहारांच्या दुरुस्ती नोंदी द्या :**

१) सौरभ यांचेकडून खरेदी केलेल्या ₹ ५०,००० च्या मालाची नोंद लेखा पुस्तकात करण्यात आली नाही.
२) यंत्र स्थापनेकरिता देण्यात आलेली मजुरी ₹ ५,००० मजुरी खात्यात नावे करण्यात आले.

**उत्तर :**

**मूळ रोजकीर्द**

| दिनांक | तपशील | खा.पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १ | खरेदी खाते ----------- नावे | | ५०,००० | |
| | सौरभ खात्याला | | | ५०,००० |
| | (खरेदीची नोंद न करण्यात आल्याच्या चुकीची दुरुस्ती केल्याबद्‌दल) | | | |
| २ | यंत्र खाते ----------- नावे | | ५,००० | |
| | मजुरी खात्याला | | | ५,००० |
| | (यंत्र स्थापनेकरिता देण्यात आलेली मजुरी चुकीने मजुरी खात्यात नोंदविण्यात आली ती चूक दुरुस्त केल्याबद्‌दल) | | | |
| | **एकूण** | | **५५,०००** | **५५,०००** |

६) **दत्त आणि प्राप्त रोख कसर (Cash discount allowed and received) :** दिलेली रोख कसर आणि मिळणारी रोख कसर हे अरोखीकृत व्यवहार (Non cash transaction) असल्याने त्यांची नोंद रोख पुस्तकात होणार नाही. अशा व्यवहारांच्या नोंदी मूळ रोजकीर्दीत खालील प्रमाणे होतील.

**पुढील व्यवहारांवरून दुरुस्तीच्या नोंदी करा :**

१) सुरेशनी आपल्याला खात्याच्या पूर्ण शोधनार्थ रोख कसर दिली ₹ ४२०

२) कुणाल स्टोअर्सला रोख कसर दिली ₹ ६५०

**उत्तर :**

**मूळ रोजकीर्द**

| दिनांक | तपशील | खा.पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १ | सुरेश खाते ----------- नावे | | ४२० | |
| | कसर खात्याला | | | ४२० |
| | (रोख कसर मिळाल्याबद्दल) | | | |
| २ | कसर खाते ----------- नावे | | ६५० | |
| | कुणाल स्टोअर्स खात्याला | | | ६५० |
| | (रोख कसर दिल्याबद्दल) | | | |
| | **एकूण** | | **१,०७०** | **१,०७०** |

७) **इतर नोंदी (Other entries) :**

**मूळ रोजकीर्दीत नोंदी करा.**

१) पटेल फर्निचरकडून ₹ ७४,००० चे उपस्कर उधार खरेदी केले

२) सुरजला संयंत्र उधार विकण्यात आले ₹ ९,४००

३) मालकाने स्वतःच्या उपयोगासाठी ₹ ४,००० चा माल घेतला

४) मोफत नमुना म्हणून मालाचे वितरण ₹ ११,०००

५) आगीमुळे ₹ ८,५०० च्या मालाचे नुकसान झाले

६) सीमाकडून रोख कसर मिळाली ₹ ५००

७) हेमंत यांना रोख कसर दिली ₹ ६००.

उत्तर :

---------- यांची मूळ रोजकीर्द

| दिनांक | तपशील | खा.पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १ | उपस्कर खाते ----------- नावे<br>पटेल फर्निचर खात्याला<br>(उधारीने फर्निचर खरेदी केल्याबद्दल) | | ७४,००० | ७४,००० |
| २ | सुरज खाते ----------- नावे<br>सयंत्र खात्याला<br>(सयंत्र उधारीने विकल्याबद्दल) | | ३१,५०० | ३१,५०० |
| ३ | उचल खाते ----------- नावे<br>माल खात्याला<br>(व्यक्तिगत उपयोगासाठी मालाची उचल केल्याबद्दल) | | ४,००० | ४,००० |
| ४ | जाहिरात खाते ----------- नावे<br>नमुना म्हणून मोफत माल वाटप खात्याला<br>(मोफत नमुना म्हणून मालाचे वितरण केल्याबद्दल) | | ११,००० | ११,००० |
| ५ | आगीमुळे नुकसान खाते ----------- नावे<br>आगीमुळे नुकसान माल खात्याला<br>(आगीमुळे मालाचे नुकसान झाल्याबद्दल) | | ८,५०० | ८,५०० |
| ६ | सीमा खाते ----------- नावे<br>कसर खात्याला<br>(कसर मिळाल्याबद्दल) | | ५०० | ५०० |
| ७ | कसर खाते ----------- नावे<br>हेमंत खात्याला<br>(हेमंत यांना कसर दिल्याबद्दल) | | ६०० | ६०० |
| | **एकूण** | | **१,३०,१००** | **१,३०,१००** |

## स्वाध्याय

### प्र.१ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सहाय्यक पुस्तके म्हणजे काय ?

२) रोकड पुस्तक म्हणजे काय ?

३) प्रति प्रविष्टीचा अर्थ सांगा.

४) अग्रधन पध्दती आधारीत लघुरोख पुस्तकाचा अर्थ सांगा.

५) खरेदी पुस्तकात कोणते व्यवहार नोंदविले जातात.

६) विक्री पुस्तकात कोणत्या प्रकारची विक्री लिहली जाते.

७) कोणत्या प्रकारचे व्यवहार रोजकीर्दीत नोंदविले जातात.

८) लघु रोखपाल कोणास म्हणतात ?

### प्र.२ खालील विधानांसाठी पर्यायी ठरतील असे योग्य शब्द / संज्ञा किंवा शब्द समुह द्या.

१) रोख पुस्तक सांभाळणारी व्यक्ती

२) व्यवसायिकाद्वारे अग्रक्रमाने उघडण्यात येणारे बँक खाते

३) लघुरोख पुस्तक ज्यात शोधन बाजूस विभीन्न खर्चाच्या नोंदी करता योग्य रकान्याची आखणी केली जाते.

४) सहाय्यक पुस्तक ज्यामध्ये केवळ उधार माल खरेदी संबंधीचेच व्यवहार लिहीतात.

५) सहाय्यक पुस्तक ज्यामध्ये केवळ विकलेला माल परत केल्याची नोंद केली जाते.

६) रोख पुस्तकाच्या दोन्ही बाजूवर केली जाणारी नोंद

७) वैयक्तीक बचत करण्याकरीता उघडण्यात येणारे खाते.

८) खरेदीदाराकडून विक्रेत्याला माल परत पाठविल्या संधीचा संपुर्ण तपशील देणारे पत्र.

९) विक्रेत्याकडून ग्राहकाला त्याचेकडून सदोष माल मिळाल्यासंबंधी पाठविण्यात येणारे पत्र

१०) बँक खात्याचे नाव ज्यावर खातेदाराला विकर्ष सवलत दिली जाते.

### प्र.३ खाली दिलेल्या पर्यायामधुन योग्य पर्याय निवडून संपूर्ण वाक्य पुन्हा लिहा.

१) रोख पुस्तकात रोख रकान्याची कधीही ............... शिल्लक राहणार नाही.
(अ) जमा (ब) नावे (क) शुन्य (ड) या पैकी कोणतीही नाही

२) रोख पुस्तकाच्या दोन्ही बाजूस होणाऱ्या नोंदीला ............ नोंद म्हणतात.
(अ) प्रारंभिक (ब) दुरुस्तीची (क) हस्तांतरण (ड) प्रती

३) विक्री पुस्तकात नोंद करण्यासाठी .............. हा स्त्रोत दस्तऐवज असावा
(अ) आगतबिजक (ब) निर्गतबिजक (क) प्रणामक (ड) रोखपत्र

४) उधारीने यंत्र खरेदी केल्याची नोंद ............... मधे होईल
(अ) खरेदीपुस्तक (ब) रोखपुस्तक (क) मूळ रोजकीर्द (ड) खरेदी परत पुस्तक

५) रोजकीर्दीचे विभाजन म्हणजे ............. पुस्तक होय.
(अ) सहाय्यक (ब) खरेदीपरत (क) खरेदी (ड) मुळ रोजकिर्द

६) व्यवसायात गुंतविण्यात आलेली अतिरिक्त रक्कम ................ यात लिहीण्यात येते.
(अ) खरेदी पुस्तक (ब) रोख पुस्तक (क) मूळ रोजकीर्द (ड) विक्री परत पुस्तक

७) बुडीत कर्जाची नोंद .............. करण्यात येते.

(अ) विक्री पुस्तक (ब) खरेदी पुस्तक (क) रोख पुस्तक (ड) मूळ रोजकीर्द

८) ग्राहकाने आपल्या बँक खात्यात परस्पर जमा केलेली रक्कम रोख पुस्तकात ........... बाजूला लिहीण्यात येते.

(अ) शोधन (ब) जमा (क) प्राप्ती (ड) दोन्ही

९) धनादेश लिहीणारा व त्यावर स्वाक्षरी करणारा व्यक्ती हा ............ असतो.

(अ) आदेशक (ब) आदेशिती (क) आदाता (ड) यापैकी सर्वच

१०) एक निश्चित रक्कम निश्चित कालाकरिता ................ खात्यात जमा केली जाते.

(अ) चालू (ब) बचत (क) मुदत ठेव (ड) आवर्ती

## प्र.४ खालील विधाने बरोबर आहेत किंवा चूक आहेत ते सकारण सांगा. :

१) रोजकीर्द हे दुय्यम नोंदीचे पुस्तक आहे.

२) संपत्तीची उधार विक्री ही विक्रीपुस्तकात नोंदविली जाते.

३) रोख आणि उधार खरेदीची नोंद खरेदी पुस्तकात केली जाते.

४) रोख विक्रीची नोंद विक्री पुस्तकात केली जाते.

५) रोख पुस्तकात केवळ रोखप्राप्ती व रोख शोधन संबंधी व्यवहाराच्या नोंदी करण्यात येतात.

## प्र.५ खालील विधानांशी तुम्ही सहमत का असहमत ते लिहा.

१) व्यापारी कसर रोख पुस्तकात नोंदविली जाते.

२) लघु रोख पुस्तकात मोठ्या व्यवहारांच्या नोंदी केल्या जातात.

३) रोख मिळाल्यास त्याची नोंद रोख पुस्तकाच्या नावे बाजूवर केली जाते.

४) रोख पुस्तकात नावे व जमा बाजूला लिहिल्या जाणाऱ्या व्यवहारांना प्रतिप्रविष्टी (दुहेरी नोंद) असे म्हणतात.

५) यंत्राच्या उधार खरेदीची नोंद खरेदी किर्दमध्ये करण्यात येते.

## प्र.६ खालील विधाने पूर्ण करा.

१) रोख पुस्तक हे --------- किर्द आहे.

२) मूळ रोजकिर्दीत फक्त --------- कसर नोंदविली जाते.

३) उधार खरेदी केलेला माल जर पुरवठादाराला परत केला असेल तर त्याची नोंद --------- कीर्दमध्ये होते.

४) संपत्तीची उधार विक्री केल्यास त्याची नोंद --------- पुस्तकात होते.

५) दोन रकानी रोकड पुस्तकात लिहावयाच्या व्यवहारांचा संबंध रोख आणि --------- शी असतो.

६) उधार खरेदी केलेल्या वस्तूंची नोंद --------- मध्ये होते.

७) रोख पुस्तकात --------- व्यवहार नोंदविले जात नाहीत.

८) रोख पुस्तकाच्या बँक रकानाच्या जमा बाजूची बेरीज जास्त असल्यास --------- दर्शविते.

९) लघु रोख पुस्तकाचा वापर --------- व्यवहारांसाठी केला जातो.

१०) खरेदी पुस्तकात केवळ --------- खरेदी केलेल्या मालाची नोंद केली जाते.

## प्र.७ खालील विधाने दुरुस्त करून पुन्हा लिहा.

१) रोख खरेदीचे व्यवहार खरेदी पुस्तकात लिहिले जातात.

२) रोख पुस्तकात रोखीच्या व्यवहाराबरोबरच उधारीचे व्यवहारही नोंदविले जातात.

३) लहान आणि मोठे व्यापार व्यवहार लिहिण्यासाठी सहाय्यक पुस्तकाचा वापर करतात.

४) लघु रोख पुस्तक सांभाळणाऱ्या व्यक्तीस मुख्य रोखपाल असे म्हणतात.

**प्र.८ खालील विधाने सोडवा :**

१) रोख खरेदी ₹ १,६०,००० आणि व्यापारी कसर १०% व रोख कसर ५% असल्यास शुद्ध खरेदीची राशी किती?

२) हरिषकडून ₹ १२,००० चा माल ७% व्यापारी कसरीवर खरेदी केला, तर व्यापारी कसरीची राशी किती?

३) प्रत्येकी ₹ ३०० प्रमाणे ५० शर्ट आणि प्रत्येकी ₹ ६०० प्रमाणे ४० पॅन्ट विकल्या, तर एकूण विक्रीची राशी किती?

४) प्रत्येकी ₹ ५०० प्रमाणे ३० जॅकेट्स ८% व्यापारी कसरीवर विकल्यास व्यापारी कसरीची राशी किती राहील?

**प्र.९ खालील तक्ता पूर्ण करा :**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | रोख खरेदी | | उधार खरेदी | | खरेदीपरत | | शुद्ध खरेदी |
| | ₹ ३५,००० | + | ₹ ५५,००० | - | | = | ₹ ८८,००० |
| २) | रोख विक्री | | उधार विक्री | | विक्रीपरत | | एकूण विक्री |
| | | + | ₹ ६०,००० | - | ₹ ३,००० | = | ₹ १,०२,००० |
| ३) | रोख विक्री | | उधार विक्री | | व्यापारी कसर | = | एकूण विक्री |
| | ₹ ९०,००० | + | ₹ १,१०,००० | - | ₹ १६,००० | = | |
| ४) | रोख खरेदी | | उधार खरेदी | | व्यापारी कसर | | शुद्ध खरेदी |
| | ₹ ७०,००० | + | | - | ₹ १८,००० | = | ₹ १,६२,००० |
| ५) | प्रारंभिक रोख शिल्लक | | रोख प्राप्ती | | रोख शोधन | | एकूण रोख |
| | | + | ₹ ६०,००० | - | ₹ ४५,००० | = | ₹ २३,००० |
| ६) | रोख विक्री | | उधार विक्री | | एकूण विक्री | | एकूण ऋणको |
| | ₹ १,२०,००० | + | ₹ १,४०,००० | = | ₹ २,६०,००० | - | |
| ७) | रोख खरेदी | | उधार खरेदी | | एकूण खरेदी | | एकूण ऋणको |
| | ₹ ८०,००० | + | | = | ₹ १,९०,००० | - | ₹ १,१०,००० |
| ८) | प्रारंभिक लघु रोख शिल्लक | | लघु रोख प्राप्ती | | लघु रोख खर्च | | अंतिम लघु रोख शिल्लक |
| | ₹ २५० | + | ₹ १,७५० | - | | = | ₹ ४२० |
| ९) | प्रारंभिक लघु रोख शिल्लक | | लघु रोख प्राप्ती | | लघु रोख खर्च | | अंतिम लघु रोख शिल्लक |
| | ₹ ४०० | + | | - | ₹ १,८०० | = | ₹ २५० |
| १०) | प्रारंभिक लघु रोख शिल्लक | | लघु रोख प्राप्ती | | लघु रोख खर्च | | अंतिम लघु रोख शिल्लक |
| | | + | ₹ १,८०० | - | ₹ २,२५० | = | ₹ १५० |

**१. जानेवारी २०१८ या महिन्याकरीता रोख व बँक रकाने असलेल्या रोख पुस्तकात पुढील व्यवहाराची नोंद करा.**

| २०१८ | | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| जाने. | ०१ | रोख रकमेत व्यवसाय प्रारंभ केला | १,२०,००० |
| | ०३ | बँक ऑफ बडोदामध्ये जमा केले | ५०,००० |
| | ०५ | साक्षीकडून मालाची खरेदी | २०,००० |
| | ०६ | दिवाकरला माल विकला व धनादेश मिळाला | २०,००० |
| | १० | साक्षीला रक्कम दिली | २०,००० |
| | १४ | दि. ६ जाने. २०१८ ला मिळालेला धनादेश बँकेत जमा केला | |
| | १८ | शिवाजीला माल विकला | १२,००० |
| | २० | वाहतुक खर्चाचे दिले | ५०० |
| | २२ | शिवाजीकडून रक्कम मिळाली | १२,००० |
| | २७ | कमिशन मिळाले | ५,००० |
| | ३० | वैयक्तिक उपयोगाकरीता व्यवसायातुन उचलले | २,००० |

**२ जूलै २०१८ या महिन्यातील पुढील व्यवहारांची नोंद रोख व बँक रकाने असलेल्या रोख पुस्तकात करा.**

| २०१८ | | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| जुलै | ०१ | हस्तस्थ रोख | १७,५०० |
| | ०१ | बँकेत शिल्लक | ५,००० |
| | ०३ | मालाची रोख खरेदी | ३,००० |
| | ०५ | अरुणकडून धनादेश मिळाला | १०,००० |
| | ०८ | रोखीने मालाची विक्री | ८,००० |
| | १० | अरुणकडून मिळालेला धनादेश बँकेत जमा केला | |
| | १२ | मालाची खरेदी केली आणि त्याचे धनादेशाद्वारे ताबडतोब शोधन करण्यात आले | २०,००० |
| | १५ | धनादेशाद्वारे स्थापना व्ययाचे दिले. | १,००० |
| | १८ | रोख विक्री | ७,००० |
| | २० | बँकेच जमा केले | १०,००० |
| | २४ | सामान्य खर्चाचे दिले. | ५०० |
| | २७ | कमिशन बद्दल रेखांकित धनादेश मिळाला | ६,००० |
| | २९ | भाडे दिले | २,००० |
| | ३० | वैयक्तिक उपयोगाकरिता व्यवसायातुन रक्कम उचलली | १,२०० |
| | ३१ | मजुरी दिली | ६,००० |

**३ जुलै २०१८ या महिन्यातील पुढील व्यवहारांच्या नोंदी मेसर्स कमल ट्रेडर्स यांच्या रोख व बँक रकाने असलेल्या रोख पुस्तकात करा. सुरुवातीची रोख शिल्लक ₹ २,००० आणि बँक चालु खाते ₹ ८,०००. या महिन्यातील व्यवहार खालील प्रमाणे.**

| | | रक्कम (₹) |
|---|---|---|
| ०३ | रोख विक्री | २,३०० |
| ०५ | मालाची खरेदी केली व धनादेश दिला | ६,००० |
| ०८ | रोख विक्री | १०,००० |
| १२ | सामान्य खर्चाचे दिले | ₹ ७०० |
| १५ | मालाची विक्री केली व धनादेश मिळाला व तो लगेच बँकेत जमा केला | २०,००० |
| १८ | मोटार कार खरेदी बद्दल धनादेश दिला | १५,००० |
| २० | मृणालकडून धनादेश मिळाला व तो बँकेत जमा केला | १०,००० |
| २२ | रोख विक्री | ७,००० |
| २५ | मृणालकडून मिळालेला धनादेश अनादरीत झाला | |
| २८ | भाडे दिले | २,००० |
| २९ | धनादेशाद्वारे टेलीफोन खर्चाचे दिले | ५०० |
| ३१ | वैयक्तीक उपयोगाकरीता व्यवसायातुन उचलले | २,००० |

**४ खालील दिलेल्या व्यवहारांवरुन विश्लेषणात्मक रकाने असलेले लघु रोख पुस्तक तयार करा. अग्रधन पध्दतीनुसार मुख्य रोखपालाकडून ₹१५०० मिळाले.**

| २०१८ | | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| जाने. | ०१ | वाहतुक खर्च दिला | ५० |
| | ०२ | दूरध्वनी खर्चाचे दिले | ४० |
| | ०२ | बस भाडे दिले | २० |
| | ०३ | टपाल खर्च दिला | ३० |
| | ०४ | कर्मचाऱ्यांसाठी अल्पोपहार | ८० |
| | ०६ | कुरिअर खर्च दिला | ३० |
| | ०८ | ग्राहकांसाठी अल्पोपहार | ५० |
| | १० | वाहन व्यय | ३५ |
| | १५ | व्यवस्थापकाचे ट्रॅक्सी भाडे | ७० |
| | १८ | स्टेशनरी खरेदी केली | ६५ |
| | २० | बस भाडे दिले | १० |
| | २२ | झेरॉक्स शुल्क | ३० |
| | २५ | इंटरनेट शुल्क | ३५ |
| | २७ | टपाल तिकिटांची खरेदी केली | २०० |
| | २९ | उपस्कर दुरुस्तीचे दिले | १०५ |
| | ३० | धुलाई खर्चाचे दिले | ११५ |
| | ३१ | किरकोळ खर्चाचे दिले | १०० |

५. **अग्रधन पध्दती अंतर्गत असलेल्या विश्लेषणात्मक लघु रोख पुस्तकात पुढील व्यवहारांच्या नोंदी करा.**

| २०१८ | | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| एप्रिल | ०१ | सुरुवातीची लघुरोख शिल्लक | २०० |
| | ०२ | मुख्य रोखपालाकडून वाहक धनादेश मिळाला | १,२०० |
| | ०३ | सेवकाला बक्षिस दिले | ४० |
| | ०४ | स्टेशनरी खरेदी केली | १५० |
| | ०५ | टॅक्सी भाडे दिले | ३५ |
| | ०६ | स्टॅम्प पॅड आणि शाईची खरेदी केली | १४० |
| | ०७ | गाडी भाडे दिले | ४० |
| | ०८ | बस भाडे दिले | ३० |
| | ११ | साफ-सफाईचे दिले | ५० |
| | १३ | पेन्सिल बॉक्स खरेदी केला | ४० |
| | १४ | तार खर्चाचे दिले | ३५ |
| | १५ | सोहनला दिले | २५० |
| | १९ | कर्मचाऱ्यानां चहा व फराळाचे दिले | १५० |
| | २० | रेल्वेभाडे दिले | ३० |
| | २१ | वाहतुक खर्चाचे दिले | ६५ |

६. **योग्य सहाय्यक पुस्तके तयार करा व त्याची खतावणी करा.**

| २०१८ | | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| फेब्रु. | ०१ | विराट यांना मालाची विक्री | ५,००० |
| | ०४ | खुशबु ट्रेडर्स कडून मालाची खरेदी | २,४८० |
| | ०६ | शंकर ट्रेडर्स यांना मालाची विक्री | २,१०० |
| | ०७ | विराट यांच्याकडून माल परत आला | ६०० |
| | ०८ | खुशबू ट्रेडर्सला माल परत केला | २८० |
| | १० | महेश यांना मालाची विक्री | ३,३०० |
| | १४ | कुन्ती ट्रेडर्स कडून मालाची खरेदी | ५,२०० |
| | १५ | अरुण यांचेकडून उपस्कर खरेदी केले | ३,२०० |
| | १७ | नरेशकडून माल आणला | ४,०६० |
| | २० | कुन्ती ट्रेडर्सला माल परत केला | २०० |
| | २२ | महेश यांचेकडून माल परत आला | २५० |
| | २४ | १०% व्यापारी कसरीवर किर्तीकडून माल खरेदी केला | ५,७०० |
| | २५ | ५% व्यापारी कसरीवर श्री सूर्याला मालाची विक्री केली | ६,६०० |
| | २६ | प्रकाश ब्रदर्सला मालाची विक्री केली | ४,००० |
| | २८ | किर्तीला माल परत केला, १०% व्यापारी कसर | १,००० |
| | २८ | प्रकाश ब्रदर्स कडून माल परत आला | ५०० |

**७. पुढील व्यवहारांची नोंद विजय यांचे खरेदीपुस्तक, विक्रीपुस्तक, खरेदी परत पुस्तक व विक्री परत पुस्तक यामध्ये करा, ऑगस्ट २०१८.**

२०१८

ऑगस्ट ०१ विकास स्टोअर्स कडून ₹ १८,००० चा माल ५% व्यापारी कसरीवर खरेदी केला.

०२ प्रभाकर ट्रेडर्सला ₹ ९,००० चा माल विकला.

०५ २८ जुलै २०१८ ला पाठविलेल्या आदेशानुसार विणाने ₹ १६,००० मुल्याचा माल ५% व्यापारी कसरीवर पाठविला.

०८ विकास स्टोअर्सला ₹ १,६०० (ढोबळ) माल परत केल्याचे नावे पत्र पाठविण्यात आले.

१० ६% व्यापारी करारीवर ₹ १२,००० मुल्याचा माल शामल ॲन्ड सन्सला विकण्यात आला.

१४ विणा यांनी ₹ ९०० (ढोबळ) माल परत केल्यासंबंधीचे जमापत्र मिळाले.

२२ प्रभाकर ट्रेडर्स यांनी ₹ १,५०० चा माल परत केल्याचे जमापत्र प्राप्त झाले.

२२ शामल ॲन्ड सन्स कडून ₹ १२०० (शुद्ध) माल परत आल्याचे जमापत्र मिळाले.

२३ प्रिया स्टोअर्स कडून ₹ १६,६०० चा माल खरेदी केला आणि ₹ १५० गाडीभाडे दिले.

२५ साधना स्ट्रोअर्स कडून ₹ १२,००० चा माल खरेदी करण्यात आला व तोच माल २०% नफ्याने आराधना स्टोअर्सला विकण्यात आला.

२८ दोषपूर्ण माल असल्यामुळे आराधना स्टोअर्सने ₹ २४०० चा माल परत केला तोच माल साधना स्टोअर्स ला परत करण्यात आला.

३१. कार्यालयीन उपयोगाकरीता आर्ट फर्निचर वर्कस् यांचे कडून उपस्कर उधार खरेदी केले ₹ ३०,०००.

**८. पुढील व्यवहारांच्या नोंदी श्री आकाश यांच्या खरेदीपुस्तक, विक्रीपुस्तक, खरेदी परत पुस्तक व विक्री परत पुस्तक यात करा.**

२०१८

जाने. ०१ धवल ट्रेडर्स कडून माल खरेदी केला ₹ १५,००० व तोच माल मूळ किमतीवर २५% नफा आकारुन कुणाल ट्रेडर्सला विकला.

०५ सुनेत्रा यांच्याकडे ₹ १०,००० वजा ५% व्यापारी कसर या अटीवर मालासाठी आदेश पाठविला.

०८ सौरभ ट्रेडर्स यांचे कडून ₹ २०,००० चा माल १०% व्यापारी कसरीवर खरेदी केला.

१३ विनायक स्टोअर्सला ₹ ८,००० चा माल ५% व्यापारी कसरीवर विकला

१५ विनायक स्टोअर्सने ₹ २०० चा माल आपल्याला परत पाठविला.

१८ सुनेत्रा यांनी ५ जाने २०१८ च्या आदेशाची अंमलबजावणी केली.

२० विष्णु ट्रेडर्सला ₹ २१,००० चा माल ५% व्यापारी कसरीवर विकला.

२२ सुनेत्राला ₹ १,००० (ढोबळ) माल परत केला.

२८ कुणाल ट्रेडर्स कडून ₹ ५०० (शुध्द) चा माल परत आला.

३० सौरभ ट्रेडर्स यांना ₹ १,५०० (ढोबळ) माल परत केला.

**९. खालील व्यवहारा श्री कमल यांच्या सहाय्यक पुस्तकात नोंदवा.**

२०१८

एप्रिल ०१ सुहास यांनी त्यांच्या ४१ क्रमांकाच्या बिजकानुसार ₹१२,००० चा माल खरेदी केला.

०४ बिजक क्रमांक १२ प्रमाणे विराट यांचेकडून ₹ ११,७८० चा माल १०% व्यापारी कसरीवर खरेदी केला.

०७ बिजक क्रमांक १२ प्रमाणे कुलदिप यांचेकडून ₹ ११,०००चा माल २५% व्यापारी कसरीवर आणला.

०८ बिजक क्रमांक ८४ प्रमाणे आर्ट फर्निचर वर्क्स यांचेकडून ₹ १३,००० उपस्कर खरेदी केले.

१२ बिजक क्रमांक २७ प्रमाणे धिरज यांना ₹ ११,५०० चा माल विकण्यात आला.

१३ बिजक क्रमांक ८८ प्रमाणे राजा यांना ₹ १२,७८० ता माल ५% व्यापारी कसरीवर विकण्यात आला.

२१ सुरेश यांना ₹८००० चा माल २०% व्यापारी कसरीवर विकला.

२३ बिजक क्रमांक १४ प्रमाणे धिरज यांनी ₹ ५,००० चा माल परत पाठवला.

२६ सुरेश यांनी ₹ १५० (ढोबळ) माल परत केला आणि त्यांना जमापत्र क्रमांक ११५ निर्गमित करण्यात आले.

२८ सुहास यांना ₹ १,२०० चा माल परत केला, नावे पत्र क्र. ०९.

३० विराट यांना माल परत केला ₹ १,३०० (ढोबळ) आणि नावे पत्र क्रमांक १० पाठविले.

३० कुलदिप यांना माल परत केला ₹ १,१०० (ढोबळ) आणि नावे पत्र क्रमांक ११ पाठविले.

### १०. खालील व्यवहार मेसर्स नवयुग ट्रेडर्स यांच्या सहाय्यक पुस्तकात लिहून दाखवा.

२०१८

मार्च ०१ भारत पाटील यांना ₹ १०,००० चा माल १०% व्यापारी कसरीवर विकला.

०४ नरेश कडून ₹ ११,००० वजा १०% व्यापारी कसरीवर माल खरेदी केला.

०६ कार्यालय उपयोगाकरीता मेसर्स शाम फर्निचर वर्क्स यांचे कडून ₹ १५,००० चे उपस्कर खरेदी केले.

०७ भारत पाटील यांनी वरील मालापैकी २०% दोषपुर्ण माल परत पाठविला त्या बदल्यात त्यांना नविन माल पाठविण्यात आला.

०८ सुंदर यांना ₹ १३,००० वजा १५% व्यापारी कसरीवर माल विकण्यात आला.

१० ₹ २४,००० पुस्तकी मुल्य असलेले संगणक सुमित यांना ₹ २३,८०० ला विकले.

१२ साजन यांच्याकडे ₹ १२,००० च्या मालाचा आदेश दिला.

१७ नरेश यांच्याकडून ₹ १४,००० चा माल खरेदी केला व तोच माल कामेशला ₹ १६,००० ला विकला.

१९ कामेशकडून ₹ १,६०० चा माल परत आला व तो लगेच नरेशला परत केला.

२३ ₹ ४,८०० पुस्तकी मुल्य असलेले उपस्कर राकेश यांना ₹ ४,५०० ला विकले.

२६ कार्यालय उपयोगाकरीता ६ मार्च २०१८ रोजी खरेदी केलेले उपस्कर ₹ ४,५०० मूल्याचे मेसर्स शाम फर्निचर वर्क्स यांना परत करण्यात आले.

२८ साजन यांनी १२ मार्च २०१८ च्या आदेशाची पूर्तता केली.

# 6 बँक मेळपत्रक / बँक जुळवणी पत्रक
## (Bank Reconciliation Statement)

**घटक**

*६.१ अर्थ, महत्व आणि लेखांकन दस्तऐवजाची उपयुक्तता.*

*६.२ बँक मेळपत्रकाचा अर्थ, गरज आणि महत्व.*

*६.३ रोख व पास बुक शिल्लकेत येणाऱ्या फरकाची कारणे.*

*६.४ बँक मेळपत्रक / बँक जुळवणी पत्रकाचा नमुना.*

*६.५ बँक मेळपत्रक / जुळवणी पत्रक तयार करणे.*

**क्षमता विधाने**

- *विद्यार्थी बँकेशी संबंधीत वेगवेगळ्या कागदपत्रांचे नमुने तयार करू शकतो.*
- *विद्यार्थी रोख पुस्तक व बँक पास बुक यामधील फरक ओळखतो.*
- *विद्यार्थी रोख पुस्तकाची शिल्लक आणि पास बुकची शिल्लक यामध्ये येणाऱ्या फरकाची कारणे शोधू शकतो.*
- *विद्यार्थी बँक मेळपत्रक तयार करू शकतो.*

**बँक मेळपत्रक / बँक जुळवणी पत्रक : (Bn k Recn cilit in Stt ements)**

### ६.१. लेखांकन दस्तऐवजांचा अर्थ, महत्व आणि उपयुक्तता.

**प्रस्तावना :**

लेखांकिय दस्तऐवजात व्यवहाराची मुळ सत्यता, जसे व्यवहाराची राशी, ही राशी कोणाला दिली, व्यवहाराची कारणे आणि व्यवहाराचा उद्देश याचे वर्णन केले जाते. जेंव्हा एखादा आर्थिक व्यवहार होतो त्या व्यवहाराचा सबळ पुरावा हा पुस्तपालन प्रक्रिये करिता आधुनिक बँकिंग सेवे मध्ये अमूलाग्र बदल झालेला आहे. आजकालच्या व्यवसायामध्ये इंटरनेट आणि मोबाईल बँकिंगची भूमिका लक्षणीय आहे. रोख शोधन व रोख प्राप्तीचे व्यवहार या पध्दतीनुसार केल्यास दोन्ही पक्षांना व्यवहाराचे पुरावे प्राप्त होतात.

परंतु आजही बँकेचे व्यवहार बँकेत जाऊनच पूर्ण करण्याचे प्रमाण जास्त आहे. धनादेशाने किंवा ड्राफ्ट ने व्यवहाराचे शोधन आणि प्राप्तीचे महत्व पूर्णपणे अबाधित राहते.

**बँक दस्तऐवजाचे प्रकार : (Types of Bank Documents)**

१. **पैसे जमा करण्याचे चलनपत्र : (Pay-in-slip)**

**अर्थ :** पैसे भरण्याचे पावतीला पैसे जमा करण्याची पावती / चलनपत्र असेही म्हणतात. खातेदार जेंव्हा बँकेत धनादेश किंवा रक्कम भरण्यासाठी जातो तेंव्हा ही पावती त्याला भरून द्यावी लागते. जेंव्हा रोख रक्कम बँकेत जमा करावयाची असते तेंव्हा खातेदार त्याचा खातेक्रमांक, पैसे, जमा करण्याची तारीख आणि बँकेत जमा करावयाच्या रक्कमेचे विवरण देतो. त्याच प्रमाणे खातेदार बँकेत जेंव्हा धनादेश जमा करतो तेंव्हा धनादेशाची संपूर्ण माहिती जसे खाते क्रमांक ज्या बँकेचा धनादेश आहे. त्या बँकेचे नाव, रक्कम इत्यादी माहिती खातेदाराला पावतीत भरावी लागते.

पैसे भरण्याची पावती / चलनपत्र दोन भागात विभागलेली असते. पावतीची उजवी बाजू बँक आपल्याकडे पुरावा म्हणून ठेवून घेते तर डावीबाजू म्हणजे पावतीचा दुसरा भागावर (counterfoil) संबंधीत कारकुनाची सही स्टॅम्प आणि दिनांक लिहितो आणि खातेदाराला अभिस्विकृती म्हणून परत देतो.

**महत्व आणि उपयुक्तता (Importance and Utilities) :**

१) खातेदाराला आपल्या खात्यात रोख रक्कम तसेच धनादेश जमा करण्याची सुविधा मिळते.

२) खाते पुस्तकात पैसे जमा करण्याच्या आधारे रोख किंवा धनादेश जमा केल्याची नोंद केली जाते.

३) अभिस्विकृती किंवा पावतीचा छोटा भाग हा कायदेशीर पुरावा म्हणून उपयोगात येऊ शकतो.

**घटक :**

(पैसे जमा करण्याच्या पावतीच्या डाव्या आणि उजव्या बाजूला एकसारखी माहिती असते)

१) बँकेचे नाव, शाखा आणि पत्ता.

२) व्यवहाराची तिथी.

३) बँकेत जमा केलेली रक्कम अंकात व अक्षरात असली पाहिजे (रोख / धनादेश)

४) खातेदाराचे नाव.

५) खाते क्रमांक.

६) खात्याचा प्रकार.


७) जमा करणाऱ्या नोटांचे विवरण जसे ₹ १००, ₹ २००, ₹ ५००, ₹ २,००० इ.

८) धनादेशाची संपूर्ण माहिती.

९) पैसे मिळणाऱ्या बँकेची माहिती.

१०) जर ₹ ५०,००० च्या वर रक्कम जमा करणार असाल तर पॅन क्रमांक देणे आवश्यक आहे.

**पैसे जमा करण्याच्या चलनपत्राचा नमुना (Pay-in-Slip)**




**आकृती. ६.१ (अ)**

बँकेत जर धनादेश जमा करावयाचा असल्यास आधुनिक पध्दतीनुसार पैसे भरण्याच्या पावती सोबत जोडून बँकेत लावलेल्या धनादेश संकलन पेटीमध्ये टाकावे.

**२. पैसे काढण्याची पावती / चलनपत्र (Withdrawal Slip) :**

**अर्थ :** बँकेत असलेल्या खात्यातून रक्कम काढण्यासाठी जी पावती भरावी लागते त्या पावतीला पैसे काढण्याची पावती किंवा पैसे काढण्याचे चलन पत्र असे म्हणतात. या पावतीची दुसरी प्रत म्हणून मिळत नाही, तर या व्यवहाराची नोंद बँकेच्या खाते पुस्तकात केली जाते आणि त्याचा परिणाम ग्राहकांकडे असलेल्या बँक पास बुकामध्ये दिसून येतो.

**महत्व आणि उपयुक्तता : (Importance and Utilities)**

१) चलनाचा / पावतीचा उपयोग खातेदाराला फक्त बँकेतून पैसे काढण्यासाठीच होतो.

२) खातेदाराने या पावतीच्या / चलनाच्या समोरील बाजू आणि मागील बाजूला सही करावी.

३) पावतीवर खातेदाराने केलेली सही ही बँकेद्वारे नमुना सही सोबत तपासून घेतली जाते. यामुळे याबाबत गैरव्यवहार टाळता येतो.

**घटक :**

१) बँकेचे नाव आणि पत्ता.

२) व्यवहाराची तिथी.

३) खातेदाराचे नाव.

४) खात्याचा नंबर आणि प्रकार.


५) रक्कम अंक आणि अक्षरासहीत.

६) खातेदाराची स्वाक्षरी.

जर बँकेतून काढली जाणारी रक्कम ₹ ५०,००० पेक्षा अधिक असल्यास खातेदाराने पॅनकार्डची छायांकीत प्रत देणे आवश्यक आहे.

खातेदार बँकेतून पैसे काढण्यासाठी धनादेशाचा सुध्दा वापर करू शकतो.

**पैसे काढण्याच्या चलनपत्राचा नमुना** (Withdrawal Slip) :


CASH WITHDRAWAL SLIP / पैसे काढावयाचे चलन / नकद आहर्ता पर्ची

बँक ऑफ महाराष्ट्र / बैंक ऑफ महाराष्ट्र / Bank of Maharashtra / एक परिवार एक बैंक

बँकेतून पैसे काढावयाच्या चलनावरोबर खाते पुस्तिका आवश्यक आहे. कृपया मागे सही करावी. हे चलन म्हणजे चेक नव्हे. केवळ मूळ शाखेत वापरण्यासाठी
इस निकासी पर्ची के साथ पासबुक का होना जरूरी हैं। कृपया पिछली ओर हस्ताक्षर करें। यह आहरण पर्ची चेक नहीं हैं। केवल मूल शाखा में प्रयुक्त हेतु।
Pass Book must accompany with this withdrawal. Please sign overleaf. This withdrawal slip is not a cheque. Use at home branch only

शाखा/Branch ______ दिनांक/Date : ______

कृपया, मला वा धारकाला ₹.
वाहक/स्वत: को ₹.
Pay Bearer/Self the sum of ₹. ______ debiting

बचत खाते क्र. / बचत खाता क्र. / Saving A/c No. ______ ला नावे टाकून रोख द्यावेत. / में नामें डालकर नकद अदा करें।

खातेदाराचे नांव / खाताधारक का नाम / in Name of A/c. ______ ₹ ______

खातेदाराची स्वाक्षरी / खाताधारक के हस्ताक्षर / A/c. Holder's Signature ______

पासकर्ता अधिकारी/निरीक्षक/कर्मचाऱ्याची स्वाक्षरी / पासकर्ता अधिकारी/निरीक्षक/कर्मचारी के हस्ताक्षर / Signature of Passing Officer/Supervisor/Employee ______

F24C 200 x 14,000 BLOCKS - 02/2018

६.१ (ब)

बँकीग सेवा घेण्यासाठी प्रत्यक्ष बँकेत जाऊन व्यवहार करण्याची आवश्यकता आता राहिली नसून माहिती व तंत्रज्ञानाच्या आधारे सुध्दा ही सेवा मिळवू शकता, याला आभासी बँकिंग सेवा (Virtual Banking) असे म्हणतात.

## ३. बँक पास बुक / ग्राहक पुस्तिका (Bank Pass Book) :

**अर्थ :** बँकेच्या खाते पुस्तकात असलेल्या खातेदारांच्या खाते क्रमांकावर झालेल्या व्यवहाराचा खाते पुस्तकातील उतारा म्हणजे पास बुक / ग्राहक पुस्तिका होय. खातेदाराच्या खात्यात झालेल्या नोंदीची खाते पुस्तकांची माहिती बँक ग्राहकाला देत असते. वेळोवेळी झालेल्या व्यवहाराच्या नोंदी आणि खात्यावरील शिलकीची माहिती बँक एका लहान पुस्तकाद्वारे ग्राहकाला / खातेदाराला देते. आधुनिक पध्दतीनुसार बँक पास बुक संगणकीय लेखा प्रणालीद्वारे तयार करून ग्राहकाला दिली जातात.

**महत्व आणि उपयुक्तता :**

१) पास बुकमुळे खात्यावरील शिल्लकेची एक विशिष्ट तारखेची माहिती मिळते.

२) वादग्रस्त प्रकरणामध्ये बँकेच्या अधिनियमानुसार बँक पास बुक हा एक सबळ पुरावा म्हणून त्याचा वापर होतो.

३) पास बुकावरून हे सिध्द होते की, खात्यावरील सर्व व्यवहार बँकद्वारेच झालेले आहेत.

**घटक :**

१) बँकेचे नाव आणि शाखा.

२) बँकेचा पत्ता आणि दुरध्वनी क्रमांक.

३) खातेदाराचे संपूर्ण नाव आणि पत्ता.

४) खात्याचा प्रकार.

५) खातेक्रमांक आणि ग्राहक ओळख क्रमांक.

६) खातेदाराचा फोटो.

७) आय.एफ.एस.सी. (भारतीय वित्तीय पध्दत क्रमांक) या अद्याक्षर क्रमांकाचा उपयोग संगणकीय पध्दतीने रक्कम स्थानांतरीत करण्यासाठी होतो जसे IMPS, NEFT आणि RTGS इत्यादी.

८) बँक पास बुकामध्ये दिनांकाचा रकाना, विवरण, धनादेश क्रमांक काढलेली रक्कम, जमा केलेली रक्कम आणि बँक अधिकाऱ्याची सही असते.

**बँक पास बुक/ग्राहकपुस्तिकेचा नमुना (Format) :**

**पास बुक/ग्राहक पुस्तिका**

| दिनांक | विवरण | धनादेश क्र. | काढलेली रक्कम नावे. (₹) | जमा केलेली रक्कम जमा.(₹) | शिल्लक (₹) | सही |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**६.१ (क)**

खातेदाराला / ग्राहकाला बँकेत जमा असलेली रक्कम व काढलेली रक्कमेची कोणतीच माहिती नसायची परंतु १८ व्या शतकात पास बुक/ग्राहक पुस्तिकेचा वापर बँकेत सुरू होऊन ग्राहकांच्या खात्यावरील संपूर्ण व्यवहाराची माहिती पहिल्या वेळेस बँक पास बुकाच्या स्वरूपात त्याच्या हातात देण्यात आली. आज विवरण ऑनलाईनसुध्दा पाहता येतात.

**४. बँक विवरण : (Bank Statement) :**

**अर्थ :** व्यावसायिक बँकेत व्यवसायाच्या नावाने चालू/ चलखाते उघडू शकतो कारण चालू खात्याच्या अनेक सुविधा व्यवसायिकाला मिळतात जसे व्यवसायिक अनेक वेळेस चालू खात्यात रक्कम व धनादेश जमा करू शकतो तसेच अनेक वेळेस पैसे रोख आणि धनादेशाद्वारे काढू शकतो.

व्यवसायिकाला चालू खात्यावर झालेले व्यवहार व चालू खात्यातील शिल्लक जाणून घेण्याची इच्छा असते त्या करिता बँक आपल्या खातेदाराला बँक विवरण देते. चालू खातेदाराने एका विशिष्ट कालावधीत झालेल्या आर्थिक व्यवहाराच्या नोंदीचे संक्षिप्त माहिती/ विवरण बँक विवरणामध्ये समाविष्ट असते. पूर्वी बँक विवरण कागदावर छापील स्वरूपाचे असायचे आणि ते विवरण बँक मासिक त्रिमाही किंवा वार्षिक रूपात तयार करत असत. परंतु इंटरनेट आणि ऑनलाईन बँकिंगमुळे बँक विवरण माहिती ऑनलाईन सुध्दा मिळू शकते. हेच इलेक्ट्रॉनिक बँक विवरण खातेदार ऑनलाईन सुध्दा पाहू शकतो तसेच संपादित करून तो बँक विवरणाची प्रत काढू शकतो. तसेच ऑनलाईन बँक विवरणामुळे कागद आणि टपालाचा खर्च कमी होतो.

**महत्व आणि उपयुक्तता : (Importance and Utilities)**

१) बँक विवरणामुळे खातेदाराला बँक खात्यावरील शिल्लक समजते.

२) खर्चाचे शोधन करतांना योग्य नियोजन करता येते.

३) व्यावसायिकाने बँकेत जमा केलेले धनादेशाच्या शोधनाचा कालावधी समजतो.

४) बँक मेळपत्रक/ जुळवणी पत्रक तयार करण्यासाठी बँक विवरण उपयोगी आहे.

**घटक :**

१) बँकेचा तपशील शाखा आणि पत्ता.

२) व्यवहाराची तिथी.

३) विवरणे.

४) धनादेश क्रमांक.

५) काढलेल्या रक्कमा.

६) जमा केलेल्या रक्कमा.

७) शिल्लक.

**नमुना :** **खाते विवरण**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| बँक ऑफ इंडिया<br>एस.बी.रोड<br>खाते प्रकार : संस्थात्मक | | | चालू खाते<br>खाते विवरण | | दिनांक: / /२०___<br>पान क्रमांक :<br>खाते वही क्र.: | |
| खाते | | | | | | |
| **दिनांक** | **विवरण** | **धनादेश क्रमांक.** | **काढलेली रक्कम**<br>**नावे. ₹** | **जमा केलेली रक्कम**<br>**जमा. ₹** | **शिल्लक (₹)** | **सही** |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**६.१(ड)**

५. **बँक सूचना (Bank Advice) :**

बँकेकडून खातेदार ग्राहकाला विहीत नमुन्यात काही माहिती दिली जाते जसे रक्कम जमा करण्यासाठी दिलेला धनादेश न वटल्यास, बँक शुल्क नावे केल्याबद्दल, बँककडे वटविलेल्या प्राप्त विपत्र अनादरीत झाल्यामुळे, राशी संग्रहणार्थ जमा केलेले **विपत्र,** व्याज आकारणी, लाभांश आणि व्याज बँकेद्वारे गोळा करणे आणि ग्राहकाच्या पूर्व सूचनेनुसार बँकेने खर्चाचे शोधन केलेले असल्यास.

**महत्व आणि उपयुक्तता : (Importance and Utilities)**

१) बँकेच्या सूचने आधारे व्यवसायिक खात्याशी संबंधीत संपूर्ण माहिती वेळोवेळी अद्यावत करू शकतो.

२) खात्यावर झालेल्या व्यवहाराचा पुरावा तयार करता येतो.

**घटक :**

१) बँकेचे नाव आणि पत्ता.

२) बँक सूचना पाठविण्याची तिथी.

३) खातेदाराचे नाव, पत्ता आणि खातेक्रमांक.

४) व्यवहारांचा तपशील.

५) नावे आणि जमा होणारी रक्कम.

**नमुना :**

**बँक सूचना**

**दि. पिपल्स सहकारी बँक मर्यादित पुणे**

दिनांक : २४ नोव्हेंबर, २०१८

प्रति,

**मे. धनश्री ट्रेडर्स, पुणे**

खाते नं.- चालू खाते ००००१२३४

महोदय,

आपले खाते खालील माहितीच्या आधारे नावे/ जमा करण्यात आले. :

| **व्यवहाराचा तपशील** | **रक्कम** | | | |
|---|---|---|---|---|
| | **नावे (₹)** | | **जमा (₹)** | |
| आपले विद्युत देयक आपल्या सूचनेप्रमाणे अदा करण्यात आले आहे सोबत देयकाची प्रत देत आहोत. | १५,००० | ०० | | |
| एकूण | १५,००० | ०० | | |

बँक व्यवस्थापक

६.१ (अ)

खातेदाराने आपल्या नोंदीकृत मोबाईल नंबरवरून बँकेशी व्यवहाराची नवीन माहिती बँक अधिसूचना संदेशवहनद्वारे बँक सूचनाद्वारे प्राप्त करू शकतो.

## ६.२ बँक मेळपत्रक / बँक जुळवणी पत्रकाचा अर्थ, व्याख्या, गरज आणि महत्व :

**अर्थ :** व्यावसायिक आपल्या खातेपुस्तकात/ लेखा पुस्तकात बँक रकाना असलेली रोख पुस्तक तयार करतो आणि त्यात बँकेशी संबंधीत सर्व व्यवहार नोंदवितो. रोख पुस्तकात असलेला बँकेचा रकाना चालू खाते दर्शवितो. इतर व्यवसायिकांशी होणारे व्यवहार बँका आपल्या खाते पुस्तकात करतात आणि त्यावरून बँक ग्राहकांचे पास बुक/ ग्राहक पुस्तिका तयार करतात. जेंव्हा व्यावसायिक बँकेत रोख रक्कम जमा करतो किंवा राशी संग्रहणार्थ धनादेश जमा करतो तेंव्हा त्याची नोंद तो रोख पुस्तकात नावे किंवा प्राप्ती बाजूला करतो. बँक याची नोंद पास बुकामध्ये जमा किंवा शोधन बाजुला करते. त्याचप्रमाणे, व्यावसायिक खर्चाचे शोधन करण्यासाठी धनादेश देतो, याची नोंद तो रोख पुस्तकात जमा किंवा खर्च (Payment) बाजूला करतो. याच व्यवहाराची नोंद बँक ग्राहकांच्या पास बुकामध्ये नावे किंवा उत्पन्न बाजूला करते. म्हणजेच व्यावसायिक जे काही रोख पुस्तकात नोंदवितो त्याची विरुद्ध नोंद बँक पास बुकमध्ये करते. खरेतर रोख पुस्तकातील शिल्लक व बँक पास बुकमधील शिल्लक समान असली पाहिजे. यात फरक फक्त एवढाच की रोख पुस्तकात नावे शिल्लक असेल तर पास बुकमध्ये जमा शिल्लक असेल.

| व्यवसायाच्या पुस्तकात | | बँकेच्या पुस्तकात | |
|---|---|---|---|
| नावे. रोख पुस्तक जमा. | | नावे. पास बुक (व्यवसायिक खात) जमा. | |
| प्राप्ती(₹) | शोधन (₹) | शोधन (₹) | प्राप्ती (₹) |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

**आकृती. ६.२(अ)** **आकृती. ६.२(ब)**

परंतु प्रत्यक्षात रोख पुस्तकातील बँक शिल्लक नेहमीच पास बुकमधील शिल्लक पेक्षा वेगळीच असते. या वेगवेगळ्या दिसणाऱ्या शिल्लकांची कारणे आणि त्यांची जुळवणी करण्यासाठी बँक मेळपत्रक तयार करणे अनिवार्य असते. बँकाकडून आपल्या चालू खातेदारांना नियमितपणे बँक विवरण देत असते. बँक पास बुक आणि रोख पुस्तकातील फरकाचे सुक्ष्म निरिक्षण करण्यासाठी बँक विवरणाची तुलना रोख पुस्तकाशी केली जाते.

**व्याख्या :**

"असे विवरण की, जे रोख पुस्तकातील बँक रकान्याची शिल्लक व बँक पास बुकातील शिल्लक यातील मेळ/ जुळवणी करण्यासाठी तयार केले जाते आणि दोन्ही शिल्लकामध्ये कशामुळे फरक पडला याची कारणे दर्शविते. त्यास बँक मेळ पत्रक/ जुळवणी पत्रक असे म्हणतात."

"असे विवरण की, जे एक विशेष कालावधीचे किंवा एका महिन्याच्या बँक पास बुकची शिल्लक आणि रोख पुस्तकातील बँक रकान्याची शिल्लक यातील फरकाची कारणे दर्शविते त्या विवरणाला बँक मेळ पत्रक/ बँक जुळवणी पत्रक असे म्हणतात."

**बँक मेळपत्रकाची गरज आणि महत्व : (Need and importance of Bank Reconciliation Statement)**

१) रोख पुस्तक आणि बँक पास बुक नुसार असणारी बँक शिल्लक यात फरक असण्याची कारणे स्पष्ट करते.

२) पास बुक व रोख पुस्तक मध्ये झालेल्या लोप विभ्रम/ विसर चुका शोधून काढण्यासाठी याची मदत होते.

३) रोकड हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून घोटाळा होण्याची संधी कमी करते.

४) बँकेशी होणाऱ्या व्यवहारांची बँकेने योग्य नोंदी केल्या आहेत की नाही ते तपासण्यासाठी मदत होते.

५) बँक मेळपत्रक हे संस्थेच्या कर्मचाऱ्यांवर रोखनोंदी अद्ययावत ठेवण्याकरिता नैतिक दडपणाचे काम करते.

६) रोख प्राप्ती आणि रोख शोधनाच्या माहितीचे अंतर्गत अंकेक्षण करण्यासाठी महत्वाची यंत्रणा म्हणून काम करते.

## ६.३ रोख पुस्तक आणि बँक पास बुकात दिसणाऱ्या फरकाची कारणे :

१) वेळेतील अंतर/ फरक.

२) व्यावसायिकाकडून किंवा बँकांकडून होणाऱ्या लोप विभ्रम/ विसर चुका.

**१) वेळेतील अंतर/ फरक : (Time Difference) :**

व्यवहाराची नोंद एकाच वेळी रोख पुस्तक आणि पास बुक मध्ये केली जात नाही तर त्यामुळे काही कालावधी असतो.

**उदा. :** जेंव्हा व्यावसायिक बँकेमध्ये धनादेश जमा करतो अशावेळी त्याच्या दृष्टीने हा व्यवहार आहे व तो त्याची नोंद ताबडतोब रोकड पुस्तकात करतो. परंतु बँक धनादेशाची राशी खात्यात जमा झाल्यानंतर पास बुक मध्ये नोंद करते. परंतु वेळेअभावी व्यवहाराची नोंद फक्त व्यवसायिकाला रोख पुस्तकात दिसते परंतु पास बुक आणि रोख पुस्तकाची जुळवणी केल्यास दोन्ही पुस्तकात फरक दिसून येतो.

२) **व्यावसायिक किंवा बँकांकडून होणाऱ्या लोप विभ्रम / विसर चुका :**

व्यावसायिक किंवा बँक यांच्या कडून होणाऱ्या लोप विभ्रम/ विसर चुका हे सुध्दा दोन्ही पुस्तकातील शिल्लकेत दिसणाऱ्या फरकाचे कारण ठरू शकते.

**उदा. :** बँकेने आकारलेल्या बँक शुलकाची ₹ ५४०/- नोंद बँकेने नावे केली असल्यास आणि हीच नोंद रोख पुस्तकात ₹ ४५०/- ने केल्यास या ठिकाणी या व्यवहाराची नोंद दोन्ही पुस्तकात दिसून येते परंतु दोन्ही पुस्तकाच्या शिल्लकेत फरक दिसून येतो.

**रोख पुस्तक आणि बँक पास बुकमधील फरकाची कारणे**

१. **वेळेअभावी फरक.**

अ) व्यवहाराची नोंद फक्त रोख पुस्तकात दिसते परंतु पास बुकात दिसत नाही.

१) शोधन केलेले धनादेश परंतु सादर केले नाही.

२) जमा केलेले धनादेश पण बँकेकडे संकलीत न केलेले धानादेश.

ब) व्यवहाराची नोंद फक्त पास बुकात दिसते परंतु रोख पुस्तकात दिसत नसल्यास.

१) बँकेने व्याज जमा केले.

२) ग्राहकाच्या वतीने जमा केलेली रक्कम

३) बँकेद्वारे खर्चाचे सरळ शोधन.

४) बँकेने आकारलेले बँक शुल्क, अधिकोष अधि विकर्षावरील व्याज, बँकेने आकारलेले अपहार.

५) प्राप्यविपत्र आणि धनादेशाचे अनादरण.

६) बँक खात्यात परस्पर रक्कम जमा करणे.

२. **बँक आणि व्यावसायिकाकडून होणाऱ्या लोप विभ्रम चुका.**

१) चुकीच्या बाजूला नोंदविणे.

२) चुकीच्या खात्यात नोंदविणे.

३) चुकीचे संतुलन व बेरीज.

४) दोनदा नोंदविणे.

५) व्यवहारातील लोप विभ्रम चुका.

६.३(अ)

१. **वेळेमुळे दिसणारा फरक :**

अ) **रोख पुस्तकात व्यवहार दिसणे परंतु पास बुकात न दिसणे :**

१) **धनादेश दिला परंतु सादर न केल्यास :** खातेदाराने धनादेश दिल्याबरोबर लगेच रोख पुस्तकात जमा बाजुला नोंद करतो परंतु बँक धनादेश जो पर्यंत बँकेत सादर होत नाही तो पर्यंत खाते पुस्तकात नोंद घेत नाही. बँक मेळपत्रक तयार करण्यापूर्वी जर ग्राहकाने धनादेश बँकेत सादर न केल्यास खातेदाराच्या पास बुकाची शिल्लक ही रोख पुस्तकाच्या शिल्लकेपेक्षा जास्त/अधिक दिसते.

२) **धनादेश बँकेत जमा केला परंतु रक्कम जमा न झाल्यास :** धनादेश मिळाल्याबरोबर लगेच बँकेत जमा केल्याबरोबर खातेदार रोख पुस्तकात नावे बाजूला नोंद करतो. त्यामुळे रोख पुस्तकाची शिल्लक बँक रकान्यात जास्त होते परंतु जोपर्यंत धनादेशाची रक्कम बँकेत जमा होत नाही, तोपर्यंत पास बुकमध्ये जमा दाखविले जात नाही. बँक मेळपत्रक तयार करण्याच्या तिथिला शिल्लकेत फरक दिसून येतो.

**ब) बँक पास बुकमध्ये व्यवहाराची नोंद दिसते परंतु रोख पुस्तकात नाही :**

१) **बँकेने व्याज जमा केल्यास :** खातेदाराला दिले जाणारे व्याज बँकेने ग्राहकाच्या खात्यात जमा केले असल्यास पास बुकमधील बँकेची शिल्लक जास्त होईल. बँकेकडून व्यवहाराची सूचना मिळाल्यानंतर ग्राहक बँकेशी सुसंगत नोंद आपल्या रोख पुस्तकात करेल. तो पर्यंत पास बुकातील बँक शिल्लक ही रोख पुस्तकातील बँक शिल्लकपेक्षा अधिक राहील.

२) **ग्राहकाच्या वतीने सरळ/ थेट रक्कम बँकेत जमा करणे :** ग्राहकाच्या स्थायीसूचने नुसार बँक संबंधीत व्यक्तीकडून व्याज, लाभांश, भाडे इ. ग्राहकाच्या खात्यात जमा करते त्यामुळे पास बुक मधील शिल्लक वाढते. पण वरील जमा रक्कमेची नोंद बँक सूचना मिळाल्यानंतरच ग्राहक आपल्या रोख पुस्तकात नोंदी करतो मात्र तोपर्यंत रोख पुस्तक आणि बँक विवरण (पास बुक) मधील शिल्लक वेगळी राहते.

३) **बँकद्वारे सरळ शोधन :** ग्राहकांच्या सुचनेनुसार काही खर्चाचे शोधन बँक करु शकते जसे विमा प्रव्याजी, विद्युत बिल, दुरध्वनी बील, कर्जाचे हप्ते इत्यादी. वरील खर्चाचे शोधन केल्यानंतर लगेच बँक ग्राहकांच्या पास बुक आणि बँकविवरणात नावे बाजुला नोंद करते. परंतु बँकेकडून सुचना मिळाल्याशिवाय ग्राहकाला व्यवहाराची कोणतीही कल्पना नसते तो पर्यंत पास बुक बँकविवरणाची शिल्लक ही रोख पुस्तकातील शिल्लकेपेक्षा कमी असते.

४) **बँकेतर्फे बँकशुल्क, अधिविकर्षवरील व्याज, वर्तनाची आकारणी :** बँकेतर्फे ग्राहकाला वेगवेगळ्या प्रकारच्या सेवा पुरविल्या जातात. आणि त्या बद्दल बँक शुल्क आणि वर्तन/ अपहार त्याच प्रमाणे ग्राहकाला दिलेल्या अधिविकर्ष सुविधेवर देखील व्याज आकारते. अशा सुविधेवरील आकारलेले व्याज बँक वेळोवेळी ग्राहकांच्या खात्यात नावे करते. तथापि संस्थांना अशा प्रकारच्या शुल्क आणि वर्तन इ. ची माहिती पास बुक/ बँक विवरणाद्वारे माहिती मिळते. म्हणून बँक मेळपत्रक तयार करण्याच्या दिवशी मात्र पास बुक मधील शिल्लक ही रोख पुस्तकातील शिल्लकीपेक्षा कमी दिसुन येईल.

५) **प्राप्त विपत्र आणि धनादेशाचा अनादर :** मुदतपूर्व बँकेत वटविलेले प्राप्तविपत्र आणि धनादेश अनादरीत झाल्यास पास बुक आणि बँक विवरणात ग्राहकाच्या खात्यात नावे केले जाते. परंतु यांचा कोणताच परिणाम बँकेने सुचना दिल्याशिवाय रोख पुस्तकात दाखविला जात नाही त्याचप्रमाणे ग्राहकाने खर्चाचे धनादेशाने शोधन केल्यास आणि तो धनादेश अनादरीत झाले तर बँक यांची नोंद पास बुक आणि बँक विवरण जमा बाजूला करतात.

६) **बँक खात्यात रक्कम सरळ जमा करणे :** व्यावसायिकाच्या सुचनेनुसार जेंव्हा ऋणको व्यावसायिकाच्या खात्यात रक्कम जमा करतो तेंव्हा बँकेकडून सूचना मिळाल्याशिवाय व्यावसायिकाला या व्यवहाराची काहीच माहिती उपलब्ध होत नाही. या व्यवहारात व्यावसायिकाच्या खात्यात राशी जमा झाल्याची नोंद बँकेत होते परंतु हीच नोंद व्यावसायिकाच्या रोख पुस्तकात होत नाही. याचे असे परिणाम दिसतात, की बँक पास बुकची शिल्लक ही रोख पुस्तकातील शिल्लकेपेक्षा जास्त आहे.

IMPS (Immediate payment Service) : तात्काळ शोधन सेवा मुळे आंतर बँकीग क्षेत्रात तांत्रिक पध्दतीने शोधन करण्यासाठी निधी व रक्कम ताबडतोब एका बँकेतून दुसऱ्या बँकेत स्थानातरीत करण्याची सुविधा आहे. खातेदाराला ताबडतोब रक्कम किंवा निधी स्थानांतरीत करावयाचा असल्यास तो तात्काळ शोधन सेवेच्या माध्यमातून रक्कम स्थानांतरीत करु शकतो कारण ही सेवा चोवीस तास (२४×७) तसेच बँक सुट्टीच्या दिवशी सुध्दा चालू राहते.

NEFT (National Electronic Funds Trannsfer) : राष्ट्रीय तांत्रिक निधी स्थानांतरण या सेवेमुळे खातेदार कमी रोकड स्थानांतरीत करु शकतो (₹ दोन लाखापेक्षा कमी रक्कमेचे) आणि (RTGS Real Time Gross Settelment) या बँकींग सेवेमुळे खातेदार ग्राहक अधिक रक्कम इतर खात्यावर स्थानांतरीत करु शकतो (₹ दोन लाखापेक्षा अधिक रक्कम या सेवेमुळे स्थानांतरीत करता येते.)

२. **बँक किंवा व्यावसायिक यांच्याकडून होणाऱ्या लोप विभ्रम चुका/ विसरचुका :**

काहीवेळेस व्यवहारांची नोंद करताना बँकेकडून चूक होऊ शकते. त्यामुळे रोकड पुस्तकातील शिल्लक व बँक पास बुकमधील शिल्लक यामध्ये फरक आढळतो. उदा.

१) चुकीच्या बाजूला नोंद करणे.

२) चुकीच्या रकमेची नोंद करणे.

३) चुकीचे संतुलन आणि बेरीज.

४) दोनदा नोंदी करणे.

५) व्यवहारात लोप विभ्रम/ विसर चुका दिसणे.

## ६.४ बँक मेळापत्रकाचा नमुना :

**बँकमेळपत्रक ------------ रोजीचे**

| विवरण | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| बँकेतील शिल्लक / अधिविकर्ष / रोकड पुस्तक / पास बुकनुसार / पास बुक शिल्लक | | XXX |
| **अधिक (+)** इतर पुस्तकाची शिल्लक वाढण्याची कारणे | | |
| १. | XXX | |
| २. | XXX | XXX |
| **वजा (–)** इतर पुस्तकाची शिल्लक घटण्याची कारणे | | |
| १. | | |
| २. | XXX | |
| ३. | XXX | |
| | XXX | XXX |
| रोख शिल्लक / अधिविकर्ष / पास बुकानुसार / रोख पुस्तकानुसार | | XXX |

६.४ (अ)

* उत्तर नकारात्मक आल्यास अधिविकर्ष समजले जाते अन्यथा उलट.

**वैकल्पिक सादरीकरण :**

बँक मेळपत्रक दुसऱ्या पद्धतीनेही सादर करता येते. त्यामध्ये बँक मेळपत्रकात रक्कमेचे दोन रकाने करावे लागतात. एका रकान्यामध्ये वाढलेल्या रक्कमेचे कारण नमुद करण्यासाठी अधिक होणारी रक्कम आणि दुसऱ्या रकाना वजा होण्याच्या रक्कमेचे कारण नमुद करण्यासाठी (वजा होणारी रक्कम).

- रोख पुस्तकाची नावे शिल्लक अधिकच्या रकान्यात लिहीणे.
- रोख पुस्तकाची जमा शिल्लक किंवा अधिविकर्ष शिल्लक वजाच्या रकान्यात लिहिणे.
- पास बुकाची नावे शिल्लक किंवा अधिविकर्ष शिल्लक वजा रकान्यात लिहिणे.
- पास बुकाची जमा शिल्लक अधिकच्या रकान्यात लिहिणे.

बँक मेळपत्रकातील दोन्ही रकान्याची बेरीज केल्यानंतर दोघातील फरक काढला जातो. हा फरक म्हणजेच रोख पुस्तकानुसार किंवा पास बुकानुसार शिल्लक रक्कम किंवा अधिविकर्ष.

**बँक मेळपत्रक ------------ रोजीचे**

| विवरण | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| बँक शिल्लक/ रोख पुस्तकानुसार अधिविकर्ष /पास बुक<br>**अधिक :** शिल्लक वाढल्याचे कारण<br>१.<br>२.<br>३. | | |
| **वजा :** शिल्लक घटण्याची कारण<br>१.<br>२. | | |
| बँक शिल्लक/ अधिविकर्ष पास बुक / रोख पुस्तकानुसार किंवा बँक पास बुकनुसार | | XXX |

**६.४ (ब) बँक पास बुकनुसार :**

## ६.५ बँकमेळपत्रक तयार करणे :

शिल्लकेत दिसणारा फरक आणि परिणाम कारणे शोधण्याची कार्यपध्दती :

जेंव्हा पास बुक आणि रोख पुस्तकातील शिल्लकमध्ये दिसणारा फरक शोधून काढण्याच्या पायऱ्या :-

१. रोख पुस्तकात नावे बाजुला दर्शविलेली पदे आणि पास बुकात जमा बाजुला (जमा रकान्यात) दर्शविलेली पदे यांची तुलना करुन दोन्ही पदे पुस्तकात दर्शविली असल्यास त्यांना ✓ अशी खूण करावी.

२. रोख पुस्तकात जमा बाजूला दर्शविलेली पदे आणि पास बुकात नावे बाजुला(नावे रकान्यात) दर्शविलेली पदे यांची तुलना करुन दोन्ही पदे दोन्ही पुस्तकात दर्शविली असल्यास त्यांना ✓ अशी खूण करावी.

३. दोन्ही पुस्तकात ज्या पदांना टिक केले नसेल तिच पदे रोख पुस्तक आणि पास बुक यातील दिसणाऱ्या फरकांकरिता जबाबदार असतात.

४. फरकाच्या कारणाचे विश्लेषण करावे.

५. बँक मेळपत्रक तयार करण्याची तिथी ठरवावी कारण बँकमेळपत्रक कोणत्याही तिथीला तयार करता येते. सामान्यत: बँकमेळपत्रक तयार करण्याची तिथी ही महिन्याच्या शेवटच्या दिवसाची असते कारण रोख पुस्तक आणि पास बुक मधील शिल्लक या दिवशी सहजरित्या उपलब्ध होऊ शकते.

६. बँक मेळपत्रक तयार करतांना रोखपुस्तक आणि पास बुकाच्या शिल्लकेने करावी, तो सुरुवातीचा बिंदू असतो.

७. पायरी क्र.३ मध्ये खूण (✓) न केलेल्या अधिक व वजा होणारी पदे पत्रकाच्या सुरवातीच्या पदात समायोजित करावी समता पत्रकाच्या प्रारंभी रोख पुस्तकाची शिल्लक घेतली असल्यास पास बुकात घेतलेल्या नोंदी प्रमाणे रोख पुस्तकाची शिल्लक समायोजित करावी, याचप्रमाणे परस्पर उलट विचार करावा.

८. अधिक आणि वजाचे नियम लागू करावे.

अ) जेंव्हा रोख पुस्तकाप्रमाणे शिल्लक दिली असेल तर
- पास बुक किंवा रोख पुस्तकात जमा बाजुला अधिक करा.
- पास बुक किंवा रोखपुस्तकात नावे बाजूला वजा करा.

ब) जेंव्हा पास बुकानुसार शिल्लक दिली असेल तर
- पास बुक किंवा रोख पुस्तकात नावे बाजूला जमा करा.
- पास बुक किंवा रोख पुस्तकात जमा बाजूला वजा करा.

क) जेंव्हा रोख पुस्तकाप्रमाणे अधिविकर्ष दिला असेल तर
- रोख पुस्तक किंवा पास बुकात नावे बाजुला अधिक करा.
- रोख पुस्तक किंवा पास बुकात जमा बाजुला वजा करा.

ड) जेंव्हा पास बुकानुसार अधिविकर्षाची शिल्लक दिली असल्यास
- रोख पुस्तक किंवा पास बुकात जमा बाजुला अधिक करा.
- रोख पुस्तक किंवा पास बुकात नावे बाजुला वजा करा.

| विसंगीतीची कारणे | जेंव्हा रोख पुस्तकानुसार बँक शिल्लक दिली असल्यास<br>नावे शिल्लक | जेंव्हा पास बुकनुसार बँक शिल्लक दिली असल्यास<br>जमा शिल्लक | जेंव्हा रोख पुस्तकानुसारअधिनिकर्ष शिल्लक दिली असल्यास<br>जमा शिल्लक | पास बुकानुसार अधिनिकर्ष शिल्लक दिली असल्यास<br>नावे शिल्लक |
|---|---|---|---|---|
| 1. बँकेत जमा केलेला परंतु वसूल न झालेला धनादेश. | (-) | (+) | (+) | (-) |
| 2. दिलेला धनादेश परंतु सादर न झालेला धनादेश. | (+) | (-) | (-) | (+) |
| 3. पास बुकमध्ये बँक शुल्क नावे केल्याबद्दल | (-) | (+) | (+) | (-) |
| 4. फक्त पास बुकात व्याज जमा केल्याबद्दल | (+) | (-) | (-) | (+) |
| 5. फक्त पास बुकात व्याज नावे केल्याबद्दल. | (-) | (+) | (+) | (-) |
| 6. बँकद्वारे केलेल्या शोधनाची नोंद फक्त पास बुकात केल्यास . | (-) | (+) | (+) | (-) |
| 7. ग्राहकाने प्रत्यक्ष शोधनाची नोंद बँक पास बुकात जमा केल्यास. | (+) | (-) | (-) | (+) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8. बँकेत वटविलेल्या प्राप्त विपत्राचे अनादरणाची नोंद फक्त पास बुकात केल्यास. | (–) | (+) | (+) | (–) |
| 9. राशी संग्रहणार्थ बँकेत जमा केलेला धनादेश अनादरित/ वसुल न झाल्यास त्याची नोंद रोख पुस्तकात केली नसल्यास. | (–) | (+) | (+) | (–) |

**६.५ (अ)**

### अ. जेंव्हा रोख पुस्तक आणि पास बुकाचा समान कालावधीचा उतारा दिलेला असल्यास :

जेंव्हा समान कालावधीचा उतारा दिला असेल तेव्हा खालील मुद्द्यांचा विचार करावा.

अ) फक्त असमान घटकच लक्षात घ्यावेत.

ब) रोख पुस्तक (बॅंक रकाना) आणि पास बुकाचे सुरवातीची / प्रारंभीची शिल्लक लक्षात घ्यावी.

रोख पुस्तक आणि पास बुकाच्या शिल्लकेत ज्या घटकांमुळे फरक दिसतो तो फरक शोधून काढण्यासाठी दोन्ही पुस्तकाच्या शिल्लकेने तुलना करावी. ज्या नोंदी एकाच वेळेला दोन्ही पुस्तकात दर्शविलेल्या दिसून येतात. त्यामुळे दोन्ही पुस्तकातील शिल्लकात फरक दिसून येत नसेल तर त्याला दुर्लक्ष करावे. जे घटक रोख पुस्तकात दिसतात परंतु पास बुकात दिसत नाही किंवा उलट फक्त त्याच कारणामुळे दोन्ही पुस्तकातील शिल्लकेत फरक दिसून येतो याची नोंद बँक मेळपत्रकात नोंदविली जाते.

**उदाहरण १.:**

**व्यावसायिकाचे खाते पुस्तक**

नावे रोख पुस्तक (फक्त बँक रकाना) जमा

| दिनांक | प्राप्ती | रक्कम(₹) | दिनांक | शोधन | रक्कम(₹) |
|---|---|---|---|---|---|
| २०१९ एप्रिल | | | २०१९ एप्रिल | | |
| ०१ | शिल्लक खाली आणली | ✓ १५,६०० | ०५ | वेतन | ✓ ४,५०० |
| ०५ | आनंद | ✓ ५,२०० | ०९ | रामलाल ब्रदर्स | ✓ ६,००० |
| ०८ | रोख | ✓ ४,००० | १५ | अतुल ॲण्ड सन्स | ✗ २,६०० |
| १५ | मोहन | ✗ ७,१०० | २५ | रमण आणि कंपनी | ✓ ३,२२० |
| २८ | दिपक | ✗ ६,८०० | ३० | शिल्लक पुढे नेली | ✗ २२,३८० |
| | | ३८,७०० | | | ३८,७०० |
| मे ०१ | शिल्लक खाली आणली | २२,३८० | | | |

**बँकेच्या पुस्तकात**

नावे पास बुक जमा

| दिनांक | खर्च/ शोधन | रक्कम (₹) | दिनांक | उत्पन्न/प्राप्ती | रक्कम(₹) |
|---|---|---|---|---|---|
| **२०१९ एप्रिल** | | | **२०१९ एप्रिल** | | |
| ०८ | वेतन | ✓ ४,५०० | ०१ | शिल्लक खाली आणली | ✓ १५,६०० |
| १८ | रामलाल ब्रदर्स | ✓ ६,००० | ०८ | रक्कम जमा केली | ✓ ४,००० |
| २२ | विमा प्रव्याजी | ✗ ६,५०० | १० | आनंद | ✓ ५,२०० |
| २९ | रमण आणि कंपनी. | ✓ ३,२२० | १४ | लाभांश | ✗ २,००० |
| ३० | बँक शुल्क | ✗ ८०० | | | |
| ३० | शिल्लक पुढे नेली | ५,७८० | | | |
| | | २६,८०० | | | २६,८०० |
| | | | मे ०१ | शिल्लक खाली आणली | ५,७८० |

वर दिलेल्या दोन्ही पुस्तकातील फरकाचे कारण शोधून ३० एप्रिल २०१९ रोजीचे बँक मेळपत्रक तयार करा :

१) जेंव्हा रोख पुस्तकानुसार शिल्लक दिलेली असल्यास.

२) जेंव्हा पास बुकानुसार शिल्लक दिलेली असल्यास.

**उत्तर :** रोख पुस्तकाची शिल्लक व पास बुकाची शिल्लक यांची तुलना करीत असताना जे पद/व्यवहार दोन्ही पुस्तकात दिलेले असतील त्यांच्या पुढे बरोबर (✓) ची खुण करावी. यावरून असे स्पष्ट होईल की दोन्ही पुस्तकांच्या शिल्लकेमध्ये कोणताही फरक येणार नाही. त्यामुळे अशा पदांकडे दुर्लक्ष करावे. जे पदे/व्यवहार कोणत्यातरी एका पुस्तकात लिहिलेले आहे, त्याच्यासमोर चुकीची (×) खुण करावी आणि हीच जे पदे/व्यवहार दोन पुस्तकातील शिल्लकेत फरक पडण्याची कारणे असू शकतात म्हणून बँक मेळपत्रक तयार करतांना ही पदे अधिक किंवा वजा केले जातात.

रोख पुस्तकाची नावे बाजूची (प्राप्ती) तुलना पास बुकच्या जमा बाजूशी (प्राप्ती) केल्यावर असे आढळले की,

१) मोहनकडून ₹ ७,१०० चे आणि दिपककडून रु ₹ ६,८०० चे धनादेश प्राप्त झालेत. राशी संग्रहणार्थ बँकेत जमा केले परंतु अद्याप बँकेत राशी जमा झालेली नाही.

२) बँकेने लाभांशाचे ₹ २,००० जमा केले परंतु रोख पुस्तकात ही नोंद दिसत नाही.

रोख पुस्तकाची जमा बाजू (शोधन) ची तुलना पास बुकाच्या नावे बाजूशी (शोधन) केल्यास :-

१) अतुल आणि सन्सला शोधना करीता दिलेला ₹२,६००/- चा धनादेश बँकेत सादर झालेला नाही.

२) बँकाने विमा प्रव्याजी चे ₹ ६,५०० दिले पण याची नोंद रोख पुस्तकात घेण्यात आलेली नाही.

३) बँकेने शुल्का बद्दलच्या ₹ ८०० नावे दिले पण रोख पुस्तकात नोंद दिसत नाही.

वरील विसंगती बँक मेळपत्रकात खालील प्रमाणे दिसून येईल.

१) जर रोख पुस्तकानुसार शिल्लक दिली असल्यास

**बँक मेळपत्रक**
**३० एप्रिल २०१९ रोजीचे**

| विवरण/तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| रोख पुस्तकानुसार शिल्लक | | २२,३८० |
| **अधिक :** १. बँकेत लाभांश जमा केल्याची नोंद फक्त पास बुक मध्येच दिसत आहे. | २,००० | |
| २. शोधनार्थ अतुल ॲण्ड सन्सला दिलेला धनादेश बँकेत सादर करण्यात आलेला नाही. | २,६०० | ४,६०० |
| | | २६,९८० |
| **वजा :** १. बँकेत जमा केलेला धनादेशाची राशी अद्याप खात्यावर जमा झालेली नाही. मोहन ₹ ७,१०० दिपक ₹ ६,८०० | १३,९०० | |
| २. बँकेने दिलेल्या विमा प्रव्याजीची रक्कम रोख पुस्तकात दिसत नाही. | ६,५०० | |
| ३. बँक शुल्काची नोंद फक्त पास बुकात दिसत आहे. | ८०० | २१,२०० |
| पास बुकानुसार बँक शिल्लक | | ५,७८० |

ii) जर पास बुकानुसार शिल्लक दिलेली असल्यास:

**बँक मेळपत्रक**
**३० एप्रिल २०१९ रोजीचे**

| विवरण/तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| पास बुकनुसार शिल्लक | | ५,७८० |
| **अधिक :** १.बँकेत जमा केलेल्या धनादेशाची राशी अद्याप खात्यावर जमा झालेली नाही. मोहन ₹ ७,१०० दिपक ₹ ६,८०० | १३,९०० | |
| २. बँकेने दिलेल्या विमा प्रव्याजीची रक्कम रोख पुस्तकात दिसत नाही. | ६,५०० | |
| ३. बँक शुल्काची नोंद फक्त पास बुकात दिसत आहे. | ८०० | २१,२०० |
| | | २६,९८० |
| **वजा :** १. खर्चाच्या शोधनार्थ अतुल ॲड सन्सला दिलेला धनादेश सादर करण्यात आला नाही. | २,६०० | |
| २. बँकेने जमा केलेल्या लाभांशाची नोंद फक्त पास बुकमध्येच दिसत आहे. | २,००० | ४,६०० |
| रोख पुस्तकानुसार बँक शिल्लक | | २२,३८० |

**टिप :** बँक मेळपत्रकाची सुरुवात जेंव्हा रोखपुस्तकाच्या शिल्लकेनुसार करतो तेंव्हा शेवटी पास बुक शिल्लक दिसून येते आणि जेंव्हा बँक मेळपत्रकाची सुरुवात पास बुक शिल्लकेनुसार करतो तेंव्हा शेवटी रोख पुस्तकाची शिल्लक दिसून येते.

**व्यावसायिक बँक मेळपत्रक तयार करतांना शेवटी रोखपुस्तकाची शिल्लक किंवा बँक पास बुकाच्या शिल्लकेनुसार करु शकतो.**

**ब) जेव्हा रोख पुस्तकात पास बुकचा वेगवेगळ्या कालावधीचा उतारा दिलेला असतो :**

जेव्हा असमान कालावधीसाठी उतारा दिलेला असतो, तेंव्हा दोन्ही पुस्तकात दिसणारे समान घटक विचारात घ्यावे. दोन्ही पुस्तकातील शिल्लकेत जर समान घटकामध्ये विसंगती दिसून येत असेल तर ही विसंगती बँक मेळपत्रकात विचारात घेतली जाते.

**उदाहरण क्र. २ :**

**_____________च्या पुस्तकात**

नावे — रोख पुस्तक (फक्त बँक रकाना) — जमा

| दिनांक | प्राप्ती | रक्कम (₹) | दिनांक | शोधन | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | २०१९ | | |
| जाने. ०१ | शिल्लक खाली आणली | ३०,००० | जाने. ०१ | खरेदी | १५,००० |
| ०५ | दिपा | २२,५०० | ०४ | कुलदिप | २१,००० |
| ०८ | गिता | ७,५०० | ०६ | जाहिरात | १३,५०० |
| १० | संगिता | ✓ ७५,००० | १५ | हेमंत | ✓ १९,५०० |
| १२ | ऋचा | ५१,००० | २१ | प्रविण | ✓ ९,९०० |
| १९ | श्रुती | ✓ २४,००० | २६ | यंत्र | २३,१०० |
| | | | २९ | विद्या | ✓ २७,००० |
| | | | ३१ | शिल्लक पुढे नेली | ८१,००० |
| | | २,१०,००० | | | २,१०,००० |

**बँकेच्या पुस्तकात**

नावे — **पास बुक** — जमा

| दिनांक | शोधन | रक्कम (₹) | दिनांक | प्राप्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | २०१९ | | |
| फेब्रु. ०६ | हेमंत | ✓ १९,५०० | फेब्रु. ०१ | शिल्लक खाली आणली | ३८,४०० |
| ०९ | विद्युत देयक | १,०५० | ०१ | संगिता | ✓ ७५,००० |
| ०९ | प्रविण | ✓ ९,९०० | ०५ | पियुष | १५,००० |
| १० | विद्या | ✓ २७,००० | ०७ | अरिजीत | ९,००० |
| ११ | निशांत | १,४१० | ०९ | श्रुती | ✓ २४,००० |

दि. ३१ जानेवारी २०१९ रोजीचे बँक मेळपत्रक तयार करा.

**उत्तर:** रोख पुस्तकाची तुलना पास बुकशी करताना लक्षात येईल की, जी पदे दोन्ही पुस्तकामध्ये नोंदविली गेली आहेत. त्यांना ✓ अशी खूण केलेली आहे. तिच दोन्ही पुस्तकातील शिल्लक न जुळण्याची कारणे आहेत आणि ती बँक मेळपत्रकामध्ये येतील. जाने.२०१९ आणि फेब्रु. २०१९ यातील वेगवेगळ्या कालावधीचे रोख पुस्तक व पास बुकचे उतारे दिलेले आहेत. रोख पुस्तकाची प्राप्तीबाजू आणि पास बुकाची प्राप्ती बाजू आणि रोख पुस्तकाची शोधन बाजु व पास बुकाची शोधन बाजू यांची तुलना करतांना त्यांच्यात दिसणाऱ्या विसंगतीचे कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) राशी संग्रहणार्थ धनादेश बँकेत जमा केले परंतु अद्याप बँकेत रक्कम जमा झालेली नाही :

संगिता ₹ ७५,००० श्रुती ₹ २४,०००

२) शोधनार्थ दिलेला धनादेश बँकेत सादर केले नाहीत :

हेमंत ₹ १९,५००

प्रविण ₹ ९,९००

विद्या ₹ २७,०००

**बँक मेळपत्रक**

**३१ जानेवारी २०१९ रोजीचे**

| विवरण / तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| रोख पुस्तकानुसार बँक शिल्लक | | ८१,००० |
| **अधिक :** १. शोधनार्थ दिलेले धनादेश बँकेत सादर झाले नाहीत | | |
| हेमंत | १९,५०० | |
| प्रविण | ९,९०० | |
| विद्या | २७,००० | ५६,४०० |
| | | १,३७,४०० |
| **वजा :** १. बँकेत धनादेश जमा केला परंतु वसूल न झाल्यास | | |
| संगिता | ७५,००० | |
| श्रुती | २४,००० | ९९,००० |
| पास बुकनुसार बँक शिल्लक | | ३८,४०० |

**क. जेव्हा रोख पुस्तकानुसार बँक शिल्लक / रोख पुस्तकानुसार अनुकूल शिल्लक / रोख पुस्तकानुसार नावे शिल्लक दिलेली असल्यास :**

**उदाहरण क्र. ३**

३१ मार्च २०१९ रोजी श्री. अरविंद यांच्या रोख पुस्तकात बँक शिल्लक ₹ ५७,४००, अशी दिसून येते. परंतु पास बुकाची शिल्लक वेगळी आहे. रोख पुस्तक आणि पास बुकची तुलना केल्यानंतर खालील विसंगती दिसून आल्या :

१) ₹ ६,३५० चा धनादेश बँकेत जमा केला परंतु अद्याप रक्कम जमा झाली नाही.

२) बँकेने शोधन केलेल्या विद्युत देयक ₹ ९७००/- ची नोंद रोख पुस्तकात दाखविण्यात आली नाही.

३) पुरवठादाराला शोधनार्थ दिलेला ₹ १५,१०० चा धनादेश ३१ मार्च २०१९ पर्यंत बँक सादर करण्यात आला नाही.

४) गुंतवणुकीवरील व्याजाबद्दल मिळालेले ₹ ८,८०० बँकेने जमा केले परंतु रोख पुस्तकात नोंद केली नाही.

५) बँकेने शुल्लकाबद्दल आकारलेले ₹ ६५० पास बुकात नावे करण्यात आले.

६) श्री. तन्मय (ऋणको) यांनी ₹ १२,००० दि.२८/०३/२०१९ रोजी आपल्या बँक खात्यात जमा केले त्याची नोंद रोख पुस्तकात घेण्यात आलेली नाही.

दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी बँक मेळपत्रक तयार करा.

**श्री. अरविंदच्या पुस्तकात**

**बँकमेळपत्रक ३१ मार्च २०१९ रोजीचे**

| विवरण / तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| रोख पुस्तकानुसार बँक शिल्लक | | ५७,४०० |
| **अधिक :** १. शोधनार्थ दिलेला धनादेश बँकेत सादर झालेला नाही. | १५,१०० | |
| २. गुंतवणुकीवरील व्याजाची नोंद पास बुकमध्ये झाली परंतु रोख पुस्तकात घेण्यात आली नाही. | ८,८०० | |
| ३. ऋणकोने बँकेत जमा केलेल्या राशीची नोंद रोख पुस्तकात झाली नाही. | १२,००० | ३५,९०० |
| | | ९३,३०० |
| **वजा :** १. बँकेत जमा केलेला धनादेशाची रक्कम अद्याप खात्यावर जमा झाली नाही. | ६,३५० | |
| २. बँकेने शोधन केलेल्या विद्युत देयकाची नोंद रोख पुस्तकात झालेली नाही. | ९,७०० | |
| ३. बँकशुल्काची नोंद फक्त पास बुकात नावे करण्यात आली. | ६५० | १६,७०० |
| पास बुकनुसार बँक शिल्लक | | ७६,६०० |

**ड. जेंव्हा पास बुकानुसार बँक शिल्लक/ पास बुकनुसार अनुकूल शिल्लक / पास बुकानुसार बँकेची जमा शिल्लक दिलेली असल्यास....**

**उदाहरण क्र.४ :**

खालील माहितीच्या आधारे श्री. अनुराग यांच्या रोखपुस्तकाची दि.३० जून २०१९ रोजीची बँक शिल्लक काढा.

१) पास बुकनुसार बँक शिल्लक ₹ १४,०००/-.

२) दि.२५ जून २०१९ रोजी दोन धनादेश अनुक्रमे ₹ ८,९००/- आणि ₹ १०,७००/- शोधनार्थ देण्यात आले परंतु दोन धनादेशापैकी फक्त ₹ ८,९००/- चा धनादेश दि.३० जून २०१९ रोजी बँकेत सादर करण्यात आला.

३) ₹ १६,४००/- चे धनादेश बँकेत राशी संग्रहणार्थ करण्यात आला परंतु फक्त ₹ ६,४००/- चा धनादेशाची रक्कम दि.२८ जून २०१९ रोजी खात्यात जमा झाली.

४) खाजगी उपयोगासाठी ₹ ५,५००/- ची रक्कम बँकेतून काढण्यात आली. पण त्याची नोंद रोख पुस्तकात घेण्यात आली नाही.

५) श्री. अनुराग यांच्या खात्यात ₹ ३५०/- अनुशंगिक खर्चाबद्दल नावे करण्यात आले. पण त्याची नोंद रोख पुस्तकात करण्यात आली नाही.

६) दि.३० जून २०१९ रोजी अनादरीत झालेल्या ₹ ७,५००/- च्या धनादेशाची नोंद पास बुकात नावे बाजुला दिसून येते.

७) व्याजाचे ₹ ४२५/- ची नोंद पास बुकात जमा करण्यात आलेली आहे.

**श्री. अनुरागच्या पुस्तकात**
**बँकमेळपत्रक**
**३१ मार्च २०१९ रोजीचे**

| विवरण / तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| पास बुकनुसार बँक शिल्लक | | १४,००० |
| **अधिक :** १. बँकेत जमा केलेल्या धनादेशाची रक्कम अजून खात्यात जमा झालेली नाही. | १०,००० | |
| २. खाजगी उपयोगसाठी काढलेल्या रोख रक्कमेची नोंद रोख पुस्तकात झाली नाही. | ५,५०० | |
| ३. अनुशंगिक खर्च फक्त पास बुकात नावे केला. | ३५० | |
| ४. अनादरीत झालेल्या धनादेशाची नोंद फक्त पास बुकात नावे करण्यात आली. | ७,५०० | २३,३५० |
| | | ३७,३५० |
| **वजा :** १. शोधनार्थ दिलेला धनादेश बँकेत सादर झाला नाही. | १०,७०० | |
| २. व्याजाची नोंद फक्त पास बुकात जमा करण्यात आली. | ४२५ | ११,१२५ |
| रोख पुस्तकानुसार बँक शिल्लक | | २६,२२५ |

**इ. जेंव्हा रोख पुस्तकानुसार अधिविकर्ष/ रोख पुस्तकानुसार प्रतिकुल शिल्लक / रोख पुस्तकानुसार जमा शिल्लक दिलेली असल्यास.**

**उदाहरण क्र. ५ :**

कुणालच्या रोख पुस्तकावर दि.३१ जुलै २०१९ रोजी ₹ ३६,२८०/– चा अधिविकर्ष आहे. पास बुक आणि रोख पुस्तकाची तुलना करतांना खालील फरक दिसून आला.

१) श्री. मनिषला (ऋणको) ₹ १८,७००/– ची रक्कम त्याला प्रत्यक्ष बँकेतून देण्यात आली पण त्याची नोंद रोख पुस्तकात घेण्यात आली नाही.

२) बँकेत जमा केलेल्या ₹ १८,९००/– चा धनादेशाची रक्कम बँकेने वसुल करुन रक्कम खात्यात जमा केली, परंतु रोख पुस्तकात ₹ १९,८००/– ची नोंद करण्यात आली.

३) दि. २७ जुलै २०१९ रोजी कर्मचाऱ्यांच्या वेतनाबद्दल दिलेला ₹ २५,०००/– चा धनादेश दि.०४ ऑगस्ट २०१९ रोजी बँकेत सादर करण्यात आला.

४) कार्यालयीन कामाकरिता ATM मधून काढलेल्या ₹ २०,०००/– ची नोंद रोख पुस्तकात घेण्यात आली नाही.

५) रोख पुस्तकात नावे बाजुला असलेल्या बँक रकान्याची बेरीज ₹ १००/– ने अधिक आहे.

६) आपल्या सूचनेनुसार बँकेने कार्यालय भाडेबद्दल ₹ १९,५००/– दिले.

७) आपल्या वतीने बँकेने ₹ ३,७५०/– वर्तनाचे जमा केले पण त्याची नोंद रोख पुस्तकात नाही.

दि.३१ जुलै २०१९ रोजीचे बँक मेळपत्रक तयार करा.

उत्तर :

**कुणालच्या पुस्तकात**

**बँक मेळपत्रक**

**३१ जुलै २०१९ रोजीचे**

| **विवरण / तपशील** | **रक्कम (₹)** | **रक्कम (₹)** |
|---|---|---|
| रोख पुस्तकानुसार अधिविकर्ष | | ३६२८० |
| **अधिक :** १. बँकेत जमा केलेल्या व वसूल झालेल्या धनादेशाची रक्कम रोख पुस्तकात जास्त रकमेने केली. (१९८०० - १८९००) | ९०० | |
| २. कार्यालय उपयोगाकरिता ATM मधुन काढलेल्यारक्कमेची नोंद रोख पुस्तकात घेतली नाही. | २०,००० | |
| ३. रोख पुस्तकात नावे बाजुला असलेल्या बँक रकान्याची बेरीज अधिक घेतली गेली. | १०० | |
| ४. बँकने दिलेल्या कार्यालय भाडेची नोंद फक्त पास बुकात दिसते. | १९,५०० | ४०,५०० |
| | | ७६,७८० |
| **वजा :** १. ऋणकोने प्रत्यक्ष बँकेतून जमा केलेल्या रक्कमेची नोंद रोख पुस्तकात नोंदविण्यात आली नाही. | १८,७०० | |
| २. शोधनार्थ दिलेला धनादेश बँकेस सादर झाला नाही. | २५,००० | |
| ३. वर्तनाची रक्कम बँकेने वसुल करुन नोंदविली. | ३,७५० | ४७,४५० |
| पास बुकनुसार अधिकोष अधिविकर्ष. | | २९,३३० |

**वैकल्पिक पध्दत :**

पुढीलप्रमाणे अधिक (+) आणि वजा (-) असे दोन रकाने दाखवून बँक मेळपत्रक तयार केले जाऊ शकते. :

**बँक मेळपत्रक**

**३१ जुलै २०१९ रोजीचे**

| **विवरण / तपशील** | **अधिक रक्कम (₹)** | **वजा रक्कम (₹)** |
|---|---|---|
| रोख पुस्तकानुसार अधिविकर्ष | | ३६,२८० |
| १. ऋणकोने प्रत्यक्षात बँक खात्यात जमा केलेल्या रक्कमेची नोंद रोख पुस्तकात नाही. | १८,७०० | |
| २. बँकेत जमा केलेल्या धनादेशाची राशी बँक वसुली केली परंतु त्याची नोंद रोख पुस्तकात चुकीच्या रक्कमेने नावे करण्यात आली. | | ९०० |
| ३. शोधनार्थ दिलेला धनादेश बँकेत सादर झाला नाही. | २५,००० | |
| ४. ATM मधुन काढलेल्या रोख रक्कमेची नोंद रोख पुस्तकात घेतली नाही. | | २०,००० |
| ५. रोख पुस्तकाची बँक रकान्याची नावे बाजूची बेरीज अधिक घेतली गेली. | | १०० |
| ६. बँकेने दिलेल्या कार्यालयाचे भाडेची नोंद फक्त पास बुकमध्ये दिसते. | | १९,५०० |
| ७. वर्तनाची रक्कम बँकेने वसूल करून नोंद दिली. | ३,७५० | |
| ८. पास बुकनुसार अधिकोष अधिविकर्ष | २९,३३० | |
| | **७६,७८०** | **७६,७८०** |

**फ. जेंव्हा पास बुकनुसार अधिविकर्ष / पास बुकनुसार प्रतिकूल शिल्लक / पास बुकानुसार नावे शिल्लक दिलेली असेल :**

**उदाहरण ६ :**

खालील दिलेल्या माहितीच्या आधारे बँक मेळपत्रकतयार करुन श्री. भुवनेश्वर यांच्या वि. ३१ ऑक्टोंबर २०१८ रोजीची रोख पुस्तकानुसार येणारी शिल्लक काढा.

१) श्री. भुवनेश्वर यांच्या पास बुकात ₹ ५३,९७०/–चा अधिविकर्ष आहे.

२) बँकेने श्री. भुवनेश्वरचे खाते ₹ १७,०७०/– ने चुकीने जमा केले.

३) श्री. भुवनेश्वर यांच्या स्थायिक आदेशा वरुन बँकेने चेंबर ऑफ कॉमर्स यांना वार्षिक वर्गणीबद्दल ₹ ६,०००/– दिले. परंतु याची नोंद रोख पुस्तकात आली नाही.

४) रोख पुस्तकात शोधन बाजुला असलेल्या बँक रकाना ₹.३५०/– ने कमी आहे.

५) बँकेने अधिविकर्षावर व्याज आकारले ₹ १,५३०.

६) दि.३१ ऑक्टोबर २०१८ रोजी ₹ २३,०००/– रोख बँकेत जमा केल्याची नोंद पास बुकात केलेली नाही.

७) शोधनार्थ दिलेला ₹ ४०,०००/– चा धनादेश बँकेकडे सादर करण्यात आला नाही.

**उत्तर :**

**श्री. भुवनेश्वरच्या पुस्तकात**

**बँक मेळ पत्रक**

**३१ ऑक्टोंबर २०१८ रोजीचे**

| विवरण / तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| पास बुकनुसार अधिकोष अधिविकर्ष | | ५३,९७० |
| **अधिक :** १. बँकेने पास बुकात चुकीने जमा केलेली नोंद. | १७,०७० | |
| २. शोधनार्थ दिलेला धनादेश बँकेत सादर झालेला नाही. | ४०,००० | ५७,०७० |
| | | १,११,०४० |
| **वजा :** १. चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेला बँकेने दिलेल्या वार्षिक वर्गणीची नोंद रोख पुस्तकात नाही. | ६,००० | |
| २. रोख पुस्तकात शोधन बाजूच्या बँक रकान्याची बेरीज कमी आहे. | ३५० | |
| ३. अधिविकर्षावरील व्याजाची नोंद फक्त पास बुकमध्ये नावे करण्यात आली. | १,५३० | |
| ४. बँकेत जमा केलेल्या रोख रक्कमेची नोंद पास बुकमध्ये घेण्यात आली नाही. | २३,००० | ३०,८८० |
| रोख पुस्तका प्रमाणे अधिविकर्ष | | ८०,१६० |

**उदाहरण क्र.७ :**

श्री. राजीव यांचे पास बुक दि. ३१ मार्च २०१८ रोजी ₹ ६,३००/– जमा बाकी दर्शविते परंतु रोखपुस्तकाची शिल्लक वेगळीच आहे. दोन्ही पुस्तकांच्या शिल्लकेची तुलना करतांना खालील मुद्दे लक्षात आले.

१) दि. २५ मार्च २०१८ रोजी ₹ ८५,०००/– चे धनादेश राशी सग्रहणार्थ जमा करण्यात आले, परंतु फक्त ₹ ६०,०००/– चे धनादेश ३१ मार्च २०१८ पूर्वी जमा झाले.

२) शोधनाबद्दल दिलेल्या ₹ ५८,५००/– च्या धनादेशापैकी ₹ ४८,५००/– चे धनादेश दि.३१ मार्च २०१८ पूर्वी सादर करण्यात आले नाही.

३) मुदतपूर्व बँकेत वटविण्यात आलेले ₹ ४,०००/– चे प्राप्तविपत्र दि.३० मार्च २०१८ रोजी अनादरित झाल्याची माहिती बँकतर्फे दि.०५ एप्रिल २०१८ रोजी मिळाली.

४) बँकेद्वारे आकारलेल्या ₹ ८२०/– व्याजाची नोंद रोख पुस्तकात दोनदा करण्यात आली.

५) पास बुकची नावे बाजु ₹ २००/– ने जास्त आहे.

६) आकाश कडून मिळालेल्या ₹ ४,२५०/– चा धनादेश संग्रहणासाठी बँकेत जमा करण्यात आला. परंतु अद्याप खात्यावर जमा झाला नाही. याची नोंद रोख पुस्तकातील रोख रकान्यात करण्यात आली.

७) शोधन केलेल्या ₹ ८,७००/– च्या देयविपत्राची नोंद रोख पुस्तकात नोंदविण्यात आलेली नाही.

८) श्री. आदित्य (ग्राहक) ने ₹ १७,०००/– NEFT प्रणालीद्वारे खात्यात जमा केले परंतु याची नोंद रोख पुस्तकात आली नाही.

दि.३१ मार्च २०१८ रोजीचे बँक मेळपत्रक तयार करा.

**उत्तर :**

**श्री. राजीवच्या पुस्तकात**
**बँक मेळपत्रक**
**३१ मार्च २०१८ रोजीचे**

| विवरण / तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| पास बुकनुसार बँक शिल्लक | | ६,३०० |
| **अधिक :** १. संग्रहणाकरिता जमा केलेला धनादेश अद्याप खात्यात जमा झालेला नाही. | २५,००० | |
| २. बँक खात्यात वटविण्यात आलेले विपत्र अनादरीत झाल्याची नोंद रोख पुस्तकात दिसत नाही. | ४,००० | |
| ३. बँकद्वारे आकारलेल्या व्याजाची नोंद रोख पुस्तकात दोनदा करण्यात आली. | ८२० | |
| ४. पास बुकची नावे बाजुची बेरीज जास्त दिसते. | २०० | |
| ५. बँकेने शोधन केलेल्या देयविपत्राची नोंद रोख पुस्तकात केली नाही. | ८,७०० | ३८,७२० |
| | | ४५,०२० |
| **वजा :** १. शोधनार्थ दिलेले धनादेश बँकेत सादर झाले नाही. | ४८,५०० | |
| २. ग्राहकाने थेट खात्यात रक्कम जमा केल्याची नोंद रोख पुस्तकात केलेली नाही. | १७,००० | ६५,५०० |
| रोख पुस्तका नुसार अधिकोष अधिविकर्ष शिल्लक | | **२०,४८०** |

**स्पष्टीकरण टिप :**

बँक मेळपत्रक / जुळवणीपत्रकात व्यवहार क्रमांक ६ दर्शविण्यात आलेला नाही. याचा दोन्ही पुस्तकाच्या शिल्लकेवर फरक पडत नाही. याची नोंद रोख पुस्तकांच्या बँक रकान्यामध्ये घेण्यात आली नाही आणि बँक पास बुकात सुध्दा ही नोंद दिसत नाही कारण धनादेशाची राशी बँकेने वसुल केलेली नाही.

**उदाहरण क्र.८ :**

दिनांक ३० सप्टेंबर २०१८ रोजी श्री. पंकजच्या रोख पुस्तकावर ₹ ३२,४९०/– ची जमा शिल्लक आहे. खालील माहितीच्या आधारे ३० सप्टेंबर २०१८ रोजीचे बँक मेळपत्रक तयार करा.

१) ₹ ८,२००/–, ₹ ११,३६०/– आणि ₹ १६,४४०/– असे तीन धनादेश बँकेत जमा करण्यात आले, परंतु ३० सप्टेंबर २०१८ पूर्वी फक्त ₹ ११,३६०/– रक्कमेच्या धनादेशाची रक्कम बँकखात्यात जमा झाली.

२) शोधनाबद्दल दिलेला ₹ ९३,०००/– चा धनादेशाची रक्कम दि.३० सप्टेंबर २०१८ पूर्वी रोखिकृत झाली नाही.

३) धनादेश पुस्तकाचे शुल्क ₹ २५०/– आणि संदेश वहनाचे ₹ १७०/– ची नोंद फक्त पास बुकमध्ये नावे करण्यात आली.

४) श्री. श्रेयांसने NEFT प्रणालीद्वारे खात्यात ₹ १,२३,२००/- जमा केले पण त्याची नोंद चुकीने रोख पुस्तकात ₹ १२,३२०/- ने नावे करण्यात आली.

५) पास बुकची प्राप्ती बाजू ₹ १,०००/- ने कमी घेतली.

६) बँकेने लाभांशबद्दल मिळालेले ₹ १२,५००/-खात्यात जमा केले परंतु रोख पुस्तकात झाली नाही.

**उत्तर :**

**श्री. पंकजच्या पुस्तकात**

**बँक मेळपत्रक**

**३० सप्टेंबर २०१८ रोजीचे**

| विवरण / तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| रोख पुस्तकानुसार अधिविकर्ष | | ३२,४९० |
| **अधिक :** १. बँकेत जमा केलेले धनादेश अद्याप वसुल झालेले नाही. | २४,६४० | |
| २. धनादेश पुस्तकाबद्दल बँकेने आकारलेल्या शुल्काची नोंद रोख पुस्तकात झाली नाही. | २५० | |
| ३. संदेश वहन शुल्काची नोंद फक्त पास बुकात दिसते. | १७० | |
| ४. पास बुकची प्राप्ती बाजु जास्त दिसते. | १,००० | २६,०६० |
| | | ५८,५५० |
| **वजा :** १. शोधनाबद्दल दिलेला धनादेशाचे शोधन झाले नाही. | ९३,००० | |
| २. NEFT प्रणाली द्वारे बँकेत रक्कम जमा केली गेली पण कमी रक्कमेची नोंद रोख पुस्तकात नावे केली. | १,१०,८८० | |
| ३. बँकेने वसूल आणि जमा केलेली लाभांशाची नोंद फक्त पास बुकात दिसते. | १२,५०० | |
| | | २,१६,३८० |
| पास बुक नुसार बँक शिल्लक | | १,५७,८३० |

**उदाहरण क्र.९ :**

दि. ३१ मार्च २०१८ रोजी श्री. राजीव यांच्या पास बुक प्रमाणे जमा शिल्लक ₹ १६,७००/- दिसते.

खालील माहितीच्या आधारे बँकमेळपत्रक तयार करा :

१) श्री. राजीव यांनी त्यांच्या बचत खात्यातून रोख ₹ ८,५००/- काढले. परंतु याची नोंद रोख पुस्तकातील चालू खात्यात दिसते.

२) राशी संग्रहणार्थ बँकेत जमा केलेल्या ₹ २७,०००/- च्या धनादेशापैकी फक्त ₹ २३,०००/- चे धनादेश ३१ मार्च २०१८ पर्यंत खात्यावर जमा झाले.

३) दि.२५ मार्च २०१८ रोजी ₹ ४०,५००/- चे धनादेश शोधनाबद्दल देण्यात आले, त्यापैकी फक्त ₹ १५००/- चा धनादेश ३० मार्च २०१८ रोजी बँकेत सादर करण्यात आला.

४) ₹ ११७००/- चे बँकेत वटविण्यात आलेले प्राप्तविपत्र ३० मार्च २०१८ रोजी अनादरीत झाल्याची सूचना दि.०५ एप्रिल २०१८ रोजी प्राप्त झाली.

५) बँकेने शोधन केलेल्या विमा प्रव्याजी ₹ १४,४००/- ची नोंद रोख पुस्तकात दोनदा करण्यात आली.

६) पास बुकाची नावे बाजू ₹ ३००/- ने अधिक आहे.

७) बँकेने दिलेल्या ₹ ८००/-च्या व्याजाची नोंद फक्त पास बुकात दिसते.

उत्तर:

**श्री. रवीच्या पुस्तकात**
**बँक मेळपत्रक**
**३१ मार्च २०१८ रोजीचे**

| विवरण / तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| पास बुक नुसार बँक शिल्लक | | १६,७०० |
| **अधिक :** १. बँकेत जमा केलेले परंतु अद्याप वसूल न झालेले धनादेश | ४,००० | |
| २. बँकेत वटविलेल्या विपत्र अनादरणाची नोंद फक्त पास बुकात आहे. | ११,७०० | |
| ३. पास बुकाची नावे बाजूची बेरीज अधिक आहे. | ३०० | |
| | | १६,००० |
| | | ३२,७०० |
| **वजा :** १. बचत खात्यातून काढलेल्या रोख रक्कमेची नोंद चुकीने रोख पुस्तकातील चालू खात्यात दाखविण्यात आली. | ८,५०० | |
| २. शोधना बद्दल दिलेले धनादेश बँकेत सादर करण्यात आले नाही. | ३९,००० | |
| ३. बँकेने शोधनकेलेल्या विमा प्रव्याजीची नोंद रोख पुस्तकात दोनदा दाखवली. | १४,४०० | |
| ४. बँकेने दिलेल्या व्याजाची नोंद रोख पुस्तकात दिसत नाही. | ८०० | |
| | | ६२,७०० |
| रोख पुस्तकानुसार अधिविकर्ष | | ३०,००० |

**उदाहरण १० :**

खाली दिलेल्या तपशीलाच्या आधारे दि.३१ जानेवारी२०१८ रोजीचे बँक मेळपत्रक तयार करा.

१) रोख पुस्तकानुसार नावे शिल्लक ₹ ४८,०००/-.

२) बँकेत जमा केलेल्या ₹ ३७,०००/- चा धनादेश बँकेने वसूल केला परंतु रोख पुस्तकात नोंद केली नाही.

३) बँकेत रोख जमा केलेल्या ₹ २६,२००/- ची नोंद रोख पुस्तकात रोख रकान्यात करण्यात आली.

४) डेबीट कार्ड द्वारे खरेदी केलेल्या ₹ २५,०००/-, उपस्कर (फर्निचर)ची नोंद रोख पुस्तकात घेण्यात आलेली नाही.

५) I.M.P.S. प्रणालीद्वारे धनकोंना स्थानांतरीत केलेल्या ₹२६,७००/- ची नोंद रोख पुस्तकात घेण्यात आली नाही.

६) ऑनलाईन बँकींग द्वारे शोधन केलेल्या टेलिफोन देयक ₹ ७,२५०/- आणि विद्युत देयक ₹ ८,२५०/- ची नोंद रोख पुस्तकात घेण्यात आलेली नाही.

७) विनोदकडून मिळालेल्या ₹ २८,६००/- चा धनादेश बँकेत जमा केला, दि.२७ जानेवारी २०१९ अनादरीत झाला याची सूचना ४ फेब्रुवारी २०१९ रोजी मिळाली.

उत्तर : **बँक मेळपत्रक ३१ जानेवारी २०१९ रोजीचे**

| विवरण / तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| रोख पुस्तकानुसार बँक शिल्लक | | ४८,००० |
| **अधिक :** १. संग्रहणार्थ जमा केलेले धनादेश वसूल झाले पण त्याची नोंद रोख पुस्तकात केलेली नाही. | ३७,००० | |
| २. बँकेत रोख जमा केल्याची नोंद चुकून रोखपुस्तकात रोख रकान्यात केली. | २६,२०० | ६३,२०० |
| | | १,११,२०० |
| **वजा :** १. डेबिट कार्ड द्वारे केलेल्या शोधनाची नोंद रोख पुस्तकात नाही. | २५,००० | |
| २. I.M.P.S. प्रणालीद्वारे स्थानांतरीत केलेल्या रक्कमेची नोद रोख पुस्तकात केली नाही. | २६,७०० | |
| ३. ऑनलाईन प्रणालीद्वारे शोधन केलेले टेलिफोन देयक व विद्युत देयकाची नोंद फक्त पास बुकात आहे. | १५,५०० | |
| ४. अनादरीत झालेल्या धनादेशाची नोंद अद्याप रोख पुस्तकात झालेली नाही. | २८,६०० | |
| | | ९५,८०० |
| पास बुकनुसार बँक शिल्लक | | १५,४०० |

## धनको आणि ऋणकोची जुळवणी :

मुळ लेखांकनातील चुका ओळखण्यासाठी जुळवणीची मदत होते. लेखांकनाच्या विशिष्ट भागाची इतर भागाशी तुलना करतांना सत्यता आणि अचूकता तपासण्याकरिता जुळवणीचा उपयोग होतो. विक्रेता सुध्दा जुळवणी पत्रक तयार करतो. म्हणजेच ऋणको आणि धनकोचे जुळवणी पत्रक ऋणकोकडून किती रक्कम येणे आहे आणि धनकोना किती रक्कम देणे आहे, याची तुलना करण्यासाठी विक्रेत्याच्या पुस्तकात ऋणकोचे खाते आणि ऋणकोच्या पुस्तकात विक्रेत्याचे खाते यातील फरकाचे समाधान करण्यासाठी धनको आणि ऋणकोची जुळवणी करावी लागते.

**ऋणको आणि धनकोची जुळवणी करण्याची प्रक्रिया :**

१. ऋणकोला अशी विनंती करावयाची की त्याच्या पुस्तकातील लेखापुस्तकाची माहिती द्यावी.

२. आपल्या लेखा पुस्तकात ऋणकोचे खाते एक्सल (टेबलफॉरमॅट) रुपात तयार करावे.

३. (टेबलफॉरमॅट) फाईलच्या दोन्ही प्रती संचिकेत चिटकाव्यात.

४. दोन्ही खात्यात दिसणाच्या नोंदीची तुलना करावी.

५. ज्या नोंदी दोन्ही खात्यात जुळत नाही अशा नोंदीची यादी करावी.

६. एक सारख्या दिसणाच्या फरकाचे गट तयार करून त्यांना शिर्षक द्यावे.

७. विक्रेत्याचे फरकाच्या आधारे जुळवणी पत्रक तयार करावे.

**कृती करा:**

१. आपल्या लेखापाल श्री. न्यु. याने २८ फेब्रुवारी २०१८ रोजी बँक मेळपत्रक तयार केले आहे. बँकमेळपत्रकावर रोख पुस्तकाची शिल्लक आहे. पास बुकानुसार ₹ १,००,०००/-. शिल्लक आहे. जुळवणी पत्रकात काही चुका असण्याची शक्यता आहे. या चुकांची दुरुस्ती आपण आमच्यासाठी करणार का?

**बँक मेळपत्रक २८ फेब्रुवारी २०१८ रोजीचे**

| विवरण / तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| रोख पुस्तकानुसार बँक शिल्लक | | १,२४,१०० |
| **अधिक :** १. बँकेत जमा केलेला परंतु वसूल न झालेला धनादेश | ३०,००० | |
| २. शोधनाबद्दल दिलेला धनादेश बँकेत सादर झाला नाही. | २८,००० | |
| ३. विमा प्रव्याजीचे शोधन केल्याची नोंद फक्त पास बुकात आहे. | ५,००० | |
| ४. व्याज वसुलीची नोंद फक्त पास बुकात करण्यात आली. | ३,००० | ६६,००० |
| | | १,९०,१०० |
| **वजा :** १. बँक शुल्काची नोंद फक्त पास बुकात नावे करण्यात आली. | १,००० | |
| २. बँकेने लाभांश वसूल केल्याची नोंद फक्त पास बुकात करण्यात आली. | ४,००० | |
| ३. बँकेत जमा केलेल्या धनादेशाची नोंद चुकीने रोखपुस्तकात दोन वेळेस करण्यात आली. | २४,००० | |
| ४. शोधनाबद्दल दिलेल्या व रोखिकृत झालेल्या धनादेशाची नोंद रोख पुस्तकात ₹ ८,९००/- च्या ऐवजी ₹ ९,८००/-ने करण्यात आली. | ९०० | २९,९०० |
| पास बुकनुसार अधिविकर्ष शिल्लक | | १,६०,२०० |

२. दोन किंवा तीन बँकेत भेट देऊन बँकेतील व्यवहाराशी संबंधीत कागदपत्रे जसे पैसे काढण्याचे चलनपत्र, पैसे जमा करावयाचे चलनपत्र इत्यादी जमा करुन त्यांची तुलना करा.

३. आपल्या परिसरातील एखाद्या मेडिकलचे दुकान किंवा स्टेशनरीच्या दुकानात जाऊन त्यांच्या मालकांशी संवाद साधा की ते आपले बँक मेळपत्रक कशा प्रकारे तयार करतात.

४. जर आपल्याकडे ए.टी.एम. कार्ड असेल तर त्या आधारे ए.टी.एम मधून आपल्या खात्याचे (Mini Statment) लहान विवरण काढा आणि आपल्या खात्यात जमा केलेली रक्कम, खात्यातून काढलेली रक्कम आणि शिल्लकेचा अभ्यास करा.

५. आपल्या बँकेस भेट देऊन स्थानिक धनादेश आणि किती धनादेशांचे शोधन करण्यासाठी किती कालावधी लागतो याची माहिती घ्या.

६. खालील दिलेली फरकाची कारणे वाचून ती खालीलपैकी कोणत्या प्रकारची आहेत ते ओळखा.

१) वेळेतील फरक

२) व्यावसायीक आणि बँकेकडून घडणाऱ्या चुका.

अ) शोधना करिता दिलेला धनादेश अद्याप बँकेत सादर झालेला नाही.

ब) अधिविकर्षा वरील व्याजाची नोंद बँकेने नावे केली परंतु रोख पुस्तकात नोंद करण्यात आली नाही.

क) संग्रहणार्थ बँकेत जमा केलेल्या धनादेशाची रक्कम बँकेने अजून जमा केलेली नाही.

ड) बँकेने विमा प्रव्याजी भरला परंतु त्यांची नोंद रोख पुस्तकात दोन वेळेस करण्यात आली.

इ) बँकेत रोख ₹१२३००/- जमा केले. परंतु त्याची नोंद रोख पुस्तकात ₹ १३,२००/- ने करण्यात आली.

फ) बँकेला देय असलेल्या व्याजाची नोंद फक्त पास बुकात जमा करण्यात आली.

## स्वाध्याय

### प्र.१ एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. बँक पास बुक कोण तयार करतो ?
२. पैसे जमा करण्याचे चलनपत्र म्हणजे काय ?
३. अधिविकर्ष म्हणजे काय ?
४. पैसे काढण्याचे चलनपत्र म्हणजे काय ?
५. बँक विवरण ग्राहकाला कोण पाठवतो ?
६. रोख पुस्तकाची नावे शिल्लक काय दर्शविते ?
७. बँक मेळपत्रक /बँकजुळवणी पत्रक कोण तयार करतो ?
८. पास बुकात दर्शविली जाणारी नावे शिल्लक कार्य दर्शविते ?
९. बँकेत असलेल्या ठेवीवरील व्याजाची नोंद पास बुकमध्ये कोणत्या बाजूला केली जाते. ?
१०. बँक मेळपत्रक का तयार केले जाते ?

### प्र.२ पुढील विधानासाठी एकशब्द किंवा संज्ञा किंवा एकशब्द समूह द्या:

१. कोणत्या खात्यावर बँकेद्वारे अधिनिकर्ष सुविधा दिली जाते.
२. बँकेच्या लेखा पुस्तकातील खाते दाराच्या खात्याचा उतारा.
३. भारतामध्ये अंकलिपी सांकेतिक प्रणालीद्वारे निधी स्थानांतरीत करण्याची तांत्रिक पध्दत.
४. रोख पुस्तक आणि पास बुकातील फरकाची कारणे दर्शविणारे पत्रक.
५. पास बुकाची नावे शिल्लक.
६. बँकेत रोख रक्कम किंवा धनादेश जमा करण्याच्यावेळी भरावे लागणारे बँकेचे चलनपत्र.
७. रक्कम जमा करण्याच्या चलनपत्राची डावी बाजू.
८. रोख पुस्तकाची जमा शिल्लक.
९. बँकेशी केलेल्या व्यवहारांची ग्राहकाने नोंदवून ठेवलेले पुस्तक.
१०. व्यवसायिकाच्या चालू खात्यातील जमा रक्कमेपैकी काढलेल्या रकमेनंतर राहिलेली रक्कम.

### प्र.३ खालील विधानाशी आपण सहमत आहात कि असहमत ते लिहा :

१. रोख पुस्तकातील बँक रकाना म्हणजे बँक खाते होय.
२. खातेदाराला बँक मेळपत्रक तयार करण्यासाठी बँकेचे विवरण उपयोगी ठरते.
३. शोधनाकरिता दिलेले धनादेश परंतु बँकेस सादर न झालेल्या धनादेशाची नोंद केवळ रोख पुस्तकात होते.
४. बँकमेळपत्रक हे फक्त चालू वर्षाच्या शेवटी तयार केले जाते.
५. बँकमेळपत्रक हे बँक विवरणाला अनुरुप असते.
६. रोख पुस्तकाप्रमाणे दिसणारी बँक शिल्लक ही नेहमी पास बुकाप्रमाणे दिसणाच्या बँक शिल्लकेसमान असते.
७. बँक सूचना व्यवसायिक बँकेला देतो.
८. पैसे जमा करण्याचे चलनपत्र फक्त धनादेश बँकेत जमा करण्यासाठीच उपयोगी आहे.
९. रोख पुस्तकातील शिल्लक आणि पास बुकातील शिल्लकेतील फरक व्यवहार खतावणी करतांना झालेल्या चुकांमुळे दिसून येतो.
१०. इंटरनेट बँकींगद्वारे रोख शोधन व प्राप्तीचा पुरावा आपोआप निर्माण होतो.

### प्र.४ खालील दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडुन विधाने पुन्हा लिहा:

१. अधिविकर्ष म्हणजे रोख पुस्तकाची ________ शिल्लक होय..

अ) अखेरची ब) नावे क) सुरुवातीची ड) जमा

२. जेंव्हा बँकेत जमा केलेल्या धनादेशाची रक्कम बँक खात्यात जमा झाल्यास पास बुकात ही नोंद ________होते.

अ) अनादरण ब) नावे क) जमा ड) खातेबाद .

३. एका विशिष्ट कालावधीचे आर्थिक व्यवहार बँकेच्या खात्यात दर्शविलेला तपशील ________.

अ) रक्कम काढण्याचे चलन पत्र ब) बँक सूचना

क) बँक विवरण ड) पैसे जमा करण्याचे चलनपत्र.

४. रोख पुस्तकात नावे केलेली नोंदीमुळे रोख शिल्लक ____________.

अ) वाढते ब) कमी होते

क)निरर्थक होते ड) वरील पैकी एकही नाही.

५. बँकेमेळपत्रक हे __________ तयार करते. .

अ) विद्यार्थी ब) व्यावसायिक क) बँक ड) वरीलपैकी एकही नाही.

६. पास बुकनुसार दिसणारी बँकशिल्लक म्हणजे ____________ पास बुकाची शिल्लक होय.

अ) जमा ब) प्रारंभिक क) नावे ड) अखेरची.

७. बँक अधिविकर्षाची सुविधा ___________ खातेदाराला देते.

अ) बचत ब) अवत क ) चालू ड) ठेव.

८. रोख पुस्तकानुसार दिसणारी शिल्लकेला ____________ शिल्लक सुध्दा म्हणतात.

अ) अनुकूल ब) अधिविकर्ष क) असामान्य ४)प्रतिकूल.

९. जेंव्हा असामान्य कालावधीचा रोख पुस्तक आणि पास बुकाचा उतारा दिलेला असेल तेंव्हा _________ घटक/पदे बँकमेळपत्रक तयार करतांना विचारात घेतले जातात.

अ) असामान्य ब) सामान्य क) अनुकूल ड)समान.

१०. जेंव्हा सामान्य कालावधीचा रोख पुस्तक आणि पास बुकाचा उतारा दिलेला असतो तेंव्हा फक्त __________ घटक बँक मेळपत्रक तयार करतांना विचारात घेतले जातात.

अ) असामान्य ब) समान क) अनुकूल ४)प्रतिकूल.

### प्र.५ खालील विधाने पूर्ण करा :

१. शोधनाबद्दलची नोंद रोख पुस्तकात जमा होते तर पास बुकात ___________ होईल.

२. बँक मेळपत्रक तयार करताना रोख पुस्तकातील ___________रकाना विचारात घेतात.

३. धनकोंना दिलेल्या धनादेशाची नोंद सर्वप्रथम ______________ पुस्तकात दिसते.

४. रोख पुस्तकाची शिल्लक आणि पास बुकाची शिल्लकेतील फरकाच्या कारणासाठी तयार केलेल्या पत्रकास ___________ म्हणतात.

५. पास बुकाची प्राप्ती बाजूची बेरीज जास्त दिसत असल्यास पास बुकाची शिल्लक __________ दिसेल.

६. धनकोंना ऑनलाईन पध्दतीने स्थानांतरीत केलेल्या रक्कमेची नोंद रोख पुस्तकात __________ बाजूला केली जातात.

७. बँकेने अधिविकर्षावर आकारलेल्या व्याजाची नोंद ______________ बाजूला पास बुकात केली जाते.

८. सामान्यतः रोखपुस्तकावर नावे शिल्लक असेल तर पास बुकात _________ शिल्लक दिसते.

९. बॅकेतून रक्कम काढण्यासाठी जे चलन पत्र भरावे लागते त्या चलन पत्राला___________ म्हणतात .

१०. ___________ मिळाल्यावर व्यावसायिक आपले खाते अद्यावत करतो.

**प्र.६ खालील विधाने चूक कि बरोबर ते सकारण लिहा :**

१) संग्रहणार्थ बँकेत जमा केलेला धनादेश अद्याप वसूल न झाल्यास त्याची नोंद फक्त पास बुकात होते.

२) ऋणकोने व्यवसायिकाच्या खात्यात थेट रक्कम जमा केल्यास त्याची नोंद पास बुकात जमा बाजूला होते.

३) व्यवसायिक बँक मेळपत्रक तयार करताना फक्त रोखपुस्तकाच्या शिलकेनुसारच तयार करतो.

४) जेव्हा रोखपुस्तकानुसार अधिविकर्ष दिला असेल, तेव्हा बँक शुल्क फक्त पास बुकात नावे होईल ते अधिक (+) करावे लागते.

५) बँकेकडून व्यवसायिकाला बँक विवरण पाठविले जाते.

**प्र.७ काल्पनिक नावाच्या आधारे नाव, खाते क्रमांक आणि रक्कम इ. माहितीचा नमुना तयार करा :**

१) बँक विवरण

२) पैसे जमा करण्याचे चलनपत्र

३) पैसे काढण्याचे चलनपत्र

४) बँक सूचना

५) पास बुक / ग्राहक पुस्तिका

**प्र.८ खालील विधाने दुरुस्त करून पुन्हा लिहा :**

१) बँकेत रक्कम किंवा धनादेश जमा करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या दस्तऐवजाला पास बुक असे म्हणतात.

२) बँक मेळपत्रक बँक तयार करते.

३) पास बुकातील नावे शिल्लक ही अनुकूल शिल्लक दर्शविते.

४) जेव्हा धनादेश बँकेत जमा केला जातो तेव्हा रोखपुस्तकाच्या जमा बाजूला नोंद केली जाते.

५) जेव्हा समान कालावधीचा उतारा दिला जातो तेव्हा केवळ समान पदे विचारात घेतले जातात.

**प्र.९ खाली दिलेला कोष्टक (तक्ता) पूर्ण करा :**

| | कारण | जेव्हा रोखपुस्तकानुसार सामान्य शिल्लक दिलेली असल्यास अधिक / वजा | जेव्हा पास बुकनुसार सामान्य शिल्लक दिलेली असल्यास अधिक / वजा |
|---|---|---|---|
| १) | व्याज फक्त पास बुकात नावे केल्यास | | |
| २) | ग्राहकाने थेट बँकेत रक्कम जमा केल्याची नोंद पास बुकमध्ये घेतल्यास | (+) | |
| ३) | संग्रहणार्थ बँकेत जमा केलेला धनादेश अद्याप वसूल झालेला नसल्यास | | |
| ४) | बँकेत जमा केलेला धनादेश अनादरीत झाल्यास | | (+) |
| ५) | शोधनार्थ दिलेला धनादेश बँकेस सादर झाला नसल्यास | | (-) |

## प्रात्याक्षिक उदाहरणे

१. **खालील दिलेल्या पास बुक आणि रोख पुस्तकातील बँकाना उताऱ्यावरुन दि.३१ ऑक्टोंबर २०१८ रोजीचे बँकेमेळपत्रक तयार करा.**

**___________ च्या पुस्तकात**

नावे. **रोख पुस्तक (फक्त बँक रकाना)** जमा.

| दिनांक | प्राप्ती | रक्कम (₹) | दिनांक | शोधन | रक्कम (') |
|---|---|---|---|---|---|
| २०१८ ऑक्टोंबर | | | २०१८ ऑक्टोंबर | | |
| ०१ | शिल्लक खाली आणली | १०,००० | ०७ | तेजस | १२,००० |
| ०५ | अपर्णा | ५,००० | १० | अनिल | ३,००० |
| ०८ | अपूर्वा | ६,००० | १५ | बँक शुल्क | २०० |
| १२ | ओंकार | ३,००० | १७ | जाहिरात | २,००० |
| २० | सुनिल | ४,००० | २० | आहरण/ उचल | १,००० |
| | | | ३१ | शिल्लक पुढे नेली | ९,८०० |
| | | **२८,०००** | | | **२८,०००** |

**बँकेच्या पुस्तकात**

नावे. पास बुक जमा.

| दिनांक | शोधन | रक्कम (₹) | दिनांक | प्राप्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| २०१८ ऑक्टोंबर | | | २०१८ ऑक्टोंबर | | |
| ०७ | व्याज | ५०० | ०१ | शिल्लक खाली आणली | १०,००० |
| १० | विमा प्रव्याजी | २,००० | १० | अपूर्वा | ६,००० |
| १३ | अनिल | ३,००० | २२ | सुनिल | ४,००० |
| २० | दूरध्वनी देयक | २,००० | २४ | राजू | २,००० |
| २० | आहरण/ उचल | १,००० | २७ | स्वानंद | ३,००० |
| ३१ | शिल्लक पुढे नेली | १६,५०० | | | |
| | | **२५,०००** | | | **२५,०००** |

२. **खाली दिलेल्या रोख पुस्तक आणि पास बुकाच्या उताऱ्यावरुन दि.३१ मार्च २०१९ रोजीचे बँकेमेळपत्रक तयार करा.**

**___________ च्या पुस्तकात**

नावे. **रोख पुस्तक (फक्त बँक रकाना)** जमा.

| दिनांक | प्राप्ती | रक्कम (₹) | दिनांक | शोधन | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | २०१९ | | |
| मार्च ०१ | शिल्लक खाली आणली | ७९,५०० | मार्च ०४ | भाडे | ३६,००० |
| ०४ | अविनाश | १८,००० | ०६ | मानसी | २०,१०० |
| ०९ | धनंजय | २५,५०० | १२ | निखिल | ९,६०० |
| १५ | मिनल | १०,८०० | १७ | आहरण/ उचल | १५,००० |
| २० | रोख | २४,००० | २४ | निशांत | २७,६०० |
| २७ | प्रसाद | १४,७०० | ३१ | शिल्लक पुढे नेली | ६४,२०० |
| | | **१,७२,५००** | | | **१,७२,५००** |

**पास बुक**

| दिनांक | विवरण | काढलेली रक्कम नावे. ₹ | जमा केलेली रक्कम जमा. ₹ | शिल्लक ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | |
| एप्रिल ०१ | शिल्लक खाली आणली | | | ८६,४०० |
| ०४ | मिनल | | १०,८०० | ९७,२०० |
| ०६ | प्रसाद | | १४,७०० | १,११,९०० |
| १० | वेतन | २४,००० | | ८७,९०० |
| १३ | निशांत | २७,६०० | | ६०,३०० |
| १८ | भारत | | ११,४०० | ७१,७०० |
| २३ | केशव | ६,६०० | | ६५,१०० |
| २७ | मानसी | २०,१०० | | ४५,००० |
| ३० | शर्वरी | | १८,००० | ६३,००० |

**३. श्री. रवि यांच्या पास बुकात दि. ३१ ऑगस्ट २०१८ रोजी ₹ ३३,६००/–, ची जमा शिल्लक आहे. परंतु रोख पुस्तकात वेगळी शिल्लक दिसते. दोन्ही पुस्तकांची तुलना केली असता खालील प्रमाणे फरक लक्षात आले.:**

१. बँकेला दिलेला ₹ २४,५००/– चा धनादेश दि. ३१ ऑगस्ट २०१८ पूर्वी बँकेत जमा झाला नाही.

२. ग्राहकाने NEFT प्रणालीद्‌वारे खात्यावर जमा केल्याची नोंद फक्त पास बुकात आलेली आहे. ₹ ३३,०००/–.

३. दि.२८ ऑगस्ट २०१८ रोजी शोधना करिता दिलेला ₹ ३८,८००/– चा धनादेश दि.०५ सप्टेंबर २०१८ रोजी बँकेत सादर करण्यात आला.

४. बँकेतून वटविण्यात आलेले ₹ १५,०००/– चे प्राप्यविपत्र दि.३० ऑगस्ट २०१८ रोजी अनादरीत झाल्याची सूचना बँकेद्‌वारे दि.०३ सप्टेंबर २०१८ रोजी प्राप्त झाली.

५. पास बुकची जमा बाजू ₹ २,०००/–ने जास्त दिसते.

६. बँक शुल्क ₹ ४००/– आकारल्याची नोंद बँकेने पास बुकात नावे केली, रोखपुस्तकात नोंद झाली नाही.

दि. ३१ ऑगस्ट २०१८ रोजीचे बँक मेळपत्रक तयार करा.

**४. खालील दिलेल्या माहितीच्या आधारे दि.३१ डिसेंबर २०१८ रोजीचे बँक मेळपत्रक तयार करा.**

१. दि. ३१ डिसेंबर २०१८ रोजी रोख पुस्तकानुसार अधिविकर्ष शिल्लक ₹ ४८,४५०/–होती.

२. बँकेने आकारलेल्या संदेशवाहनाचे ₹ ३७० ची नोंद फक्त पास बुकात नावे करण्यात आलेली आहे. परंतु रोख पुस्तकात याची नोंद घेतली गेलेली नाही.

३. अधिविकर्षावरील व्याज ₹ २,८७०/– ची नोंद रोखपुस्तकात झाली नाही.

४. बँकेत वटविण्यात आलेल्या ₹ १२,०००/– च्या विपत्राची नोंद रोख पुस्तकात पूर्ण रक्कमेने दिसते. परंतु बँकेने कपात केलेल्या ₹ २००/– कसरीची नोंद झाली नाही.

५. शोधनार्थ दिलेला ₹ ३२,३००/– चा धनादेश दि.३१ डिसेंबर २०१८ पूर्वी बँकेस सादर करण्यात आलेला नाही.

६. संग्रहणार्थ बँकेत जमा केलेला ₹ २४,०००/– चा धनादेशापैकी फक्त ₹ ८,००० चा धनादेश दि.३१ डिसेंबर २०१८ पूर्वी वसूल झाला.

७. डेबीट कार्डद्‌वारे लेखन सामुग्री देयकाचे ₹ ११,३००/– शोधन केले पण त्याची नोंद रोख पुस्तकात झाली नाही.

**५. खालील दिलेल्या तपशीलाच्या आधारे दि.३० जून २०१९ रोजीचे बँक मेळपत्रक तयार करा.**

१. पास बुक नुसार जमा शिल्लक ₹ २०,०००/-.

२. ₹ ३,५००/-चा दिलेला धनादेश बँकेस सादर करण्यात आला पण त्याची नोंद पास बुकात ₹ ५,३००/- दाखविण्यात आली.

३. संग्रहणार्थ बँकेत जमा केलेला ₹ ९,७००/- चा धनादेश वसूल झाला परंतु रोख पुस्तकात त्याची नोंद आलेली नाही.

४. रोख पुस्तकाची शोधन बाजू ₹ १००/- ने कमी दिसते.

५. बँकेद्वारे शोधन केलेल्या विद्युत देयकाची ₹ ६,२००/- ची नोंद पास बुकात दोन वेळेस करण्यात आली.

**६. खालील दिलेल्या माहितीच्या आधारे दि. ३१ मार्च २०१९ रोजीचे बँक मेळपत्रक तयार करा.**

१) रोख पुस्तकानुसार शिल्लक ₹ १०,०००/-.

२) शोधनार्थ दिलेला धनादेश ₹ २,०००/- बँकेत सादर झाला नाही.

३) ऋणकोने ₹ ३,५००/- NEFT या प्रणालीद्वारे बँक खात्यात जमा केले पण त्याची नोंद रोख पुस्तकात झाली नाही.

४) बँकेने विद्युत देयक ₹ ४५०/- भरले आणि ₹ १००/- बँक शुल्काबद्दल आकारले.

५) अबक कंपनीला डेबीट कार्डद्वारे ₹१,५००/- दिले परंतु रोख पुस्तकात त्याची नोंद ₹१५०/- अशी दाखविण्यात आली.

६) गुंतवणुकीवरील व्याज बँकेने खात्यात जमा केले ₹ ५००/-.

७) ₹ ८८५/- चा शोधनार्थ दिलेला धनादेश बँकेत सादर करण्यात आला परंतु बँकेने चुकीने ₹ ८६५/- ची नोंद पास बुकात केली.

**७. दि. ३१ जानेवारी २०१८ रोजी रोख पुस्तकानुसार बँक शिल्लक ₹ ४०,०००/- अशी आहे. परंतु पास बुकातील शिल्लक वेगळी आहे. वरील शिल्लकेमध्ये दिसणाऱ्या विसंगतीची कारणे शोधा.**

१) जानेवारी २०१८ मध्ये शोधनाबद्दल दिलेला ₹ १,००,०००/- चा धनादेशा पैकी फक्त ₹ ५०,०००/- चा धनादेश ३१ जानेवारी २०१८ पूर्वी बँकेत सादर करण्यात आला.

२) राशी संग्रहणार्थ ₹ २,००,०००/- चा धनादेश बँकेत जमा केला. त्यापैकी फक्त ₹ ८०,०००/- च्या धनादेशाची रक्कम जानेवारी २०१८ पूर्वी बँकेत जमा झाली.

३) खाली दिलेले व्यवहार जानेवारी २०१८ मध्ये पास बुकमध्ये दिसतात, परंतु त्यांची नोंद रोख पुस्तकात घेण्यात आली नाही.

   १) बँकेने ECS प्रणालीद्वारे ₹ ६,४००/- विद्युत बिल भरले.

   २) बँकेने ₹ १२,०००/- व्याज खात्यात जमा केले.

   ३) बँकेने वर्तनाचे ₹ १,०००/- आणि बँक शुल्लकाचे ₹ ६००/- नावे केले.

   ४) ग्राहकाने NEFT द्वारे थेट खात्यावर ₹ १,०००/- जमा केले.

दि. ३१ जानेवारी २०१८ रोजीचे बँके मेळपत्रक तयार करा.

**८. जानेवारी २०१८ मध्ये श्री. गिरीश कुंभार यांचे पास बुकात ₹ १४,०००/- बँक शिल्लक आहे. रोख पुस्तक व पास बुकाची तुलना केल्यास खालील त्रुटी लक्षात येतात.**

१) ₹ १०,०००/- चा धनादेश बँकेत जमा केला. परंतु बँकेने खात्यावर रक्कम जमा केला नाही.

२) भागावरील लाभांश बँकेने जमा केला परंतु त्याची नोंद रोख पुस्तकात घेण्यात आली नाही. ₹ १,०००/-

३) स्थायी सूचने नुसार बँकेने विमा प्रव्याजीचे ₹ ५००/- ECS प्रणालीने भरले पण रोख पुस्तकात या व्यवहाराची नोंद झाली नाही.

४) बँकेने कमिशनबद्दल ₹ ७५/- नावे केले.

५) धनादेश अनादर प्रकरणी बँकेने ₹ ९००/- नावे केल्याची नोंद फक्त पास बुकात आहे.

६) ₹ १,५००/- चा धनादेश बँकेत जमा केल्याची नोंद रोख पुस्तकात दोन वेळेस करण्यात आली.

७) जानेवारी २०१८ मध्ये एकूण ₹ २०,०००/– चे धनादेश निर्गमित करण्यात आले परंतु फक्त ₹ ८,०००/– चे धनादेश बँकेत जानेवारी २०१८ पूर्वी शोधनाकरीता सादर झाले.

३१ जानेवारी २०१८ रोजी बँक मेळपत्रक तयार करा.

**९. प्रशांत एन्टरप्रायझेस यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारे दि.३१ मार्च २०१८ रोजीचे बँक मेळपत्रक तयार करा .**

१) रोख पुस्तकानुसार अधिविकर्ष ₹ २८,०००/–

२) ₹ २,०००/– चा धनादेश निर्गमित करण्यात आला. बँकेने तो अनादरीत केला परंतु अनादरणाची नोंद रोख पुस्तकात घेण्यात आली नाही.

३) बँकेने ₹ १५०/- बँक शुल्काबद्दल नावे केले.

४) मालकाच्या बचत खात्यात बँकेने ₹ २,५००/– स्थानांतरीत केले पण त्याची नोंद रोख पुस्तकात नाही.

५) पुरवठादाराला दिलेला ₹ १,६००/–चा धनादेश बँकेत ३१ मार्च २०१८ पर्यंत सादर झालेला नव्हता.

६) राशी संग्रहणार्थ ₹ ३,०००/– आणि ₹ २,०००/– चे धनादेश बँकेत जमा करण्यात आले. परंतु त्या पैकी फक्त ₹ ३,०००/– चा धनादेश ३१ मार्च २०१८ पूर्वी बँकेत जमा झाला.

७) ग्राहकाने ₹ १,५००/– बँक खात्यात परस्पर जमा केले परंतु रोख पुस्तकात त्याची नोंद रोखीच्या रकान्यात करण्यात आली.

८) अधिविकर्षावर ₹ ७५०/- व्याज बँकेने नावे केले.

**१०. ३१ डिसेंबर २०१८ रोजीचे बँक मेळपत्रक तयार करा.**

१) पास बुकनुसार नावे शिल्लक ₹ १६,०००

२) ग्राहकाने आपल्या बँक खात्यात NEFT द्वारे ₹ ८,०००/– परस्पर जमा केले.

३) ₹ १०,५००/– चे धनादेश संग्रहणार्थ बँकेत आले नाहीत परंतु बँकेने जमा केले नाहीत.

४) बँकेने कमिशनबद्दल ₹ ३००/- ने नावे केल्याची नोंद पास बुकात आहे परंतु रोख पुस्तकात नाही.

५) डिसेंबर २०१८ मध्ये ₹ ३,५००/– चे बँकेत वटविलेले विपत्र जानेवारी २०१९ मध्ये अनादरीत होऊन परत आले.

६) स्थायी सूचनेनुसार बँकेने ₹ ६५०/-टेलिफोनचे बिल भरले त्याची नोंद रोख पुस्तकात नाही.

७) बँकेत ₹ ९७५/- चा धनादेश जमा करण्यात आला परंतु चुकून त्याची नोंद रोख पुस्तकात ₹ ७९५/- अशी करण्यात आली.

# 7 घसारा/ अवक्षयन (Depreciation)

**घटक**

७.१ घसाऱ्याचा अर्थ, व्याख्या आणि महत्व.

७.२ घसाऱ्यावर परिणाम करणारे घटक.

७.३ घसाऱ्याच्या पध्दती.

७.३.१. सरळ रेषा पध्दत.

७.३.२. प्ऱ्हासन अधिक्य पध्दत.

७.३.३. स्थिर प्रभाग पध्दत व प्ऱ्हासन अधिक्य पध्दत यातील फरक.

७.४ घसारा आकारण्याच्या नोंदी –

**क्षमता विधाने –**

- विद्यार्थ्यांना घसाऱ्याची संकल्पना, विविध पध्दती आणि महत्व यांचे आकलन होते.
- विद्यार्थ्यांना स्थिर आणि चल संपत्तीच्या फरकाचे आकलन होते.
- विद्यार्थी विविध स्थिर संपत्तीवरील घसाऱ्याची गणना करू शकतो.
- विद्यार्थी सरळरेषा पध्दती व ऱ्हासमान घसारा पध्दतीतील घसाऱ्याच्या राशिचा फरक ओळखतो.

दैंनदिन जीवनात आपण अनेक दृश्य व अदृश्य संपत्तीचा वापर करतो. त्या संपत्तीला स्वतःचे आयुष्य असते. उदा. इमारत, उपस्कर यंत्रसामुग्री इ. संपत्तीच्या स्थापनेपासुन किंवा तिच्या प्राप्तीपासुन तीचा वर्षानुवर्षे किंवा सतत उपयोग होत असल्यामुळे तिची किंमत (cost) संपत्तीच्या उपयुक्त आयुष्यामध्ये विभागणे आवश्यक आहे. स्थिर संपत्तीची किंमत विभागण्याच्या प्रक्रियेला घसारा असे म्हणतात.

## ७.१ घसाऱ्याचा अर्थ व व्याख्या –

‘डिप्रीशिएन’ **(Depriciations)** हा शब्द लॅटीन भाषेतील ’डेप्रिटीयम’ (Depretium) शब्दापासुन बनला आहे. ज्याचा अर्थ घटते किंवा कमी होते असा होतो. व्यवसायिक क्रिया पार पाडण्यासाठी प्रत्येक व्यवसायिक काही स्थिर संपत्तीचा उपयोग करीत असतो. अशा संपत्ती, खरेदी करण्याचा हेतू कायमस्वरूपी उपयोग करणे हा असून त्याची पुनर्विक्री करणे हा नसतो.

कालक्रमानुसार जमीन वगळता सर्वच स्थिर संपत्तीच्या किमती घटत असतात. म्हणून स्थिर संपत्तीच्या प्रत्यक्ष वापरामुळे तिच्या किंमतीत होणारी तुटफुट / घट म्हणजे घसारा होय.

**काही काळानंतर संपत्तीत निर्माण होणारी अकार्यक्षमता किंवा तुटफुट यामुळे किमतीत होणारी झीज म्हणजे घसारा होय.**

घसारा आकारल्याशिवाय खरे व वास्तिक उत्पन्न निश्चित करता येणार नाही व पुर्नस्थापनेसाठी कोणतीही तरतुद करू शकणार नाही. संपत्तीची खरेदी हा भांडवली खर्च आहे. हा आगम खर्च नाही.

महत्वाचे - NOTE:

१. जमिनीवर (Land) कधीही घसारा आकारला जात नाही. अनेकवेळा तिच्यात वृध्दी होते. एखाद्या भागातील जमिनीचे मुल्य वाढतही नाही किंवा घटतही नाही.

२. प्रत्येक वर्षी कंपनीला नफा होवो अथवा तोटा, घसारा आकारावाच लागतो.

व्याख्या - Definition:-

१. "कोणत्याही कारणामुळे जेव्हा संपत्तीच्या किंमतीत हळुहळु घट होते तेव्हा त्यास 'घसारा' असे म्हणतात."

***- आर. एन. कार्टर.***

'Depriciation is the gradual deacrease in the value of an assets from any cause.'

२. "संपत्तीच्या वापरामुळे तिच्या किंमतीत हळूहळू होणारी घट / झीज म्हणजे 'घसारा' होय"

***- आर. जी. विल्यम्स.***

३. "स्थिर संपत्तीच्या गुणवत्तेत आणि मुल्यात कायमस्वरूपी आणि सातत्याने होणारी घट म्हणजे 'घसारा' होय."

***- विल्यम पीकल्स.***

४. "स्थिर संपत्तीच्या वापरामुळे संपत्तीच्या मुल्यात होणारी घट किंवा झीज म्हणजे घसारा होय. याशिवाय कालानुरूप तुटफुट होणे, नष्ट होणे, अपघात होणे तसेच बाजारात संपत्तीची किंमत कमी होणे होय.


***-द इन्सटिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौटंट ऑफ इंडिया (ICAI)***

५. "संपत्तीच्या उपयोगाच्या जीवनकालात घसाऱ्याच्या संपूर्ण राशिचे विभाजन करणे म्हणजे घसारा होय. घसाऱ्याची आकारणी हि उत्पन्नाशी संबंधित जमा - खर्चाच्या कालावधीकरीता प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या केली जाते."

***- दि इंटरनॅशनल अकाउंटिंग स्टॅन्डर्ड कमिटी (ICAC)***

६. संपत्तीमध्ये हळूहळू नियमित व कायम स्वरूपी होणारी घट म्हणजे घसारा होय.

**घसारा आकारण्याची कारणे -**



१. **सहज व नैसर्गिक तुटफुट – (Normal and Natural Wear and Tear)**

प्रत्यक्ष संपत्तीचा उपयोग करीत असतांना सहज व नैसर्गिक तुटफुट होत असते, त्यामुळे स्थिर संपत्तीचे मुल्य कमी होते. संपत्तीचा जास्त उपयोग केल्यास जास्त तुटफुट होते.

२. **कालमर्यादा – (Passage of Time)**

स्थिर संपत्ती उपयोगात नसली तरीही ठरावीक काळानंतर तीचे मुल्य कमी होते. उदा. एकस्वाधिकार, व्यापारीचिन्ह, स्वामीत्व, भाडेपट्‌टी, संगणक – प्रणाली, आराखडा इ.

३. **निरूपयोगिता – (Obsolescence)**

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे किंवा उत्पादनाच्या तंत्रातील बदलामुळे जुनी स्थिर संपत्ती जरी ती वापरण्याजोगी असली तरी ती कालबाह्य किंवा निरूपयोगी होते, यामुळे संपत्तीचे मुल्य कमी होते. उदा. संगणक, दुरदर्शन (T.V) इ.

४. **उत्खनन ऱ्हास / अवक्षयन – (Depletion)**

उत्खनन म्हणेज रिकामे होणे. नष्ट होणाऱ्या संपत्तीचा अतीवापर किंवा उत्खनन केल्यास संपत्तीचे मुल्य कमी होते. उदा. जंगल, इंधनविहीरी, खानी, खदानी इ.

५. **नैसर्गिक आपत्ती – (Natural Calamities/Impairment of an Asset)**

कधी – कधी नैसर्गिक आपत्तीमुळे स्थिर संपत्तीचे नुकसान होते व किंमत कमी होते. उदा. भुकंप, चक्रीवादळ, आग, पुर, किंवा अपघात इ. मुळे संपत्तीचे नुकसान झाल्यास जमाखर्चाच्या पुस्तकात त्याची नोंद करावी लागते.

६. **शोध – (Invention)**

जेव्हा नवीन यंत्राचा शोध लावला जातो, त्यावेळी अगोदरची यंत्र – सामुग्रीची उपयोगिता कमी होते व त्यामुळे तिची किंमतही कमी होते. उदा. जेव्हा बाजारात, 'आयफोन ८' आला तेव्हा 'आयफोन ७' ची किंमत कमी झाली.

७. **बाजार मुल्य – (Market Value)**

सद्य परिस्थितीनुसार संपत्तीचे बाजार मुल्य कमी – जास्त होते. त्यामुळे घसारा सुद्‌धा बदलतो. जेव्हा बाजारपेठेत एखाद्या संपत्तीचे मुळ किंमतीच्या किंवा लगतमुल्याच्या तुलनेने मुल्य कमी होते. तेव्हा तेही घसारा आकारल्याचे कारण ठरू शकते.

## घसारा आकारण्याची आवश्यकता आणि महत्व – NEED AND IMPORTANCE OF DEPRECIATION–

१. घसाऱ्याची आकारणी नफा – तोटा खात्याला केली जाते. घसारा हा उत्पादन खर्चाचा महत्त्वाचा घटक आहे. संपत्तीचे वास्तविक मुल्य दाखविण्यासाठी घसारा विचारात घ्यावा लागतो. ठराविक लेखा कालावधितील शुद्‌ध नफा – तोटा काढण्यासाठी घसारा महत्त्वाचा असतो. एखादी संपत्ती वापरात नसली तरीही कालमर्यादेनुसार तिचे मुल्य कमी होते. घसारा हि व्यवसायातील हानी (Loss) आहे. घसारा हा अवित्तीय (Non Cash) खर्च आहे. 'घसारा' नामधारी खाते आहे.


२. जर संपत्तीच्या रकमेतुन घसाऱ्याची रक्कम कमी केली नाही तर त्या संपत्तीचे मुल्य जास्त दिसेल. त्यामुळे आपण व्यवसायाची खरी व वास्तविक आर्थिक स्थिती स्पष्ट करू शकणार नाही.

३. जेव्हा एखाद्या जुन्या संपत्तीचे आयुष्य समाप्त होते. तेव्हा त्याजागी संपत्तीची पुनर्स्थापना करण्यासाठी घसाऱ्याची तरतुद करणे आवश्यक असते. जर घसाऱ्याची तरतुद करण्यात आली नाही तर, नविन संपत्ती खरेदी करण्यासाठी व्यवसायाला निधी उपलब्ध होवू शकणार नाही.

४. सरकारला व्यवसायातील खरा वास्तविक कर देण्यासाठी घसारा आकारणे आवश्यक असते.

५. घसारा दरवर्षी आकारून तेवढ्या रकमेच्या निधीची तरतूद केल्यास स्थिर संपत्तीच्या उपयुक्त आयुष्यानंतर नवीन संपत्ती खरेदी करणे शक्य होईल.

## ७.२. घसारा आकारण्यासाठी विचारात घ्यावयाचे घटक –




१. **संपत्तीचे मुल्य – (Cost of Asset)**

जेव्हा घसारा आकारण्यात येतो, तेव्हा संपत्तीची मुळ किंमत हा महत्त्वाचा घटक असतो. यात संपत्तीच्या क्रयमुल्याबरोबरच तीला कार्यन्वीत किंवा अधिग्रहीत करण्यासाठी करावयाच्या खर्च समाविष्ट असतो. उदा. स्थापनाखर्च किंवा प्रतिस्थापना खर्च इ.

थोडक्यात संपत्तीची मुळ किंमत = संपत्तीचे क्रममुल्य + स्थापनाखर्च किंवा अनुशंगिक खर्च उदा. वाहतुक खर्च, वाहतुकीचा विमा, जकात, हमाली, दलाली, स्थापनेची मजुरी, जुन्या संपत्तीच्या दुरस्तीचा खर्च इ.

२. **संपत्तीचे अनुमानित उपयुक्त आयुष्य –**

बहुधा व्यवसायात संपत्तीचा ज्या निश्चित कालावधीसाठी उपयोग अपेक्षित असतो, ते तीचे उपयुक्त आयुष्य मानले जाते. दुसऱ्या शब्दात जोपर्यन्त व्यवसायाला त्या संपत्तीपासुन उपयुक्त सेवा आणि लाभ मिळत असतो. तोपर्यन्त तिचा व्यवसायात उपोयग केला जातो. म्हणून संपत्तीचे उपयुक्त आयुष्य भौतिक आयुष्यापेक्षा कमी असते.

३. **अनुमानित अवशेष मुल्य किंवा त्रोटमुल्य –**

संपत्तीचे उपयुक्त आयुष्य पूर्ण झाल्यानंतर तिच्या मोडीपासून / विक्रीपासून जी किंमत मिळते तिला मोडीची किंमत / अवशेष मुल्य किंवा त्रोटमुल्य असे म्हणतात. हि मोडीची किंमत निश्चित केल्यांनतर ती संपत्तीच्या मुळ किंमतीतुन कमी करण्यात येते.

## ७.३ घसारा आकारण्याच्या पद्धती – METHODS OF DEPRECIATION

संपत्तीचे स्वरूप, तिचा उपयोग, आणि गरजेनुसार घसारा आकारण्याच्या विविध पद्धती आहेत.

घसारा आकारण्यासाठी खालील विविध पद्धती दिलेल्या आहेत.

१. स्थिर प्रभाग किंवा सरळरेषा किंवा मुळ किंमतीवर घसारा पद्धत.

२. घटणाऱ्या शिलकेवर किंवा घटत्या किंमतीवर घसारा पद्धत –

३. वार्षिक वृत्ती – (Annuity Method).

४. घसारा निधी पद्धत – (Depreciation fund method)

५. पुनर्मुल्यांकन पद्धत – (Revaluation Method)

६. विमापत्र पद्धत – (Insurance Policy method)

७. यंत्रदर तास पद्धत – (Machine Hour Rate method)

**टिप : वरील विविध पद्धतींपैकी इ. ११ वी वाणिज्य करिता अभ्यासक्रमात पहिल्या दोनच पद्धती समाविष्ट केलेल्या आहेत त्यामुळे केवळ त्याच पद्धतींचे वर्णन खाली केले आहे.**

### ७.३.१. स्थिर प्रभाग किंवा सरळ रेषा किंवा मुळ किंमतीवर घसारा पद्धत – Fixed Instalment or Straight Line or Original Cost Method:-

या पद्धतीमध्ये दरवर्षी घसारा हा संपत्तीच्या मूळ किंमतीवर ठराविक दराने आकारला जातो. त्यामुळे संपत्तीचे मुल्य तिचे जीवन काळ समाप्त झाल्यावर शुन्यापर्यन्त किंवा मोडीच्या किंमतीपर्यन्त येते.

घसाऱ्याची राशि निश्चित करणे – (To assestain the Depreciation Amount)

या पद्धतीत घसाऱ्याची वार्षिक राशि निश्चित करण्याकरिता संपत्तीच्या एकूण मुळ किंमतीतुन मोडीची किंमत कमी करण्यात येते, व त्या राशिला संपत्तीच्या अणुमाणित आयुष्याने विभागण्यात येते. घसारा खालील सुत्रानुसार काढण्यात येतो.

$$\text{वार्षिक घसारा} = \frac{\text{संपत्तीची मुळ किंमत – अवशेष मुल्य}}{\text{संपत्तीचे अनुमाणित आयुष्य (वर्षे)}}$$

- संपत्तीची मुळ किंमत = संपत्तीचे क्रयमुल्य + अनुशंगिक खर्च

**उदाहरणार्थ**

एक यंत्र ₹ १५,०००/– ला खरेदी करण्यात आले त्याच्या स्थापनेकरिता ₹ ३,०००/– खर्च करण्यात आला. त्याचे अनुमाणित आयुष्य १० वर्ष असून तिच्या मोडीपासून ₹ २,००० मिळतील म्हणून त्यावर पुढीलप्रमाणे घसारा आकारता येईल.

$$\text{वार्षिक घसारा} = \frac{\text{₹ १५,००० +३,००० – २०००}}{\text{१० वर्ष}}$$

$$= \frac{\text{₹ १६,०००}}{\text{१०}}$$

$$= \text{₹ १,६०० वार्षिक घसारा}$$

घसाऱ्याचा दर (Rate) दिला असल्यास त्याप्रमाणे सुद्धा घसारा आकारावा, त्यासाठी खालील सुत्राचा वापर करावा.

$$\text{वार्षिक घसारा} = \frac{\text{संपत्तीची मुळ किमंत x घसाऱ्याचा दर}}{\text{१००}}$$

**सूचना : चालु आर्थीक वर्षामध्ये व्यवसायातील संपत्तीचा जितक्या कालावधीसाठी उपयोग करण्यात येईल तेवढ्याच कालावधीकरिता घसाऱ्याची राशि निश्चित करण्यात येईल.**

**उदाहरणार्थ –**

संपत्तीची मुळकिंमत ₹ ८०,००० असुन तिच्यावर वार्षीक १० % दराने स्थिर प्रभाग पद्धतीने पसारा आकारण्यात येतो. तेव्हा घसाऱ्याची राशि खालील प्रमाणे येईल.

१. वार्षिक घसारा (१ ले वर्ष) = ₹ ८०,००० x १० / १०० = ₹ ८,००० **वार्षिक घसारा**

घटती किंमत – WDV= ₹ ८०,००० – ₹ ८,००० = ₹ ७२,०००

२. वार्षिक घसारा (दुसरे वर्ष) = ₹ ८०,००० x १०/१०० = ₹ **८,००० वार्षिक घसारा**

घटती किंमत – WDV= ₹ ७२,००० – ₹ ८,००० = ₹ ६४,०००

३. वार्षिक घसारा (तिसरे वर्ष) = ₹ ८०,००० x १०/१०० = ₹ **८,००० वार्षिक घसारा**


घटती किंमत – WDV= ₹ ६४,००० – ₹ ८,००० = ₹ ५६,०००

४. वार्षिक घसारा (चौथे वर्ष) = ₹ ८०,००० x १०/१०० = ₹ **८,००० वार्षिक घसारा**

घटती किंमत – WDV= ₹ ५६,००० – ₹ ८,००० = ₹ ४८,०००

**टीप : या पद्धतीमध्ये प्रत्येक वर्षी घसारा संपत्तीच्या मुळ किंमतीवर आकारला जाईल.**

दरवर्षी घसारा संपत्तीच्या मुळ किंमतीवर आकारला जात असल्यामुळे घसाऱ्याची राशि स्थिर (एकच) असते. वर्षाच्या शेवटी आलेखाच्या कागदावर घसारा आकारल्याचे बिंदू (Point) दर्शविले आहे. सर्व बिंदू एकत्र जोडल्यास 'क्ष' अक्षांशाला एक सरळ समांतर रेषा तयार होते. म्हणून या पद्धतीला सरळ रेषा पद्धत असे म्हणतात.




**आकृती ७.३.१ – सरळ रेषा पद्धतीत घसारा**

### ७.३.२ ऱ्हासमान शेष पद्धत किंवा प्रऱ्हासन अधिक्य किंवा घटत्या किंमतीवर घसारा पद्धत –

या पद्धतीत घसारा निश्चित दराने संपत्तीच्या मागील वर्षाच्या किंमतीवर आकारला जातो. जमाखर्चाच्या पुस्तकात वर्षाच्या सुरूवातील संपत्ती खात्याला जी शिल्लक असते त्या मुल्यावर / शिलकेवर घसारा आकारण्यात येतो.

घसाऱ्याची रक्कम स्थिर नसते परंतु ती हळु – हळु कमी होते. सुरूवातीच्या काळात घसाऱ्याची रक्कम जास्त असते नंतर ती कमी होते. कारण दरवर्षी संपत्तीची किंमत कमी होत जाते.

**उदाहरणार्थ –**

एका संपत्तीची मुळ किंमत ₹ ८०.००० असुन तिच्यावर वार्षिक १० % घटत्या किंमतीवर घसारा आकारण्यात येतो. तेव्हा घसाऱ्याची आकारणी खालील प्रमाणे करण्यात येईल.

1. वार्षिक घसारा (१ ल्या वर्षी) = ₹ ८०,००० X १०/१०० = **₹ ८,००० वार्षिक घसारा**

   घटती किंमत – WDV= ₹ ८०,००० – ₹ ८,००० = ₹ ७२,०००

2. वार्षिक घसारा (दुसऱ्या वर्षी) = ₹ ७२,००० X १०/१०० = **₹ ७,२०० वार्षिक घसारा**

   घटती किंमत – WDV= ₹ ७२,००० – ₹ ७,२०० = ₹ ६४,८००

3. वार्षिक घसारा (तिसऱ्या वर्षी) = ₹ ६४,८०० X १०/१०० = **₹ ६,४८० वार्षिक घसारा**

   घटती किंमत – WDV= ₹ ६४,८०० – ₹ ६,४८० = ₹ ५८,३२०

4. वार्षिक घसारा (चौथ्या वर्षी) = ₹ ५८,३२० X १०/१०० = **₹ ५,८३२ वार्षिक घसारा**

   घटती किंमत – WDV= ₹ ५८,३२० – ₹ ५,८३२ = ₹ ५२,४८८

**टिप : या पद्धतीत वर्षाच्या सुरूवातीला मुळ किंमतीवर घसारा आकारण्यात येतो, त्या नंतर घसारा संपत्तीवर घटत्या किंमतीवर (WDV) आकारण्यात येतो.**

प्रत्येक वर्षी घसारा संपत्तीच्या कमी होणाऱ्या मुल्यावर आकारला जात असल्यामुळे घसाऱ्याची राशी कमी कमी होत जाते. या पद्धतीने घसारा आकारल्यास आणि आलेख कागदावर त्याचे बिंदू (Point) दर्शविल्यास व एकत्र जोडल्यास आलेख खालीलप्रमाणे दिसेल.




**आकृती ७.३.२ – ऱ्हाससमान शेष पद्धतीत घसारा –**

### ७.३.३. स्थिर प्रभाग पद्धत व प्र्‍हासन अधिक्य पद्धत यातील फरक –

| मुद्दा | स्थिर प्रभाग पद्धत – | ऱ्हासमान शेष पद्धत – |
|---|---|---|
| अर्थ | या पद्धतीत संपत्तीवरील घसाऱ्याची राशि दरवर्षी स्थिर असते. | या पद्धतीत संपत्तीवरील घसाऱ्याची राशि दरवर्षी कमी – कमी होत जाते. |
| आकारणी | घसारा हा संपत्तीच्या मुळकिंमतीवर आकारला जातो. | घसारा संपत्तीच्या घटत्या किमंतीवर आकारला जातो. |
| घसाऱ्याची रक्कम | दरवर्षी घसाऱ्याची रक्कम सारखी असते. | दरवर्षी घसाऱ्याची रक्कम कमी होत जाते. |
| स्थिर संपत्तीचे मुल्य | स्थिर संपत्तीचे मुल्य कमी होवून शुन्यापर्यन्त येवू शकते. | स्थिर संपत्तीचे मुल्य कमी होवून शुन्यापर्यन्त येवू शकत नाही. |
| नफा | संपत्तीच्या उपयोगाच्या काळात सुरूवातीला जास्त नफा होतो नंतर कमी होतो. | या पद्धतीत सुरूवातीला नफा कमी होतो नंतर जास्त होतो. |
| आयकर नियमानुसार | आयकर कायद्यानुसार योग्य नाही. | आयकर कायद्यानुसार योग्य आहे. |
| उपयुक्तता | जिथे दुरुस्ती खर्च कमी असतो व नूतनीकरण वारंवार करावे लागत नाही अशा ठिकाणी ही पद्धत सोयीची आहे. | जिथे दुरुस्ती खर्च जास्त असतो व नूतनीकरण वारंवार करावे लागते अशा ठिकाणी ही पद्धत सोयीची आहे. |
| आलेख | सरळ रेषा पद्धतीत आलेख हा सरळ / कण्यासारखा असतो. | ऱ्हासमान शेष पद्धतीत आलेख हा डावीकडून उजवीकडे खाली येतो. |

## ७.४ जमाखर्च नोंदी – (Accounting Treatment)

दोन्ही पद्धतीनुसार नोंदी सारख्याच आहेत त्या खालीलप्रमाणे –

**अ. (१) संपत्ती खरेदीचे वर्ष**

**१. संपत्ती रोख खरेदी केल्यास**

संपत्तीचे खाते ------------ नावे.

रोकड / बँक खात्याला ---------

(संपत्तीची रोख खरेदी)

**२. संपत्तीची उधार खरेदी केल्याबद्दल**

संपत्ती खाते ------- नावे.

विक्रेता / पुरवठादाराच्या खात्याला -----------

(संपत्तीची उधार खरेदी केल्याबद्दल)

**३. संपत्ती कार्यान्वीत करण्यासाठी काही अनुशंगिक खर्च केल्यास –**

संपत्तीचे खाते ----------------- नावे.

रोकड / बँक खात्याला ------------------

(अनुशंगिक खर्चाचे शोधन केल्याबद्दल)

**४. घसारा आकाल्याबद्दल**

घसारा खाते ------------- नावे.

संपत्ती खात्याला ----------

(घसारा आकारल्याबद्दल)

**५. वर्षअखेर घसारा खात्याची शिल्लक नफा – तोटा खात्यास वर्ग केल्याबद्दल)**

नफा – तोटा खाते ----------- नावे.

घसारा खात्याला -----------

(घसारा नफा – तोटा खात्यास वर्ग केल्याबद्ल)

**ब) दुसऱ्या व त्यापुढील वर्षांसाठी**

**१. घसारा आकारल्याबद्दल**

घसारा खाते ------------- नावे.

संपत्ती खात्याला -----------

(घसारा आकारल्याबद्दल)

**२. वर्ष अखेरीस घसारा खात्याची शिल्लक नफातोटा खात्यास वर्ग केल्याबद्दल**

नफातोटा खाते ------------- नावे.

घसारा खात्याला -----------

**क) संपत्तीच्या विक्रीच्या वर्षी**

**१. संपत्तीच्या विक्री तारखेपर्यंत घसारा आकारल्याबद्दल**

घसारा खाते ------------- नावे.

संपत्ती खात्याला -----------

**२. संपत्ती पुस्तकी मुल्यावर विकल्यास**

रोकड / बँक खाते ------------- नावे.

संपत्तीच्या खात्याला -----------

(पुस्तकी मुल्यावर संपत्तीची विक्री केल्याबद्दल)

**३. संपत्ती नफ्यावर विकल्यास**

रोकड / बँक खाते ----------- नावे.

संपत्ती खात्याला -----------

संपत्ती वरील नफा खात्याला -----------

(नफ्यावर संपत्तीची विक्री केल्याबद्ल)

**४. संपत्तीवरील नफा, नफा – तोटा खात्यास वर्ग केल्याबद्दल**

संपत्तीवरील नफा खाते ----------------- नावे.

नफा – तोटा खात्याला -----------

(संपत्तीवरील नफा, नफा – तोटा खात्यास वर्ग केल्याबद्दल)

**५. संपत्ती तोट्यावर विकल्यास**

रोकड / बँक खाते ------------------- नावे.

संपत्तीवरील तोटा खाते ----------- नावे

संपत्ती खात्याला -----------

(संपत्तीची तोट्यावर विक्री केल्याबद्दल)

**६. संपत्तीच्या विक्रीवरील तोटा नफा – तोटा खात्यास वर्ग केल्याबद्दल –**

नफा – तोटा खाते ...........................................नावे.

संपत्तीवरील तोटा खाते -----------------

(संपत्तीवरील तोटा नफा – तोटा खात्यात नेल्याबद्दल)

**७. शेष संपत्तीवर (असल्यास) घसारा आकारल्याबद्दल –**

घसारा खाते .....................................................नावे.

संपत्तीचे खात्याला ------------

(शेष संपत्तीवर ठराविक दराने घसारा आकारल्याबद्दल)

**८. वर्षअखेर घसारा नफा – तोटा खात्यात नेल्याबद्दल –**

**नफा – तोटा खाते** ................................................ नावे

घसारा खात्याला -----------------

(घसारा खात्याची शिल्लक नफा – तोटा खात्यात नेल्याबद्दल)

**– सरळरेषा पद्धतीवरील उदाहरणे –**

**उदाहरण क्र. – १.**

सिद्धी ली. रत्नागिरी ते १ एप्रिल २०१५ रोजी एक यंत्रसामुग्री ₹ २,००,०००/– किंमतीला खरेदी केले. यंत्राच्या मुळ किंमतीवर वार्षिक १० % दराने घसारा आकारण्यात येतो. आर्थिक वर्ष ३१ मार्च ला समाप्त होते. असे गृहीत धरून पहिल्या तीन वर्षाकरता किर्दनोंदी देवून यंत्र खाते व घसारा खाते तयार करा.

उत्तर –

**सिद्धी ली. रत्नागिरीच्या पुस्तकात किर्दनोंदी.**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१५ एप्रिल १ | यंत्र खाते नावे.<br>बँक खात्याला<br>(यंत्र खरेदी केल्याबद्दल) | - | २,००,००० | २,००,००० |
| २०१६ मार्च ३१ | घसारा खाते नावे.<br>यंत्र खात्याला<br>(मुळ किमतीवर १० % घसारा आकारल्याबद्दल) | - | २०,००० | २०,००० |
| २०१६ मार्च ३१ | नफा – तोटा खाते नावे<br>घसारा खात्याला<br>(घसारा खात्याची शिल्लक नफा तोटा खात्याला नेल्याबद्दल) | - | २०,००० | २०,००० |
| २०१७ मार्च ३१ | घसारा खाते नावे.<br>यंत्र खात्याला<br>(मुळ किमतीवर १० % घसारा आकारल्याबद्दल) | - | २०,००० | २०,००० |
| २०१७ मार्च ३१ | नफा – तोटा खाते नावे.<br>घसारा खात्याला<br>(घसारा खात्याची शिल्लक नफा तोटा खात्याला नेल्याबद्दल) | - | २०,००० | २०,००० |
| २०१८ मार्च ३१ | घसारा खाते नावे<br>यंत्र खात्याला<br>(मुळ किमतीवर १० % दराने घसारा आकारल्याबद्दल) | - | २०,००० | २०,००० |
| २०१८ मार्च ३१ | नफा – तोटा खाते नावे.<br>घसारा खात्याला<br>(घसारा खात्याची शिल्लक नफा – तोटा खात्याला नेल्याबद्दल) | - | २०,००० | २०,००० |

**कार्य टिपणी :–**

| | | (₹) |
|---|---|---|
| १. | **घसाऱ्याची आकारणी** | |
| १ एप्रिल २०१५ चे मुल्य | | २,००,००० |
| | वजा २०१५ – १६ साठी १० % घसारा | २०,००० |
| | १ एप्रिल २०१६ ची किंमत | १,८०,००० |
| | वजा २०१६ – १७ साठी१० % घसारा | २०,००० |
| | १ एप्रिल २०१७ ची किंमत | १,६०,००० |
| | वजा २०१७ – १८ साठी १० % घसारा | २०,००० |
| | १ एप्रिल २०१८ चे मुल्य – | १,४०,००० |

२. **पर्यायी पद्धत**

| | |
|---|---|
| १ एप्रिल २०१५ चे मुल्य | २,००,००० |
| वजा ३ वर्षाचा १० % घसारा | |
| (२०,०००+२०,०००+२०,०००) | – ६०,००० |
| | १,४०,००० |

**सिद्धी ली. रत्नागिरीच्या पुस्तकात**

**नावे** **यंत्र खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ | दिनांक | तपशील | रो.पा. | राशि ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१५ | | | | २०१६ | | | |
| एप्रिल १ | बँक खाते | | २,००,००० | मार्च ३१ | घसारा खाते | | २०,००० |
| | | | | मार्च ३१ | शि / खा/ नेली | | १,८०,००० |
| | | | २,००,००० | | | | २,००,००० |
| २०१६ | | | | २०१७ | | | |
| एप्रिल १ | शि/ खा/ आणली | | १,८०,००० | मार्च ३१ | घसारा खाते | | २०,००० |
| | | | | मार्च ३१ | शि / खा/ नेली | | १,६०,००० |
| | | | १,८०,००० | | | | १,८०,००० |
| २०१७ | | | | २०१८ | | | |
| एप्रिल १ | शि/ खा/ आणली | | १,६०,००० | मार्च ३१ | घसारा खाते | | २०,००० |
| | | | | मार्च ३१ | शि / खा/ नेली | | १,४०,००० |
| | | | १,६०,००० | | | | १,६०,००० |
| २०१८ | | | | | | | |
| एप्रिल १ | शि/ खा/ आणली | | १,४०,००० | | | | |

**नावे** **घसारा खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ | दनिांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१६ | | | | २०१६ | | | |
| मार्च ३१ | यंत्र खाते | | २०,००० | मार्च ३१ | नफा – तोटा खाते | | २०,००० |
| | | | २०,००० | | | | २०,००० |
| २०१७ | | | | २०१७ | | | |
| मार्च ३१ | यंत्र खाते | | २०,००० | मार्च ३१ | नफा – तोटा खाते | | २०,००० |
| | | | २०,००० | | | | २०,००० |
| २०१८ | | | | २०१८ | | | |
| मार्च ३१ | यंत्र खाते | | २०,००० | मार्च ३१ | नफा – तोटा खाते | | २०,००० |
| | | | २०,००० | | | | २०,००० |

**उदाहरण – २**

मे. पुनावाला आणि कंपनी लातूर यांनी १ एप्रिल २०१६ रोजी ₹ ५०,०००/- ची सामुग्री खरेदी केली व त्याबद्दल चेक दिला. त्यांनी स्थिर प्रभाग पद्धतीने घसारा आकारण्याचा निर्णय घेतला. सामुग्रीचे अनुमाणित आयुष्य ८ वर्ष असुन तिच्या मोडीपासून ₹ २,००० /- मिळतील असा अंदाज आहे. १ जानेवारी २०१९ मध्ये सामुग्री ₹ ३५,००० ला विकण्यात आली. कंपनीची लेखापुस्तके दरवर्षी ३१ मार्चला बंद होतात.

सामुग्रीवरिल वार्षीक घसारा काढून पहिल्या तीन वर्षाकरीता सामुग्री खाते, तिसऱ्या वर्षाच्या किर्दनोंदी लिहा व घसाऱ्याचे गणन करा.

उत्तर :

**मे. पुनावाला आणि कंपनी, लातूर**

**च्या पुस्तकात सामुग्री खाते**

**नावे** **जमा**

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१६ | | | | २०१७ | | | |
| एप्रिल १ | बँक खाते | | ५०,००० | मार्च ३१ | घसारा खाते | | ६,००० |
| | | | | मार्च ३१ | शि / खा/ नेली | | ४४,००० |
| | | | ५०,००० | | | | ५०,००० |
| २०१७ | | | | २०१८ | | | |
| एप्रिल १ | शि/ खा/ आणली | | ४४,००० | मार्च ३१ | घसारा खाते | | ६,००० |
| | | | | मार्च ३१ | शि / खा/ नेली | | ३८,००० |
| | | | ४४,००० | | | | ४४,००० |
| २०१८ | | | | २०१९ | | | |
| एप्रिल १ | शि/ खा/ आणली | | ३८,००० | जाने १ | घसारा खाते (९ म) | | ४,५०० |
| २०१९ | सामुग्रीवरील नफा खाते | | १,५०० | जाने १ | बँक खाते | | ३५,००० |
| जाने १ | | | | | | | |
| | | | ३९,५०० | | | | ३९,५०० |

**कार्य टीप : १. घसाऱ्याचे आगमन –**

$$\text{वार्षिक घसारा} = \frac{\text{संपत्तीची मुळ किंमत – मोडीची किंमत}}{\text{अनुमाणित आयुष्य}}$$

$$\therefore \text{घसारा} = \frac{₹\ ५०,००० - ₹\ २,०००}{८\ \text{वर्ष}}$$

$$\therefore \text{घसारा} = \frac{₹\ ४८,०००}{८\ \text{वर्ष}}$$

$\therefore$ घसारा = ₹ ६,००० वार्षिक घसारा

**कार्य टीप : २.**

संपत्तीच्या विक्रीवरील नफा–तोटा

| | |
|---|---|
| संपत्तीची मूळकिंमत | ₹ ५०,००० |
| – २ वर्ष ९ महिन्याचा घसारा | – १६,५०० |
| १–१–२०१९ ची किंमत | ₹ ३३,५०० |
| विक्री मूल्य | – ३५,००० |
| विक्रीवरील नफा | ₹ १,५०० |

मे. पुनावाला आणि कंपनी, लातूर ची रोजकिर्द २०१८–१९ अखेर

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१९ जाने १ | घसारा खाते नावे.<br>सामुग्री खात्याला<br>(सामुग्रीवर घसारा आकारल्याबद्दल) | –<br>– | ४,५०० | <br>४,५०० |
| जाने १ | बँक खाते नावे.<br>सामुग्री खात्याला<br>सामुग्रीवरील नफा खात्याला<br>(सामुग्री नफ्यावर विकल्याबद्दल) | – | ३५,००० | <br>३३,५००<br>१,५०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मार्च ३१ | सामुग्रीवरील नफा खाते नावे.<br>नफा - तोटा खात्याला<br>(सामुग्री नफा, नफा - तोटा खात्याला नेल्याबद्दल) | - | १,५०० | <br>१,५०० |
| मार्च ३१ | नफा - तोटा खाते नावे<br>घसारा खात्याला<br>(घसारा खात्याची शिल्लक नफा - तोटा खात्याला नेल्याबद्दल) | - | ४,५०० | <br>४,५०० |

**उदाहरण - ३**

प्रभुणे अँड सन्स, कोल्हापूर यांनी १ आक्टोबर २०१५ रोजी स्वतःच्या कार्यालयाकरीता काही फर्निचर बनवून घेतले. याकरिता त्यांनी सामुग्री करीता ₹ ७२,००० व मजुरीकरिता ₹ ३२,००० असा खर्च केला.

फर्निचर अनुमाणित आयुष्य १० वर्ष असून अखेरीस त्याच्या मोडीपासून ₹ २४,००० मिळतील असा अंदाज आहे.

१ आक्टोबर २०१८ रोजी त्यांनी सर्व फर्निचर रु, ८०,००० ला विकले. प्रत्येकवर्षी त्यांची लेखा पुस्तके ३१ मार्चला बंद होतात.

पहिल्या चार वर्षांच्या कालावधीकरिता फर्निचर खाते व घसारा खाते दाखवा.

**उत्तर :** **प्रभूने इंडस्ट्रीज कोल्हापूर यांच्या पुस्तकात**

**नावे** **फर्निचर खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१५ | | | | २०१६ | | | |
| आक्टो १ | बँक खाते (७२,००० + ३२,०००) | | १,०४,००० | मार्च ३१ | घसारा खाते | | ४,००० |
| | | | | मार्च ३१ | शि/खा/नेली | | १,००,००० |
| | | | १,०४,००० | | | | १,०४,००० |
| २०१६ | | | | २०१७ | | | |
| एप्रिल १ | शि/खा/आणली | | १,००,००० | मार्च ३१ | घसारा खाते | | ८,००० |
| | | | | मार्च ३१ | शि/खा/नेली | | ९२,००० |
| | | | १,००,००० | | | | १,००,००० |
| २०१७ | | | | २०१८ | | | |
| एप्रिल १ | शि/खा/आणली | | ९२,००० | मार्च ३१ | घसारा खाते | | ८,००० |
| | | | | मार्च ३१ | शि/खा/नेली | | ८४,००० |
| | | | ९२,००० | | | | ९,२००० |
| २०१८ | | | | २०१८ | | | |
| एप्रिल १ | शि/खा/आणली | | ८४,००० | आक्टो ३१ | घसारा खाते | | ४,००० |
| | | | | आक्टो ३१ | बँक खाते | | ८०,००० |
| | | | ८४,००० | | | | ८४,००० |

नावे **घसारा खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१६ मार्च ३१ | फर्निचर खाते | - | ४,००० | २०१६ मार्च ३१ | नफा - तोटा खाते | - | ४,००० |
| | | | ४,००० | | | | ४,००० |
| २०१७ मार्च ३१ | फर्निचर खाते | - | ८,००० | २०१७ मार्च ३१ | नफा - तोटा खाते | - | ८,००० |
| | | | ८,००० | | | | ८,००० |
| २०१८ मार्च ३१ | फर्निचर खाते | - | ८,००० | २०१८ मार्च ३१ | नफा - तोटा खाते | - | ८,००० |
| | | | ८,००० | | | | ८,००० |
| २०१८ आक्टो १ | फर्निचर खाते | - | ४,००० | २०१९ मार्च ३१ | नफा - तोटा खाते | - | ४,००० |
| | | | ४,००० | | | | ४,००० |

**कार्यटिप -**

१. फर्निचर ची मुळ किंमत -

संपत्तीचे परिव्यय मुल्य = क्रयमुल्य + स्थापना खर्च मजुरी

= ₹ ७२,००० + ₹ ३२,०००

= ₹ १,०४,०००

२. घसाऱ्याचे आगनत

$$\text{वार्षिक घसारा} = \frac{\text{परिव्यय मुल्य + मजूरी - मोडीची किमंत}}{\text{अनुमानित आयुष्य}}$$

$$\therefore \text{वार्षिक घसारा} = \frac{१,०४,००० - २४,०००}{१०}$$

$$\text{वार्षिक घसारा} = \frac{८०,०००}{१०}$$

घसारा = ₹ ८,००० ६ महिना घसारा = ₹ ४,०००

**उदाहरण - ४**

१ जानेवारी २०१५ रोजी 'SCON' ट्रान्सपोर्ट कंपनी पुणे यांनी ४ ट्रक प्रत्येकी ₹ २५,००० ला खरेदी केले. ते सरळरेषा पद्धतीने १० % दराने घसारा आकारतात.

१ जानेवारी २०१६ रोजी त्यांनी एक ट्रक ₹ २०,००० ला विकला. १ जुलै २०१६ रोजी (१ जाने २०१५ ₹ २५,००० ला खरेदी केलेला) ₹ २२,००० ला विकला. १ जाने २०१७ रोजी एक नविन ट्रक रु, ४०,००० ला खरेदी केला.

लेखापुस्तके ३१ मार्च ला बंद होतात असे गृहीत धरून पहिल्या तीन वर्षाकरिता ट्रक खाते आणि घसारा खाते तयार करा.

### 'SCON' ट्रान्सपोर्ट कंपनी, पुणे च्या पुस्तकात

**नावे** **ट्रक खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१५ | | | | २०१५ | | | |
| जाने १ | बँक खाते | – | १,००,००० | मार्च ३१ | घसारा खाते (अ+ब+क+ड) | – | २,५०० |
| | | | | मार्च ३१ | शि/खा/गेली | – | ९७,५०० |
| | | | १,००,००० | | | | १,००,००० |
| २०१५ | | | | २०१६ | घसारा खाते (१-अ) | – | १,८७५ |
| एप्रिल १ | शि/खा/आणली | – | ९७,५०० | जाने १ | बँक खाते | – | २०,००० |
| | | | | जाने १ | ट्रकवरील तोटा खाते | – | २,५०० |
| | | | | जाने १ | घसारा खाते | – | ७,५०० |
| | | | | मार्च ३१ | शि/खा/गेली | – | ६५,६२५ |
| | | | | मार्च ३१ | | | |
| | | | ९७,५०० | | | | ९७,५०० |
| २०१६ | | | | २०१६ | | | |
| एप्रिल १ | शि/खा/आणली | | ६५,६२५ | जुलै १ | घसारा खाते | – | ६२५ |
| जुलै १ | ट्रकवरील नफा खाते | | ७५० | २०१७ | बँक खाते | – | २२,००० |
| | | | | जुलै १ | घसारा खाते | – | ६,००० |
| २०१७ | | | | मार्च ३१ | शि/खा/गेली | – | ७७,७५० |
| जाने १ | बँक खाते | | ४०,००० | मार्च ३१ | | | |
| | | | १,०६,३७५ | | | | १,०६,३७५ |
| २०१७ | | | | | | | |
| एप्रिल १ | शि/खा/आणली | | ७७,७५० | | | | |

**नावे** **घसारा खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१५ | | | | २०१५ | | | |
| मार्च ३१ | ट्रक खाते | | २,५०० | मार्च ३१ | नफा -तोटा खाते | | २,५०० |
| | | | २,५०० | | | | २,५०० |
| २०१६ | | | | २०१६ | | | |
| जाने १ | ट्रक खाते | | १,८७५ | मार्च ३१ | नफा -तोटा खाते | | ९,३७५ |
| मार्च ३१ | ट्रक खाते | | ७,५०० | | | | |
| | | | ९,३७५ | | | | ९,३७५ |
| २०१६ | | | | २०१७ | | | |
| जुलै १ | ट्रक खाते | - | ६२५ | मार्च ३१ | नफा -तोटा खाते | – | ६,६२५ |
| २०१७ | ट्रक खाते | - | ६,००० | | | | |
| मार्च ३१ | | | | | | | |
| | | | ६,६२५ | | | | ६,६२५ |

**कार्यटिप :–**

१. ट्रकच्या विक्रीवरील नफा तोटा (१ जाने २०१६)

| | |
|---|---|
| १ – १ – २०१५ ची मुळ किंमत | ₹ २५,००० |
| वजा ३१ मार्च २०१५ चा घसारा (३ म) | ₹ ६२५ |
| | ₹ २४, ३७५ |
| (–) ३१ मार्च २०१५ चा घसारा (९ म) | ₹ १,८७५ |
| | ₹ २२, ५०० |
| (–) १ – १ – २०१६ ची विक्री – | ₹ २०,००० |
| ट्रक विक्रीवरील तोटा – | ₹ २,५०० |

२. दुसऱ्या ट्रकच्या विक्रीवर नफा – तोटा –

| | | |
|---|---|---|
| १ – १– २०१५ ची मुळ किंमत | ₹ २५,००० | |
| विक्री पर्यंतचा २०१५ चा घसारा | ₹ ३,७५० | (६२५ + २,५००+६२५) |
| १ जुलै २०१६ ची किंमत | ₹ २१,२५० | |
| १ जुलै २०१६ चा विक्रीमुल्य | ₹ २२,००० | |
| ट्रकच्या विक्रीवरील नफा | ₹ ७५० | |

**पर्यायी कार्यटिप :**

| ट्रक | १ – अ ₹ | ट्रक | १ – ब ₹ | ट्रक | १ – क ₹ | ट्रक | १ – ड ₹ | ट्रक | २ रे ₹ | एकूण घसारा ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १-१-१५ | २५,००० | १-१-१५ | २५,००० | १-१-१५ | २५,००० | १-१-१५ | २५,००० | १-१-१७ | ४०,००० | |
| ३१-३-१५ | ६२५ | ३१-३-१५ | ६२५ | ३१-३-१५ | ६२५ | ३१-३-१५ | ६२५ | | | २,५०० |
| १-४-१५ | २४,३७५ | १-४-१५ | २४,३७५ | १-४-१५ | २४,३७५ | १-४-१५ | २४,३७५ | | | |
| १-१-१६ | १,८७५ | ३१-३-१६ | २,५०० | ३१-३-१६ | २,५०० | ३१-३-१६ | २,५०० | | | ९,३७५ |
| पुस्तकी मुल्य | २२,५०० | १-४-१६ | २१,८७५ | १-४-१६ | २१,८७५ | १-४-१६ | २१,८७५ | | | |
| विक्री मुल्य | २०,००० | १-७-१६ | ६२५ | ३१-३-१७ | २,५०० | ३१-३-१७ | २,५०० | ३१-३-१७ | १,००० | ६,६२५ |
| विक्रीवर तोटा | २,५०० | पुस्तकी मुल्य | २१,२५० | १-४-१७ | १९,३७५ | १-४-१७ | १९,३७५ | १-४-१७ | ३९,००० | |
| | | विक्री मुल्य | २२,००० | | | | | | | |
| | | विक्रीवर नफा | ७५० | | | | | | | |

**उदाहरण – ५**

मे. रूबीना ट्रेडर्स, सिंधुदुर्ग यांनी १ एप्रिल २०१६ रोजी, ₹ ३०,००० किंमतीचे फर्निचर आणले. व १ ऑक्टोबर, २०१६ रोजी ₹ २०,००० किंमतीचे अतिरिक्त फर्निचर घेतले. ते स्थिर प्रभाग पद्धतीने १५ % दराने घसारा आकारतात.

१ ऑक्टोबर, २०१६ रोजी त्यांनी १ कपाट ₹ ५,००० ला विकले. ज्याची मुळ किंमत १ एप्रिल २०१६ रोजी ₹ १०,००० होती. व त्याच तारखेला एक नविन कपाट ₹ १५,००० ला खरेदी केले.

३१ मार्चला आर्थिक वर्ष समाप्त होते असे गृहीत धरून २०१६ – १७, २०१७ – १८ व २०१८ – १९ या वर्षाकरिता फर्निचर खाते व घसारा खाते तयार करा.

**उत्तर :**

**मे. रुबीना ट्रेडर्स, सिंधुदुर्ग च्या पुस्तकात**

**नावे** **फर्निचर खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१६ | | | | २०१७ | | | |
| एप्रिल १ | बँक खाते | – | ३०,००० | मार्च ३१ | घसारा खाते | – | ६,००० |
| ऑक्टो १ | बँक खाते | – | २०,००० | मार्च ३१ | शि/ खा/ नेली | – | ४४,००० |
| | | | ५०,००० | | | | ५०,००० |
| २०१७ | | | | २०१८ | | | |
| एप्रिल १ | शि/ खा/ आणली | | ४४,००० | मार्च ३१ | घसारा खाते | – | ७,५०० |
| | | | | मार्च ३१ | शि/ खा/ नेली | – | ३६,५०० |
| | | | ४४,००० | | | | ४४,००० |
| २०१८ | | | | २०१८ | | | |
| एप्रिल १ | शि/ खा/ आणली | – | ३६,५०० | ऑक्टो १ | घसारा खाते (१अ) | – | ७५० |
| ऑक्टो १ | बँक खाते | – | १५,००० | ऑक्टो १ | बँक खाते | – | ५,००० |
| | | | | ऑक्टो १ | फर्निचरवर तोटा खाते | – | १,२५० |
| | | | | २०१९ | | | |
| | | | | मार्च ३१ | घसारा खाते (१ब + २ + ३) | – | ७,१२५ |
| | | | | मार्च ३१ | शि/ खा/ नेली | – | ३७,३७५ |
| | | | ५१,५०० | | | | ५१,५०० |
| २०१९ | | | | | | | |
| एप्रिल १ | शि/ खा/ आणली | | ३७,३७५ | | | | |

नावे | घसारा खाते | जमा

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१७ | | – | | २०१७ | | | |
| मार्च ३१ | फर्निचर खाते | | ६,००० | मार्च ३१ | नफा – तोटा खाते | | ६,००० |
| | | | ६,००० | | | | ६,००० |
| २०१८ | | – | | २०१८ | | | |
| मार्च ३१ | फर्निचर खाते | | ७,५०० | मार्च ३१ | नफा – तोटा खाते | | ७,५०० |
| | | | ७,५०० | | | | ७,५०० |
| २०१८ | | – | | २०१९ | | | |
| ऑक्टो १ | फर्निचर खाते | | ७५० | मार्च ३१ | नफा – तोटा खाते | | ७,८७५ |
| २०१९ | | | | | | | |
| मार्च ३१ | फर्निचर खाते | | ७,१२५ | | | | |
| | | | ७,८७५ | | | | ७,८७५ |

**कार्यटिप : घसाऱ्याची गणना व विक्री केलेल्या फर्निचरवरील नफा/तोटा**

| | फर्निचर | विक्री १–अ ₹ | फर्निचर | न विकलेले १–ब | फर्निचर | २ ₹ | फर्निचर | ३ ₹ | एकूण घसारा ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुल्य | १–४–१६ | १०,००० | १–४–१६ | २०,००० | १–१०–१६ | २०,००० | १–१०–१८ | १५,००० | |
| मुल्य | ३१–३–१७ | १,५०० | ३१–३–१७ | ३,००० | ३१–३–१७ | १,५०० | | | ६,००० |
| मुल्य. | ३१–३–१८ | १,५०० | ३१–३–१८ | ३,००० | ३१–३–१८ | ३,००० | | | ७,५०० |
| मुल्य. | १–१०–१८ | ७५० | ३१–३–१९ | ३,००० | ३१–३–१९ | ३,००० | (६ म) ३१–३–१८ | १,१२५ | ७,८७५ |
| | पुस्तकी मुल्य | ६,२५० | १–४–१९ | ११,००० | १–४–१९ | १२,००० | १–४–१९ | १३,८७५ | |
| | विक्रीमुल्य | ५,००० | | | | | | | |
| | तोटा | १,२५० | | | | | | | |

**उदाहरण – ६**

मे. अमिर एजन्सी, सोलापूर यांच्या लेखापुस्तकात १ ऑक्टो २०१५ रोजी, यंत्र खात्यावर नावे बाकी ₹ ५६,००० दिसते. त्याची मुळ किंमत ₹ ८०,००० होती.

१ एप्रिल २०१६ रोजी मे. अमिर एजन्सीने जास्तीची ₹ ४५,००० यंत्रसामुग्री आणली आणि तिच्या स्थापनेवर ₹ ५,००० खर्च केला. १ ऑक्टो २०१७ यंत्रसामुग्रीचा १ भाग ₹ १५,००० ला विकला, ज्याची मुळ किंमत १ एप्रिल २०१६ रोजी ₹ २०,००० होती.

मे. अमिर एजन्सी १०% दराने स्थिर प्रभाग पद्धतीने घसारा आकारते आणि त्यांचे आर्थिक वर्ष ३१ मार्च ला संपते.

**२०१५ – १६, २०१६ – १७, २०१७ – १८ या वर्षाकरिता यंत्रसामुग्री खाते व तिसऱ्या वर्षाकरिता अमिर एजन्सीच्या पुस्तकात किर्दनोंदी करा.**

उत्तर :

मे. अमिर एजन्सी, सोलापुर च्या पुस्तकात

नावे **यंत्र सामुग्री खाते** जमा

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१५ | | - | | २०१६ | | | |
| ऑक्टो १ | शि/ खा/ आणली | - | ५६,००० | मार्च ३१ | घसारा खाते | - | ४,००० |
| | | | | मार्च ३१ | शि/ खा/ नेली | - | ५२,००० |
| | | | ५०,००० | | | | ५६,००० |
| २०१६ | | | | २०१७ | | | |
| एप्रिल १ | शि/ खा/ आणली | - | ५२,००० | मार्च ३१ | घसारा खाते | - | १३,००० |
| एप्रिल १ | बँक खाते | - | ५०,००० | मार्च ३१ | शि/ खा/ नेली | - | ८९,००० |
| | | | १,०२,००० | | | | १,०२,००० |
| २०१७ | | - | | २०१७ | | | |
| एप्रिल १ | शि/ खा/ आणली | | ८९,००० | ऑक्टो १ | घसारा खाते | - | १,००० |
| | | | | ऑक्टो १ | बँक खाते | - | १५,००० |
| | | | | ऑक्टो १ | यंत्रावरील तोटा खाते | - | २,००० |
| | | | | २०१८ | | | |
| | | | | मार्च ३१ | घसारा खाते | - | ११,००० |
| | | | | मार्च ३१ | शि/ खा/ नेली | - | ६०,००० |
| | | | ८९,००० | | | | ८९,००० |
| २०१८ | | | | | | | |
| एप्रिल १ | शि/ खा/ आणली | | ६०,००० | | | | |

मे. अमिर एजन्सी यांच्या पुस्तकात

किर्दनोंदी

| दिनांक | तपशील | खा.पा. | नावे राशि ₹ | जमा राशि ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१७ ऑक्टो १ | घसारा खाते नावे<br>यंत्र खात्याला<br>(यंत्रावर १० % घसारा आकारल्यास) | - | १,००० | १,००० |
| ऑक्टो १ | बँक खाते नावे<br>यंत्रावरील तोटा खाते नावे<br>यंत्र खात्याला<br>(यंत्रविक्रीवर तोटा झाल्याबद्दल) | -<br>- | १५,०००<br>२,००० | १७,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०१८<br>मार्च ३१ | घसारा खाते नावे<br>यंत्र खात्याला<br>(यंत्रावर १० % घसारा आकारलाबद्‌ल) | - | ११,००० | ११,००० |
| मार्च ३१ | नफा - तोटा खाते नावे<br>यंत्र विक्री तोटा खात्याला<br>(यंत्र विक्री - तोट खाते नफातोटा खात्याला स्थानांतरित केल्याबद्‌ल) | - | २,००० | २,००० |
| मार्च ३१ | नफा - तोटा खाते नावे<br>घसारा खात्याला<br>(यंत्राच्या विक्रीवरील तोटा नफा - तोटा खात्याला नेल्याबद्‌दल) | - | १२,००० | १२,००० |
| | **एकूण** | | **४३,०००** | **४३,०००** |

**कार्य टीप :**

| यंत्रसामुग्री I | न विकलेली ₹ | यंत्रसामुग्री II अ | विक्री यंत्रसामुग्री ₹ | यंत्रसामुग्री II ब | न विकलेली ₹ | एकूण घसारा ₹ |
|---|---|---|---|---|---|---|
| १-१०-१५ | ५६,००० | | | | | |
| ३१-३-१६ | ४,००० | | | | | ४,००० |
| १-४-१६ | ५२,००० | १-४-१६ | २०,००० | १-४-१६ | ३०,००० | |
| ३१-३-१७ | ८,००० | ३१-३-१७ | २,००० | ३१-३-१७ | ३,००० | १३,००० |
| १-४-१७ | ४४,००० | १-४-१७ | १८,००० | १-४-१७ | २७,००० | |
| ३१-३-१८ | ८,००० | १-१०-१७ | १,००० | ३१-३-१८ | ३,००० | १२,००० |
| १-४-१८ | ३६,००० | मुल्य | १७,००० | १-४-१८ | २४,००० | |
| | | विक्री किंमत | १५,००० | | | |
| | | विक्रीवरील तोटा | २,००० | | | |

**घटत्या किंमतीवर घसारा या पद्‌धतीवरील उदाहरणे**

**उदाहरण - १**

१ एप्रिल २०१६ रोजी सौरभने ₹ १,१५,००० किमतीची यंत्रसामुग्री आकारली आणि तिच्या स्थापनेकरिता ₹ ५००० खर्च केला. दरवर्षी व घटत्या किमतीने १० % दराने घसारा आकारण्याचे ठरविले. त्यांची हिशोब पुस्तके दरवर्षी ३१ मार्चला खाते बंद होतात.

१ ऑक्टोबर २०१८ ला त्यांनी संपूर्ण यंत्रसामुग्री ₹ ८०,००० ला विकली. सौरभच्या पुस्तकात ३१ मार्च २०१८ पर्यन्तच्या किर्दनोंदी करून दाखवा.

उत्तर :

**सौरभच्या पुस्तकात**
**किर्दनोंदी**

| दिनांक | तपशील | खा.पा. | नावे राशि ₹ | जमा राशि ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१६<br>एप्रिल १ | यंत्रसामुग्री खाते नावे<br>बँक खात्याला<br>(यंत्र खरेदी केल्याबद्दल) | - | १,१५,००० | <br><br>१,१५,००० |
| एप्रिल १ | यंत्रसामुग्री खाते नावे<br>बँक खात्याला<br>(यंत्र स्थापनेवर खर्च केल्याबद्दल) | - | ५,००० | <br>५,००० |
| २०१७<br>मार्च ३१ | घसारा खाते नावे<br>यंत्रसामुग्री खात्याला<br>(यंत्रावर घसारा आकारल्याबद्दल) | - | १२,००० | <br>१२,००० |
| मार्च ३१ | नफा - तोटा खाते नावे<br>घसारा खात्याला<br>(घसारा खात्याची शिल्लक नफा - तोटा खात्यात नेल्याबद्दल) | - | १२,००० | <br>१२,००० |
| २०१८<br>मार्च ३१ | घसारा खाते नावे<br>यंत्रसामुग्री खात्याला<br>(पुस्तकीमुल्यावर घसारा आकारल्याबद्दल) | - | १०,८०० | <br>१०,८०० |
| मार्च ३१ | नफा - तोटा खाते नावे<br>घसारा खात्याला<br>(घसारा खात्याची शिल्लक नफा - तोटा खात्यात स्थलांतरित केल्याबद्दल) | - | १०,८०० | <br>१०,८०० |
| २०१८<br>ऑक्टो १ | घसारा खाते नावे<br>यंत्रसामुग्री खात्याला<br>(पुस्तकीमुल्यावर घसारा आकारल्याबद्दल) | - | ४,८६० | <br>४,८६० |
| ऑक्टो १ | बँक खाते नावे<br>यंत्रविक्रीवरील तोटा खाते नावे<br>यंत्रसामुग्री खात्याला<br>(यंत्रसामुग्री तोट्यावर विकल्याबद्दल) | -<br>- | ८०,०००<br>१२,३४० | <br><br>९२,३४० |
| २०१९<br>मार्च ३१ | नफा - तोटा खाते नावे<br>यंत्र विक्रीवरील तोटा खात्याला<br>(यंत्र विक्रीवरील तोटा, नफा तोटा खात्यास वर्ग) | | १२,३४० | <br>१२,३४० |
| मार्च ३१ | नफा - तोटा खाते नावे<br>घसारा खात्याला<br>(घसारा नफा तोटा, खात्यास वर्ग) | - | ४,८६० | ४,८६० |

**कार्यटिप :**

यंत्राच्या विक्रीवरील नफा तोटा गणना

| | |
|---|---|
| १-४-२०१६ ची मुळ किंमत | ₹ १,२०,००० |
| वजा २०१७ चा घसारा | ₹ १२,००० |
| १-४-२०१७ चे पुस्तकीमुल्य | ₹ १,०८,००० |
| वजा २०१७ चा घसारा | ₹ १०,८०० |
| १-४-२०१८ चो पुस्तकीमुल्य | ₹ ९७,२०० |
| वजा २०१८ चा ६ महिन्याचा घसारा | ₹ ४,८६० |
| पुस्तकी मूल्य | ₹ ९२,३४० |
| वजा विक्री मुल्य | ₹ ८०,००० |
| यंत्राच्या विक्रीवरील तोटा | ₹ १२,३४० |

**उदाहरण - २**

संगम ट्रेडिंग कंपनी बुलढाणा यांनी एक वाहन १ एप्रिल २०१६ रोजी ₹ ८५,००० किमतीला खरेदी केले आणि त्याच्या स्थापनेकरिता ₹ ५,००० खर्च केला. ३० सप्टेम्बर २०१६ रोजी आणखी ₹ १०,००० किमतीचे अतिरिक्त वाहन खरेदी करण्यात आले.

३१ मार्च २०१८ रोजी एक वाहन ₹ १२,००० ला विकण्यात आले ज्याची मुळ किंमत १ एप्रिल २०१६ ला ₹ २०,००० होती.

२०१६ - १७, २०१७ - १८ आणि २०१८ - १९ या तीन वर्षाकरिता वाहन खाते व २०१७ - १८ या वर्षाकरिता किर्दनोंदी करा. प्रत्येक वर्षी ३१ मार्च ला वर्ष समाप्त होते असे गृहीत धरून वाहनावर ऱ्हासमान शेष पद्धतीने १० % दराने घसारा आकारा.

**उत्तर :** **संगम ट्रेडींग कंपनी, बुलढाणा यांच्या पुस्तकात,**

**नावे** **वाहन खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | खा. पा. | राशि ₹ | दिनांक | तपशील | खा. पा. | राशि ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१६ | | | | २०१७ | | | |
| एप्रिल १ | बँक खाते | - | ९०,००० | मार्च ३१ | घसारा खाते | - | ९,००० |
| सप्टें ३० | बँक खाते | - | १०,००० | मार्च ३१ | घसारा खाते | - | ५०० |
| | | | | मार्च ३१ | शि/ खा/ नेली | - | ९०,५०० |
| | | | १,००,००० | | | | १,००,००० |
| २०१७ | | | | २०१८ | | | |
| एप्रिल १ | शि/ खा/ आणली | - | ९०,५०० | मार्च ३१ | घसारा खाते (१) | - | १,८०० |
| | | | | मार्च ३१ | बँक खाते | - | १२,००० |
| | | | | मार्च ३१ | वाहन विक्री तोटा खाते | - | ४,२०० |
| | | | | मार्च ३१ | घसारा खाते | - | ६,३०० |
| | | | | मार्च ३१ | घसारा खाते | - | ९५० |
| | | | | मार्च ३१ | शि/खा/नेली | - | ६५,२५० |
| | | | ९०,५०० | | | | ९०,५०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१८ | | | | २०१९ | | | |
| एप्रिल १ | शि/ खा/ आणली | | ६५,२५० | मार्च ३१ | घसारा खाते | - | ५,६७० |
| | | | | मार्च ३१ | घसारा खाते | - | ८५५ |
| | | | | मार्च ३१ | शि/ खा/ नेली | - | ५८,७२५ |
| | | | ६५,२५० | | | | ६५,२५० |
| २०१९ | | | | | | | |
| एप्रिल १ | शि/ खा/ आणली | | ५८,७२५ | | | | |

**संगम ट्रेडींग कंपनी, बुलढाणा यांच्या पुस्तकात**
**किर्दनोंदी**

| दिनांक | तपशील | खा.पा. | नावे राशि (₹) | जमा राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८<br>मार्च ३१ | घसारा खाते नावे<br>वाहन खात्याला<br>(पुस्तकी मुल्याच्या १० % घसारा आकारल्याबद्दल) | - | १,८०० | १,८०० |
| मार्च ३१ | बँक खाते नावे<br>वाहनविक्रीवर तोटा खाते नावे<br>वाहन खात्याला<br>(वाहनाची तोट्यावर विक्री केल्याबद्दल) | -<br>- | १२,०००<br>४,२०० | १६,२०० |
| मार्च ३१ | नफा - तोटा खाते नावे<br>वाहनविक्रीवरिल तोटा खात्याला<br>(वाहन विक्रीवरील तोटा नफा तोटा खात्यास वर्ग) | - | ४,२०० | ४,२०० |
| मार्च ३१ | घसारा खाते नावे<br>वाहन खात्याला<br>(वाहनावर घसारा आकारल्याबद्दल) | - | ७,२५० | ७,२५० |
| मार्च ३१ | नफा - तोटा खाते नावे<br>घसारा खात्याला<br>(घसारा खात्यावरील शिल्लक नफातोटा खात्यास वर्ग) | - | ९,०५० | ९,०५० |
| | **एकूण** | | **३८,५००** | **३८,५००** |

**कार्य टीप :**

**वाहनाच्या विक्रीवरिल नफा व तोटा –**

| वाहन | विक्री ₹ १ | वाहन | न विकलेले ₹ २ | वाहन | न विकलेले ₹ ३ | एकूण घसारा ₹ |
|---|---|---|---|---|---|---|
| १-४-१६ | २०,००० | १-४-१६ | ७०,००० | ३०-९-१६ | १०,००० | |
| ३१-३-१७ | २,००० | ३१-३-१७ | ७,००० | ३१-३-१७ | ५०० | ९,५०० |
| १-४-१७ | १८,००० | १-४-१७ | ६३,००० | १-४-१७ | ९,५०० | |
| ३१-३-१८ | १,८०० | ३१-३-१८ | ६,३०० | ३१-३-१८ | ९५० | ९,०५० |
| पुस्तकी मुल्य | १६,२०० | १-४-१८ | ५६,७०० | १-४-१८ | ८,५५० | |
| विक्री मुल्य | १२,००० | ३१-३-१९ | ५,६७० | ३१-३-१९ | ८५५ | ६,५२५ |
| विक्रीवर तोटा | ४,२०० | १-४-१९ | ५१,०३० | १-४-१९ | ७,६९५ | |

**उदाहरण – ३**

शर्मिला ऑटोमोबाईल्स ठाणे, यांनी १ जुलै २०१५ रोजी एक यंत्र ₹ ८०,००० ला खरेदी केले. १ ऑक्टोबर २०१६ रोजी कंपनीने आणखी ₹ ३०,००० किंमतीचे अतिरीक्त यंत्र खरेदी केले. ३१ मार्च २०१८ रोजी १ जुलै २०१५ रोजी खरेदी केलेले यंत्र निकामी झाल्यामुळे ₹ ६५,००० ला विकण्यात आले. वर्षअखेर ३१ मार्च रोजी १०% दराने प्रऱ्हासन अधिक्य पद्धतीने घसारा आकारण्यात येतो.

**२०१५ – १६, २०१६ – १७ व २०१७ – १८ या तीन वर्षाकरिता यंत्रखाते व घसारा खाते तयार करा.**

**उत्तर :** **शर्मिला ऑटोमोबाईल्स ठाणे, च्या पुस्तकात**

**नावे** **यंत्र खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | खा. पा. | राशि (₹) | दिनांक | तपशील | खा. पा. | राशि (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१५ जुलै १ | बँक खाते | – | ८०,००० | २०१६ मार्च ३१ | घसारा खाते | – | ६,००० |
| | | | | मार्च ३१ | शि/ खा/ नेली | – | ७४,००० |
| | | | ८०,००० | | | | ८०,००० |
| २०१६ एप्रिल १ | शि/ खा/ आणली | – | ७४,००० | २०१७ मार्च ३१ | घसारा खाते | – | ८,९०० |
| ऑक्टो १ | बँक खाते | – | ३०,००० | मार्च ३१ | शि/ खा/ नेली | – | ९५,१०० |
| | | | १,०४,००० | | | | १,०४,००० |
| २०१७ एप्रिल १ | शि/ खा/ आणली | – | ९५,१०० | २०१८ मार्च ३१ | घसारा खाते | – | ६,६६० |
| | | | | मार्च ३१ | घसारा खाते | – | २,८५० |
| २०१८ मार्च ३१ | यंत्रविक्रीवर नफा खाते | – | ५,०६० | मार्च ३१ | बँक खाते | – | ६५,००० |
| | | | | मार्च ३१ | शि/ खा/ नेली | – | २५,६५० |
| | | | १,००,१६० | | | | १,००,१६० |
| २०१८ एप्रिल १ | शि/ खा/ आणली | – | २५,६५० | | | | |

नावे घसारा खाते जमा

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१६ मार्च ३१ | यंत्र खाते | – | ६,००० | २०१६ मार्च ३१ | नफा – तोटा खाते | – | ६,००० |
| | | | ६,००० | | | | ६,००० |
| २०१७ मार्च ३१ | यंत्र खाते | – | ८,९०० | २०१७ मार्च ३१ | नफा – तोटा खाते | – | ८,९०० |
| | | | ८,९०० | | | | ८,९०० |
| २०१८ मार्च ३१ | यंत्र खाते | – | ६,६६० | २०१८ मार्च ३१ | नफा – तोटा खाते | – | ९,५१० |
| मार्च ३१ | यंत्र खाते | – | २,८५० | | | | |
| | | | ९,५१० | | | | ९,५१० |

**कार्य टिप :**

यंत्रावरील नफा – तोटा

| | |
|---|---|
| १–७–२०१५ ची मुळ किंमत – | ₹ ८०,००० |
| (–) ३१–३–२०१६ चा घसारा (९ म) | ₹ ६,००० |
| (–) ३१ – ३– २०१७ चा घसारा – | ₹ ७४,००० |
| | – ७,४०० |
| | ₹ ६६,६०० |
| (–) ३१ मार्च २०१८ चा घसारा – | ₹ ६,६६० |
| | ₹ ५९,९४० |
| (–) विक्रीमुल्य | ₹ ६५,००० |
| विक्रीवरील नफा – | ₹ ५,०६० |

अतिरिक्त यंत्रावरील घसारा –

| | |
|---|---|
| १ ऑक्टोबर २०१६ ची मुळ किंमत | ₹ ३०,००० |
| (–) ३१ मार्च २०१७ चा घसारा (६ म) | १,५०० |
| (–) ३१ मार्च २०१८ चा घसारा | २,८५० |
| पुस्तकी मुल्य ३१ मार्च, २०१८ अखेर | ₹ २५,६५० |

**उदाहरण – ४**

कांचन ट्रेडींग सेन्टर, दादर यांनी १ एप्रिल २०१५ रोजी एक संगणक ₹ ५०,००० ला खरेदी केले व त्यावर्षी १ ऑक्टोबरला जास्तीचे २०,००० चे संगणक खरेदी केले.

१ ऑक्टोबर २०१६ रोजी १ एप्रिल २०१५ रोजी खरेदी केलेले संगणक ₹ ४०,००० ला विकले व त्याच तारखेला नविन संगणक ₹ २४,००० ला खरेदी केले.

सेन्टर दरवर्षी ऱ्हासमान शेष पद्धतीने ८ % दराने वार्षिक घसारा आकारते.

सेन्टर ची लेखापुस्तके ३१ मार्चला बंद होतात असे गृहीत धरून पहिल्या तीन वर्षाकरिता संगणक खाते व घसारा खाते तयार करा.

**उत्तर :**

**कांचन ट्रेडींग सेंन्टर, दादर यांच्या पुस्तकात**

**नावे** **संगणक खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१५ | | | | २०१६ | | | |
| एप्रिल १ | बँक खाते | – | ५०,००० | मार्च ३१ | घसारा खाते | – | ४,८०० |
| ऑक्टो १ | बँक खाते | – | २०,००० | मार्च ३१ | शि/ खा/ नेली | – | ६५,२०० |
| | | | ७०,००० | | | | ७०,००० |
| २०१६ | | | | २०१६ | | | |
| एप्रिल १ | शि / खा /आणली | – | ६५,२०० | ऑक्टो १ | घसारा खाते | – | १,८४० |
| ऑक्टो १ | बँक खाते | – | २४,००० | ऑक्टो १ | बँक खाते | – | ४०,००० |
| | | | | ऑक्टो १ | संगणक विक्री तोटा | – | ४,१६० |
| | | | | मार्च ३१ | घसारा खाते (I + II) | – | २,४९६ |
| | | | | २०१७ | | | |
| | | | | मार्च ३१ | शि/ खा/ नेली | | ४०,७०४ |
| | | | ८९,२०० | | | | ८९,२०० |
| २०१७ | | | | २०१८ | | | |
| एप्रिल १ | शि / खा /आणली | – | ४०,७०४ | मार्च ३१ | घसारा खाते | – | ३,२५६ |
| | | | | मार्च ३१ | शि/ खा/ नेली | – | ३७,४४८ |
| | | | ४०,७०४ | | | | ४०,७०४ |
| २०१८ | | | | | | | |
| एप्रिल १ | शि / खा /आणली | – | ३७,४४८ | | | | |

नावे घसारा खाते जमा

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१६ मार्च ३१ | संगणक खाते | - | ४,८०० | २०१६ मार्च ३१ | नफा - तोटा खाते | - | ४,८०० |
| | | | ४,८०० | | | | ४,८०० |
| २०१६ ऑक्टो १ | संगणक खाते १ | - | १,८४० | २०१७ मार्च ३१ | नफा - तोटा खाते | - | ४,३३६ |
| २०१७ मार्च ३१ | संगणक खाते २ | - | २,४९६ | | | | |
| | | | ४,३३६ | | | | ४,३३६ |
| २०१८ मार्च ३१ | संगणक खाते I + II | - | ३,२५६ | २०१८ मार्च ३१ | नफा - तोटा खाते | - | ३,२५६ |
| | | | ३,२५६ | | | | ३,२५६ |

**कार्य टीप :**

**संगणकाच्या विक्रीवरील**

| संगणक | विक्री I ₹ | संगणक | II ₹ | संगणक | III ₹ | एकूण घसारा ₹ |
|---|---|---|---|---|---|---|
| १-४-१५ | ५०,००० | १-१०-१५ | २०,००० | १-१०-१६ | २४,००० | |
| ३१-३-१६ | ४,००० | ३१-३-१६ | ८०० | | | ४,८०० |
| १-४-१६ | ४६,००० | १-४-१६ | १९,२०० | (६ म) | | |
| १-१०-१६ | १,८४० | ३१-३-१७ | १,५३६ | ३१-३-१७ | ९६० | ४,३३६ |
| पुस्तकी मुल्य | ४४,१६० | १-४-१७ | १७,६६४ | १-४-१७ | २३,०४० | |
| विक्री मुल्य | ४०,००० | ३१-३०१८ | १४१३ | ३१-३-१८ | १,८४३ | ३,२५६ |
| तोटा विक्री वर - | ४,१६० | १-४-१८ | १६,२५१ | १-४-१८ | २१,१९७ | |

**उदाहरण - ५**

मे. जानकी ट्रेडर्स रत्नागिरी यांनी १ एप्रिल २०१५ रोजी एक इमारत ₹ १२,००,००० ला घेतली आणि १ एप्रिल २०१६ रोजी तिच्यावर ₹ ८,००,००० खर्च करून विस्तार केला.

१ ऑक्टोबर, २०१६ रोजी इमारतीचा अर्धा भाग दलालामार्फत ₹ ९,५०,००० ला विकला त्याकरिता विक्रीमुल्याच्या ३ % दलाली दिली.

दरवर्षी ३१ मार्चला ते प्ऱ्हासन अधिक्य पद्धतीने १० % दराने वार्षिक घसारा आकारतात.

**२०१५ - १६, २०१६ - १७ आणि २०१७ - १८ या तीन वर्षाकरिता इमारत खाते व घसारा खाते तयार करा.**

उत्तर :

**मे. जानकी ट्रेडर्स, रत्नागिरी यांच्या पुस्तकात**

**नावे** **इमारत खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१५ | | | | २०१६ | | | |
| एप्रिल १ | बँक खाते | – | १२,००,००० | मार्च ३१ | घसारा खाते | – | १,२०,००० |
| | | | | मार्च ३१ | शि / खा /नेली | – | १०,८०,००० |
| | | | १२,००,००० | | | | १२,००,००० |
| २०१६ | | | | २०१६ | | | |
| एप्रिल १ | शि / खा /आणली | – | १०,८०,००० | ऑक्टो ३१ | घसारा खाते | – | ४७,००० |
| एप्रिल १ | बँक खाते | – | ८,००,००० | ऑक्टो ३१ | बँक खाते | – | ९,२१,५०० |
| ऑक्टो १ | विक्री नफा खाते | – | २८,५०० | २०१७ | | | |
| | | | | मार्च ३१ | घसारा खाते | – | ९४,००० |
| | | | | मार्च ३१ | शि / खा /नेली | – | ८,४६,००० |
| | | | १९,०८,५०० | | | | १९,०८,५०० |
| २०१७ | | | | २०१८ | | | |
| एप्रिल १ | शि / खा /आणली | – | ८,४६,००० | मार्च ३१ | घसारा खाते | – | ८४,६०० |
| | | | | मार्च ३१ | शि / खा /आणली | – | ७,६१,४०० |
| | | | ८,४६,००० | | | | ८,४६,००० |
| २०१८ | | | | | | | |
| एप्रिल १ | शि / खा /आणली | – | ७,६१,४०० | | | | |

**नावे** **घसारा खाते** **जमा**

| दिनांक | तपशील | रो. पा. | राशि | दिनांक | तपशील | रो. पा. | राशि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१६ | | | | २०१६ | | | |
| मार्च ३१ | इमारत खाते | – | १,२०,००० | मार्च ३१ | नफा – तोटा खाते | – | १,२०,००० |
| | | | १,२०,००० | | | | १,२०,००० |
| २०१६ | | | | २०१७ | | | |
| ऑक्टो १ | इमारत खाते | – | ४७,००० | मार्च ३१ | नफा – तोटा खाते | – | १,४१,००० |
| २०१७ | | | | | | | |
| मार्च ३१ | इमारत खाते | – | ९४,००० | | | | |
| | | | १,४१,००० | | | | १,४१,००० |
| २०१८ | | | | २०१८ | | | |
| मार्च ३१ | इमारत खाते | – | ८४,६०० | मार्च ३१ | नफा – तोटा खाते | – | ८४,६०० |
| | | | ८४,६०० | | | | ८४,६०० |

**कार्य टीप :**

**विकलेल्या इमारतीवर नफा – तोटा आणि घसाऱ्याचे आगमन–** (₹)

| | |
|---|---|
| १ एप्रिल २०१५ रोजी इमारतीची खरेदी | – १२,००,०००. |
| (–) ३१–३–२०१६ चा घसारा | – १,२०,०००. |
| १–४–२०१५ चे पुस्तकी मुल्य | – १०,८०,००० |
| (+) १ एप्रिल २०१६ इमारतीचा विस्तार | – ८,००,००० |
| एकूण इमारतीचे मुल्य | – १८,८०,००० |

विकलेली ₹ ९,४०,००० न विकलेली ₹ ९,४०,०००

| | | | |
|---|---|---|---|
| अ) अर्धी इमारत विकली<br>१ एप्रिल २०१६<br>१ ऑक्टो २०१६<br>चा घसारा (६ म) | ९,४०,०००<br><br><br>४७,००० | ब) न विकलेली अर्धी इमारत<br>१ एप्रिल २०१६<br>२०१६ – १७ चा<br>घसारा १०% | ९,४०,०००.<br><br><br>९४,०००. |
| पुस्तकी मुल्य<br>विक्रीमुल्य | ८,९३,०००<br>९,२१,५०० | पुस्तकी मुल्य<br>२०१७ – १८ चा घसारा | ८,४६,०००.<br>८४,६००. |
| इमारत विक्रीवर नफा | २८,५०० | पुस्तकी मुल्य | ७,६१,४०० |

## स्वाध्याय

### प्र.१ वस्तुनिष्ठ प्रश्न –

**अ) खालील प्रश्नांनी फक्त एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. घसारा म्हणजे काय?

२. घसारा का आकारला जातो?

३. संपत्तीचे अवशेष मुल्य म्हणजे काय?

४.. तोट्यावरती सुद्धा घसारा का आकारतात?

५. जेव्हा घसारा आकारतात तेव्हा कोणते खाते जमा करतात?

६. संपत्तीवरिल नफा किंवा तोटा कोठे स्थानांतरित करतात?

७. घसारा खात्याची शिल्लक कोठे स्थानांतरित करतात?

८. सरळ रेषा पद्धतीत घसारा आकारणीचे सूत्र सांगा.

९. स्थिर प्रभाग पद्धत म्हणजे काय?

१०. संपत्तीच्या स्थापनेवर खर्च केल्यास कोणते खाते नावे करतात?

## प्र.२ खालील विधानाकरिता शब्द / शब्दसमुह / संज्ञा सूचवा.

१. स्थिर संपत्तीच्या मुल्यात सतत हळू - हळू, कायम स्वरूपात होणारी घट.

२. संपत्तीची खरेदी किंमत आणि तीच्या प्रती स्थापनेकरिता केलेला खर्च इ.

३. स्थिर संपत्तीच्या आयुष्याअखेर तिच्या मोडीपासून अपेक्षित असणारे मुल्य.

४. संपत्तीचा असा काळ की ती चांगल्या अवस्थेत असते.

५. घसाऱ्याची अशी पद्धत की ज्यामध्ये घसाऱ्याची एकत्र राशि संपत्तीच्या आयुष्यात समान असते.

६. घसाऱ्याची अशी पद्धत की ज्यात घसाऱ्याचा दर स्थिर असतो परंतु घसाऱ्याची रक्कम हि वर्षा वर्षानंतर कमी होत जाते.

७. संपत्तीचा असा प्रकार की जीच्यावर घसारा आकारला जातो.

८. नवीन संपत्तीला कार्यन्वीत करण्यासाठी केलेला खर्च.

९. स्थिर संपत्तीच्या पुस्तकीमुल्याच्या पेक्षा जास्त किंमतीला केलेली विक्री.

१०. घसाऱ्याची अशी पद्धत ज्यात अवशेष मुल्य शुन्यापर्यन्त येवू शकत नाही.

## प्र.३ योग्य पर्याय निवडून संपूर्ण विधान पुन्हा लिहा.

१. स्थिर संपत्तीच्या मुल्यात होणारी घट म्हणजे .............

अ) घसारा  ब) योग्य मुल्यांकन  क) संयोजन  ड) वरिलपैकी नाही.

२. घसारा फक्त .................. संपत्तीवर आकारला जातो.

अ) स्थिर  ब) चालु  क) अनुत्पादक  ड) काल्पनिक

३. नविन यंत्राच्या स्थापनेकरिता केलेला खर्च म्हणजे ......... खर्च होय.

अ) महसूली  ब) भांडवली  क) आस्थागित महसूली  ड) उत्पन्न

४. स्थिर संपत्तीच्या मोडीपासून वसूल होणारे मुल्य म्हणजे .......... होय.

अ) पुस्तकी मुल्य  ब) अवशेष मुल्य  क) बाजार मुल्य  ड) मुळ किंमत

५. ........... या पद्धतीत घसाऱ्याची राशि दर वर्षाला कमी - कमी होत जाते.

अ) स्थिर प्रभाग पद्धत  ब) ऱ्हासमान शेष पद्धत

क) घसारा निधी पद्धत  ड) पुनर्मुल्यांकन पद्धत

६. ............. या पद्धतीत घसाऱ्याची राशि दरवर्षाला स्थिर असते.

अ) सरळ रेषा पद्धत  ब) ऱ्हासमान शेष पद्धत

क) पुनर्मुल्यांकन पद्धत  ड) विमापत्र पद्धत

७. .............. या खात्याला घसारा खात्याची शिल्लक स्थानांतरित करतात.

अ) उत्पादन खाते  ब) व्यापार खाते  क) नफा - तोटा खाते  ड) ताळेबंद

### प्र.४ खालील विधाने चुक की बरोबर ते सकारण सांगा.

१. घसारा फक्त स्थिर संपत्तीवर आकारला जातो.

२. घसाऱ्यामुळे संपत्तीचे मुल्य वाढते.

३. घसारा खात्याची शिल्लक नफा – तोटा खात्याला स्थानांतरित करतात.

४. स्थिर संपत्तीच्या विक्रीवरील नफा – तोटा फक्त घसारा आकारल्यानंतरच निश्चित केला जातो.

५. यंत्राच्या स्थापनेकरिता मजुरीचे शोधन मजुरी खात्याला नावे केले जाते.

६. संपत्ती उपयोगात नसल्यास घसारा आकारल्याची गरज नाही.

७. घसारा फक्त चालु / अस्थिर संपत्तीवर आकारला जातो.

८. जेव्हा व्यवसायात तोटा होतो, तेव्हा घसारा आकारण्याची गरज नाही.

### प्र.५ खालील वाक्ये पूर्ण करा.

१. घसारा ............ संपत्तीवर आकारला जातो.

२. संपत्तीच्या स्थापनेवरिल मजुरी हि ............. खात्याला नावे केली आहे.

३. .......... या पद्धतीत घसाऱ्याची राशि दरवर्षी बदलते.

४. घसारा = $\dfrac{\text{संपत्तीचे मुळ किंमत वजा ...................}}{\text{संपत्तीचे अनुमानित आयुष्य}}$

५. संपत्तीच्या मुल्यात हळु हळु व कायमस्वरूपी होणारी घट म्हणजे ........ होय.

६. स्थिर प्रभाग पद्धती दरवर्षी घसाऱ्याची रक्कम .............. असते.

७, संपत्तीची मुळ किंमत = ................... + स्थापनाखर्च

८. संपत्तीचे आयुष्य संपल्यानंतर तिच्या वसुलीपासकून मिळालेले मुल्य .......... होय.

९. घसारा खाते ................. खाते आहे.

१०. घसारा हा शब्द लॅटीन भाषेतील ....... या शब्दापासून बनला आहे.

### प्र.६ खालील विधानाशी तुम्ही सहमत की असहमत आहात ते सांगा.

१) घसारा हा वित्तीय खर्च नाही.

२) प्ऱ्हासन अधिक्य पद्धतीत घसाऱ्याचा वक्र क्ष अक्षला समांतर असतो.

३) घसाऱ्याचा दर हा स्थिर संपत्तीच्या आयुष्यावर आधारीत असतो.

४) मोडीची किंमत ही संपत्तीच्या वार्षिक घसाऱ्यावर परिणाम करीत नाही.

५) स्थिर संपत्तीवर घसारा आकारल्यास व्यवसायाची खरी व वास्तविक स्थिती निश्चित करता येते.

### प्र.७ खालील विधाने दुरुस्त करून पुन्हा लिहा.

१) संपत्तीच्या घटणाऱ्या किंमतीमुळे वार्षिक घसारा वाढतो.

२) सर्व संपत्तीवर घसारा आकारला जातो.

३) प्ऱ्हासन अधिक्य पद्धतीत घसारा संपत्तीच्या मूळ किंमतीवर आकारला जातो.

४) संपत्तीवर घसारा आकारल्यास संपत्ती खाते नावे करतात.

५) संपत्तीच्या विक्रीवरील नफा संपत्ती खात्याच्या जमा बाजूला लिहितात.

**प्र.८ खालील विधाने सोडवा.**

१) एका यंत्राचे परिव्यय मूल्य ₹ २३,००० असून त्याचे अनुमाणित आयुष्य ७ वर्ष आहे. शेवटी त्याच्या विक्रीपासून ₹ २,००० मिळतील असा अंदाज आहे. वार्षिक घसारा शोधून काढा.

२) एका संगणकाचे परिव्यय मूल्य ₹ ४०,००० आहे. त्यावर वार्षिक ८% दराने घसारा आकारण्यात येतो. घसाऱ्याची राशि शोधून काढा.

३) श्री 'क्ष' यांनी १ ऑक्टोबर २०१५ ला ₹ २,८०,००० फर्निचर खरेदी केले आणि त्याच्या स्थापनेवर ₹ २०,००० खर्च केला. ते ३१ मार्च २०१६ रोजी सरळ रेषा पद्धतीने ६% दराने घसारा आकारतात. घसाऱ्याची रक्कम शोधून काढा.

४) १ जानेवारी २०१६ रोजी सिताराम आणि कंपनी यांनी १ यंत्र ₹ २,००,००० ला खरेदी केले. ते दरवर्षी १०% दराने ३१ मार्चला ऱ्हासमान शेष पद्धतीने घसारा आकारतात. ३१ मार्च २०१७ रोजी यंत्राचे पुस्तकी मूल्य (WDV) शोधून काढा.

५) १ जुलै २०१६ रोजी रमाई आणि कंपनी यांनी एक यंत्र ₹ ७,००० ला विकले. जे यंत्र १ एप्रिल २०१५ रोजी ₹ १०,००० ला खरेदी केले होते. दरवर्षी ३१ मार्च ला त्यावर वार्षिक १०% घसारा आकारल्यानंतर त्यावरील नफा-तोटा शोधून काढा.

## स्थिर प्रभाग पद्धतीवरील उदाहरणे

१. नासिकच्या फरीद यांनी एक मोटारगाडी १ एप्रिल २०१५ रोजी ₹ ५५,००० खरेदी केली आणि सुरू करण्याकरिता ₹ ५,००० खर्च केला. मोटारीचे अनुमाणित आयुष्य १० वर्ष आहे, तिच्या मोडीपासून ₹ १०,००० मिळतील. असा अंदाज आहे.

**प्रत्येक वर्षी ३१ मार्चला खाते बंद होतात असे गृहीत धरून पहिल्या वर्षाकरिता मोटारगाडी खाते लिहून दाखवा.**

२. १ जानेवारी २०१७ रोजी, साई इंडस्ट्रीज नागपूर यांनी ₹ १,६५,००० चे यंत्र खरेदी केले त्यावर ₹ १५,००० स्थापनाखर्च केला. यंत्राचे अनुमाणित आयुष्य १० वर्ष आहे. आणि मोडीपासून ₹ ३०,००० मिळू शकतात. १ ऑक्टोबर २०१८ रोजी संपूर्ण यंत्र ₹ १,५०,००० ला विकण्यात आले.
**दरवर्षी ३१ मार्चला खाते बंद होतात असे गृहीत धरून वर्ष २०१६ – १७, २०१७ – १८ व २०१८ – १९ करिता यंत्र खाते व घसारा खाते लिहून दाखवा.**

३. शुभांगी ट्रेडींग कंपनी, डोंबिवली यांनी १ जानेवारी २०१६ रोजी ₹ ८६,००० ला एक यंत्र खरेदी केले व लगेच त्याच्या स्थापनेकरिता ₹ ४००० खर्च केला. १ ऑक्टोबर २०१६ रोजी रु, ४०,००० चे अतिरीक्त यंत्र खरेदी केले.

१ जानेवारी २०१६ रोजी खरेदी केलेले यंत्र निरूपयोगी झाल्यामुळे, १ ऑक्टोबर २०१७ रोजी ते ₹ ७०,००० ला विकले. व १ जुलै २०१७ रोजी एक नविन यंत्र ₹ ४५,००० ला खरेदी केले.

दरवर्षी ३१ मार्चला स्थिर प्रभाग पद्धतीर्षीक १२ % दराने घसारा आकारला जातो. पहिल्या तीन वर्षाकरिता यंत्र खाते तयार करून तीसऱ्या वर्षाशी संबंधित किर्दनोंदी घ्या. (वर्ष २०१७ – १८.)

४. त्रिवेणी ट्रेडर्स, रायगड यांनी १ जानेवारी २०१५ रोजी एक प्रकल्प (Plant) ₹ १२,००० ला खरेदी केला. आणि तिच्या प्रतिस्थापनेकरिता ₹ ३००० खर्च केला. १ जुलै २०१६ रोजी दुसरे प्रकल्प (Plant) ₹ २५,००० ला खरेदी करण्यात आले. १ एप्रिल २०१७ रोजी आणखी एक प्रकल्प ₹ २७,००० ला खरेदी करण्यात आले. आणि त्यांची स्थापना व मजुरी करीता ₹ २००० व वाहतुकखर्च ₹ १००० खर्च करण्यात आले.

दरवर्षी १०% सरळ रेषा पद्धतीने घसारा आकारण्यात येतो. ३१ मार्च २०१८ पर्यन्त प्रकल्प (Plant) खाते व घसारा खाते लिहुन दाखवा.

५. १ एप्रिल २०१६ रोजी समीर आणि कंपनी मुंबई यांनी एक यंत्र ₹ २,००,००० किंमतीस खरेदी केले. १ जुलै २०१७ रोजी आणखी जास्तीचे ₹ ४०,००० किंमतीचे यंत्र खरेदी केले.

३१ मार्च २०१९ ला कंपनीने १ जुलै २०१७ रोजी खरेदी केलेले यंत्र ₹ ३५,००० ला विकले. प्रत्येक वर्षी ३१ मार्च ला खाते बंद होते. कंपनी संपत्तीच्या मुळ किमतीवर वार्षिक १०% दराने घसारा आकारते.

३१ मार्च २०१६ – १७, २०१७ – १८ व २०१८ – १९ या वर्षाकरिता यंत्र खाते व घसारा खाते लिहून दाखवा.

६ समर्थ मॅन्युफॅक्चरींग कंपनी ली. औरंगाबाद यांनी एक नविन यंत्र ₹ ४५,००० ला १ जाने. २०१५ रोजी खरेदी केले व लगेच त्याच्या स्थापनेसाठी ₹ ५००० खर्च केला. त्याचवर्षी १ जुलै ला अतिरीक्त यंत्र ₹ २५,००० किमतीचे खरेदी केले. १ जुले २०१६ रोजी १ जाने २०१५ ला खरेदी केलेले यंत्र निकामी झाल्यामुळे ₹ ४०,००० ला विकले.
दरवर्षी ३१ मार्चला वार्षीक १०% दराने स्थिर प्रभाग पद्धतीने घसारा आकारण्यात येतो.

२०१४ – २०१५, २०१५ – १६ व २०१६ – १७ या कालवधीकरिता यंत्र खाते तुम्हास तयार करावयाचे आहे.

## प्ऱ्हासन अधिक्य पद्धतीवरिल उदाहरणे

१. १ ऑक्टोबर २०१५ रोजी मे. ओंकार एंटरप्राइझेस यांनी एक छपाई यंत्र ₹ ७५,००० ला घेतले आणि त्याच्या स्थापनेवर ₹ ५,००० खर्च केला. १ जानेवारी २०१७ रोजी आणखी एक छपाईयंत्र ₹ ४५,००० ला खरेदी केले. घसारा २०% दराने ऱ्हासमान शेष पद्धतीने दरवर्षी ३१ मार्चला आकारला जातो.

**पहिल्या चार वर्षाकरिता छपाई यंत्र खाते तयार करा. लेखापुस्तके दरवर्षी ३१ मार्चला बंद होतात.**

२. विशाल कंपनी, धुळे यांनी १ एप्रिल २०१६ रोजी एक यंत्र ₹ ६०,००० किंमतीचे खरेदी केले. १ ऑक्टोबर २०१७ रोजी त्यांनी त्याचपद्धतीने यंत्र ₹ ३०,००० किंमतीचे खरेदी केले आणि १ जुलै २०१८ रोजी ₹ २०,००० यंत्र खरेदी केले.

१ जानेवारी २०१९, ला त्यांनी १ एप्रिल २०१६ रोजी खरेदी केलेल्या यंत्रसामुग्री १/३ भाग / हिस्सा निकामी झाल्यामुळे ₹ १८,००० ला विकला असे गृहीत धरा. कंपनीची लेखापुस्तके दरवर्षी ३१ मार्चला यंत्र खाते लिहून तिसऱ्या वर्षाशी संबंधित किर्दनोंदी करा. घसारा घटत्या किंमतीवर (WDV) १० % दराने वार्षीक आकारला जातो.

३. १ एप्रिल २०१४ रोजी महेश ट्रेडर्स, सोलापूर यांनी ₹ २०,००० चे उपस्कर खरेदी केले. त्यावर्षी १ ऑक्टोबर जास्तीचे उपस्कर ₹ १०,००० चे खरेदी केले.

१ ऑक्टो २०१५ रोजी, १ एप्रिल २०१४ रोजी खरेदी केलेले उपस्कर ₹ १५,००० ला विकले. आणि त्याच दिवशी नविन उपस्कर ₹ २०,००० मुल्याचे खरेदी केले.

संस्था दरवर्षी वार्षीक १०% दराने ऱ्हासमान शेष पद्धतीने घसारा आकारते.

३१ मार्च २०१४ – १५, २०१५ – १६ व २०१६ – १७ या आर्थिक वर्षासाठी उपस्कर खाते व घसारा खाते तयार करा.

४. राधिका मसाले' अमरावती, यांनी १ जानेवारी २०१५ रोजी एक प्रकल्प (Plant) ₹ ८०,००० ला खरेदी केला. १ एप्रिल २०१६ एक नविन प्रकल्प (Plant) सुद्धा ₹ ६०,००० ला खरेदी केला व त्याच्या स्थापनेसाठी ₹ १०,००० खर्च केले. १ जानेवारी २०१७ रोजी पहिला प्रकल्प (Plant) ₹ ६०,००० ला विकला व त्याजागी ₹ २०,००० चा नविन प्रकल्प (Plant) खरेदी केला.

३१ मार्च २०१५, ३१ मार्च २०१६ व ३१ मार्च २०१७ ला संपणाऱ्या वर्षासाठी प्रकल्प लेखा (Plant Account) आणि घसारा लेखा तयार करा. घसारा वार्षीक १०% दराने ऱ्हासमान शेष पद्धतीने आकारला जातो.

५. १ एप्रिल २०१५ रोजी सुमन ट्रेडर्स यांनी एक यंत्र ₹ ३०,००० ला खरेदी केले. १ ऑक्टोबर २०१५ रोजी त्याच पद्धतीने दुसरे यंत्र ₹ २०,००० मुल्याचे खरेदी केले.

१ ऑक्टोबर २०१६ रोजी, १ एप्रिल २०१५ ला खरेदी केलेले यंत्र ₹ १,८०,००० ला विकले. आणि त्याजागी दुसरे यंत्र त्याच तारखेला ₹ १५,००० ला आणले.

यंत्रावर वार्षीक २०% दराने प्रऱ्हासन अधिक्य पद्धतीने घसारा आकारण्यात येतो. प्रत्येक वर्षी आर्थीक वर्ष ३१ मार्चला समाप्त होते. वर्ष २०१५ – १६, २०१६ – १७ व २०१७ – १८ या वर्षाकरिता यंत्र खाते व घसाार खाते तयार करा.

**कृती करा –**

१. कोणत्याही व्यवसायिक संस्थेला भेट द्या.आणि त्यांच्या संस्थेत ज्या संपत्तीवर घसारा आकारण्यात येतो त्यासंबंधी माहिती गोळा करा.

२. कोणत्याही व्यापारी संस्थेला सनदी लेखापाल (C. A) कार्यालयाला भेट द्या. व ते घसाार आकारण्यासाठी कोणत्या पद्धती व दरांचा प्रत्यक्ष उपयोग करतात त्यासंबंधीची माहिती गोळा करा.

३. वैदेही आणि कंपनी भांडुप, यांनी विविध तारखेला खालील पाच संगणके खरेदी केली.

१ एप्रिल २०१५ – ₹ १,१०,०००   १ जुलै २०१५ – ₹ ३०,०००

३० सप्टेंबर २०१५ – ₹ ८०,०००   १ जानेवारी २०१६ – रु ५०,०००

३१ मार्च २०१६ – ₹ ४०,०००

वरिल पाचही संगणकावर ३१ मार्च २०१६ ला संपणाऱ्या वर्षाकरिता वार्षिक १०% दराने घसाऱ्याची राशि काढून दाखवा.

४. राजीव इंडस्ट्रीज, चिपळूण यांनी १ जुलै २०१६ रोजी ₹ ४०,००० किमतीचे यंत्र खरेदी केले. घसाऱ्याचा दर वार्षीक १२% पहिल्या तीन वर्षाकरिता स्थिर प्रभाग पद्धत व प्रऱ्हासन अधिक्य पद्धतीने घसाऱ्याची राशि काढून दाखवा.

५. घरगुदी उपकरणे, विद्युत उपकरणे, मोबाईल, धुलाईयंत्र अशी इतर कोणती संपत्ती ज्यावर अधिक दराने घसारा आकारण्यात येतो, तुलना करा.

# 8 चुकांची दुरूस्ती (Rectification of Errors)

**घटक**

*८.१ चुकांचे अर्थ आणि त्यांचे परिणाम*
*८.२ चुकांचे प्रकार*
*८.३ चुका शोधून त्या दुरुस्त करणे*
*८.४ निलंबित खाते तयार करणे.*

**क्षमता विधाने :**

- *विद्यार्थ्यांना चुकांच्या दुरूस्तीचा अर्थ आणि परिणामांचे आकलन होते.*
- *विद्यार्थ्यांना चुकांचे प्रकार व त्यांची उदाहरणे समजतात.*
- *विद्यार्थी चुकांचा शोध व दुरूस्ती करतो.*
- *विद्यार्थी निलंबित खात्याचा अर्थ आणि फायदे समजतो.*
- *विद्यार्थी निलंबित खाते तयार करू शकतो.*

## ८.१ प्रस्तावना आणि अर्थ :

मागील प्रकरणात आपण हे शिकलो की, तेरीज हे लेखापुस्तकामध्ये नोंदविलेल्या व्यवहारांची अंकगणितीय अचूकता तपासण्यासाठी तयार केली जाते. तेरीज पत्रक जुळल्यास करण्यात आलेल्या नोंदी, खतावणी आणि काढलेली शिल्लक बरोबर आहे असे मानण्यास हरकत नाही. परंतु तेरीजपत्रक अंशतः जुळत नसेल तर जमा खर्चाच्या नोंदी लिहिण्यात चुका झाल्या आहेत हे निश्चित असते.

**चुका**
**नावे आणि जमा बाजू जुळत नसेल? का?**

| नावे (₹) | जमा (₹) |
|---|---|
| | ५०० |
| १,२०० | १,५०० |

लेखापुस्तकात / खाते वहीत जेव्हा एकही चुक नसते तेंव्हा अचूकतेची खात्री वाटते. अचूकतेची खात्री करण्यासाठी खाते पुस्तिकातील चुका ओळखणे आणि त्यांची दुरूस्ती करणे गरजेचे असते. अनेक व्यवसायिक सामान्य लेखांकन प्रणालीतून संगणकीय प्रणालीमध्ये व्यवहार नोंदवितात यामुळे लेखांकनाच्या नोंदी मध्ये होणाऱ्या चुका टाळता येतात. म्हणून लेखांकनात आढळणाऱ्या चुका शोधून व त्यांची दुरूस्ती करून व्यवसायाला होणारा अचूक नफा किंवा तोटा आणि व्यवसायाची आर्थिक स्थिती जाणून घेता येते.

**चुकांची कारणे**

लेखांकनाच्या ज्ञानाचा अभाव

चुकीची माहिती संकलन

चुकीची नोंद

अंकगणितीय गणना चुकीची

**दुरूस्तीची गरज / आवश्यकता :**

१. लेखांकनाच्या अचूक नोंदी करण्यासाठी


२. नफा / तोटा खात्यात अचूक रक्कमा लिहून अचूक / सत्य नफा तोटा खाते तयार करण्यासाठी

३. व्यवसायाची सत्य / अचूक आर्थिक स्थिती जाणून घेण्यासाठी व बिनचूक ताळेबंद करण्यासाठी

**चुकांचे प्रकार / वर्गीकरण :**

ज्या वेळी खाते पुस्तकात / लेखा पुस्तकात आर्थिक व्यवहार नोंदविताना काही चुका होत असतात आणि त्या चुका काही काळांनतर दुरूस्त केल्या जातात. झालेल्या चुका आणि त्यांचे स्वरूप आणि वर्गीकरण खालील चार प्रकारे केले जाऊ शकते.

**चुकांचे प्रकार**



१) **विसरचुका (लोप विभ्रम चुका):** खाते पुस्तकात व्यवहार नोंदविताना अशा प्रकारच्या चुका अंशतः किंवा पूर्णपणे वगळण्यात येतात. उदा. उधार खरेदी रद्द झाल्यास या चुकीचा परिणाम म्हणजे धनकोचे खाते जमा किंवा खरेदी खाते नावे असा दिसून येईल. सर्व प्रकारच्या चुका तेरीजपत्रकात परिणाम करत नाही आणि अशा चुका शोधून काढणे हे तेरीजला शक्य नाही.

अशा चुकांचे प्रकार पडतात :

१) पूर्ण विसर चुकांचा तेरीज पत्रकावर परिणाम दिसून येत नाही.

२) अपूर्ण अंशतः विसर चुकांचा तेरीज पत्रकावर परिणाम दिसून येतो.

| चुकांचे प्रकार आणि अर्थ | चुकांचे उपप्रकार उदाहरणासहित |
|---|---|
| **१)** विसरचुका (लोप विभ्रमचुका) खाते पुस्तकात/ लेखापुस्तकात पूर्णतः किंवा अंशतः अशा प्रकारच्या चुका होतात. | **अ) पूर्णतः विसरचुका :** आदित्यला उधारीवर माल विकला परंतु त्याची नोंद विक्री पुस्तकात केलेली नाही. |
| | **ब) अंशतः विसर चुका :** आदित्यला विक्री केलेल्या मालाची नोंद विक्री खात्यात जमा बाजूला केली परंतु आदित्यच्या खात्यात स्थानांतरित केली नाही. म्हणजे विक्री खाते जमा केले परंतु आदित्यचे खाते नावे केले नसेल. तर ह्या चुकाचे परिणाम तेरीज पत्रकात दिसतील. |

२) **लेख विभ्रम चुका:** अशा प्रकारच्या चुका खात्यात नोंदी करतांना चुकीची नोंद, चुकीच्या बेरजा किंवा शिल्लक काढतांना किंवा रक्कमा लिहितांना सहाय्यक लेखा पुस्तकात किंवा व्यवहारांची मुळ नोंद करतांना होतात. अशा प्रकारच्या चुका तेरीज पत्रकावर परिणाम करतात.

**लेख विभ्रम चुकांचे वर्गीकरण खालील प्रमाणे करता येतील :**

१) नोंदवितांना होणाऱ्या चुका. २) बेरजा करतांना होणाऱ्या चुका.

३) स्थानांतरित करतांना होणाऱ्या चुका. ४) खतावणी करतांना होणाऱ्या चुका

| चुकांचे प्रकार आणि अर्थ | चुकांचे उपप्रकार उदाहरणासहित |
|---|---|
| **३) लेख विभ्रम चुका :** अशा चुका खात्यात नोंदी करतांना, चुकीची नोंद, चुकीच्या बेरजा, शिल्लक काढतांना किंवा रक्कम लिहितांना सहाय्यक पुस्तकात खतावणी करतांना किंवा स्थानांतरित करतांना दिसून येतात. | **अ) मुळ नोंदी पुस्तकात करतांना होणाऱ्या चुका** चैतन्यकडून ₹ ८५०/- चा माल खरेदी केला. परंतु खरेदी पुस्तकात नोंद करतांना ₹ ५८०/- ची नोंद करण्यात आली. (अशा चुकांचा तेरीज पत्रकावर कोणताच परिणाम होत नाही कारण खरेदी खाते आणि चैतन्यचे खाते एकाच / समान रक्कमेने नोंदविलेले आहे.)<br>**ब) सहाय्यक पुस्तकाची चुकीची बेरीज :** **उदा.** खरेदी पुस्तकाची बेरीज ₹ ५०० /- ने कमी दिसून येते. खरेदी खात्यात नावे बाजूला ₹ ५००/- ने घट करून तेरीज पत्रकाच्या नावे बाजुने सुध्दा ₹ ५००/- कमी दिसतील. |

| | |
|---|---|
| | **क) खाते पुस्तकाची संतुलन करतांना बेरजेत होणाऱ्या चुका :**<br>उदा. धनकोचे खाते ₹ ७००/- ने कमी दिसते म्हणून तेरीज पत्रकात जमा बाजू ₹ ७००/- कमी दिसेल.<br>**ड) खतावणी करतांना होणाऱ्या चुका :**<br>(१) खतावणी योग्य खात्याच्या चुकीच्या बाजूला रोहनला ₹ ९०० चा माल विकला. खात्यात नावे बाजूला करण्याऐवजी जमा बाजूला करण्यात आली.<br>(२) चुकीच्या रक्कमेने खतावणी<br>(३) एकाच खात्यात दोन वेळेस खतावणी<br>(४) नोंदीची खतावणी करतांना चुकीच्या खात्याला पण योग्य बाजूला खतावणी केल्यास त्याचा परिणाम तेरीजपत्रकावर होत नाही.<br>**ई) चुका पुढे नेणे :**<br>खरेदी पुस्तकाची बेरीज ₹ १,५००/- होते खरेदी पुस्तकातील ₹ १,२५०/- ची शिल्लक ₹ २५०/- कमी करून तेरीजपत्रकात नावे बाजूला दाखविली. आणि ती सुध्दा तेरीज मधून वजा केली. |

**३) सैध्दांतिक चुका :**

व्यवहाराच्या  नोंदी करतांना लेखांकिय तत्वांचे उल्लंघन झाल्यास ज्या चुका होतात त्यांना सैध्दांतिक चुका असे म्हणतात. किंवा लेखांकनाच्या तत्वानुसार व्यवहाराची नोंद केली जात नाही. अशा चुकांना सैध्दांतिक चुका म्हणतात. खर्च किंवा उत्पनाचे भांडवली स्वरूप आणि महसूली स्वरूपाचे वर्गीकरण करतांना चुकीचे वर्गीकरण झाले असल्यास. उत्पन्न, संपत्ती आणि देयता मध्ये रक्कम योग्य बाजूला लिहिली असेल आणि चुकीच्या खात्यात खतावणी केल्यास असा चुकांचा तेरीजपत्रकावर कोणताही परिणाम होत नाही.

| चुकांचे प्रकार आणि अर्थ | उपप्रकार उदाहरणासहित |
|---|---|
| **३) सैध्दांतिक चुका :**<br>(ज्या चुका लेखांकिय तत्वांचा / नियमांचा उल्लंघन होण्यास कारणीभूत ठरतात. | **अ) भांडवल स्वरूपाच्या खर्चांना महसूली खर्च समजल्यास**<br>**उदा.** नवीन यंत्र स्थापनेकरिता दिलेली मजुरी यंत्रखात्यात नावे करण्याऐवजी मजुरी खाते नावे केली.<br>**ब) महसूली स्वरूपाचे खर्चांना भांडवली स्वरूपाचे खर्च समजल्यास**<br>उदा. जुन्या यंत्राची दुरूस्तीसाठी दिलेली ₹ ५०० /- ची नोंद दुरूस्ती खर्च खात्यात नावे करण्याऐवजी यंत्र खात्यात नावे केली. |

४) **भरपाईच्या चुका :** भरपाईच्या चुका म्हणजे अशी चुक की जी एका बाजूची चूक किंवा चुकांची भरपाई दुसऱ्या बाजूवरील चूक किंवा चुका भरून काढतात. एक किंवा अनेक रकमेची चूक विरूध्द बाजूला भरून काढते अशी चूक म्हणजे भरपाईची चूक होय. या चूकीचा परिणाम तेरीज पत्रकाच्या जुळवणीवर होत नाही.

| अर्थासहीत चुकाचे प्रकार | उदाहरणासहित उपप्रकार |
|---|---|
| **४) भरपाईच्या चुका :**<br>दोन किंवा दोन पेक्षा जास्त चुका आढळतात अशा चुकांचा शुध्द परिणाम खात्याच्या नावे आणि जमा बाजूला निरंक दिसून येतो. | **अ) उदा.**<br>१० मे २०१६ रोजी अशोकला ₹ ३,००० /- दिले याची खतावणी अशोक खात्यात ₹ ३०० /- रक्कमेने नावे करण्यात आली. २० मे २०१६ रोजी कुमारला ₹ ३००/- दिले याची खतावणी त्यांच्या खात्यात नावे बाजूला ₹ ३,०००/- अशी दाखविण्यात आली. या ठिकाणी शुध्द फरक शून्य दिसेल. |

एक तर्फी चुका, दुतर्फी चुका असे सुद्धा चुकांचे वर्गीकरण करण्यात येते. तेरजेच्या नियमानुसार एकतर्फी चुकांचे परिणाम फक्त एकाच खात्यावर होतो. अशा चुका दुरूस्त करण्यासाठी खाते त्याच्या नावे किंवा जमा बाजुला लिहिल्या जातात. तेरीज तयार करण्यापुर्वी या चुका शोधून काढल्या जातात. तेरीज तयार केल्यानंतर जर एकतर्फी चुका आढळून आल्या तर त्याची दुरूस्ती निलंबित खात्याचा वापर करून केली जाते.

दुतर्फी चुकांचा परिणाम दोन किंवा त्यापेक्षा अधिक खात्यावर होतो. आणि याचा कोणताही परिणाम तेरीजपत्रकावर होत नाही. रोजकिर्दीतील नोंदीच्या आधारे या चुका दुरूस्त केल्या जातात.

**टीप :** दुरूस्तीच्या नोंदी रोजकिर्द मध्ये नोंदवाव्यात.

### उदाहरणे

१) अनिल ॲण्ड सन्स् च्या पुस्तकात तेरीज पत्रक तयार करण्यापूर्वीच चूका आढळून आल्यास त्यांची दुरूस्ती करा.

१) आर्यन यांना ₹ २,००० /- चा माल उधारीवर विकला परंतु या व्यवहाराची नोंद विक्री पुस्तकात केली नाही.

२) यंत्र दुरुस्तीसाठी केलेला ₹ ६०० /- चा खर्च चुकून यंत्र खात्यावर नोंदविण्यात आला.

३) श्रीकांत यांना वेतनाबद्दल दिलेले ₹ २,५००/- चुकीने लेखा पुस्तकामध्ये वैयक्तीक खात्यात दाखविण्यात आले.

दुरुस्त नोंद = विरुद्ध नोंद + बरोबर नोंद

**कार्य टिप :**

| अ. क्र. | चुकीची नोंद | विरूध्द नोंद | बरोबर नोंद | दुरूस्तीची नोंद |
|---|---|---|---|---|
| १ | निरंक<br>(पूर्ण निसर चूक) | निरंक | आर्यन खाते नावे २,०००<br>विक्री खात्याला २,००० | आर्यन खाते नावे २,०००<br>विक्री खात्याला २,००० |
| २ | यंत्र खाते नावे ६००<br>रोख खात्याला ६०० | रोख खाते नावे ६००<br>यंत्र खात्याला ६०० | दुरूस्ती खाते नावे ६००<br>रोख खात्याला ६०० | दुरूस्ती खाते नावे ६००<br>यंत्र खात्याला ६०० |
| ३ | श्रीकांत खाते नावे २,५००<br>रोख खात्याला २,५०० | रोख खाते नावे २,५००<br>श्रीकांत खात्याला २,५०० | वेतन खाते नावे २,५००<br>रोख खात्याला २,५०० | वेतनखाते नावे २,५००<br>श्रीकांत खात्याला २,५०० |

उत्तर :

**अनिल ॲण्ड सन्स् ची रोजकिर्द**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १) | आर्यन खाते नावे<br>विक्री खात्याला.........<br>(आर्यन ला विकलेल्या मालाची नोद विक्री पुस्तकात केलेली नाही ही चूक दुरूस्ती बद्दल) | | २,००० | २,००० |
| २) | दुरूस्ती खर्च खाते नावे<br>यंत्र खात्याला.........<br>(यंत्र खात्यात नावे झालेली चुकीची नोंद दुरूस्ती केल्याबद्दल) | | ६०० | ६०० |
| ३) | वेतन खाते नावे<br>श्रीकांत खात्याला.........<br>(श्रीकांत खात्याच्या नावे बाजूला झालेली वेतनाची नोंद दुरूस्त केल्याबद्दल) | | ४५० | ४५० |

**२) श्री. आनंदच्या पुस्तकात आढळून आलेल्या चुकांची दुरूस्ती करा.**

१) ₹ २,००० /- ला विक्री केलेले जुने उपस्कर, मालाची विक्री समजण्यात आली.

२) श्री. रोहितला दिलेले वेतनाचे ₹ १५,०००/- त्याच्या वैयक्तिक खात्यात नावे दाखविण्यात आले.

३) व्यवसायाच्या मालकाने खाजगी उपयोगासाठी व्यापारातून उचल केलेले ₹ ७,०००/- व्यापार खर्चाच्या नावे टाकले.

४) श्री. सावंतकडुन प्राप्त झालेले ₹ ५००/- श्री. शिंदेच्या खात्यात जमा दाखविले.

५) दुरूस्ती खर्च ₹ ५००/- इमारत खात्यास नावे दिले गेले.

६) व्याजाबद्दल ₹ १,५००/- मिळाले पण त्याची नोंद वर्तन खात्यात जमा केली.

७) ₹ ५,००० /- चे छपाई यंत्राबद्दल दिले, परंतु ते कार्यालय खर्च म्हणून समजण्यात आले.

**कार्य टीप** : दुरुस्त नोंद = विरुद्‌ध नोंद + बरोबर नोंद

| अ. क्र. | चुकीची नोंद (₹) | | | विरूद्‌ध नोंद (₹) | | | बरोबर नोंद (₹) | | | दुरूस्तीची नोंद (₹) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रोखखाते<br>विक्री खात्याला | नावे | २,०००<br>२,००० | विक्री खाते<br>रोख खात्याला | | २,०००<br>२,००० | रोख खाते<br>उपस्कर खात्याला | नावे | २,०००<br>२,००० | विक्री खाते<br>उपस्कर खात्याला | नावे | २,०००<br>२,००० |
| २ | श्री. रोहित खाते<br>रोख खात्याला | नावे | १५,०००<br>१५,००० | रोख खाते<br>श्री. रोहित खात्याला | नावे | १५,०००<br>१५,००० | वेतन खाते<br>रोख खात्याला | नावे | १५,०००<br>१५,००० | वेतन खाते<br>श्री. रोहित खात्याला | नावे | १५,०००<br>१५,००० |
| ३ | व्यापार खर्च खाते<br>रोख खात्याला | नावे | ७,०००<br>७,००० | रोख खाते<br>व्यापार खर्च खात्याला | नावे | ७,०००<br>७,००० | उचल खाते<br>रोख खात्याला | नावे | ७,०००<br>७,००० | उचल खाते<br>व्यापार खर्च खात्याला | नावे | ७,०००<br>७,००० |
| ४ | रोख खाते<br>श्री. शिंदे खात्याला | नावे | ५००<br>५०० | श्री. शिंदे खाते<br>रोख खात्याला | नावे | ५००<br>५०० | रोख खाते<br>सावंत खात्याला | नावे | ५००<br>५०० | श्री. शिंदे खाते<br>श्री. सावंत खात्याला | नावे | ५००<br>५०० |
| ५ | इमारत खाते<br>रोख खात्याला | नावे | ५००<br>५०० | रोख खाते<br>इमारत खात्याला | नावे | ५००<br>५०० | दुरूस्ती खाते<br>रोख खात्याला | नावे | ५००<br>५०० | दुरूस्ती खाते<br>इमारत खात्याला | नावे | ५००<br>५०० |
| ६ | रोख खाते<br>वर्तन खात्याला | नावे | १,५००<br>१,५०० | वर्तन खाते<br>रोख खात्याला | नावे | १,५००<br>१,५०० | रोख खाते<br>व्याज खात्याला | नावे | १,५००<br>१,५०० | वर्तन खाते<br>व्याज खात्याला | नावे | १,५००<br>१,५०० |
| ७ | कार्यालय खर्च खाते<br>रोख खात्याला | नावे | ५,०००<br>५,००० | रोख खाते<br>कार्यालय खर्च खात्याला | नावे | ५,०००<br>५,००० | संगणक खाते<br>रोख खात्याला | नावे | ५,०००<br>५,००० | संगणक खाते<br>कार्यालय खर्च खात्याला | नावे | ५,०००<br>५,००० |

उत्तर :

**आनंद अँड सन्सच्या पुस्तकात**
**रोजकिर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| (१) | विक्री खाते .................... नावे<br>उपस्कर खात्याला..........<br>(उपस्कर विक्रीची नोंद चुकून वस्तूविक्री म्हणून करण्यात आली होती ती दुरूस्त केल्याबद्दल) | | २,००० | २,००० |
| (२) | वेतन खाते .................... नावे<br>रोहित खात्याला..........<br>(रोहितला दिलेले वेतन त्याच्या वैयक्तीक खात्याला नावे करण्यात आले होते त्याची दुरूस्ती केल्याबद्दल) | | १५,००० | १५,००० |
| (३) | उचल खाते .................... नावे<br>व्यापार खर्च खात्याला..........<br>(खाजगी उपयोगासाठी उचलण्यात आलेली रकमेची नोंद चुकीने व्यापार खर्च खात्यात केली होती त्याची दुरूस्ती केल्याबद्दल) | | ७,००० | ७,००० |
| (४) | श्री. शिंदे खाते .................... नावे<br>श्री. सावंत खात्याला..........<br>(सावंतकडून मिळालेल्या रकमेची नोंद चुकीने शिंदेच्या नावाने केली होती त्याची दुरूस्ती केल्याबद्दल) | | ५०० | ५०० |
| (५) | दुरूस्ती खाते .................... नावे<br>इमारत खात्याला..........<br>(इमारत दुरूस्ती साठी दिलेले खर्च इमारत खात्याला नावे टाकण्यात आले होते त्याची दुरूस्ती केल्याबद्दल) | | ५०० | ५०० |
| (६) | वर्तन खाते .................... नावे<br>व्याज खात्याला..........<br>(प्राप्त व्याज वर्तन खात्याला लिहिले होते त्याची दुरूस्ती केल्याबद्दल) | | १,५०० | १,५०० |
| (७) | संगणक खाते .................... नावे<br>कार्यालय खर्च खात्याला..........<br>(खरेदी केलेल्या संगणकाची नोंद कार्यालय खर्च खात्याला नावे केले होते त्याची दुरूस्ती केल्याबद्दल) | | ५,००० | ५,००० |

## ८.३ चुकांची दुरूस्ती आणि त्याचा शोध :

**चुका शोधण्याच्या पायऱ्या :**


चुका शोधून काढल्या तर त्या चुकांची दुरूस्ती करणे सामान्यतः अनिवार्य आहे. खालील पैकी कोणत्याही एका ठिकाणी चुका लक्षात येऊ शकतात.

**पायरी १) –** तेरीजपत्रक तयार करण्यापूर्वी

**पायरी २) –** तेरीजपत्रक तयार झाल्यानंतर परंतु अंतिम लेखे तयार करण्यापूर्वी

**पायरी ३) –** अंतिम लेखे तयार झाल्यानंतर

**चुकांचे परिणाम**




## उदाहरणे

**उदाहरण क्र. १ :**

**खालील लेखांकनाच्या चुकांची दुरूस्ती करा.**

१) वैष्णवी यांना ₹ १५,००० /– च्या मालाची विक्री केली. पण त्याची नोंद विक्री पुस्तकात करण्यात आली नाही.

२) लेखापाल वरूण दास यांना ₹ ९,०००/– वेतन दिले त्याची नोंद त्यांच्या वैयक्तिक खात्यास करण्यात आली.

३) ₹ ३,५००/– ला जुने उपस्कर विकले त्याची नोंद विक्री पुस्तकात झाली.

४) यंत्रखरेदी करतांना वाहतुक खर्च दिला ₹ ५००/– पण त्याची नोंद वाहतुक खर्च खात्यात नावे केली.

५) आदित्य वर्मा यांना ₹ ४५,०००/– रोख दिले परंतु कुमार वर्माचे खाते नावे करण्यात आले.

**रोजकिर्द नोंदी**

| अ. क्र. | तपशील | खा. पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| (१) | वैष्णवी खाते............ नावे<br>विक्री खात्याला .............<br>(वैष्णवी यांना विकलेल्या मालाची नोंद विक्री पुस्तकात न केल्याबद्द्ल चुकीची दुरूस्ती) | | १५,००० | १५,००० |
| (२) | वेतन खाते............ नावे<br>वरूण दास खात्याला .............<br>(वरूणदासला दिलेले वेतन त्याच्या वैयक्तीक खात्यास नावे केले होते ते बरोबर केल्याबद्द्ल) | | ९,००० | ९,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (३) | विक्री खाते............ नावे<br>उपस्कर खात्याला .............<br>(विकलेले उपस्कर चुकून विक्री खात्यात नोंदविले होते ते बरोबर केल्याबद्दल) | | ३,५०० | ३,५०० |
| (४) | यंत्र खाते............ नावे<br>वाहतुक खर्च खात्याला .............<br>(यंत्राच्या खरेदीवरील वाहतुक खर्च, वाहतुक खर्च खात्यात नावे केला होता ती नोंद दुरूस्त केल्याबद्द्ल) | | ५०० | ५०० |
| (५) | आदित्य वर्माचे खाते............ नावे<br>कुमार वर्मा खात्याला .............<br>(आदित्य वर्माला दिलेली राशी चुकून कुमार वर्माच्या खात्याला नावे करण्यात आली होती ती दुरूस्त केल्याबद्द्ल) | | ४५,००० | ४५,००० |

**उदाहरण क्र. २ :**

**खालील चुकांची दुरुस्ती करा.**

१) विक्री परत पुस्तकाची बेरीज २०० ₹ ने जास्त घेतली.

२) श्री. अमीत यांना भाड्याबद्दल दिलेले ₹ ८०० त्यांच्या वैयक्तिक खात्यास नावे करण्यात आले.

३) श्री. अभिराज यांना ₹ ३५० चा माल विकला परंतु त्याची नोंद खरेदी पुस्तकात ५३० ₹ अशी करण्यात आली.

४) उपस्कर दुरूस्तीचा खर्च ₹ ३०० ची नोंद उपस्कर व अन्वायुक्ती खात्यात नावे केली.

५) प्राप्तवर्तन ₹ २०० ची खतावणी वर्तन खात्यात नावे बाजुला केली.

६) श्री. राम यांना दिलेला ₹ ३०० च्या धनादेशाची नोंद चुकून रोख पुस्तकाच्या रोख रकान्यात केली.

**रोजकिर्द नोंदी**

| अ. क्र. | तपशील | खा. पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| (१) | या व्यवहाराची रोजकिर्द नोंद होणार नाही कारण याचा परिणाम केवळ एकाच खात्यावर झालेला आहे. यामध्ये विक्री परत खात्याला ₹ २०० जादा नावे दिले गेले आहेत. त्यामुळे हि चूक दुरूस्त करण्यासाठी विक्री परत खात्याला ₹ २०० जमा करावे. | | | |
| (२) | भाडेखाते .............. नावे<br>श्री. अमीतच्या खात्याला................<br>(भाड्याची रक्कम अमीतच्या वैयक्तिक खात्यात नावे टाकली होती, ती दुरूस्त केल्याबद्ल) | | ८०० | ८०० |
| (३) | अभिराज खाते .............. नावे<br>खरेदी खात्याला.................<br>विक्री खात्याला.....................<br>(श्री. अभिराजला विकलेल्या ₹ ३५० उधार मालाची नोंद चुकून खरेदी पुस्तकात ₹ ५३० ने केल्याची दुरूस्ती केल्याबद्दल) | - | ८८० | ५३०<br>३५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (४) | दुरूस्ती खाते ............. नावे<br>उपस्कर व अन्वायुक्त खात्याला<br>(उपस्कर दुरूस्तीचा खर्च, उपस्कर व अन्वयुक्त खात्यास नावे केला त्या दुरूस्तीबद्दल) | | ३०० | ३०० |
| (५) | या व्यवहाराची रोजकिर्द नोंद होणार नाही कारण याचा परिणाम केवळ एकाच खात्यावर झालेला आहे. यामध्ये प्राप्त वर्तन खतावणीमध्ये वर्तन खात्याला नावे टाकण्यात आले आहे. त्यामुळे चुक दुरूस्त करण्यासाठी वर्तन खात्याला ₹ ४०० जमा करावे. | | | |
| (६) | रोख खाते ............. नावे<br>बँक खात्यात<br>(धनादेश शोधनाची रक्कम चुकन रोख पुस्तकात रोख रकान्यात करण्यात आलेल्या चुकीच्या दुरूस्ती बद्दल) | | ३२० | ३२० |

**उदाहरण क्र. ३ :**

**खाली चुकांच्या दुरूस्ती करा.**

१) विक्री परत पुस्तकाची बेरीज ₹ ८०० /- ने जास्त लिहिली.
२) कारखाना विज देयक ₹ ७,०००/- दिले, परंतु या व्यवहाराची लेखापुस्तकात नोंद दोनदा करण्यात आली
३) विक्री पुस्तकाची बेरीज ₹ ९००/- कमी लिहिण्यात आली.
४) भाडे दिले ₹ ८२५/- ही नोंद चुकीने भाडे खात्यास ₹ ३२५/- करण्यात आली.
५) इमारत विस्तार करण्यासाठी देण्यात आलेली ₹ ९,९००/- मजूरीची नोंद मजूरी खात्यास करण्यात आली.
६) यंत्र खरेदी प्रसंगी देण्यात आलेल्या वाहतुक खर्चाची नोंद ₹ २,०००/- वाहतुक खर्च खात्यास करण्यात आली.
७) व्यवसाय मालकाच्या जीवन विमा प्रव्याजीची रक्कम ₹ १,५००/- देण्यात आली. पण ती विमा खात्यास नावे दिली.

**रोजकिर्द नोंदी**

| अ. क्र. | तपशील | खा. पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| (१) | कोणतीही नोंद होणार नाही कारण केवळ एकाच खात्यावर परिणाम झाला, विक्री परत खाते ₹ ८००/- जमा करावे. | | | |
| (२) | रोख खाते ............ नावे<br>कारखाना विजदेयक खात्याला<br>कारखाना विज देयक दिल्याची नोंद दोन वेळी करण्यात आल्याची चुक दुरूस्ती केल्याबद्दल | | ७,००० | ७,००० |
| (३) | कोणतीही नोंद होणार नाही कारण केवळ एकाच खात्यावर परिणाम झाला, विक्रीखाते ₹ ९००/- जमा करावे. | | | |
| (४) | कोणतीही नोंद होणार नाही कारण भाडे खाते हे ₹ ५००/- नावे करण्यात यावे. | | | |
| (५) | इमारत खाते ............ नावे<br>मजूरी खात्याला<br>इमारत खात्याऐवजी चुकीने मजुरी खाते नावे केल्याने दुरूस्ती केल्याबद्दल | | ९,९०० | ९,९०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (६) | यंत्र खाते ............ नावे<br>वाहतुक खर्च खात्याला<br>वाहतुक खर्च नावे केल्याची चुकीची नोंद दुरूस्त करून यंत्र खाते नावे केल्याबद्दल | | २,००० | २,००० |
| (७) | आहरण / उचल खाते ............ नावे<br>विमा खात्याला<br>उचल खाते नावे करण्याऐवजी विमा खाते नावे करण्यात आलेली दुरूस्ती केल्याबद्दल | | १,५०० | १,५०० |

**उदाहरण क्र. ४ :**

**खालील चुका दुरूस्त करा :**

१) वैशाली ट्रेडर्स कडून ₹ ७,५०० /– चा माल उधारीने खरेदी करण्यात आला परंतु खरेदीची नोंद पुस्तकात करण्यात आली नाही.

२) ₹ २,०००/– चा खरेदी केलेला माल परत पाठविला, त्याची नोंद पुस्तकात करण्यात आली नाही.

३) अंजली ट्रेडर्स ला उधार विक्री केलेल्या ₹ ३,००० /– ची मालीची नोंद चुकून विक्री पुस्तकात ₹ ३०० /– ने करण्यात आली.

४) सुमीत आणि कंपनी कडून परत आलेला ₹ २,०००/– माल संवरण स्कंधात समाविष्ट असून त्याची नोंद कोणत्याच पुस्तकात केली नाही.

५) ₹ १,२००/– च्या मालखरेदीची नोंद खरेदी पुस्तकात ₹ १२,०००/– करण्यात आली.

६) निताला विक्री केलेल्या मालाची बिजकात ₹ २००/– ने किंमत जास्त दाखविण्यात आली.

**किर्दनोंदी**

| अ. क्र. | तपशील | खा. पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| (१) | खरेदी खाते ............ नावे<br>वैशालीच्या खात्याला<br>(वैशालीकडून खरेदी केलेल्या उधार खरेदीची नोंद विसर चुकीमुळे घेतली नव्हती ती नोंद केल्याबद्दल) | | ७,५०० | ७,५०० |
| (२) | धनकोचे खाते ............ नावे<br>खरेदी परत खात्याला<br>(खरेदी परतीची ₹ २,०००/– ची न केलेली नोंद केल्याबद्दल) | | २,००० | २,००० |
| (३) | अंजली ट्रेडर्स खाते ............ नावे<br>विक्री खात्याला<br>(अंजली ट्रेडर्सला विकलेल्या ₹ ३,०००/– च्या मालाची नोंद ₹ ३००/– ने केल्याबद्दल) | | २,७०० | २,७०० |
| (४) | विक्री परत खाते ............ नावे<br>सुमित आणि कंपनी खात्याला<br>(सुमित आणि कंपनी कडून परत आलेल्या मालाची नोंद विसरचुकीमुळे घेण्यात आली नव्हती ती नोंद केल्याबद्दल) | | २,००० | २,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (५) | धनको खाते ............ नावे<br>खरेदी खात्याला<br>(₹ १,२००/- च्या खरेदी केलेल्या मालाची नोंद ₹ १२,०००/- ने केल्याबद्‌दल) | | १०,८०० | १०,८०० |
| (६) | विक्री खाते ............ नावे<br>निताच्या खात्याला............<br>(विक्री केलेल्या मालाचे विजक ₹ २००/- ने जास्त दाखविले होते ते दुरूस्ती केल्याबद्‌दल) | | २०० | २०० |

**उदाहरण क्र. ५. : खालील चुकांच्या दुरूस्ती करिता आवश्यक किर्द नोंदी करा.**

१) सुजितकडून खरेदी केलेल्या ₹ ३,०००/- च्या मालाची नोंद चुकून विक्री पुस्तकात करण्यात आली.

२) सचिनला विकलेल्या ₹ ५,२००/- मालाची नोंद खरेदी पुस्तकाद्‌वारे केली गेली.

३) ग्राहकाकडून परत आलेल्या ₹ ८००/- च्या मालाची नोंद खरेदी परत पुस्तकात करण्यात आली.

४) अजितला उधारीवर विकलेल्या ₹ २४०/- मालाची नोंद विक्री पुस्तकात ₹ ४२०/- करण्यात आली.

५) ₹ ९००/- ला विकलेल्या जुने टेबल व खुर्चीची विक्री मालाची विक्री ग्राह्य धरण्यात आली.

६) मालकाचे घरभाडे ₹ १,२००/- दिले परंतु भाडे खाते नावे करण्यात आले.

**नोंदी**

| अ. क्र. | तपशील | खा. पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| (१) | खरेदी खाते ............ नावे<br>विक्री खाते ............ नावे<br>सुजित खात्याला<br>(सुजित कडून खरेदी केलेल्या मालाची नोंद विक्री पुस्तकात केल्याबद्‌दल) | | ३,०००<br>३,००० | ६,००० |
| (२) | सचिन खाते ............ नावे<br>विक्री खात्याला ............<br>खरेदी खात्याला ..............<br>(सचिनला विकलेल्या मालाची नोंद खरेदी पुस्तकात केल्याबद्‌दल) | | १०,४०० | ५,२००<br>५,२०० |
| (३) | विक्री परत खाते ............ नावे<br>खरेदी परत खाते ............ नावे<br>ग्राहकाच्या खात्याला<br>(ग्राहकाकडून परत आलेल्या मालाची नोंद खरेदी परत पुस्तकात केल्याबद्‌दल) | | ८००<br>८०० | १,६०० |
| (४) | विक्री खाते ............ नावे<br>अजित खात्याला<br>(अजितला उधारीने विकलेल्या ₹ २४०/- नोंद ₹ ४२०/- ने केल्याबद्‌दल) | | १८० | १८० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (५) | विक्री खाते ............ नावे<br>उपस्कर खात्याला ...............<br>(उपस्कर विक्रीची नोंद मालाची विक्री अशी नोंद केल्याबद्दल) | | ९०० | ९०० |
| (६) | आहरण / उचल खाते ............ नावे<br>भाडे खात्याला ................<br>(मालकाचे घरभाडे ₹ १,२०० दिले भाडे खाते नावे केल्याबद्दल) | | १,२०० | १,२०० |

## ८.४ निलंबित खाते – Suspense account

**निलंबित खाते – अर्थ**

जेव्हा तेरीज पत्रकाची दोन्ही बाजूच्या बेरजा जुळत नसतील आणि जर तेरीज पत्रकात नावे (म्हणजे जेव्हा तेरीजच्या जमा बाजूची बेरीज ही नावे बाजूच्या बेरजेपेक्षा जास्त असेल. किंवा जेव्हा तेरीजच्या नावे बाजूची बेरीज ही जमा बाजूच्या बेरजेपेक्षा जास्त असेल) आणि जमा यांच्या बेरजा जुळवण्यासाठी जे तात्पुरते स्वरूपाचे खाते उघडले जाते त्या खात्याला " निलंबित खाते " असे म्हणतात. एकाच खात्यावर परिणाम करणाऱ्या चुकांना एकेरी चुका म्हणतात या चुका निलंबित खात्याद्वारे दुरुस्त करता येतात. एकेरी चुका शोधून व दुरुस्त केल्यानंतर निलंबित खाते आपोआप बंद होते.

**उदाहरण ६ :**

श्री. किशोरीलाल यांची तेरीज पत्रकाची बेरीज जुळत नसून फरकाची रक्कम ₹ ६२०/– तात्पुरत्या निलंबित खात्याला स्थानांतरित करण्यात आली. काही काळानंतर चुकांचा शोध लागला. वरील चुकांची दुरूस्ती करण्यासाठी रोजकिर्द नोंदी करून निलंबित खाते तयार करा.

१) मे. सिंग आणि कंपनी यांचे कडून ₹ ८४०/– प्राप्त झाले. परंतु खतावणीमध्ये मे. सिंगच्या खात्यात ₹ ५० नावे करण्यात आली.

२) यंत्र दुरूस्ती करिता दिलेला खर्च ₹ ५३०/– ची नोंद यंत्र खात्यात ₹ १५० नावे बाजूला करण्यात आली.

३) मे. शाह आणि कंपनीला दिलेली ₹ २५/– ची कसर त्यांच्या खात्याला जमा करण्यात आली.

४) चेतन ॲण्ड कंपनीला दिलेल्या ₹ ७३०/– ची नोंद चुकून मे. ललित ॲण्ड कंपनीच्या खात्यावर ₹ २५० जमा करण्यात आली.

५) खरेदी पुस्तकाची बेरीज ₹ १००/– ने कमी लिहिली.

**रोजकिर्द**

| अ. क्र. | तपशील | खा. पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| (१) | निलंबित खाते ............ नावे<br>मे. सिंग ॲण्ड कंपनी खात्याला<br>(मे. सिंग ॲण्ड कंपनी खात्यात ₹ ८४० /– ने जमा होणारी नोंद ₹ ५०/– ने नावे करण्यात आली होती ती नोंद दुरूस्त केल्याबद्दल) | | ८९० | ८९० |
| (२) | यंत्र दुरूस्ती खाते ............ नावे<br>यंत्र खात्याला<br>निलंबित खात्याला<br>(यंत्र दुरूस्ती खर्च ₹ ५३०/– ची नोंद चुकून यंत्र खाते ₹ १५०/– ने नावे करण्यात आले ही नोंद दुरूस्त केल्याबद्दल) | | ५३० | १५०<br>३८० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (३) | मे. शाह आणि कंपनी खाते ............ नावे . | | ५० | |
| | निलंबित खात्याला ....... | | | ५० |
| | (शाह आणि कंपनीला दिलेल्या कसरीची ₹ ५०/- नोंद चुकून जमा झाली होती ती दुरूस्त केल्याबद्दल) | | | |
| (४) | चेतन ॲण्ड कंपनी खाते ............ नावे | | ७३० | |
| | ललित ॲण्ड कंपनी खाते ......... नावे | | २५० | |
| | निलंबित खात्याला ....... | | | ९८० |
| | (चेतन ॲण्ड कंपनीला दिलेल्या २५०/- ची नोंद चुकून ललित ॲण्ड कंपनीच्या खात्यात जमा करण्यात आलेली नोंद दुरूस्त केल्याबद्दल) | | | |
| (५) | खरेदी खाते ............ नावे | | १०० | |
| | निलंबित खात्याला .............. | | | १०० |
| | (खरेदी खात्यात नावे बाजूला कमी दिसणाऱ्या रक्कमेची नोंद दुरूस्त केल्याबद्दल) | | | |

**नावे** **निलंबित खाते** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| तेरीज पत्रकातील फरकाची रक्कम (संतुलित राशी) | ६२० | यंत्र दुरूस्ती खाते | ३८० |
| | | शाह ॲण्ड कंपनी खाते | ५० |
| मे. सिंग ॲण्ड कंपनी खाते | ८९० | चेतन ॲण्ड कंपनी खाते | ७३० |
| | | ललित ॲण्ड कंपनी खाते | २५० |
| | | खरेदी खाते | १०० |
| | १,५१० | | १,५१० |

**उदाहरण ७ :**

**खालील चुका निलंबित खात्याच्या आधारे दुरूस्त करा.**

१) सचिनकडून ₹ ३,०००/- चा माल खरेदी केला. पण त्याची नोंद विक्री पुस्तकात झाली परंतु सचिनचे खाते बरोबर जमा केले.

२) श्री. अनिलकुमार (ऋणको) कडून ₹ ४,५००/- रोख मिळाले. याची नोंद बरोबर रोखपुस्तकात केली, ही नोंद त्याच्या खात्यास झाली नाही.

३) विक्री पुस्तक ₹ २,०००/- ने बेरीज जास्त लिहिली.

४) सादिक यांना ₹ ५,०००/- रोख दिले. परंतु साबिरचे खाते ₹ १,८००/- ने जमा करण्यात आले.

५) खरेदी परत खात्याची एकूण बेरीज ₹ ३,१५०/- असताना ₹ १,५३०/- ही शिल्लक पुढे नेण्यात आली.

६) श्वेताने ₹ ७,५०० /- रोख दिले परंतु अंकिताचे खाते ₹ ७,०००/- ने नावे करण्यात आले.

**रोजकिर्द नोंदी**

| अ. क्र. | तपशील | | खा. पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | खरेदी खाते ............ | नावे | | ३,००० | |
| | विक्री खाते ............ | नावे | | ३,००० | |
| | निलंबित खात्याला .......... | | | | ६,००० |
| | (माल खरेदी केल्याची नोंद जी विक्री पुस्तकात होती ती आता बरोबर केल्याबद्दल) | | | | |
| (२) | निलंबित खाते ............ | नावे | | ४,५०० | |
| | अनिलकुमार खात्याला ........ | | | | ४,५०० |
| | (विसर चुकामुळे जमा झालेले अनिलकुमार खाते दुरूस्त करण्यात आले) | | | | |
| (३) | विक्री खाते ............ | नावे | | २,००० | |
| | निलंबित खात्याला .......... | | | | २,००० |
| | (विक्री पुस्तकाची ₹ २,०००/- जास्तीची शिल्लक बरोबर केल्याबद्दल) | | | | |
| (४) | सादिक खाते ............ | नावे | | ५,००० | |
| | साबिर खाते ............ | नावे | | १,८०० | |
| | निलंबित खात्याला .............. | | | | ६,८०० |
| | (सादिकला रोख राशी दिल्याची नोंद चुकीने साबिरच्या खाते जमा केलेली नोंद दुरूस्ती केल्याबद्दल) | | | | |
| (५) | निलंबित खाते ............ | नावे | | १,६२० | |
| | खरेदी परत खात्याला | | | | १,६२० |
| | (खरेदी परत पुस्तकाची कमी दिसणारी बेरीजेची दुरूस्ती केल्याबद्दल) | | | | |
| (६) | श्वेता खाते ............ | नावे | | ७,५०० | |
| | अंकिता खात्याला ........ | | | | ७,००० |
| | निलंबित खात्याला ...... | | | | ५०० |
| | (श्वेताला दिलेले रोख ₹ ७,५००/- ची नोंद चुकीने अंकिताच्या खात्यात ₹ ७,०००/- नावे झालेली नोंद दुरुस्त केल्याबद्दल) | | | | |

**उदाहरण क्र. ८ :**

**खालील चुकांची दुरूस्ती करा.**

१) शर्मा यांनी विक्री केलेल्या ₹ ८,०००/- च्या मालाची चुकून वर्माचे खाते नावे करण्यात आले.

२) एस. कुमार कडुन खरेदी केलेल्या ₹ १,२००/- च्या मालाची नोंद खरेदी पुस्तकानुसार त्यांच्या खात्यात जमा ऐवजी नावे करण्यात आली.

३) जी. रमेशकडून ₹ ३५०/- मिळाले याबद्दलची नोंद रोख पुस्तकात उत्पन्न बाजुला केली, परंतु त्याची खतावणीमध्ये नोंद केली नाही.

४)	रोख खरेदीसाठी के. मयूरला दिलेले ₹ ८००/– ची नोंद त्यांच्या खात्यात नावे बाजूला करण्यात आली.

५)	खाजगी वापरासाठी व्यवसायातून काढलेले ₹ १,५००/– ची नोंद सामान्य खर्च खात्यात नावे करण्यात आली.

**नोंदी**

| अ. क्र. | तपशील | खा. पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| (१) | शर्माचे खाते ............ नावे .<br>वर्मा खात्याला .......<br>शर्माला मालाची विक्री केली चुकून वर्माला नावे केल्याची नोंद दुरूस्त केल्याबद्दल) | | ८,००० | ८,००० |
| (२) | एस. कुमारचे खाते ₹ २,४००/– ने जमा केल्यामुळे किर्द नोंद होणार नाही. | | | |
| (३) | जी. रमेश खाते ₹ ३५०/– ने जमा करावे. किर्द नोंद होणार नाही | | | |
| (४) | खरेदी खाते ............ नावे .<br>के. मयुर खात्याला .......<br>के. मयूरला रोखीच्या खरेदीबद्दल रोख दिली, त्याचे खाते नावे केले, नोंद दुरूस्त केल्याबद्दल | | ८०० | ८०० |
| (५) | उचल खाते ............ नावे .<br>सामान्य खर्च खात्याला .......<br>वैयक्तिक कारणासाठी पैसे घेतले त्याची चुकून नोंद सामान्य खर्चाला झाली ती नोंद दुरुस्त करण्याबद्दल | | १,५०० | १,५०० |

वरील उदाहरणाच्या केलेल्या नोंदीमुळे तेरीज पत्रक मान्य करत नसल्यास फरकाची रक्कम निलंबित खात्याला दाखविण्यात यावी. किर्दमध्ये दाखविण्यात आलेले आहे आणि नोंद क्रं. (२) आणि (३) खालीलप्रमाणे दुरुस्त करता येतील.

| | | ₹ | ₹ |
|---|---|---|---|
| २) निलंबित खाते | नावे | १,२०० | |
| एस. कुमार खात्याला .......... | | | १,२०० |
| ३) निलंबित खाते | नावे | ३५० | |
| जी. रमेश खात्याला ........... | | | ३५० |

**निलंबित खाते खालीलप्रमाणे आहे.**

**नावे** **निलंबित खाते** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| एस. कुमार खाते<br>जी. रमेश खाते | १,२००<br>३५० | तेरीज पत्रकातील फरक | १,५५० |
| | १,५५० | | १,५५० |

**उदाहरण क्र. ९ :**

श्री. अमिताभ यांच्या तेरीज पत्रकाची बेरीज जुळत नाही. फरकाची रक्कम त्यांनी निलंबित खात्याला स्थानांतरित केली. त्यानंतर अमिताभने झालेल्या चुका शोधून काढल्या.

१) मोटार कार नोंदणीसाठी ₹ ८००/- ची नोंद कायदेशीर खर्च म्हणून नोंदविली गेली.

२) यंत्र दुरूस्ती खर्च ₹ ३००/- दिला. याची नोंद यंत्र खात्यात नावे करण्यात आली.

३) ₹ १,०००/- च्या जुन्या यंत्राच्या तपासणी व दुरूस्तीकरिता केलेला दुरूस्ती खर्च दुरूस्ती खात्याला नावे करण्यात आला.

४) इमारत बांधकामासाठी लागणारे साहित्य खरेदी केले. ₹ ९०,०००/- आणि ₹ १०,०००/- मजूरीसाठी दिले. याची नोंद इमारत खात्यात करण्यात आलेली नाही.

५) ₹ ६,०००/- चे उपस्कर खरेदी केले आणि त्याची नोंद खरेदी पुस्तकात ₹ ४००/- ने करण्यात आली.

६) ₹ १,०००/- चे यंत्र श्री. सुमितला विकण्यात आले परंतु त्याची नोंद विक्री पुस्तकात केली.

७) विक्री परत पुस्तकाची बेरीज ₹ २,०००/- ची नोंद खतावणीमध्ये केली नाही.

तेरीज पत्रकात दिसणारी मूळ फरकाची रक्कम काढण्यासाठी वरील व्यवहारात झालेल्या चुका दुरूस्त करून निलंबित खाते तयार करा.

**उत्तर :**

**रोजकिर्द**

| अ. क्र. | तपशील | खा. पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| (१) | मोटार खाते ............ नावे .<br>कायदेशीर खर्च खात्याला .......<br>(मोटारकार नोंदणीचा खर्च कायदेशीर खात्याला नावे करण्यात आला. चुक दुरूस्त केल्याबद्दल) | | ८०० | ८०० |
| (२) | दुरूस्ती खाते ............ नावे .<br>यंत्र खात्याला .......<br>(यंत्र खाते नावे केलेले दुरूस्ती खर्चाची नोंद दुरूस्त केल्याबद्दल) | | ३०० | ३०० |
| (३) | यंत्र खाते ............ नावे .<br>दुरूस्ती खर्च खात्याला .......<br>(जुने यंत्र खरेदी करतांना केलेला तपासणी खर्चाची नोंद चुकून दुरूस्ती खर्च खाते नावे करण्यात आली होती ती नोंद दुरूस्त केल्याबद्दल) | | १,००० | १,००० |
| (४) | इमारत खाते ............ नावे .<br>रोख खात्याला .......<br>(इमारत बांधकामासाठी लागणारे बांधकाम साहित्य व मजुरी खर्चाची नोंद इमारत खात्याला नावे केल्याबद्दल) | | १,००,००० | १,००,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (५) | उपस्कर खाते ............ नावे .<br>खरेदी खात्याला.......<br>निलंबित खात्याला .......<br>(₹ ६,०००/- चे खरेदी केलेल्या उपस्करची नोंद चुकून ₹ ४००/- ने खरेदी खात्यात नावे करण्यात आली होती ती चुक दुरूस्त केल्याबद्दल) | | ६,००० | <br>४००<br>५,६०० |
| (६) | विक्री खाते ............ नावे .<br>यंत्र खात्याला .......<br>(यंत्र विक्रीची नोंद विक्री पुस्तकात झालेली नोंद दुरूस्त केल्याबद्दल) | | १,००० | <br>१,००० |
| (७) | विक्री परत खाते ............ नावे .<br>निलंबित खात्याला .......<br>(लेखा पुस्तकात न केलेली विक्री परत पुस्तकाच्या बेरजेची नोंद दुरूस्त केल्याबद्दल) | | २,००० | <br>२,००० |

**नावे** **निलंबित खाते** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| तेरीज पत्रकानुसार दिसणारी विक्रीतील फरकाची रक्कम (संतुलीत रक्कम) | ७,६०० | उपस्कर खाते<br>विक्री परत खाते | ५,६००<br>२,००० |
| | ७,६०० | | ७,६०० |

म्हणून तेरीजपत्रकातील मूळ फरक ₹ ७,६००/- जास्त जमा होता.

## स्वाध्याय

### प्र.१ एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) चुकांच्या दुरूस्तीचा अर्थ स्पष्ट करा?

२) सैद्धांतिक चुकांचा अर्थ स्पष्ट करा.

३) अंशतः लोप विभ्रम चुकांचा अर्थ विशद करा?

४) पूर्ण लोप विभ्रम चुकांचा अर्थ विशद करा?

५) भरपाईच्या चुका म्हणजे काय?

### प्र.२ पुढील विधानासाठी एक शब्द संज्ञा किंवा शब्द समूह लिहा.

१) तेरीज पत्रकावर प्रभावित होणाऱ्या चुका.

२) लेखापुस्तक बंद करते वेळेस जास्तीची दिसणारी बेरीज.

३) लेखापुस्तकात व्यवहार नोंदवितांना अंशतः किंवा पूर्णतः होणाऱ्या लेख विभ्रमचुका निदर्शनास आलेली चूक.

४) व्यवहार नोंदवितांना लेखांकिय तत्वांचा उल्लंघनामुळे झालेली चूक.

५) असे खाते ज्यामध्ये तेरीज पत्रकातील फरकाची रक्कम स्थानांतरित केली जाते.

६) एका चुकीचा परिणाम दुसऱ्या चुकीमुळे नाहीसा होत असलेली चुक.

७) तेरीज पत्रकावरून उघड न होणारी चूक.

८) चुकां मुळे झालेली चुकीची नोंद किंवा चुकीची खतावणी.

## प्र.३ दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्यायाची निवड करा व वाक्य पुन्हा लिहा.

१) दुरूस्तीच्या नोंदी ................ मध्ये केल्या जातात.

अ) मुळ रोजकिर्द ब) लेखा पुस्तक क) ताळेबंद ड) रोख पुस्तक

२) अशा प्रकारच्या चुका ज्या फक्त रोजकिर्द नोंदीमध्येच दुरूस्त होऊ शकतात.

अ) जास्त बेरजेच्या ब) एकतर्फी चुका क) कमी बेरजेच्या ड) दुतर्फी चुका

३) खतावणीमध्ये चुकीच्या नोंदीमुळे घडणाऱ्या चुका ........... .

अ) सैध्दांतिक ब) लेख विभ्रम क) भरपाईच्या ड) लोप विभ्रम

४) एखाद्या व्यवहाराची अजिबात कुठेही नोंद करण्यात आलेली नाही, तर त्याला ........ म्हणतात.

अ) नोंदीची चुक ब) लोप विभ्रम चुका

क) सैध्दांतिक चुका ड) लेख विभ्रम चुका

५) जेंव्हा .......... जुळत नाही, तेंव्हा निलंबित खाते उघडले जाते.

अ) ताळेबंद ब) व्यापार खाते क) नफा तोटा खाते ड) तेरीज पत्रक

## प्र.४ खालील विधाने चुक की बरोबर ते सकारण लिहा.

१) लेखा पुस्तकांच्या शिलकीच्या आधारे तेरीजपत्रक तयार केले जाते.

२) काही विशिष्ट चुकामुळे तेरीजपत्रक जुळते.

३) दुरूस्तीच्या नोंदी रोख पुस्तकात केल्या जातात.

४) जेंव्हा तेरीजपत्रकाची बेरीज जुळत असेल तेंव्हा निलंबित खाते उघडण्याची गरज नसते.

५) सर्व प्रकारच्या चुका फक्त निलंबित खात्याद्वारेच दुरूस्त केल्या जाऊ शकतात.

## प्र.५ खालील विधानाशी आपण सहमत आहात कि असहमत ते लिहा.

१) व्यवहारांची नोंद करतांना रक्कम किंवा खात्यात अहेतूपुरस्सर घडणाऱ्या विसर आणि लेख विभ्रम नोंदीना चुका असे म्हटले जाते.

२) चुकीच्या नोंदी, चुकीची खतावणी, चुकीची बेरीज, चुकीचे संतुलन आणि चुकीची गणना इत्यादींना अंकगणितीय चुका असे म्हटले जाते.

३) एक किंवा अनेक नावे रक्कमाच्या चुकांची भरपाई एक किंवा अनेक जमा रक्कमांच्या चुकांशी होते तेव्हा त्यास भरपाईच्या चुका असे म्हणतात.

४) संपूर्ण व्यवहारांची नोंद मूळ पुस्तकात न झाल्यास त्याचा परिणाम तेरीजपत्रकाच्या जुळवणीवर होत नाही.

५) जेव्हा व्यवहारांची नोंद लेखांकनाच्या सैध्दांतिक नियमानुसार केली जात नाही तेव्हा त्यास भरपाईच्या चुका असे म्हणतात.

**प्र.६ खालील विधाने पूर्ण करा.**

१) ---------- म्हणजे लेखापुस्तकामध्ये कोणतीही चूक नसण्याची खात्री होय.

२) व्यवहारांच्या नोंदी करतांना लेखांकनाच्या मूळ तत्वांचे उल्लंघन झाल्यास ---------- म्हणतात.

३) ---------- नोंदी चुकांच्या शोधावर अवलंबून असतात.

४) चुकांची दुरूस्ती करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपाचे उघडले जाणारे खाते ---------- होय.

५) चुकीच्या नोंदीमुळे व्यवहारांच्या नोंदीमध्ये ---------- होते.

**प्रात्यक्षिक उदाहरणे :**

**१. खालील चुकांची दुरूस्ती करा.**

१) प्रविणला दिलेले वेतन ₹ ६,५००/- ची नोंद चुकून त्याच्या वैयक्तिक खात्यात नावे करण्यात आली.

२) सिध्दांत ट्रेडर्स कडून ₹ १२,०००/- चा माल रोखीने खरेदी केला पण त्याची नोंद सिध्दांत ट्रेडर्स खात्याच्या नावे बाजुला करण्यात आली.

३) घरमालक श्री. शांतीलाल यांना ₹ ५,०००/- भाडे दिले आणि त्याची नोंद त्याच्या वैयक्तीक खात्याला नावे करण्यात आली.

४) बँकेकडून ₹ ७००/- व्याज मिळाले याची नोंद बँक खात्यात जमा दाखविण्यात आली.

५) टाईम्स ऑफ इंडियाला ₹ ५,०००/- जाहिरात खर्चाबद्दल दिले आणि याची नोंद टाईम्स ऑफ इंडिया खात्यास नावे करण्यात आली.

**२. खालील चुकांची दुरूस्ती करा.**

१) यंत्र खरेदी ₹ ९,०००/- ची नोंद खरेदी खात्यात नावे करण्यात आली.

२) इंड्स कंपनी कडून खरेदी केलेल्या यंत्राची किंमत ₹ १५,०००/- दिली आणि याची नोंद इंड्स कंपनी खात्यात नावे करण्यात आली.

३) छपाईयंत्र (प्रिंटर) खरेदी केल्याची ₹ १०,०००/- ची नोंद चुकून खरेदी पुस्तकात करण्यात आली.

४) कायदेशीर खर्चाबद्दल ₹ ८००/- मोहनला दिलेले होते ही नोंद त्याच्या खात्यात नावे दाखविण्यात आली.

५) रमेशला रोख दिलेल्या ₹ ५००/- ची नोंद सुरेशच्या खात्यात नावे दाखविण्यात आली.

**३. खालील चुकांची दुरूस्ती करा.**

१) संजय यांना उधार विकलेल्या ₹ ३,०००/- च्या मालाची नोंद चुकून खरेदी पुस्तकात नोंदविण्यात आली.

२) शितलकडून ₹ २,०००/- चा माल उधारीने खरेदी केला या व्यवहाराची नोंद चुकून विक्री पुस्तकात करण्यात आली.

३) उमेशला परत पाठविलेल्या ₹ ५००/- च्या मालाची नोंद विक्री परत पुस्तकात करण्यात आली.

४) गणेशने ₹ ९००/- चा माल परत पाठविला याची नोंद खरेदी परत पुस्तकात दाखविण्यात आली.

५) नेहा कडून ₹ १०,०००/- चा माल उधार खरेदी केला आणि त्याची नोंद ₹ ११,०००/- ने करण्यात आली.

**४. खालील चुकांची दुरूस्ती करा.**

१) निखिलला ₹ २,०००/- भाडे दिल्याची नोंद त्याच्या वैयक्तीक खात्यास दाखविली.

२) विक्री परत पुस्तकाची बेरीज ₹ २,०००/- ने जास्त घेतली.

३) धनराज यांना उधार विकलेल्या मालाची ₹ ६,५००/- ची नोंद खतावणीमध्ये त्यांच्या वैयक्तीक खात्यात दाखविण्यात आली नाही.

४) जुना संगणक खरेदीची ₹ ८,०००/- ची नोंद दुरूस्ती खात्यास नावे करण्यात आली.

५) उपस्कर दुरुस्ती ₹ ५००/- ची नोंद उपस्कर खाते नावे करण्यात आली.

**५. खालील चुकांची दुरूस्ती करा.**

१) इमारत बांधकामासाठी ₹ १०,०००/- मजुरी दिली याची नोंद चुकून मजूरी खात्यात नावे दाखविण्यात आली.

२) श्री. पटेल कडून ₹ ५,०००/- राशी मिळाल्याची नोंद रोख पुस्तकात करण्यात आली परंतु त्याची खतावणी लेखा पुस्तकातील पटेलच्या खात्यात केली नाही.

३) रोहिणीला विक्री केलेल्या ₹ ९,०००/- ची मालाची नोंद चुकून मोहिनीच्या खात्यात नावे करण्यात आली.

४) ₹ ५,०००/- इमारत बांधकामा करिता खरेदी केलेल्या बांधकाम साहित्याची नोंद चुकून खरेदी खात्यात नावे केली.

**६. तेरीज पत्रकात ₹ १,२३०/- चा फरक दिसत होता हा फरक निलंबित खात्याला नावे दाखविण्यात आला त्यानंतर खालील चुका दिसून आल्या. चुकांच्या दुरूस्तीच्या नोंदी करून निलंबित खाते तयार करा.**

१) विक्री पुस्तकाची बेरीज ₹ १,०००/- ने जास्त दिसते.

२) आरतीला ₹ ४,४००/- चा माल विकला त्याची नोंद आरतीच्या खात्यात ₹ ४,०००/- ने दाखविण्यात आली.

३) खरेदी पुस्तकाची बेरीज ₹ १००/- ने अधिक दिसते.

४) रणजितकडून ₹ ५००/- मिळाले त्याची नोंद रणजितच्या खात्याला केली नाही.

५) समीरला विकलेल्या ₹ ७५०/- च्या मालाची नोंद खरेदी पुस्तकात करण्यात आली.

६) वर्तन खात्यात ₹ ५७०/- ऐवजी ₹ ५००/- जमा करण्यात आले.

**७. लेखापालच्या असे लक्षात आले की, तेरीज पत्रकाची नावे बाजूला ₹ ३०८/- रक्कम कमी दिसत आहे म्हणून लेखापालने हा फरक निलंबित खात्यात दर्शविला व नंतर खालील चुका आढळून आल्या.**

१) खरेदी खात्याची नावे बाजूची बेरीज ₹ १००/- कमी दिसते.

२) ग्राहकाला दरमहा दिली जाणारी कसर ₹ १००/- ची नोंद लेखापुस्तकात कसर खात्याला जमा करण्यात आली.

३) मिहीरला दिलेल्या ₹ १०२/- च्या मालाची नोंद त्यांच्या खात्यात ₹ १२०/- ने करण्यात आली.

४) कार्यालय उपयोगासाठी खरेदी केलेली लेखनसामुग्रीची नोंद ₹ २६/- ने रोख पुस्तकात केली परंतु लेखा पुस्तकात त्याची खतावणी केली नाही.

५) मिहीरने दिलेले ₹ २७५/- ची नोंद मितालीच्या खात्यात जमा करण्यात आली.

वरील व्यवहारांच्या नोंदी रोजकिर्दीत देऊन निलंबित खाते तयार करा.

**८. अनुराग यांच्या तेरीज पत्रकाची जमा बाजू ₹ ६,०००/- ने जास्त आहे. ही फरकाची रक्कम निलंबित खात्याला स्थानांतरित करण्यात आली त्यानंतर पुढील चुका आढळून आल्या.**

१) रमाकांत कडून ₹ ८,०००/- रोख मिळाल्याची नोंद त्याच्या खात्यात ₹ ६,००० /- ने करण्यात आली.

२) नमनकडून उधार खरेदी बद्दल ₹ ७,०००/- ची नोंद विक्री पुस्तकात झाली, नमनचे खाते बरोबर जमा केले.

३) विक्रीपरत पुस्तकाची बेरीज ₹ १,०००/- ने जास्त दिसते.

४) विक्री पुस्तकाची बेरीजेची ₹ १०,०००/- खतावणी विक्री खात्याला करण्यात आली नाही.

५) यंत्र खरेदीची ₹ १०,०००/- ची नोंद खरेदी खात्यात ₹ ५,०००/- ने करण्यात आली.

चुकांची दुरूस्ती करून निलंबित खाते तयार करा.

**९. श्री. यशवंत यांची ३१ मार्च २०१९ रोजीच्या तेरीज मध्ये चुका आढळून आल्या. या चुकांमुळे आलेला फरक निलंबित खात्याला स्थानांतरित करण्यात आला. खातेपुस्तक पाहिल्यानंतर दिसून आले कि,**

१) खरेदी परतीची ₹ १,०००/- च्या नोंदीची खतावणी खरेदी खात्यात नावे बाजूला करण्यात आली.

२) बद्रीनाथ यांना दिलेल्या ₹ ४,०००/- ची नोंद केदारनाथ यांच्या खात्यात नावे करण्यात आली.

३) किशोर कडून मिळालेल्या ₹ ५,४००/- च्या नोंदीची खतावणी त्यांच्या खात्यात नावे बाजूस करण्यात आली.

४) ₹ २,०००/- प्राप्त कसरीच्या नोंदींची खतावणी कसर खात्यात नावे दाखविण्यात आली.

५) मोटार सायकलच्या दुरूस्तीसाठी केलेल्या ₹ २,७४०/- ची नोंद, मोटार सायकल खात्यात ₹ १,७४०/- नावे करण्यात आली.

वरील व्यवहाराची चुकांची दुरूस्तीसाठी रोजकिर्द नोंदी करा. तसेच ३१ मार्च २०१९ रोजी निलंबित खात्याला स्थानांतरित करण्यात आलेल्या फरकाची रक्कमेचा हिशोब करण्यासाठी निलंबित खाते तयार करा. असे गृहीत धरा की वरील चुका दुरूस्तीनंतर निलंबित खाते संतुलित होतील.

**१०. लेखापालाच्या चुकांची दुरूस्ती करा.**

१) किशोर कडून ₹ ७००/- चा माल खरेदी केला त्याची नोंद विक्री पुस्तकात दाखविण्यात आली.

२) खरेदी परत केलेल्या ₹ १२०/- च्या मालाची नोंद खरेदी परत पुस्तकात करण्याऐवजी खरेदी पुस्तकात झाली.

३) प्रिंटरची दुरूस्ती केल्याबद्दल सुभाषला ₹ १८०/- द्यायचे आहेत तसेच एक नवीन प्रिंटर ₹ १,९२०/- ला त्याने पाठविला, याची नोंद ₹ २,०००/- ने खरेदी पुस्तकात करण्यात आली.

४) नितीनला ₹ १,५००/- चा माल परत केला आणि त्याची नोंद विक्री परत पुस्तकात केली.

५) पूर्वदत्त भाडे खातेशी संबंधीत ₹ ४५०/- ची नोंद विसरचुकीमुळे त्या खात्यातून स्थानांतरित करण्यात आली नाही.

# 9 स्वामीत्व संस्थेची अंतिम खाती
# (Final Accounts of a Proprietary Concern)

**अभ्यास घटक :**

*९.१ आर्थिक खात्यांचा अर्थ उद्‌देश आणि महत्त्व*

*९.२ व्यापार खाते तयार करणे*

*९.३ नफातोटा खाते तयार करणे*

*९.४ ताळेबंद तयार करणे*

*९.५ खालील समायोजन नोंदीचे परिणाम*

- *संवरणस्कंध (वर्ष अखेरचा मालसाठा)*
- *अदत्त खर्च*
- *पूर्वदत्त खर्च*
- *संपत्तीवर घसारा*
- *बुडीत व संशयित कर्ज निधी*
- *ऋणको आणि धनकोवर कसरीची तरतूद*
- *पूर्वप्राप्त (आगाऊ मिळालेले) उत्पन्न*
- *उपार्जित/अप्राप्त उत्पन्न*
- *नमुना मालाचे मोफत वाटप*
- *व्यापाऱ्याने वैयक्तीक उपयोगाकरिता केलेली उचल*
- *भांडवलावर व्याज*
- *उचलीवर व्याज*

***क्षमता विधाने***

- विद्यार्थ्यांना स्वामीत्व संस्थेच्या अंतिम खात्याचा अर्थ, उद्‌देश आणि महत्त्व यांचे आकलन होते.
- विद्यार्थ्यांना विविध समायोजन नोंदींचे आकलन होते.
- विद्यार्थी व्यापार खाते, नफातोटा खाते आणि ताळेबंद कौशल्य वापरून तयार करू शकतो.

**प्रस्तावना (Introduction) :**

व्यावसायिक व्यवहारांची शास्त्रीय पद्धतीने नोंद ठेवण्याची क्रिया म्हणजे लेखांकन होय. हे व्यवसायाची सर्व आर्थिक माहिती शास्त्रशुद्ध पद्धतीने उपलब्ध करून देतात. येथे व्यावसायिक व्यवहारांची नोंदच होत नाही तर लेखांकन प्रक्रियाही सुरू होते आणि ही लेखांकन प्रक्रिया अंतिम लेखांवर पूर्ण होते.

## ९.१ अ) आर्थिक खात्याचा अर्थ : (Meaning of Final Accounts)

लेखांकनाचा मूलभूत हेतु पुरवठादार, कामगार, ग्राहक आणि व्यवसाय मालक यांचे हित जोपासणे हा असतो. तसेच व्यवसायाची आर्थिक स्थिती जाणून घेण्यास मदत होते. हाच हेतु समोर ठेवून वेगवेगळ्या प्रकारची खाती तयार केली जातात. हे सर्व आर्थिक वर्षाच्या अखेरीस केले जाते. थोडक्यात, अंतिम लेखे हे वित्तीय विवरण आणि वित्तीय स्थिती इत्यादीचे विशिष्ट वेळ आणि तारखेचे विवरण करते. हा व्यापार खाते, नफातोटा खाते आणि ताळेबंद याचा संच असतो. व्यापार खात्यावरून ढोबळ नफा किंवा ढोबळ तोटा कळतो आणि नफातोटा खात्यावरून व्यवसायाचा शुद्ध नफा किंवा शुद्ध तोटा समजतो. ताळेबंद पत्रक आर्थिक वर्षाच्या शेवटी व्यवसायाची संपत्ती आणि देयता दर्शविते.

**ब) आर्थिक लेखांचा उद्देश :–**


- आर्थिक लेखाचा प्रमुख उद्देश विहीत आर्थिक वर्षातील व्यवसायाचा ढोबळ नफा / ढोबळ तोटा आणि शुद्ध नफा / शुद्ध तोटा शोधून काढणे हा असतो.
- आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी व्यवसायाची अचूक आणि वास्तव आर्थिक स्थिती दर्शविणे.
- व्यवसायमालकांना व्यवसायाचा तंतोतंत परिणाम आणि व्यवसायाची स्थिती माहीत करून घेणे.
- थोडक्यात आर्थिक व्यवहारांचे संक्षिप्त विवरण दर्शविणे.
- आर्थिक घडामोडींवर नियंत्रण ठेवणे.
- आर्थिक निर्णय घेण्यासाठी व्यवसाय मालकाला वित्तीय विवरणे मदत करतात.

**क) वार्षिक खात्यांचे महत्त्व :–**

१) आर्थिक विवरणांच्या आधारावर व्यवस्थापक किंवा व्यवसाय मालक व्यवसायाचे नियोजन करून अंतिम निर्णय घेतात.
२) आर्थिक विवरणे आर्थिक वर्षाच्या शेवटी व्यवसायाची खरी वित्तीय स्थिती दर्शवितात.
३) लेखापालाने लिहिलेले आर्थिक व्यवहार हा अचूक गणितीय पुरावा असतो.
४) आर्थिक विवरणामुळे व्यवसायाच्या देवाण घेवाणमध्ये पारदर्शकता असते.
५) आर्थिक विवरणामुळे सरकारला द्याव्या लागणाऱ्या विविध करांची अचूक माहिती मिळण्यास मदत होते जसे आयकर, वस्तू व सेवा कर(GST) इत्यादी.
६) हा एक स्वयंचलित आदेश असतो की, व्यवसायाच्या आर्थिक व्यवहारांचे विवरण तयार करणे.

**आर्थिक खाती कशी तयार करावीत :–**

प्रत्येक वेळी व्यवसायामध्ये आर्थिक व्यवहार होतच असतात. या सर्व व्यवहारांची नोंद शास्त्रशुद्ध पद्धतीने रोजकीर्दमध्ये घेतली जाते. रोजकिर्दीवरून विशिष्ट खात्यात खतावणी केली जाते. आर्थिक वर्षाच्या शेवटी सर्व खाती संतुलीत केली जातात. खात्यावर नावेबाकी किंवा जमा बाकी असते. या शिलकांच्या आधारे तेरीज पत्रक (परीक्षा सूची) तयार करण्यात येते आणि या संपूर्ण शिलकेच्या मदतीने व्यापार खाते, नफातोटा खाते आणि ताळेबंद पत्रक तयार करण्यात येते यालाच अंतिम खाती म्हणून संबोधली जाते ही लेखांकन पद्धत खालील प्रमाणे दर्शविली जाते.




**अंतिम खात्यातील समाविष्ट बाबी (संच)**

१) उत्पादन खाते

२) व्यापार खाते

३) नफातोटा खाते

४) नफातोटा विनियोजन खाते

५) ताळेबंद

**टिप :–** इयत्ता ११ वी वाणिज्य विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये उत्पादन लेखा, व नफातोटा समायोजन खाते अभ्यासक्रमासाठी नाहीत. फक्त व्यापार खाते, नफातोटा खाते आणि ताळेबंद यांचाच समावेश अभ्यासक्रमात केलेला आहे.

**व्यापार खाते** (Trading Account)

व्यापार खाते हे एक अशा प्रकारचे खाते असते की जे आपल्याला व्यवसायाच्या एकंदरीत संपूर्ण व्यापारी कृतीची माहिती देते सर्व प्रकारचे प्रत्यक्ष खर्च आणि हानी व्यापार खात्याच्या नावे बाजूवर दर्शविण्यात येतात आणि सर्व प्रकारचे मालाच्या विक्रीसंबंधीचे व्यवहार जमा बाजूवर दर्शविण्यात येतात.

व्यापार खात्याच्या नावे बाजूवर प्रारंभण स्कंध खरेदी आणि सर्वप्रकारचा प्रत्यक्ष खर्च उदा. मजुरी, वाहतूक खर्च, कोळसा, गॅस व पाणी, निर्माण खर्च इत्यादी दर्शविण्यात येतात.

त्याचप्रमाणे व्यापार खात्याच्या जमा बाजूवर संवरणस्कंध, विक्री, विक्रीपरत, मालकाने स्वतःच्या उपयोगासाठी घेतलेला माल, नमुना म्हणून मोफत वाटलेला माल इत्यादी. आर्थिक वर्षाच्या शेवटी व्यवसायाचा ढोबळ नफा किंवा ढोबळ तोटा शोधून काढण्यासाठी व्यापार खाते तयार करण्यात येते. व्यापार खात्याच्या जमा बाजूची बेरीज नावे बाजूच्या बेरजेपेक्षा जास्त असल्यास ढोबळ नफा दर्शविते आणि नावे बाजूची बेरीज जमा बाजूच्या बेरजेपेक्षा जास्त असल्यास ढोबळ तोटा दर्शविते. हा ढोबळ नफा किंवा ढोबळ तोटा नफातोटा खात्याला स्थानांतरीत करण्यात येतो.

**व्यापार खात्याच्या महत्त्वाच्या बाबी :–**

१) **मालसाठा (स्कंध) :–** अविक्रीत मालाला स्कंध (मालसाठा) असे म्हणतात.

स्कंध (मालसाठा) दोन प्रकारचा असतो.

(अ) **प्रारंभण स्कंध (वर्षाच्या सुरुवातीचा मालसाठा) :** वर्षाच्या सुरुवातीला शिल्लक असलेल्या मालसाठ्यास प्रारंभण स्कंध असे म्हणतात. प्रारंभण स्कंध हा व्यापार खात्याच्या नावे बाजूवर दर्शविला जातो.

(ब) **संवरण स्कंध (वर्षाच्या शेवटचा मालसाठा) :** आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी शिल्लक असलेला अविक्रीत मालसाठा म्हणजे संवरण स्कंध होय. याचे मूल्यांकन लागतमूल्य (परिव्यय मूल्य) विपणी मूल्य (बाजार मूल्य) यापैकी जे मूल्य असेल ते गृहीत धरले जाते. संवरण स्कंध व्यापार खात्याच्या जमा बाजूवर दर्शवितात आणि त्याची दुसरी नोंद ताळेबंद पत्रकाच्या संपत्ती बाजूवर दर्शवितात.

२) **खरेदी :–** यामध्ये मालाची खरेदी समाविष्ट असते संपत्ती नाही. तो माल रोखीने किंवा उधारीवर खरेदी केलेला असतो. व्यापार खात्याच्या नावे बाजूवर खरेदीमधून खरेदी परत वजा करून शुद्ध खरेदीने नोंद केली जाते.

३) **विक्री :–** ही फक्त मालाची विक्री असते संपत्तीची नाही. रोखीने किंवा उधारीने विकलेला माल म्हणजे विक्री होय. विक्रीमधून विक्रीपरत वजा केली जाते आणि शुद्धविक्री व्यापार खात्याच्या जमा बाजूवर दर्शविली जाते.

४) **प्रत्यक्ष खर्च :–** उत्पादनासाठी लागणाऱ्या खर्चाला प्रत्यक्ष खर्च म्हणतात. हा खर्च फक्त चालू आर्थिक वर्षाशी संबंधीत असतो. उदा. मजुरी, उत्पादनखर्च, निर्माणीप्रकाश, कोळसा, गॅस, इंधन, पाणी, आयात शुल्क, गोदीभाडे, वाहतूक खर्च, अधिकार शुल्क इत्यादींना प्रत्यक्ष खर्च असे म्हणतात.

**व्यापार खात्याचा नमुना**

**व्यापार खाते**

**................ यांचे पुस्तकात ३१ मार्च ................ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध / मालसाठा | | xxxx | विक्री | xxxx | |
| खरेदी | xxxx | | वजा – विक्रीपरत | xxxx | xxxx |
| वजा – खरेदीपरत | xxxx | xxxx | | | |
| प्रत्यक्ष खर्च | | xxxx | नमुना मालाचे मोफत वितरण | | xxxx |
| वाहन व्यय | | xxxx | मालकाद्वारे व्यक्तीगत | | xxxx |
| खरेदीवरील वाहतूक खर्च | | xxxx | उपयोगासाठी मालाची केलेली | | |
| आयात कर / सीमा शुल्क | | xxxx | उचल | | |
| मजुरी | | xxxx | आगीमुळे नष्ट झालेला माल | | xxxx |
| कोळसा, गॅस, इंधन आणि पाणी | | xxxx | संवरण स्कंध | | xxxx |
| कारखाना खर्च | | xxxx | ढोबळ तोटा / सकल हानी | | xxxx |
| अधिकार शुल्क | | xxxx | (नफातोटा खात्याला | | |
| ढोबळ नफा / सकल लाभ | | xxxx | स्थानांतरीत) | | |
| (नफातोटा खात्याला | | | | | |
| स्थानांतरीत) | | | | | |
| | | xxxx | | | xxxx |

✻ व्यापार खात्याचा संतुलित संख्या (Balancing figure) हा ढोबळ नफा किंवा ढोबळ तोटा दर्शवितो. व्यापार खात्याची जमा शिल्लक ढोबळ नफा दर्शविते. तो नफातोटा खात्याच्या जमा बाजूला स्थानांतरीत केला जातो. व्यापार खात्याची नावे शिल्लक ढोबळ तोटा दर्शविते. तो नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर स्थानांतरीत केला जातो.

**उदाहरण १**

खालील माहितीवरून श्रीमती संगिता यांचे ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार खाते तयार करा.

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| मजुरी | १६,००० | मालसाठा (१.४.२०१८) | २२,००० |
| अधिकार शुल्क | ११,००० | विक्री | ३,८०,००० |
| विक्री परत | २४,००० | खरेदी | १,९०,००० |
| संगिताने स्वतःच्या वैयक्तीक उपयोगाकरिता उचलेला माल | १६,००० | खरेदी परत | ६,४०० |
| कारखाना भाडे | ४,२०० | उत्पादन खर्च | ८,४०० |
| ३१ मार्च २०१९ ला शिल्लक मालाचे मूल्य | ३६,००० | गामक शक्ती | १६,००० |
| | | आगतवाहन व्यय | ७,४०० |

**उत्तर :–** **श्रीमती संगिता यांचे पुस्तकात व्यापार खाते**

**३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | २२,००० | विक्री | ३,८०,००० | |
| खरेदी | १,९०,००० | | वजा – विक्रीपरत | २४,००० | ३.५६.००० |
| वजा – खरेदीपरत | ६,४०० | १,८३,६०० | उचल | | १६,००० |
| मजुरी | | १६,००० | संवरण स्कंध | | ३६,००० |
| अधिकार शुल्क | | ११,००० | | | |
| कारखाना भाडे | | ४,२०० | | | |
| उत्पादन खर्च | | ८,४०० | | | |
| गामक शक्ती | | १६,००० | | | |
| आगत वाहन व्यय | | ७,४०० | | | |
| ढोबळ नफा (नफातोटा खात्याला स्थानांतरीत) | | १,३९,४०० | | | |
| | | ४,०८,००० | | | ४,०८,००० |

**व्यापार खाते तयार करण्यासाठी रोजकीर्द नोंदी :**

लेखांकन वर्षाचे शेवटी प्रत्यक्ष खर्चाची आणि प्रत्यक्ष उत्पन्नाची खाती बंद करून त्यांच्या शिलका व्यापार खात्याला स्थानांतरीत करण्यात येतात. याकरिता करण्यात येणाऱ्या रोजकीर्द नोंदीना अंतिम नोंदी (closing entries) असे म्हणतात.

**अ) प्रारंभण स्कंध, खरेदी, प्रत्यक्ष खर्चाचे स्थानांतरण :–**

१) खरेदी परत खात्याला स्थानांतरण

खरेदी परत खाते ..................नावे

खरेदी खात्याला

(खरेदी परत खरेदी खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

२) विक्री खाते -------- नावे

विक्री परत खात्याला

(विक्री परत विक्री खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

३) व्यापार खाते -------- नावे

प्रारंभण स्कंध खात्याला

प्रत्यक्ष खर्च खात्याला

खरेदी खात्याला

(प्रारंभण स्कंध, प्रत्यक्ष खर्च, खरेदी परत व खरेदी व्यापार खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

**ब) विक्री स्थानांतरण :-**

विक्री खाते -------- नावे

व्यापार खात्याला

(विक्री व्यापार खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

**क) संवरण स्कंधाचे व्यापार खात्याला स्थानांतरण केल्याची नोंद :-**

संवरण स्कंध खाते -------- नावे

व्यापार खात्याला

(संवरण स्कंध व्यापार खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

**ड) ढोबळ नफा / ढोबळ तोटा**

**१. ढोबळ नफा नफातोटा खात्याला स्थानांतरीत :-**

व्यापार खाते -------- नावे

नफातोटा खात्याला

(ढोबळ नफा नफातोटा खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

**२. ढोबळ तोटा नफातोटा खात्याला स्थानांतरीत :-**

नफातोटा खाते -------- नावे

व्यापार खात्याला

(ढोबळ तोटा नफातोटा खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

## ९.३ नफातोटा खाते (Profit and Loss Account)

नफातोटा खाते हे व्यवसायाचा अंतिम परिणाम दर्शविते. व्यापार खाते तयार केल्यानंतर पुढचे पाऊल म्हणजे नफातोटा खाते तयार करणे हे होय. ते अप्रत्यक्ष खर्च आणि अप्रत्यक्ष उत्पन्न या आधारावर तयार करण्यात येते. नफातोटा खाते व्यवसायाचा शुद्ध नफा किंवा शुद्ध तोटा दर्शविते. चालू वर्षाशी संबंधित सर्व अप्रत्यक्ष खर्च ज्यांचे शोधन करण्यात आले किंवा करावयाचे आहे ते सर्व नफातोटा खात्याला नावे केले जातात. तसेच चालू वर्षाशी संबंधीत सर्व अप्रत्यक्ष उत्पन्न जसे प्राप्त कमिशन, प्राप्त भाडे, मिळालेली कसर इत्यादी. नफातोटा खात्याला जमा बाजूला नोंदविले जातात. जर नफातोटा खात्याची जमा बाजूची बेरीज ही नावे बाजूच्या बेरजेपेक्षा जास्त असेल तर नफातोटा खात्यामध्ये जमा शिल्लक असल्याचे निदर्शनास येते म्हणजेच तो शुद्ध नफा होय. मात्र जर नफातोटा खात्याचे नावे बाजूची बेरीज ही जमा बाजूचे बेरजेपेक्षा जास्त असेल तर ती नावे शिल्लक दर्शविते म्हणजेच तो शुद्ध तोटा (Net loss) होय. शुद्ध नफातोटा भांडवल खात्याला स्थानांतरीत केला जातो. नफातोटा खाते हे नामधारी खाते आहे.

**नफातोटा खात्याचा नमूना**

**नफातोटा खाते**

**३१ मार्च -------- रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| ढोबळ तोटा (पुढे आणला) | | xxxx | ढोबळ नफा (पुढे आणला) | | xxxx |
| वेतन आणि मजुरी | | xxxx | प्राप्त भाडे | | xxxx |
| भाडे, दर आणि कर | | xxxx | प्राप्त वर्तन / कमिशन | | xxxx |
| विमा | | xxxx | प्राप्त कसर | | xxxx |
| बँक शुल्क | | xxxx | गुंतवणुकीवर व्याज | | xxxx |
| कसर / अपहार दिली | | xxxx | बँक ठेवीवर प्राप्त व्याज | | xxxx |
| अंकेक्षण शुल्क | | xxxx | इतर किरकोळ उत्पन्न | | xxxx |
| घसारा : | | | जुनी सं. बुडीत कर्ज निधी | xxxx | |
| जमीन व इमारत | xxxx | | (–) बुडीत कर्ज (तेरजेतील) | xxxx | |
| सयंत्र आणि यंत्र | xxxx | | (–) नवीन बुडीत कर्ज | xxxx | |
| उपस्कर (फर्निचर) | xxxx | xxxx | (–) नवीन सं.बु. कर्ज निधी | xxxx | xxxx |
| प्रवास खर्च | | xxxx | शुद्ध तोटा | | xxxx |
| जाहिरात | | xxxx | (भांडवल खात्याला स्थानांतरीत) | | |
| छपाई व लेखनसामग्री | | xxxx | | | |
| व्याज दिले | | xxxx | | | |
| असामन्य हानी (उदा. आग किंवा चोरीमुळे हानी) | | xxxx | | | |
| संवेष्टन खर्च | | xxxx | | | |
| वर्तन | | xxxx | | | |
| संशयित बुडीत कर्ज निधी खाते | | | | | |
| जुने बुडीत कर्ज | xxxx | | | | |
| (+) नवीन बुडीत कर्ज | xxxx | | | | |
| (+) नवीन बुडीत व संशयित कर्ज निधी | xxxx | | | | |
| (–) जुना बुडीत कर्ज निधी | xxxx | xxxx | | | |
| संपत्ती विक्रीवर तोटा | | xxxx | | | |
| शुद्ध नफा (भांडवल खात्यावर स्थानांतरीत) | | xxxx | | | |
| | | xxxx | | | xxxx |

**उदा. १**

खालील शिलकांवरून आपणास राजू ॲन्ड सन्स यांचे व्यापार व नफातोटा खाते ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता तयार करा.

| तपशील | नावे शिल्लक (₹) | तपशील | जमा शिल्लक (₹) |
|---|---|---|---|
| मजुरी | ९,२०० | खरेदीपरत (निर्गत प्रत्याय) | ६,५२० |
| खरेदी | ६६,८०० | विक्री | १,५२,९०० |
| आगत वाहन व्यय | ३,३५० | प्राप्त वर्तन / कमिशन | १८,००० |
| विक्रीपरत (आगत प्रत्याय) | ४.८०० | प्राप्त भाडे | ९,००० |
| प्रारंभण स्कंध | ३१,३०० | कसर मिळाली | ४,६०० |
| वेतन | १७,४०० | | |
| अधिकार शुल्क | ४,८०० | | |
| भाडे, दर व कर | १२,६८० | | |
| बुडीत कर्ज | ५०० | | |
| निर्गत वाहन व्यय | ३,७२० | | |
| छपाई व लेखनसामग्री | २,४०० | | |
| जाहिरात | १८,००० | | |
| दिलेली कसर | १,५२० | | |
| विमा | ५,८०० | | |
| कारखाना भाडे | ७,००० | | |
| वर्तन / कमिशन दिले | १,८०० | | |
| | १,९१,०२० | | १,९१,०२० |

संवरण स्कंधाचे मूल्य ₹ ५६,८५० होते.

**उत्तर :–**

**राजू ॲन्ड सन्स यांचे पुस्तकात**

**व्यापार खाते**

**३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ३१,३०० | विक्री | १,५२,९०० | |
| खरेदी | ६६,८०० | | वजा – विक्रीपरत | ४,८०० | १,४८,१०० |
| वजा – खरेदीपरत | ६,५२० | ६०,२८० | | | |
| | | | संवरण स्कंध | | ५६,८५० |
| मजुरी | | ९,२०० | | | |
| आगत वाहन व्यय | | ३,३५० | | | |
| अधिकार शुल्क | | ४,८०० | | | |
| कारखाना भाडे | | ७,००० | | | |
| ढोबळ नफा (पुढे नेला) (संतुलीत राशी) | | ८९,०२० | | | |
| | | २,०४,९५० | | | २,०४,९५० |

**नफातोटा खाते**
**३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| वेतन | | १७,४०० | ढोबळ नफा (पुढे आणला) | | ८९,०२० |
| जाहीरात | | १८,००० | प्राप्त वर्तन | | १८,००० |
| दिलेली कसर | | १,५२० | प्राप्त भाडे | | ९,००० |
| भाडे, दर व कर | | १२,६८० | कसर मिळाली | | ४,६०० |
| विमा | | ५,८०० | | | |
| बुडीत कर्ज | | ५०० | | | |
| निर्गत वाहन व्यय | | ३,७२० | | | |
| वर्तन दिले | | १,८०० | | | |
| छपाई व लेखनसामग्री | | २,४०० | | | |
| शुद्ध नफा (भांडवल खात्यात स्थानांतरीत) | | ५६,८०० | | | |
| | | **१,२०,६२०** | | | **१,२०,६२०** |

**नफातोटा खात्यातील काही महत्त्वाच्या पदांचे स्पष्टीकरण :–**

**अ) कार्यालय व प्रशासन खर्च :–**

हे खर्च दैनंदिन कार्यालय व्यवस्थापन आणि प्रशासन सुव्यवस्थित ठेवण्यासाठी करण्यात येतात. यामध्ये कार्यालय भाडे, विमा, टपाल आणि तार खर्च, अंकेक्षण शुल्क, छपाई व लेखनसामुग्री, वेतन, स्थिर संपत्तीवर घसारा दुरुस्ती आणि देखभाल इत्यादी खर्चाचा समावेश होतो.

**ब) विक्री व वितरण व्यय :–**

हे खर्च मालाची विक्री व वितरण करण्यासाठी करण्यात येतात. या खर्चामध्ये जाहिरात, निर्गत वाहन व्यय, साठवणूक, विक्रेत्याचे वेतन, विक्रीकर कमिशन, बुडीत कर्ज, बुडीत व संशयित कर्जनिधी, गोदाम भाडे, इतर विक्रीवरील खर्च इत्यादींचा समावेश होतो.

**क) वित्तीय खर्च :–**

हे खर्च व्यवसाय संचालनासाठी करण्यात येतात. यामध्ये कर्जावरील व्याज, बँक ओव्हरड्राफ्टवरील व्याज, बँक शुल्क, विपत्रांवरील कसर, दिलेली कसर, ठेवीवरील व्याज इत्यादींचा समावेश होतो.

**ड) असधारण नुकसान :–**

हे असाधारण नुकसान नफातोटा खात्यात दर्शविण्यात येतात. उदाहरणार्थ, आगीमुळे नुकसान, संक्रमणमध्ये माल नुकसान, संपत्ती विक्रीवर तोटा इत्यादी.

**इ) महसुली उत्पन्न :–**

मालाच्या विक्री व्यतिरीक्त मिळणारे सर्व उत्पन्न. उदा. प्राप्त कमिशन, प्राप्त कसर इत्यादी.

**फ) अव्यापारी किंवा अव्यवहार्य नफा** (Non trading or Non operation Imcome) :–

यामध्ये बँकेकडून मिळणारे उत्पन्न किंवा गुंतवणुकीवरील उत्पन्नाचा समावेश होतो. अन्य उत्पन्न जे अव्यापारी स्रोतापासून मिळते. उदाहरणार्थ, प्राप्त लाभांश, बँक ठेवीवर व्याज, संपत्ती विक्रीवरील नफा इत्यादी.

**ग) असाधारण फायदे (Abnormal gains) :–**

भांडवली गुंतवणुकीवर मिळणारे उत्पन्न किंवा फायदे याचा समावेश असाधारण उत्पन्नात होतो. उदाहरणार्थ, गुंतवणूक विक्रीवरील नफा. असे सर्व उत्पन्न नफातोटा खात्याच्या जमा बाजूवर दर्शवितात.

**नफातोटा खात्याशी संबंधीत रोजकीर्द नोंदी**

**अ) अप्रत्यक्ष खर्चाचे नफातोटा खात्याचे नावे बाजूस स्थानांतरण**

नफातोटा खाते --------- नावे

पगार खात्याला

भाडे खात्याला

जाहिरात खात्याला

विमा खात्याला इत्यादी

(सर्व अप्रत्यक्ष खर्च नफातोटा खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

**ब) विभिन्न उत्पन्नाची पदे नफातोटा खात्याचे जमा बाजूस स्थानांतरीत केल्याबद्दल –**

विविध अप्रत्यक्ष उत्पन्नाची खाती --------- नावे

(लाभांश, कसर, व्याज इत्यादी)

नफातोटा खात्याला

(विविध उत्पन्न नफातोटा खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

**क) शुद्ध नफा किंवा शुद्ध तोटा भांडवल खात्याला स्थानांतरणाच्या नोंदी**

**१) शुद्ध नफा भांडवल खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल**

नफातोटा खाते --------- नावे

भांडवल खात्याला

(शुद्ध नफा भांडवल खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

**२) शुद्ध तोटा भांडवल खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल**

भांडवल खाते --------- नावे

नफातोटा खात्याला

(शुद्ध तोटा भांडवल खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

शुद्ध नफा भांडवल खात्यात अधिक करण्यात यावा तर शुद्ध तोटा वजा करण्यात यावा.

## ९.४ ताळेबंद (Balance Sheet)

ताळेबंद हे विवरणपत्र आहे ज्यामध्ये व्यवसायाची संपत्ती आणि देयता दर्शविली जाते. एका विशिष्ट तारखेला व्यवसायाची वित्तीय स्थिती कशी आहे याची निश्चिती करण्यासाठी ताळेबंद तयार केला जातो.

ताळेबंद हे दोन बाजूंमध्ये विभागलेले एक विवरण पत्र आहे. डाव्या बाजूस 'देयता बाजू' समजली जाते आणि उजवी बाजू ही 'संपत्ती बाजू' समजली जाते. दोन्ही बाजूच्या बेरजा नेहमी समान असतात. ताळेबंद पत्रकात सर्व खात्यांच्या शिलका ज्या व्यापार व नफातोटा खात्यात दर्शविण्यात आल्या नाहीत त्या (वास्तविक व वैयक्तीक खाती) दर्शविण्यात येतात. ताळेबंद पत्रक व्यवसायाची आर्थिक स्थिती दर्शविते.

**मेसर्स यांचे पुस्तकात**

**ताळेबंद दि. ३१ मार्च ----- रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | xxx | | रोख | हस्थरथ | xx |
| (+) शुद्‌ध नफा | xx | | बँकेतील रोख | | xx |
| (+) भांडवलावर व्याज | xx | | प्राप्त विपत्र | | xx |
| | xxx | | विविध ऋणको | | xx |
| (−) उचल | xx | | ख्याती | | xx |
| (−) उचलीवर व्याज | xx | | उपस्कर | | xx |
| (−) शुद्‌ध तोटा | xx | xxx | सयंत्र व यंत्र | | xx |
| बँक कर्ज | | xx | जमीन व इमारत | | xx |
| अधिकोष अधिविकर्ष | | xx | पूर्वदत्त खर्च | | xx |
| विविध धनको | | xx | अप्राप्त उत्पन्न | | xx |
| देय्य विपत्र | | xx | संवरण स्कंध | | xx |
| अदत्त खर्च | | xx | | | |
| पूर्णप्राप्त उत्पन्न | | xx | | | |
| एकूण | | xxx | एकूण | | xxx |

**काही महत्त्वाच्या समायोजना आणि त्यांच्या रोजकिर्द नोंदी :-**

१) **संवरण स्कंध / वर्ष अखेरचा मालसाठा**

संवरण स्कंध खाते -------- नावे

व्यापार खात्याला

(वर्षअखेरचा माल व्यापार खात्याला स्थानांतरीत केल्याबद्‌दल)

२) **संपत्तीवर घसारा (Depreciation on assets) :-**

संपत्तीच्या गुणवत्तेत आणि मूल्यात कायमस्वरूपी आणि सातत्याने होणारी घट म्हणजे घसारा होय. घसारा स्थिर संपत्तीवर आकारण्यात येतो. स्थिर संपत्तीवर आकारलेला घसारा हे नुकसान आहे म्हणून नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर दर्शवितात आणि ताळेबंद पत्रकातील संपत्ती बाजूवरील संबंधित संपत्तीतून वजा करतात.

स्थिर संपत्तीवर घसारा आकारल्यास रोजकीर्दीत खालीलप्रमाणे रोजकीर्द नोंद करण्यात येते.

I) स्थिर संपत्तीवर घसारा आकारल्यास -

घसारा खाते -------- नावे

स्थिर संपत्तीच्या खात्याला

(स्थिर संपत्तीवर घसारा आकारल्याबद्‌दल)

II) घसाऱ्याची राशी नफातोटा खात्याला स्थानांतरीत केल्यास

नफातोटा खाते -------- नावे

घसारा खात्याला

(नफातोटा खात्याला घसारा स्थानांतरीत केल्याबद्‌दल)

३) **अदत्त खर्च / न दिलेले खर्च (Outstanding Expenses) :-**

अदत्त खर्च म्हणजे असे खर्च जे निर्मित झालेले असतात. परंतु त्यांचे लेखांकन वर्षात शोधन करण्यात आलेले नसते.

अशा खर्चाला अदत्त खर्च म्हणतात. अदत्त खर्चासाठी खालीलप्रमाणे रोजकीर्द नोंद करण्यात येते.

खर्च खाते -------- नावे

अदत्त खर्च खात्याला

(अदत्त खर्चाची राशी स्थानांतरीत केल्याबद्दल)

उदा. भाडे, वेतन इत्यादी

व्यापार किंवा नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर त्या विशिष्ट खर्चाच्या रकमेत मिळवा आणि ताळेबंद पत्रकाच्या देयता बाजूवर दर्शवा.

४) **पूर्वदत्त खर्च / आगावू दिलेला खर्च (Prepaid expenses) :-**

पूर्वदत्त खर्च म्हणजे असे खर्च होत ज्याचे शोधन चालू वर्षात केले जाते परंतु त्याचा लाभ पुढील वर्षामध्ये मिळणारा असतो. पूर्वदत्त खर्चासाठी खालीलप्रमाणे रोजकीर्द नोंद करण्यात येते.

पूर्वदत्त खर्च खाते -------- नावे

विशिष्ट खर्च खात्याला

(पूर्वदत्त खर्चाची राशी विशिष्ट खर्चातून वजा केल्याबद्दल)

उदा. विमा, जाहीरात इत्यादी)

व्यापार किंवा नफातोटा खात्याचे नावे बाजूवर संबंधीत खर्चातून वजा करण्यात यावे आणि ताळेबंद पत्रकाच्या संपत्ती बाजूवर पूर्वदत्त खर्च दर्शविण्यात यावा.

५) **अप्राप्त उत्पन्न (कमविलेले परंतु न मिळालेले उत्पन्न) :-**

आर्थिक वर्षाच्या कालावधीत कमविलेले परंतु न मिळालेले उत्पन्न म्हणजे अप्राप्त उत्पन्न होय.

अप्राप्त उत्पन्न खाते -------- नावे

उत्पन्न खात्याला

(उत्पन्न अप्राप्त असल्याबद्दल)

६) **पूर्वप्राप्त उत्पन्न / आगाऊ मिळालेले उत्पन्न**

पुढील वर्षाशी संबंधीत असलेले परंतु चालु आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या उत्पन्नास पूर्वप्राप्त उत्पन्न म्हणतात.

उत्पन्न खाते -------- नावे

पूर्वप्राप्त उत्पन्न खात्याला

(आगाऊ उत्पन्न मिळाल्याबद्दल)

७) **बुडीत कर्ज / अशोध्य ऋण (Bad debts) :-**

ऋणकोकडून वसूल न होणाऱ्या रकमेला बुडीत कर्ज असे म्हणतात. बुडीत कर्ज हा व्यवसाय उपक्रमाला होणारा तोटा होय. म्हणून बुडीत कर्जाची रक्कम नफातोटा खात्याला नावे करण्यात येते आणि ऋणको या पदातून वजा करण्यात येते. यासंबंधीच्या नोंदी पुढीलप्रमाणे होतील-

बुडीत कर्ज खाते -------- नावे

विविध ऋणको खात्याला

(अतिरीक्त बुडीत कर्जाची तरतूद केल्याबद्दल)

नाफातोटा खाते -------- नावे

बुडीत कर्ज खात्याला

(बुडीत कर्ज नफातोटा खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

८) **बुडीत व संशयित कर्ज निधी / अशोध्य व संदिग्ध ऋणार्थ संचिती** (Reserve for bad and doubtful debts) (New R.D.D.) :–

काही असेही ऋणको असू शकतात ज्यांच्याकडून वसूल होणे संदिग्ध असते. अशी कर्ज वसूल होऊही शकतात किंवा त्यांची वसुली होऊ शकत नाही. या कारणांसाठी जी तरतूद करण्यात येते तिला बुडीत व संशयित कर्ज निधी असे म्हणतात. ही तरतूद मागील वर्षाच्या अनुभवाच्या आधारावर करण्यात येते. भविष्यकाळात कर्जाची वसुली होऊ शकली नाही तर व्यवसायाला तोटा होतो. अशा तोट्याची भरपाई बुडीत कर्जाची तरतूद करून करता येते.

संशयित बुडीत कर्जाकरिता तरतुदीसाठीची रोजकीर्द नों पुढीलप्रमाणे आहे –

नफातोटा खाते -------- नावे

संशयित व बुडीत कर्जनिधी खात्याला

(बुडीत व संशयित कर्जनिधीची तरतूद केल्याबद्दल)

**टीप :–**

१) जेव्हा केवळ तेरजेमध्ये बुडीत कर्ज (नावेशिल्लक) देण्यात येते तेव्हा तो तोटा असतो आणि हा तोटा नफातोटा खात्याला नावे करण्यात येतो.

२) जेव्हा संशयित बुडीत कर्ज निधी (RDD) तेरजेमध्ये देण्यात येते तेव्हा अशा संशयित बुडीत कर्जनिधीला जुनी किंवा अस्तित्वात असलेली सं.बु. कर्ज निधी असे म्हणतात.

३) जेव्हा समायोजनेमध्ये संशयित बुडीत कर्जनिधी सुचविण्यात आला असेल तेव्हा त्या निधीला नवीन स.बु. कर्जनिधी असे म्हणतात.

९) **ऋणकोवर कसरीची तरतूद** (Provision for Discount on Debtors) :–

ऋणकोनी त्यांच्याकडून येणे असलेल्या रकमेचे शोधन अगोदर करावे यासाठी त्यांना कसर देण्यात येते अशी कसर व्यवसायाचा तोटा समजण्यात येते. अशा कसरीचे आगणन हे शुद्ध ऋणकोवर करण्यात येते.

(सकल ऋणकोतून बुडीत कर्ज व संशयित व बुडीत कर्ज निधीची रक्कम वजा केल्यावर)

ऋणकोवर कसरीची तरतूद संबंधी रोजकीर्द नोंद –

नफातोटा खाते -------- नावे

ऋणकोवर कसर तरतूद खात्याला

(ऋणकोवर कसरीची तरतूद केल्याबद्दल)

१०) **धनकोवर कसरीची तरतूद** (Provision for discount on Creditors) :–

ही ऋणकोवर कसरीच्या विरुद्ध आहे. धनकोंना देय निधी अगोदर शोधन केल्यास ते आपल्याला काही निश्चित रकमेची सूट (कसर) देतील. हा एक प्रकारचा व्यवसायाला मिळणारा अपेक्षित लाभ होय. अशा प्रकारे धनकोकडून प्राप्त कसरीस राशीला नफातोटा खात्यास जमा करण्यात येते आणि देयतेमध्ये घट होत असल्याने विविध धनकोंमधून वजा करण्यात येते.

धनकोंवर कसर तरतुदीची रोजकिर्द नोंद पुढीलप्रमाणे करण्यात येते.

धनकोंवर कसर तरतूद खाते -------- नावे

नफातोटा खात्याला

(धनकोंवर कसरीची तरतूद केल्याबद्दल)

११) **उचल / आहरण** (Drawings) :–

उचल म्हणजे व्यावसायिकाने आपल्या व्यवसायातून स्वतःच्या खाजगी उपयोगासाठी रोख, माल किंवा वस्तूंची केलेली उचल होय. मालक व्यवसायातून जेव्हा अशा प्रकारची उचल करतो तेव्हा व्यवसायातील त्याच्या भांडवलात घट होते. म्हणून उचल ही रक्कम ताळेबंदाचे देयता बाजूवर भांडवलातून वजा करण्यात येते. मालकाद्वारे स्वतःचे किंवा घरगुती उपयोगाकरिता व्यवसायातून उचललेला माल अविक्रीत माल असतो म्हणून त्याची नोंद व्यापार खात्याचे जमा बाजूस करण्यात येते किंवा खरेदीतून वजा करण्यात येते.

मालकाने व्यवसायातून मालाची उचल केली असता करण्यात येणारी रोजकीर्द नोंद –

I) उचल / आहरण खाते -------- नावे

व्यापार खात्याला

किंवा

खरेदी खात्याला

II) मालकाचे भांडवल खाते -------- नावे

उचल खात्याला

**१२) नमुना म्हणून मालाचे मोफत वितरण (Goods distributed as free Samples) :-**

ग्राहकांना मालाचे मोफत नमुना म्हणून वितरीत करणे म्हणजे एक प्रकारे मालाची जाहिरात करणे होय. म्हणून या व्यवहाराची नोंद नफातोटा खात्याचे नावे बाजूवर 'जाहिरात खर्च' या शिर्षकांतर्गत करण्यात येते. त्याचा दुसरा प्रभाव व्यापार खात्याचा जमा बाजूस करण्यात येतो किंवा व्यापार खात्याच्या नावे बाजूवरील खरेदी या पदातून वजा करतात.

नमुना म्हणून मोफत वितरीत करण्यात येणाऱ्या मालाची रोजकीर्द नोंद -

I) नमुना म्हणून मोफत माल वितरण खाते -------- नावे

व्यापार खात्याला

किंवा

खरेदी खात्याला

(नमुना म्हणून मोफत वितरीत केलेले माल व्यापार खात्याला किंवा खरेदी खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

II) जाहिरात खाते -------- नावे

नमुना म्हणून मोफत माल वितरण खात्याला

(नमुना म्हणून मोफत वितरीत केलेल्या मालाची रक्कम जाहीरात खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

**१३) भांडवलावर व्याज**

I) भांडवलावर व्याज खाते -------- नावे

भांडवल खात्याला

(भांडवलावर व्याज आकारल्याबद्दल)

II) नफातोटा खाते -------- नावे

भांडवलावर व्याज खात्याला

(भांडवलावरील व्याज नफातोटा खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

**१४) उचलीवर व्याज / आहरणावर व्याज**

I) भांडवल खाते -------- नावे

उचलीवर व्याज खात्याला

(उचलीवर व्याज आकारल्याबद्दल)

II) उचलीवर व्याज खाते -------- नावे

नफातोटा खात्याला

(उचलीवरील व्याज नफातोटा खात्याला स्थानांतरीत केल्याबद्दल)

## ९.५ समायोजनांचा परिणाम (EFFECTS OF ADJUSTMENTS)

| अ.क्र. | समायोजनेचे नाव | प्रथम परिणाम | अंतिम परिणाम |
|---|---|---|---|
| १) | संवरण स्कंध (लागत मूल्य किंवा बाजार मूल्य यापैकी कमी असलेली रक्कम) | व्यापार खात्याचे जमा बाजूवर | ताळेबंद पत्रकात संपत्ती बाजूवर दर्शवा |
| २) | स्थिर संपत्तीवर घसारा | नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर | ताळेबंद पत्रकाच्या संपत्ती बाजूवर त्या विशिष्ट संपत्तीमधून वजा करा. |
| ३) | अदत्त खर्च / देणे बाकी खर्च | व्यापार किंवा नफातोटा खात्यामध्ये त्या विशिष्ट खर्चामध्ये अधिक करा. | ताळेबंद पत्रकाच्या देयता बाजूवर दर्शवा. |
| ४) | पूर्वदत्त खर्च / आगाऊ दिलेले खर्च | व्यापार किंवा नफातोटा खात्यामध्ये त्या विशिष्ट खर्चातून वजा करा. | ताळेबंद पत्रकाच्या संपत्ती बाजूवर दर्शवा. |
| ५) | अप्राप्त उत्पन्न / उपार्जित उत्पन्न | नफातोटा खात्याच्या जमा बाजूवर विशिष्ट उत्पन्नातून अधिक करा. | ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर दर्शवा. |
| ६) | पूर्वप्राप्त उत्पन्न / आगाऊ मिळालेले उत्पन्न | नफातोटा खात्याच्या जमा बाजूवर विशिष्ट उत्पन्नातून वजा करा. | ताळेबंदाचे देयता बाजूवर दर्शवा. |
| ७) | बुडीत कर्ज / अशोध्य ऋण | नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर | ताळेबंदात संपत्ती बाजूवर ऋणकोमधून वजा करा |
| ८) | संशयित व बुडीत कर्ज बुडीत कर्ज निधी (RDD) | नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर | ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर विविध ऋणकोमधून वजा करा. |
| ९) | ऋणकोवर कसरीची तरतूद | नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर दर्शवा | ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर विविध ऋणकोमधून वजा करा. |
| १०) | धनकोवर कसर तरतूद | नफातोटा खात्याचे जमा बाजूवर | ताळेबंदाचे देयता बाजूवर विविध धनको म्हणून वजा करा. |
| ११) | व्यक्तीगत उपयोगासाठी माल घेणे / उचल | व्यापर खात्याच्या जमा बाजूवर दर्शवा<br>किंवा<br>खरेदी या पदातून वजा करा. | ताळेबंदाचे देयता बाजूवर भांडवलामधून वजा करा. |
| १२) | नमूना म्हणून मालाचे मोफत वितरण | व्यापर खात्याच्या जमा बाजूवर दर्शवा<br>किंवा<br>खरेदी या पदातून वजा करा. | नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर जाहिरात खर्च या नावाने दर्शवा. |
| १३) | भांडवलावरील व्याज | नफातोटा खात्याच्या नावे बाजूस दाखविणे | ताळेबंदामध्ये भांडवलामध्ये जमा करावे. |
| १४) | उचलीवरील व्याज | नफातोटा खात्यास जमा बाजूस दाखविणे | ताळेबंदामध्ये उचलीमध्ये जमा किंवा भांडवलातून वजा करा. |

**उदाहरण क्र. १ :**

मेसर्स भारद्‌वाज ॲन्ड सन्स यांची ३१ मार्च २०१९ रोजीची तेरीज पुढीलप्रमाणे आहे. तुम्हाला ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार आणि नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करावयाचा आहे.

**तेरीज – ३१ मार्च २०१९ रोजीची**

| तपशील | नावे रक्कम (₹) | तपशील | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| अधिकार शुल्क | ४,००० | विविध धनको | ५६,००० |
| उचल | १०,००० | विक्री | ८१,००० |
| मजुरी | ६,००० | खरेदीपरत | ३,००० |
| खरेदी | ७१,००० | भांडवल | २,५०,००० |
| रोख | १०,००० | देय विपत्र | २०,००० |
| विक्रीपरत | ५,००० | बँक अधिविकर्ष | ४०,००० |
| बँक | ४०,००० | | |
| विमा | १,००० | | |
| उपस्कर | ३४,००० | | |
| इमारत | १,२०,००० | | |
| विविध ऋणको | १,००,००० | | |
| बुडीत कर्ज | १,००० | | |
| विविध खर्च | ३,००० | | |
| प्रवास खर्च | २,००० | | |
| प्रारंभण स्कंध | २४,००० | | |
| निर्गत वाहन व्यय | १,६०० | | |
| भाडे | १,००० | | |
| आगत वाहन व्यय | ४०० | | |
| वेतन | १६,००० | | |
| | **४,५०,०००** | | **४,५०,०००** |

**समायोजना :–**

वर्षअखेर संवरण स्कंध मूल्य ₹ ५४,०००

उत्तर :–

**भारद्वाज ॲन्ड सन्स यांचे पुस्तकात**
**व्यापार व नफातोटा खाते**
**३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | २४,००० | विक्री | ८१,००० | |
| खरेदी | ७१,००० | | (–) विक्रीपरत | ५,००० | ७६,००० |
| (–) खरेदीपरत | ३,००० | ६८,००० | संवरण स्कंध | | ५४,००० |
| अधिकार शुल्क | | ४,००० | | | |
| मजुरी | | ६,००० | | | |
| आगत वाहन व्यय | | ४०० | | | |
| ढोबळ नफा (पुढे नेला) | | २७,६०० | | | |
| | | **१,३०,०००** | | | **१,३०,०००** |
| वेतन | | १६,००० | ढोबळ नफा पुढे आणला | | २७,६०० |
| भाडे | | १,००० | | | |
| विविध खर्च | | ३,००० | | | |
| विमा | | १,००० | | | |
| बुडीत कर्ज | | १,००० | | | |
| प्रवास खर्च | | २,००० | | | |
| निर्गत वाहन व्यय | | १,६०० | | | |
| शुद्ध नफा (भांडवल खात्याला स्थानांतरीत) | | २,००० | | | |
| | | **२७,६००** | | | **२७,६००** |

**ताळेबंद**
**३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | २,५०,००० | | इमारत | | १,२०,००० |
| (+) शुद्ध नफा | २,००० | | उपस्कर | | ३४,००० |
| | २,५२,००० | | विविध ऋणको | | १,००,००० |
| (–) उचल | १०,००० | २,४२,००० | बँक | | ४०,००० |
| विविध धनको | | ५६,००० | रोख | | १०,००० |
| देय विपत्र | | २०,००० | संवरण स्कंध | | ५४,००० |
| बँक अधिविकर्ष | | ४०,००० | | | |
| | | ३,५८,००० | | | ३,५८,००० |

**उदाहरण क्र. २ :**

मंगेश ट्रेडर्स यांची ३१ मार्च २०१८ ची तेरीज खालील प्रमाणे देण्यात आली आहे. आपण ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

**तेरीज ३१ मार्च २०१८ रोजीची**

| तपशील | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | ३२,७५० | |
| खरेदी | ५५,००० | |
| विक्री | -- | ८९,५०० |
| खरेदी परत (निर्गत प्रत्याय) | -- | २,६३० |
| विक्री परत (आगत प्रत्याय) | ४,४८० | -- |
| अधिकार शुल्क | ४,००० | -- |
| मजुरी आणि वेतन | ८,००० | -- |
| कार्यालय वेतन | ११,००० | -- |
| प्राप्य विपत्र | १९,२५० | -- |
| देय विपत्र | -- | १२,५०० |
| कार्यालयीन उपकरणे | २०,००० | -- |
| मोटार व्हॅन | ३०,४०० | -- |
| सयंत्र आणि यंत्र | २५,००० | -- |
| बुडीत कर्ज | २,५०० | -- |
| जाहीरात | ६,००० | -- |
| हस्तस्थ रोख | ५,००० | -- |
| विविध ऋणको | ३१,२५० | -- |
| संशयित बुडीत कर्ज निधी | -- | १,००० |
| विविध धनको | -- | २४,००० |
| भांडवल | | १,२५,००० |
| | २,५४,६३० | २,५४,६३० |

**समायोजना :–**

१) अखेरच्या संवरण स्कंधाचे ३१ मार्च २०१८ रोजी परिव्यय मूल्य ₹ १९,०००, असून त्याचे बाजार मूल्य ₹ २०,००० होते.

२) कार्यालय वेतन १ महिन्याचे देणे बाकी आहे.

३) पूर्वदत्त मजुरी ₹ १,०००.

४) घसारा आकारा–कार्यालयीन उपकरणांवर वार्षिक ५% दराने, मोटार व्हॅनवर वार्षिक १०% दराने आणि सयंत्र व यंत्रसामुग्रीवर वार्षिक १५% दराने.

उत्तर :–

**मंगेश ट्रेडर्स यांचे पुस्तकात**

**व्यापार व नफातोटा खाते**

**३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ३२,७५० | विक्री | ८९,५०० | |
| खरेदी | ५५,००० | | (–) विक्रीपरत | ४,४८० | ८५,०२० |
| (–) खरेदीपरत | २,६३० | ५२,३७० | संवरण स्कंध | | १९,००० |
| मजुरी आणि वेतन | ८,००० | | | | |
| वजा – पूर्वदत्त मजुरी | १,००० | ७,००० | | | |
| अधिकार शुल्क | | ४,००० | | | |
| ढोबळ नफा (पुढे नेला) | | ७,९०० | | | |
| | | **१,०४,०२०** | | | **१,०४,०२०** |
| कार्यालय वेतन | ११,००० | | ढोबळ नफा (पुढे आणला) | | ७,९०० |
| (+) अदत्त वेतन | १,००० | १२,००० | शुद्ध तोटा | | १९,३९० |
| बुडीत कर्ज | २,५०० | | (भांडवल खात्याला स्थानांतरीत) | | |
| (–) जुनी संशयित व बुडीत कर्जनिधी | १,००० | १,५०० | | | |
| घसारा : | | | | | |
| कार्यालयीन उपकरणे | १,००० | | | | |
| मोटार व्हॅन | ३,०४० | | | | |
| सयंत्र व यंत्र | ३,७५० | ७,७९० | | | |
| जाहीरात | | ६,००० | | | |
| | | २७,२९० | | | २७,२९० |

## ताळेबंद
## ३१ मार्च २०१८ रोजीचा

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | १,२५,००० | | कार्यालयीन उपकरणे | २०,००० | |
| (–) शुद्ध तोटा | १९,३९० | १,०५,६१० | (–) घसारा | १,००० | १९,००० |
| | | | मोटार व्हॅन | ३०,४०० | |
| अदत्त वेतन | | १,००० | (–) घसारा | ३,०४० | २७,३६० |
| देय विपत्र | | १२,५०० | संयंत्र व यंत्र | २५,००० | |
| विविध धनको | | २४,००० | (–) घसारा | ३,७५० | २१,२५० |
| | | | | | |
| | | | विविध ऋणको | | |
| | | | संवरण स्कंध | | ३१,२५० |
| | | | हस्तस्थ रोख | | १९,००० |
| | | | पूर्वदत्त मजुरी | | ५,००० |
| | | | | | १,००० |
| | | **१,४३,११०** | | | **१,४३,११०** |

**कार्य टीप :–**

**घसारा**

१) ५% ₹ २०,००० वर (कार्यालयीन उपकरणे) – २०,००० × ५/१००
घसारा ₹ १,०००.

२) १०% ₹ ३०,४०० वर (मोटर व्हॅन) – ३०,४०० × १०/१००
घसारा ₹ ३,०४०

३) १५% ₹ २५,००० (संयंत्र व यंत्र) – २५,००० × १५/१००
घसारा ₹ ३,७२५

**उदाहरण क्र. ३ :**

मेसर्स रीना एंटरप्रायजेस यांची तेरीज खालील प्रमाणे देण्यात आली आहे. आपण ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

**तेरीज – ३१ मार्च २०१८ रोजीची**

| तपशील | नावे शिल्लक (₹) | जमा शिल्लक (₹) |
|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | ४५,२०० | -- |
| भांडवल | -- | ३,००,००० |
| उचल | २०,००० | -- |
| उपस्कर | ६०,००० | -- |
| पूर्वदत्त विमा | १,७७० | -- |
| ऋणको आणि धनको | ७०,००० | १,२९,२५० |
| खरेदी आणि विक्री | ५७,००० | १,२०,००० |
| संयत्र व यंत्र | ५०,००० | -- |
| गुंतवणूक | ६८,००० | -- |
| कारखाना विमा | २६,००० | -- |
| हिशोब तपासणी शुल्क | २१,००० | -- |
| वाहन व्यय | १,८०० | -- |
| जमीन आणि इमारत | १,४०,००० | -- |
| भाडे | ७,१२० | -- |
| संशयीत बुडीत कर्जनिधी | -- | ६,००० |
| निर्गत वाहन व्यय | ८,३६० | -- |
| परत | २,००० | ९,००० |
| कसर | १,००० | ७,००० |
| प्राप्त वर्तन | -- | ८,००० |
| | **५,७९,२५०** | **५,७९,२५०** |

**समायोजना :–**

१) बुडीत कर्ज ₹ २,००० खातेबाद करा आणि ऋणकोवर २.५% दराने संशयीत बुडीत कर्ज निधीची तरतूद करा.

२) वर्षअखेर शिल्लक मालसाठ्याचे लागत मूल्य ₹ ४६,००० असून त्याचे विपणी मूल्य ₹ ४०,००० आहे.

३) जमीन व इमारतीवर वार्षिक ५% दराने आणि संयत्र व यंत्रावर वार्षिक १०% दराने घसारा आकारा.

४) पूर्वदत्त भाडे ₹ ३,५६०.

५) अदत्त वाहन व्यय ₹ १,२००.

उत्तर :

**मेसर्स रीना एंटरप्रायजेस यांच्या पुस्तकात**
**व्यापार व नफातोटा खाते ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

नावे जमा

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ४५,२०० | विक्री | १,२०,००० | |
| खरेदी | ५७,००० | | वजा विक्रीपरत | २,००० | १,१८,००० |
| वजा – खरेदीपरत | ९,००० | ४८,००० | | | |
| कारखाना विमा | | २६,००० | अखेरचा मालसाठा | | ४०,००० |
| वाहन व्यय | १,८०० | | | | |
| (+) अदत्त वाहन व्यय | १,२०० | | | | |
| | | ३,००० | | | |
| ढोबळ नफा (पुढे नेला) | | ३५,८०० | | | |
| | | **१,५८,०००** | | | **१,५८,०००** |
| हिशोबतपासणी शुल्क | | २१,००० | ढोबळ नफा (पुढे आणला) | | ३५,८०० |
| भाडे | ७,१२० | | कसर | | ७,००० |
| (–) पूर्वदत्त भाडे | ३,५६० | ३,५६० | जुनी सं.क. निधी | ६,००० | |
| निर्गत वाहन व्यय | | ८,३६० | (–) नवीन बुडीत कर्ज | २,००० | |
| कसर | | १,००० | | ४,००० | |
| घसारा : | | | (–) नवीन सं.क.नि. | १,७०० | २,३०० |
| जमीन व इमारत | | | | | |
| संयत्र व यंत्र | ७,००० | | प्राप्त वर्तन | | ८,००० |
| शुद्ध नफा | ५,००० | १२,००० | | | |
| (भांडवल खात्याला स्थानांतरीत) | | ७,१८० | | | |
| | | **५३,१००** | | | **५३,१००** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | ३,००,००० | | ऋणको | ७०,००० | |
| (+) शुद्ध नफा | ७,१८० | | (–) बुडीत कर्ज | २,००० | |
| | ३,०७,१८० | | | ६८,००० | |
| | | | (–) सं. कर्जनिधी | १,७०० | ६६,३०० |
| (–) उचल | २०,००० | २,८७,१८० | जमीन व इमारत | १,४०,००० | |
| धनको | | १,२९,२५० | (–) घसारा | ७,००० | १,३३,००० |
| अदत्त वाहन व्यय | | १,२०० | संयत्र व यंत्र | ५०,००० | |
| | | | (–) घसारा | ५,००० | ४५,००० |
| | | | पूर्वदत्त भाडे | | ३,५६० |
| | | | पूर्वदत्त विमा | | १,७७० |
| | | | उपस्कर | | ६०,००० |
| | | | गुंतवणूक | | ६८,००० |
| | | | अखेरचा मालसाठा | | ४०,००० |
| | | ४,१७,६३० | | | ४,१७,६३० |

**उदाहरण क्र. ४ :**

खांडवाला एंटरप्रायजेस यांची तेरीज खालील प्रमाणे आहे. त्यावरून ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

**तेरीज ३१ मार्च २०१८ रोजीची**

| तपशील | नावे बाकी (₹) | जमा बाकी (₹) |
|---|---|---|
| भांडवल | | ५५,००० |
| उचल | ३,००० | -- |
| प्रारंभण स्कंध | १६,४०० | -- |
| खरेदी | ३१,१०० | -- |
| आगत वाहन व्यय | २,५०० | -- |
| विक्री | -- | ५०,००० |
| विक्रीपरत | १,९८० | -- |
| भाडे आणि कर | ६,००० | -- |
| बुडीत कर्ज | ४०० | -- |
| संशयीत बुडीत कर्जनिधी | -- | -- |
| कसर | २,३७५ | १,५०० |
| वर्तन (Commission) | -- | -- |
| धनको | -- | २५५ |
| ऋणको | २०,२५० | १८,५०० |
| उपस्कर | ६,००० | -- |
| यंत्र | १२,००० | -- |
| ख्याती | ७,५०० | -- |
| मजुरी आणि वेतन | ७,००० | -- |
| वेतन (१० महिन्यांचे) | ५,००० | -- |
| जाहीरात | ९,००० | -- |
| कर्जरोख्यात गुंतवणूक | ८,५०० | -- |
| ऋण आणि अग्रिम | -- | १३,७५० |
| | **१,३९,००५** | **१,३९,००५** |

**समायोजना :-**

१) संवरण स्कंध ₹ १७,२५०.

२) पूर्वदत्त भाडे ₹ ४,०००.

३) ₹ १,००० बुडीत कर्जाची तरतूद करून ऋणकोवर २% प्रमाणे संशयीत बुडीत कर्जनिधीची तरतूद करा.

४) यंत्रावर ७.५% वार्षिक दराने आणि उपस्करावर वार्षिक १५% दराने घसारा आकारा.

५) धनकोवर ३% दराने कसर निधीची तरतूद करा.

उत्तर :

**खांडवाला एन्टरप्रायझेस यांचे पुस्तकात**

नावे **व्यापार व नफातोटा खाते ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता** जमा

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | १६,४०० | विक्री | ५०,००० | |
| खरेदी | | ३१,१०० | (–) विक्रीपरत | १,९८० | ४८,०२० |
| आगत वाहन व्यय | | २,५०० | संवरण स्कंध | | १७,२५० |
| मजुरी आणि वेतन | | ७,००० | | | |
| ढोबळ नफा (पुढे नेला) | | ८,२७० | | | |
| | | **६५,२७०** | | | **६५,२७०** |
| वेतन | ५,००० | | | | |
| (+) अदत्त वेतन | १,००० | ६,००० | ढोबळ नफा (पुढे आणला) | | ८,२७० |
| भाडे व कर | ६,००० | | धनकोवर प्राप्त कसर | | ५५५ |
| (–) पूर्वदत्त भाडे | ४,००० | २,००० | प्राप्त वर्तन | | २५५ |
| घसारा : | | | | | |
| यंत्र | ९०० | | शुद्ध तोटा | | १२,३८० |
| उपस्कर | ९०० | १,८०० | (भांडवल खात्याला | | |
| कसर | | २,३७५ | स्थानांतरीत) | | |
| जाहीरात | | ९,००० | | | |
| बुडीत कर्ज | ४०० | | | | |
| (+) नवीन बुडीत कर्ज | १,००० | | | | |
| (+) संशयीत बुडीत कर्जनिधी | ३८५ | | | | |
| | १,७८५ | | | | |
| (–) जुना बुडीत कर्ज | १,५०० | | | | |
| | | २८५ | | | |
| | | **२१,४६०** | | | **२१,४६०** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | ५५,००० | | यंत्र | १२,००० | |
| (–) शुद्ध तोटा | १२,३८० | | (–) घसारा | ९०० | ११,१०० |
| | ४२,६२० | | उपस्कर | ६,००० | |
| (–) उचल | ३,००० | ३९,६२० | (–) घसारा | ९०० | ५,१०० |
| धनको | १८,५०० | | ऋणको | २०,२५० | |
| (–) कसर | ५५५ | १७,९४५ | (–) बुडीत कर्ज | १,००० | |
| अदत्त वेतन | | १,००० | | १९,२५० | |
| ऋण व अग्रिम | | १३,७५० | (–) सं. कर्जनिधी | ३८५ | १८,८६५ |
| | | | संवरण स्कंध | | १७,२५० |
| | | | पूर्वदत्त भाडे | | ४,००० |
| | | | ख्याती | | ७,५०० |
| | | | कर्जरोख्यात गुंतवणूक | | ८,५०० |
| | | **७२,३१५** | | | **७२,३१५** |

**कार्य टीपा :**

१) तेरीज पत्रकात वेतन ₹ ५,००० दिलेले आहे आणि समायोजनेत २ महिन्याचे वेतन देणे बाकी आहे. याचाच अर्थ तेरीज पत्रकात १० महिन्याचे वेतन ₹ ५,००० म्हणून २ महिन्याचे वेतन ₹ १,००० याचाच अर्थ अदत्त वेतन ₹ १,०००.

| | | |
|---|---|---|
| | वेतन | ₹ ५,००० |
| (+) | अदत्त वेतन | ₹ १,००० |
| | | ₹ ६,००० |

२) ₹ १९,२५० वर २% प्रमाणे संशयीत बुडीत कर्जनिधी

$$\frac{१९,२५० \times २}{१००} = ₹ ३८५$$

∴ संशयीत बुडीत कर्जनिधी ₹ ३८५

३) धनकोवरील कसर निधी – १८, ५०० वर ३% दराने

$$\frac{१८,५०० \times ३}{१००} = ₹ ५५५$$

∴ धनकोवरील कसर निधी ₹ ५५५

**उदाहरण ५ :**

ओंकार यांच्या खालील तेरीज पत्रकावरून ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

**तेरीज ३१ मार्च २०१८ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम (₹) | जमा शिल्लक | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| ऋणको | ४५,००० | भांडवल | १,२०,००० |
| प्रारंभण स्कंध | ११,५५० | विक्री | ६०,७५० |
| खरेदी | ५३,२५० | खरेदीपरत | ४५० |
| विक्रीपरत | १,०५० | प्राप्त लाभांश | २,२५० |
| बुडीत कर्ज | ६०० | धनको | ३७,५०० |
| भाडे, दर आणि कर | २,६७० | अधिकोष अधिविकर्ष | २४,००० |
| विमा | २,४०० | संशयीत बुडीत कर्जनिधी. | १,२०० |
| कार्यालयीन उपकरणे | ४२,९०० | | |
| उपस्कर व अन्वायुक्ती | २८,५०० | | |
| बँकेतील रोख | ३२,२८० | | |
| वेतन | ३,००० | | |
| जाहीरात | १,८०० | | |
| दलाली | २,१०० | | |
| उचल | ३,००० | | |
| मजुरी | २,२५० | | |
| कोळसा, गॅस व पाणी | १,८०० | | |
| यंत्रसामुग्री | १२,००० | | |
| | **२,४६,१५०** | | **२,४६,१५०** |

**समायोजना :–**

१) संवरण स्कंधाचे मूल्य ₹. ४२,०००.

२) बुडीत कर्ज ₹ १,२०० खाते बाद करून ऋणकोवर २% प्रमाणे बुडीत व संशयीत कर्जनिधी निर्माण करा.

३) अदत्त खर्च – वेतन ₹ ७५० आणि मजुरी ₹ २२५

४) कार्यालयीन उपकरणांवर वार्षिक २.५% दराने आणि यंत्रसामुग्रीवर वार्षिक ५% दराने घसारा आकारा

५) पूर्वदत्त विमा ₹ ९००

**उत्तर :**

**ओंकार यांचे पुस्तकात**
**व्यापार व नफातोटा खाते**
**३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ११,५५० | विक्री | ६०,७५० | |
| खरेदी | ५३,२५० | | (–) विक्रीपरत | १,०५० | ५९,७०० |
| वजा – खरेदीपरत | ४५० | ५२,८०० | | | |
| मजुरी | २,२५० | | संवरण स्कंध | | ४२,००० |
| (+) अदत्त मजुरी | २२५ | २,४७५ | | | |
| कोळसा, गॅस, पाणी | | १,८०० | | | |
| ढोबळ नफा (पुढे नेला) | | ३३,०७५ | | | |
| | | **१,०१,७००** | | | **१,०१,७००** |
| वेतन | ३,००० | | ढोबळ नफा (पुढे आणला) | | ३३,०७५ |
| (+) अदत्त वेतन | ७५० | ३,७५० | प्राप्त लाभांश | | २,२५० |
| विमा | २,४०० | | | | |
| (–) पूर्वदत्त विमा | ९०० | १,५०० | | | |
| घसारा: | | | | | |
| जमीन व इमारत | १,०७३ | | | | |
| यंत्रसामुग्री | ६०० | १,६७३ | | | |
| भाडे, दर व कर | | २,६७० | | | |
| जाहिरात | | १,८०० | | | |
| बुडीत कर्ज | ६०० | | | | |
| (+) नवीन बु. कर्ज | १,२०० | | | | |
| (+) नवीन सं.बु. कर्जनिधी | ८७६ | | | | |
| | २,६७६ | | | | |
| (–) जुना बु.सं. कर्जनिधी | १,२०० | १,४७६ | | | |
| दलाली | | २,१०० | | | |
| शुद्ध नफा (भांडवल खात्याला स्थानांतरीत) | | २०,३५६ | | | |
| | | **३५,३२५** | | | **३५,३२५** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | १,२०,००० | | जमीन व इमारत | ४२,९०० | |
| (+) शुद्ध नफा | २०,३५६ | | (−) घसारा | १,०७३ | ४१,८२७ |
| | १,४०,३५६ | | | | |
| (−) उचल | ३,००० | १,३७,३५६ | यंत्रसामुग्री | १२,००० | |
| | | | (−) घसारा | ६०० | ११,४०० |
| धनको | | ३७,५०० | | | |
| अदत्त वेतन | | ७५० | उपस्कर व अन्वायुक्ती | | २८,५०० |
| अदत्त मजुरी | | २२५ | ऋणको | ४५,००० | |
| अधिकोष अधिविकर्ष | | २४,००० | (−) नवीन बुडीत कर्ज | १,२०० | |
| | | | | ४३,८०० | |
| | | | (−) सं.बु. कर्जनिधी | ८७६ | ४२,९२४ |
| | | | पूर्वदत्त विमा | | ९०० |
| | | | बँकेतील रोख | | ३२,२८० |
| | | | संवरण स्कंध | | ४२,००० |
| | | **१,९९,८३१** | | | **१,९९,८३१** |

**उदाहरण क्र. ६**

मे. अभय यांच्या खालील दिलेल्या तेरीज पत्रकावरून व अतिरिक्त माहितीवरून ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

**तेरीज ३१ मार्च २०१८ रोजीची**

| तपशील | नावे बाकी (₹) | जमा बाकी (₹) |
|---|---|---|
| भांडवल | -- | २,२८,००० |
| उपस्कर | ४०,००० | -- |
| विमा | १०,००० | -- |
| वेतन | १७,००० | -- |
| आगत वाहन व्यय | १,००० | -- |
| भाडे, दर आणि कर | ७,००० | -- |
| यंत्रसामग्री | ५०,००० | -- |
| मजुरी | ८,००० | -- |
| उचल | १४,००० | -- |
| कसर | -- | १,७०० |
| निर्गत वाहन व्यय | ५,६०० | -- |
| खरेदी आणि विक्री | ६२,००० | १,७१,००० |
| स्कंध (१.४.२०१७ रोजीचा) | ३१,००० | |
| परत | ५,००० | ६,३०० |
| भाडे | -- | ६,००० |
| संशयीत बुडीत कर्जनिधी | -- | ५,००० |

| | | |
|---|---|---|
| बुडीत कर्ज | २,००० | -- |
| जाहिरात | १०,९०० | -- |
| ऋणको आणि धनको | ९०,००० | ५४,००० |
| प्राप्त विपत्र | ३६,००० | -- |
| बँकेतील रोख | ८,५०० | -- |
| ६% दराचे बँक कर्ज (१.१०.२०१७ ला घेतले) | -- | ५०,००० |
| भागांवरील दलाली | ४,००० | -- |
| सुटी अवजारे | ३६,००० | -- |
| देय विपत्र | -- | १६,००० |
| ख्याती | १,००,००० | -- |
| | **५,३८,०००** | **५,३८,०००** |

**समायोजना :–**

१) वर्षअखेरच्या शिल्लक मालाचे लागत मूल्य ₹ ३७,००० असून विपणी मूल्य ₹ ४०,००० आहे.

२) ऋणकोवर ५% दराने संशयीत बुडीत कर्जनिधीची तरतूद करा.

३) अदत्त खर्च – मजुरी ₹ ३,०००, वेतन ₹ ३,६००

४) यंत्रसामुग्रीवर वार्षिक १०% दराने आणि उपस्करवर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

५) भांडवलावर ५% व्याज आकारा

६) पूर्वदत्त विमा ₹ २,०००

**उत्तर :**

**मे. अभय यांच्या पुस्तकात**
**व्यापार व नफातोटा खाते**
**३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ३१,००० | विक्री | १,७१,००० | |
| खरेदी | ६२,००० | | (–) विक्रीपरत | ५,००० | १,६६,००० |
| (–) खरेदीपरत | ६,३०० | ५५,७०० | | | |
| मजुरी | ८,००० | | संवरण स्कंध | | ३७,००० |
| (+) अदत्त मजुरी | ३,००० | ११,००० | | | |
| आगत वाहन व्यय | | १,००० | | | |
| ढोबळ नफा (पुढे नेला) | | १,०४,३०० | | | |
| | | **२,०३,०००** | | | **२,०३,०००** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतन | १७,००० | | ढोबळ नफा (पुढे आणला) | | १,०४,३०० |
| (+) अदत्त वेतन | ३,६०० | २०,६०० | प्राप्त कसर | | १,७०० |
| भांडवलावर व्याज | | ११,४०० | प्राप्त भाडे | | ६,००० |
| बुडीत कर्ज | २,००० | | | | |
| (+) नवीन बुडीत कर्ज | ४,५०० | | | | |
| | ६,५०० | | | | |
| (−) जुना सं.क.नि. | ५,००० | १,५०० | | | |
| घसारा : | | | | | |
| यंत्र | ५,००० | | | | |
| उपस्कर | २,००० | ७,००० | | | |
| विमा | १०,००० | | | | |
| (−) पूर्वदत्त विमा | २,००० | ८,००० | | | |
| भाडे, दर व कर | | ७,००० | | | |
| निर्गत वाहन व्यय | | ५,६०० | | | |
| जाहिरात | | १०,९०० | | | |
| बँक कर्जावर व्याज | | १,५०० | | | |
| भागांवरील दलाली | | ४,००० | | | |
| शुद्ध नफा (भांडवल खात्याला स्थानांतरीत) | | ३४,५०० | | | |
| | | **१,१२,०००** | | | **१,१२,०००** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | २,२८,००० | | यंत्रसामुग्री | ५०,००० | |
| (+) भांडवलावर व्याज | ११,४०० | | (−) घसारा | ५,००० | ४५,००० |
| | २,३९,४०० | | उपस्कर | ४०,००० | |
| (+) शुद्ध नफा | ३४,५०० | | (−) घसारा | २,००० | ३८,००० |
| | २,७३,९०० | | बँकेतील रोख | | ८,५०० |
| (−) उचल | १४,००० | २,५९,९०० | प्राप्त विपत्र | | ३६,००० |
| ६% बँक कर्ज | ५०,००० | | संवरण स्कंध | | ३७,००० |
| (+) व्याज (६ महिन्याचे) | १,५०० | ५१,५०० | ऋणको | ९०,००० | |
| धनको | | ५४,००० | (−) सं.बु. कर्जनिधी | ४,५०० | ८५,५०० |
| अदत्त वेतन | | ३,६०० | सुटी अवजारे | | ३६,००० |
| अदत्त मजुरी | | ३,००० | ख्याती | | १,००,००० |
| देय्य विपत्र | | १६,००० | पूर्वदत्त विमा | | २,००० |
| | | **३,८८,०००** | | | **३,८८,०००** |

**कार्य टीपा :–**

१) भांडवलावर व्याज

भांडवलावर वार्षिक ५% प्रमाणे व्याज

$$\frac{२,२८,००० \times ५}{१००} = ₹ ११,४००$$

भांडवलावर व्याज ₹ ११,४००

२) तेरीज पत्रकातील अदृष्य समायोजना

६% बँक कर्ज १ ऑक्टोबर २०१७ रोजी घेतलेले ₹ ५०,०००

कर्जावर ६ महिन्याचे व्याज

$$\frac{५०,००० \times ६ \times ६}{१०० \times १२} = \frac{३,०००}{२} = १,५००$$

बँक कर्जावर ६ महिन्याचे व्याज ₹ १,५००

**उदाहरण क्र. ७**

मेसर्स लक्ष्मी एंटरप्रायजेस यांच्या खाली दिलेल्या तेरीज व समायोजनाचे आधारे ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार आणि नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| नावे शिल्लक | रक्कम (₹) | जमा शिल्लक | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| यंत्रसामुग्री | १,००,००० | कसर | २,००० |
| विविध ऋणको | १,२०,८०० | विक्री | ७७,५०० |
| उपस्कर | ३६,००० | खरेदीपरत | ४,८०० |
| स्कंध (१ एप्रिल २०१८) | २०,००० | धनको | ५२,००० |
| मजुरी | १,८०० | १०% बँक कर्ज | ७६,००० |
| विद्युत शुल्क | ४,६०० | (१ ऑक्टोबर २०१८ ला घेतले) | |
| विमा | ५,००० | संशयीत बुडीत कर्जनिधी | १,६०० |
| कारखाना भाडे | ४,६०० | अधिकोष अधिविकर्ष | ५३,३०० |
| प्रवास खर्च | ३,६०० | भांडवल | १,००,००० |
| जाहीरात | २,५०० | | |
| कार्यालय भाडे | ३,००० | | |
| खरेदी | ४९,३०० | | |
| विक्रीपरत | २,८०० | | |
| बुडीत कर्ज | १,२०० | | |
| उचल | १२,००० | | |
| | ३,६७,२०० | | ३,६७,२०० |

**समायोजना :–**

१) ३१ मार्च २०१९ रोजीचा संवरण स्कंध ₹ ५७,०००

२) यंत्रसामुग्री आणि उपस्करावर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

३) पूर्वदत्त विमा ₹ १,०००.

४) बुडीत कर्ज ₹ ८०० अपलेखीत करून ऋणकोवर ५% दराने संशयीत बुडीत कर्जनिधी निर्माण करा आणि २% दराने ऋणकोवर देय कसर निधीची तरतूद करा. तसेच धनकोवर ३% दराने कसर निधीची तरतूद करा.

५) अदत्त खर्च – मजुरी ₹ २,२०० आणि कार्यालय भाडे ₹ १,४००.
६) मालकाने स्वतःसाठी ₹ २,००० चा माल उचलला.

**उत्तर :–**

**मेसर्स लक्ष्मी एंटरप्रायजेसच्या पुस्तकात**
**व्यापार व नफातोटा खाते**
**३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | २०,००० | विक्री | ७७,५०० | |
| खरेदी | ४९,३०० | | (–) विक्रीपरत | २,८०० | ७४,७०० |
| (–) खरेदीपरत | ४,८०० | ४४,५०० | मालकाची उचल | | २,००० |
| मजुरी | १,८०० | | संवरण स्कंध | | ५७,००० |
| (+) अदत्त मजुरी | २,२०० | ४,००० | | | |
| कारखाना भाडे | | ४,६०० | | | |
| ढोबळ नफा (पुढे नेला) | | ६०.६०० | | | |
| | | **१,३३,७००** | | | **१,३३,७००** |
| कार्यालय भाडे | ३,००० | | ढोबळ नफा | | ६०,६०० |
| (+) अदत्त भाडे | १,४०० | ४,४०० | (पुढे आणला) | | |
| विद्युत शुल्क | | ४,६०० | कसर | | २,००० |
| विमा | ५,००० | | धनकोवरील कसर | | १,५६० |
| (–) पूर्वदत्त विमा | १.००० | ४,००० | | | |
| प्रवास खर्च | | ३,६०० | | | |
| घसारा : यंत्रसामुग्री | ५,००० | | | | |
| : उपस्कर | १,८०० | ६,८०० | | | |
| बुडीत कर्ज | १,२०० | | | | |
| (+) बुडीत कर्ज नवीन | ८०० | | | | |
| (+) सं.बु. कर्जनिधी | ६,००० | | | | |
| | ८,००० | | | | |
| (–) जुना सं.बु. कर्जनिधी | १,६०० | ६,४०० | | | |
| ऋणकोवर कसर निधी | | २,२८० | | | |
| जाहीरात | | २,५०० | | | |
| बँक कर्जावर व्याज | | ३,८०० | | | |
| शुद्ध नफा | | २५,७०० | | | |
| (भांडवल खात्याला रवाना) | | | | | |
| | | ६४,१६० | | | ६४,१६० |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | १,००,००० | | यंत्र सामुग्री | १,००,००० | |
| (+) शुद्ध नफा | २५,७८० | | (–) घसारा | ५,००० | ९५,००० |
| | १,२५,७८० | | उपस्कर | ३६,००० | |
| (–) उचल | १४,००० | १,११,७८० | (–) घसारा | १,८०० | ३४,२०० |
| | | | पूर्वदत्त विमा | | १,००० |
| अदत्त मजुरी | | २,२०० | विविध ऋणको | १,२०,८०० | |
| अदत्त भाडे | | १,४०० | (–) नवीन बुडीत कर्ज | ८०० | |
| धनको | ५२,००० | | | १,२०,००० | |
| (–) देय कसर निधी | १,५६० | ५०,४४० | (–) सं.बु. कर्जनिधी | ६,००० | |
| १०% बँक कर्ज | ७६,००० | | | १,१४,००० | |
| (+) व्याज (६ म.) | ३,८०० | ७९,८०० | (–) देय्य कसर निधी | २,२८० | १,११,७२० |
| अधिकोष अधिविकर्ष | | ५३,३०० | | | |
| | | | संवरण स्कंध | | ५७,००० |
| | | २,९८,९२० | | | २,९८,९२० |

**उदाहरण क्र. ८**

श्रेयस यांच्या पुढील तेरजेवरून ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करावयाचा आहे.

**तेरीज पत्रक ३१ मार्च २०१८ रोजीचे**

| नावे बाकी | रक्कम (₹) | जमा बाकी | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | १४,४०० | धनको | १९,३०० |
| ऋणको | ३०,००० | निर्गत प्रत्याय | ७५० |
| आगत प्रत्याय | १,६५० | विक्री | २०,००० |
| भाडे, दर आणि विमा | २,२५० | कसर | ३६५ |
| उत्पादन मजुरी | २,५२५ | भांडवल | ७५,००० |
| कसर | ३९० | अदत्त व्याज | ६५० |
| व्याज | ४७५ | कर्ज | ७,५०० |
| आगीमुळे नुकसान | १,६५० | | |
| वेतन | १,८५० | | |
| खरेदी | २४,३५० | | |
| उचल | २,५०० | | |
| निर्गत वाहन व्यय | १,२७५ | | |
| सुटी अवजारे | १७,५०० | | |
| संयत्र व यंत्र | १४,००० | | |
| हस्तस्थ रोख | १,२५० | | |
| बँकेतील रोख | ७,५०० | | |
| | १,२३,५६५ | | १,२३,५६५ |

**समायोजना :**

१) ३१ मार्च २०१८ रोजी संवरण स्कंध ₹ ४८,५००
२) सुटी अवजारावर वार्षिक १०% प्रमाणे तसेच संयत्र व यंत्रावर वार्षिक १५% दराने घसारा आकारा.
३) पूर्वदत्त विमा ₹ ५०० आणि अदत्त भाडे ₹ ४०० आहे..
४) भांडवलावर वार्षिक ५% प्रमाणे आणि उचलीवर वार्षिक ७% दराने व्याजाची आकारणी करा.
५) अदत्त वेतन ₹ ६५० आहे.

**उत्तर :–**

**श्रेयस यांचे पुस्तकात**
**व्यापार व नफातोटा खाते**
**३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | १४,४०० | विक्री | २०,००० | |
| खरेदी | २४,३५० | | (–) आगत प्रत्याय | १,६५० | १८,३५० |
| (–) निर्गत प्रत्याय | ७५० | २३,६०० | | | |
| उत्पादन मजुरी | | २,५२५ | संवरण स्कंध | | ४८,५०० |
| ढेबळ नफा (पुढे नेला) | | २६,३२५ | | | |
| | | **६६,८५०** | | | **६६,८५०** |
| भाडे, दर व विमा | २,२५० | | ढोबळ नफा (पुढे आणला) | | २६,३२५ |
| (+) अदत्त भाडे | ४०० | | कसर | | ३६५ |
| | २,६५० | | उचलीवर व्याज | | ८८ |
| (–) पूर्व दत्त विमा | ५०० | २,१५० | (६ महिन्याचे) | | |
| कसर | | ३९० | | | |
| भांडवलावर व्याज | | ३,७५० | | | |
| घसारा : | | | | | |
| सुटी अवजारे | १,७५० | | | | |
| संयत्र व यंत्र | २,१०० | ३,८५० | | | |
| व्याज | | ४७५ | | | |
| वेतन | १,८५० | | | | |
| (+) अदत्त वेतन | ६५० | २,५०० | | | |
| आगीमुळे नुकसान | | १,६५० | | | |
| निर्गत वाहन व्यय | | १,२७५ | | | |
| शुद्ध नफा (भांडवल खात्याला वर्ग) | | १०,७३८ | | | |
| | | **२६,७७८** | | | **२६,७७८** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | ७५,००० | | जमीन व इमारत | १७,५०० | |
| (+) भांडवलावर व्याज | ३,७५० | | (–) घसारा | १,७५० | १५,७५० |
| (+) शुद्ध नफा | १०,७३८ | | संयत्र व यंत्र | १४,००० | |
| | ८९,४८८ | | (–) घसारा | २,१०० | ११,९०० |
| (–) उचल | २,५०० | | बँकेतील रोख | | ७,५०० |
| (–) उचलीवर व्याज | ८८ | ८६,९०० | संवरण स्कंध | | ४८,५०० |
| धनको | | १९,३०० | पूर्व दत्त विमा | | ५०० |
| कर्ज | | ७,५०० | ऋणको | | ३०,००० |
| अदत्त वेतन | | ६५० | हस्तस्थ रोख | | १,२५० |
| अदत्त व्याज | | ६५० | | | |
| अदत्त भाडे | | ४०० | | | |
| | | **१,१५,४००** | | | **१,१५,४००** |

**कार्य टीप :** उचलीवर व्याज ₹ २,५०० वर वार्षिक ७% दराने ६ महिन्याचे व्याज.

$$\frac{२,५०० \times ७ \times ६}{१०० \times १२} = \frac{१७५}{२} = ८७.५ = ८८$$

उचलीवर व्याज ₹ ८८ (जेव्हा उदाहरणात उचलीची तारीख दिली नसेल तेव्हा ६ महिन्याचे व्याज विचारात घ्यावे.)

**उदाहरण क्र. ९**

खाली दिलेल्या तेरजेवरून किसन ट्रेडर्स यांचे ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीची**

| तपशील | नावे बाकी (₹) | तपशील | जमा बाकी (₹) |
|---|---|---|---|
| स्कंध (१.४.२०१८) | १,५०,००० | विविध धनको | २,००,००० |
| खरेदी | ८,५०,००० | अधिकोष अधिविकर्ष | १,८०,००० |
| मजुरी | १,२०,००० | व्याज | ६०,००० |
| अप्रत्यक्ष खर्च | ८०,००० | संशयीत व बुडीत कर्जनिधी | १०,००० |
| विक्रीपरत | २०,००० | विक्री | १३,९५,३०० |
| गामक शक्ती व इंधन | ९५,००० | खरेदीपरत | ३०,००० |
| जाहीरात | ७०,००० | भांडवल | ६,००,००० |
| प्रवास खर्च | ३०,००० | | |
| विविध ऋणको | २.२०,००० | | |
| संयत्र व यंत्र | १,८०,००० | | |
| छपाई व लेखन सामग्री | १८,००० | | |
| संगणक व छपाई यंत्र | ५,२०,००० | | |
| विमा प्रव्याजी | २०,००० | | |
| हस्तस्थ रोख | ४२,३०० | | |
| बुडीत कर्ज | ११,००० | | |
| आहरण (उचल) | ४९,००० | | |
| | **२४,७५,३००** | | **२४,७५,३००** |

**समायोजना :-**

१) संवरण स्कंधाचे मूल्य ₹ २,८०,००० होते.

२) मजुरीचे ₹ ३०,०००, देणेबाकी आहे, अप्रत्यक्ष अदत्त वेतन ₹ २२,०००.

३) संयत्र व यंत्रसामुग्री या पदात १ ऑक्टोबर २०१८ रोजी खरेदी केलेल्या ₹ ४०,००० च्या यंत्राचा समावेश आहे. संयत्र व यंत्रावर वार्षिक १०% दराने व इमारतीवर वार्षिक १०% दराने घसारा आकारा.

४) ऋणकोवर ५% दराने संशयीत व बुडीत कर्जनिधीची तरतूद करा.

५) विमा प्रव्याजी ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता दिला आहे.

६) प्रवास खर्चामध्ये श्री किसन यांच्या खाजगी प्रवास केल्यासंबंधीचे ₹ १०,००० चा समावेश आहे.

**उत्तर :-**

**किसन ट्रेडर्स यांचे पुस्तकात**
**व्यापार व नफातोटा खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | १,५०,००० | विक्री | १३,९५,३०० | |
| खरेदी | ८,५०,००० | | (-) विक्रीपरत | २०,००० | १३,७५,३०० |
| (-) खरेदीपरत | ३०,००० | ८,२०,००० | संवरण स्कंध | | २,८०,००० |
| मजुरी | १,२०,००० | | | | |
| (+) अदत्त मजुरी | ३०,००० | १,५०,००० | | | |
| गामक शक्ती व इंधन | | ९५,००० | | | |
| ढोबळ नफा (पुढे नेला) | | ४,४०,३०० | | | |
| | | **१६,५५,३००** | | | **१६,५५,३००** |
| वेतन | ८०,००० | | ढोबळ नफा (पुढे आणला) | | ४,४०,३०० |
| (+) अदत्त वेतन | २२,००० | १,०२,००० | व्याज | | ६०,००० |
| जाहीरात | | ७०,००० | | | |
| प्रवास खर्च | ३०,००० | | | | |
| (-) खाजगी प्रवास खर्च | १०,००० | २०,००० | | | |
| छपाई व लेखनसामग्री | | १८,००० | | | |
| विमा प्रव्याजी | २०,००० | | | | |
| (-) पूर्वदत्त विमा | ५,००० | १५,००० | | | |
| बुडीत कर्ज | ११,००० | | | | |
| (+) स.बु. कर्जनिधी | ११,००० | | | | |
| | २२,००० | | | | |
| (-) जुना बुडीत कर्ज | १०,००० | १२,००० | | | |
| घसारा : | | | | | |
| संयत्र व यंत्र | १६,००० | | | | |
| इमारत | ५२,००० | ६८,००० | | | |
| शुद्ध नफा (भां.खा. स्थानांतरीत) | | १,९५,३०० | | | |
| | | **५,००,३००** | | | **५,००,३००** |

**ताळेबंद**
**३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | Assets | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | ६,००,००० | | हस्तस्थ रोख | | ४२,३०० |
| (+) शुद्ध नफा | १,९५,००० | | विविध ऋणको | २,२०,००० | |
| | ७,९५,००० | | (-) सं.बु. कर्जनिधी | ११,००० | २,०९,००० |
| (-) आहरण | ४९,००० | | संयत्र व यंत्र | १,८०,००० | |
| (-) खाजगी प्रवास खर्च | १०,००० | ७,३६,३०० | (-) घसारा | १६,००० | १,६४,००० |
| विविध धनको | | २,००,००० | | | |
| अधिकोष अधिविकर्ष | | १,८०,००० | इमारत | ५,२०,००० | |
| अदत्त मजुरी | | ३०,००० | (-) घसारा | ५२,००० | ४,६८,००० |
| अप्रत्यक्ष अदत्त वेतन | | २२,००० | संवरण स्कंध | | २,८०,००० |
| | | | पूर्वदत्त विमा | | ५,००० |
| | | **११,६८,३००** | | | **११,६८,३००** |

**कार्य टीप :** -

१) विमा प्रव्याजी ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता ₹ २०,०००, ३ महिन्याचा विमा प्रव्याजी पूर्वदत्त

$२०,००० \times \frac{३}{१२} = ₹\ ५,०००$

२) नवीन संशयित बुडीत कर्ज निधी ऋणकोत्तर ५%.

$२,२२,००० \times \frac{५}{१००} = ₹\ ११,०००$

३) संयत्र व यंत्राची शिल्लक ₹ १,८०,०००
१ ऑक्टोबर २०१७ रोजी खरेदी ₹ (-) ४०,०००
१,४०,०००

₹ १,४०,००० वर वार्षिक १०% दराने घसारा = ₹ १४,०००

₹ ४०,००० वर ६ महिन्याचा घसारा

$= \frac{४०,००० \times १० \times ६}{१०० \times १२} = ₹\ २,०००$

एकूण घसाऱ्याची राशी १४,००० + २,००० = ₹ १६,०००

**उदाहरण क्र. १०**

३१ मार्च २०१९ ची खाली देण्यात आलेली तेरीज आणि अतिरिक्त माहितीवरून अरुण यांचे पुस्तकात व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम (₹) | जमा शिल्लक | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| ऋणको | २४,००० | भांडवल | २५,००० |
| प्रारंभण स्कंध | ८,००० | विक्री | २०,००० |
| अधिकार शुल्क | १,५०० | धनको | १०,००० |
| मजुरी | १,००० | खरेदीपरत | १,००० |
| वेतन | २,५०० | ऋण व अग्रिम | ८,००० |
| उचल | ३,००० | देय्य विपत्र | १२,००० |
| ख्याती | ८,००० | प्राप्त व्याज | १,००० |
| विक्रीपरत | ५०० | | |
| टेलीफोन शुल्क | १,००० | | |
| आगत वाहन व्यय | १,००० | | |
| निर्गत वाहन व्यय | १,००० | | |
| व्यापार खर्च | ५०० | | |
| विमा | २,००० | | |
| संयत्र व यंत्र | ६,००० | | |
| उपस्कर | ५,००० | | |
| खरेदी | १२,००० | | |
| | **७७,०००** | | **७७,०००** |

**समायोजना :–**

१) संवरण स्कंधाचे लागत मूल्य ₹ १३,००० असून बाजार मूल्य ₹ १५,००० होते.

२) घसारा आकारा :– संयत्र व यंत्रावर वार्षिक ५% आणि उपस्करावर वार्षिक १०% दराने

३) विम्याचे ₹ ७०० आगावू भरले आहेत.

४) वेतनाचे ₹ ८०० आणि मजुरीचे ₹ १,००० देणे बाकी आहे.

५) ऋणकोवर ५% प्रमाणे संदिग्ध ऋणार्थ संचिती (R.D.D.) निर्माण करा.

६) नमुना म्हणून ₹ ३,००० चा माल मोफत वाटण्यात आला.

उत्तर :–

**अरुण यांचे पुस्तकात**

**व्यापार व नफातोटा खाते दि. ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

नावे | | | | | जमा

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ८,००० | विक्री | २०,००० | |
| खरेदी | १२,००० | | (–) विक्रीपरत | ५०० | १९,५०० |
| (–) खरेदीपरत | १,००० | ११,००० | | | |
| अधिकार शुल्क | | १,५०० | | | |
| मजुरी | १,००० | | संवरण स्कंध | | १३,००० |
| (+) अदत्त मजुरी | १,००० | २,००० | नमुना म्हणून मोफत | | ३,००० |
| आगत वाहन व्यय | | १,००० | वाटलेला माल | | |
| ढोबळ नफा (पुढे नेला) | | १२,००० | | | |
| | | **३५,५००** | | | **३५,५००** |
| विमा | २,००० | | ढोबळ नफा पुढे आणला | | १२,००० |
| (–) पूर्वदत्त विमा | ७०० | १,३०० | प्राप्त व्याज | | १,००० |
| वेतन | २,५०० | | | | |
| (+) अदत्त वेतन | ८०० | ३,३०० | | | |
| घसारा : | | | | | |
| संयंत्र व यंत्र | ३०० | | | | |
| उपस्कर | ५०० | ८०० | | | |
| संदिग्ध ऋणार्थ संचिती | | १,२०० | | | |
| निर्गत वाहन व्यय | | १,००० | | | |
| टेलीफोन शुल्क | | १,००० | | | |
| व्यापार खर्च | | ५०० | | | |
| नमुना म्हणून मोफत | | ३,००० | | | |
| वाटलेला माल | | | | | |
| शुद्ध नफा | | ९०० | | | |
| (भांडवल खात्याला स्थानांतरीत) | | | | | |
| | | **१३,०००** | | | **१३,०००** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | २५,००० | | संवरण स्कंध | | १३,००० |
| (+) शुद्ध नफा | ९०० | | संयंत्र व यंत्र | ६,००० | |
| | २५,९०० | | (–) घसारा | ३०० | ५,७०० |
| (–) उचल | ३,००० | २२,९०० | उपस्कर | ५,००० | |
| धनको | | १०,००० | (–) घसारा | ५०० | ४,५०० |
| अदत्त खर्च : | | | पूर्वदत्त विमा | | ७०० |
| वेतन | ८०० | | ख्याती | | ८,००० |
| मजुरी | १,००० | १,८०० | ऋणको | २४,००० | |
| ऋण व अग्रिम | | ८,००० | (–) सं.ऋ.स. | १,२०० | २२,८०० |
| देय्य विपत्र | | १२,००० | | | |
| | | **५४,७००** | | | **५४,७००** |

**उदाहरण क्र. ११**

३१ मार्च २०१९ ची खाली देण्यात आलेली तेरीज आणि अतिरिक्त माहितीवरून प्रविण ॲन्ड सन्स यांचे व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीची**

| तपशील | नावे शिल्लक (₹) | तपशील | जमा शिल्लक (₹) |
|---|---|---|---|
| रोख | ४,००० | संशयीत व बुडीत कर्जनिधी | १,६०० |
| प्रारंभण स्कंध | १०,००० | धनको | ५०,२८० |
| मजुरी | ६,००० | विक्री | ६२,००० |
| व्याज | ३,००० | खरेदीपरत | १,७२० |
| वेतन | १२,००० | बँक अधिविकर्ष | २०,००० |
| उचल | १०,००० | प्राप्त वर्तन | २,८०० |
| जाहीरात | १,२०० | भांडवल | १,००,००० |
| यंत्रसामुग्री | ५१,००० | | |
| छपाई व लेखनसामग्री | १,२०० | | |
| ऋणको | ७६,००० | | |
| विक्रीपरत | १,५०० | | |
| खरेदी | ५४,५०० | | |
| बुडीत कर्ज | १,९२० | | |
| कसर | २,०८० | | |
| भाडे | ४,००० | | |
| | **२,३८,४००** | | **२,३८,४००** |

**समायोजना :–**

१) संवरण स्कंधाचे मूल्य ₹ ८४,०००

२) मजुरीचे ₹ ८०० आगावू दिलेले आहेत.

३) वेतनाचे ₹ ३,६०० आणि भाडे ₹ ३,००० देणे बाकी आहे.

४) बुडीत कर्ज ₹ २,००० अपलेखीत करून ऋणकोवर ३% दराने संशयीत व बुडीत कर्जनिधी निर्माण करा.

५) यंत्रसामुग्रीचे मूल्य ₹ ४८,००० पर्यंत कमी करण्यात यावे.

६) भांडवलावर वार्षिक ५% दराने व्याजाची आकारणी करा.

उत्तर :–

## प्रविण ॲन्ड सन्स यांचे पुस्तकात
## व्यापार व नफातोटा खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता

नावे जमा

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | १०,००० | विक्री | ६२,००० | |
| खरेदी | ६४,५०० | | (–) विक्रीपरत | १,५०० | ६०,५०० |
| (–) खरेदीपरत | १,७२० | ६२,७८० | | | |
| मजुरी | ६,००० | | संवरण स्कंध | | ८४,००० |
| (–) पूर्वदत्त मजुरी | ८०० | ५,२०० | | | |
| ढोबळ नफा (पुढे नेला) | | ७६,५२० | | | |
| | | **१,४४,५००** | | | **१,४४,५००** |
| भाडे | ४,००० | | ढोबळ नफा पुढे आणला | | ७६,५२० |
| (+) अदत्त भाडे | ३,००० | ७,००० | प्राप्त वर्तन | | २,८०० |
| यंत्रावर घसारा | | ३,००० | | | |
| वेतन | १२,००० | | | | |
| (+) अदत्त वेतन | ३,६०० | १५,६०० | | | |
| बुडीत कर्ज | १,९२० | | | | |
| (+) नवीन बुडीत कर्ज | २,००० | | | | |
| (+) सं.बु. कर्जनिधी | २,२२० | | | | |
| | ६,१४० | | | | |
| (–) जुना बुडीत कर्ज निधी | १,६०० | ४,५४० | | | |
| भांडवलावर व्याज | | ५,००० | | | |
| व्याज | | ३,००० | | | |
| जाहिरात | | १,२०० | | | |
| छपाई व लेखनसामग्री | | १,२०० | | | |
| कसर | | २,०८० | | | |
| शुद्ध नफा (भांडवल खात्याला स्थानांतरीत) | | ३६,७०० | | | |
| | | **७९,३२०** | | | **७९,३२०** |

## ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | १,००,००० | | यंत्रसामुग्री | ५१,००० | |
| (+) भांडवलावर व्याज | ५,००० | | (–) घसारा | ३,००० | ४८,००० |
| (+) शुद्ध नफा | ३६,७०० | | ऋणको | ७६,००० | |
| | १,४१,७०० | | (–) नवीन बुडीत कर्ज | २,००० | |
| (–) उचल | १०,००० | १,३१,७०० | | ७४,००० | |
| धनको | | ५०,२८० | (–) सं.बु. कर्जनिधी | २,२२० | ७१,७८० |
| अदत्त वेतन | | ३,६०० | संवरण स्कंध | | ८४,००० |
| अदत्त भाडे | | ३,००० | पूर्वदत्त मजुरी | | ८०० |
| बँक अधिविकर्ष | | २०,००० | रोख | | ४,००० |
| | | **२,०८,५८०** | | | **२,०८,५८०** |

**कार्य टीप :**

१) नवीन बुडीत कर्ज ₹ २,००० आणि संशयीत कर्जनिधी ३%

| | |
|---|---|
| ऋणको | ₹ ७६,००० |
| (–) नवीन बुडीत कर्ज | ₹ २,००० |
| | ₹ ७४,००० |

₹ ७४,००० वर ३% प्रमाणे संशयीत बुडीत कर्जनिधी ₹ २,२२०

२) भांडवलावर व्याज ५% दराने

$$\frac{१,००,००० \times ५}{१००} = ₹\ ५,०००$$

भांडवलावर व्याज ₹ ५,०००

**उदाहरण क्र. १२**

विजय ट्रेडर्स यांची तेरीज खालीलप्रमाणे आहे. त्यावरून ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

**तेरीज ३१ मार्च २०१८ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम (₹) | जमा शिल्लक | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| भाडे, दर आणि कर | ३,५०० | संशयीत व बुडीत कर्जनिधी | २,५०० |
| विमा | १,००० | प्रकाशकडून कर्ज | ३४,७०० |
| मजुरी | ६,००० | विक्री | ९२,३०० |
| उचल | ३,००० | भांडवल | ४५,००० |
| विविध ऋणको | १५,००० | विविध धनको | १८,००० |
| खरेदी | ४०,००० | विविध उत्पन्न | ७,५०० |
| कसर | ९०० | देय्य विपत्र | १७,००० |
| संयत्र व यंत्र | ५०,००० | कसर | ३,००० |
| विविध व्यय | ३,६०० | | |
| दुरूस्ती | ९,४०० | | |
| स्कंध (१.४.२०१७) | १२,००० | | |
| उपस्कर | ४०,००० | | |
| बँक शिल्लक | ७,५०० | | |
| बुडीत कर्ज | ६०० | | |
| प्राप्य विपत्र | २७,५०० | | |
| | **२,२०,०००** | | **२,२०,०००** |

**समायोजना :–**

१) पूर्वदत्त विमा ₹ ४००

२) ऋणकोवर १०% प्रमाणे संशयीत व बुडीत कर्जनिधी निर्माण करा आणि ऋणकोवर ६% प्रमाणे देय कसर निधीची तरतूद करा.

३) अदत्त खर्च – विविध व्यय ₹ १,४०० आणि मजुरी ₹ १,०००

४) उपस्करावर वार्षिक १०% दराने आणि यंत्रसामुग्रीवर वार्षिक ४% दराने घसारा आकारा.

५) विविध उत्पन्न ₹ १,५०० आगावू प्राप्त झाले आहे.

६) ३१ मार्च २०१८ रोजीचा स्कंध ₹ ३०,०००

**उत्तर :–**

**विजय ट्रेडर्स यांचे पुस्तकात**

**व्यापार व नफातोटा खाते ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | १२,००० | विक्री | | ९२,३०० |
| खरेदी | | ४०,००० | | | |
| मजुरी | ६,००० | | संवरण स्कंध | | ३०,००० |
| (+) अदत्त मजुरी | १,००० | ७,००० | | | |
| ढोबळ नफा (पुढे नेला) | | ६३,३०० | | | |
| | | **१,२२,३००** | | | **१,२२,३००** |
| भाडे, दर आणि कर | | ३,५०० | ढोबळ नफा पुढे आणला | | ६३,३०० |
| विमा | १,००० | | | | |
| (–) पूर्वदत्त विमा | ४०० | ६०० | जुना बुडीत कर्ज | २,५०० | |
| विविध व्यय | ३,६०० | | (–) नवीन बुडीत कर्ज | १,५०० | |
| (+) अदत्त विविध व्यय | १,४०० | ५,००० | | १,००० | |
| घसारा : | | | (–) बुडीत कर्ज | ६०० | ४०० |
| उपस्कर | ४,००० | | विविध उत्पन्न | ७,५०० | |
| संयत्र व यंत्र | २,००० | ६,००० | (–) पूर्वप्राप्त उत्पन्न | १,५०० | ६,००० |
| कसर | ९०० | | | | |
| + ऋणकोवर देय्य | ८१० | १,७१० | कसर | | ३,००० |
| दुरूस्ती | | ४६,४९० | | | |
| शुद्ध नफा | | | | | |
| (भांडवल खात्याला स्थानांतरीत) | | | | | |
| | | **७२,७००** | | | **७२,७००** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | ४५,००० | | उपस्कर | ४०,००० | |
| (+) शुद्ध नफा | ४६,४९० | | (−) घसारा | ४,००० | ३६,००० |
| | ९१,४९० | | सयंत्र व यंत्र | ५०,००० | |
| (−) उचल | ३,००० | ८८,४९० | (−) घसारा | २,००० | ४८,००० |
| विविध धनको | | १८,००० | विविध ऋणको | १५,००० | |
| प्रकाशकडून कर्ज | | ३४,७०० | (−) सं. बुडीत कर्जनिधी | १,५०० | |
| अदत्त विविध व्यय | | १,४०० | | १३,५०० | |
| अदत्त मजुरी | | १,००० | (−) देय्य कसर निधी | ८१० | १२,६९० |
| पूर्वप्राप्त विविध उत्पन्न | | १,५०० | पूर्वदत्त विमा | | ४०० |
| देय्य विपत्र | | १७,००० | संवरण स्कंध | | ३०,००० |
| | | | बँक शिल्लक | | ७,५०० |
| | | | प्राप्य विपत्र | | २७,५०० |
| | | **१,६२,०९०** | | | **१,६२,०९०** |

**कार्य टीप :**

जुना संशयीत व बुडीत कर्जनिधी तेरीज पत्रकात दिलेला हा बुडीत कर्ज व नवीन संशयित व बुडीत कर्जनिधीपेक्षा जास्त असल्यामुळे तो नफातोटा खात्याच्या जमा बाजूवर ₹ ४०० ने दर्शविला आहे.

**उदाहरण क्र. १३**

अजय एंटरप्रायजेस यांची ३१ मार्च २०१९ रोजीची तेरीज खालील प्रमाणे आहे. त्यावरून ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता वार्षिक खाती तयार करा.

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीची**

| तपशील | नावे शिल्लक (₹) | जमा शिल्लक (₹) |
|---|---|---|
| ऋणको | ५२,८३५ | |
| प्रारंभण स्कंध | ८,६०५ | |
| खरेदी | २५,३७५ | |
| इंधन आणि शक्ती | १,८१८ | |
| धनको | | ४२,८६० |
| विक्रीवरील वाहतूक खर्च | १,८६० | |
| उचल | ५,००० | |
| भांडवल | | १,६०,००० |
| विक्री | | ३९,४७२ |
| परत | ८६० | १,३७५ |

| | | |
|---|---|---|
| बँकेतील रोख | १६,३७५ | |
| उपस्कर (१.७.२०१८ ला खरेदी) | ३९,५०० | |
| वेतन | ७,००० | |
| मोटार कार | २०,५०० | |
| मजुरी | ७,००० | |
| सामान्य खर्च | ७,२९५ | |
| ८% कर्ज (१.१०.२०१८ ला घेतले) | | १५,००० |
| बुडीत कर्ज | २,००० | |
| संशयीत व बुडीत कर्जनिधी | | ८०० |
| यंत्रे | ४०,८०० | |
| विमा | ५,००० | |
| देय विपत्र | | ६,८६६ |
| प्राप्त कमिशन | | १,४५० |
| गुंतवणूक | २६,००० | |
| | **२,६७,८२३** | **२,६७,८२३** |

**समायोजना :**

१) ३१ मार्च २०१८ रोजी शिल्लक असलेल्या मालाचे मूल्य ₹ २८,०००

२) बुडीत कर्ज ₹ १,५०० खाते बाद करून ऋणकोवर ५% दराने संशयीत व बुडीत कर्जनिधी निर्माण करा.

३) घसारा आकारा – उपस्कर, मोटार गाडी आणि यंत्रावर वार्षिक अनुक्रमे १०%, ७% आणि ५% प्रमाणे

४) अर्जित परंतु अप्राप्त कमिशन ₹ ५५०

५) अदत्त खर्च – सामान्य खर्च ₹ १,०००, मजुरी ₹ ५००

६) पूर्वदत्त विमा ₹ २,०००

**उत्तर :**

**अजय एंटरप्रायजेस**

**व्यापार व नफातोटा खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ८,६०५ | विक्री | ३९,४७२ | |
| खरेदी | २५,३७५ | | (–) विक्रीपरत | ८६० | ३८,६१२ |
| (–) खरेदीपरत | १,३७५ | २४,००० | | | |
| मजुरी | ७,००० | | संवरण स्कंध | | २८,००० |
| (+) अदत्त मजुरी | ५०० | ७,५०० | | | |
| इंधन आणि शक्ती | | १,८१८ | | | |
| ढोबळ नफा (पुढे नेला) | | २४,६८९ | | | |
| | | **६६,६१२** | | | **६६,६१२** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतन | | ७,००० | ढोबळ नफा पुढे आणला | | २४,६८९ |
| विमा | ५,००० | | प्राप्त वर्तन | १,४५० | |
| (–) पूर्वदत्त विमा | २,००० | ३,००० | + अप्राप्त वर्तन | ५५० | २,००० |
| विक्रीवरील वाहतूक खर्च | | १,८६० | निव्वळ तोटा | | ५,७७१ |
| सामान्य खर्च | ७,२९५ | | (भांडवल खात्याला | | |
| + अदत्त सामान्य खर्च | १,००० | ८,२९५ | स्थानांतर) | | |
| बुडीत कर्ज | २,००० | | | | |
| (+) नवीन बुडीत कर्ज | १,५०० | | | | |
| (+) सं. बुडीत कर्जनिधी | २,५६७ | | | | |
| | ६,०६७ | | | | |
| (–) जुना बुडीत कर्ज निधी | ८०० | ५,२६७ | | | |
| घसारा : | | | | | |
| मोटार कार | १,४३५ | | | | |
| उपस्कर | २,९६३ | | | | |
| यंत्रे | २,०४० | ६,४३८ | | | |
| कर्जावरील व्याज | | ६०० | | | |
| | | **३२,४६०** | | | **३२,४६०** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | १,६०,००० | | उपस्कर | ३९,५०० | |
| (–) शुद्ध तोटा | ५,७७१ | | (–) घसारा | २,९६३ | ३६,५३७ |
| | १,५४,२२९ | | (९ महिन्याचा) | | |
| (–) उचल | ५,००० | १,४९,२२९ | मोटार कार | २०,५०० | |
| देय विपत्र | | ६,८६६ | (–) घसारा | १,४३५ | १९,०६५ |
| धनको | | ४२,८६० | जमीन आणि इमारत | ४०,८०० | |
| अदत्त सामान्य खर्च | | १,००० | (–) घसारा | २,०४० | ३८,७६० |
| अदत्त मजुरी | | ५०० | विविध ऋणको | ५२,८३५ | |
| ८% कर्ज | १५,००० | | (–) नवीन बुडीत कर्ज | १,५०० | |
| (+) अदत्त व्याज | ६०० | १५,६०० | | ५१,३३५ | |
| | | | (–) सं.ऋ. संचिती | २,५६७ | ४८,७६८ |
| | | | संवरण स्कंध | | २८,००० |
| | | | अर्जित परंतु अप्राप्त वर्तन | | ५५० |
| | | | पूर्वदत्त विमा | | २,००० |
| | | | बँकेतील रोख | | १६,३७५ |
| | | | गुंतवणूक | | २६,००० |
| | | **२,१६,०५५** | | | **२,१६,०५५** |

**कृती १ :** विद्यार्थ्यांनी त्यांच्या घराजवळील स्वामित्व संख्येला भेट देऊन विविध माहिती गोळा करावी जसे खर्च, उत्पन्न, नफा, तोटा, खरेदी, विक्री, मालसाठा इत्यादी आणि व्यापारी, व्यापारी व नफातोटा खाते आणि ताळेबंद कशाप्रकारे तयार करतात ते विद्यार्थी जाणून घेतील.

**कृती २ :** विद्यार्थ्यांनी व्यापार व नफातोटा खाते आणि ताळेबंदातील चुका शोधून काढाव्यात. चुका विद्यार्थ्यांना शोधून काढण्यास सांगावे.

**व्यापार खाते आणि नफा तोटा खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | २५,००० | विक्री | १७,२०० | |
| खरेदी | १०,५०० | | (–) निर्गत प्रत्याय | २०० | १७,००० |
| (–) आगत प्रत्याय | ५०० | १०,००० | | | |
| मजुरी | | २,००० | संवरण स्कंध | | ४०,००० |
| जाहिरात | | ८०० | | | |
| अधिकार शुल्क | | ४०० | | | |
| ढोबळ नफा (पुढे नेला) | | १८,८०० | | | |
| | | **५७,०००** | | | **५७,०००** |
| वेतन | | ४,००० | ढोबळ नफा पुढे आणला | | १८,८०० |
| विमा | | ७,२०० | बँक कर्जावरील व्याज | | ६०० |
| जाहिरात | | २,००० | | | |
| भाडे | | ८०० | | | |
| प्राप्त कसर | | ४०० | | | |
| छपाई व लेखन सामुग्री | | ७०० | | | |
| शुध्द नफा | | ४,३०० | | | |
| | | **१९,४००** | | | **१९,४००** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | ७०,००० | | इमारत | | २०,००० |
| अधिक शुध्द नफा | ४,३०० | | संयत्र व यंत्र | | ३०,८०० |
| | ७४,३०० | | ऋणको | | ३३,००० |
| (–) उचल | ३०० | ७४,००० | वर्तन | | २,००० |
| धनको | | ९,८०० | संवरण स्कंध | | ४०,००० |
| अधिकोष कर्ज | | ३०,००० | | | |
| देय विपत्र | | ४,००० | | | |
| प्राप्य विपत्र | | २,००० | | | |
| पूर्वदत्त खर्च | | ८०० | | | |
| ख्याती | | ५,००० | | | |
| टपाल खर्च | | २०० | | | |
| | | **१,२५,८००** | | | **१,२५,८००** |

**टिप :** वरील अंतिम लेख विद्यार्थ्यांना कृतीसाठी दिलेल आहेत. तेरीज पत्रक इतर समायोजना दिलेल्या नसल्याने ताळेबंद जुळणार नाही.

## स्वाध्याय

**प्र.१ एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) व्यापार खाते म्हणजे काय?
२) नफातोटा खाते म्हणजे काय?
३) ताळेबंद का तयार करतात?
४) अंतिम खाती म्हणजे काय?
५) 'शुद्ध नफा' यापासून आपणास काय अर्थबोध होतो?
६) 'ढोबळ नफा' म्हणजे काय?
७) उपार्जित उत्पन्न ही संज्ञा स्पष्ट करा.
८) अदत्त खर्च ही संज्ञा स्पष्ट करा.
९) घसारा म्हणजे काय?
१०) 'पूर्वदत्त खर्च' यापासून आपणास काय अर्थबोध होतो?

**प्र.२ खालील विधानांकरिता एकशब्द / शब्दसमूह / संज्ञा द्या.**

१) न संपलेल्या, कालावधीसाठी करण्यात आलेला खर्च.
२) कमविलेले परंतु अद्यापपर्यंत न मिळालेले उत्पन्न.
३) विक्रीवर केलेला वाहतुकीसाठी खर्च
४) संपत्ती आणि देयतेचे विवरण.
५) व्यवसायाचा शुद्ध नफा किंवा शुद्ध तोटा जाणून घेण्यासाठी तयार करण्यात येणारे खाते.
६) लेखांकन वर्षाचे शेवटी शिल्लक असलेल्या मालाची किंमत.
७) संभाव्य बुडीत कर्जासाठी करण्यात आलेली तरतूद.
८) आर्थिक वर्षाच्या शेवटी व्यवसायाचा नफा किंवा तोटा व व्यवसायाची आर्थिक स्थिती जाणून घेण्यासाठी तयार करण्यात येणारे अंतिम विवरण.
९) मालाच्या विक्रय वृद्धीसाठी करण्यात येणारा खर्चाचा प्रकार.
१०) तेरीज तयार करण्यात आल्यानंतर पुरविण्यात येणारी अतिरीक्त माहिती.

**प्र.३ खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्यायाची निवड करा व विधाने पुन्हा लिहा.**

१) ............ म्हणजे संपत्तीचे देयतेवरील आधिक्य होय.
अ) ख्याती ब) भांडवल क) गुंतवणूक ड) उचल

२) मिळालेली कसर ही .......... खात्याच्या जमा बाजूवर स्थानांतरीत करतात.
अ) चालू ब) नफातोटा क) व्यापार ड) भांडवल

३) ...... म्हणजे विशिष्ट तारखेला व्यवसायाची आर्थिक स्थिती दर्शविणारे विवरण होय.
अ) व्यापार खाते ब) तेरीज क) नफातोटा खाते ड) ताळेबंद

४) अदत्त खर्च ताळेबंद पत्रकाच्या ...... बाजूवर दर्शवितात.
अ) देयता ब) संपत्ती क) उचल ड) जमा

५) उचलीवरील व्याज ...... खात्याचा जमा बाजूवर दर्शविले जाते.
अ) व्यापार ब) नफातोटा क) ख्याती ड) भांडवल

६) व्यापार खात्याची नावेबाकी म्हणजे ------ होय.

अ) ढोबळ तोटा ब) शुद्ध तोटा क) शुद्ध नफा ड) ढोबळ नफा

७) खरेदीवरील वाहतूक खर्च हा ------ खात्याच्या नावे बाजूवर दर्शविला जातो.

अ) व्यापार ब) नफातोटा क) भांडवल ड) बँक

८) नफातोटा खात्याची जमाशिल्लक --------- दर्शविते.

अ) शुद्ध नफा ब) ढोबळ नफा क) ढोबळ तोटा ड) शुद्ध तोटा

९) संवरण स्कंधाचे मूल्यांकन करताना लागतमूल्य किंवा बाजारमूल्य यापैकी जे ------ असेल त्या आधारावर निश्चित करण्यात येते.

अ) जास्त ब) कमी क) समान ड) यापैकी नाही

१०) जेव्हा उचलीची विशिष्ट तारीख दिली नसेल तर व्याज ------ महिन्याकरिता आकारतात.

अ) चार ब) सहा क) आठ ड) नऊ

## प्र.४ खालील विधाने बरोबर की चूक ते लिहा :

१) प्रत्येक समायोजनेचे किमान तीन परिणाम होतात.
२) तेरीज पत्रकातील प्रत्येक पदाचा केवळ एकच परिणाम होतो.
३) कमविलेले परंतु न मिळालेले उत्पन्न हे देयता आहे.
४) ख्याती ही काल्पनिक संपत्ती नाही.
५) नफातोटा खात्याची जमाबाकी शुद्ध नफा दर्शविते.

## प्र.५ रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :

१) ढोबळ नफा --------- खात्याला स्थानांतरीत करतात.
२) व्यापार खात्याची नावेबाकी --------- दर्शविते.
३) अप्राप्त उत्पन्न ताळेबंद पत्रकाच्या --------- बाजूवर दर्शवितात.
४) बँक कर्जावरील व्याज --------- खात्याच्या नावेबाजूवर दर्शवितात.
५) व्यवसायाचा --------- जाणून घेण्यासाठी नफातोटा खाते तयार केले जाते.
६) मालाच्या खरेदी आणि विक्रीचा परिणाम जाणून घेण्यासाठी --------- खाते तयार केले जाते.
७) सर्व अप्रत्यक्ष खर्च --------- खात्याला स्थानांतरीत करतात.
८) नफातोटा खात्याच्या जमा शिलकेपेक्षा नावे शिल्लक जास्त असल्यास --------- होतो.
९) सर्व प्रत्यक्ष खर्च --------- खात्याला स्थानांतरीत करतात.
१०) ताळेबंद हे संपत्ती व देयतेचे --------- आहे.

## प्र.६ असाधारण (odd) शब्द लिहा.

१) भाडे, वेतन, विमा, संयंत्र व यंत्र
२) खरेदी, संवरण स्कंध, ऋणको, कारखाना भाडे
३) भांडवल, देय्य विपत्र, ऋणको, अदत्त मजुरी
४) जाहीरात, प्रवास खर्च, कारखाना भाडे, विमा
५) हस्तस्थ रोख, ऋणको, अप्राप्त उत्पन्न, बुडीत व संशयीत कर्जनिधी

**प्र.७ खालील विधानाशी आपण सहमत आहात का असहमत आहात ते लिहा.**

१) बुडीत व संशयीत कर्जनिधी नफातोटा खात्याला नावे करतात.

२) ताळेबंद हे पत्रक असून खाते सुद्‌धा आहे.

३) अप्रत्यक्ष खर्च व्यापार खात्याच्या नावे बाजूवर दर्शवितात.

४) अधिकोष अधिविकर्ष ही अंतर्गत देयता आहे.

५) भांडवल म्हणजे संपत्तीचे देयतेवरील आधिक्य होय.

**प्र.८ खालील विधाने बरोबर करून पुन्हा लिहा.**

१) व्यापार खात्याची संतुलीत राशी शुद्‌ध नफा किंवा शुद्‌ध तोटा दर्शविते.

२) सर्व प्रत्यक्ष खर्च नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर लिहितात.

३) नफातोटा खात्याची जमा बाजूची बेरीज नावे बाजूच्या बेरजेपेक्षा जास्त असेल तर शुद्‌ध तोटा दर्शविते.

४) भांडवल खाते --------- नावे

नफातोटा खात्याला

(शुद्‌ध नफा भांडवल खात्याला स्थानांतरीत केल्याबद्‌दल)

५) व्यापार खाते --------- नावे

विक्री खाते --------- जमा

(विक्री व्यापार खात्याला स्थानांतरीत केल्याबद्‌दल)

**प्र.९ खालील गणना करा.**

१) भांडवल शोधून काढा.

| संपत्ती (₹) | | देयता (₹) | |
|---|---|---|---|
| इमारत | २०,००० | देय्य विपत्र | १८,००० |
| उपस्कर | १५,००० | धनको | २०,७०० |
| ऋणको | ३०,००० | अदत्त मजुरी | १,२५० |
| गुंतवणूक | १०,००० | | |
| बँकेतील रोख | ५,००० | | |
| संयत्र व यंत्र | २०,००० | | |

२) १ जुलै २०१८ रोजी ₹ ३५,५०० मूल्याची यंत्र सामुग्री खरेदी केली आणि त्याच दिवशी तिच्या स्थापनेसाठी ₹ ४,५०० खर्च केला. यंत्र सामुग्रीवर वार्षिक ७% दराने दरवर्षी ३१ मार्चला घसारा आकारण्यात येतो. घसाऱ्याची राशी निर्धारीत करा.

३) श्री. प्रमोद यांनी १ ऑक्टोबर २०१८ रोजी भारतीय स्टेट बँकेकडून १२% वार्षिक दराने ₹ ३,५०,००० कर्ज घेतले. ३१ मार्च २०१९ पर्यंत व्याजाची राशी निर्धारीत करा.

४) वार्षिक विमा प्रव्याजी ₹ ८,०००, १ डिसेंबर २०१८ रोजी दिले. ३१ मार्च २०१९ पर्यंतची रक्कम निश्चित करा.

५) ढोबळ नफा किंवा ढोबळ तोटा निर्धारीत करा. खरेदी ₹ १५,५००, विक्री ₹ ३०,००० आगत वाहन व्यय ₹ १,२००, प्रारंभण स्कंध ₹ ५,००० खरेदी परत ₹ ५००, संवरण स्कंध ₹ १८,०००.

१. **खालील खात्यांच्या शिलकांवरून श्रीमती जयश्री यांचे पुस्तकात ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार खाते तयार करा.**

| तपशील | नावे बाकी (₹) | जमा बाकी (₹) |
|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | ४१,००० | |
| खरेदी | ५९,००० | |
| खरेदीपरत | | ७,००० |
| विक्रीपरत | १,६०० | |
| विक्री | | १,०३,००० |
| मजुरी | ३,४०० | |
| आगत वाहन व्यय | १,००० | |
| अधिकार शुल्क | ४,००० | |
| | १,१०,००० | १,१०,००० |

संवरण स्कंध ₹ ४०,००० आहे.

२. **संजय बदर्स यांचे ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता नफातोटा खाते तयार करा.**

| | | |
|---|---|---|
| १) | बँक शुल्क | ₹ २२,००० |
| २) | व्याज (जमा) | ₹ १६,००० |
| ३) | विविध खर्च | ₹ ४२,००० |
| ४) | विमा | ₹ ३५,००० |
| ५) | वेतन | ₹ ४०,००० |
| ६) | दर आणि कर | ₹ १३,००० |
| ७) | टपाल | ₹ ८,००० |
| ८) | जाहिरात | ₹ ४०,००० |
| ९) | भाडे दिले | ₹ ३२,००० |
| १०) | बुडीत कर्ज | ₹ १०,००० |
| ११) | प्राप्त कमिशन | ₹ १७,५०० |
| १२) | छपाई व लेखनसामग्री | ₹ २१,००० |
| १३) | आगीमुळे नुकसान | ₹ १८,००० |
| १४) | कसर (नावे) | ₹ २३,००० |
| १५) | कसर (जमा) | ₹ ३७,००० |
| १६) | किरकोळ उत्पन्न | ₹ १४,००० |
| १७) | घसारा | ₹ ३४,००० |
| १८) | निर्गत वाहन व्यय | ₹ ६०,००० |
| १९) | गोदाम खर्च | ₹ ४०,००० |
| | टीप :- ढोबळ नफा | ₹ ४,०७,५०० |

३. **खाली दिलेल्या तेरजेवरून संजीव अ‍ॅण्ड सन्स यांचे पुस्तकात ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीची**

| तपशील | नावे शिल्लक (₹) | जमा शिल्लक (₹) |
|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | २२,००० | |
| खरेदी आणि विक्री | १,७८,००० | ४,६०,००० |
| निर्गत वाहन व्यय | ४,८०० | |
| संयत्र व यंत्र | ५०,००० | |
| ऋणको आणि धनको | ४४,००० | ७६,००० |
| परत | २,००० | ४,००० |
| इमारत | ५८,००० | |
| मोटार व्हॅन | ४०,००० | |
| छपाई व लेखनसामग्री | ३,००० | |
| मजुरी | २८,००० | |
| संशयीत व बुडीत कर्जनिधी | | ३,२०० |
| कमिशन | | २,४०० |
| कार्यालय व्यय | ५,४०० | |
| वाहतूक खर्च | ९,००० | |
| उपस्कर | २०,००० | |
| परिसर (Premises) | ८१.००० | |
| सुटी अवजारे | २०,४०० | |
| उचल | २४,७०० | |
| बँक अधिविकर्ष | | २२,००० |
| हस्तस्थ रोख | ७१,००० | |
| लाभांश | | ३,३०० |
| भांडवल | | १,४०,००० |
| वेतन | ४४,००० | |
| प्राप्त विपत्र व देय्य विपत्र | ५,६०० | ८,४०० |
| बुडीत कर्ज | २,४०० | |
| जाहीरात (३ वर्षाकरिता) | ६,००० | |
| | **७,१९,३००** | **७,१९,३००** |

**समायोजना :**

१) ३१ मार्च २०१९ रोजी संवरण स्कंधाचे लागतमूल्य ₹ ६०,००० आणि बाजारमूल्य ₹ ७०,०००.

२) अदत्त खर्च – मजुरी ₹ ४,०००, वेतन ₹ २,४००

३) मोटार व्हॅनवर वार्षिक १०% दराने आणि उपस्करावर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

४) बुडीत कर्ज ₹ २,००० खातेबाद करा आणि ऋणकोवर ५% दराने संशयीत व बुडीत कर्जनिधी निर्माण करा.

५) भांडवलावर वार्षिक १०% दराने व्याजाची आकरणी करा.

४. **नंदिनी ॲण्ड कंपनी यांची तेरीज खालील प्रमाणे आहे. त्यावरून ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीची**

| तपशील | नावे शिल्लक (₹) | जमा शिल्लक (₹) |
|---|---|---|
| सुटी अवजारे | १,१०,००० | |
| उपस्कर व अन्वायुक्ती | ८१,००० | |
| बुडीत कर्ज | १,४०० | |
| विविध ऋणको | ८१,६०० | |
| स्कंध (३१ मार्च २०१८) | ५२,००० | |
| खरेदी | ७७,००० | |
| रोख विक्री | | २१,००० |
| उधार विक्री | | ८१,००० |
| परत | ४०० | ६०० |
| जाहिरात | ४,८०० | |
| दर, कर आणि विमा | ६,००० | |
| दुरूस्ती आणि देखभाल | १,२०० | |
| वेतन ($\frac{२}{३}$ कार्यालयासाठी) | १८,००० | |
| भाडे (११ महिन्याचे) | २,२०० | |
| यंत्रसामुग्री (१ ऑक्टोबर २०१८ रोजी खरेदी केलेली ₹ १२,००० समाविष्ट) | ८४,००० | |
| भांडवल | | ३,६०,००० |
| संशयीत व बुडीत कर्जनिधी | | ८,००० |
| विविध धनको | | ७०,००० |
| उचल | १४,००० | |
| व्याज | | १,२०० |
| लाभांश | | २,८०० |
| बँक शिल्लक | ४०,००० | |
| अधिकार शुल्क | ६,००० | |
| ९% बँक कर्ज (३० सप्टेंबर २०१८) | | ४०,००० |
| निर्गत वाहन व्यय | ४,००० | |
| कसर | १,००० | |
| | **५,८४,६००** | **५,८४,६००** |

**समायोजना :–**

१) संवरण स्कंध ₹ १,००,०००

२) बुडीत कर्ज ₹ २,००० अपलेखीत करून ऋणकोवर ५% प्रमाणे संशयीत व बुडीत कर्जनिधी निर्माण करा.

३) यंत्रसामुग्रीवर वार्षिक १०% दराने घसारा आकारा आणि सुटी अवजारे पुनर्मुल्यांकन ₹ १,००,००० करावे.

४) भांडवलावर वार्षिक २% दराने व्याज आकारा.

५. **खालील तेरीज आणि समायोजनाच्या आधारे अब्दुल ट्रेडर्स यांचे ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता वार्षिक खाती तयार करा.**

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम (₹) | जमा शिल्लक | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| वेतन | १०,००० | प्राप्त व्याज | २,४०० |
| खरेदी | ७१,४०० | भांडवल | १,६०,००० |
| भाडे (११ महिन्याचे) | २,२०० | विक्री | ८५,००० |
| यंत्रसामुग्री | ५६,००० | संशयित बुडीत कर्जनिधी | २,००० |
| अग्रिम मजुरी | ४,००० | प्राप्त कमिशन | १,६०० |
| प्रारंभण स्कंध | २०,००० | देय्य विपत्र | ९,२०० |
| बुडीत कर्ज | १,००० | धनको | ५६,००० |
| पूर्वदत्त विमा | २,४०० | | |
| मजुरी | २,६०० | | |
| सुटी अवजारे | २६,००० | | |
| अप्राप्त कमिशन | ४०० | | |
| विविध ऋणको | ६४,००० | | |
| रोख | १,००० | | |
| बँक | ३,००० | | |
| उचल | ७,६०० | | |
| गाडी भाडे | १,००० | | |
| प्राप्य विपत्र | १३,६०० | | |
| अरुणाला कर्ज | ३०,००० | | |
| | **३,१६,२००** | | **३,१६,२००** |

**समायोजना :–**

१) संवरण स्कंधाचे मूल्य ₹ ८९,६००

२) अदत्त खर्च – वेतन ₹ २,०००, मजुरी ₹ ४,०००

३) यंत्रसामुग्री वार्षिक १०% दराने घसारा आकारा.

४) बुडीत कर्ज ₹ २,००० खातेबाद करा आणि ऋणकोवर ५% दराने संशयीत व बुडीत कर्जनिधीची तरतूद करा.

६. **गिता इंटरप्रायजेस यांची तेरीज खालीलप्रमाणे आहे त्यावरून ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीची**

| तपशील | नावे शिल्लक (₹) | जमा शिल्लक (₹) |
|---|---|---|
| भांडवल | | ५०,००० |
| उचल | १,७५० | |
| प्रारंभण स्कंध | ८,००० | |
| खरेदी आणि विक्री | १६,५०० | २२,५०० |
| परत | ६२५ | ७५० |
| निर्गत वाहन व्यय | ४२५ | |
| उत्पादक मजुरी | १,००० | |
| अनुत्पादक मजुरी | ६०० | |
| वेतन | १,००० | |
| प्रवास खर्च | १,१२५ | |
| व्यापार खर्च | ३२५ | |
| इंधन आणि कोळसा | २५० | |
| कसर | ४६० | ५५० |
| सामान्य खर्च | २२५ | |
| बुडीत कर्ज | २०० | |
| संयत्र व यंत्र | २०,००० | |
| उपस्कर | ५,५०० | |
| संवेष्टन खर्च | १७५ | |
| विविध ऋणको आणि धनको | १०,०९० | ६,७५० |
| हस्तस्थ रोख | २,२०० | |
| गुंतवणूक | १०,२५० | |
| संशयीत व बुडीत कर्जनिधी | | १५० |
| | **८०,७००** | **८०,७००** |

**समायोजना :–**

१) ३१ मार्च २०१९ रोजी शिल्लक असलेल्या मालसाठ्याचे लागतमूल्य ₹ ७,१०० असून बाजार मूल्य ₹ ७,५०० आहे.

२) प्रवास खर्चात ₹ १२५ व्यवसाय मालकाच्या व्यक्तीगत प्रवास खर्चाचे आहेत.

३) अशोककडून येणे असलेल्या रकमेपैकी बुडीत कर्ज ₹ १७५ अपलेखीत करून विविध ऋणकोवर ५% दराने संशयीत व बुडीत कर्जनिधी निर्माण करा.

४) विविध ऋणकोवर तसेच धनकोवर अनुक्रमे २% आणि ३% कसर निधीची तरतूद करा.

५) संयत्र व यंत्रावर आणि उपस्करावर वार्षिक १०% दराने घसारा आकारा.

७. **खालील खात्यांच्या शिलकांवरून दिपक ॲन्ड कंपनी यांचे पुस्तकात ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**दिपक ॲन्ड कंपनी यांच्या खात्यांच्या शिलका ३१ मार्च २०१९ रोजीच्या**

| शिल्लक | रक्कम (₹) | शिल्लक | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| बँक | ३०,००० | वेतन | ३०,००० |
| भांडवल | १,२०,००० | बँक कर्ज | ३०,००० |
| देय्य विपत्र | ७,५०० | सामान्य खर्च | ७,५०० |
| उपस्कर | १९,५०० | व्याज दिले | १,५०० |
| प्राप्त कमिशन | ३,००० | यंत्रसामुग्री | २५,५०० |
| स्कंध (१.४.२०१८) | २७,००० | विक्री | ९६,००० |
| इमारत | ३७,५०० | खरेदी | ४२,००० |
| मजुरी | ७,५०० | ऋणको | ३१,५०० |
| धनको | ३७,५०० | खरेदीपरत | ३,००० |
| बुडीत कर्ज | ४,५०० | हस्तस्थ रोख | १६,५०० |
| संशयित बुडीत कर्जनिधी | ३,००० | | |
| विक्रीपरत | १,५०० | | |
| विमा प्रव्याजी (१.१.१९ ते ३१.१२.१९) | १८,००० | | |

**समायोजना :–**

१) अंतिम असलेल्या शिल्लक मालाचे मूल्य ₹ ६०,००० आहे.

२) कमिशनचे ₹ ३,००० अप्राप्त आहेत.

३) ऋणकोवर २% प्रमाणे आणि धनकोवर ३% प्रमाणे कसर निधीची तरतूद करा.

४) उपस्कराचे मूल्य ₹ ४,५०० ने कमी करा आणि इमारतीचे मूल्य १०% ने कमी करा.

५) वेतनाचे ₹ ४,५०० आणि मजुरीचे ₹ १,५०० देणे बाकी आहे.

८. **खालील तेरीज राजू ट्रेडर्स यांच्या लेखापुस्तकातील असून त्यावरून ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता खालील समायोजना विचारात घेऊन व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम (₹) | जमा शिल्लक | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| राजू यांची उचल | ५,००० | राजू यांचे भांडवल | २,००,००० |
| प्रारंभण स्कंध | ३०,००० | विक्री | १,६४,००० |
| मजुरी | ५,००० | खरेदीपरत | २,४०० |
| खरेदी | ६०,००० | धनको | ४०,००० |
| व्यापार व्यय | ८०० | कसर | १,६०० |
| अधिकार शुल्क | १,६०० | देय्य विपत्र | १३,६०० |
| वेतन | २०,००० | | |
| ऋणको | ८०,००० | | |
| संयत्र व यंत्र | ५६,००० | | |
| छपाई व लेखनसामग्री | २,४०० | | |
| बुडीत कर्ज | ९०० | | |
| कसर | १,२०० | | |
| उपस्कर | १६,००० | | |
| जाहिरात | ३,००० | | |
| निर्गत वाहन व्यय | ६०० | | |
| संगणक | १,२०,००० | | |
| प्राप्य विपत्र | १६,००० | | |
| हस्तस्थ रोख | १,१०० | | |
| अधिकोषस्थ रोख | २,००० | | |
| | **४,२१,६००** | | **४,२१,६००** |

**समायोजना :–**

१) संवरण स्कंधाचे लागतमूल्य ₹ ४०,००० असून बाजारमूल्य ₹ ४४,००० होते.

२) संयत्र व यंत्रावर, उपस्करावर, संगणकावर अनुक्रमे वार्षिक ५%, १०% आणि १५% दराने घसारा आकारा.

३) वेतन १० महिन्याचे दिलेले आहे.

४) ऋणको ₹ ४०० बुडीत कर्ज आकारून १०% दराने संशयित व बुडीत कर्जनिधी निर्माण करा.

५) जाहिरात खर्च २ वर्षासाठी.

९. **श्रद्धा एंटरप्रायजेस यांची तेरीज खालीलप्रमाणे आहे त्यावरून तुम्ही ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता वार्षिक खाती तयार करा.**

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम (₹) | जमा शिल्लक | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | २,४०,००० | भांडवल | १३,००,००० |
| खरेदी | ८,५०,००० | विविध धनको | १,२०,००० |
| विक्रीपरत | १५,००० | देय्य विपत्र | ६०,००० |
| मजुरी | २९,००० | विक्री | २५,००,००० |
| शक्ती आणि इंधन | २१,८०० | खरेदीपरत | ८,००० |
| प्रवास खर्च | १४,७०० | कसर | २,००० |
| अंकेक्षण शुल्क | ७,००० | अधिकोष अधिविकर्ष | १,५४,००० |
| अधिकार शुल्क | ७२,००० | संशयीत व बुडीत कर्जनिधी | ८,००० |
| कसर | १,७५० | | |
| टपाल खर्च | १३,५०० | | |
| बुडीत कर्ज | ३,००० | | |
| विविध ऋणको | ५,२०,००० | | |
| उपस्कर | १,२०,००० | | |
| संयत्र व यंत्र | १५,००,००० | | |
| स्वमालकीचा परिसर | ७,०२,००० | | |
| भाडे, दर आणि विमा | ४२,२५० | | |
| | **४१,५२,०००** | | **४१,५२,०००** |

**समायोजना :–**

१) पूर्वदत्त विमा ₹ २,२५०

२) संवरण स्कंधाचे लागत मूल्य ₹ ३,८०,००० असून बाजारमूल्य ₹ ४,००,००० होते.

३) मजुरीचे ₹ ६,००० आणि भाडे ₹ ५,००० देणे बाकी आहे.

४) ऋणकोवर ₹ १,५०० बुडीत कर्ज आकारून ५% दराने संशयीत व बुडीत कर्जनिधी निर्माण करा.

५) घसारा आकारा – उपस्करावर वार्षिक १०% दराने, संयत्र व यंत्रावर वार्षिक १०% दराने आणि स्वमालकीच्या परिसरावर वार्षिक १५% दराने.

**१०. अयुब ॲन्ड कंपनी यांची तेरीज खालील प्रमाणे आहे. त्यावरून ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम (₹) | जमा शिल्लक | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| हस्तस्थ रोख | ४,५७५ | कसर | ९०० |
| बँकेतील रोख | १५,४५० | अभयकडून कर्ज | १५,००० |
| उचल | १८,००० | धनको | १८,२२५ |
| उपस्कर | ६,००० | विक्री | १,९५,००० |
| सयंत्र व यंत्र | ४५,००० | खरेदीपरत | ३,००० |
| प्रारंभण स्कंध | ३०,००० | भांडवल | ९०,००० |
| खरेदी | १,२०,००० | | |
| वेतन आणि मजुरी | ३३,६०० | | |
| ऋणको | ३०,६०० | | |
| विक्रीपरत | ७,५०० | | |
| अंकेक्षण शुल्क | २,२५० | | |
| भाडे, दर आणि कर | ५,४०० | | |
| बुडीत कर्ज | ६०० | | |
| प्रवास खर्च | ७५० | | |
| विमा | १,२०० | | |
| अभयच्या कर्जावर व्याज | ४५० | | |
| व्यापार खर्च | ३०० | | |
| सामान्य खर्च | ४५० | | |
| | **३,२२,१२५** | | **३,२२,१२५** |

**समायोजना :–**

१) ३१ मार्च २०१९ रोजी शिल्लक मालाचे मूल्य ₹ ६०,०००.

२) पूर्वदत्त विमा ₹ ६०० आहे.

३) ऋणकोवर ₹ ६०० बुडीत कर्ज आकारून ५% दराने संशयीत व बुडीत कर्जनिधीसाठी तरतूद करा.

४) संयत्र व यंत्रावर वार्षिक १०% दराने घसारा आकारा आणि उपस्करचे पुनर्मुल्यांकन ₹ ४,५०० करा.

५) वेतनाचे ₹ ९०० देणे बाकी आहेत.

**११. रजनिश ॲन्ड सन्स यांची तेरीज खालील प्रमाणे आहे, आणि अतिरिक्त माहिती दिली आहे. त्यावरून ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**तेरीज ३१ मार्च २०१८ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम (₹) | जमा शिल्लक | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| स्कंध (१.४.२०१७) | १,२०,००० | भांडवल | ६,००,००० |
| खरेदी | ४,००,००० | विक्री | ३,००,००० |
| मजुरी | १७,००० | खरेदीपरत | ८,००० |
| वाहतूक खर्च | ६,००० | विविध धनको | १,८०,००० |
| वेतन | ६०,००० | देय्य विपत्र | ९०,००० |
| भाडे, दर आणि कर | १२,००० | ८% कर्ज | १,००,००० |
| विमा | ८,००० | (१.१०.२०१७ ला घेतले) | |
| अधिकार शुल्क | १०,००० | अधिकोष अधिविकर्ष | ७९,२०० |
| कसर | ४,५०० | | |
| कुरीयर आकार | ५,२०० | | |
| बुडीत कर्ज | ७,००० | | |
| व्यापार व्यय | २,५०० | | |
| उचल | १५,००० | | |
| यंत्रसामुग्री | ३,००,००० | | |
| उपस्कर | १,५०,००० | | |
| एकस्व | ५०,००० | | |
| विविध ऋणको | १,९०,००० | | |
| | **१३,५७,२००** | | **१३,५७,२००** |

**समायोजना :–**

१) वर्षअखेरच्या शिल्लक मालाचे लागतमूल्य ₹ ३,००,००० आणि बाजारमूल्य ₹ ३,२०,००० होते.

२) वेतन १० महिन्याचे दिलेले आहे.

३) विमा ३० जून २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता दिला आहे.

४) आपले ऋणको श्री अमित दिवाळखोर झाल्यामुळे त्यांच्याकडून येणे ₹ १०,००० वूसल होण्या जोगे नाही.

५) ऋणकोवर ५% प्रमाणे संशयित व बुडीत कर्जनिधीची तरतूद करा.

६) यंत्रसामुग्रीवर वार्षिक १०% दराने आणि उपस्करावर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

**१२. जॉन ॲन्ड सन्स यांची तेरीज खालीलप्रमाणे आहे. त्यावरून ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम (₹) | जमा शिल्लक | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| उचल (१ जुलै २०१८) | १२,००० | विविध धनको | ४०,००० |
| हस्तस्थ रोख | ८,००० | खरेदीपरत | ४,५०० |
| बँकेतील रोख | २०,००० | लाभांश | १०० |
| प्राप्य विपत्र | १५,००० | भाडे | २०० |
| मजुरी | १,८०० | विक्री | ५३,२०० |
| कसर | ७०० | बँक कर्ज | ५,००० |
| भाडे | २,००० | भांडवल | ९९,७०० |
| जाहिरात | ३,००० | | |
| बुडीत कर्ज | १,२०० | | |
| प्रवास खर्च | ८०० | | |
| खरेदी | ४०,००० | | |
| यंत्रसामुग्री | १५,००० | | |
| मोटार गाडी | १८,००० | | |
| विक्रीपरत | १,२०० | | |
| स्कंध (१ एप्रिल २०१८) | १०,००० | | |
| विविध ऋणको | ३५,००० | | |
| निर्गत वाहन व्यय | १,००० | | |
| ६% गुंतवणूक (१ सप्टेंबर २०१८) | १८,००० | | |
| | **२,०२,७००** | | **२,०२,७००** |

**समायोजना :–**

१) संवरण स्कंध ₹ २७,०००

२) यंत्रसामुग्रीवर वार्षिक १०% दराने आणि मोटार गाडीवर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

३) विविध ऋणकोवर ५% दराने संदिग्ध ऋणार्थ संचितीची तरतूद करा.

४) उचलीवर वार्षिक ५% दराने व्याज आकारा.

५) विविध धनकोवर ३% दराने कसरनिधी निर्माण करा.

६) पूर्वदत्त जाहिरात ₹ १,००० आहे.

७) भाडे ₹ १,५०० देणे बाकी आहे.

१३. **पुष्पकराज यांची ३१ मार्च २०१९ ची तेरीज खालील प्रमाणे आहे. त्या आधारे ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचे स्थिती विवरण तयार करा.**

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम (₹) | जमा शिल्लक | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| उचल | २,००० | भांडवल | ८०,००० |
| मोटार गाडी | ३०,००० | विविध धनको | २५,००० |
| हस्तस्थ रोख | १,००० | लाभांश | ४,८०० |
| प्राप्य विपत्र | २०,००० | कमिशन | २,५३५ |
| मजुरी | १,००० | ८% कर्ज (१.७.२०१८) | १३,७०० |
| कसर | २३५ | खरेदीपरत | ४०० |
| भाडे | ३०० | विक्री | ३८,६८० |
| जाहिरात | २,५०० | | |
| बुडीत कर्ज | ५०० | | |
| प्रवास खर्च | १,००० | | |
| खरेदी | २७,४०० | | |
| यंत्रसामुग्री | ३०,००० | | |
| कार्यालय व्यय | ५०० | | |
| विक्रीपरत | ६८० | | |
| प्रारंभण स्कंध | १०,००० | | |
| विविध ऋणको | ३५,५०० | | |
| निर्गत वाहन व्यय | ५०० | | |
| बँकेतील शिल्लक | २,००० | | |
| | **१,६५,११५** | | **१,६५,११५** |

**समायोजना :–**

१) ३१ मार्च २०१९ रोजी शिल्लक मालाचे मूल्य ₹ २८,००० होते.

२) विविध ऋणकोवर ५% दराने बुडीत कर्जनिधी निर्माण करा.

३) घसारा आकारा – मोटार गाडीवर वार्षिक ५% दराने आणि यंत्रसामुग्रीवर वार्षिक ७% दराने.

४) अदत्त खर्च – भाडे ₹ ८००, मजुरी ₹ १,०००

५) भांडवलावर वार्षिक ३% दराने व्याज आकारा.

६) मालकाने स्वतःच्या वैयक्तिक उपयोगाकरिता ₹ ४,००० चा माल उचलला.

**१४. ज्योती ट्रेडींग कंपनी यांच्या खालील तेरजेवरून ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचे स्थिती विवरण तयार करा.**

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे बाकी | रक्कम (₹) | जमा बाकी | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| स्कंध (१.४.२०१८) | ९,५०० | भांडवल | २,००,००० |
| विक्रीपरत | ७५० | संशयीत व बुडीत कर्जनिधी | १,००० |
| सुटी उपकरणे | ५५,००० | विक्री | ३८,७५० |
| ऋणको | ५०,८०० | खरेदीपरत | ४५५ |
| प्राप्य विपत्र | ४,००० | धनको | ४७,००० |
| खरेदी | २९,४५५ | देय्य विपत्र | ८,००० |
| उपस्कर | १५,००० | कसर | १,८४५ |
| वेतन | ५,००० | | |
| विक्रीवरील वाहतूक खर्च | ३,००० | | |
| कायदेशीर खर्च | २,००० | | |
| विमा | २,२०० | | |
| ख्याती | २०,००० | | |
| यंत्रसामुग्री | ४०,००० | | |
| मजुरी | २,३४५ | | |
| बँक शिल्लक | ३०,००० | | |
| उचल | ८,००० | | |
| गुंतवणूक | २०,००० | | |
| | **२,९७,०५०** | | **२,९७,०५०** |

**समायोजना :–**

१) संवरण स्कंधाचे परिव्यय (लागत) मूल्य ₹ ५८,००० आणि विपणी (बाजार) मूल्य ₹ ६०,००० आहे.

२) बुडीत कर्ज ₹ १,२०० अपलेखीत करून ऋणकोवर २% प्रमाणे संशयीत व बुडीत कर्जनिधीची तरतूद करा आणि धनकोवर ५% प्रमाणे कसर निधी निर्माण करा.

३) सुटी उपकरणे पुनर्मुल्यांकन ₹ ५२,००० करावे आणि उपस्करावर वार्षिक १०% दराने घसारा आकारा.

४) अदत्त खर्च – वेतन ₹ १,००० आणि मजुरी ₹ २२५

५) भांडवलावर वार्षिक २% प्रमाणे व्याज आकारा. तसेच उचलीवर वार्षिक १०% दराने व्याजाची आकारणी करा.

१५. **खालील खात्यांच्या शिलकांवरून मनिष एंटरप्रायजेस यांच्या पुस्तकात ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरीता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**तेरीज ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम (₹) | जमा शिल्लक | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| हस्तस्थ रोख | ५,२०० | भांडवल | ५०,००० |
| प्रारंभण स्कंध | १०,३७० | बँक कर्ज | १५,००० |
| ख्याती | १०,००० | देय्य विपत्र | ८,५०० |
| एकस्व | ४,००० | धनको | ३८,२६० |
| बँकेतील रोख | ४,४०० | राखीव निधी | १,५०० |
| गाडी भाडे | २,५०० | लाभांश | २,००० |
| कोळसा आणि शक्ती | १,५०० | मुदत ठेवीवर व्याज | ३,४४० |
| उपस्कर | १२,००० | विक्री | ४०,००० |
| खरेदी | ३५,२६० | | |
| भ्रमणध्वनी शुल्क | ३,२०० | | |
| कारखाना वेतन | २,४०० | | |
| दुरूस्ती | ८०० | | |
| प्रकाश (Lighting) | १,००० | | |
| निर्गत वाहन व्यय | ३६० | | |
| व्यावसायिक शुल्क | १,२४० | | |
| ऋणको | ४०,००० | | |
| सयंत्र व यंत्र | १३,७०० | | |
| कार्यालय उपकरणे | १०,००० | | |
| आगत वाहन व्यय | ७७० | | |
| | **१,५८,७००** | | **१,५८,७००** |

**समायोजना :–**

१) ३१ मार्च २०१९ रोजी स्कंधाचे मूल्य ₹ ३२,००० होते.

२) एकस्व ५०% अपलेखित करा आणि सयंत्र व यंत्रावर वार्षिक १०% दराने घसारा आकारा आणि कार्यालय उपकरणावर २०% घसारा आकारा.

३) ऋणकोवर ५% प्रमाणे बुडीत कर्जनिधी निर्माण करून २% प्रमाणे कसर निधीची तरतूद करा.

४) अदत्त भ्रमणध्वनी शुल्क ₹ ३०० आणि अदत्त गाडी भाडे ₹ ५०० आहे.

५) भांडवलावर वार्षिक ५% दराने व्याज आकारा.

६) नमुना म्हणून मोफत वाटलेला माल ₹ २,०००.

# 10 एकेरी नोंद पद्‌धती (Single Entry System)

**अभ्यास घटक**

*१०.१ प्रास्तविक आणि अर्थ*

*१०.२ एकेरी नोंद पद्‌धती आणि दुहेरी नोंद पद्‌धती यातील फरक*

*१०.३ अवस्था विवरण तयार करणे*

*१०.४ नफातोटा विवरण तयार करणे*

*१०.५ अतिरिक्त माहीती/ समायोजना*

- *अतिरिक्त भांडवल*
- *उचल (आहरण)*
- *स्थिर संपत्तीवर घसारा*
- *बुडीत कर्ज*
- *संदिग्ध ऋणार्थ संचिती*
- *संपत्ती आणि देयतेचे अवमुल्यन आणि अधिमुल्यन*
- *कर्जावरील व्याज*
- *भांडवलावरील व्याज*
- *अदत्त / न दिलेला खर्च*
- *पूर्वदत्त खर्च / अगोदर दिलेला खर्च*

**क्षमता विधाने**

- *विद्यार्थ्याला एकेरी नोंद पद्‌धतीचा अर्थ समजतो.*
- *विद्यार्थी एकेरी नोंद पद्‌धती आणि दुहेरी नोंद पध्दतीचा फरक ओळखतो.*
- *विद्यार्थी स्वामित्व-संस्थेचे प्रारंभिक व अंतिम विवरणपत्रक आणि नफा किंवा तोटापत्रक तयार करू शकतो.*

## १०.१ प्रस्तावना (Introduction) :

आतापर्यंत आपण मागील प्रकरणात दुहेरी नोंद पद्‌धतीने एकल व्यापारी संस्थेचे लेखांकनाचे कार्य कसे पार पाडण्यात येत याचा अभ्यास केला. या प्रकरणात आपल्याला लेखांकनाच्या एकेरी नोंद पद्‌धतीचा अभ्यास करावयाचा आहे. प्राचीन काळात व्यावसायिक व्यवहार नोंदविण्यासाठी कोणतीही शास्त्रीय पद्‌धती नव्हती. तेव्हा ते जमाखर्च लिहण्यासाठी पारंपारिक पद्‌धतीचा वापर करत असत.

एकेरी नोंद पद्‌धती लहान व्यावसायिकाला उपयुक्त आहे. कारण तिथे आर्थिक व्यवहारांची संख्या कमी असते. लेखांकनाच्या दुहेरी नोंद पद्‌धतीची ही अपूर्ण व अशास्त्रीय पद्‌धती होय. ही पद्‌धत शास्त्रीय व बिनचूक नाही.

**एकेरी नोंद पद्‌धतीची अर्थ** (Meaning of Single Entry System) :

या पद्‌धतीमध्ये रोख पुस्तक आणि वैयक्तीक खाती ऋणको आणि धनको यांची खाती ठेवली जातात. वास्तविक खाती आणि

नामधारी खाती वगळली जातात. एकेरी नोंद पद्धतीच्या वापरासाठी कोणतेही विशिष्ट नियम नसतात. लेखांकनाची मुळ उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यास अयशस्वी आहे. म्हणून यावरून व्यवसायातील वास्तविक नफा-तोटा व व्यवसायाची खरी आर्थिक परिस्थिती शोधून काढू शकत नाही.

**व्याख्या (Definitions) :**

i) **कोहलर** यांच्या मते ''एकेरी नोंद पद्धती ही जमाखर्चाची अशी पद्धत आहे की ज्यात नियमानुसार केवळ रोख आणि वैयक्तीक खातीच येतात. ही सदैव अपूर्ण असलेली आणि परिस्थितीनुसार बदलत जाणारी अपूर्ण दुहेरी नोंद पद्धती आहे.''

ii) **कार्टर** यांचे मते : ''अशी पद्धत किंवा पद्धती की ज्यामध्ये व्यवहारांची नोंद करतांना दुहेरी संयोगांचा अभाव आणि त्यामुळे व्यापाऱ्याला व्यवसायासाठी आवश्यक असणारी आर्थिक स्थितीची माहिती काढतांना असमर्थता दर्शविते.''

एकेरी नोंद पद्धती ही एक नोंद पद्धती, द्विनोंद पद्धती यांचा समन्वय आहे.

**एकेरी नोंद पद्धती ही खालील कारणासाठी योग्य आहे. :**

१. जमाखर्चाची ही पद्धत फारच साधी, सोपी आहे.

२. या पद्धतीध्ये पुरेशी कौशल्य लेखांकनाच्या ज्ञानाची तत्वांची आवश्यकता नसल्यामुळे लेखांकनाचे रेकॉर्ड ठेवणे सहज व सोपे आहे.

३. दुहेरी नोंद पद्धतीच्या तुलनेने जमाखर्चाची ही पद्धत कमी खर्चीक आहे.

४. नफा किंवा तोटा शोधून काढणे फारच सोपे आहे.

५. प्रामुख्याने ज्या व्यवसायातील व्यवहार कमी आहेत आणि व्यवसायाची संपत्ती आाणि देयता मर्यादित आहे.

६. ही फारच कमी वेळेत पूर्ण होते.

**१०.२ एकेरी नोंद पद्धती आणि दुहेरी नोंद पद्धती यातील फरक**

| Points | एकेरी नोंद पद्धती | दुहेरी नोंद पद्धती |
|---|---|---|
| १) दुहेरी पैलु | या पद्धतीत सर्वच व्यवहारांच्या दुहेरी पैलुंची नोंद केली जात नाही. | या पद्धतीत सर्वच व्यवहारांच्या दुहेरी पैलुंची नोंद केली जाते. |
| २) खाती | या पद्धतीत फक्त वैयक्तीक खाती आणि रोख पुस्तक ठेवली जातात. वास्तविक आणि नामधारी खाती ठेवली जात नाहीत. | या पद्धतीत वैयक्तीक खाती. वास्तविक खाती आणि नामधारी खाती पूर्णपणे ठेवली जातात. |
| ३) तेरीज | या पद्धतीत तेरीज पत्रक तयार केले जात नाही. कारण ही जमा खर्चाची अपूर्ण पद्धती आहे. गणितीय शुद्धता तपासून पाहता येत नाही. | दुहेरी नोंद पद्धतीमध्ये तेरीजपत्रक तयार केले जाते त्यामुळे गणितीय शुद्धता तपासून पाहता येते. |
| ४) नफा किंवा तोटा | या पद्धतीत शुद्ध नफा किंवा शुद्ध तोटा शोधून काढण्यासाठी नफा तोटा खाते तयार केले जात नाही | या पद्धतीत नफातोटा खाते तयार केले जात असल्याने निव्वळ नफा किंवा निव्वळ तोटा शोधता येतो. |
| ५) ताळेबंद | या पद्धतीत फक्त अवस्था विवरणे तयार केली जातात. ताळेबंद पत्रक तयार केले जात नाही. | या पद्धतीमध्ये व्यवसायाची खरी आर्थिक स्थिती समजते कारण ताळेबंद पत्रक तयार केले जाते. |
| ६) उपयुक्तता | ही पद्धती लहान व्यावसायिक आणि संस्था यांना उपयुक्त आहे. | दुहेरी नोंद पदधती ही सर्व प्रकारच्या व्यापारी संघटनासाठी उपयुक्त आहे. |

| | | |
|---|---|---|
| ७) नियम | एकेरी नोंद पद्धती ही कोणतेही शास्त्रीय नियम पाळत नाही. | दुहेरी नोंद पद्धतीत शास्त्रीय नियम पाळले जातात. |
| ८) खरेपणा | सरकारी अधिकारी ही पद्धती ग्राह्य धरत नाहीत. | सरकारी अधिकारी ही पद्धती ग्राह्य धरतात. |
| ९) महाग | एकेरी नोंद पद्धती ही कमी खर्चीक आहे. कारण वेळ आणि श्रम कमी लागतात. | दुहेरी नोंद पद्धती ही एकेरी नोंद पद्धतीच्या तुलनेने महाग आहे. |
| १०) आर्थिक स्थिती | अवस्था विवरणावरून व्यवसायाची आर्थिक स्थिती कळते. | ताळेबंदावरून व्यवसायाची खरी व वास्तविक स्थिती कळते. |

## १०.३ प्रारंभिक व अंतिम अवस्था विवरण तयार करणे. :

एकेरी नोंद पद्धतीत खालील विवरणे तयार केली जातात.

i) प्रारंभिक अवस्था विवरण (Opening Statement of Affairs)

ii) अंतिम अवस्था विवरण (Closing Statement of Affairs)

iii) नफा किंवा तोटा विवरण (Statement of Profit or Loss.)

**अवस्था विवरण (Statements of Affairs) :**

संपत्ती आणि देयतांच्या आधारे अवस्था विवरण तयार केले जाते. ते ताळेबंदासारखे असते. डाव्या बाजूला देयता आणि उजव्या बाजूला संपत्ती, एकेरी नोंद पद्धती मध्ये व्यवसायातील प्रारंभिक आणि अंतिम भांडवल शोधून काढण्यासाठी अवस्था विवरण तयार करतात. एकूण संपत्ती आणि एकूण देयता यातील फरकाला भांडवल असे म्हणतात.

प्रारंभिक अवस्था विवरण **(Opening Statement of Affairs) :**

प्रारंभिक अवस्था विवरण हे वर्षाच्या सुरवातीलाा असलेल्या संपत्ती आणि देयतांच्या शिलकांच्या आधारे तयार केले जाते. वर्षाच्या सुरुवातीचे भांडवल शोधण्यासाठी एकूण संपत्ती आणि एकूण देयता आवश्यक असते.

**प्रारंभिक भांडवल = प्रारंभिक संपत्ती – प्रारंभिक देयता.**

**अंतिम अवस्था विवरण (Closing Statement of Affairs) :**

अंतिम अवस्था विवरण हे वर्षाच्या शेवटी तयार केले जाते. अंतिम संपत्ती आणि अंतिम देयता अंतिम अवस्था विवरणात दर्शविण्यात येतात. अंतिम संपत्ती वजा अंतिम देयता केल्यास अंतिम भांडवल रक्कम प्राप्त होत असते.

**अंतिम भांडवल = अंतिम संपत्ती – अंतिम देयता**

खाली दिलेल्या प्रारूपावरून अवस्था विवरणामध्ये समाविष्ट केल्या जाणाऱ्या पदांची माहिती कळू शकते.

**---------यांचे पुस्तकात**

**अवस्था विवरण--------रोजीचे**

| देयता | राशि (₹) | संपत्ती | राशि (₹) |
|---|---|---|---|
| विविध धनको | ------- | सयंत्र आणि यंत्र | -------- |
| देय विपत्र | -------- | उपस्कर व अन्वायुक्ती | -------- |
| अदत्त खर्च | ------- | इमारत | -------- |
| अधिकोष अधिविकर्ष | ------- | गुंतवणूक | -------- |
| बँक कर्ज | ------- | विविध ऋणको | -------- |
| | | प्राप्य विपत्र | ------- |
| **भांडवल (शिल्लक राशि)** | -------- | पूर्वदत्त खर्च | --------- |
| | | हस्तस्थ रोख | --------- |
| | | बँकेतील शिल्लक | -------- |
| | -------- | | -------- |

**(टीप : प्रारंभिक अवस्था विवरण आणि अंतिम अवस्था विवरण विद्यार्थी एकत्र तयार करू शकतील.)**

## १०.४ नफा तोटा विवरण तयार करणे :

वर्षभरातील नफा किंवा तोटा जाणून घेण्यासाठी नफा-तोटा विवरण तयार केले जाते. प्रथम प्रारंभिक व अंतिम भांडवल शोधून काढले जाते. नंतर अंतिम भांडवलात वर्षभरात व्यावसायिकाने केलेली उचल अधिक केली जाते. त्यानंतर अतिरिक्त भांडवल (जर असेल) तर ते वजा केले जाते. नंतर प्रारंभिक भांडवल वजा करून जर काही समायोजना असतील तर त्या समायोजीत केल्या जातात.

एकेरी नोंद पद्धतीतमध्ये वर्षभरातील नफा निश्चित करण्यासाठी खालील पद्धतीचा अवलंब केला जात असतो. :

i) शुद्ध मुल्य पद्धती (Net Worth Method)

ii) परिवर्तन पद्धती (Conversion Method)

**(टिप : परिवर्तन पद्धती इ. ११ वी च्या अभ्यासक्रमात नाही. त्यामुळे स्पष्टीकरण दिलेले नाही.)**

**शुद्ध मुल्य पद्धती (Net Worth Method) :**

व्यवसायातील नफा व्यापार खाते आणि नफातोटा खाते तयार करून शोधला जातो. परंतु एकेरी नोंद पद्धतीमध्ये हे शक्य नाही कारण पुरेशी माहिती उपलब्ध नसते. म्हणून एकेरी नोंद पद्धतीमध्ये नफा शोधून काढण्यासाठी नफातोटा विवरण तयार करतात.

वर्षअखेरचे भांडवल आणि वर्षाच्या सुरवातीचे भांडवल यांची तुलना केली जाते. वर्ष अखेरचे भांडवल जर वर्षाच्या सुरवातीच्या भांडवलापेक्षा जास्त असेल तर दोघांतील फरक नफा होय. जर वर्षखेरचे भांडवल वर्षाच्या सुरवातीच्या भांडवलापेक्षा कमी असेल तर दोघांतील फरक तोटा होय. याशिवाय इतर समायोजना विचारात घेतल्या जातात. (अतिरिक्त भांडवल, उचल इत्यादी) नफा किंवा तोटा शोधून काढण्यासाठी जर काही समायोजना असतील जसे घसारा, भांडवलावरील व्याज, बुडीत कर्ज, संदिग्ध ऋणार्थ संचिती यांचा देखील या ठिकाणी विचार केला जातो.

**----यांच्या पुस्तकात**

**नफा तोटा दर्शविणारे विवरण / पत्रक**

**दि. ३१ मार्च -------रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

| तपशील | राशि (₹) | राशि (₹) |
|---|---|---|
| अंतिम भांडवल / वर्ष अखेरचे भांडवल | | .............. |
| (+) वर्षभरातील उचल | | |
| रोख | .............. | |
| वस्तु | .............. | .............. |
| | | .............. |
| (–) अतिरिक्त भांडवल (चालू वर्षात गुंतवलेले) | | .............. |
| | | .............. |
| (–) वर्षाच्या सुरवातीचे भांडवल | | .............. |
| समायोजना पूर्वीचा नफा | | .............. |

खालील उदाहरणावरून आपणास नफा तोटा कसा शोधून काढतात याची कल्पना येईल.

प्रारंभिक भांडवल ₹ ९०,०००

अंतिम भांडवल ₹ १,५०,०००

वर्षभरात आणलेले अतिरिक्त भांडवल ₹ १०,०००.

वर्षभरातील उचल ₹ १५,०००.

**उत्तर :**

**नफा तोटा दर्शविणारे विवरण**

**दि. ३१ मार्च -------रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

| विवरण | राशि (₹) | राशि (₹) |
|---|---|---|
| अंतिम भांडवल | | १,५०,००० |
| (+) वर्षभरातील उचल | | १५,००० |
| | | १,६५,००० |
| (–) वर्षभरात आणलेले अतिरिक्त भांडवल | | १०,००० |
| | | १,५५,००० |
| (–) प्रारंभिक भांडवल | | ९०,००० |
| शुद्ध नफा | | ६५,००० |

## १०.५ अतिरिक्त माहिती (समायोजना) Additional Information (Adjustments):

१. **अतिरिक्त भांडवल** (Additional Capital) :

जर मालकाने चालू वर्षामध्ये जी रोख किंवा संपत्ती व्यवसायात आणलेली असेल तिला अतिरिक्त भांडवल' असे म्हणतात. नफा-तोटा विवरणामध्ये नफा किंवा तोट्याची गणना करतांना त्या वर्षातील अखेरच्या भांडवल रकमेतून अतिरिक्त भांडवलाची रक्कम वजा करावयाची असते.

२. **उचल** (Drawings) :

नफा-तोट्याची गणना करतांना नफा तोटा विवरणात उचल ही वर्षअखेरच्या भांडवलात अधिक केली जात असते. व्यवसाय मालकाने स्वत:च्या वैयक्तीक उपयोगाकरिता व्यवसायातून रोख किंवा वस्तू घेत असेल तर त्यास उचल असे म्हणतात. मालकाने चालू वर्षात उचल केल्यास तेवढ्याने वर्षअखेरचे भांडवल कमी झालेलेअसते.

३. **घसारा** (Depreciation) :

व्यवसायामध्ये ज्या काळापर्यंत ती स्थिर संपत्ती उपयुक्त राहील त्या काळासाठी ठराविक दराने घसाऱ्याची गणना होते. नफा तोटा विवरणात घसाऱ्याची रक्कम दर्शवावयाची असते. घसाऱ्याची रक्कम निर्धारीत करतांना हे लक्षात ठेवावे की, ती स्थिर संपत्ती, किती काळाकरीता चालूवर्षात व्यवसायात आहे.

४. **बुडीत कर्ज** (Bad Debts) :

ऋणकोकडून येणे असलेल्या रकमेपैकी वसूल न होणारी रक्कम 'बुडीत कर्ज' होय. म्हणून नफ्याचे आगणन करताना नफा-तोटा विवरणामध्ये बुडीत कर्जाची रक्कम वजा केली जाते.

५. **बुडीत व संशयित कर्ज निधी** (Reserve for Doubtful Debts (provision for bad and doubtful debts)–

संशयित कर्ज निधी हा व्यवसायाचा संभाव्य तोटा आहे. म्हणून अशा तरतुदीची रक्कम नफा तोटा विवरणामध्ये नफ्यातून वजा केली जाते.

६. **संपत्ती आणि देयतांचे अवमुल्यन व अधिमुल्यन** (Undervaluation and Over valuation of Assets and Liabilities) :

व्यवसायाचा खरा नफा-तोटा माहित करून घेण्यासाठी जर संपत्ती आणि देयतांचे अवमुल्यन (कमी) किंवा अधिमूल्यन (जास्त) करण्यात आले असेल तर ते समायोजित केले जाते.

अ) **संपत्तीचे अवमूल्यन** (Undervaluation of Assets) : संपत्तीचे अवमूल्यन म्हणजे कमी भांडवल दर्शवित असते. ज्या वेळेस नफ्याची गणना केली जात असेल तेव्हा संपत्तीचे अवमूल्यन नफातोटा विवरण पत्रकामध्ये 'अधिक' करण्यात येते.

ब) **संपत्तीचे अधिमूल्यन** (Overvaluation of Assets) : जर लेखापुस्तकात संपत्तीचे मूल्य जास्त दाखविण्यात आले असेल तर अशा संपत्तीची किंमत कमी करावी लागेल. त्या संपत्तीचे मूल्य मुळ किमतीला आणावे लागेल. अशी संपत्तीची जास्तीची किंमत ही जास्त भांडवल दर्शवित असते. जे नफा गणना करतांना समायोजित करावे लागते. म्हणून संपत्तीची जादा किंमत ही नफा तोटा विवरणात वजा करण्यात येईल.

क) **देयतांचे अवमूल्यन** (Undervaluation of Liabilities) : देयतांची कमी किंमत जास्तीचे भांडवल दर्शवित असते जे योग्य प्रकारे समायोजन करणे गरजेचे आहे. म्हणून नफा-तोटा विवरणात ते (–) वजा म्हणून दाखविण्यात येईल.

ड) **देयतांचे अधिमूल्यन** (Overvaluation of Liabilities) : देयतांच्या जास्तीचे मूल्य हे कमी भांडवल दर्शविते. जे योग्य प्रकारे समायोजन करणे गरजेचे असते. म्हणून नफातोटा विवरणात ही रक्कम अधिक (+) करावी लागेल.

७) **कर्जावरील व्याज** (Interest on Loan) :

व्यवसायासाठी उसनावार घेतलेली रक्कम म्हणजे कर्ज होय. कर्जावरील व्याज हा संस्थेचा खर्च असतो. म्हणून नफातोटा विवरणात ते वजा (–) म्हणून दाखविला जाईल.

८) **भांडवलावरील व्याज (Interest on Capital) :**

व्यवसायात गुंतविलेल्या सुरवातीच्या भांडवलावर आणि चालू वर्षात गुंतविलेल्या अतिरिक्त भांडवलावर व्याजाची गणना करायची असते. भांडवलावरील व्याज हा संस्थेचा खर्च समजला जातो. म्हणून तो नफा-तोटा विवरणामध्ये वजा (–) दाखविण्यात येतो.

उदा. प्रारंभिक भांडवल ३१ मार्च २०१७ रोजीचे ₹ १,५०,००० अतिरिक्त गुंतविलेले भांडवल १ ऑक्टोबर २०१७ रोजीचे ₹ ४०,००० भांडवलावरील व्याजाचा दर वार्षिक १०% व्याजाची राशी खालील प्रमाणे. :

| | | |
|---|---|---|
| भांडवलावरील व्याज | १०% वर ₹ १,५०,००० | ₹ १५,००० |
| | १०% वर ₹ ४०,००० वर सहा महिन्यांसाठी (१ ऑक्टो २०१७ ते ३१ मार्च २०१८) | ₹ २,००० |
| एकूण भांडवलावरील व्याजाची रक्कम | | ₹ १७,००० |

९) **उचलीवरील व्याज (Interest on Drawings) :**

उचलीवर आकारण्यात येणारे व्याज हे व्यवसायाचे उत्पन्न असते. म्हणून ते नफा-तोटा विवरणामध्ये अधिक (+) म्हणून दाखविण्या येईल. जर उचलीवर व्याजाचा दर दिला असेल आणि उचल केल्याची तारीख दिली नसेल तर उचलीवर ६ महिन्याचे व्याज आकारण्यात येईल.

१०) **अदत्त / देणे खर्च (Outstanding/ Unpaid Expenses) :**

चालू वर्षाचे खर्च परंतु ज्याचे शोधन चालू वर्षात झालेले नाही अशा खर्चांना अदत्त खर्च म्हणतात. अशा अदत्त खर्चाची रक्कम नफा तोटा विवरणामध्ये अधिक (+) दाखवून शुद्ध नफा निश्चित केला जात असतो.

११) **पूर्वदत्त खर्च अग्रीम दिलेला खर्च (Prepaid Expenses/Expenses paid in Advance/Unexpired expenses) :**

व्यवसायामध्ये काही खर्च आगाऊ दिले जातात. त्यांना पूर्वदत्त खर्च म्हणतात. पूर्वदत्त खर्च हा पुढील वर्षासाठीचा खर्च असतो तो चालू वर्षात दिलेला असतो म्हणून पूर्वदत्त खर्च नफा तोटा विवरणामध्ये (–) वजा करून दाखविला जातो.

**----यांच्या पुस्तकात**

**नफा तोटा विवरण ३१ मार्च ------------रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

| तपशील | राशि (₹) | राशि (₹) |
|---|---|---|
| अंतिम भांडवल / वर्षअखेरचे भांडवल | | ---------- |
| (+) वर्षभरातील उचल | | |
| रोख | ---------- | |
| वस्तू | ---------- | ---------- |
| | | ---------- |
| (–) : अतिरिक्त भांडवल : (चालू वर्षात गुंतविलेले) | | ---------- |
| **समायोजित अंतिम भांडवल** | | ---------- |
| (–) : वर्षाच्या सुरवातीचे भांडवल | | |
| | | ---------- |
| **समायोजना पूर्वीचा नफा** | | ---------- |
| **(+) – वर्षभरातील उत्पन्न व प्राप्ती** | | |
| १. उचलीवरील व्याज | ---------- | |
| २. गुंतवणुकीवरील व्याज | ---------- | |
| ३. पूर्वदत्त खर्च | ---------- | |
| ४. अप्राप्त उत्पन्न | ---------- | |
| ५. संपत्तीचे अवमुल्यन | ---------- | |
| ६. देयताचे अधिमुल्यन | ---------- | ---------- |
| **(–) : वर्षभरातील खर्च व नुकसान** | | ---------- |
| १. भांडवलावर व्याज | ---------- | |
| २. बँक कर्जावरील व्याज | ---------- | |
| ३. बुडीत कर्ज आणि बुडीत व संशयित कर्जनिधी | ---------- | |
| ४. स्थिर संपत्तीवर घसारा | | |
| ५. संपत्तीचे अधिमूल्यन | ---------- | |
| ६. देयतेचे अवमुल्यन | ---------- | |
| ७. अदत्त खर्च | ---------- | |
| ८. पूर्व प्राप्त उत्पन्न | ---------- | |
| | ---------- | --------- |
| **शुद्ध नफा / शुद्ध तोटा** | ---------- | ---------- |

खालील उदाहरणावरून आपणास नफा तोटा कसा शोधून काढतात याची कल्पना येईल.

**उदाहरण : १**

श्री मनोज आपली लेखापुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. त्यांची माहिती खालीलप्रमाणे.

३१.३.२०१७ रोजीचे भांडवल ₹ ८०,०००

३१.३.२०१८ रोजीचे भांडवल ₹ १,००,०००

वर्षभरातील उचल ₹ ३,०००

चालू वर्षातील अतिरिक्त भांडवल ₹ ८,०००

३१ मार्च २०१८ वर्ष अखेर नफा किंवा तोटा निश्चित करा.

**उत्तर :**

**नफा तोटा विवरण दि. ३१ मार्च, २०१८ रोजी संपणाऱ्या वर्ष अखेर**

| तपशील | राशि (₹) | राशि (₹) |
|---|---|---|
| वर्षअखेरचे भांडवल | | १,००,००० |
| (+) वर्षभरातील उचल | | ३,००० |
| | | १,०३,००० |
| (–) चालू वर्षातील अतिरिक्त भांडवल | | ८,००० |
| | | ९५,००० |
| **(–) वर्षाच्या सुरवातीचे भांडवल** | | ८०,००० |
| **चालू वर्षातील शुद्ध नफा** | | १५,००० |

**उदाहरण : २**

खालील माहिती चालू वर्षातील असून सुरवातीचे भांडवल ₹ ६२,०००; उचल ₹ ५,००० चालू वर्षातील अतिरिक्त भांडवल ₹ ९,००० आणि अंतिम भांडवल ₹ ५०,००.

३१ मार्च २०१८ वर्ष अखेर नफा किंवा तोटा निश्चित करा.

**उत्तर :**

**नफा तोटा विवरण ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

| तपशील | राशि. (₹) | राशि. (₹) |
|---|---|---|
| अंतिम भांडवल | | ५०,००० |
| (+) उचल | | ५,००० |
| | | ५५,००० |
| (–) चालू वर्षातील अतिरिक्त भांडवल | | ९,००० |
| **समायोजित अंतिम भांडवल** | | ४६,००० |
| (–) सुरवातीचे भांडवल | | ६२,००० |
| **वर्षभरातील तोटा** | | १६,००० |

**उदाहरण : ३**

**अर्जुन** आपली लेखापुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. त्यांची संपत्ती व देयता खालीलप्रमाणे.

| तपशील | ३१.३.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) |
|---|---|---|
| रोख | १,५०० | १,००० |
| विविध ऋणको | ३०,००० | ४६,००० |
| स्कंध (मालसाठा) | ३५,००० | ३१,००० |
| सयंत्र आणि यंत्र | ६१,००० | ७५,००० |
| विविध धनको | १५,००० | १३,५०० |
| देय विपत्र | – | ४,००० |

२०१७-१८ या वर्षात त्यांनी ₹ १५,००० अतिरिक्त भांडवल गुंतविले. त्यांनी वैयक्तीक उपयोगाकरिता प्रत्येक महिन्याला ₹ २,५०० व्यवसायातून उचलले. ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाचा नफा किंवा तोटा शोधून काढा.

**उत्तर :**

**अर्जुन यांचे पुस्तकात**

**अवस्था विवरण ३१ मार्च २०१७ रोजीचे**

| देयता | राशि (₹) | संपत्ती | राशि (₹) |
|---|---|---|---|
| विविध धनको | १५,००० | रोख | १,५०० |
| **भांडवल (संतुलित राशी)** | १,१२,५०० | विविध ऋणको | ३०,००० |
| | | स्कंध (मालसाठा) | ३५,००० |
| | | सयंत्र आणि यंत्र | ६१,००० |
| | **१,२७,५००** | | **१,२७,५००** |

**अवस्था विवरण ३१ मार्च २०१८ रोजीचे**

| देयता | राशि (₹) | संपत्ती | राशि (₹) |
|---|---|---|---|
| विविध धनको | १३,५०० | रोख | १,००० |
| देय विपत्र | ४,००० | विविध ऋणको | ४६,००० |
| **भांडवल (संतुलित राशी)** | १,३५,५०० | स्कंध (मालसाठा) | ३१,००० |
| | | सयंत्र आणि यंत्र | ७५,००० |
| | **१,५३,०००** | | **१,५३,०००** |

**नफा तोटा विवरण**

**३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

| तपशील | राशि.(₹) | राशि (₹) |
|---|---|---|
| वर्ष अखेरचे भांडवल | | १,३५,५०० |
| (+) वर्षभरातील उचल (२,५०० x १२ महिने) | | ३०,००० |
| | | १,६५,५०० |
| (–) अतिरिक्त भांडवल | | १५,००० |
| **समायोजित अंतिम भांडवल** | | १,५०,५०० |
| (–) वर्षाच्या सुरवातीचे भांडवल | | १,१२,५०० |
| **वर्षभरातील नफा** | | **३८,०००** |

**उदाहरण : ४**

श्री. मौर्य आपली लेखापुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. त्यांची माहिती खालीलप्रमाणे.

| तपशील | ३१.३.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) |
|---|---|---|
| बँकेतील शिल्लक | १०,००० | ४०,००० |
| विविध ऋणको | २५,००० | ४२,००० |
| व्यापारातील स्कंध | २०,००० | ३५,००० |
| उपस्कर | ३०,००० | ३०,००० |
| यंत्र | ६०,००० | ६०,००० |
| देय विपत्र | ४,००० | ४,००० |
| विविध धनको | १०,००० | १५,००० |
| १०% दराचे बँक कर्ज | ४,३०० | ४,३०० |

**अतिरिक्त माहिती** (Additional information) :

१. श्री. मौर्य यांनी व्यवसायाच्या खात्यातून ₹ ६,००० वैयक्तिक उपयोगाकरिता काढले.

२. त्यांनी व्यवसायात ₹ ३०,००० अतिरिक्त भांडवल गुंतविले.

३. उपस्कर आणि यंत्रावर वार्षिक १०% प्रमाणे घसारा आकारा.

तयार करा : १) प्रारंभिक आणि अंतिम अवस्था विवरण

२) ३१.३.२०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरीता नफातोटा विवरण

उत्तर :

**मौर्य यांचे पुस्तकात**
**अवस्था विवरण**

| देयता | ३१.३.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) | संपत्ती | ३१.३.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) |
|---|---|---|---|---|---|
| देय विपत्र | ४,००० | ४,००० | यंत्र | ६०,००० | ६०,००० |
| विविध धनको | १०,००० | १५,००० | उपस्कर | ३०,००० | ३०,००० |
| १०% बँक कर्ज | ४,३०० | ४,३०० | व्यापारातील स्कंध | २०,००० | ३५,००० |
| **भांडवल (संतुलित राशि)** | १,२६,७०० | १,८३,७०० | विविध ऋणको | २५,००० | ४२,००० |
| | | | बँकेतील शिल्लक | १०,००० | ४०,००० |
| | १,४५,००० | २,०७,००० | | १,४५,००० | २,०७,००० |

**नफा तोटा विवरण**
**३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

| तपशील | राशि (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| ३१ मार्च २०१८ रोजीचे भांडवल | | १,८३,७०० |
| (+) चालु वर्षातील उचल | | ६,००० |
| | | १,८९,७०० |
| (–) गुंतविलेले अतिरिक्त भांडवल | | ३०,००० |
| **समायोजित अंतिम भांडवल** | | १,५९,७०० |
| (–) ३१.३. २०१७ रोजीचे भांडवल | | १,२६,७०० |
| **समायोजन पूर्वीचा नफा** | | ३३,००० |
| **(–) वर्षभरातील खर्च व नुकसान** | | |
| i) यंत्रावरील घसारा (१०%, ₹ ६०,०००) | ६,००० | |
| ii) उपस्करावरील घसारा (१०%, ₹ ३०,०००) | ३,००० | |
| iii) बँक कर्जावर व्याज (१०%, ₹ ४,३००) | ४३० | ९,४३० |
| **वर्षाचा शुद्ध नफा** | | **२३,५७०** |

**उदाहरण : ५**

शुभम आपली लेखापुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. त्यांनी खालीलप्रमाणे माहिती पुरविली आहे. :

| तपशील | ३१.३.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) |
|---|---|---|
| बँकेतील रोख | ३,००० | ६,५०० |
| हस्तस्थ रोख | २०० | ५,००० |
| व्यापारातील मालसाठा | ६०,००० | ६८,००० |
| विविध ऋणको | १०,००० | २५,००० |
| उपकरणे | ८,००० | ८,००० |
| विविध धनको | १५,००० | १०,००० |
| उपस्कर | १०,००० | १०,००० |

चालु आर्थिक वर्षात शुभम यांनी ₹ ३,००० चे अतिरिक्त भांडवल आणले आणि ₹ ५,००० ची उचल केली. उपस्करावर वार्षिक १०% दराने आणि उपकरणांवर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता नफा-तोटा शोधून काढा.

उत्तर - (पर्यायी पध्दतीनुसार)

**शुभम यांचे पुस्तकात**

**अवस्था विवरण ३१ मार्च २०१७ रोजीचे**

| देयता | राशि (₹) | संपत्ती | राशि (₹) |
|---|---|---|---|
| विविध धनको | १५,००० | बँकेतील रोख | ३,००० |
| | | हस्तस्थ रोख | २०० |
| | | व्यापारातील मालसाठा | ६०,००० |
| **भांडवल (संतुलित राशी)** | ७६,२०० | विविध ऋणको | १०,००० |
| | | उपकरणे | ८,००० |
| | | उपस्कर | १०,००० |
| | **९१,२००** | | **९१,२००** |

**अवस्था विवरण ३१ मार्च, २०१८**

| देयता | राशि (₹) | संपत्ती | | राशि (₹) |
|---|---|---|---|---|
| विविध धनको | १०,००० | बँकेतील रोख | | ६,५०० |
| | | हस्तस्थ रोख | | ५,००० |
| **भांडवल (संतुलित राशि)** | १,११,१०० | व्यापारातील मालसाठा | | ६८,००० |
| | | विविध ऋणको | | २५,००० |
| | | उपकरणे | ८,००० | |
| | | (-) घसारा | ४०० | ७,६०० |
| | | उपस्कर | १०,००० | |
| | | (-) घसारा | १,००० | ९,००० |
| | **१,२१,१००** | | | **१,२१,१००** |

**नफा तोटा विवरण**
**३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

| तपशील | राशि.(₹) | राशि (₹) |
|---|---|---|
| वर्षअखेरचे भांडवल ३१ मार्च २०१८ | | १,११,१०० |
| (+) वर्षभरातील उचल | | ५,००० |
| | | १,१६,१०० |
| (–) अतिरिक्त भांडवल | | ३,००० |
| | | १,१३,१०० |
| (–) वर्षाच्या सुरवातीचे भांडवल | | ७६,२०० |
| **वर्षाचा शुद्ध नफा** | | **३६,९००** |

**टिप :** वरील उदहारण पर्यायी पद्धतीने सोडविले आहे. सर्व समायोजना अंतिम अवस्था विवरणात विचारात घेतल्या आहेत.

**उदाहरण : ६**

ज्योती आपली लेखापुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. खालील माहितीच्या आधारे वर्षाच्या सुरवातीचे व अंतिम अवस्था विवरण आणि नफा-तोटा विवरण तयार करा.

| तपशील | १.४.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) |
|---|---|---|
| बँक शिल्लक | ३५,००० | ३०,००० |
| रोख शिल्लक | १४,००० | १०,००० |
| विविध ऋणको | १,२०,००० | १,६०,००० |
| मालसाठा | ५०,००० | ९०,००० |
| उपस्कर | १८,००० | १८,००० |
| यंत्र | ९०,००० | १,२०,००० |
| विविध धनको | ३२,००० | ५०,००० |
| देय विपत्र | १८,५०० | २५,००० |

**अतिरिक्त माहिती :**

१. ज्योती यांनी खाजगी उपयोगाकरिता व्यवसायातून ₹ ३३,५०० उचलले.
२. १ जानेवारी २०१८ रोजी त्यांनी व्यवसायात ₹ ५,००० अतिरिक्त भांडवल म्हणून गुंतविले.
३. १ जानेवारी २०१८ रोजी यंत्रामध्ये वाढ करण्यात आली.
४. उपस्कर आणि यंत्रावर वार्षिक १०% दराने घसारा आकारा.
५. ऋणकोवर १५% प्रमाणे बुडीत व संशयित कर्जनिधी निर्माण करा.
६. लेखापुस्तकात मालसाठ्याचे २०% अधिमूल्यन झाले.

उत्तर :

**ज्योती यांच्या पुस्तकात**

**प्रारंभिक आणि अंतिम अवस्था विवरण**

| देयता | १.४.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) | संपत्ती | १.४.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) |
|---|---|---|---|---|---|
| विविध धनको | ३२,००० | ५०,००० | बँक शिल्लक | ३५,००० | ३०,००० |
| देयविपत्र | १८,५०० | २५,००० | रोख शिल्लक | १४,००० | १०,००० |
| | | | विविध ऋणको | १,२०,००० | १,६०,००० |
| **भांडवल (संतुलित राशि)** | २,७६,५०० | ३,५३,००० | मालसाठा | ५०,००० | ९०,००० |
| | | | उपस्कर (फर्निचर) | १८,००० | १८,००० |
| | | | यंत्र | ९०,००० | १,२०,००० |
| | ३,२७,००० | ४,२८,००० | | ३,२७,००० | ४,२८,००० |

**नफा–तोटा विवरण पत्रक ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

| तपशील | | राशि (₹) | राशि (₹) |
|---|---|---|---|
| ३१.३.२०१८ रोजीचे भांडवल | | | ३,५३,००० |
| (+) उचल | | | ३३,५०० |
| | | | ३,८६,५०० |
| (–) गुंतविलेले अतिरिक्त भांडवल | | | ५,००० |
| **समायोजित अंतिम भांडवल** | | | ३,८१,५०० |
| (–) १ एप्रिल २०१७ रोजीचे भांडवल | | | २,७६,५०० |
| **समायोजन पूर्वीचा नफा** | | | १,०५,००० |
| **(–) वर्षभरातील खर्च व नुकसान** | | | |
| १. उपस्करावर घसारा (₹ १८,००० वर १०%) | | १,८०० | |
| २. यंत्रावर घसारा : | | | |
| (₹ ९०,००० वर १०% प्रमाणे) | ९००० | | |
| (₹ ३०,००० वर १०% प्रमाणे ३ महिने) | ७५० | ९,७५० | |
| ३. बुडीत व संशयित कर्ज निधी (₹ १,६०,००० वर १५% प्रमाणे) | | २४,००० | |
| ४. मालसाठ्याचे अधिमूल्यन | | १५,००० | |
| | | | ५०,५५० |
| **वर्षाचा शुद्ध नफा** | | | **५४,४५०** |

**कार्य टीप :**

मालसाठ्याचे २०% , अधिमूल्यन झाले. त्याचे वास्तविक मूल्य खालीलप्रमाणे.

$$\text{वास्तविक मुल्य} = \frac{\text{पुस्तकी मूल्य}}{१०० + \text{अधिमुल्यनाचे गुणोत्तर}} \times १००$$

$$\text{वास्तविक मुल्य} = \frac{९०,०००}{१०० + २०} \times १००$$

$$\text{वास्तविक मुल्य} = \frac{९०,०००}{१२०} \times १००$$

$$\text{वास्तविक मुल्य} = ₹\,७५,०००$$

मालसाठ्याचे वास्तविक मुल्य ₹ ७५,००० आहे परंतु पुस्तकी मूल्य ₹ ९०,००० दाखविण्यात आले. (₹ ९०,००० – ₹ ७५,०००) = ₹ १५,००० हे नुकसान आहे म्हणून नफा तोटा विवरणपत्रकात वजा केले आहे.

**उदाहरण : ७**

रोहित आपली लेखापुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. त्यांची १.४.२०१८ आणि ३१.३.२०१९ ची आर्थिक स्थिती पुढीलप्रमाणे :

| तपशील | १.४.२०१८ (₹) | ३१.३.२०१९ (₹) |
|---|---|---|
| रोख | १२,००० | १८,००० |
| बँक शिल्लक | १०,००० | १५,००० |
| व्यापारातील मालसाठा | ३५,००० | ५०,००० |
| विविध ऋणको | ३०,००० | ३५,००० |
| विविध धनको | २०,००० | ३२,००० |
| इमारत | ४०,००० | ६०,००० |
| उपस्कर | १५,००० | २०,००० |

चालु वर्षात त्यांनी प्रतिमहिना ₹ १०० प्रमाणे घरगुती खर्चासाठी उचल केली. इमारतीवर वार्षिक १० % प्रमाणे आणि उपस्करावर वार्षिक १२% प्रमाणे घसारा आकारा (या दोन्ही संपत्तीत १ ऑक्टो २०१८ रोजी वाढ करण्यात आली असे गृहीत धरा)

₹ १,००० बुडीत कर्ज झाले असून ५% दराने बुडीत व संशयित कर्ज निधी ऋणकोवर आकारण्यात यावा आणि ऋणकोवर २% प्रमाणे कसर निधी निर्माण करा. भांडवलावर वार्षिक ५% प्रमाणे आणि उचलीवर वार्षिक ५% प्रमाणे व्याजाची आकारणी करा.

तयार करा :

१) प्रारंभिक आणि अंतिम अवस्था विवरण

२) ३१.३.२०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता नफा-तोटा विवरण पत्रक

**उत्तर :** **रोहीत यांचे पुस्तकात अवस्था विवरण १ एप्रिल २०१८**

| देयता | राशि (₹) | संपत्ती | राशि (₹) |
|---|---|---|---|
| विविध धनको | २०,००० | रोख | १२,००० |
| | | बँक शिल्लक | १०,००० |
| **भांडवल (संतुलीत राशी)** | १,२२,००० | व्यापारातील मालसाठा | ३५,००० |
| | | विविध ऋणको | ३०,००० |
| | | इमारत | ४०,००० |
| | | उपस्कर | १५,००० |
| | **१,४२,०००** | | **१,४२,०००** |

**अवस्था विवरण ३१ मार्च २०१९ रोजीचे**

| देयता | राशि (₹) | संपत्ती | राशि (₹) |
|---|---|---|---|
| विविध धनको | ३२,००० | बँक शिल्लक | १५,००० |
| | | रोख | १८,००० |
| | | व्यापारातील मालसाठा | ५०,००० |
| **भांडवल (संतुलीत राशी)** | १,६६,००० | विविध ऋणको | ३५,००० |
| | | इमारत | ६०,००० |
| | | उपस्कर | २०,००० |
| | **१,९८,०००** | | **१,९८,०००** |

**नफा तोटा विवरण पत्रक ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

| तपशील | | राशि (₹) | राशि (₹) |
|---|---|---|---|
| ३१ मार्च २०१९ रोजीचे भांडवल | | | १,६६,००० |
| (+) उचल (₹१००×१२ प्रति महिना) | | | १,२०० |
| | | | १,६७,२०० |
| समायोजित अंतिम भांडवल | | | १,२२,००० |
| (–) १.४.२०१८ रोजीचे भांडवल | | | |
| समायोजन पूर्वीचा नफा | | | ४५,२०० |
| **(+) वर्षभरातील उत्पन्न व प्राप्ती** | | | |
| १. उचलीवर व्याज (₹ १,२०० वर ५% प्रमाणे, ६ महिने) | | | ३० |
| **(–) वर्षभरातील खर्च व नुकसान** | | | ४५,२३० |
| १. भांडवलावर व्याज ( ₹ १,२२,००० वर ५% प्रमाणे) | | ६,१०० | |
| २. अ) इमारतीवर घसारा : | | | |
| (₹ ४०,००० वर १०% प्रमाणे) | ४,००० | | |
| ब) (₹ २०,००० वर १०% प्रमाणे, × ६ महिने) | १,००० | ५,००० | |
| ३. अ) उपस्करावर घसारा : | | | |
| (₹ १५,००० वर १२% प्रमाणे) | १८०० | | |
| ब) (₹ ५,००० वर १२% प्रमाणे, × ६ महिने) | ३०० | २,१०० | |
| ४. बुडीत कर्ज | | १,००० | |
| ५. बुडीत व संशयित कर्ज निधी (₹ ३५,००० – ₹ १,००० = ३४,००० वर ५% प्रमाणे) | | १,७०० | |
| ६. देय कसर निधी (₹ ३४,००० – ₹ १,७०० = ३२,३०० वर २% प्रमाणे) | | ६४६ | १६,५४६ |
| **वर्षाचा शुद्ध नफा** | | | **२८,६८४** |

**(टिप :** उचल केल्याची तारीख दिली नसल्यामुळे त्यावरील व्याज ६ महिन्यासाठी आकारले आहे.)

**उदाहरण : ८**

आदित्य आपली लेखा पुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. त्यांची माहिती खालीलप्रमाणे.

| तपशील | ३१.३.२०१६ (₹) | ३१.३.२०१७ (₹) |
|---|---|---|
| बँकेतील रोख | ३६,००० | ४५,००० |
| व्यापारातील मालसाठा | ३०,००० | ३५,००० |
| ऋणको | १५,००० | २२,००० |
| उपस्कर | ९,५०० | ९,५०० |
| विविध धनको | २७,८५० | ३५,४०० |
| देय विपत्र | --- | १०,००० |
| गुंतवणूक | --- | २०,००० |

**अतिरिक्त माहिती :**

१. आदित्य यांनी वर्षभरात व्यवसायाच्या बँक खात्यातून पहिल्या ६ महिन्यात ₹१५० प्रतिमहिना व नंतरच्या ६ महिन्यात ₹ २०० प्रती महिना खाजगी उपयोगासाठी काढले आणि ₹ ३०० चा माल स्वत:च्या वैयक्तीक उपयोगासाठी व्यवसायातून उचलला.

२. आदित्य यांनी घरगुती उपस्कर ₹ ५,००० ला विकले आणि ती रक्कम व्यवसायात गुंतविली.

३. उपस्करावर १०% वार्षिक दराने घसारा आकारा आणि ऋणकोवर ५% प्रमाणे बुडीत व संशयित कर्ज निधी निर्माण करा.

तयार करा. : १. प्रारंभिक अवस्था विवरण

२. अंतिम अवस्था विवरण

३. ३१ मार्च २०१७ रोजी संपणाऱ्या वर्षाचे नफातोटा विवरण पत्रक

**उत्तर :**

**आदित्य यांचे पुस्तकात**

**अवस्था विवरण**

| देयता | ३१.३.२०१६ (₹) | ३१.३.२०१७ (₹) | संपत्ती | ३१.३.२०१६ (₹) | ३१.३.२०१७ (₹) |
|---|---|---|---|---|---|
| विविध धनको | २७,८५० | ३५,४०० | बँकेतील रोख | ३६,००० | ४५,००० |
| देय विपत्र | --- | १०,००० | व्यापारातील मालसाठा | ३०,००० | ३५,००० |
| | | | ऋणको | १५,००० | २२,००० |
| **भांडवल (संतुलीत राशि)** | ६२,६५० | ८६,१०० | उपस्कर | ९,५०० | ९,५०० |
| | | | गुंतवणूक | --- | २०,००० |
| | ९०,५०० | १,३१,५०० | | ९०,५०० | १,३१,५०० |

**नफातोटा विवरण दि. ३१.३.२०१७ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

| तपशील | राशि. (₹) | राशि. (₹) |
|---|---|---|
| भांडवल ३१ मार्च २०१७ | | ८६,१०० |
| (+) उचल | | |
| रोख (₹ १५० × ६ महिने + ₹ २०० × ६ महिने) | २,१०० | |
| वस्तूंची उचल | ३०० | २,४०० |
| | | ८८,५०० |
| (–) गुंतविलेले अतिरिक्त भांडवल | | ५,००० |
| **समायोजित अंतिम भांडवल** | | ८३,५०० |
| **(–)** भांडवल ३१ मार्च २०१६ | | ६२,६५० |
| **समायोजन पूर्वीचा नफा** | | २०,८५० |
| **(–) वर्षभरातील खर्च व नुकसान** | | |
| १. उपस्करावर घसारा (₹ ९,५०० वर १०%) | ९५० | |
| २. बुडीत व संशयित कर्जनिधी (₹ २२,००० वर ५%) | १,१०० | २,०५० |
| **वर्षाचा शुद्ध नफा** | | **१८,८००** |

**उदाहरण ९**

दिव्या आपली लेखापुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. त्यांची व्यवसायाची एकेरी नोंद पद्धती प्रमाणे माहिती खालीलप्रमाणे.

| तपशील | १.४.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) |
|---|---|---|
| हस्तस्थ रोख | २,००० | ४,००० |
| बँकेतील रोख | ३,००० | ५,००० |
| इमारत | ३०,००० | ३०,००० |
| सयंत्र आणि यंत्र | ३,००० | ३,००० |
| प्राप्त विपत्र | १,००० | १,५०० |
| मालसाठा | ६,००० | ८,००० |
| देय विपत्र | २,००० | २,२०० |
| विविध ऋणको | ४,००० | ६,००० |
| विविध धनको | २,००० | १,००० |

**अतिरिक्त माहिती :**

१. भांडवलावर वार्षिक १०% प्रमाणे व्याज आकारण्यात यावे.

२. इमारतीवर वार्षिक १०% प्रमाणे आणि सयंत्र आणि यंत्रावर वार्षिक ५% प्रमाणे घसारा आकारा.

३. धनकोचे मूल्य ₹ २,००० ने कमी दाखविण्यात आले आहे.

४. देय विपत्राचे ₹ ६०० अधिमूल्यन करण्यात आले आहे.

५. ऋणकोवर ५% प्रमाणे बुडीत व संशयित कर्ज निधीसाठी तरतूद करावी.

६. दिव्या यांनी १ ऑक्टोबर २०१७ रोजी व्यवसायात ₹ १,००० अतिरिक्त भांडवल गुंतविले.

तयार करा : प्रारंभिक व अंतिम अवस्था विवरण आणि ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाचे नफातोटा विवरण

**उत्तर :**

**दिव्या यांचे पुस्तकात**

**अवस्था विवरण रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

| देयता | १.४.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) | संपत्ती | १.४.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) |
|---|---|---|---|---|---|
| देय विपत्र | २,००० | १,००० | हस्तस्थ रोख | २,००० | ४,००० |
| विविध धनको | २,००० | २,२०० | बँकेतील रोख | ३,००० | ५,००० |
| | | | इमारत | ३०,००० | ३०,००० |
| **भांडवल (संतुलीत राशी)** | ४५,००० | ५४,३०० | सयंत्र आणि यंत्र | ३,००० | ३,००० |
| | | | प्राप्त विपत्र | १,००० | १,५०० |
| | | | मालसाठा | ६,००० | ८,००० |
| | | | विविध ऋणको | ४,००० | ६,००० |
| | **४९,०००** | **५७,५००** | | **४९,०००** | **५७,५००** |

**नफा–तोटा विवरण ३१.३.२०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

| तपशील | | राशि (₹) | राशि (₹) |
|---|---|---|---|
| ३१ मार्च २०१८ रोजीचे भांडवल | | | ५४,३०० |
| (–) अतिरिक्त भांडवल | | | १,००० |
| **समायोजित अंतिम भांडवल** | | | ५३,३०० |
| **(–)** १ एप्रिल २०१७ रोजीचे भांडवल | | | ४५,००० |
| **समायोजन पुर्वीचा नफा** | | | ८,३०० |
| **(+) वर्षभरातील उत्पन्न व प्राप्ती** | | | |
| देयविपत्राचे अधिमूल्यन | | | ६०० |
| **(–) वर्षभरातील खर्च व नुकसान** | | | ८,९०० |
| १. अ) भांडवलावर व्याज | | | |
| वर्षाच्या सुरवातीच्या भांडवलावर | | | |
| (₹ ४५,००० वर १०% प्रमाणे) | ₹ ४,५०० | | |
| ब) अतिरिक्त भांडवलावर | ₹ ५० | | |
| (₹ १००० वर १०% प्रमाणे, ६ महिन्याचे) | | ४,५५० | |
| २) बुडीत व संशयित कर्ज निधी (₹ ६,००० वर ५%) | | ३०० | |
| ३) इमारतीवर घसारा (₹ ३०,००० वर १०%) | | ३,००० | |
| ४) संयंत्र आणि यंत्रावर घसारा (₹ ३,००० वर ५%) | | १५० | |
| ५) धनकोचे अवमूल्यन | | २,००० | १०,००० |
| **वर्षाचा शुद्ध तोटा** | | | **१,१००** |

**उदाहरण : १०**

श्री राज आपली पुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. खालील माहितीवरून वर्षाच्या सुरवातीचे अवस्था विवरण आणि वर्षअखेरचे अवस्था विवरण आणि नफा तोटा विवरण तयार करा.

| तपशील | राशि (₹) ३१.३.२०१८ | राशि (₹) ३१.३.२०१९ |
|---|---|---|
| विविध ऋणको | ४०,००० | ५०,००० |
| विविध धनको | ३०,००० | ६०,००० |
| १०% सरकारी रोखे | ---- | २०,००० |
| अधिकोष अधिविकर्ष | ३२,००० | ४०,००० |
| उपस्कर | १२,००० | १२,००० |
| मालसाठा | ४०,००० | ६०,००० |
| यंत्र सामुग्री | ३०,००० | ५०,००० |
| हस्तस्थ रोख | ४,००० | १०,००० |
| देय विपत्र | १८,००० | २२,५०० |
| प्राप्त विपत्र | १५,००० | १९,००० |

**अतिरिक्त माहिती :**

१. श्री राज यांनी मुलीच्या लग्नाकरिता व्यवसायातून ₹ २,००० उचलले.
२. १ ऑक्टोबर २०१८ रोजी त्यांनी व्यवसायात ₹ ६,००० अतिरिक्त भांडवल गुंतविले.
३. जास्तीची यंत्रसामुग्री १ ऑक्टोबर २०१८ रोजी घेतली.
४. ₹ २,००० बुडीत कर्ज अपलेखीत करून ऋणकोवर ५% प्रमाणे संशयीत कर्ज निधी निर्माण करा.
५. मालसाठ्याचे २० % ने अधिमूल्यन झाले आहे.
६. धनकोचे २०% ने अवमूल्यन झाले आहे.
७. १०% सरकारी रोखे १ ऑक्टोबर २०१८ रोजी खरेदी केले.
८. उचलीवर वार्षिक १० % प्रमाणे व्याजाची आकारणी करा.
९. भांडवलावर १०% प्रमाणे व्याज आकारा.
१०. उपस्करावर वार्षिक १०% प्रमाणे घसारा आकारा.
११. यंत्र सामुग्रीवर वार्षिक १०% प्रमाणे घसारा आकारा.

**उत्तर :** **श्री राज यांचे पुस्तकात**

**अवस्था विवरण रोजीचे**

| देयता | ३१.३.२०१८ (₹) | ३१.३.२०१९ (₹) | संपत्ती | ३१.३.२०१८ (₹) | ३१.३.२०१९ (₹) |
|---|---|---|---|---|---|
| विविध धनको | ३०,००० | ६०,००० | विविध ऋणको | ४०,००० | ५०,००० |
| अधिकोष अधिविकर्ष | ३२,००० | ४०,००० | १०% सरकारी रोखे | ---- | २०,००० |
| देयविपत्र | १८,००० | २२,५०० | उपस्कर | १२,००० | १२,००० |
| **भांडवल (संतुलित राशि)** | ६१,००० | ९८,५०० | मालसाठा | ४०,००० | ६०,००० |
| | | | यंत्रसामुग्री | ३०,००० | ५०,००० |
| | | | हस्तस्थ रोख | ४,००० | १०,००० |
| | | | प्राप्य विपत्र | १५,००० | १९,००० |
| | **१,४१,०००** | **२,२१,०००** | | **१,४१,०००** | **२,२१,०००** |

**नफा तोटा विवरण ३१.३.२०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

| तपशील | | राशि (₹) | राशि. (₹) |
|---|---|---|---|
| ३१.३.२०१९ रोजीचे भांडवल | | | ९८,५०० |
| (+) उचल | | | २,००० |
| | | | १,००,५०० |
| (–) अतिरिक्त भांडवल | | | ६,००० |
| **समायोजित अंतिम भांडवल** | | | ९४,५०० |
| (–) ३१.३.२०१८ रोजीचे भांडवल | | | ६१,००० |
| **समायोजन पूर्वीचा नफा** | | | ३३,५०० |
| **(+) वर्षभरातील उत्पन्न व प्राप्ती** | | | |
| १. उचलीवर व्याज | | १०० | |
| (₹ २००० वर १०% प्रमाणे, ६ महिने) | | | |
| २. सरकारी रोख्यां वर व्याज | | १,००० | १,१०० |
| (₹ २०००० वर १०% प्रमाणे, ६ महिने) | | | ३४,६०० |
| **(–) वर्षभरातील खर्च व नुकसान :** | | | |
| १. i) सुरवातीच्या भांडवलावर | | | |
| (₹ ६१,००० × $\frac{१०}{१००}$) | ₹ ६,१०० | | |
| ii) अतिरिक्त भांडवल | | | |
| (₹ ६,००० × $\frac{१०}{१००}$ × $\frac{६}{१२}$) | ₹ ३०० | ६,४०० | |
| २. उपस्करावर घसारा | | १,२०० | |
| (₹ १२,००० × १०/१००) | | | |
| ३. यंत्रसामुग्रीवर घसारा (₹ ३०,००० × $\frac{१०}{१००}$) | ₹ ३,००० | | |
| वाढीव यंत्रसामुग्रीवर (₹ २०,००० × $\frac{१०}{१००}$ × $\frac{६}{१२}$) | ₹ १,००० | ४,००० | |
| ४. बुडीत कर्ज | | २,००० | |
| ५. संशयित कर्ज निधी (₹ ५०,००० – ₹ २,००० = ४८,००० वर ५%) | | २,४०० | |
| ६. मालसाठ्याचे अधिमूल्यन (टीप – १) | | १०,००० | |
| ७. धनकोचे अवमूल्यन (टीप – २) | | १५,००० | ४१,००० |
| वर्षाचा शुद्ध तोटा | | | **६,४००** |

**कार्य टीपा :**

१) मालसाठ्याचे २०% ने अधिमुल्यन झाले. त्याची वास्तविक किंमत खालील प्रमाणे

$$\text{वास्तविक मूल्य} = \frac{\text{पुस्तक मूल्य}}{१०० + \text{अधिमुल्यन गुणोत्तर}} \times १००$$

$$\text{वास्तविक मूल्य} = \frac{₹\ ६०,०००}{१०० + २०} \times १००$$

$$\text{वास्तविक मूल्य} = \frac{₹\ ६०,०००}{१२०} \times १००$$

$$\text{वास्तविक मूल्य} = ₹\ ५०,०००$$

वास्तविक मूल्य ₹ ५०,००० आणि पुस्तकी मूल्य ₹ ६०,००० आहे. (₹ ६०,००० – ₹ ५०,०००) = ₹ १०,००० हे नुकसान आहे. म्हणून नफा तोटा विवरण पत्रकात वजा केले आहे.

२) धनकोचे २०% ने अवमूल्यन झाले. धनकोची वास्तविक मूल्य खालीलप्रमाणे.

$$\text{वास्तविक मूल्य} = \frac{\text{पुस्तक मूल्य}}{१०० - \text{अवमुल्यन गुणोत्तर}} \times १००$$

$$\text{वास्तविक मूल्य} = \frac{₹\ ६०,०००}{१०० - २०} \times १००$$

$$\text{वास्तविक मूल्य} = \frac{₹\ ६०,०००}{८०} \times १००$$

$$\text{वास्तविक मूल्य} = ₹\ ७५,०००$$

धनकोचे वास्तविक मूल्य ₹ ७५,००० आणि पुस्तकी मूल्य ₹ ६०,००० आहे. (₹ ६०,००० – ₹ ७५,०००) = ₹ १५,००० धनको वाढले, हे नुकसान आहे म्हणून नफा तोटा विवरण पत्रकात वजा केले आहे.

**कृती –I**

लहान व्यावसायिकाला भेट देऊन उत्पन्न खर्च, संपत्ती, देयता यांची माहिती गोळा करून त्या आधारे अवस्था विवरण व नफातोटा शोधून काढा.

**कृती –II**

एकेरी नोंद पध्दतीने व्यवसायाचा नफा-तोटा काढणाऱ्या व्यवसाय संस्थेस भेट द्या.

## स्वाध्याय

### प्र.१ एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. एकेरी नोंद पद्धती म्हणजे काय?

२. अवस्था विवरण म्हणजे काय?

३. एकेरी नोंद पद्धतीमध्ये सामान्यपणे कोणती खाती ठेवली जात नाहीत?

४. भांडवल शोधून काढण्यासाठी एकेरी नोंद पद्धतीमध्ये कोणते विवरण तयार केले जाते?

५. एकेरी नोंद पद्धतीमध्ये प्रारंभिक भांडवल कशा रितीने शोधून काढले जाते?

६. एकेरी नोंद पद्धतीमध्ये कोणती खाती ठेवण्यात येतात?

७. एकेरी नोंद पद्धतीमध्ये तेरीज पत्रक तयार केले जाते का?

८. कोणत्या प्रकारच्या व्यापारी संघटना सामान्यपणे एक नोंद पद्धतीचा वापर करतात?

### प्र.२ खालील विधानासाठी एक शब्द/ शब्दसमुह/ संज्ञा लिहा.

१. ताळेबंदा सारखे असणारे विवरण.

२. लहान व्यापारी संघटनांना योग्य असलेली लेखांकनाची पद्धती.

३. प्रारंभिक भांडवलाची रक्कम शोधून काढण्यासाठी तयार केले जाणारे ताळेबंद समान विवरण

४. संपत्तीचे देयतावरील आधिक्य म्हणजे.

५. एकेरी नोंद पद्धतीमध्ये व्यावसायिकाचे अंतिम भांडवल हे प्रारंभिक भांडवलापेक्षा जास्त असणे.

६. लेखाकंनाची अशी पद्धत जी मर्यादित व्यवहार लिहिण्यास उपयुक्त असते.

७. लेखाकंनाची अशास्त्रीय पद्धत.

८. व्यवसायाच्या मालकाने अस्तित्वात असलेल्या भांडवलापेक्षा त्यात केलेली जास्तीची भांडवली गुंतवणूक.

### प्र.३ खाली दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून संपूर्ण वाक्य पुन्हा लिहा.

१) भांडवल रक्कम निश्चित करण्यासाठी तयार केले जाते ...........

अ) अवस्था विवरण    ब) रोख खाते
क) उचलखाते    ड) ऋणको खाते

२) एकेरी नोंद पद्धतीमध्ये प्रारंभिक भांडवल = प्रारंभिक संपत्ती वजा (-) .................

अ) प्रारंभिक देयता    ब) रोख खाते    क) ऋणको    ड) धनको

३) अचूक नफा शोधून काढण्यासाठी चालू वर्षात अतिरिक्त भांडवल हे अंतिम भांडवलातून ............. केले जाते.

अ) अधिक    ब) वजा    क) विभाजीत    ड) दुर्लक्ष

४) एकेरी नोंद पद्धती ही ............साठी उपयुक्त होऊ शकते.

अ) एकल व्यापारी    ब) कंपनी    क) सरकार    ड) यापैकी नाही.

५) अचूक नफा शोधून काढतांना, उचल ही अंतिम भांडवलात ........ केली जाते.

अ) गुणित    ब) विभाजीत    क) वजा    ड) अधिक

६) संपत्ती आणि देयतेतील फरकाला ...........म्हणतात.

अ) भांडवल    ब) उचल    क) उत्पन्न    ड) खर्च

७)	जेव्हा प्रारंभिक भांडवलापेक्षा अंतिम भांडवल जास्त असते ते ...........दर्शविते.

अ) नफा	ब) तोटा	क) संपत्ती	ड) देयता

८)	जर प्रारंभिक भांडवल ₹ ३०,०००अंतिम भांडवल ₹६०,००० ; उचल ₹ ५,००० ; आणि अतिरिक्त भांडवल ₹३,००० ; असेल तर नफा ................ असेल.

a) ₹ ४५,०००	b) ₹ ३५,०००	c) ₹ ३२,०००	d) ₹ २२,०००

## प्र.४ खालील विधाने चूक कि बरोबर सकारण लिहा :

१.	दुहेरी नोंद पद्धती ही लेखापुस्तके ठेवण्याची शास्त्रशुद्ध पद्धत आहे.

२.	एकेरी नोंद पद्धतीत तेरीज तयार करणे अशक्य असते.

३.	अवस्था विवरण आणि ताळेबदंपत्रक हे एकसारखेच आहेत.

४.	मोठ्या व्यवसायाला एकेरी नोंद पद्धती उपयोगी नाही.

५.	एकेरी नोंद पद्धतीत केवळ रोख आणि वैयक्तीक खाती नोंदविली जातात.

## प्र.५. खालील विधानांशी तुम्ही सहमत आहात का?

१)	अतिरीक्त भांडवलामुळे वार्षिक नफ्यात वाढ होते.

२)	एकेरी नोंद पद्धतीमध्ये उचलीवरील व्याजामुळे नफ्यात घट होते.

३)	एकेरी नोंद पद्धतीमध्ये वास्तविक आणि नामधारी खाती ठेवली जात नाही.

४)	एकेरी नोंद पद्धती ही निश्चित नियम आणि तत्वांवर आधारीत आहे.

५)	नफातोटा विवरण हे नफातोटा खात्यासारखेच आहे.

## प्र.६ रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१)	अवस्था विवरण हे .............सारखेच आहे.

२)	एकेरी नोंद पद्धतीमध्ये, नफा = वर्षअखेरचे भांडवल वजा ................

३)	अचूक नफा शोधून काढतांना अंतिम भांडवलातून उचल ................ केली जाते.

४)	पुस्तपालनाच्या ................. पद्धतीत प्रत्येक व्यवहाराची दुहेरी नोंद करण्यात येते.

५)	संपत्ती आणि देयता मधील फरकास .................... म्हणतात.

६)	एकेरी नोंद पद्धती ................... साठी लोकप्रिय आहे.

७)	शुध्द नफा शोधून काढण्यासाठी अतिरीक्त भांडवल अंतिम भांडवलातून .......... केले जाते.

८)	एकेरी नोंद पद्धती ही ...........व्यवसायासाठी उपयुक्त आहे.

## प्र.७ असाधारण (odd) शब्द शोधा :

१)	उचलीवर व्याज, अदत्त खर्च, संपत्तीचे अवमूल्यन, पूर्वदत्त खर्च

२)	भांडवलावरील व्याज, कर्जावरील व्याज, देयतेचे अधिमूल्यन, संपत्तीवरील घसारा

३)	धनको, देय्यविपत्रे, अधिकोष अधिविकर्ष, व्यापारातील मालसाठा

**प्र.८ खालील कोष्टक पूर्ण करा :**

१) अंतिम भांडवल − प्रारंभिक भांडवल = नफा

| अंतिम भांडवल | | प्रारंभिक भांडवल | | नफा |
|---|---|---|---|---|
| ₹ १०,००० | − | ₹ ५,००० | = | |

२) प्रारंभिक संपत्ती − प्रारंभिक देयता = प्रारंभिक भांडवल

| प्रारंभिक संपत्ती | | प्रारंभिक देयता | | प्रारंभिक भांडवल |
|---|---|---|---|---|
| | − | ₹ २०,००० | = | ₹ १०,००० |

३) अंतिम संपत्ती − अंतिम देयता = अंतिम भांडवल

| अंतिम संपत्ती | | अंतिम देयता | | अंतिम भांडवल |
|---|---|---|---|---|
| ₹ १०,००० | − | ₹ ५,००० | = | |

४) अंतिम भांडवल + उचल = अतिरिक्त भांडवल − प्रारंभिक भांडवल = नफा

| अंतिम भांडवल | | उचल | | अतिरिक्त भांडवल | | प्रारंभिक भांडवल = | | नफा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | + | ₹ १५,००० | = | ₹ ४०,००० | − | ₹ २०,००० | = | |

५) हस्तस्थ रोख + बँकेतील रोख + विविध ऋणको − देय्य विपत्र = भांडवल

| हस्तस्थ रोख | | बँकेतील रोख | | विविध ऋणको | | देय्य विपत्र | | भांडवल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ₹ १०,००० | + | ₹ ५,००० | + | ₹ ८,००० | − | ₹ ४,००० | = | |

**प्र.९ चौकोनात योग्य खूण करून खालील तक्ता पूर्ण करा. जेव्हा अंतिम भांडवल दिलेले असेल तेंव्हा :**

| | | अधिक | वजा |
|---|---|---|---|
| १) | उचल | | |
| २) | पूर्वदत्त खर्च | | |
| ३) | देयतेचे अधिमूल्यन | | |
| ४) | देयतेचे अवमूल्यन | | |
| ५) | उचल वरील व्याज | | |
| ६) | प्रारंभिक भांडवल | | |
| ७) | संपत्तीचे अवमूल्यन | | |
| ८) | भांडवलावरील व्याज | | |
| ९) | संपत्तीवरील घसार | | |
| १०) | बुडीत कर्ज | | |

**१. श्री. पुनावाला आपली लेखापुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. त्यांनी खालील माहिती पुरविली आहे.**

३१.३.२०१७ रोजीचे भांडवल ₹ ६०,००० ३१.३.२०१८ रोजीचे भांडवल ₹ १,००,०००

वर्षभरातील उचल ₹ २,००० व्यवसायात गुंतविलेले अतिरिक्त भांडवल ₹ १२,०००

वर्षभरातील नफा किंवा तोटा शोधून काढा.

**२. सुजित या लहान व्यावसायिकाने त्याच्या व्यवसायाची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.**

| तपशील | १.४.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) |
|---|---|---|
| हस्तस्थ रोख | २,००० | ७,००० |
| ऋणको | ४०,००० | ६०,००० |
| धनको | ५०,००० | ८०,००० |
| १०% सरकारी रोखे | ----- | ९,००० |
| बँक अधिविकर्ष | ७०,००० | ३०,००० |
| मोटारव्हॅन | ५०,००० | ७०,००० |
| उपस्कर | १५,००० | १५,००० |
| मालसाठा | ७०,००० | ९०,००० |
| प्राप्य विपत्र | ७०,००० | ९०,००० |

**अतिरिक्त माहीती :**

१. सुजित यांनी १ ऑक्टोबर २०१७ रोजी त्यांच्या वैयक्तीक उपयोगाकरिता ₹ ५,००० उचल केली.

२. त्यांनी त्यांच्या निवासी सदनिकेचे भाडे देण्यासाठी व्यवसायातून ₹ ३०,००० उचलले.

३. उपस्करावर वार्षिक १०% प्रमाणे घसारा आकारा आणि मोटारव्हॅन ₹ १,००० ने अपलेखित करा.

४. उचलीवर ₹ ३,००० व्याज आकारा.

५. १०% सरकारी रोखे १ ऑक्टोबर २०१७ रोजी खरेदी केले.

६. भांडवलावर वार्षिक १०% दराने व्याज आकारा.

७. ₹ १,००० बुडीत कर्ज अपलेखीत करून ऋणकोवर बुडीत व संशयीत कर्ज निधीसाठी ५% प्रमाणे तरतूद करा.

तयार करा : प्रारंभिक अवस्था विवरण, अंतिम अवस्था विवरण आणि ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता नफा-तोटा विवरण.

**३. अंजली आपली लेखापुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. १ एप्रिल २०१६ रोजीची त्यांची आर्थिक स्थिती खालीलप्रमाणे**

**बँकेतील** ₹ ४,०००, हस्तस्थ रोख ₹ १,०००, मालसाठा ₹ ६,०००; विविध ऋणको ₹ ८,४००, सयंत्र आणि यंत्र ₹ ७,५००, प्राप्य विपत्र ₹ २,६००, धनको ₹ ३५००; देय्यविपत्र ₹ ४,०००

३१.३.२०१७ रोजीची त्यांची आर्थिक स्थिती खालीलप्रमाणे - बँकेतील रोख ₹ ३,९००, हस्तस्थ रोख ₹ २,०००. मालसाठा ₹ ९०००, विविध ऋणको ₹ ७,५००; सयंत्र आणि यंत्र ₹ ७,५००; देय्य विपत्र ₹ २,२००, प्राप्य विपत्र ₹ ३,४००; धनको ₹ १,५००

या वर्षात अंजली यांनी ₹ १,५०० अतिरिक्त भांडवल व्यवसायात गुंतविले आणि त्यांनी वैयक्तीक उपयोगाकरिता दरमहा ₹ ७०० उचल केली.

सयंत्र आणि यंत्रावर वार्षिक ५% प्रमाणे घसारा आकारा. ऋणकोवर ५% दराने संशयित कर्ज निधी आकारा.

प्रारंभिक आणि अंतिम अवस्था विवरण व ३१ मार्च २०१७ रोजी संपणाऱ्या वर्षाचे नफा-तोटा विवरण तयार करा.

**४. श्री विजय फळांचा व्यवसाय करतात. ते आपली लेखा पुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. त्यांनी त्यांच्या व्यवसायाची खालील माहिती दिली आहे.**

| तपशील | ३१.३.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) |
|---|---|---|
| इमारत | ५०,००० | ६०,००० |
| उपस्कर | ३०,००० | ३०,००० |
| सयंत्र आणि यंत्र | २०,००० | ४०,००० |
| विविध ऋणको | ३०,००० | ५०,००० |
| मालसाठा | १५,००० | २५,००० |
| रोख शिल्लक | १०,००० | २०,००० |
| प्राप्य विपत्र | ५,००० | १०,००० |
| विविध धनको | ३०,००० | १५,००० |
| बँक अधिविकर्ष | ८,००० | ----- |
| बँक शिल्लक | ----- | १२,००० |

**अतिरिक्त माहिती :**

१. श्री विजय यांनी ₹ ७,००० नव्याने भांडवल गुंतविले.

२. त्यांनी मुलीच्या लग्नाकरिता ₹ ४०,००० व्यवसायातून खर्च केले.

३. इमारतीवर ₹ ६,००० घसारा आकारा.

४. ऋणकोवर ५% दराने संशयित कर्जनिधी आकारा.

तयार करा - १. प्रारंभिक अवस्था विवरण

२. अंतिम अवस्था विवरण

३. ३१.३.२०१८ चा नफातोटा विवरण

**५ कु. फिजा आपली पुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. आणि त्यांनी त्यांच्या व्यवसायाची माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.**

| तपशील | १.४.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) |
|---|---|---|
| ऋणको | २५,००० | ४५,००० |
| गुंतवणूक | ---- | ४०,००० |
| सयंत्र आणि यंत्र | १०,००० | १०,००० |
| धनको | ३०,००० | ३३,००० |
| मालसाठा | ३२,००० | ३५,००० |
| बँकेतील रोख | १६,००० | ५०,००० |
| देय्य विपत्र | ५,००० | ८,००० |

**अतिरिक्त माहिती :**

१. कु. फिजा यांनी पहिल्या अर्ध वर्षात दरमहा ₹ २,००० प्रमाणे आणि दुसऱ्या अर्ध वर्षात दरमहा ₹ १,००० प्रमाणे व्यवसायाच्या खात्यातून वैयक्तीक उपयोगाकरिता काढले.

२. त्यांनी त्यांची वैयक्तीक संपत्ती ₹ ४०,००० विकून ती रक्कम अतिरिक्त भांडवल म्हणून गुंतविली.

३. त्यांनी ₹ १२,००० किमतीचा माल घरगुती उपयोगाकरिता नेला.

४. सयंत्र आणि यंत्रावर वार्षिक १०% दराने घसारा आकारा.

५. ऋणकोवर ५% प्रमाणे बुडीत व संशयित कर्ज निधी आकारा.

तयार करा – १. प्रारंभिक अवस्था विवरण

२. अंतिम अवस्था विवरण

३. ३१.३.२०१८ रोजीचे नफातोटा विवरण

**६. कु सानिका आपली पुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. त्यांनी ३१.३.२०१८ रोजीचे अवस्था विवरण दिले आहे.**

| देयता | राशि (₹) | संपत्ती | राशि (₹) |
|---|---|---|---|
| धनको | १२,००० | सयंत्र आणि यंत्र | १७,००० |
| देय विपत्र | ८,५०० | ऋणको | १९,५०० |
| भांडवल (संतुलित राशि) | ३८,५०० | मालसाठा | ९,००० |
| | | हस्तस्थ रोख | ७,५०० |
| | | प्राप्य विपत्र | ६,००० |
| | **५९,०००** | | **५९,०००** |

३१ मार्च २०१८ रोजी त्यांची देयता आणि संपत्ती खालीलप्रमाणे :

सयंत्र आणि यंत्र ₹ ४२,०००, मालसाठा ₹ ३८,०००, हस्तस्थ रोख ₹ १०,०००, धनको ₹ ७,०००, ऋणको ₹ २५,०००, देय विपत्र ₹ ६,०००

वर्षभरातील उचल ₹ ५,५००, सयंत्र आणि यंत्राचे ५% ने अधिमूल्यन आणि मालसाठ्याचे २० % ने अवमूल्यन झाले. ऋणकोवर १०% दराने बुडीत व संशयित कर्ज निधी निर्माण करा. भांडवलावर वार्षिक १०% प्रमाणे व्याज आकारा.

तयार करा. – १. अंतिम अवस्था विवरण

२. ३१.३.२०१८ चे नफातोटा विवरण

७. श्री. सुहास यांनी १ एप्रिल २०१७ रोजी ₹ १,५०,००० भांडवलाने व्यापार सुरू केला.

३१ मार्च २०१८ रोजीची त्यांची आर्थिक स्थिती – रोख ₹ २०,०००, मालसाठा ₹ १५,०००, ऋणको ₹ ३०,०००, परिसर ₹ ९०,०००, वाहन ₹ ४५,०००, धनको ₹ १८,५००, देयविपत्र ₹ १०,०००

**अतिरिक्त माहिती :**

१. ३० सप्टेंबर २०१७ रोजी त्यांनी ₹ १०,००० अतिरिक्त भांडवल आणले, भांडवलावर वार्षिक ५% प्रमाणे व्याज आकारा.

२. त्यांनी खाजगी उपयोगाकरिता ₹ १५,००० उचलले. उचलीवर वार्षिक ५% प्रमाणे व्याज आकारा.

३. बुडीत कर्ज ₹ ५०० अपलेखीत करा.

४. वाहनावर ५% प्रमाणे आणि परिसरावर ४ % प्रमाणे घसारा आकारा.

तयार करा. – १. अंतिम अवस्था विवरण

२. ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाचे नफा तोटा विवरण.

८. **गणेश आपली पुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. त्यांच्या व्यवसायाची माहिती खालीलप्रमाणे.**

| तपशील | १.४.२०१६ (₹) | ३१.३.२०१७ (₹) |
|---|---|---|
| हस्तस्थ रोख | १५,००० | २२,००० |
| बँकेतील रोख | ३०,००० | ४५,००० |
| मालसाठा | ८,००० | १३,००० |
| उपस्कर | २०,००० | २०,००० |
| सयंत्र आणि यंत्र | ९०,००० | १,१०,००० |
| इमारत | ५०,००० | ५०,००० |
| ऋणको | २७,००० | ३८,००० |
| धनको | ८,००० | १०,००० |

वर्षभरात त्यांनी ₹ २५,००० खाजगी उपयोगासाठी उचल केली आणि ₹ ३,००० चा माल घरगुती उपयोगासाठी नेला. १ ऑक्टोबर २०१६ रोजी त्यांनी घरगुती उपस्कर ₹ ४,००० ला विकले आणि ही संपूर्ण रक्कम व्यवसायाच्या बँक खात्यात जमा केली. सयंत्र आणि यंत्रावर वार्षिक १०% प्रमाणे घसारा आकारा (वाढीव यंत्र १ ऑक्टोबर २०१६ रोजी आणले) उपस्करावर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

तयार करा: १. प्रारंभिक अवस्था विवरण

२. अंतिम अवस्था विवरण

३. ३१ मार्च २०१७ रोजी संपणाऱ्या वर्षाचे नफा तोटा विवरण

९. **पिटर आपली लेखापुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. खालील माहितीनुसार प्रारंभिक आणि अंतिम अवस्था विवरण आणि ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता नफा तोटा विवरण तयार करा.**

| तपशील | ३१.३.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) |
|---|---|---|
| बँक शिल्लक | ४६,००० | ३८,००० |
| रोख शिल्लक | ८,५०० | १५,००० |
| विविध ऋणको | ८०,००० | १,३०,००० |
| मालसाठा | ७०,००० | १,००,००० |
| उपस्कर | १८,००० | १८,००० |
| विविध धनको | ४०,००० | ४५,००० |
| देय विपत्र | १५,००० | ३०,००० |

**अतिरिक्त माहिती :**

१. पिटर यांनी ₹ १५,००० खाजगी उपयोगासाठी व्यवसायातून काढले.

२. १ जानेवारी २०१८ रोजी त्यांनी व्यवसायात ₹ १०,००० अतिरिक्त भांडवल आणले.

३. उपस्करावर वार्षिक १०% दराने घसारा आकारा.

४. विविध ऋणकोवर ५% दराने बुडीत कर्ज निधी साठी तरतूद करा.

५. लेखापुस्तकात अंतिम मालसाठ्याचे २५% ने अधिमूल्यन झाले.

**१०. सुरेश आपली लेखापुस्तके एकेरी नोंद पद्धतीने ठेवतात. १.४.२०१७ रोजीची त्यांची आर्थिक स्थिती खालीलप्रमाणे :**
बँकेतील रोख ₹ ४,०००, हस्तस्थ रोख ₹ ३,०००; मालसाठा ₹ ८,०००; विविध ऋणको ₹ ९,०००; संयंत्र आणि यंत्र ₹ १०,०००; प्राप्त विपत्र ₹ ३,०००; धनको ₹ १,५००; देय विपत्र ₹ २,०००.

३१मार्च २०१८ रोजीची आर्थिक स्थिती खालीलप्रमाणे :

बँकेतील रोख ₹ ६,४००; हस्तस्थ रोख ₹ १,८००; मालसाठा ₹ १००००; विविध ऋणको ₹ ८,०००; संयत्र आणि यंत्र ₹ १०,०००; देय विपत्र ₹ ४,०००; प्राप्त विपत्र ₹ ५,२००; धनको ₹ २,०००.

चालू वर्षात सुरेश यांनी व्यवसायात ₹ ३,००० अतिरिक्त भांडवल गुंतविले. आणि खाजगी उपयोगासाठी ₹ ७०० प्रती महिना उचल केली.

सयंत्र आणि यंत्रावर वार्षिक ५% दराने घसारा आकारा ऋणकोवर ५% दराने संशयित कर्ज निधी आकारा.

तयार करा: १. प्रारंभिक अवस्था विवरण

२. अंतिम अवस्था विवरण

३. ३१ मार्च २०१७ रोजी संपणाऱ्या वर्षाचे नफा तोटा विवरण

# उत्तरसूची

## 1. पुस्तपालन व लेखाकर्माची ओळख
## (Introduction of Book-Keeping & Accountancy)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्र.२ | १) पुस्तपालन | २) भांडवल | ३) धनको | ४) व्यवहार |
| | ५) हानी | ६) दिवाळखोर नसलेला झालेला व्यक्ती | ७) निर्णय घेणे | ८) मालमत्ता |
| | ९) चल संपत्ती | १०) व्यापारी कसर | | |
| प्र.३ | १) नफा | २ रोख | ३) बुडीत कर्ज | ४) प्रकटीकरण संकल्पना |
| | ५) वस्तू | ६) ख्याती | ७) एएस - ३ | ८) पुराणमतवाद |
| | ९) स्पष्टीकरण | १०) व्यवहार | | |

प्र.४ सत्य : २, ३, ५, ७, ८, १०  असत्य : १, ४, ६, ९

## २. पुस्तपालनाची द्विनोंद पद्धती अर्थ आणि मूलतत्वे
## (Meaning & Fundamental of Double Entry Book-Keeping)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्र.२ | १) दुहेरी नोंद पद्धत | २) जमाबाजू | ३) उचल/ आहरण करणे | ४) वास्तविक खाते. |
| | ५) नामधारी | ६) नावे | ७) अदृश्यसंपत्ती | ८) लयूका डी बर्गो पॅसिओली |
| | ९) एकनोंद पद्धती | १०) दुहेरी नोंद पद्धती | | |
| प्र.३ | १) १० नोंव्हेंबर | २) भारतीय पद्धत | ३) जमा | ४) वैयक्तीक |
| | ५) वास्तविक | ६) अदृश्य/अमूर्त संपत्ती | ७) वैयक्तीक | ८) लाभ देणाऱ्याचे |
| | ९) बाहेर जाणारी | १०) खर्च आणि नुकसान | | |
| प्र.४ | १) चूक | २) चूक | ३) बरोबर | ४) बरोबर |
| | ५) चूक | ६) चूक | ७) बरोबर | ८) बरोबर |
| | ९) बरोबर | १०) बरोबर | ११) बरोबर | १२) चूक |
| | १३) चूक | १४) बरोबर | १५) चूक | |
| प्र.५ | १) जमा | २) भांडवल | ३) नावे | ४) दुहेरी नोंद |
| | ५) उत्पन्न आणि प्राप्ती | ६) वास्तविक | ७) एकनोंद | ८) वास्तविक |
| | ९) नामधारी | १०) दोन | ११) वास्तविक | १२) वास्तविक |

प्र.६ १) वैयक्तीक खाते :- १, ३, ५, ८, ९, १६, १७, १९, २०, २४, २९, ३१, ३४, ३५, ३८.
२) वास्तविक खाते :- २, ६, ७, १२, १४, २१, २३, २६, २८, ३२, ३३.
३) नामधारी खाते :- ४, १०, ११, १३, १५, १८, २२, २५, २७, ३०, ३६, ३७, ३९, ४०.

## ३. रोजकिर्द / पंजी (Journal)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्र.२ | १) रोजकिर्द | २) GST | ३) स्पष्टीकरण; | ४) रोजकिर्दयन |
| | ५) Jour | ६) रोख कसर | ७) मिश्र (संयुक्त) नोंद | ८) उचल |
| | ९) आगम कर | १०) खाते पान क्रमांक | | |

**प्र.३** १) स्पष्टीकरण २) व्यापारी कसर ३) रोजकिर्दयन ४) स्पष्टीकरण
५) खाते पान क्रमांक ६) लाभ घेणाऱ्याचे खाते ७) फर्निचर खाते ८) कमिशन/ दलाली खाते
९) देना बँक कर्ज खाते, १०) पशुधन खाते

**प्र.४** सत्य : २, ३, ४, ८, १० असत्य : १, ५, ६, ७, ९

**प्र.५** १) रोजकिर्द २) रोजकिर्दयन ३) स्पष्टीकरण ४) व्यापारी कसर
५) कसर (रोख सूट) ६) स्पष्टीकरण ७) रोख ८) पावती
९) तीन (३); १०) रेखांकित धनादेश.

**प्र.७** १) रोजकीर्दीत फक्त आर्थिक व्यवहारांची नोंद होते.
२) जमाखर्चाच्या पुस्तकात रोखकसरीची नोंद होते.
३) रोजकीर्द हे मूळनोंदीचे पुस्तक आहे.
४) भारत सरकारकडून १ जुलै २०१७ रोजी अंमलबजावणी करण्यात आली.
५) मालकाने यंत्रखरेदी केल्यास त्याच्या भांडवलात वाढ होते.

**प्र.८** सहमत – १, ३, ५, असहमत – २, ४

**प्र.९** १) ३६,००० २) CGST – ₹ २५०, SGST ₹ २५० ३) ₹ १,०५० ४) १०% ५) ₹ ४०,५००

## ४. खातेवही / प्रपंजीयन (Ledger)

**प्र.२** १) खातेवही २) खतावणी ३) खातेपान क्रमांक (पृष्ठांक) ४) खातेसुंलन
५) ऋणको ६) अधिकोष अधिविकर्ष ७) आगीमुळे नुकसान ८) शुद्ध तेरीज

**प्र.३** १) वैयक्तिक २) शेवटची ३)रो. पान क्र. ४) नावे
५) खाते संतुलन ६) खतावणी ७) नावे ८)तेरीज पत्रक

**प्र.४** सत्य :- ५,६, ८ असत्य : १,२,३,४,७

**प्र.५** १) नावे २) नावे ३) जमा ४) जमा
५) नामधारी ६) शिल्लक आली आणली ७) उचल ८) ₹ २०,०००

### ४. प्रात्याक्षिक उदाहरणे

**प्र.२** खरेदी खात्याची नावे शिल्लक – ₹ २ १,३०० जमा शिलका – खरेदी परत खाते ₹ १,३३०, अमोलचे खाते ₹७,५००, ऐश्वर्याचे खाते ₹ १,९२०, विवेकचे खाते ₹ ३,९००, शेठचे खाते ₹ ५,८५०, शबरीचे खाते ₹ ८००.

**प्र.३** नाव रोकड खात्याची नावे बाकी ₹ १०,४००, भूषणचे खाते ₹ १,४००, खरेदी खाते ₹ ६,६००, मजुरी खाते ₹ ४०० जमा शिलका – विनयचे भांडवल ₹ १०,०००, विकासचे खाते ₹ १,४००, विक्री खाते ₹ ७,४००.

**प्र.४** रोकड खाते ₹ ९,४५०

**प्र.५** दिलेली कसर ₹ १,१५०

**प्र.६** **नावे शिलका :** रोकडखाते ₹ २,०००, खरेदी खाते ₹ १३,०००, बँक खाते ₹ ३७,७५०.जमा शिलका – विक्री खाते ₹ १२,५००, मदन लालचे भांडवल खाते ₹ ४०,०००, जास्तीची रक्कम ₹ ४,५००.

**प्र.७** **नावे शिलका :** खरेदीखाते ₹ ३०,६००, रोकड खाते ₹ १,५८, १००, लेखनसामुग्री ₹ ४,५००, जाहिरात खाते ₹ २,०००, देवचे खाते ₹ ४००, सागरचे खाते ₹ ६,३००,

**जमा शिलका :** सुनीलचे भांडवल खाते ₹ १,४०,०००, केदारचे कर्ज खाते ₹ ५०,०००, शेखरचे खाते ₹ ५,६०० विक्री खाते ₹ ६,३००.

**प्र.८** नावे .शिलका –रोकड खाते ७,५५०, खरेदी खाते ₹ २,०००, प्राप्त SGST खाते ५०, प्राप्त CGST ५०, भाडे खाते ₹ २५०, उचल खाते ₹३००, मोबाईल खाते ₹ ७००. जमा शिलका – कमिशन खाते ₹ १०,०००, विक्री खाते ₹ ३,०००, देय SGST A/c ₹ ७५, देय CGST A/c ₹ ७५.

प्र.९ **नावे शिलका :** यंत्र खाते ₹ ४,४०,०००, रश्मीचे खाते ₹ ७९,६००, खरेदी खाते ₹ २,५५,०००, विक्रीपरत खाते ४०,४००, रोकड खाते ९५,८००, बँक खाते १,६६,०००, लेखन सामुग्री खाते ५,०००, पगार खाते ₹ १०,०००, दत्त कसर ₹ १,०००.

**जमा शिलका :** प्राप्त कसर खाते ₹ ८००, विक्री खाते ₹ ४, १८,०००, पवनचे भांडवल खाते ₹ ५,२०,०००, व्याज खाते ₹ ६,०००, तेरजेची बेरीज ₹ १०,९२,८००.

## ५. सहाय्यक पुस्तके (Subsidiary Books)

प्र.२ १) लघुरोखपाल २) चालु खाते ३) विश्लेषणात्मक लघुरोख पुस्तक ४) खरेदी पुस्तक ५) विक्री परत पुस्तक ६) प्रती प्रविष्ठी ७) बचत ८) नावे पत्र ९) जमापत्र १०) चालु खाते

प्र.३ १) (अ) जमा २) (ड) प्रती ३) (ब) निर्गत बिजक ४) (क) मूळ रोजकीर्द ५) (अ) सहाय्यक ६) (ब) रोख पुस्तक ७) (ड)मूळ रोजकीर्द ८) (क) प्राप्ती ९) (अ) आदेशक १०) (क) मुदत ठेव.

प्र.४ सत्य :- ५ असत्य : १,२,३,४

प्र.५ सहमत – ३, ४ असहमत – १, २, ५

प्र.६ १) सहाय्यक २) रोख ३) खरेदीपरत ४) मूळ रोजकीर्द ५) बँक ६) खरेदी पुस्तक ७) उधार ८) अधिविकर्ष ९) लघु १०) उधार

प्र.८ १) ₹ १,३६,८०० २) ₹ ८४० ३) ₹ ३९,००० ४) ₹ १,२००

## ५. प्रात्याक्षिक उदाहरणे

प्र.१ शेवटीची रोख शिल्लक ₹ ६४,५०० : शेवटची बँक शिल्लक ₹ ७०,०००

प्र.२ शेवटची रोख शिल्लक ₹ ८,८०० शेवटची बँक शिल्लक ₹ १०,०००

प्र.३ शेवटची रोख शिल्लक ₹ १६,६०० शेवटची बँक शिल्लक ₹ ६,५००

प्र.४ लघुरोख शिल्लक ₹ ४३५, १ फेब्रुवारी,२०१८ ला अग्रधन रक्कम प्राप्त ₹ १,०६५

प्र.५ एकूण लघुखर्च : ₹ १,०५५, लघुरोख शिल्लक : ₹ ३४५. १ मे २०१८ अग्रधन रक्कम प्राप्त मुख्य रोख पालाकडून ₹ १,०५५

प्र.६ १) खरेदी पुस्तकाची बेरीज : ₹ १६,८७०; २) विक्री पुस्तकाची बेरीज : ₹ २०,६७०; ३) खरेदी परत पुस्तकाची बेरीज : ₹ १,३८०; ४) विक्री परत पुस्तकाची बेरीज : ₹ १,३५०;

प्र.७ १) खरेदी पुस्तकाची बेरीज : ₹ ६०,९००; २) विक्री पुस्तकाची बेरीज : ₹ ३४,६८०; ३) खरेदी परत पुस्तकाची बेरीज : ₹ ४,७३०; ४) विक्री परत पुस्तकाची बेरीज : ₹ ५,१००

प्र.८ १) खरेदी पुस्तकाची बेरीज : ₹ ४२,५००; २) विक्री पुस्तकाची बेरीज : ₹ ४६,३००; ३) खरेदी परत पुस्तकाची बेरीज : ₹ २,३००; ४) विक्री परत पुस्तकाची बेरीज : ₹ ६९०

प्र.९ १) खरेदी पुस्तकाची बेरीज : ₹ ३०,९३३; २) विक्री पुस्तकाची बेरीज : ₹ ३०,०४१; ३) खरेदी परत पुस्तकाची बेरीज : ₹ ३,१९५; ४) विक्री परत पुस्तकाची बेरीज : ₹ ६२०

प्र.१० १) खरेदी पुस्तकाची बेरीज : ₹ ३५,९००; २) विक्री पुस्तकाची बेरीज : ₹ ३६,०५०; ३) खरेदी परत पुस्तकाची बेरीज : ₹ १,४००; ४) विक्री परत पुस्तकाची बेरीज : ₹ ३,४००

## ६. बँक मेळपत्रक / बँक जुळवणी पत्रक (Bank Reconciliation Statement)

**प्र.२** १. चालू खाते. २. पास बुक.
३. आय.एफ.एस, सी, भारतीय वित्तीय सांकेतीक प्रणाली ४. बँक मेळपत्रक.
५. पास बुकानुसार अधिविकर्ष. ६. पैसे जमा करण्याचे चलनपत्र.
७. पैसे जमा करण्याच्या चलनपत्राचा छोटा भाग / हिस्सा. ८. रोख पुस्तकानुसार अधिविकर्ष.
९. रोख पुस्तक. १०. बँक शिल्लक (अनुकूल शिल्लक).

**प्र.३** सहमत – १, २, ३, ८, ९ असहमत – ४, ५, ६, ७

**प्र.४** १. जमा. २. जमा. ३. बँक विवरण. ४. वाढते.
५. व्यावसायिक. ६. जमा. ७. चालू ८. अनुकूल.
९. सामान्य. १०. असामान्य.

**प्र.५** १. नावे. २. बँक. ३. रोख ४. बॅकमेळपत्रक.
५. वाढीव / वाढलेली / जास्त. ६. शोधन/ जमा. ७. नावे. ८. जमा.
९. पैसे काढण्याचे चलनपत्र. १०. बँक सूचना.

**प्र.६** बरोबर – २, ४, ५ चूक – १, ३

### ६. प्रात्याक्षिक उदाहरणे

**प्र.३ रोख पुस्तकानुसार अधिविकर्ष ₹ ३००**

**प्र.४ पास बुकनुसार अधिविकर्ष शिल्लक ₹ ४६,८९०/–**

**प्र.५ रोख पुस्तकानुसार बँक शिल्लक ₹ २८,१००**

**प्र.६ पास बुकनुसार बँक शिल्लक ₹ १२,०७०**

**प्र.७ पास बुकनुसार अधिविकर्ष शिल्लक ₹२५,०००**

**प्र.८ पास बुकनुसार अधिविकर्ष ₹ १३,९७५/–**

**प्र.९ पास बुकनुसार अधिविकर्ष ₹ २६,५००/–**

**प्र.१० पास बुकनुसार अधिविकर्ष ₹ १६,२३०**

## ७. घसारा/ अवक्षयन (Depreciation)

**प्र.२** १) घसारा २) संपत्तीची मुळ किंमत ३) मोडीची किंमत ४) संपत्तीचा उपयोगाचा कार्यकाल
५) स्थिर प्रभाग पद्धत ६) ऱ्हासमान शेष पद्धत ७) स्थिर संपत्ती ८) स्थापना खर्च
९) संपत्तीच्या विक्रीवरील नफा १०) प्ऱ्हासन अधिक्य पद्धत

**प्र.३** १) घसारा २) स्थिर ३) भांडवली ४) अवशेष मुल्य
५) ऱ्हासमान शेष पध्दत ६) सरळ रेषा पद्धत ७) नफा – तोटा खाते

**प्र.४** बरोबर – १,३,४ चूक – २, ५, ६, ७, ८.

**प्र.५** १) स्थिर २) यंत्र ३) ऱ्हासमान शेष पद्धत ४) अवशेष मुल्य
५) घसारा ६) स्थिर ७) क्रममुल्य ८) अवशेषमुल्य
९) नामधारी १०) डेप्रीटियम.

**प्र.६** सहमत – १, ३, ५, असहमत – २, ४.

प्र.८ १) वार्षिक घसारा ₹ ३,००० २) वार्षिक घसारा ₹ ३,२०० ३) घसारा ₹ ९,०००
४) पुस्तकीमूल्य (WDV) ₹ १,७५,५०० ५) यंत्राच्या विक्रीवर तोटा ₹ १,७५०.

## ७. स्थिर प्रभाग पद्धतीवरील उदाहरणे

प्र.१ दरवर्षी घसारा ₹ ५,००० मोटारगाडी खात्यावर शिल्लक ₹ ४०,०००

प्र.२ पहिल्या वर्षी घसारा – ₹ ३,७५०, दुसऱ्या वर्षी घसारा – ₹ १५,०००, तिसऱ्या वर्षी घसारा – ₹ ७,५०० तोटा – ३,७५०

प्र.३ पहिल्या वर्षी घसारा – ₹ २,७००, दुसऱ्या वर्षी घसारा – ₹ १३,२००, तिसऱ्या वर्षी घसारा – ₹ १४,२५०, यंत्राच्या विक्रीवरील तोटा – रु, १,१००, यंत्रखात्याची शिल्लक – ₹ ७३,७५०

प्र.४ पहिल्या वर्षी घसारा – ₹ ३७५, दुसऱ्या वर्षी घसारा – ₹ १,५०० तिसऱ्या वर्षी घसारा – ₹ ३,३७५, चौथ्या वर्षी घसारा – रु, ७,०००, प्लँट खात्याची शिल्लक – ₹ ५७,७५०

प्र.५ पहिल्या वर्षी घसारा – ₹ २०,०००, दुसऱ्या वर्षी घसारा – ₹ २३,०००, तिसऱ्या वर्षी घसारा – ₹ २४,०००, यंत्र विक्रीवरिल नफा – रु, ३,०००, यंत्र खात्यावरिल शिल्लक – ₹ १,४०,०००

प्र.६ पहिल्या वर्षी घसारा – ₹ १,२५०, दुसऱ्या वर्षी घसारा – ₹ ६,८७५, तिसऱ्या वर्षी घसारा – ₹ ३,७५०, यंत्र विक्रीवरील तोटा – रु, २,५००, यंत्रखात्यावरिल शिल्लक – ₹ २०,६२५

## ७. प्ऱ्हासन अधिक्य पद्धतीवरिल उदाहरणे

प्र.१ पहिल्या वर्षी घसारा – ₹ ८,०००, दुसऱ्या वर्षी घसारा – ₹१६,६५०, तिसऱ्या वर्षी घसारा – ₹ २०,०७०, चौथ्या वर्षी घसारा – रु, १६,०५६, छपाई यंत्रावर बाकी – ₹ ६४,२२४

प्र.२ पहिल्या वर्षी घसारा – ₹ ६,०००, दुसऱ्या वर्षी घसारा – ₹ ६,९००, तिसऱ्या वर्षी घसारा – ₹ ८,७१०, चौथ्या वर्षी घसारा रु, ७,३८१ यंत्रविक्रीवरील तोटा – रु, ३,४२०, यंत्रखात्यावर बाकी – ₹ ६४,४२९.

प्र.3 पहिल्या वर्षी घसारा – ₹ २,५००, दुसऱ्या वर्षी घसारा – ₹२,८५०, तिसऱ्या वर्षी घसारा – ₹ २,७५५, उपस्कर विक्रीवर तोटा – रु, २,१००, उपस्कर खात्यावर बाकी – ₹ २४,७९५

प्र.४ पहिल्या वर्षी घसारा – ₹ २,०००, दुसऱ्या वर्षी घसारा – ₹७,८००, तिसऱ्या वर्षी घसारा – ₹ १२,७६५, प्लँटच्या विक्रीवर तोटा – रु, ४,९३५, प्लँटवर बाकी – ₹ ८२,५००

प्र.५ पहिल्या वर्षी घसारा – ₹ ८,०००, दुसऱ्या वर्षी घसारा – ₹७,५००, तिसऱ्या वर्षी घसारा – ₹ ५,५८०, प्लँटच्या विक्रीवर तोटा – रु, ३,६००, प्लँटवर बाकी – ₹ २२,३२०

## ८. चुकांची दुरूस्ती (Rectification of Errors)

प्र.२ १) एकतर्फी चुका २) अतिरिक्त बेरीज ३) लोप विभ्रम चुका ४) सैध्दांतीक चुका
५) निलंबित खाते ६) भरपाईच्या चुका ७) दुतर्फी चुका, ८) लेख विभ्रम चुका

प्र.३ १) मूळ रोजकिर्द २) दुतर्फी चुका ३) लेख विभ्रम
४) लोप विभ्रम चुका ५) तेरीज पत्रक

प्र.४ बरोबर : १, २, ४, चुक : ३, ५

प्र.५ सहमत – १, ३, ४ असहमत – २, ५.

प्र.६ १) अचूकता २) सैद्धांतिक चूक ३) दुरुस्ती
४) निलंबित खाते ५) चूक

## ८. प्रात्याक्षिक उदाहरणे

**प्र.९** निलंबित खात्याची सुरुवातीची जमा शिल्लक ₹ १,५८०/-.

## ९. स्वामीत्व संस्थेची अंतिम खाती
## (Final Accounts of a Proprietary Concern)

**प्र.२** १) पूर्वदत्त खर्च २) अप्राप्त उत्पन्न ३) निर्गत वाहन व्यय ४) ताळेबंद
५) नफातोटा खाते ६) संवरण स्कंध ७) बुडीत व संशयीत कर्ज निधी ८) अंतिम लेखे
९) विक्री खर्च १०) समायोजना

**प्र.३** १) भांडवल २) नफातोटा ३) ताळेबंद ४) देयता
५) नफातोटा ६) ढोबळ तोटा ७) व्यापार ८) शुद्‌ध नफा
९) कमी १०) सहा

**प्र.४** बरोबर : २, ५ चूक : १, ३, ४

**प्र.५** १) नफातोटा खाते २) ढोबळ तोटा ३) संपत्ती ४) नफातोटा खाते
५) शुद्‌ध परिणाम ६) व्यापार खाते ७) नफातोटा खाते ८) शुद्‌ध तोटा
९) व्यापार खाते १०) विवरण

**प्र.६** १) संयत्र व यंत्र २) ऋणको ३) ऋणको
४) कारखाना भाडे ५) बुडीत व संशयीत कर्जनिधी

**प्र.७** सहमत – १, ५ असहमत – २, ३, ४

**प्र.९** १) ₹ ६०,०५० २) ₹ २,१०० ३) ₹ २१,०००
४) ₹ २,६६७ ५) ₹ २६,८०० (ढोबळ नफा)

## ९. प्रात्याक्षिक उदाहरणे

**प्र.१** ढोबळ नफा ₹ ४०,०००

**प्र.२** शुद्‌ध नफा ₹ ५४,०००

**प्र.३** ढोबळ नफा ₹ २,८१,०००, शुद्‌ध नफा ₹ २,०५,७००, ताळेबंदाची बेरीज ₹ ४,४०,८००

**प्र.४** ढोबळ नफा ₹ ५५,२००, शुद्‌ध नफा ₹ ८,२२०, ताळेबंदाची बेरीज ₹ ४,७३,४२०

**प्र.५** ढोबळ नफा ₹ ७५,६००, शुद्‌ध नफा ₹ ५५,५००, ताळेबंदाची बेरीज ₹ २,७९,३००

**प्र.६** ढोबळ नफा ₹ ३,६५०, शुद्‌ध तोटा ₹ २,९४२, ताळेबंदाची बेरीज ₹ ५१,७३०

**प्र.७** ढोबळ नफा ₹ ७९,५००, शुद्‌ध नफा ₹ २८,२४५, ताळेबंदाची बेरीज ₹ २,२८,१२०

**प्र.८** ढोबळ नफा ₹ १,०९,८००, शुद्‌ध नफा ₹ ४९,२४०, ताळेबंदाची बेरीज ₹ ३,०१,८४०

**प्र.९** ढोबळ नफा ₹ १६,५४,२००, शुद्‌ध नफा ₹ १२,८४,५२५, ताळेबंदाची बेरीज ₹ २९,२९,५२५

**प्र.१०** ढोबळ नफा ₹ १,००,२००, शुद्‌ध नफा ₹ ४८,००० ताळेबंदाची बेरीज ₹ १,५४,१२५

**प्र.११** ढोबळ नफा ₹ ५५,०००, शुद्‌ध तोटा ₹ १,१४,७००, ताळेबंदाची बेरीज ₹ ९,३५,५००

**प्र.१२** ढोबळ नफा ₹ ३१,७००, शुद्‌ध नफा ₹ २०,७८०, ताळेबंदाची बेरीज ₹ १,५३,४८०

**प्र.१३** ढोबळ नफा ₹ ३१,०००, शुद्‌ध नफा ₹ २३,४०३, ताळेबंदाची बेरीज ₹ १,४१,१२५

**प्र.१४** ढोबळ नफा ₹ ५४,९३०, शुद्‌ध नफा ₹ ३६,६३३, ताळेबंदाची बेरीज ₹ २,८६,१०८

**प्र.१५** ढोबळ नफा ₹ २०,७००, शुद्‌ध नफा ₹ ६,६१०, ताळेबंदाची बेरीज ₹ १,२३,१७०

## १०. एकेरी नोंद पद्धती (Single Entry System)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्र.२ | १) अवस्था विवरण, | २) एकेरी नोंद पद्धती, | ३) प्रारंभिक अवस्था विवरण, | ४) भांडवल, |
| | ५) नफा, | ६) एकेरी नोंद पद्धती | ७) एकेरी नोंद पद्धती, | ८) अतिरिक्त भांडवल. |
| प्र.३ | १) अवस्था विवरण | २) प्रारंभिक देयता | ३) वजा | ४) एकल व्यापारी |
| | ५) अधिक | ६) भांडवल | ७) नफा | ८) ₹ ३२,००० |
| प्र.४ | **बरोबर** – १, ४, ५ | **चूक** – २, ३ | | |
| प्र.५ | सहमत – ३, ४ | असहमत – १, २, ५. | | |
| प्र.६ | १) ताळेबंद | २) प्रारंभिक भांडवल | ३) अधिक | ४) द्विनोंदपद्धत |
| | ५) भांडवल | ६) एकल व्यापारी | ७) वजा | ८) लहान |
| प्र.७ | १) अदत्त खर्च | २) देयतेचे अधिमूल्यन | ३) व्यापारातील मालसाठा | |
| प्र.८ | १) ₹ ५,००० | २) ₹ ३०,००० | ३) ₹ ५,००० | |
| | ४) ₹ २५,०००, ₹ २०,००० | | ५) ₹ १९,००० | |

## १०. प्रात्याक्षिक उदाहरणे

प्र.१ वर्षाचा शुद्ध नफा ₹ ३०,०००

प्र.२ प्रारंभिक भांडवल ₹ १,२७,०००, अंतिम भांडवल ₹ २,३१,०००, वर्षाचा शुद्ध नफा ₹ १,२३,३००

प्र.३ प्रारंभिक भांडवल ₹ २२,०००, वर्षअखेरचे भांडवल ₹ २९,६००, वर्षाचा शुद्ध नफा ₹ १३,७५०

प्र.४ प्रारंभिक भांडवल ₹ १,२२,०००, वर्षअखेरचे भांडवल ₹ २,३२,०००, वर्षाचा शुद्ध नफा ₹ १,३४,५००

प्र.५ प्रारंभिक भांडवल ₹ ४८,०००, वर्षअखेरचे भांडवल ₹ १,३९,०००, वर्षाचा शुद्ध नफा ₹ ७७,७५०

प्र.६ अंतिम भांडवल ₹ १,०२,०००, वर्षाचा शुद्ध नफा ₹ ७०,१५०

प्र.७ अंतिम भांडवल ₹ १,७१,५००, शुद्ध नफा ₹ १२,७७५

प्र.८ प्रारंभिक भांडवल ₹ २,३२,०००, अंतिम भांडवल ₹ २,८८,०००, शुद्ध नफा वर्षाचा ₹ ६९,०००

प्र.९ प्रारंभिक भांडवल ₹ १,६७,५००, अंतिम भांडवल ₹ २,२६,०००, शुद्ध नफा ₹ ३५,२००

प्र.१० प्रारंभिक भांडवल ₹ ३३,५००,अंतिम भांडवल ₹ ३५,४००, वर्षाचा शुध्द नफा ₹ ६,४००

किरकोळ धनको

एकल व्यापारी संस्था

लेखांकिय मानांकने

वस्तू व सेवाकर

शुद्ध मूल्य

बँक मेल पत्रक

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे–४११००४.

₹ 203.00